

चंद्रपूरच्या महाकालीची लोकपरंपरा

# माय धुरपता

संजीव भागवत



महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई



चंद्रपूरच्या महाकालीची लोकपरंपरा

# माय धुरपता

संजीव भागवत

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

❖ **पुस्तकाचे नाव** : चंद्रपूरच्या महाकालीची लोकपरंपरा माय धुरपता

❖ **लेखक** : संजीव पंढरीनाथ भागवत

❖ **आयएसबीएन** : 978-93-93599-93-3

❖ **प्रथमावृत्ती** : २०२४

❖ **प्रकाशक** :

सचिव,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ
रवींद्र नाट्य मंदिर इमारत, दुसरा मजला,
पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी आवार,
सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई - ४०००२५

❖ © **प्रकाशकाधीन** :

❖ **मुद्रक** :

व्यवस्थापक,
शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय,
मुंबई -४००००४.

❖ **किंमत** : रु. १७४.००

या पुस्तकात व्यक्त केलेली मते स्वतः लेखकाची असून, या मतांशी महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ व महाराष्ट्र शासन सहमत असेलच असे नाही.

# अध्यक्षांचे निवेदन

'चंद्रपूरच्या महाकालीची लोकपरंपरा माय धुरपता' हा ग्रंथ चंद्रपूर आणि मराठवाड्यासह आजूबाजूच्या आंध्र प्रदेश, तेलंगणा, कर्नाटक आदी राज्यातील लोकसंस्कृतीचा दुवा साधणारा ग्रंथ आहे. मातृदेवता आणि त्यांचे अस्तित्व सर्वसामान्यांमध्ये अजूनही कसे अबाधित आहे, याचा दाखला हा ग्रंथ देतो. हजारो वर्षांपासून गावकुसाबाहेर, चौरस्त्यावर, नदीकाठी, डोंगरदऱ्यांत असलेल्या मातृदेवता आणि त्यांची लोकपरंपरा जिवंत ठेवणाऱ्या देवकरीण-पोतराज यांची लेखकाने दखल घेत त्यांच्या नोंदी केल्या आहेत. त्यांची माहिती गोळा करून त्यांच्याकडील मौखिक साहित्य उजेडात आणले आहे. त्यांचा 'चंद्रपूरच्या महाकालीची लोकपरंपरा माय धुरपता' ग्रंथ हा पुढील लोकसाहित्याचे अभ्यासक, संशोधकांसाठी एक दिशादर्शक ठरेल.

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने या संशोधनपर ग्रंथाचे स्वागत केले आहे. प्रस्तुत ग्रंथाचे प्रकाशन मंडळाने केले आहे. जाणकार, अभ्यासक आणि जिज्ञासू वाचकही या ग्रंथाचे स्वागत करतील असा विश्वास वाटतो.

**डॉ. सदानंद मोरे**

अध्यक्ष

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

हजारो वर्षांपासून मातृदेवतांची परंपरा जतन
करणाऱ्या अनाम पोतराज-देवकरणींना!

# अनुक्रम


निवेदन ३

प्रस्तावना ९

मनोगत १३

विभाग पहिला : विश्लेषणात्मक मांडणी १८

१. पोतराज-देवकरीण १९

पोतराज-देवकरीण, दीक्षा,आरती,
शाक्त-तांत्रिक, वीर कंगन-दंडकडे, बावन्न वीर

२. महाकाली : एक गुह्यवासिनी ६९

शैलगृहे, चौरस्त्यावरील मातृदेवता,
लेण्यातील महाकालीची मंदिरे

३. सप्तमाता आणि जलदेवता ८१

सात देवता, साती आसरा, शंभूची परंपरा,
निर्ऋती, हरिती, मातृपरंपरा

४. धुरपतामाय : शाक्त तांत्रिकांची परंपरा १०१

तंत्र, तांत्रिक, कृषिमाया, निसर्ग पूजा

५. धुरपतामाय आणि देवी हरिती १२१

हरितीची मंदिरे, शिल्प आदींची माहिती

विभाग दुसरा : लोकपरंपरेचा स्थळ अहवाल १३१

आंध्र प्रदेश, तेलंगणा, मराठवाडा, विदर्भातील
स्थळांना भेटी देऊन मिळवलेली माहिती तसेच
पोतराज, देवकरीण व त्यांचा ग्राऊंड रिपोर्ट

**६. योगिनी : देवकरीण** १३२
१. राजामाय, २. भागामाय, ३. श्रावण्या पोतराज,
४. यमुनामाय, ५. देवयमाय, ६. विठामाय,
७.रुकमामाय, ८. म्हादामाय

**७. धुरपतामायची मौखिक परंपरा** २२३
मराठवाड्यासह आंध्र प्रदेश, तेलंगणाच्या
अनेक जिल्ह्यातील महिला पोतराजांची गाणी

**८. अंगात येणे : नेणिवेचा आविष्कार** २९३
गंधर्व, मातृदेवता, पोतराज, देवकरीण

**विभाग तिसरा : परिशिष्ठ** ३०८

**९. पोतराजविरोधातील संघर्ष** ३०९
१९८४ सालातील चंद्रपूरच्या यात्रेतील संघर्ष,
सहभागी कार्यकर्त्यांकडील माहिती

**१०. गोंड राजे आणि चंद्रपूर** ३१३
गोंड राजे, खांडक्या बल्लाळशहा,
राणी हिरातानी, राणी हिराई,

**११. महाकाली मंदिर आणि स्थापत्यकला** ३२५
राणी हिराईचे योगदान, गोंडकालीन
चित्र-शिल्प, मंदिराची रचना

**संदर्भसूची** ३३१

**शब्दसूची** ३३५

# प्रस्तावना

'चंद्रपूरच्या महाकालीची लोकपरंपरा माय धुरपता' (चंद्रपूरची शाक्तपंथीय महाकाली) या ग्रंथाचे रचियता संजीव भागवत यांनी अनेक शक्ती स्थळांना प्रत्यक्ष भेट देऊन मोठ्या श्रमाने संग्रहित केलेली ही ग्रंथरचना आहे. गावकुसाबाहेर ठेवलेल्या दुर्लक्षित लोकसाहित्यास न्याय देणारी एक सुंदर रचना ठरावे असेच या ग्रंथाचे स्वरूप आहे.

प्राचीन काळातील उपासनेत देवी उपासनेला महत्त्वाचे स्थान होते. त्याचे मुख्य कारण मानवस्त्रीचे महत्त्वाचे स्थान हे होय. मातेच्या रूपातील देवी ही जन्म आणि संवर्धनाकरिता जबाबदार मानले जाते. तसेच ती शत्रूंचा संहारकर्ती म्हणूनही मान्यता आहे. देवी उपासना केवळ भारतातच आहे असे नव्हे, तर भारताबाहेरही तिची उपासना मोठ्या प्रमाणात चालू आहे. माय धुरपता शाक्तपंथातील शक्ती हे जगाचे आदिकारण समजून तिच्यापासून जगनिर्मिती झाली अशी धारणा सर्वमान्य आहे.

लोकसाहित्यातील माय धुरपता, महाकाली हे दुर्लक्षित मौखिक साहित्य प्रथमच जनतेसमोर मांडण्याचा प्रयत्न लेखकाने केलेला दिसतो. अर्थात लिखित साधनाच्या अभावी त्यात काही उणिवा असण्याची शक्यता नाकारता येत नाही. परंतु लेखकाने केलेला प्रयत्न निश्चितच वाखाणण्याजोगा आहे. किंबहुना असे म्हणता येईल की, लेखनाचा केलेला हा उपक्रम आरंभबिंदू मानून पुढच्या संशोधकास मार्गदर्शक ठरेल अशी या ग्रंथाची रचना आहे.

ही ग्रंथरचना करताना लेखकाने केवळ ऐकीव, मौखिक माहिती आधारभूत न धरता त्याकरिता संदर्भ आधारग्रंथाचासुद्धा पुरेपूर उपयोग केला आहे. त्यात यापूर्वीचे संदर्भग्रंथ, लेखक डी. डी. कोसंबी, प्राच्यविद्यापंडित शरद् पाटील, डॉ. रघुनाथ बोरकर, डॉ. नीरज साळुंखे, डॉ. नवनाथ शिंदे, रा. चिं. ढेरे, डॉ. सुनील राठोड, डॉ. सरोजिनी बाबर इत्यादी लेखकांच्या संदर्भग्रंथांचा सबलीकरण करण्याकरिता पुरेपूर वापर केला आहे.

ग्रंथाची रचना तीन विभागात केलेली असून पहिल्या भागात विषयाची विश्लेषणात्मक मांडणी केली आहे. यात पोतराज, देवकरीण, देवकर

यांचेबद्दल माहिती दिली असून धार्मिक रीती-रिवाजाचे लेखकाने सुंदर वर्णन केले आहे. त्यात बावन्न वीर याबाबतचे वर्णन विलोभनीय असे आहे. मातृपरंपरेत जलदेवता, सप्तमाता, मातृदेवता, साती आसरा, निर्ऋती, हरिती आणि शंभूची परंपरा यात धुरपतामायचा समावेश, धुरपतामाय ठिकाणांचा उल्लेख, लेखकाने स्वतः त्या ठिकाणी जाऊन मिळवलेली माहिती कौतुकास्पद आहे. आसरा, नदीदेवता आणि जलदेवता, सृष्टी निर्माण भूमातांचा संबंध धुरपतामायशी जोडण्याचा प्रयत्न लेखकाने केला आहे. तसेच पंचमहाभूतांची पूजा आणि निसर्गाशी साधर्म्य यात माय धुरपताचे महत्त्व विशद केले आहे.

माय धुरपता ही शाक्त तांत्रिकांची परंपरा आहे. त्याचा संबंध जलदेवता निसर्गदेवता कृषीमायाशी असून याकरिता शरद् पाटील यांच्या ग्रंथाचा पुरेपूर वापर करून देवकरीणला मातृसत्ताक परंपरेशी जोडण्याचा लेखकाने प्रयत्न केला आहे. अतिमागासलेल्या मांग समाजातील पोतराज, देवकरीण, देवकर यांचा संबंध मातृसत्ताक परंपरेशी जोडून ब्राह्मणेतर समाजात त्यांना असलेले महत्त्व, स्थान याबाबतचे वर्णन मागासलेल्या समाजाला न्याय देणारे ठरते.

महाराष्ट्र व महाराष्ट्र बाहेरील गावात मौखिक लोकगीतात संग्रहित असलेली माहिती गोळा करून त्यात नमूद मातृदेवता धुरपताचे महत्त्व, तिचे निसर्ग, जलदेवता, शाक्त संप्रदायातील काली, महाकालीशी असलेले साधर्म्य, विद्या व अविद्या यामुळे मानव सृष्टीवर होणारा परिणाम, जगनिर्मिती काली, तिचे नऊ भेद, जन्म आणि मृत्यूशी असलेला संबंध, वैदिकांच्या विरोधातील धुरपतामायची परंपरा, धुरपतामाय आणि हरिती गौरी इत्यादी बाबतचा ज्ञात-अज्ञात इतिहास धुरपतामायच्या लोकगीतातून मांडून तो प्रकाशात आणण्याचा प्रयत्न या ग्रंथाच्या माध्यमातून प्रथमच केलेला दिसतो. या परंपरेतील राजामाय, भागामाय, विठामाय, यमुनामाय, देवयमाय, रुकमामाय, म्हादामाय या योगिनी आणि देवकरीण यांचेबद्दल लोकगीतातून मिळविलेली माहिती वाचनीय आहे.

वैशाखी पौर्णिमेला बौद्धधर्मात जसे महत्त्वाचे स्थान आहे, त्याचप्रमाणे धुरपतामायच्या भक्तांनासुद्धा वैशाखी, चैत्र आणि आषाढी पौर्णिमा महत्त्वाची आहे. या दिवशी अनेक भक्तिमय कार्यक्रम करून धुरपतामायचे

स्मरण केले जाते. वारकऱ्यांचे आराध्य दैवत पंढरपूरचा पांडुरंग यांचा संबंध धुरपतामायशी जोडून धुरपता ही विठ्ठलाची बहीण असल्याचे ग्रंथातील विधान संशोधकास चिंतन व मनन करण्यास बाध्य करते.

धुरपतामायची चळवळ ही वैदिक परंपरेच्या विरोधातील असून वारकरी संप्रदायाशी जवळीक साधणारी, समांतरपद्धतीने आजतागायत चालत आलेली दिसते, असे विधान नव्यानेच लेखकाने मांडण्याचा प्रयत्न केला आहे. पोतराज, देवकरीण आणि देवकर ही मंडळी प्रामुख्याने अस्पृश्य आदी समाजातील तर आहेतच, याशिवाय त्यांना शिक्षणाची फारशी संधी मिळाली नाही, त्यामुळे ते मागे राहिले अशी खंत लेखक करीत असले तरी त्यांनी कायमच मौखिक परंपरेवर भर देऊन मौखिक साहित्य टिकविण्याचा प्रयत्न केलेला दिसतो ही विशेष बाब होय. या लोकांनी जगण्याचा संघर्ष करीत प्रसंगी हालअपेष्टा, कायम आणि उपेक्षा सहन करतच पोतराज देवकर यांनी शब्दपरंपरेचे वैभव टिकून ठेवलेले आहे. वैदिकांशी कायमच संघर्ष करून गावकुसाबाहेरील आणि आतील प्रामुख्याने महिलांनी जतन केलेली ही मौखिक साहित्यपरंपरा टिकवून ठेवणे पुढच्या पिढीचे आद्य कर्तव्य ठरते.

अंगात येणे : नेणिवेचा आविष्कार या प्रकरणात एक वेगळा विचार लेखकाने मांडण्याचा प्रयत्न केला आहे. त्याचा वैज्ञानिक दृष्टीने विचार होणे आवश्यक असल्याचे लेखकाचे मत विचार करण्याजोगे आहे. याशिवाय लेखक अशी आग्रही भूमिका मांडतात की, नैसर्गिक मालमत्तेची नासाडी देवपूजेत करणे, दही, दूध, तूप, तेल यांची नासाडी करून त्यास जनमान्यता देणे हे अनुचित आहे. लेखकाच्या या मतास मान्यता देणे योग्यच ठरेल. भोळ्याभाबड्या जनतेचे देवाच्या नावाखाली फसवणूक करून लूटमार केली जाते अशा प्रथांवर, त्यास प्रोत्साहन देणाऱ्या संघटनांवर बंदी घालणे आवश्यक असल्याचे लेखकाचे मत परिवर्तनवादी आहे. त्याची अंमलबजावणी होणे आवश्यक वाटते.

एकंदरीतच या ग्रंथाच्या वाचनाने धुरपता मातेची ओळख तर होतेच, पण ती करून देताना लेखकाने ग्रंथनिर्मितीसाठी घेतलेले श्रम, माहिती गोळा करण्याची जिज्ञासा व तिचा सर्वांगीण उपयोग व्हावा तसेच वैदिक प्रथा, परंपरासंदर्भातील मांडलेली भूमिका वाखाणण्याजोगी आहे.

आत्तापर्यंत उजेडात न आलेली माहिती आणि तिचा आवाका लक्षात घेता त्या दृष्टीने मला त्यांचे लेखन फार आवडले. वाचकांनाही ते आवडेल यात शंका नाही. शेवटी लेखकाच्या पुढील वाटचालीला शुभेच्छा देऊन माझी लेखणी इथेच थांबविते.

धन्यवाद!

**डॉ. रघुनाथ रा. बोरकर**
सेवानिवृत्त अभिरक्षक,
पुरातत्त्व व वस्तुसंग्रहालय विभाग,
महाराष्ट्र राज्य

# मनोगत

'चंद्रपूरच्या महाकालीची लोकपरंपरा माय धुरपता' हे लोकपरंपरेवर प्रकाशित होणारे माझे पहिलेच पुस्तक. चंद्रपूर येथील महाकाली देवीला लोकपरंपरेत धुरपता म्हणतात. या धुरपतामायच्या लोकपरंपरेवर प्रकाश टाकण्यासाठी केलेला हा एक छोटासा प्रयत्न आहे. मरिआई, पोचेमाय, सातीआसरा, सप्तमाता या गावाबाहेर, चौरस्त्यावर, नदीकाठी असणाऱ्या मातृदेवता. देवी हरिती, देवी निर्ऋती या सर्वच मातृदेवता या एकाच परंपरेतील असून प्रत्येकांचे एक-दुसऱ्यांशी अतूट नाते आहे. इतकेच नव्हे, तर अधिक खोलात गेल्यास एकच परंपरा या विविध भौगोलिक ठिकाणी वेगवेगळ्या नावांनी सुरू राहिलेल्या असल्याचे दिसते. त्याच्या ठिकाणी कृषिमाया आणि निसर्गमायेचे एकसमान सूत्र दिसून येते.

मागील काही हजार वर्षांमध्ये अनेक प्रकारची धार्मिक, राजकीय स्थित्यंतरे घडली. महाराष्ट्रात बाराव्या शतकानंतर आणि त्यापूर्वी अनेक प्रकारच्या धार्मिक, वैदिकविरोधी चळवळी उदयाला आल्या. महात्मा चक्रधर स्वामींचा महानुभव पंथ, महात्मा बसवेश्वरांची लिंगायतधर्माची चळवळ, भागवतधर्माची वारकरी चळवळ, अशा अनेक चळवळींनी समाजमन ढवळून निघाले. त्या काळांमध्ये समाजप्रबोधनासोबतच भक्तीमार्गासाठी या चळवळींचे खूप मोठे योगदान राहिले. अशी अनेक प्रकारची स्थित्यंतरे सुरू असतानाही आपले अस्तित्व आणि आपली वेगळी ओळख निर्माण करून धुरपतामायची चळवळ आजतागायत लोकपरंपरेच्या माध्यमातून कायम जपून आहे. ती ओळख आणि त्यातील उत्सुकता मला हे पुस्तक लिहायला महत्त्वाची ठरली. या पुस्तकाच्या निमित्ताने गावोगाव फिरताना, संदर्भ शोधताना जे दिसले ते मी साधेपणाने मांडले. त्याचे संदर्भही दिले. काही बाबी आख्यायिका, चमत्कारांच्या आणि लोककथांच्या माध्यमातून जिवंत असल्याने त्या आहेत तशाच मांडणे अपरिहार्य होते. म्हणून हे पुस्तक तीन भागांमध्ये केले आहे. लोकपरंपरा, लोकसाहित्य आणि एकूणच लोककथांमध्ये मोडतोड न करता तशाच मांडण्याचा माझा प्रयत्न राहिलेला आहे.

मराठवाड्यात चंद्रपूरच्या महाकालीची मोठी परंपरा आणि त्या

चळवळीचा प्रभाव राहिला आहे. नांदेड, लातूर, बीड, जालना, परभणी, उस्मानाबाद, औरंगाबाद या जिल्ह्यांतील प्रत्येक गावांत प्रामुख्याने 'मांग, महार, माळी, साळी, कोळी, कुंभार, बंजारा, सालेवार, वंजारी, घिसाडी, मराठा, कुणबी आदी समाजात मुलींचे अथवा महिलांचे नाव हे 'धुरपता' ठेवले जाते. या पुस्तकाच्या निमित्ताने मराठवाड्यातील परभणी, नांदेड, लातूर तसेच आंध्र प्रदेश, तेलंगणातील करीमनगर, कामारेड्डी, निझामाबाद आणि कर्नाटकच्या बीदर आदी जिल्ह्यांमध्ये फिरताना या नावाबद्दल सारखेपणा आढळून आला. अनेकांच्या घरांमध्ये 'धुरपता' हे नाव आदराने ठेवतात.

परभणीपासून सात मैलाच्या अंतरावर गंगाखेड रोडवर असलेल्या दैठणा या गावी मराठा समाजातील विठामाय नावाच्या देवकरीण होऊन गेल्या. आज त्यांच्यावरील मौखिक परंपरा आणि गाणी याची संख्याही अगणित आहे. दैठण्यापासून काही कि.मी.च्या अंतरावर संत जनाबाई यांचे समाधीस्थळ आहे. संत जनाबाई यांच्या अभंगांची ज्याप्रमाणे नोंद त्यांच्या काळात झाली, तशी विठामाय देवकरीण यांचीही झाली असती तर एकीकडे भक्तीपरंपरेची आणि दुसरीकडे लोकपरंपरेच्या चळवळीची मोठी परंपरा समोर आली असती. गंगाखेडच्या पूर्वेला असलेल्या इरळद-नरळद या गावी होऊन गेलेल्या देवयमाय या देवकरीण यांच्याबद्दलही असेच घडले. 'कुंभार समाजातील देवयमाय धुरपतामायच्या परंपरेतील मोठ्या शिलेदार राहिल्या आहेत.' एकाच वेळी वारकरी चळवळ आणि मातृपरंपरेतील दुवा साधण्याचे मोठे कार्य देवयमायने केले होते. याच जिल्ह्यातील रामपुरीच्या भागामायनेही मोठी परंपरा चालविली होती. आज विठामाय, भागामाय, राजामाय, रुकमामाय, देवयमाय या सर्वच योगिनींच्या समाधीस्थळांपर्यंत प्रत्यक्ष गेल्यानंतर त्यांनी केलेला मातृदेवतांच्या चळवळीचा, त्यासाठी आयुष्य समर्पित केलेला त्यांचा संघर्ष लक्षात आला. असंख्य वेळा भिक्षा गोळा करून गोरगरीबांना जगवणाऱ्या या योगिनींनी समाजाला जगण्याची उमेद दिली होती. म्हणूनच त्यांच्या परंपरेत कुठेही निराशा वा नाउमेद दिसत नाही.

**'धुरपताचं नाव बाई, मी घेतो हरघडी,**
**उभा मझ्या पाठीमागं, माय धुरपता...'**

आमची 'माय' ही आमच्या कायम पाठीमागे असते, तिच्या नावातून, स्मरणातून आम्हाला जगण्यासाठी बळ मिळते, अशी भावना महिला व्यक्त करतात. स्वतः अशिक्षित असलेल्या देवयमायने मातृपरंपरेतील योगदानासाठी आयुष्य वेचले होते. 'धुरपतामायची आरती' ही देवयमाय यांच्याच नावाने केली जाते. यामुळे त्यांचे या चळवळीत मोठे योगदान राहिलेले असतानाही त्यांचीही नोंद झाली नाही.

चंद्रपूरची यात्रा ही नांदेड जिल्ह्यातील तळेगाव येथील सालेवार समाजाच्या राजामाय, शेलगावच्या (कोळी) भोई समाजाच्या यमुनामाय या देवकरणींनी सुरू केली असल्याचे सांगितले जाते. येळेगाव येथील मराठासमाजाच्या रुकमामाय अशा सर्वच देवकरणींनी आपल्या काळात धुरपतामायची परंपरा चालविण्याचे मोठे कार्य केले होते. आपल्यासोबत लाखो जणांचा मेळा, लोकसंग्रह जमवण्याची किमया या देवकरणींनी घडवून आणली होती. लोकपरंपरेचे इतके उच्च कोटीचे कार्य करूनही त्या कायमच दुर्लक्षित राहिल्या. त्यामुळे या लोकपरंपरेचे लोकसाहित्य मला जे संग्रहीत करता आले, ते जसेच्या तसे आणि आहे त्या स्वरूपात त्याची कुठे तरी नोंद व्हावी, हा यामागचा माझा प्रयत्न आहे.

भारतीय वैदिक परंपरा ही पुरुषसत्ताक राहिल्याने स्त्रीसत्ताक असलेल्या मातृपरंपरा या कायमच उपेक्षित राहिल्या. असंख्य वेळा त्यांची नोंद करताना चुकीची, भीतीदायक आणि वैदिकांच्या हितासाठीची करण्यात आली आहे. त्यातून त्यांची बदनामी करून कायमचे बहिष्कृतही करण्यात आले. प्राच्यविद्यापंडित शरद् पाटील यांच्या संशोधनामुळे काळाच्या ओघात गडप करण्यात आलेला मातृपरंपरेचा इतिहास पुन्हा एकदा उजेडात आला. त्यामुळे या परंपरांकडे बघण्याचा एक नवा दृष्टिकोण मिळाला. मातृदेवतांची ही परंपरा मौखिक गाण्यातून एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे प्रवाहित कशा राहतील, याची त्या-त्या काळातील प्रत्येक पोतराज, योगिनी, देवकरीण आदींनी काळजी घेतली. वैदिकांशी अनेकदा संघर्ष करूनही आपल्या परंपरेला जिवंत ठेवण्याचे महान कार्य पोतराज-देवकरीण, योगिनींनी केले. त्यांच्या या ऐतिहासिक कार्याची दखल घेऊन खरे तर समाजाने ऋण व्यक्त करायला पाहिजे; परंतु त्यांना कायमच दुय्यमपणाची वागणूक मिळाली. मातृदेवतांच्या परंपरेचे

वाहक बनलेल्या, काळाच्या ओघात गडप झालेल्या लाखो पोतराज-देवकरीण यांपैकी एकाचीही नोंद होऊ शकली नाही. या पुस्तकाच्या निमित्ताने काही वाहकांची नोंद करण्याचा माझा हा अल्पसा प्रयत्न आहे.

'चंद्रपूरच्या महाकालीची लोकपरंपरा माय धुरपता' हे पुस्तक लिहिण्यामागे खरी प्रेरणा ही शरद् पाटील यांची होती. दुसरी प्रेरणा ही आई अनुसयाबाई हिची. पाटील यांच्या संपर्कात आल्यानंतर मला मातृदेवतांचा नव्याने उलगडा झाला. त्यांच्या 'दास-शूद्रांची गुलामगिरी' या पहिल्या खंडानेच मी भारावून गेलो. त्यांच्याजवळ अनेकदा चर्चा केली आणि पुढे कामाला लागलो, परंतु नोकरीच्या व्यग्रतेत पुस्तकाचे काम बरेच वर्षे रखडत गेले. चंद्रपूरला गेल्यानंतर मला ज्येष्ठ पुरातत्त्व व इतिहास संशोधक डॉ. रघुनाथ बोरकर यांचे मार्गदर्शन मिळाले. ''महाकालीसंदर्भात मांडणी करताना ती शाक्त आणि तांत्रिक यांच्या परंपरेच्या माध्यमातूनच करावी लागेल, तरच त्यातून काही उलगडा होऊ शकतो,'' असे बोरकर म्हणाले, ते त्यांचे मार्गदर्शन माझ्यासाठी महत्त्वाचे ठरले.

या पुस्तकाच्या संकल्पनेबद्दल पहिल्यांदा आमचे मित्र आणि ज्येष्ठ पत्रकार प्रमोद चुंचूवार यांच्याशी बोलणे झाले. त्यांच्या सहकार्यामुळे अनेकदा चंद्रपूरला जाऊन धुरपतामायची यात्रा, परिसर पाहता आला. संदर्भग्रंथ, मिळवता आले. आई लीलाबाई चुंचूवार यांचेही खूप सहकार्य मिळाले. अक्षरओळख नसलेल्या परंतु हजारो वर्षांची मौखिक परंपरा जतन केलेल्या पोतराज-देवकरीण यांची मदत मिळाली. मी हे पुस्तक मातृदेवींच्या या उपासकांना अर्पण केले आहे. परभणी जिल्ह्यातील सोनपेठ तालुक्यात असलेल्या थडी पिंपळगावच्या जलसामाय कदम, वाडी पिंपळगावचे पोतराज कोंडिबा कांबळे यांचे सहकार्य लाभले. विठामाय, भागामायची माहितीही यांच्यामुळे मला शोधता आली.

तळेगावच्या राजामायचे वारसदार बालाजी महाराज, रुकमामायच्या वंशजांनीही यासाठी सहकार्य केले. तर कोंडिबा कांबळे यांनी आपल्या गावी आपल्याच घरी गाणे समजून घेण्यासाठी अनेकदा देवकर, देवकरीण यांना बोलावून कार्यक्रमांचे आयोजन केले. कुंभारीचे देवकर दिलीप चव्हाण यांच्यामुळे येथील परिसर फिरता आला. पाथरी जवळील खेडुळा येथील शंकर उर्फ बंडू देवकर, वाघाळ्यातील नवनाथ देवकर, शिरू

देवकर, साशिंदर (पिनू) शिंपले, कारभारी बाबा बोबडे यांच्याकडून अनेक गाणी समजून घेता आली. त्याचे संकलन करता आले. देवकरीण विठामायची मुलगी रुकमामाय यांना अनेकदा भेटता आले. त्यांच्याकडूनही अनेक आठवणी ऐकता आल्या. चित्रकार नीलेशने मुखपृष्ठ तयार करून दिले. राज्यात आणि परराज्यातील अनेक गावांमध्ये फिरण्यासाठी माझी सहचारिणी शीतल, मुलगा सिद्धार्थ आणि मुलगी निर्ऋती यांनीही मला बळ दिले.

राज्यातील आणि परराज्यातील अनेक अनाम अशा देवकर, पोतराज-देवकरीण आदींनी त्या-त्या गावखेड्यात, चंद्रपूरच्या यात्रेत मला खूप सहकार्य केले, त्यांचा मी ऋणी आहे. ज्येष्ठ साहित्यिक राजाराम सूर्यवंशी यांच्यामुळे धुरपतामाय आणि देवी हरितीचे साम्य स्पष्ट करता आले. नागपूरचे ज्येष्ठ संशोधक चंद्रकांत वानखेडे यांनी वेळोवेळी मार्गदर्शन केले. या पुस्तकाच्या निर्मितीसाठी ज्येष्ठ अभ्यासक रवींद्र घोडराज, यांचे मोलाचे सहकार्य मिळाले. या पुस्तकाला खरे तर शरद् पाटील यांची प्रस्तावना घेण्याचे ठरले होते, परंतु ती काळाने संधी दिली नाही, ती उणीव ज्येष्ठ पुरातत्त्व संशोधक डॉ. रघुनाथ बोरकरसरांनी भरून काढली. या ग्रंथाला ज्येष्ठ विचारवंत व संस्कृत साहित्याचे गाढे अभ्यासक डॉ. आ. ह. साळुंखेसरांनी दिलेला शुभसंदेश (ब्लर्ब) माझ्यासाठी मोठा सन्मान आहे. महाराष्ट्र शासनाच्या महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने हा ग्रंथ प्रसिद्धीकरिता स्वीकारून माझ्या अल्पशा प्रयत्नाला पाठबळ दिल्याबद्दल मंडळाचे मी आभार व्यक्त करतो.

***

विभाग पहिला : विश्लेषणात्मक मांडणी

## १. पोतराज, देवकरीण

पोतराज-देवकरीण, दीक्षा,आरती,
शाक्त-तांत्रिक, वीर कंगन-दंडकडे, बावन्न वीर

## २. महाकाली : एक गुह्यवासिनी

शैलगृहे, चौरस्त्यावरील मातृदेवता,
लेण्यातील महाकालीची मंदिरे

## ३. सप्तमाता आणि जलदेवता

सात देवता, साती आसरा, शंभूची परंपरा,
निर्ऋती, हरिती, मातृपरंपरा

## ४. धुरपतामाय : शाक्त तांत्रिकांची परंपरा

तंत्र, तांत्रिक, कृषिमाया, निसर्ग पूजा

## ५. धुरपतामाय आणि देवी हरिती

हरितीची मंदिरे, शिल्प आदींची माहिती



# १

# पोतराज-देवकरीण

**'धुरपताचं नाव बाई, मी घेतो हरघडी,**
**उभा मझ्या पाठीमागं, माय धुरपता...'**

मातृदेवता म्हणून धुरपतामायवर अशा प्रकारची शेकडो गाणी, कवने, आरत्या महिला गातात. ही 'धुरपतामाय' म्हणजे चंद्रपूरची, गडचांद्याची देवी, महाकाली. तिला मराठवाड्यात 'धुरपतामाय' याच नावाने ओळखतात. या गाण्यातून येणारी 'धुरपता' ही लाखो भक्तांची माय, बहीण, पाठीराखी असते. तिच्यामुळेच आमच्या शेकडो पिढ्या जिवंत आहेत व तीच आमच्या पिढ्यांची, गणांची रक्षणकर्ती असल्याची भावना देवकरणींच्या गाण्यांमधून व्यक्त होते. कोणत्याही संकटाला ती धावून येणारी आणि कधी आपल्याच भक्तांवर रुसणारी, कधी रागावणारी असते.

उठता-बसता तिचं नाव घेताना तिच्या भक्तांना जे सुख मिळते, त्याची तुलना इतर कोणत्याही भौतिक सुखाशी करता येत नाही. सर्व काही सुख दुःख हे तिच्या नावात असते. तिच्या नावाच्या उच्चारात असते. तिच्यामुळे आमच्या शेकडो डोइं, कुळं जिवंत आहेत, अशा स्वरूपाची अगाध भावना यामागे असते. ही भावनाच लाखो पोतराज, देवकरीण आणि देवकरांच्या श्रद्धेचा मुख्य केंद्रबिंदू. तिच्याविषयी असलेल्या आदरभावाचे, प्रेमाचे गाणेही तितकेच लक्ष वेधते.

धुरपतामायची ही गाणी प्रामुख्याने देवकरीण आणि इतर महिला गातात. महिलांचा त्यात सर्वांत मोठा सहभाग असतो, तसाच पोतराज, देवकर यांचाही असतो. पोतराज-देवकरीण हे या धुरपतामायचे मुख्य भक्त. मातृपरंपरेत दक्षिण भारतात पोतराज दिसत असले तरी चंद्रपूरच्या पोतराजाची ही देशातील इतर पोतराजांपेक्षा वेगळी ओळख आहे. त्याच्याकडे शेंदराने माखलेला चाबूक, त्याला 'कोरडा'ही म्हटले जाते. दीक्षा घेताना मिळालेला हळदीच्या भंडाऱ्याची पिशवी (अलीकडे पितळेचा डबा दिला जातो) आणि संपूर्ण कपाळभर माखलेला भंडारा, अशी काही वेगळी वैशिष्ट्ये या पोतराजात आढळतात.

महाराष्ट्रात मराठा, कुणबी, सालेवार, कोळी, बंजारा, कुंभार, मांग, महार आदी जातीत देवकरीण आढळतात, पोतराज हा इतर जातीत क्वचितच आढळतो. यातील कर्नाटक, आंध्र प्रदेशातील काही भागातील तसेच महाराष्ट्राच्या सीमाभागात असलेले 'कडकलक्ष्मी' म्हणून जे पोतराज आढळतात ते बहुतांश भटक्या विमुक्त जमातीतून आलेले असतात. या पोतराजांचा धुरपतामायच्या परंपरेशी फारसा संबंध दिसत नाही. धुरपतामायच्या परंपरेत प्रामुख्याने मांग समाजातील पोतराज दिसतात. या समाजात एखाद्या घरात पोतराज सोडण्याचा वारसा असल्यास तो वारसा खंडित केला जात नाही. त्याला पोतराज वाढविण्याची परंपरा म्हणतात. मराठवाड्यातील प्रत्येक गावातील मांगवाड्यात एखादे तरी पोतराजाचे घर, त्यांचा खोपाडा अथवा त्यांची अळी असते.

'देशात कुठेही पोतराज उच्चवर्णीय जातीतून झाल्याचे दाखले अथवा उदाहरण सापडत नाहीत. तरीही आंध्र प्रदेशात बम्मन पोतराज नावाने एका कवीचा उल्लेख आढळतो.' मात्र, त्याबद्दल वेगळी मतमतांतरे आहेत.

त्यातही महाराष्ट्रात विशेषतः मराठवाडा, आंध्र प्रदेश, कर्नाटकातील माला, मादिगा तसेच महाराष्ट्रातील मांग, महार, गुरव व गोंधळी आदी जातीत प्रामुख्याने पोतराज सोडले जातात. कर्नाटक, आंध्र प्रदेश आणि इतर राज्यांत बहुतांश वेळा दलित, भटके-विमुक्त आदी जाती-जमातींतून पोतराज आलेले दिसतात.

'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या धम्मचक्र परिवर्तनाच्या चळवळीनंतर मराठवाडा, विदर्भातील आणि एकूणच राज्यातील अपवादाने असलेल्या महार समाजातून पोतराज सोडण्याचे प्रमाण मोठ्या प्रमाणात कमी झाले. या समाजाने शिक्षणाची कास धरून आपला भौतिक आणि बौद्धिक विकासाचा मार्ग निवडल्याने त्यांच्यात ही परंपरा आपोआपच कमी झाली.' गावगाड्यात याच जातीचा भाऊबंद आणि जोडगोळी म्हणून ओळख असलेल्या मांग समाजाला ते पूर्णत्वाने जमले नाही. त्यातही काहींनी त्या पावलावर पाऊल टाकत आपले मार्ग निवडले. मात्र त्यानंतरही बराच मोठा समाज आपली परंपरा धरून राहिल्याने मराठवाडा आणि विदर्भातील मांग समाजात अजूनही पोतराज दिसतात. पोतराज आणि या परंपरेला धरून राहिल्याने मांग समाजाचा विकास होऊ शकला नाही, असा समज असला ते पूर्णतः वस्तुस्थितीला धरून नाही. त्यामागे विविध सामाजिक आणि आर्थिक कारणे आहेत. तरीही शिक्षणाची सोबत न केल्याने अनेकांना आपला भौतिक विकास साधता आला हेही नाकारता येत नाही. मात्र, मांग समाजातील पोतराजांनी याविषयी आपली कोणतीही तक्रार न करता, आपल्या मूळ धुरपतामायच्या मातृपरंपरेचे जतन करण्यासाठी स्वतःला वाहून घेतलेले दिसते.

गडचांद्याच्या धुरपतामायसोबत उस्मानाबाद जिल्ह्यातील येरमाळ्याची येडामाय या देवींच्या नावाने मांग समाजातील पोतराज सर्वाधिक सोडले जातात. शेकडो वर्षांपासून मुलगा झाल्यास धुरपतामायच्या सेवेसाठी पोतराज म्हणून सोडण्याची परंपरा या समाजात अजूनही रूढ आहे. तशीच 'वंशात मुलगी होऊ दे', म्हणूनही धुरपतामायकडे नवस केला जातो आणि मुलगी झाली की तिचे नाव 'धुरपता' हे हमखास ठेवले जाते. अनेक पोतराजांची नावे ही 'धुरपत' किंवा भगत असतात. पोतराज, स्त्रीवाचक असतात. त्यांचे वाढवलेले केस, तर काहींच्या जटा,



वाढलेल्या असतात. त्यांची सांस्कृतिक ओळखही वेगळी असते. जटा वाढविण्यामागे त्यांची पूर्वापार सुरू असलेली परंपरा असते. भगवान शंकराच्या जटांशी त्यांचा संबंध सांगितला जातो. पोतराजच नाही, तर देवकरीणही जटा वाढवून असतात. त्यांच्या जटांना खूप मान असतो. निसर्गाने दिलेली अथवा देवींनी दिलेला आशीर्वाद म्हणून त्या जटांचे जतन करतात. जटा ही देवीची देणगी असल्याने त्याला हळदी, कुंकू लावून पूजाही केली जाते. 'देशातील मातृपरंपरेत मुलगी व्हावी म्हणून 'नवस' केली जाणारी धुरपतामायची एक वेगळी ओळख आहे. म्हणूनच मराठवाड्यातील दलित, ओबीसी, भटके-विमुक्त समाजात 'धुरपता' हे मुलीचे नाव ठेवल्याचे दिसून येते.' मुलगी व्हावी म्हणून एखाद्या देवीला नवस करण्याची परंपरा मागील दोन दशकात थोडी कमी झाली असली तरी अजूनही ग्रामीण भागात ती शाबूत दिसते. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात ज्या-ज्या ठिकाणी मातृदेवतांची ठाणं आहेत, म्हैसेमा, सटवाई, मरिआई, पोचेमायची मंदिरे आहेत, अशा मातृदेवतांना मूल व्हावे, विशेषतः मुलगी होण्यासाठी नवस बोलला जातो.

सन १९८४ च्या काळात मांग समाजातील काही सामाजिक कार्यकर्त्यांनी चंद्रपुरात पोतराज-देवकर, देवकरीण विरोधात त्यांचे केस, जटा, कापण्याचे डफडी, हलगी, फोडण्याचे आंदोलन केले होते. या वेळी आंदोलनकर्त्यांची भूमिका ही समाजपरिवर्तनाची होती. सांस्कृतिक संदर्भ लक्षात न घेता आणि त्याला इतर सांस्कृतिक पर्याय न देता हे आंदोलन करण्यात आल्याने ते पुढील काही वर्षांत तग धरले नाही.

मागील काही वर्षांत मराठवाड्यात मांग समाजात पोतराज सोडण्याचे प्रमाण वाढताना दिसते. चैत्राच्या महिन्यात होणाऱ्या धुरपतामायच्या यात्रेत लहान मुले, तरुणांचा भरणा अधिक दिसतो. पहिली-दुसरी नाही तर पाचवीपर्यंत शाळा शिकलेली मुले पोतराज होऊन पुढील आयुष्य त्यासाठीच जगण्यासाठी तयार झालेले पाहावयास मिळतात.

विशेषतः नांदेड, लातूर, परभणी आदी जिल्ह्यांमध्ये आणि विशेषतः मांग समाजाची वस्ती अधिक असलेल्या गावांमध्ये एखादा तरी पोतराज हा धुरपतामायच्या नावाने सोडलेला दिसतो. काही कुटुंबांमध्ये शिक्षणाचा अभाव असल्याने अजूनही पिढ्यान्‌पिढ्या एका तरी मुलाला पोतराज सोडण्यासाठी आग्रही असताना दिसतात. मराठवाड्यातील लातूर, नांदेड, परभणी या जिल्ह्यात हे प्रमाण सर्वाधिक पाहायला मिळते. अलीकडे काही ठिकाणी पोतराजांच्या पार्ट्याही बनल्या आहेत. मार्च ते जून महिन्याच्या कालावधीत त्यांना कार्यक्रमाच्या सुपाऱ्या मिळत असल्याचे तरुण पोतराजांकडून सांगण्यात आले.

## धुरपतामायच्या पोतराजांचे वैशिष्ट्ये

आंध्र प्रदेश, तेलंगणा, कर्नाटकातील मरिआई, मरिअम्मा, मरियम्मा या समान नावांच्या देवींचा भक्त म्हणून पोतराज अथवा गुडगुड पोचम्माच्या नावाने पोतराज पाहायला मिळतात. 'पोतराज' या शब्दाची व्युत्पत्ती दक्षिण भाषांमध्ये पाहावयास मिळत असली तरी पोतराज हा शब्द तमिळच्या 'पोत्तुराजु' या शब्दाचे रूपांतर असल्याचेही अनेक ठिकाणी दाखले मिळतात.

'पोत्तु' हा शब्द दक्षिण भारतातील अनेक ग्रंथांत स्त्री अथवा गणिका या अर्थानेच वापरलेला दिसतो. तर काही ठिकाणी 'पोतराज' हा आद्यमातेशी थेट नाते सांगणारा असल्याने त्याचा 'जगन्माता' असा अर्थही लावण्यात आला आहे. तशा प्रकारची अनेक गाणी देवकरीण गातात.

**माय माझे धुरपता, तुवा पोतराज येडा..**
**एव्हढं सैवाराच्या येळा, तेनं हांकारीला गाडा गं...**
**माय माझे धुरपता, तुवा सारविते वटा,**

**पोतराज सोडी जटा गं, धुरपतामाय...**
**माय माझे धुरपता, घटं तुबा घामेजला..**
**पोतराज तान्हेजला गं, धुरपतामाय...**

नेपाळमधील देवी हरितीची पूजा करणारे देवीचा मुखवटा धारण करून पोतराजांप्रमाणेच नृत्य करतात. त्यांच्याही कमरेला आभरान असते. महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्र प्रदेश, तेलंगणा, ओरिसा, तामिळनाडूपर्यंत पोतराज आढळतात. पोतराजांच्या पूजापद्धती, आचरण, देवीपुढील नृत्य, यात भौगोलिकदृष्ट्या मोठ्या प्रमाणावर फरक आढळतात. मात्र, मातृपरंपरेचे सूत्र एकसमान असल्याचे दिसून येते. पोतराजाच्या पूजापद्धतीवर आणि एकूणच द्रविडी संस्कृतीचा प्रभाव शिल्लक असल्याचे पाहावयास मिळते.

महाराष्ट्रापासून ते संपूर्ण दक्षिण भारतात सप्तमाता म्हणजेच सात बहिणी या नावाच्या ग्रामदेवींची मंदिरे आणि ठिकाणे पाहावयास मिळतात. अनेक ठिकाणी या नदीकाठी असतात. सप्तमातांची बहुतांश ठिकाणे ही बारव, पुष्करणी, नदीच्या तिरावर सापडतात. सप्तमातांचा भाऊ म्हणूनही पोतराजाची दक्षिणेत काही ठिकाणी पूजा केली जाते. आंध्र प्रदेश आणि कर्नाटकमध्ये पोतराजाची खास मंदिरे आढळतात.

'आंध्र प्रदेशात सर्वांत जास्त मंदिरे ही अंतापूर जिल्ह्यात आहेत. यात जिल्ह्यातील अतमकूर मंडलमध्ये असलेल्या माडीगुब्बा, पुट्टापरथी मंडलमधील कप्पालबंदा, पामिदी मंडलमधील गुलीमिकोंडा आणि पेनुकोंडा मंडलमध्ये येणाऱ्या गुट्टूर येथे पोतराजाची ही मंदिरे आहेत. कर्नूल जिल्ह्यात कोतवालम मंडलमध्ये असलेल्या गोकुळपाडा, क्रिशीगीरी मंडलमध्ये येणाऱ्या अगवल्ली येथे ही मंदिरे आहेत.'

हैदराबादजवळ 'बोनालू' हा पोतराजांचा उत्सव प्रसिद्ध आहे. हैदराबादच्या गोवळकोंडा परिसरात असलेल्या जगदंबा मंदिरात हा प्रामुख्याने उत्सव होतो. आंध्र प्रदेश आणि तेलंगणाच्या अनेक भागातही या उत्सवाला मोठे स्थान आहे. हा उत्सव महाकाली म्हणजेच मरिआईचा असतो. ती तेलंगणा आणि आंध्र प्रदेशात महाकाली, काली, श्रीकोच्चेरी पोचम्मा, मैसेम्मा, पेद्दम्मा, गडिमैसम्मा, पोलेरम्मा, गंगम्मा नावाने

ओळखली जाते. येथेच उज्जैनी महाकाली मंदिरात लष्कर बोनालू नावाचा कार्यक्रम साजरा केला जातो. त्याचेही स्वरूप सारखेच असते. बोनालू या मातृदेवीच्या उत्सवासाठी आंध्र प्रदेश, तेलंगणातील मादिगा, गोल्ला हा समाज पुढाकार घेताना दिसतो.

मराठवाड्यातील मरिआई आणि पोचेमायच्या पूजेला ज्या प्रकारे डोक्यावर पाण्याने भरलेला कुंभ, त्यात कडूनिंबाचा डहाळा घेऊन महिला जातात. तसेच बोनालूच्या उत्सवात असते. कुंभातून जगाची निर्मिती झाली असल्याचे प्रतीक म्हणून या उत्सवात 'रंगन' नावाचा एक उत्सव साजरा केला जातो. त्यात एका कुमारीकेला अथवा महिला पुजारीला एका मोठ्या कुंभावर उभे केले जाते. त्या वेळी तिच्या अंगात देवी संचारते, अशी भावना असते. 'बोनालू' या उत्सवाचे वैशिष्ट्ये म्हणजे पहिल्या आणि शेवटच्या दिवशी येलम्माचे, मरिआईचे स्तवन केले जाते.

पोतराजांची बहुतांश मंदिरे ही महाराष्ट्रात असलेल्या वीरगळांप्रमाणे, तर काही ठिकाणी नंतरच्या काळात मूर्ती तयार करून बसविण्यात आलेल्या दिसतात. अलीकडच्या काळात त्या विकसित झाल्याचे त्यांच्या एकूण रचनेवरून दिसून येते. आपल्याकडे अजूनही म्हसोबा हे दैवत नदी, तलावाच्या काठावर सातीआसरा अथवा सप्तमातांच्या शेजारी दिसते. तसेच याचे स्वरूप असते. अशीच मंदिरे, समाध्या राज्यात विशेषतः मराठवाड्यात नांदेड, परभणी आदी जिल्ह्यांत धुरपतामायच्या उपासक, पुजारीण अथवा मूळ देवकरीण राजामाय, यमुनामाय, बिठामाय, म्हादामाय, भागामायचे बनल्या आहेत.

दीड शतकभराच्या कालावधीत परभणी जिल्ह्यातील पाथरी तालुक्यात ज्या ठिकाणी साईबाबांचे जन्मस्थानही आहे. त्याच पाथरी तालुक्यात असलेल्या रामपुरी येथे भागामायचे, तर परभणीजवळ असलेल्या दैठणा गोदावरीच्या तिरावर वसलेल्या एका छोट्याशा गावात बिठामायचे समाधी मंदिरही उभे करण्यात आले आहे. परंतु महाराष्ट्रात कुठेही म्हसोबा आदी दैवतांची ठिकाणे अपवाद वगळल्यास पोतराजाचे आणि देवकरांची मंदिरे अपवादानेच दिसतात.

कर्नाटक-आंध्र प्रदेशात वीरांप्रमाणेच पोतराजांचे मोठ्या प्रमाणात दैवतीकरण झाल्याचे दाखले पाहावयास मिळतात. त्यातच कर्नाटक आणि

आंध्र प्रदेशमध्ये 'पोतराज' या नावाची आडनावेही आहेत. उर्वरित ठिकाणी ही आडनावे खूप क्वचितच आढळून येतात.

मुंबईतील पुरातत्त्व संचालनालयाच्या कार्यालयात पोतराजाप्रमाणे दिसणारे मोठे शिल्प ठेवण्यात आले आहे. काही वर्षांपूर्वी ते कस्टमने पकडल्यानंतर ते तिथे ठेवण्यात आले. त्याची एकूण रचना ही पोतराज हा एखादा 'राजा' बसलेला असल्याचे या शिल्पातून दिसते. डोक्यावर मुकूट, पाठीवर केसाचा अंबाडा आणि उजव्या हातात असलेला चाबूक त्याने खांद्यावर टाकलेला आहे. हे मूर्तीशिल्प शृंग काळातील तिसऱ्या अथवा चवथ्या शतकातील पोतराजाचे असल्याचा अंदाज व्यक्त केला जातो. महाराष्ट्रात पोतराजांची मंदिरे नसली तरी त्यासाठीची पूजा नांदेड जिल्ह्यातील बारड या ठिकाणी केली जाते. बारडचे पोचेम्मा (पोचीमाय) देवीचे हे प्रसिद्ध मंदिर आहे. अलीकडे त्या मंदिराला 'शीतलामाता मंदिर' म्हणून ओळखले जाते. 'बारडला मातृदेवींच्या आरती आणि त्यासाठीच्या यादीत मोठे स्थान आहे. हे चवथं ठाणं म्हणून बोलले जाते. इथे पोतराजांची असंख्य शिल्पे विखुरलेल्या अवस्थेत पडून आहेत.' या ठिकाणी एकाच लक्षणाची स्त्री शिल्पे आणि पोतराजांची शिल्प आहेत. देशातील सर्वांत प्राचीन अशी ही शिल्प असावीत. त्यातील शिल्पांचे साम्य हे मोहेंजोदडो आणि हडप्पा येथे मिळालेल्या शिल्पाशी दिसते. मूळ पोचेम्माच्या मंदिरात मातृदेवतांसोबतच येथे पोतराजांच्या शिल्पांची पूजा केली जाते. तर अनेक ठिकाणी विखुरलेल्या शिल्पांना 'खोकल्या देव' म्हणूनही महिला पूजा करतात. येथे येणारी प्रत्येक महिला ही पोतराजांच्या शिल्पाची पूजा करत असते. इतकेच नाही, तर बाजूला असलेल्या बारवच्या परिसरात नवीन मूल जन्माला आल्यानंतर त्याचे रक्षण तूच कर म्हणून तिची याचना केली जाते. नवीन जन्माला आलेली मूल आणून त्याचे डोके इथे टेकवले जाते. त्याला खान्देशात 'घुंगरावणं' असे म्हटले जाते.

स्मृतीच्या नियमांचे पालन करून हजारो वर्षांपासून आपले वर्चस्व लादणाऱ्या (स्मार्त धर्माच्या) वैदिकांशी पोतराजांचा वेळोवेळी वैचारिक संघर्ष झालेला आहे. पोतराजांवरील गाण्यांतून तांत्रिकांच्या परंपरेचा मोठा उलगडा होऊ शकतो. मात्र, त्यांच्या गाण्यांना खरे तर 'कवणं' म्हटले

जाते. त्यांच्या एका कवनात ते पंडिताला पाचवे तत्त्व काय आहे, यावर सवाल-जबाब, वाद-विवाद करतात. गणाचा उगम, त्याची माहिती विचारताना दिसतात. त्यातील एक कवन असे-

**'एक मुखी रूद्राक्ष जन्मला,**
**महाशक्तीचा जन्म झाला.**
**तीन मुखी रूद्राक्ष जन्मला,**
**तीन ताळात जन्म झाला.**
**चार वेद पाचवा तत्व,**
**सांगून दे पंडिता मला!**
**हात जोडूनी विनंती,**
**करीतो सर्व मंडळीला!**
**ह्या गणाचा उखाला,**
**सांगून द्या मला सर्व गणाला...'**

'धुरपतामायचे पोतराज हे स्त्रीवेशात असतात. कमरेला विविध रंगांच्या कपड्यांचे बांधलेले आभरान, कपाळभर कुंकवाचा मळवट, हातात चाबूक, कडूलिंबाचा पाला आणि महिलांप्रमाणेच वाढवलेले केस, त्याच्या बहुतांश वेळा जटाही वाढलेल्या असतात. पोतराजाला जटा असणे एक पवित्र मानले जाते. त्यासाठी अनेक गाण्यात पोतराजांच्या या जटांचा उल्लेख सापडतो. तर त्यांच्या केसाला 'जटा' म्हणूनच उल्लेख केला जातो.'

**बाई कारणाचा हाल्या,**
**हाल्या येशीला कुथला...**
**मानाचा पोतराज...**
**जटा सोडाया गुंतला गं...**
**जटा सोडाया गुंतला गं...**

देशात प्राचीन काळापासून ते आजही ग्रामीण भागात आणि गावाबाहेर शेंदूर लावलेल्या ग्रामदेवतांची पूजा ही स्त्रियाच करतात. ही पूजा करण्याची परंपरा कालांतराने स्त्रियांकडून पुरुषसत्तेचा जसजसा उदय

झाला, त्याप्रमाणे पोतराजांकडे आली असावी. मात्र पूजा करताना स्त्रियांचा मूळ वेष धारण करण्याची प्रथा यातूनच पुढे कायम राहिली असावी. मातृसत्तेकडून पितृसत्तेचे झालेले समाजाचे स्थित्यंतर होते. शिवाय त्यातूनच एक मध्यम मार्ग अथवा उघडपणेही प्रत्येक वेळी पोतराजांनी देवीशी तादात्म्य साधण्याच्या हेतूनेही हा स्त्रीवेष धारण केला असण्याची शक्यता रा. चिं. ढेरे व्यक्त करतात.

'पोतराज गावांच्या रक्षणासाठी गाव बांधण्याचा एक विधी करतो, हा विधी म्हणजे एक प्रकारे हे एके काळी गावांचे रक्षणकर्ते असावेत, असाही त्यातून अर्थ काढता येईल' तर 'प्राचीन काळी स्त्रियाच ग्रामदैवतांचे पौरोहित्य करीत असत; नंतरच्या काळात ते पौरोहित्य पुरुषांकडे आले, तरी त्यांना स्त्रीवेष धारण करण्याची प्रथा स्वीकारावी लागली', असे महादेवशास्त्री जोशी यांनी म्हटले आहे. तर डोक्यावर केस वाढवून जे पोतराज होतात त्यांना 'जवळी पोतराज' म्हणतात. अशा पोतराजांना समाजमान्यता असते. मात्र कामधंदा, नोकरी-व्यवसाय करून आपल्या डोक्यावर केस वाढवत नाहीत, त्यांना 'काटकरी' अथवा 'अधुपरी' पोतराज म्हणतात. (पृ.१४४) यासोबतच महालक्ष्मी, काळूआई आदींसाठी सोडण्यात येणाऱ्या पोतराजांची जातपंचायत भरते तशी पद्धत धुरपतामायच्या पोतराजांसंदर्भात दिसत नाही. मरिआईला महालक्ष्मीही म्हटले जाते. त्यामुळे पोतराजाला मरिआईवाला, आईलक्ष्मीवाला म्हणत असल्याचे डॉ. घाटुगाडे म्हणतात.(पृ.१२४)

'शरद् पाटील यांनी यासाठी वेगळे संदर्भ देत त्याचा अधिक उलगडा आपल्या 'दास-शूद्रांची गुलामगिरी'मध्ये असूर राजर्षिसत्तेचे सिंधुयुग या प्रकरणात केला आहे. पुरुष पुरोहितांनी स्त्रीवेष धारण करणे ही जगभराची प्रथा आहे, असे ब्रिफॉ यांनी सप्रमाण सिद्ध केल्याचे ते सांगतात.'

''पौरोहित्य कार्य मुळात पूर्णपणे स्त्रियांच्या हातात होते आणि म्हणून पुरुष पुरोहितांना वाटे की, स्त्रीवेष केल्याने मायेची परिणामकारकता अक्षुण्ण राहते. स्त्रीचे पौरोहित्य कार्य ताब्यात घ्यायचा पुरुषांचा उपक्रम हा पुरुषसत्तेने स्त्रीसत्तेविरुद्ध केलेल्या संघर्षाचा एक भाग होता. स्त्रीचे पौरोहित्य कार्य स्वतः कडे घेणे हे पुरुषाने या मार्गावर टाकलेले पाऊल होते. म्हणूनच त्वेष्टेने व त्या अनामिक ब्रह्मनने स्त्रीवेष परिधान केला''.

पोतराज हा मुळातच सृष्टिपूजक आणि मातृपूजक असल्याने त्यांच्याकडून निसर्गमायेची परिणामकारता कायम टिकवून ठेवण्यासाठी त्यांनी स्त्रीवेष धारण केला असावा. त्यांच्या चाबकाची रचना ही सृष्टीच्या उगमातील पहिल्या जीव-जंतूंची आहे. ते त्याचे प्रतीक म्हणून त्याकडे पाहिले जाते. जिथून त्या चाबकाची सुरुवात होते, तो गोलाकार व आत नारळ असलेल्या भागाला डोके म्हटले जाते. शेवटी शेपटीचा भाग हा जलचरातील एखाद्या जीवाप्रमाणे होत जातो.

धुरपतामायच्या पोतराजाचे आणखी एक वैशिष्ट्ये म्हणजे त्याच्या पायातील वाळे. पितळेच्या गोल कड्यात घुंगरू टाकलेले असतात. त्याचा आवाज हा पोतराज आल्याची साक्ष देत असतो. समोर पायाच्या अंगठ्याला त्याला दोरीने जोडून पायाभोवती त्याचा वेढा दिलेला असतो. या वाळ्याचा आवाज मोठ्या घुंगरासारखा असतो. तसेच एक छोटे पितळाचे वाळे हाताच्या अंगठ्यात असते. हा पोतराज नाचत असताना त्यांचे वेगळे संगीत, आवाज त्यातून निघतो. पोतराज आपल्या गणाची सुरुवात करताना महादेव-पार्वतीला नमन करतो. गणपतीचेही स्तवन करत असतो आणि दुसरीकडे तो गणाची सारजी कोण व्हावी, असा सवालही करतो. ते असे असते -

**शंभू पारवती, कैलासपती, हर हर महादेव**
**ज्या भगवंतानी पिंड पैदास केला,**
**तुमच्या चरणी माझा नमस्कार..!**
**गणान गण भजना चौदा विद्याच्या वंदना,**
**हाती घेऊनी लाडवाची वाटी,**
**वाकडी फिरून गोमटी,**
**तुमच्या चरणी माझा नमस्कार...**
**पहिला नमस्कार महादेव तुझला,**
**दुसरा नमस्कार, भूजरी गणपतीला,**
**गणनाथ लेक कुणाची सर्व सती,**
**गणा माझी सारजी ही कोण व्हावी गणाची ?**

या कवनासोबतच पोतराजांच्या बहुतांश कवनांमध्ये महादेव-

पार्वतीवरील कथा आणि कवनांचा उल्लेख पदोपदी येतो. विशेषतः महादेव पार्वतीसोबत गणपतीच्या जन्माच्या कथा मोठ्या रंजकपणे सांगितल्या जातात. त्यात सवाल-जवाबाची मोठी जंत्री असते. शिवाय पार्वती आपल्या मुलासाठी आक्रंदन करत महादेवाकडून उडवण्यात आलेले शीर कुठे आहे, ते सांगण्याची विनंती करते. या कवनांतून पोतराज हा सवाल जवाब करत असला तरी तो पार्वतीचे दुःख गातो. तिचे आक्रंदन तो मांडत असतो. त्यातील एक कवन असे -

**पार्वती बसली न्हानाला, मैलाचा पुतळा केला**
**राकन दरवाज्यात बसवीला.**
**बाहेरून आले महादेव, युद्ध केले शीर उडवून दिले,**
**शीर गेले कोटे, सांगून द्या मला.**
**हात जोडूनी विनंती करतो, सर्व मंडळीला,**
**जरास बसा विश्रांत्याला...**
**निर्गूनात निर्माळी चाळीत होता,**
**लिंबाची गुळी चाळीता चाळीता,**
**मोरी लागली रूद्राक्षाची जाळी...**

अशा प्रकारचे शेकडो कवन पोतराज गात असतात. यासोबतच सवाल जवाब यांचीही मोठी संख्या असते. विशेषतः गुरू मच्छिंद्रनाथ, गोरखनाथ यांच्या परंपरेवरील कवनेही मोठ्या प्रमाणात म्हटली जातात. मच्छिंद्रनाथ, गोरखनाथ यांच्या जन्मापासूनचा इतिहास सलग एका कवनातून म्हटला जातो. यांची संख्या ही काही हजारांच्या दरम्यान असावी. काळाच्या ओघात या कवनात अनेक प्रकारची भेसळ झालेली असून अनेक मूळ कवने ही नष्ट झाली आहेत. अलीकडे पोतराजांच्या या कवनांतही नवीन गाण्यांची भेसळ झाल्याचे दिसते. त्यामुळे अनेकदा मूळ कवनांशी सांगड घालणे अवघड होते. परंतु त्यांच्या कवनातून शंभू महादेव, पार्वती, गणपती, बृहस्पती यांचा वेळोवेळी उल्लेख येतो.

धुरपतामायच्या पोतराजाची आणखी एक वेगळी ओळख म्हणजे तो त्यांचे सर्व कवन हे महादेव, पावती, मरिआई, धुरपतामाय आदींच्या भोवती अधिक असते. तरीही त्यातून बराच वेगळेपणा दिसून येतो. हा

पोतराज कवन गाताना अथवा अंगावर आभरान, खांद्यावर चाबूक आणि पायात वाळे घातल्यास कधीही पायात वहाण घालत नाहीत. विशेष म्हणजे हा पोतराज आपल्या आजूबाजूच्या गावखेड्यांमध्ये जाऊन भिक्षा मागून जगत असतो. बहुजनसमाजातील महिला या पोतराजाला भिक्षा देणे अथवा दान देणे एक पवित्र कार्य समजतात. गावात पोतराज दिसताच दान देण्यासाठी महिला पुढे येतात.

आपल्या घरात असलेल्या सुपात महिला धान्य टाकून आणतात. सुपातून आणलेल्या धान्यामुळे भरभराटी येते, अशी त्यामागील भावना असते. या सुपात धान्यासोबत हळद, कुंकवाचा करंडा ठेवलेला असतो. पोतराज आलेल्या महिलेला हळद-कुंकू लावून मरिआईचा, मायधुरपताचा आशीर्वाद देतो. महिलांनी आणलेले सुपातील धान्य पोतराज आपल्या झोळीत लगेच टाकत नाही. सोबतीदाराच्या असलेल्या हलगीच्या या तालावर तो नाचत मरिआईचे, धरतीमातेचे, निर्ऋतीचे स्तवन करत नाचत असतो. एकाच वेळी गातही असतो.

सुपात आणलेले धान्य आपल्या झोळीत टाकण्यापूर्वी ते धान्य सुपाला उभे उंच धरून ते सूप गोल-गोल फिरवत असतो. आपले सूप आणि त्यातील धान्य पूर्णपणे उभे करूनही ते धान्य खाली पडत नाही, हे पाहून महिला, उपस्थित आश्चर्यचकित होतात. महिलांना त्यांचे खूप नवल वाटते. याला देवीचा चमत्कार म्हणून पाहिले जाते. वैज्ञानिक दृष्ट्या हा चमत्कार वगैरे काही नसतो. हे वेगळे सांगण्याची गरज नाही. ठरावीक वेगाने सूप गोल फिरताना त्यावर एखाद्या सरकणाऱ्या वस्तूही हलत नाहीत. परंतु त्यासंदर्भात पोतराज सुपात धान्य घेऊन नाचविण्यामागे मातृदेवता आणि स्त्रीसत्ताक परंपरेतील प्रतीक आणि त्यातील नेणीव उरल्याचे दिसते. शूर्पणखा या महाराणीची ओळखही अशीच आहे. ती दंडकारण्याची महाराणी होती. तिला वैदिकांनी खूप बदनाम केलेले असले तरी, तिचे राज्य कसे होते, ती राणी कशी होती, हे नाशिक, ठाणे, धुळे, नंदुरबार आदी जिल्ह्यातील आदिवासी आपल्या अनेक कथा, उत्सवातून सांगत असतात. सांगली जिल्ह्यात मिरजेच्या जवळ असलेल्या बेडग येथे शेकडो वर्षांपासून मरगाई देवीच्या यात्रेत शूर्पणखा हिच्या राज्याची तिच्या कर्तृत्वाची सोंगातून आठवण करतात. त्यासाठी गावकरी



कार्यक्रमाचे आयोजन करत असून, त्यामागील प्रतीकांचा शोध घेण्याची गरज आहे. शूर्पणखेचा अर्थच ज्या राज्यात महिला सूपावर धान्य उफाणतात. नखाच्या बोटावर नाचवतात, त्या राज्याची ती राणी असा होतो. यामुळे या पोतराजाच्या सुपावरील धान्य फिरवण्याची एक परंपरा ही शूर्पणखा आणि त्यासोबतच गणधनाच्या वाटपाचीही एक प्रतिकृती असावी. ती पोतराजांनी आपल्या नृत्यातून जतन केली असावी. सूप उफाणण्यामागील ऐतिहासिकता पोतराजांनी शिल्लक ठेवली असली तरी गाण्यातून ते भूमातेला वंदन करतात. तिचे ऋण व्यक्त करतात.

## पोतराजाचा चाबूक आणि शेंदूर

'चंद्रपुरात चैत्र पौर्णिमेच्या मध्यरात्री धुरपतामायला शेंदूर चढविण्याचा एक महत्त्वाचा विधी केला जातो. या विधीनंतर पुजारी अथवा पूजा करणारा पोतराज आपल्या हाताला लागलेले शेंदराचा एक ठिपका पोतराजाच्या चाबकाला लावतात. तो पूजेचा शेंदूर लागल्याशिवाय पोतराज चाबूक वापरत नाहीत.' मात्र, ज्यांना चंद्रपूरच्या या शेंदूर माखण्याच्या विधीत आपल्या चाबकाला शेंदूर लावण्याची संधी मिळत नाही. त्यांना आपल्या गुरूकडून शेंदूर लावून घेण्याची मुभा मिळते. तो चाबूक आणि त्याचे मुख्य डोके कायम शेंदराने माखलेले असते. त्यात दीक्षा घेताना गुरूने दिलेला नारळ आत बांधलेला असतो. संपूर्ण चाबूक हा सलमकाडी म्हणजे अंबाडीच्या धाटाला पाण्यात भिजवून त्यापासून निघालेल्या तंतुमय

अंबाड्यापासून, तर कधी फटकुळीची पाने पाण्यात भिजवून त्यापासून निघालेल्या अंबाड्यापासून हा चाबूक अजूनही ग्रामीण भागात केवळ मांग समाजातील लोकच तयार करतात.

'मांग समाजाकडे गावगाड्यात दोर-दोरखंड विणण्याची प्रमुख जबाबदारी होती. यामुळे ही कला परंपरागत असल्याने चाबूकही त्यांच्याकडेच तयार केला जात होता. एकदा विणल्यानंतर त्याला तेल आणि शेंदूर कायम लागत असल्याने तो पिढ्यान्‌पिढ्या वापरला जातो.' (यमुनामायचे मूळ गाव असलेल्या शेलगाव येथील समाधी शेजारी चाबूक ठेवण्यात आला आहे. सहसा चाबूक पोतराज वापरताना दिसतात. परंतु यमुनामायच्या मंदिरातील चाबूक हा त्यांच्या कोणत्या तरी पोतराज शिष्याने आठवण म्हणून ठेवला असावा) या पोतराजाच्या चाबकाचे खास वैशिष्ट्ये म्हणजे त्याची रचनाही दक्षिण भारतातील पोतराजाच्या चाबकापेक्षा वेगळीच पाहावयाला मिळते.

पोतराजाकडे असलेला चाबूक म्हणजे दुसरे तिसरे काही नसून सृष्टीच्या जीवनचक्रातील पहिल्या जीव-जंतूंचे ते प्रतीक असते. वीरकड्याप्रमाणेच यातूनही उत्क्रांतीचा सिद्धांत दडला असल्याचे दिसते. हा चाबूक केवळ चाबूक नाही, तर त्यातून नागदेवतांचाही असलेला संबंध अधोरेखित करत असतो.

पोतराज आपल्या अंगावर परिधान करणाऱ्या प्रत्येक साजासोबत आपल्या चाबकालाही वंदन करतो. आरती आणि गाण्याच्या तालावर नाचत ठरावीक अशा ठेक्याच्या वेळी त्याच चाबकाने गोलगोल फिरवून आपल्या अंगावर त्याचे फटकारे मारून घेतो. देवीला प्रसन्न करण्यासाठीची त्याची ही क्रिया असते. तर दुसरीकडे पोतराजाच्या चाबकाच्या फटकाऱ्याने गावावर आलेली सर्व संकटे दूर पळून जातात आणि सुखसमृद्धी येते, सर्व काही मंगलमय होते, अशीही एक भावना त्यामागे असते.

## देवकरीण, पोतराजाची दीक्षा

'पोतराजाला बायका, मुले करण्याचे कोणतेही बंधन नसते. तसेच देवकर आणि देवकरीणचेही असते. तरुण, तरुणी, विवाहित अथवा

विधवा महिलेलाही सहजपणे देवकरीण होण्याची दीक्षा दिली जाते. दीक्षा देण्यासाठी कोणतेही बंधन नसते. केवळ एकदा दीक्षा घेतली की, आपल्या गुरूंची परंपरा कायम ठेवण्याची जबाबदारी येते. या परंपरेत ज्याप्रमाणे पोतराज दीक्षा देतो, त्याप्रमाणे देवकरणीलाही दीक्षा देण्याचे समान अधिकार असतात. फरक इतकाच, देवकरीण ही मुली, महिलांना तर पोतराज हा मुले, तरूण, पुरुषांना पोतराजाची दीक्षा देतो. तर कधी-कधी दोन्हीही ठिकाणी दीक्षा देतात.' चंद्रपुरात दरवर्षी चैत्राच्या यात्रेत पौर्णिमेच्या



दरम्यान पहिल्या आणि दुसऱ्या दिवशी मोठ्या प्रमाणावर दीक्षा देण्याचा कार्यक्रम घेतला जातो.

## पट फोडण्याचा विधी

या दीक्षेच्या कार्यक्रमात 'पट फोडणे' या नावाचा एक महत्त्वाचा कार्यक्रम होतो. तो झाल्याशिवाय ही दीक्षा पूर्ण होत नाही. पट फोडण्याचे दोन प्रकार आहेत. एक पोतराजाची दीक्षा होते, त्या वेळी तो फोडला जातो आणि दुसरा एखाद्या मांग समाजातील महिलेने आपल्याला मुलगा झाला तर मी धुरपतामायला पोतराज म्हणून सोडेन, असा नवस केला तर त्यासाठीही पट फोडावा लागतो. त्यासाठी रेडा म्हणजे हाल्याला मरिआईच्या नावाने सोडायचे असते. हा हाल्या गोठ्यात अथवा घराबाहेर आणून सजवला जातो. मरिआईला वाजतगाजत जाताना नवसाने झालेल्या मुलाला सोबत नेतात. त्याच्या अंगावर लिंबाचे डहाळे ठेवतात, देवीजवळ नेल्यावर पोतराज, देवकरीण नाचतात, हलगी, सूर सनईचा आवाज होतो

आणि त्यानंतर पट फोडण्याची ही प्रक्रिया होते. त्यानंतरच त्या मुलाला पोतराज झाल्याची मान्यता मिळते. तर तो वयात आल्यानंतर त्याचे कान फुंकण्याचा कार्यक्रम तेथील जुन्या पोतराजांकडून केला जातो. त्या वेळी कलालाही खास बोलावले जाते. तेलंग आणि कलाल हे एकच असतात. त्यानंतर गादी भरण्याचा कार्यक्रम होतो. तो एक प्रकारचा विधी असतो. त्या गादीनंतर काही ठिकाणी पोतराजांसोबत देवकरांना दीक्षा दिली जाते. कलाल हा देवकरांचा मूळ गुरू असल्याची मान्यता आहे.

पोतराज होण्यापूर्वी त्याला पाच रोजाची हळद लागते. त्यासाठी 'कारणा'चा कार्यक्रम ठेवावा लागतो. एखाद्या नवरदेवाप्रमाणे तो प्रकार असतो. यासाठी मोठा मांडवही घालावा लागतो. त्याच्या हातात डावही बांधावा लागतो. डाव बांधून त्याला नदीच्या, गंगेच्या काठावर, अथवा जवळ असलेल्या पुष्करणी, विहीर, बारव, तलाव यांच्या काठावर वाजतगाजत नेले जाते. यात सुवासिनीसह गावातील इतर महिला-पुरूष सहभागी होतात. नदीकाठावर अथवा तलावाशेजारी गेल्यावर पूर्वी रेड्याचा बळी दिला जात असे. आता कोंबडे, बकरे यांचा बळी दिला जातो. त्या वेळी उपस्थित असलेल्या पोतराजाच्या अंगात देवी संचारते, तो बेभान होऊन नाचत असतो. त्याच वेळी तो बकरे अथवा कोंबड्यांचे मुंडके आपल्या दाताने तोडून गंगेच्या, तलावाच्या पात्रात टाकतो. या वेळी हा पोतराज गंगेकाठी बळी देण्यापूर्वी रेड्याच्या पाठीवर उभा राहून धुपारती घालतो. अलीकडे अशा प्रकारचे विधी खूप कमी झाल्याचे दिसतात. धुरपतामायच्या पोतराजांसोबत येरमाळ्याच्या येडामायला सोडण्यात येणाऱ्या पोतराजांच्या संदर्भात असे विधी हमखास केले जातात.

नांदेड, परभणी, उस्मानाबाद, सोलापूर आदी जिल्ह्यात आणि इतर काही ठिकाणी पोतराज म्हणून देवीला सोडलेला मुलगा मोठा झाल्यानंतर त्याचे देवीबरोबर विधीपूर्वक लग्न लावले जाते. त्याच वेळी त्याच्या घरी गोंधळ घातला जातो. लग्नविधी आटोपल्यानंतर मुलाला पोतराजाची दीक्षा दिली जाते. त्यानंतरच त्याला पोतराज म्हणून मान्यता आणि त्याला एखाद्या मुलीबरोबर दुसरे लग्न करून घेण्याची मुभा मिळते. (पृ.७०)

पोतराजाला हाल्या, रेडा सोडताना अथवा त्याचा बळी देण्यापूर्वी तो त्या गावात गावभर फिरवला जातो. हा प्रवास नवीन दीक्षा घेणाऱ्या

पोतराजाच्या घरापासून सुरू होतो आणि तो बारा बलुतेदारांच्या दारांपर्यंत जाऊन पोहोचतो. सुरुवातीला हाल्यावर धुपारती म्हणून पोतराज-देवकरीण आणि गावातील सुवासिनींचा हा मेळा सुरू होतो. त्यापूर्वी त्याला खूप सजवले जाते. सुरुवातीला हा रेडा पाटलाच्या घरी आणला जातो. सुवासिन पाटलीन या रेड्याचे आणि आलेल्या लोकांचे स्वागत करते. ती घरातून बाहेर येताना आपल्याकडील दोन सुपात धान्य, आरती आणि ओटी भरण्याचे साहित्य आणते.

नवीन होणाऱ्या पोतराजाची अन्नधान्याने ओटी भरते. त्यादरम्यान, ती आपल्या दारात आणलेल्या रेड्याची, हाल्याची हळदी, कुंकू लावून आरती करते. आपल्यासोबत आणलेले पाणी हाल्याच्या पायावर टाकते. सोबत दोन सुपे भरून आणलेले गहू, ज्वारी आदी धान्य ती हाल्याच्या समोर दाखवते. तो त्याला तोंड लावतो. ते लावणे म्हणजे गावाची एकूणच गण समाजाची भरभराट होणार असल्याचे संकेत त्यामागे असतात. आपल्या गावातील शेती पिकांची भरभराट होते, त्यांची रास अशीच भरून येते, असेही त्यामागे संकेत असतात. त्यामुळे पाटलाच्या घरी आणि त्यासोबत गावाच्या चौकातही अशी पूजा केली जाते.

हाल्याने तोंड लावलेले धान्य हे पोतराज नंतर आपल्या झोळीत टाकतो. हाल्याला चौकात वाजतगाजत आल्यानंतर तिथेही गावातील महिला पोतराजाची नारळ आणि अन्नधान्याने ओटी भरतात. पुढे ते सुताराच्या घरी जातात. त्याच्या घरी ज्या न्यावच्या आधाराने लाकडाची सर्व अवजारे तयार केली जातात, त्याच्या आजूबाजूला पूजेचे सामान मांडले जाते. देवकरीण, सुवासिन महिला सुरुवातीला सुताराने तयार केलेल्या शिकरं, औत, गाडीची चाकं, पेरणीसाठी लागणारी अवजारे आदी सर्वांवर भंडारा टाकतात. कुंकू लावतात. ज्या ठिकाणी न्याव ठेवण्यात आले तिथे जमिनीवर पाणी टाकून चौकट काढतात. त्यावर भंडारा उधळून त्या न्यावची पूजा केली जाते. सुतारानंतर तेथे असलेल्या मारुती अथवा इतर ग्रामदेवतेच्या देवळासमोर त्याला नेले जाते. शेवटी गावाबाहेर असलेल्या मरिआईच्या मंदिरासमोर रेड्याला आणले जाते. त्या ठिकाणीही पोतराज हाल्याच्या पाठीवर उभे राहून धुपारती म्हणतो. त्या वेळी त्याच्या अंगात देवी आणि तो मोठी आरोळी देत खाली उडी

मारून येतो. पट फोडण्याचा दुसरा एक प्रकार हा नवीन पोतराजाच्या दीक्षेच्या वेळी केला जातो. त्या काळात पोतराज हा एक राजा असतो, अशी त्याला यावेळी मान्यता असते. या राजाला केवळ पोतराजाच्याच माध्यमातून दीक्षा दिली जाते. तोच त्याचे कान फुंकू शकतो. तोच नियम देवकरणींच्या बाबतीत असतो. पोतराजाचे कान दुसऱ्याला फुंकता येत नाही. त्यातही देवकर यांनाही हे अधिकार नसतात. मात्र, अलीकडे काही देवकर पोतराजाचे कान फुंकण्याचा प्रकार करत असल्याने मूळ रचना विसकळीत होताना दिसते. महिलांना देवकरीण होण्याची परंपरा काहींनी मोडीत काढून थेट महिलाच पोतराज बनून त्यासाठीची बतावणी करण्याचे प्रकार मागील काही वर्षांत सुरू झाल्याचेही दिसून आले.

## सात दिवसांचे इरडं

चंद्रपूरात चैत्राच्या यात्रेत दीक्षा देताना कान सवारणीचा कार्यक्रम खूप महत्त्वाचा असतो. त्यात केल्या जाणाऱ्या विधीपैकी 'इरडं' हा एक महत्त्वाचा विधी असतो. 'इरडं' म्हणजे कुंभारांकडून आणण्यात आलेले नवेकोरे गोल मडके. त्याला सजवून त्यामध्ये पाच दिवस दिवा लावला जातो. पोतराज-देवकरीण यांच्याकडून आपल्या गावाच्या वेशीबाहेर, चौरस्त्यावर असलेल्या मरिआई, पोचीमाय या देवीजवळ 'इरडं' बसवावे लागते. ते बसविण्यापूर्वी गादी भरली जाते. शेणाने सारवलेल्या जमिनीवर अथवा कपड्यावर गहू, तांदळाच्या रेषा काढून चौक अथवा चौपट काढला जातो. त्याच्या आजूबाजूला हळदीच्या कोंबासह सजावट करून दिवा लावलेले मडके म्हणजे 'इरडं' त्या चौपटाच्या मधोमध ठेवले जाते. त्यातील दिवा सलग पाच दिवस तेवत ठेवण्याची अट असते.

यादरम्यान, रात्रीच्या वेळी महिला पाच दिवस देवींची गाणी म्हणतात. कधीकधी रात्रभर कार्यक्रमही केले जातात. तर कधी त्याचे बंधनही नसते. मरिआई अथवा पोचीमायचे मंदिर दूर असल्यास नव्याने कान सवारणी केली जाणाऱ्या पोतराज-देवकरीण यांच्या घरीही हे इरडं लावले जाते. मागील ६० वर्षांपूर्वी सात दिवसांचेही इरडं बसवले जात असल्याचे उक्कडगावचे पोतराज गंगाराम गायकवाड यांनी सांगितले. लहानपणी पोतराज होताना आपल्या घरात सात दिवसांचे 'इरडं' बसविण्यात होते.

इरडं उचलण्यापूर्वी त्याला खूप सजवले होते, असेही त्यांनी सांगितले.

तेलंगणामध्ये बदकम्मा उत्सवाच्या वेळी ज्याप्रमाणे कुंभ सजवला जातो, तशी त्याची रचना केली जाते. इरड्याच्या गोलाकार बाजूने तलवारीच्या पातीसारखे धारदार धातूची पाने लावले जातात. परिसरात जर ती उपलब्ध झाली नाही तर आंब्याच्या पानावरही चालून जाते.

'इरडं' उचलल्यानंतर त्याची गावात मिरवणूक निघते. त्या वेळी पोतराज ठिकठिकाणी खेळतात. गाणी म्हणतात, बेभान होऊन नाचतात. आपला आविष्कार सादर करत असतात. त्यानंतर त्या इरड्याचे नदी अथवा बारवजवळ त्याचे विसर्जन केले जाते. कानसवारणी करणाऱ्या पोतराज, देवकरीण, देवकर यांना हळद लावून शेज चढवला जातो. त्यानंतर त्यांना त्यांच्या गुरूंकडून कान फुंकणे अथवा कानसवारणीचा कार्यक्रम केला जातो. पाच दिवस 'इरडं' बसविण्याची प्रथा मागील काही वर्षांत खूप क्वचितच ठिकाणी केली जाते. त्यामुळे कानसवारणी करण्यासाठी अलीकडे पाच दिवसांचे इरडं ज्यांना जमत नाही, त्यांना अडीच, सव्वा दिवस अथवा सव्वा तासांसाठी ते बसवावे लागते. त्यानंतरच कानसवारणीचा कार्यक्रम केला जातो.

## पहिला भिक्षेचा मान

दीक्षा घेताना पोतराजाला चाबकाचे पाच कोरडे मारले जातात. तर दीक्षा घेतल्यानंतर पोतराजाला मांगाच्या दारात गेल्याशिवाय इतर कुठेही जाता येत नाही. तो नियम पोतराज पाळतात. दीक्षा घेतलेल्या पोतराजांपैकी बहुतेकजण मांग समाजातील असले तरी त्यांना आपल्याच जातीच्या दारात जाऊन पहिली भिक्षा मागावी लागते. या वेळी पोतराजासमोर हलगी वाजविणारे असतात. हा पोतराज वाजतगाजत मांगवाड्यात जातो. आणि त्या समाजाच्या महिलेने सुपात आणलेले धान्य अगोदर सूपात नाचवून नंतर आपल्या झोळीत टाकतो. आपल्याला धान्य देण्यासाठी आणलेल्या महिलेला भंडारा, कुंकू लावून तिला 'वेल मांडवाला जाऊ दे,' असा आशीर्वादही देत असतो. मांगाने देवी, मातृदेवतेच्या परंपरेसाठी आपले मूल, लेकरू कायमचे सोडलेले असते, त्यासाठी वाहून दिलेले असते, म्हणून मांगाला या परंपरेत सर्वाधिक मान दिला जातो.

चंद्रपुरात चैत्रातील यात्रेच्या काळात दीक्षा घेतल्यानंतर धुरपतामायच्या मंदिराशेजारी असलेल्या झरपट म्हणजेच जरीपटका नदीत आंघोळ करणे, तिला वंदन करणे, असाही विधी करावा लागतो. मातृदेवताच्या परंपरेत नदी, वृक्ष, भूमाता हिची पूजा प्राधान्याने केली जाते. इथे दीक्षा घेतल्यानंतर नदीला अभिवादन करून तिची पूजा केली जाते. पूर्वी हा विधी महाकाली मंदिराच्या उजव्या बाजूला पटांगणाशेजारी असलेल्या बारवमध्ये केला जात होता. कालांतराने बंद करून आजूबाजूचा बराच भाग बुजवण्यात आला. बारव या विधीसाठीचा मोठा पुरावा होता. 'मातृसत्ताक परंपरेत महाराणी होण्यापूर्वी पुष्करणीत आंघोळ केल्यानंतर 'अभिसिंचन' नावाचा विधी केला जात असे त्याची इथे आठवण येते'

चंद्रपुरातील महाकाली मंदिरात असलेल्या मुख्य प्रवेशद्वाराच्या डावीकडील बाजूस राणीचे स्नान हे एक शिल्प कोरलेले आहे. ही स्नान करणारी स्त्री सामान्य नसावी, कारण तिच्यासोबत अन्य स्त्रिया दाखविण्यात आल्याने हा सोहळा राजघराण्यातील स्त्रियांच्या स्नानाचा असावा असे ज्येष्ठ पुरातत्त्वतज्ज्ञ डॉ. रघुनाथ बोरकर यांनी आपल्या 'महाकाली चंद्रपूरची' या शोधग्रंथात नमूद केलेले आहे. (पृ.२१)

'चंद्रपूर हे तलावाचे शहर असल्याने येथेही लघू पुष्करणी असाव्यात. त्यातच महाकाली मंदिराशेजारची ऐतिहासिक साक्ष देणारी बारव बंद केल्याने कालांतराने दीक्षा घेतल्यानंतर जवळ असलेल्या झरपट नदीत आंघोळ करण्याची प्रथा सुरू झाली असावी. अशीच प्रथा नांदेड जिल्ह्यात असलेल्या बारड या पोचेमाय म्हणजेच शीतलामाता या मंदिराजवळही कायम सुरू असते. तेथेही आता पुरातन आणि मातृपरंपरेची ओळख सांगणारी शिल्पाने सजलेली बारव बंद करून ठेवण्यात आली आहे.'

## देवकरणींची दीक्षा

देवकरीण या आपल्या नवीन शिष्याला दीक्षा देण्यापूर्वी थोडीशी जागा शेणाने सारवून एक चौपट तयार करतात. अलीकडे बहुतेक ठिकाणी गुलाबी रंगाची शाल टाकून चौपट तयार करतात. त्यावर तांदूळ सरळ रेषेत टाकत त्यातून पूर्व-पश्चिम आणि दक्षिण-उत्तर अशा चार दिशा काढल्या जातात. नवरात्रात काढण्यात येणाऱ्या चौपटासारखी अशी रचना असते.

हळदीचे कोंब, खोबऱ्याचे तुकडे चारही बाजूला ठेवून त्यावर, तर कधी बाजूने हळद म्हणजेच भंडारा, गहू, तांदूळ माखला जातो. चौपटावर दीक्षा देताना संबंधित व्यक्ती, महिलेला नैर्ऋत्य दिशेला तोंड करून बसवले जाते. अलीकडे गुरूच्या मांडीवर बसवून त्यांचे कान फुंकतात. म्हणजेच दीक्षा दिली जाते. या वेळी हलगी खूप जोराने आणि विशिष्ट अशा ठेक्यात वाजवली जाते. दीक्षा घेणाऱ्यांपासून ते त्या ठिकाणी उपस्थित असलेल्या व्यक्तीला त्या वातावरणात भारावल्यासारखे होते.

**बाई तनं, मनं, धनं,**
**मला गुरूला द्यायचं,**
**शुद्ध करावं महाराजं**
**मोक्षपदाला जायाचं वं... धुरपतामाय**

दीक्षा देण्यापूर्वी पोतराज बेभान नाचतो, तर देवकरणीच्या अंगात वारे येते. या वेळी देवकरीण आपले केस सोडून दीक्षा घेणाऱ्या महिलेला आपला मार्ग सांगत असते. आपल्या अंगात देवी संचारली असून, तिच आता प्रगट होऊन दीक्षा देत असल्याची बतावणी केली जाते. या वेळी हलगी आणि त्यासोबत सूर-सनईच्या आवाजाने वातावरण पूर्णपणे भारावून टाकलेले असते.

दरम्यान, पोतराज-देवकरीण, देवकन्या या आपल्या नवीन शिष्याला कानात गुरूमंत्र देतात. हा गुरूमंत्र काय असतो, त्यातील वाक्य, आदेश काय असतो हे कधीच सांगितले जात नाही. याला 'बीजमंत्र' किंवा 'कानमंत्र'ही म्हटले जाते. त्यासाठी मोठी गुप्तता पाळली जाते. त्याचा शोध घेतला असता केवळ काही सूचना आणि आदेश असतात, असे देवकर सांगतात. कालांतराने या दीक्षेतील मूळ गुरूमंत्र लोप पावला असावा, असे यावरून दिसून येते.

**'बीजमंत्र दिलाय कानी,**
**मार्ग झाला मोकळा.**
**देवकरणी निघाल्या या आरतीला.'**

यासोबतच बीजमंत्रासाठी इतर अनेक गाणी म्हटली जातात.

बीजमंत्र देण्याची तयारी कशी केली जाते, याचे वर्णन केले जाते. यावेळी होणाऱ्या कार्यक्रमात उपस्थित महिला अथवा पुरूष यांचे मळवट भरून त्यांचा शेज भरला जातो. मळवटावर तांदूळ माखला जातो.

**चौक भरीला गहू तांदूळ,**
**हळद लावूनी करा पिवळी...**

अलीकडे हा गुरूमंत्र दिल्याबरोबर ती महिला, पुरुष अथवा तरुण तरुणीच्या अंगात देवी आली पाहिजे, असे संकेत आहेत. लगेच देवी अंगात आली नाही, तर गुरू आपले हवे ते 'कयास' लावून मोकळे होतात. असे काही दीक्षाचे कार्यक्रम मी चंद्रपुरमध्ये जाऊन पाहिले. या वेळी नवीन शिष्याच्या कानात गुरू म्हणजेच पोतराज किंवा देवकरीण हे काय मंत्र देतात त्याची नंतर कुठेही वाच्यता केली जात नाही. त्यासाठीचा नियम सर्वच पाळतात. एकदा गुरूमंत्र मिळाला की संपूर्ण आयुष्य तो शिष्य गुरूच्या सेवेसाठी तयार असतो. तो म्हणेल त्याच नियमाने, वागण्याचे संकेत पाळले जातात.

कधीकधी दीक्षा घेताना नवीन शिष्यांच्या अंगात देवी आली नसल्यास त्याला चुकीची कारणे लावली जातात. 'करणी' म्हणजे जादूटोणा करण्यात आला असून त्याचा उतारा करावा लागेल, असे सांगून नंतर त्या शिष्यांची भलतीच अडचण, फसवणूकही केली जाते. ही अडचण करण्याची प्रथा काही लोक आपल्या सोयीसाठी करत असल्याचेही दिसून आले. दुसरीकडे कोल्हापूरच्या महालक्ष्मी आणि काळूबाईच्या पोतराजाला दीक्षा देण्याच्या विधीला 'बढण' म्हणतात.(पृ.१२५) हा विधी थोडा वेगळा असतो. धुरपतामायच्या पोतराजाला दीक्षा देण्यासाठी पटफोडणी, इरडं आदी प्रकार वेगळे दिसतात.

राजामाय, यमुनामाय, विठामाय आणि भागामायकडून दीक्षा घेतलेल्या देवकर आणि देवकरर्णींकडून मात्र वेगळीच माहिती मिळाली. अंगात आले नाही म्हणून त्यांना या देवकरर्णींनी कधीही दोष दिला नाही. केवळ सेवा आणि भक्ती यावरच आधारित अशी त्यांची शिकवण होती. मात्र, अलीकडे अडचण करणाऱ्या गुरूंची संख्या खूप वाढलेली दिसते. पोतराज नवीन शिष्याला उभे करून आपल्याकडील चाबकाचे फटके

मारतो. कमी वयाच्या मुलांना चाबकाचे फटके मारून कधी-कधी आयुष्यभराची वेदना देतात. मात्र, गुरूने केलेल्या दीक्षेच्या नावाखालील शिक्षेला कोणी विरोध करत नाहीत. तर धुरपतामायच्या मूळ परंपरेला बगल देत अनेक महिला एकाच वेळी इतर देवी-देवतांची सांगड घालतानाही अलीकडे दिसतात. तुळजापूरच्या आईच्या उपासक, भक्त असलेल्या आराधिनी महिला माळ-परडी घेऊन वेगळी ओळख जपतात. तसे धुरपतामायच्या देवकरीणची वेगळी ओळख आहे. कपाळावर माखलेला भंडारा, एका हातात लिंबाचा डहाळा, दुसऱ्या हातात पितळेचा भंडाऱ्याने भरलेला डबा आणि अंगाखांद्यावर गुलाबी रंगाची शाल अशी ओळख असते. देवकरीण गळ्यात भल्या मोठ्या कवड्यांच्या माळा क्वचितच घालताना दिसतात. तुळजापूरच्या देवीची आराधिनी आणि आपण या दोघी बहिणी असल्याचे, आपला गुरू एक असल्याचे त्या गाण्यातून सांगतात. दीक्षेत आपल्या गुरूंकडून मिळालेला भंडाऱ्याचा डबा देवकरीण आयुष्यभर जपतात. त्यानंतर तो आपल्या पुढील पिढीकडे सुपूर्द केला जातो. तर मध्ये एखाद्याला मिळालेला हा डबा, त्याचा वारसा सोडताही येतो. त्यासाठी कोंबडे, बकरे कापून सण करावा लागतो, तर चंद्रपूरला जाऊन झरपट नदीच्या पात्रात त्यातील भंडारा विसर्जित केल्यानंतर त्यातून सुटका करण्याची मुभा असते. मरिआई, पोचेमाय आणि धुरपतामायच्या नावाने होणाऱ्या सणाच्या कार्यक्रमात हिल्लाळ काढला जातो. त्या वेळी देवकरीण या प्रामुख्याने तुळजापूरच्या देवीसंदर्भातील आराधिनीचा उल्लेख असलेले गाणे आवर्जून म्हणतात. ते गाणे असे असते -

**आईनं अंबिकानं, इथं माय दिलंय जबरं ठाणं**
**तुळजापूरं शारं शारं, दिसतं माळं म्होरं,**
**दिसतं माळं म्होरं, इथं माय दिलंय जबरं ठाणं.**
**तुळजापूरं शारं, मायचं शिंदफळं माहेरं,**
**हिरव्या पातळाची माय, केलं भोप्यानं आहेरं**
**आराधिनी बाई, तू नको राहू गरवानं,**
**राहू तू गरवानं, जावू गं एक्या मारगानं...**

आराधिनी बाई, तू नको होऊ हिरमूकं
आंबाच्या राऊळातं, तुझा गं माझा गुरू एकं
आंबाच्या राऊळातं, गुरूमाय बहिणीचं नातं..
तुळजापुरामंधी कोणं हिंडतीया भणाभणा,
मायच्या कवडी येईना मना.
देवीच्या कवडी येईना मना...
तुळजापुरामंधी गं कोणं हिंडतीया दोघी-तिघी,
कवडी माय नाही मनाजोगी..
कवडी माय नाही मनाजोगी...
तुळजापूरामंधी कोण हिंडती नागीनं,
ओल्या माय झाडाला आगीनं,
ओल्या गं झाडाला आगीनं...

'देवकरीण शक्यतो कवडीच्या माळा घालत नाहीत. मात्र, एकाच वेळी तुळजापूरची आराधिनी आणि देवकरीण म्हणून वावरत असलेल्या महिला कवड्याची माळा आणि हातात भंडाऱ्याचा डबा असतो.

मात्र, त्यांना देवकरीण ही उपाधी दिली जात नाही. त्यांची ओळख ही आराधिनी म्हणूनच असते. त्यामुळे मातृपरंपरेतील देवकरीण आणि आराधिनी या दोघींमध्ये खूप मोठे साम्य दिसते.'

## पोतराज, देवकरीणसाठी गुरूमंत्र

आपल्याकडून दीक्षा घेणाऱ्या शिष्याला गुरूमंत्र दिला जातो. एकदा दिलेला गुरूमंत्र काय होता, याची माहिती शिष्यांनी गुरू होण्याची पात्रता आपल्या अंगी येईपर्यंत कोणालाही देऊ नयेत, असे संकेत असतात. हे संकेत कटाक्षाने पाळले जातात. एकदा आपला गुरू झाल्यानंतर त्यांनी दिलेले आदेश, सूचना अंतिम समजल्या जातात. देवकरीण आणि पोतराज यांच्या गुरूमंत्रामध्ये सारखेपणाच असतो.

धुरपतामायची परंपरा ही निसर्ग, पृथ्वीची पूजा करणे, प्राणीमात्रांवर दया करणे, सत्य बोलणे, यावर अधिक भर दिला जातो. बऱ्याचदा गुरूचे काही चुकले तरी त्याविरोधात कोणी जात नाही. एकदा गुरूमंत्र मिळाला



की, आपली एक नवीन फलटण तयार करण्याची मुभा मिळते.

देवकरीण-पोतराज हे आपला गुरूमंत्र देताना हलगी आणि सूर, सनईचा खूप मोठा आवाज करून त्यासाठी वातावरण तयार करतात. यासाठी काही वेळ हलगीचा विशिष्ट असा ठेका धरला जातो. अगदी सर्व अंग भारून जाईल असे वातावरण तयार होताच गुरूमंत्र म्हणजेच कान फुकण्याचा विधी केला जातो. त्यात प्रामुख्याने 'गुरू म्हणून मला यापुढे तुझे तन-मन आणि धन हे आयुष्यभर अर्पण करशील, यासाठी तू आजपासून ही शपथ घेताहेस' असे कानात सांगून त्या व्यक्तीला शपथ दिली जाते.

कानात हे वाक्य सांगताना आपण काय सांगितले हे आयुष्यभर कोणालाही सांगायचे नाही, असा दंडक असतो. त्यामुळे कान फुंकताना गुरूमंत्र काय दिला हे एकमेकांना कोणी सांगत नाही. अलीकडे कान फुंकण्याचा हाच मोठा व्यवसाय बनला आहे. यासाठी हजारो रुपये आकारले जातात. अनेकदा तर कान फुंकल्यानंतर आपल्याला ही रक्कम मिळणार नाही, असे वाटल्यास त्यापूर्वीच तळहातावर भंडारा टाकून त्यावर कापूर लावून यासाठीचा मोबदला देण्याचे कबूल करून घेण्याची प्रथाही सुरू झाल्याने काही ठिकाणी पाहावयास मिळाले. यामुळे बऱ्याचदा कान फुकलेल्या महिलांना आर्थिक भुर्दंड सोसावा लागतो.

दीक्षा घेतलेला देवकर, देवकरीण-पोतराज हा एक-दोन वर्षानंतर धुरपतामायच्या यात्रेदरम्यान आपली वेगळी शिष्यपरंपरा तयार केली जाते.

मात्र मूळ गुरू घर आणि त्यांचीच परंपरा त्यांच्या नावासह चालविले जाते. त्यासाठी नवीन अब्दागिरी म्हणजेच एक नवीन गादी (गुरू घर) होते. गादीघर सुरू झाल्यास त्यांचा एक मोठा समूह तयार होतो. प्रत्येक चैत्राच्या वारीला हा समूह आणि समूहाचा प्रमुख हा आपली वेगळी ओळख कशी राहील यासाठी कायम प्रयत्नात असतो. अलीकडे मोठ्या प्रमाणात मूळ देवकर आणि देवकरीण यांचे गादीघर मागे पडल्याचे दिसतात. तरीही राजामाय, विठामाय, भागामाय, यमुनामाय आणि रुकमामाय यांच्या समूहाचा दरारा अजूनही दिसतो. राजामायची परंपरा त्यांचे बालाजी महाराज आणि श्यामसुंदर महाराज ते प्रभावीपणे चालवतात. दोघांच्याही वेगळ्या अब्दागिरी, वेगळा म्याना असतो. त्यातच आता एका मुलीचीही यात विभागणी झाल्याचे मागील काही वर्षांत दिसून आले. दुसरीकडे नरळद-इरळदच्या देवयमायची परंपरा सध्या तुळशीदास महाराज देवकर चालवतात. मात्र त्यांचा सर्वाधिक कल हा भक्ती परंपरेकडे आहे. मातृदेवतेच्या परंपरेकडे तसा कमी दिसतो. त्यामानाने दैठण्याच्या रुकमामाय आपल्या आई विठामायची परंपरा चालवत होत्या. अलीकडेच त्यांचे निधन झाले. यात देगलूरच्या म्हादामायच्या वारसदारांना मात्र त्यांच्यानंतर वेगळी ओळख जपता आली नाही. शिवाय त्यांची वेगळी अब्दागिरीही क्वचितच दिसते.

धुरपतामायच्या परंपरेत पोतराजांकडून केली जाणारी आरती आणि तिचे स्थान खूपच महत्त्वाचे असते. या आरतीचे वैशिष्ट्ये असे की, धरतीमाता म्हणजेच भूमातेपासून ते बृहस्पतीपर्यंत(चार्वाक) सलग बारा जणांना ती वाहिलेली असते. मात्र यात पहिली आरती कोणाच्या नावे असते, हे नाव घेतले जात नाही.

काळाच्या ओघात ते गायब झाले असावे. नेमके हे नाव का घेतले जात नाही, याचा उलगडा पोतराज करत नाहीत. हा उल्लेख प्रत्येक वेळी टाळला जातो. मात्र ही पहिली आरती ही मातृदेवतेला, स्त्रीदेवतेला वाहिलेली असावी असे मत ज्येष्ठ अभ्यासक राजाराम सूर्यवंशी यांचे आहे. या आरतीत पोतराज पृथ्वी, त्रिभूवन, वेद, द्रौपदी, सप्तमाता, म्हसोबा, बळीराजा, जोर्तिलिंग, महादेव आणि बृहस्पतीला वंदन करतो, त्यांना नमस्कार करतो.

## पोतराजाची आरती

**पहिली आरती..**

(यात पहिली आरती कोणाला हा उल्लेख टाळला जातो, मात्र ती निर्ऋतीला म्हणजेच मरिआई या भूमातेला असावी)

**दुसरी आरती धरती माताला,**
**तिसरी आरती तीरभवनाला,**
**चौथी आरती चार वेदाला,**
**पाचवी आरती पाच पांडवाला,**
**सहावी आरती सहा धुरपतीला,**
**सातवी आरती साती आसराला,**
**आठवी आरती महिषासूराला,**
**नववी आरती नऊ खंड पृथ्वीला,**
**दहावी आरती दहा काशीला,**
**अकरावी आरती आकरा रूद्राक्षाला,**
**बारावी आरती बारा बृहस्पतीला,**
**तुमच्या चरणी माझा नमस्कार...!**

दुसरीकडे देवकरीणसाठी अभिषेक केला जातो. काळाच्या ओघात यातील बरेच मूळ गायब झालेले दिसते. मुळातच देवकरणी या केवळ देवी उपासनापुरत्याच मर्यादित नव्हत्या, ही बाब लक्षात घेणे आवश्यक आहे. चिकित्साविद्या आणि सोबतच वनऔषधीचे अत्यंत चांगले ज्ञान असलेल्या होत्या. आपल्या भक्तांच्या आजारांवर उपाय करण्यात त्यांचा खूप मोठा वाटा होता. म्हणून तरी धुरपतामायच्या परंपरेचा अभ्यास करताना या देवकरणींमुळे गावात आलेले अनेक कॉलरा-पटकीसारख्या महामारीतील अनेक आजार कमी झाल्याचे गावकरी सांगतात. आपल्या गावातील लोक महामारीमुळे मरत असल्याने वेळेगावातील गावकऱ्यांनी रुकमामायला बारसगावातून मोठ्या सन्मानाने आणले होते. त्यामुळे देवकरणीचा हा सन्मान अधिक अधोरेखित करण्यासाठी तिच्याकडून केल्या जाणाऱ्या अभिषेकाचा उल्लेख येत असावा.

**पहिला अभिषकंनं, गरतीला केलं कोणं?**
**जगी लाविलं निशाणं हो बाई, जगी लाविलं निशाणं.**
**पतिवरता राजामायनं हो बाई, जगी लावले निशाणं.**
**दुसरा अभिषकंनं, माय शिंगणापुरा गेले,**
**निरूप पिताजीला देले हो बाई,**
**निरूप पिताजीला देले हो बाई.**
**तिसरा अभिषकंनं, हनुमंतांच्या पारा गेले,**
**बंधुला हे बोलेले हो बाई, गाडी चांद्याला काढीले.**
**चवथा अभिषकंनं, माय वेशीमंधी गेले.**
**हात दैत्याला जोडीले हो बाई, वाट भक्ताला सोडले..**
**पाचवा अभिषकंनं, माय हाय मंदिरातं,**
**पाच बोटं शेंदरातं हो बाई,**
**धुरपता राजामायचे हो बाई, पाचं बोटं शेंदरांत...**

'पोतराज-देवकरीण यांच्यात फार विषमता नसते. दोघांनाही तितकाच मानसन्मान आणि अधिकार असतो.' भारतात आणि विशेषतः महाराष्ट्रात स्त्रीला एखाद्या देवीच्या मंदिरात समान अधिकार मिळणारे कदाचित हे एकमेव उदाहरण असावे. कोल्हापूर आदी ठिकाणी अजूनही स्त्रियांना देवीच्या मूर्तीला स्पर्श करू दिले जात नाही. पोतराजाइतकेच धार्मिक अधिकार देवकरणीला असतात आणि विशेषतः गुरू परंपरेची दीक्षा देताना जात, धर्म आणि इतर कोणतेही निकष इथे विचारात घेतले जात नाहीत. ही बाब खूप महत्त्वाची वाटते.

'पश्चिम महाराष्ट्र आणि आंध्र प्रदेश, तेलंगणा आणि कर्नाटकमध्ये असलेल्या देवदासी, वाघ्या-मुरळी यांचा धुरपतामायच्या परंपरेशी तसा काहीही संबंध दिसत नाही. थोडेबहुत पोतराजाच्या पेहरावाचे आणि काही पूजाविधीचे साम्य दिसते. तेही भौगोलिक परिस्थितीनुसार बदलताना दिसते.' धुरपतामायला वाहून घेतलेल्या देवकरणींची ओळख वेगळी आहे. त्या साधी गृहिणीही देवकरीण म्हणून आयुष्यभर राहू शकतात. विशिष्ट पेहराव आणि इतर दैनंदिन जीवनात कोणत्याही प्रकारचे बंधन

नसते. त्या आपले कुटुंब सांभाळून ज्या वेळी देवीचे सण, उत्सव, कार्यक्रम असतात, त्या वेळी आपली ओळख देतात. इतर दिवशी एखाद्या सर्वसामान्य स्त्रीप्रमाणे राहणीमान असे त्यांचे जगणे असते. चंद्रपुरात चैत्राच्या यात्रेत अलीकडे देवकरांची मोठी गर्दी दिसते. त्यांच्या 'गाद्या', अब्दागिरींची संख्याही वाढल्या आहेत. देवकर म्हणजे पोतराजाचे एक दुसरे पुढारलेले स्वरूप असले तरी त्यांची वेगवेगळी वैशिष्ट्ये पाहावयास मिळाली. पोतराजांसारखा वेष परिधान केलेला नसतो. परंतु यात मोठ्या प्रमाणात तृतीयपंथीयांचा भरणा असतो. ते पोतराज होऊ शकत नसल्याने त्यांची एक वेगळी परंपरा, यादरम्यान देवकर नावाने सुरू झाली असण्याची शक्यता आहे.

देवकर याला भगतही म्हटले जाते. 'कधी-कधी हे तंत्र-मंत्रांचा धाक आपल्या शिष्यांना दाखवत असतात. ते स्त्रियांसारखे केस वाढवलेले असतात. भगव्या, हिरव्या अथवा पिवळ्या रंगाचे कपडे घालतात. यात देवकरांमध्ये काहींची लग्नही होतात.' ते घरप्रपंच करून त्यात दोघेही जोडपे देवकर-देवकरीण म्हणून ओळखले जाते. परंतु मूळ देवकरीणशी त्यांची नाळ खूप कमी जुळताना दिसते. त्यात काहींना जटा आल्यास त्यांचा वेगळा सन्मान असतो.

'जटाचे वैज्ञानिक कारण अस्वच्छतेत, केसांची नीट निगा न राखणे, खबरदारी न घेणे, असे असले तरी ती एक देवीची आणि विशेषतः आपल्याला निसर्गाने, शिवाने दिलेली देणगी म्हणून देवकर, देवकरीण त्याकडे पाहतात.'

## जन्म-मृत्यूचे कंगन

पोतराजांच्या उजव्या हाताच्या दंडात 'वीर कडे' म्हणजेच 'देवीचे कडे' घातलेले असते. हे कडे तामिळनाडू, आंध्र प्रदेशातही देवी भक्तांमध्ये घातलेले दिसते. याला 'वीर कंगन' ही बोलेले जाते. बहुतांश ठिकाणी याचा वापर तंत्र-साधनेसाठी केला जातो. पोतराज अथवा देवकरीण या आपल्या साधनेत परिपूर्ण झाल्यानंतर हे कडे त्यांना कायम वापरण्याची मुभा मिळते. हे कडे कायम आत्मप्रेरणा, बळ आणि ताकद देते. आपल्या साधनेत अढळ ठेवते. अथवा संकटांपासून दूर ठेवते,

असा त्यांचा समज आहे. कोणत्याही कठीण प्रसंगातदेखील हे कडे हातात असले की, आपले रक्षण मायधुरपता करते, असा समज आहे.

'वीर कंगन' अथवा 'वीर कडे' हे विशेषतः महाराष्ट्रात बुलढाणा जिल्ह्यातील पाचोळा या गावातील दोन कुटुंबातील कारागीरांकडून तयार केले जाते.' हे 'कडे' काही वर्षांपर्यंत पौर्णिमेच्या दिवशी चंद्राच्या शीतल छायेत तयार केले जायचे. त्यासाठी काही ठरावीक विधीही केला जात असल्याचे सांगितले जाते. अलीकडे हा विधीही गायब झाला. या कड्याला 'वीर' का म्हटले जाते, याचा उलगडा होत नाही. मात्र देवीचे कडे आणि तंत्र-साधनेसाठी एक वेगळी ओळख म्हणून त्याचा उलगडा होण्यास बरीच मोठी मदत मिळते.

संपूर्ण सृष्टीचे चक्र, जन्म-मृत्यूच्या फेऱ्यातून गतिमान कसे होते, याची एक साक्ष हे 'कडे' देते. ते एक प्रकारे जीवनचक्र आणि त्याचा प्रवास हे स्पष्ट करत असते. जीवन-मरणाच्या प्रक्रियेतील सर्व घडामोडी एका



सरळ रेषेत आणि सहजपणे लक्षात येतील इतकी साधी रचना याची असते. अलीकडे या कड्याचे स्वरूपच बदलले दिसते. मूळ रचना त्यावरील वीर, मातृदेवता यांचीही संख्या कमी झालेली असल्याने या कड्यामागील असलेली मूळ जीवनचक्राची संकल्पनाच नष्ट होण्याच्या मार्गावर येऊन पोहोचली आहे.

'धुरपतामायच्या परंपरेत वीर कड्याला 'देवीचे कडे' म्हणून ओळखले जाते.' तर हे 'कडे' म्हणजे एक प्रकारे जन्मापासून ते मृत्यूपर्यंतचा प्रवास दाखवणारे एक सृष्टीचक्राचे प्रतीक आहे. हे प्रतीक पोतराज, देवकरीण आपल्या उजव्या हाताच्या दंडावर कायम घालून असतात. तर देवकरीण बहुतांश वेळा हे कडे आपल्या भंडाऱ्याच्या डब्यात ठेवत असतात. या कड्यावर जन्मानंतर सुरू झालेला प्रवास आणि शेवटी मृत्यू या अंतिम सत्यापर्यंत जाऊन होतो. त्यातून आपले प्राण नसलेले शरीर (शव अथवा मढे) हे अखेरच्या टोकावर कोरलेले असते. तंत्र व शैव परंपरेत अशा प्रकारच्या रचना आढळून येतात. प्रकृतीच्या

रचनेत असलेल्या पंचमहाभूतांचा यात समावेश असतो. सर्व देव-देवतांपेक्षा देवी, सप्तमाता म्हणजेच सातीआसरा, म्हसोबा, महाकाली, सरस्वती, लक्ष्मीसोबत महादेवाची पिंड, त्रिशूळ, नंदी आणि बावन्न वीर कड्याच्या सर्व बाजूने सरळ रेषेत उभे केलेले असतात. 'कड्याची सुरुवात ही एका वेशीपासून होते. वेशीचा आकार त्यात देण्यात आलेला असतो. शेवट हा वेशीच्या बाहेर होतो.' या प्रवासात सर्व देव-देवता आणि त्यातच जीवन-मृत्यूचा प्रवास दाखवला जातो. प्रत्येक व्यक्तीचा या सृष्टीचक्रात जन्म आणि शेवटी त्याचा अंत होतो. म्हणजेच त्याचा नाश होतो. जीवन आणि सर्व काही अनित्य आहे, याची जाणीव हे कडे करून देते. यामुळेच या कड्याच्या अंतिम टोकावर शव म्हणजेच मढे असते, त्याला वाजंत्री वाजवत घेऊन वेशीच्या बाहेर जात असतात. यातून जन्म आणि मृत्यूची जाणीव करून दिली जाते.

'आंध्र प्रदेश, तेलंगणा, मराठवाड्यापासून ते ओडिशाच्या टोकापर्यंत दलित-भटके आदी जातींमध्ये अजूनही अंत्ययात्रेच्या समोर वाजंत्री लावून ती नेली जाते. त्यासाठी हलगीचा आणि सूर-सनईचा एक ठेका ठरलेला असतो. त्या ठेक्याने संपूर्ण परिसर धीरगंभीर केला जातो. इतकी ताकत त्यात असते. असे ते जीवनचक्राचे चित्र या कड्यावर विविध माध्यमातून उभे करण्यात आलेले असते' या कड्यावर तयार करण्यात येणाऱ्या नवीन कड्यांमध्ये सप्तमाता, शंकर, महादेवाची पिंड, नंदी, सातीआसरा, गणपती आणि वीरभद्र आदी देवींच्या पलीकडे दुसऱ्या देवतांची रचना दिसत नाहीत. यासंदर्भात मागील दशकभरात बरेच बदल झाल्याचे वयस्कर पोतराज सांगतात. हे 'कडे' अलीकडे काही पोतराज आपल्या भक्तांना तंत्राच्या नावाने भीती दाखविण्यासाठीही वापरत असले, तरी मूळ वापर हा 'देवीचे कडे' म्हणूनच पोतराज आपल्या साधनेसाठी, निसर्गमायेच्या पूजेसाठी करताना दिसतात.

## बावन्न वीर ; तंत्रसाधना

सुरुवातीला म्हटल्याप्रमाणे या कड्याचा वापर हा तंत्रसाधनेसाठी केला जातो. पोतराज-देवकरीण ही परंपराही मुळात तांत्रिकांची आहे. काळाच्या ओघात या साधनेतील अनेक बदल झाले. वेळोवेळी ती परंपरा

नष्ट करून तिच्यावर आघात करण्यात आले असले तरी त्यातील काही सप्तमातांची मूळ परंपरा अजूनही जतन करून ठेवण्याचे मोठे कार्य पोतराज-देवकरीण यांनी केले आहे.

बावन्न वीरांना तंत्र-साधनेत खूप महत्त्व असते. तेच 'वीर' पोतराजाच्या वीर कंगनावर एका रेषेत उभे दाखवले जातात. यातील प्रत्येक वीर आणि त्याच्या शक्ती, उपासना या भिन्न प्रकाराच्या असल्याच्या नोंदी पुरातन साहित्यात पाहावयास मिळतात. मात्र, हे सर्व मातृदेवता मातृपूजक असल्याने त्यांना तंत्रापासून वेगळे करता येत नाही. राज्यात धनगर, मांग आदी समाजात 'वीर' नावाने शालीग्राम आदी देवतांची पूजा करतात.

गणांच्या सुबत्तेसाठी, सुरक्षेसाठी ज्यांनी आपल्या प्राणांची आहुती दिली, त्यांनाही वीर म्हटले जाते. 'वीर' म्हणजे 'गणबंधू' गणाची देवता असते. पोतराज त्याचा वेळोवेळी उल्लेखही करत असतात. देवकरीण, देवकन्या याचा भाऊ असलेला पोतराज हाही एक प्रकारचा 'वीर' आणि 'गणबंधू' आहे. सांगली, सातारा, कोल्हापूर, पुणे आदी परिसरात ज्या ठिकाणी धनगरांची हंगामी मुक्कामांची जागा म्हणजेच वाडी असते, त्या ठिकाणी 'वीर' अथवा विरोबा आदींची देव दिसतात. हा वीर आणि मांग जातीतील लोकांनी एखाद्या मृत व्यक्तीचे भूत शांत करण्यासाठी उभारलेले 'मांगवीर पंथ' हे वेगळे असल्याचे डी. डी. कोसंबी म्हणतात. (पृ.१५९) तसेच वीर पंथांच्या उपासनेचे मूळही सातारा जिल्ह्यात असावे, असेही कोसंबी नमूद करतात. मराठवाड्यातील अनेक गावांमध्ये शेंदूर लावून सटवाई, म्हैसेम्माप्रमाणेच वीरही घरात, घराबाहेरील देवळीत ठेवलेला असतो. विशेषतः माझ्या आजीनेही गोल दगडला शेंदूर लावलेला 'वीर' शालीग्राम कायम जतन केला होता. वेळअमावस्याच्या दिवशी देवळीतून काढून या वीराला मोठ्या परातीत ठेवून त्यावर भंडार उधळत जयघोष केला जाई. 'शिवा मल्हारीचा यळकोटऽऽ यळकोटऽऽ घे' असा तो जयघोष असायचा. त्यासोबतच महाशिवरात्रीच्या दिवशीही वीराची पूजा केली जाते. या पूजेवरून शिवाचा, म्हणजेच वीराचा संबंध हा तंत्राशी असला पाहिजे. महाशिवरात्र आणि त्या दिवशी असलेले वीराचे महत्त्व असते.

आपल्या कुळातील, गावातील किंवा परिसरातील एखाद्या पुरुष अथवा

स्त्रीने, एखाद्या विशेष कार्यासाठी आत्मबलिदान केलेले असल्यास त्यांची आठवण म्हणून घडीव दगडही उभा करतात. त्याला वीर म्हणूनही नाव दिले जाते. महाराष्ट्रातील ग्रामीण भागांमध्ये या वीरांची गणना ही ग्रामदेवतांमध्ये केलेली आहे. अशा वीरांची स्मारक, शिल्प राज्यात आणि देशात ठिकठिकाणी उभारलेली आहेत.(पृ.१०२)

आपल्या कुळांचे रक्षण याच वीरांनी केल्याने त्यांची आठवण केली जाते. वीराच्या नावाने वीर सुवासिनी वाढल्या जातात. हा विधी म्हणजे म्हणजेच पाच ते सात नवीन लग्न झालेल्या मुलींना घरी आणून त्यांना गोडधोड जेवण घातले जाते. काही वेळा सुवासिनींची तांदूळ, खारीक, खोबरं आणि हळदीच्या कोंबाने ओटी भरण्याचा एक कार्यक्रम असतो. यावेळी सुवासिनीचा सन्मान, पूजा करण्याचीही प्रथा आहे. विशेषतः पौष महिन्यात या वीर-सुवासिनी वाढल्या जातात. तर म्हसोबा, वीरोबा, खंडोबा या बळीराजाचे सर्व नवखंडकरींना वीर म्हणून गणले जायचे. नंतर लग्नकार्याच्या सुरुवातीपासून ते अनेक अमावस्यांच्या दिवशी या वीराला धुऊन पाट्यावर शेंदूर लावून ठेवले जाते. त्याची पूजा करण्याचा मान त्या वेळी पुरूष मंडळीकडे असायचा.

बसवेश्वरांनी स्थापन केलेल्या आपल्या धर्माचे नाव 'वीरशैव' असे ठेवले होते. वीरशैवाचे महत्त्व आणि त्याचाही प्रभाव मराठवाड्याच्या बहुतांश परिसरात होता. वीराचे महत्त्व दलित, समाजासोबत बंजारा समाजातही खोलवर रुजले होते. युद्धात किंवा एखाद्या साहसी कृत्यात धारातीर्थी पडलेल्या पराक्रमी शूरवीरांच्या देशातील विविध राज्यात त्यांच्या आठवणीसाठी उभारलेले दगड, लाकडी ठोके, विविध आकारांच्या शिल्पाकृतींनी साकारलेल्या गाथांना 'वीरगळ' म्हटले जाते.

भारतात ही प्रथा प्राचीन काळापासून असल्याचे दाखले मिळतात. त्या-त्या राज्यात वीरांना वेगवेगळी नावे आढळतात. महाराष्ट्रात वीर, केरळात त्यांना 'तर्रा' आणि कर्नाटकात त्यांना 'कल्लू' म्हणतात. कानडी भाषेत कल्लूचा अर्थ दगडी शिळा किंवा स्मारकशिळा होतो. कर्नाटकात हे वीर म्हणजेच 'वीरकल्लू' म्हणून बीदर, भालकी, गुलबर्ग्यापासून ते बेळगाव या पट्ट्यात मोठ्या प्रमाणात आढळून येतात.

डॉ. नीरज साळुंखे यांनी आपल्या 'दैत्य बळी व कुंतलदेश महाराष्ट्र'

या संशोधनपर ग्रंथात वीरगळ नावाच्या प्रकरणात 'वीर' आणि त्यामागील ऐतिहासिक उलगडा केला आहे. ऋग्वेदामध्ये मरुतांना वीर, मर्यावीर (मारल्या जाणारे पुरुषास) म्हटले गेल्याचे ते सांगतात. मरुत हे सात संख्येशी निगडीत आणि पर्जन्यदेव म्हणून सुफलतेशी निगडीत आहे. सात संख्या ही मातृदेवता सातीआसराशी संबंधित आहे.

सातीआसरा या कुमारिका मानल्या जातात. तर म्हसोबा हा वीर आहे. कृषक हे गण म्हणून येतात, 'वीर' याचा अर्थ गणभाऊ गणसदस्य असाही होतो. (पृ.१४७) तर बंजारासमाजात अजूनही 'वीरो' हे आपल्या भावाला म्हटले जाते. तर अनेकांचे नावही बंजारासमाजात आवडीचा भाऊ म्हणून 'वीरा' ठेवले जाते. त्यासोबतच बंजारा स्त्रिया या शिवाला आपला भाऊ मानतात. त्यामुळे 'शीव' ही देवता बंजारा समाजात 'शिवभाया' म्हणून ओळखली जाते. (पृ.१४७)

वीरभद्र हा शिवावतार मानला जात असल्याचे डॉ. साळुंखे सांगतात. त्याचप्रमाणे 'वीर' हा शब्द बळीशी व रट्ठ समाजाशी निगडीत होता. हडप्पा संस्कृतीत मर्तिक प्रथा दफनाची होती. मराठवाड्यात विशेषतः दलितांसह इतर समाजात अजूनही काही ठिकाणी मृतास दफन केल जाते. (पृ.१५२) सदाशिव टेटविलकर यांनीही 'वीर'यावर प्रकाश टाकला आहे. 'महाराष्ट्रातील वीरगळ' या त्यांच्या संशोधनपर ग्रंथात वीरांसंदर्भात त्यांच्या पूजा-अर्चापासून ते असलेल्या शिल्प आणि त्यांच्या भौगोलिक स्तवरावरील वेगळेपणाची माहिती जमविली आहे. वीरपूजा कशी सुरू झाली याचाही ते उलगडा करतात. ते म्हणतात की, 'शूर पराक्रमी वीर पुरुषांची त्यांच्याविषयी वाटणाऱ्या आदरामुळे किंवा त्यांनी आपले कोणत्याही प्रकारे अशुभ करू नये, म्हणून त्या-त्या व्यक्तींच्या नावे उभे करून दगड, लाकडी ठोके, अनघड किंवा घडीव मूर्ती यांची पूजा करण्याच्या पद्धतीला 'वीरपूजा' असे म्हणतात.' हे वीर पंचवीर, बावन्नवीर असा संख्येने ओळखले जातात. त्यात टेटविलकर यांनी नरसिंग, झोटींग, चेडा, वेताळ, म्हसोबा, मुंजा, भैरव, चेडोबा, म्हस्कोबा, म्हारदेव, वीरोबा, धुळोबा, पोषमात्रा आदी वीरांसोबतच तुकाई, मायराणी, जाखमाता ही वीरांची नावे असल्याचा उल्लेख केला आहे.(पृ.८१) तर कलगी-तुर्रा संप्रदायाचे मराठी शाहीर हे बावन्न वीरांना आपली दैवते

मानतात. प्रतिपक्षावर मात करण्यासाठी या वीरांना आवाहन करण्यासाठी जे गीत गातात त्या गीतांना 'बीर' म्हणजेच 'वीर' म्हटले जात असावे, असेही टेटविलकर मांडतात. (पृ. ७७)

या देवतांची कधी काळी वीरगळावर चित्रित केलेल्या गावांचे रक्षणकर्त्या वीरांचे विस्मरण झाले किंवा ते एक आख्यायिका बनून राहिल्या की नंतर हळूहळू वीरांचे उन्नयन होऊन त्यांचे दैवतीकरण झालेले दिसून येते, असेही ते मांडतात.(पृ. ८१) शरद् पाटील आपल्या 'जातिव्यवस्थाक सामंती सेवकत्व' या ग्रंथात वीरचा मूळ अर्थ 'बंधू' असल्याचे सांगतात. तांत्रिक देवविवाह मूलतः स्पृश्यास्पृश्य स्त्री-पुरुषांकरता होता आणि या देवविवाहांमधून साधक पुरुष वा स्त्री 'वीर' होत असे. असे त्यांनी म्हटले आहे.

डॉ. नवनाथ शिंदे आपल्या 'उस्मानाबाद जिल्ह्यातील लोकदैवते' या शोधग्रंथातील 'लोकदैवतांचे उत्सव आणि मौखिक गीतांचे संहिता विश्लेषण' या प्रकरणात म्हणतात की, 'एखाद्या अनघड तांदळ्यासही शेंदूर फासला की, त्याची स्मारक म्हणून पूजा होत असे. वीरगळसुद्धा वीरांची स्मारकशिला म्हणून निर्माण झाली असली तरी कित्येकदा पूजली जातात. भारतभर असे वीरगळ आढतात. वीरगळीच्या किंवा दगडी खांबाच्या अनुषंगाने अनेक आख्यायिका निर्माण होतात. या आख्यायिका सर्वदूर पसरतात. ज्यांच्या नावाने वीरगळी किंवा दगडी खांब म्हणजे भडखंबा उभ्या केलेल्या असतात. त्याची महती वाढत जाते आणि त्या मृत व्यक्तीविषयी आदराची भावना प्रसृत होते. आदराच्या भावनेचे परिवर्तन भक्तीमध्ये होते आणि त्या मृत व्यक्तीचे माहात्म्य वाढत जाते. असे माहात्म्य वाढले की, त्या वीरगळींना किंवा भडस्तभांना दैवतांचे रूप प्राप्त होते. त्याच्या नावाने जत्रा, खेत्रा होऊ लागतात. कालांतराने त्या दैवताला लोकदैवताची प्रतिष्ठा लाभते. पंढरपूरचा पांडुरंग, विठ्ठल हा मुळात एक वीरगळ किंवा भडस्तंभ होता, असे संशोधन प्रा. गुंथूर सोन्थायमर यांनी शोधून काढले' असल्याचे डॉ. शिंदे सांगतात.(पृ. ५)

कोसंबी यांनीही पंढरपुरात असलेल्या रखुमामाईचा एक स्वतंत्र असा मातृदेवता म्हणून सहचाराशिवाय पंथ असावा असे नमूद करतात. (पृ.११८) पूर्वेला चंद्रभागेच्या तिरावर असलेल्या जुन्या दगडीपुलाशेजारी तिरावर

जुन्या रुक्मिणी मातेचे मंदिर आहे. हे सर्वांत जुने मंदिर सांगितले जाते. दिंडीर वनातील रुक्मिणीदेवी तसेच तिला लखूबाईही म्हटले जाते. ही पंढरपुरातील सर्वांत जुनी मातृदेवता आहे.

पंढरपुरात तिचा सर्वांत जुना मातृदेवतेचा पंथ होता. शेजारीच जरीमरीचे अत्यंत प्राचीन आणि मातृदेवताचा वारसा जपणारी शिल्पाकृती आहे. मातेच्या मायांगाची प्रतिकृती दर्शविणारे अशा प्रकारचे जरीमरीचे हे एकमेव शिल्प असावे. धुरपतामायची परंपरा जतन करणारे पोतराज-देवकरीण हे पंढरपूरात आल्यानंतर पहिल्यांदा या लखूबाईच्या म्हणजेच जुन्या रुक्मिणीमातेच्या आणि जरीमरीच्या मंदिरात येऊन डोके टेकवत असतात. शेजारी असलेल्या मरिआई म्हणजेच लक्ष्मीच्या मंदिरात जाऊन पोतराज आरती करून पुढे निघतात. विजापूर गल्लीत आमदार निवासासमोर असलेल्या एका बोळात फोडीआई नावाची देवी आहे. तीची ओळखही एक वेगळी मातृदेवता म्हणून आहे. बहुजनसमाजातील महिला आजही तिची पौर्णिमेला पूजा करत असतात. नव्याने जन्माला आलेल्या मुलाचे डोके येथे आणून टेकवले जाते.

पोतराजाच्या वीर कड्यावर ५२ वीरांचा उल्लेख व ती परंपरा तांत्रिकांशी, मातृदेवतांशी संबंधित असल्याने भौगोलिक स्तरावर नावे आणि वेगळे उल्लेख मिळतात. यात काही ठिकाणी ५२ वीरांचा उल्लेख आलेला आहे. यात : क्षेत्रपाल वीर, कपिल वीर, बटूक वीर, नृसिंह वीर, गोपाल वीर, भैरव वीर, गरूड वीर, महाकाल वीर, काल वीर, स्वर्ण वीर, रक्तस्वर्ण वीर, देवसेन वीर, घंटापथ वीर, रुद्रवीर तेरासंघ वीर, वरुण वीर, कंधर्व वीर, हंस वीर, प्रियमित्र वीर, कारू वीर, अदृश्य वीर, वल्लभ वीर, वज्र वीर, महाकाली वीर, महालाभ वीर, तुंगभद्र वीर, विद्याधर वीर, घंटाकर्ण वीर, वैद्यनाथ वीर, विभीषण वीर, फाहेतक वीर, पितृ वीर, खड्ग वीर, नाघस्ट वीर, स्मशान वीर, भरुदग वीर, काकेलेकर वीर, कंफिलाभ वीर, अस्थिमुख वीर, रेतोवेद्य वीर, नकुल वीर, शौनक वीर, कालमुख वीर, भूतबैरव वीर, पैशाच वीर, त्रिमुख वीर, डचक वीर, अट्टलाद वीर आदींचा समावेश होतो. यातील अनेक नावे ही आणि त्यातील बदल हे त्या-त्या भौगोलिक स्तरावर भिन्न प्रकारचे दिसून येतात. सर्वच तांत्रिक परंपरेशी निगडित आहेत. तरीही प्रत्येक वीरांची अजूनही



एक वेगळी ओळख दिसते. देशात वेळोवेळी झालेल्या धार्मिक वर्चस्ववादाच्या लढायानंतरही पोतराज-देवकरीण यांनी आपली वेगळी ओळख अजूनही कायम ठेवली आहे. त्यातही अस्पृश्य जातींमधून विशेषतः मांग समाजातून येणाऱ्या पोतराजांबद्दल आणखी बरेच शोध घेण्याची गरज आहे. शिवकाळापर्यंत चंद्रपूर हे योगिनीचे केंद्र अबाधित राहिलेले असावे. पुढे योगिनीची परंपरा ही देवकरणींनी जपल्याचे दिसते.

सप्तमातांची म्हणजेच धुरपतामायची परंपरा जतन करण्यामागे, त्यासाठीच्या तत्त्वज्ञानाची चळवळ जिवंत ठेवण्यामागे देवकरीण यांचे मोठे योगदान दिसते. राजामाय, रुकमामाय, विठामाय, भागामाय, म्हादामाय, शेवंतामाय आदी देवकरणींपासून महाकालीच्या देवकरणींची परंपरा सुरू झाल्याचे दाखले दिसत असले तरी त्यापूर्वीही अनेक योगिनींनी ती जपली असावी. म्हणूनच त्या वाटेवर राजामाय आदी देवकरणींचे पाऊल पडले असावे.

शरद् पाटील सांगतात त्याप्रमाणे, सातव्या शतकात महाराष्ट्रातही सगळीकडे बौद्ध आणि जैन धर्मासह शैवांचे वर्चस्व होते. त्यानंतर सिद्धयोगिनींचे युग सुरू होते. बौद्ध धम्म हा समाजक्रांतीचा धम्म झाल्याने आणि महायानाने तंत्राशी संयोग केल्याने तत्कालीन बाकी अब्राह्मणी धर्म, पंथ, तीर्थंकर निष्प्रभ झाले होते. कुमारिल भट्ट (८ वे शतक) हा पूर्वमीमांसा या ब्राह्मणी तत्त्वज्ञानाचा आचार्य. त्याच्या 'तंत्र-वार्तिक' या ग्रंथामध्ये बहुसंख्य शूद्र हे बौद्धोपासक असल्याचे मान्य करतो. तंत्र-

सांख्याची पीठे ही बहिष्कृत वस्तींमध्ये बनलेली होती. शिवकाळापर्यंत ती कशी अबाधित होती हे संत तुकारामांच्या 'मद्यभक्षण मांगिण जाती' या ४ थ्या अभंगावरून दिसून येत असल्याचे पाटील यांनी दाखवून दिले आहे. स्वतः शिवाजी महाराज यांनी आग्र्याहून सुटका झाल्यानंतर ते त्या वेळी योगिनीचे केंद्र बनलेल्या चंद्रपूरला भेट दिल्याचे दाखले मिळतात.

शरद् पाटील आपल्या 'दास-शूद्रांची गुलामगिरी' या पहिल्या खंडात सहाव्या शतकाच्या नंतर देशात सिद्धयुगाचा उदय कसा झाला हे सांगतात. बौद्ध धम्माने तंत्राचा मार्ग शूद्रातिशूद्र गृहस्थांना उपलब्ध करून दिला. वज्रयान तंत्रातील बुद्ध व तारा हे शिव व शक्तीचे पूर्वज होते. इ. सनाच्या सहाव्या शतकापासून ते दहाव्या शतकापर्यंत बहरत राहिलेल्या तंत्रसाधनांनी वैदिकांविरुद्ध जोरदार आवाज घुमविला होता. वैदिक परंपरेतील सामान्यातिसामान्य गोष्टींचा त्यांनी प्रखर विरोध केला, हे स्पष्ट करतात. पोतराज-देवकरीण यांची चळवळही त्याच मार्गाने सुरू असलेली दिसते. या काळातील संस्कृतीला अध्यात्मिक दृष्ट्या 'सामंतयुग' आणि धार्मिक दृष्ट्या 'सिद्धयुग' असे म्हणतात. या सिद्धांतले बहुसंख्य सिद्ध शूद्र व अतिशूद्र जातीचे होते, असे बी. एन. एस. यादव यांच्या 'सोसायटी ॲन्ड कल्चर इन नॉर्दर्न इंडिया इन द ट्वेल्थ'(पृ.११६) या ग्रंथाचा संदर्भ देऊन सांगतात. सिद्धांची चळवळ ही शूद्रातिशूद्रांची होती हेही पाटील यांनी दाखवून दिले आहे. यामुळे चंद्रपूरच्या महाकालीची परंपरा आणि त्यातून निर्माण झालेल्या योगिनी परंपरेचे मूळही शूद्रातिशूद्रांमध्येच होते. ज्यांची नोंद झालीच नाही. अशा हजारो देवकरणी काळाच्या ओघात गडप झाल्या. परंतु त्यांची परंपरा खंडित झाली नाही, त्यांच्या वारशातूनच तीच परंपरा पुढे देवकरणींच्या माध्यमातून सुरू राहिली. राजामाय, यमुनामाय, विठामाय, रुकमामाय, भागामाय या मुख्य देवकरणींही याच परंपरेतून निर्माण झाल्या. त्यांनी ही एक वेगळी परंपरा जपून ठेवलेली आहे.

## हळदीचा भंडारा आणि डहाळा

भारतात चिकित्साविद्येचा उगम आणि विकासही मूळात स्त्रियांनी केला. यासाठी पाटील सांगतात, योगिनी या धर्मप्रसारासाठी ज्याप्रमाणे परिभ्रमण करत असत, त्याचप्रमाणे त्या औषधोपचारासाठीही करत होत्या,

यासाठीचे दाखले दिले आहेत. क्षत्राचा मूळ अर्थ औषधीसूक्त असल्याचेही त्यांनी म्हटले आहे. धुरपतामायच्या परंपरेतील सर्वच देवकरीण, योगिनींनी ही परंपरा आजतागायत हळदीचा भंडारा, कडूलिंबाचा डहाळा आणि लिंबांच्या माध्यमातून आणि त्यांच्या प्रतिकांतून त्यांनी औषधीसूक्त जतन केल्याचे दिसून येते. त्याच माध्यमातून आपली ही परंपरा शिल्लक ठेवलेली आहे. योगिनींप्रमाणेच देवकरीण या धुरपतामायच्या मातृपरंपरेची चळवळ भक्कम करण्यासाठी गावोगावी भटकंती करत. त्या वेळी त्या-त्या गावातील आजार, रोगराई कमी करत असल्याचे असंख्य उल्लेख त्यांच्यावरील गाण्यातून येतात. देवकरीण यांच्या पिशवी अथवा डब्यात असलेल्या भंडाऱ्याचा उल्लेख तर बहुतांश गाण्यात असतो. ज्या-ज्या ठिकाणी आजारपण आणि आरोग्याच्या संदर्भात अडचणी असतात, त्या-त्या ठिकाणी भंडाऱ्याला खूप महत्त्व असते. ग्लासभर पाण्यात भंडारा टाकून प्यायल्यानंतर अनेक आजार पळून जातात, अशी भावना असते. अजूनही काही जण दवाखान्यापेक्षा हाच उपाय करताना दिसतात. दवाखान्यापेक्षा त्यांना आपल्या भंडाऱ्यावर खूप विश्वास असतो. या माध्यमातून



देवकरीण या एकाच वेळी मातृपरंपरेची चळवळ आणि औषधोपचारही करत आपली परंपरा शाबूत ठेवताना दिसतात.

पोतराज, देवकर, देवकरीण यांची खरी ओळख ही त्यांच्या कपाळावर लावण्यात आलेल्या भंडाऱ्यांवरून होते. दीक्षा देताना भंडाऱ्याचा पितळेचा डबा प्रत्येक शिष्याला दिला जातो. पूर्वी भंडाऱ्याने भरलेली पिशवी दिली जायची. भंडाऱ्याप्रमाणेच कडूलिंबाच्या डहाळ्याला धुरपतामायच्या परंपरेत खूप मोठे स्थान आहे. लिंबाचा डहाळा, कुंभ याचेही एक वेगळे महत्त्व यात आहे. गावाच्या बाहेर चौरस्त्यावर असलेल्या मरिआईची पूजा करण्यासाठी शेंदूर जसा महत्त्वाचा असतो, तसाच भंडारा, लिंबाचा

डहाळाही ठेवला जातो. पाण्याच्या कुंभात डहाळा बुडवलेला तर कधी देवकरीणच्या हातात दिसतो. लिंबाचा डहाळा डोक्यावर पाण्याची भरलेला कुंभ ही परंपरा दक्षिण भारतात ठिकठिकाणी मरिआई, यलम्मा आदी देवीच्या पूजा-उत्सवात दिसते. कर्नाटक आणि महाराष्ट्रातही यल्लम्माला सातमाता म्हणजेच 'सप्त+अम्मा'असेही म्हटले जाते. कर्नाटकातील सौदंती येथील यल्लम्मा देवीच्या मंदिरात महाकालीचेही मंदिर आहे.मरिआईच्या पूजेला अथवा हिल्लाळ काढताना सुवासिनी, कुमारिका या आपल्या डोक्यावर पाण्याने भरलेला कुंभ आणि त्यावर चहूबाजूने लिंबाच्या डहाळ्याची पाने ठेवतात. देवीजवळ कुंभातील पाणी ओतताना त्या लिंबाच्या पानांचा, डहाळ्याचा आधार घेऊन त्यावरून हे पाणी सोडले जाते. देवकरीण, देवकर यांच्या हातातही हा डहाळा दिला जातो. महाराष्ट्राप्रमाणे दक्षिण भारतातील बहुतांश राज्यातही ही प्रथा दिसते.

धुरपतामायच्या परंपरेत हळदीचा भंडारा, लिंबू आणि डहाळ्याला अनन्यसाधारण महत्त्व आहे. कोणत्याही आजारावर धुरपतामायच्या भंडाऱ्याची म्हणजेच हळदीची एक चुटकी तोंडात टाकली की तो बरा होतो, असा समज, भावना भक्तांमध्ये गेल्या शेकडो वर्षांपासून रूढ आहे. कडूलिंबाची पाने, लिंबू आणि हळद ही तिनही औषधी आणि रोगप्रतिकारशक्ती वाढविण्यासाठी व त्यासाठीचे गुणधर्म असलेली आहेत. शिवाय कोरोना काळानंतर कडूलिंबाच्या पानांवर झालेल्या संशोधनातून त्याचे महत्त्व विशद झालेले आहे.

## बळी देण्याची प्रथा

**गडचांदियाला जाया,**
**केली आजच तयारी.**
**एवढा नवलाख गाडा,**
**पडला येशीच्या बाहेरी गं...**
**माय माझी धुरपता,**
**तुझी माझी झटंपटं गं...**
**असं तुझ्या गादीखाली,**
**शिरं देते बळकटं वं...**

## शिरं देते बळकटं वं...

बळी देण्याच्या परंपरेचे अनेक दाखले सिंधू संस्कृतीत आणि गोरवंशामध्येही मिळतात. प्रा. मोतीराज राठोड यांनी 'सिंधू संस्कृतीपूर्व गोर संस्कृती नांदत होती' या त्यांच्या पुस्तकात सिंधू संस्कृतीमध्ये बळी देण्याची प्रथा होती, हे स्पष्ट केले आहे. बळी देण्याचे असंख्य प्राचीन संदर्भ मिळतात. राठोड म्हणतात, बळी, भोग देण्याच्या प्रकाराचे 'चोको' बळी देतानाची मूर्ती सापडली आहे. एका मुद्रेवर एक माणूस बोकड धरून उभा आहे. खालच्या बाजूला बरेच लोक उभे आहेत. इथेच कडूनिंबाचा पाला आणि पूजेचा कासेचा तांब्या पण सापडला. या सर्व वस्तूंची पद्धत तांड्यावरील असल्याचे ते नमूद करतात.(पृ.९)

मरिआई, म्हैसेमा, सटवाई आदी गावातील मातृदेवतांना सर्रास बळी दिला जातो. बळी देण्याचा मोठा मान पोतराजाला असतो. मागील दशकभरापूर्वी मराठवाड्यात विशेषतः मांगवाड्यात पोतराजाचा कार्यक्रम आयोजित करून मरिआईला हाल्याचा म्हणजेच रेड्याचा बळी दिला जात असे. अलीकडे हा प्रकार बऱ्याच प्रमाणात कमी झाला आहे. त्यातही आता रेड्याचा बळी कमी होऊन कोंबड्या, बकऱ्यांसोबत गाभण असलेल्या मेंढीचा बळी दिला जातो. गाभण असलेल्या मेंढीचा बळी देण्याची प्रथा त्या-त्या काळात झालेल्या स्थित्यंतराचे अथवा मोठ्या संघर्षाचे प्रतिकात्मक म्हणून केली जात असावी. बळी देण्याच्या कार्यक्रमाला 'कारण' अथवा 'सण' म्हणतात. पौष महिन्यात हे कारणाचे कार्यक्रम अजूनही मराठवाड्यात ठिकठिकाणी पाहावयास मिळतात.

बळी देण्याच्या प्रथेसंदर्भात अनेक प्राचीन ग्रंथांमध्ये उल्लेख येतात. प्रामुख्याने देवीमाहात्म्यात राजा सुरथ व वैश्य समाधी याने देवीचे पूजन केल्यानंतर तिला प्रसन्न करण्यासाठी त्याने आपल्या रक्ताचा बळी दिला. वैकृतिक रहस्यात देवीला बळी देण्याचे प्रयोजन आहे. परंतु हा बळी ब्राह्मणाने न देता क्षत्रियाने द्यावा असे सांगितले आहे. बळी देण्याची प्रथा ही सुरुवातीपासूनच अस्तित्वात होती हे यावरून दिसून येते. (पृ.२३९)

महाकालीची मोठी बहीण म्हणून ज्या कोल्हापूरच्या महालक्ष्मीची ओळख आहे, त्या महालक्ष्मीलाही सुरुवातीला बळी दिला जात होता.



कवळापंचमीस होणाऱ्या कूष्मांडभेदनाच्या सोहळ्याच्या काळात मंदिराच्या आवारातच हा बळी देण्याचा कार्यक्रम होत असे. नंतरच्या काळात त्याची जागा बदलली. तो पुढे टेंबलाई येथे असलेल्या त्र्यंबुलीच्या मंदिरात होती. (पृ.१४३) मात्र, मधेच ती प्रथा बंद करण्यात आल्याचे दाखले मिळतात. महालक्ष्मीनंतर चंद्रपूरातील महाकाली, येडाई, तुळजापूरची भवानी या देवींना पूजेनंतर बळी देण्याची प्रथा बंद केल्यानंतर त्यांना नैवेद्य दाखविण्याची प्रथा सुरू झाली असावी.

शरद् पाटील म्हणतात, 'चौक वा चौरस्ता हे मातृदेवतांना बळी अर्पण करायचे स्थान होते. चारुदत्ताने त्याचा मित्र मैत्रेय याला चौरस्त्यावर जाऊन बळी अर्पण करायची विनंती केली'(पृ.२७१) निर्ऋतीला बळी चौरस्त्यावरच द्यावा, असे कोसंबी लिहितात-

'... पाषाणयुगापासून मातृदेवतांची पूजा करायची वनचरांची स्थाने चौरस्ते असत. जेथे त्यांच्या भटक्या वाटांचा मिलाप होई. विशेषतः कृष्ण षष्ठीला वा अमावस्येला दिल्या जाणाऱ्या मेध्यपशूची बळींची जागा नंतर अन्नबळींनी घेतली..'(पृ.२७१)

बळी देण्याची प्रथा ही प्राचीन काळापासून सुरू आहे. पहिला प्रकार म्हणजे पशूबळी. तो यज्ञात दिला जात असे. दुसरा प्रकार हा नरबळीचा. चौरस्त्यावरची जागा आदी स्थानांवर हा नरबळी दिला जात असे. पुढे त्यात बदल होऊन अन्नबळी देण्याच्या प्रतिकात उरली असावी. यामुळेच कृष्णष्ठीला अन्नपिंढी वाहिलेले अन्नाचा बळी म्हटले जाते.

इंग्रज राजवटीपर्यंत आपल्याकडे अनेक ठिकाणी नरबळी दिल्याचे अनेक दाखले मिळतात. राज्यात मांग समाजातील व्यक्तीचा नरबळी दिला जात होता. अनेक गडकिल्ल्यांपासून ते वाड्यांपर्यंत हे नरबळी देण्यात देण्यात आल्याचे पुरावे मिळतात. चंद्रपूरात चैत्राच्या पौर्णिमेला दरवर्षी नरबळी देण्याची प्रथा ही सुरू होती. पुढे कालांतराने त्यात बदल होऊन ही प्रथा पशूबळीपर्यंत मर्यादित राहिली. (पृ. १६१)

चंद्रपुरातील महाकाली मंदिराच्या पाठीमागे असलेल्या दैत्याच्या समोर चैत्राच्या आणि पौष महिन्यात मागील काही वर्षांपूर्वी मोठ्या प्रमाणावर पशूबळी दिला जात होता. त्यात रेड्यांपासून ते बकरे, कोंबडे यांचा त्यात समावेश असायचा. मधल्या काळात तो बंद करण्यात आला. तरीही अनेक जण मंदिरामागील दैत्याच्या समोर बकरे आणून त्याचा दूर अंतरावर बळी देतात. अलीकडे मंदिर व्यवस्थापनाच्या माध्यमातून बळी अथवा देवीला रेडा सोडण्यासाठी काही ठरावीक रक्कम घेऊन काही वेळासाठी उपलब्ध करून दिला जातो. यातून बळीची प्रथा कमी झाली असून भक्तांनाही आपण रेडा सोडल्याचे समाधान मिळते.

दत्ता तन्नीरवार 'कर्तृत्वशालिनी महाराणी हिराई'मध्ये म्हणतात, महाकाली मंदिराच्या प्रवेशद्वारासमोरच जमिनीवर देवी महाकालीची पदकमले आहेत. या पदकमलाजवळ पूर्वी यात्रेकरू बकऱ्याचा बळी देत. तर काही लोक बकरे, म्हशी जिवंत सोडत. त्यामुळे मंदिरासमोर घाण होत असल्याने पदकमलाची स्थापना मंदिरामागे केलेली आहे. तेथे बळी देण्याची प्रक्रिया चालू असते.(पृ.११३)

अशोक सिंह ठाकूर यांनी 'गोंडकालीन चंद्रपूर'मध्ये म्हणतात, गोंड जातीचे लोक आपल्या देवी देवतांना प्रसन्न करण्यासाठी गायीची बळी देत. ती प्रथा धुंड्या रामशहा यांनी बंद केली. महाकाली मंदिर परिसरात दिली जाणारी नरबळीची प्रथाही बंद केली. ती प्रथा मोडीत काढण्यासाठी त्याने अनेक कठोर शिक्षा घोषित केली होती.(पृ.३१) महाकाली मंदिरासमोर चोरून नरबळी दिल्या जात असे. त्यासाठी ही गोवारी जातीच्या एका गृहस्थाने देवीसमोरच जाहीरपणे सत्याग्रह केला आणि तेव्हा धुंड्या यांच्या लक्षात तो प्रकार आल्याने ती प्रथा बंद करण्यात आली. त्यानंतर कडक शासन करण्याचे फर्मान त्यांनी काढले. त्यामुळे नरबळीची प्रथा महाकाली मंदिरातून बंद झाली.

'कर्पूरादिस्त्रोत्रा'त उंट, बोका, मनुष्य, रेडा, बकरा आदी पशू-प्राण्यांचे बळी देण्याचे सांगितलेले आहे. मात्र त्यामागील व्याख्या ही बळीच्या माध्यमातून लोभ, मत्सर, मोह, मद, क्रोध, काम या मानवी जीवनातील षड्रिपूंचा नाश करायचा असावा असे डॉ. बोरकर म्हणतात.(पृ.१२)

चैत्राच्या यात्रेची सांगता ही पौर्णिमेला मध्यरात्री देवीला शेंदूर

चढल्यानंतर होते. त्यादिवशी येथे आलेले सर्व भक्त खारं जेवण करतात. यात बळी दिलेल्या पशु, कोंबडे, बकरे यांचे मांस शिजवून त्याचा नैवेद्य हा महाकाली मंदिराच्या पाठीमागील भिंतीला असलेल्या दैत्याला दाखवला जातो. पूर्वी तो महाकालीला दिला जात होता. कालांतराने त्यात बदल झालेला दिसतो. हे खारं जेवण केल्याशिवाय यात्रेकरू मागे फिरत नाहीत. पूर्वी या यात्रेत रेडा, बकरे यांचा बळी देऊन त्यानंतर समूहभोजनाचे कार्यक्रम केले जात असत. आता इथे कोंबडे, बकरे कापण्याची मुभा मिळत नसल्याने आजुबाजूच्या परिसरात असलेल्या मांस विक्रेत्यांकडून ते विकत घेऊन त्यांचे खारं जेवण केले जाते.

बळी देण्यापूर्वी घराच्या बाहेर, देवळीत, दरवाजाच्या बाजूला जिथे मातृदेवतेला ठेवण्यात आले आहे, त्या देवीच्या मंदिरासमोरील अंगण हे शेणाने सारवून घेतले जाते. हे ठिकाण विशेषतः नैर्ऋत दिशेला अथवा उजव्या बाजूला निश्चित केले जाते. त्या ठिकाणी पोतराज अथवा देवकरीण ही चौपटासारखी रचना करून तेथे पूजा करतात. काढण्यात आलेल्या चौपटावर तांदूळ टाकून चार दिशा रेषा काढून त्या बनविल्या जातात. त्यात हळदीचे कोंब, खारीक-खोबऱ्याच्या वाट्यांसह हिरवे पातळ, हिरवा खण, हिरवा चुडा त्यावर ठेवला जातो. मध्यभागी पाण्याने भरलेला कुंभ, त्यावर गोलाकार करून लिंबाच्या पानाचा डहाळा ठेवला जातो. बाजूला नातेवाईक, शेजारी अथवा जवळची मंडळी बसतील अशी व्यवस्था केली जाते.

प्रा. मोतीराज राठोड, यांनी त्यांच्या 'सिंधू संस्कृतीपूर्व गोर संस्कृती नांदत होती' या पुस्तकात गोर संस्कृतीतील बळी देण्याची परंपरा स्पष्ट केली आहे. त्याचा आणि पोतराजाकडून मरिआईसाठी देण्यात येणाऱ्या बळीच्या एकूणच रचनाप्रक्रियेत सारखेपणा असतो. ते म्हणतात की, बळी बकऱ्याचा दिला जात असे. त्या वेळी घरासमोर उजव्या बाजूला थोडीशी जागा शेणाने सारवली जाते. त्या ठिकाणी ज्वारीच्या पिठाने गोल आकार पृथ्वी व त्याचे चार भाग म्हणजे चार खंड रेषांनी काढतात. त्याला 'चोको' म्हणतात. चोकोच्या मध्यभागी कासेच्या तांब्यात पाणी भरून त्यात पुन्हा कडूलिंबाच्या पानांची डहाळी ठेवतात. त्याला जलकुंभ म्हणतात.(पृ.९) अशाच प्रकारची रचना पोतराजही बळी देण्याच्या



प्रक्रियेदरम्यान करतो. अजूनही काही वयस्कर सांगतात की, रेड्याचं, बकऱ्याचं नरडं पोतराज हे अंगात देवी आल्यानंतर आपल्या दातानं तोडत असे. रेड्याचं अथवा बकऱ्याचं नरडे दातानं तोडणे हा कार्यक्रम रात्रीच्या वेळात होत असे. पोतराज हलकीच्या तालावर बेभानपणे नाचतनाचत जाऊन नरडे तोडण्याचा कार्यक्रम करत असे. लोक याला दैवी चमत्कार समजत असत.

मूळ मराठवाड्यातून येऊन चंद्रपूर येथे स्थायिक झालेले प्रा. एस. टी. चिकटे यांनी लहानपणी आणि त्यानंतरच्या काळात पाहिलेले अनुभव त्यांनी सांगितले. चार दशकापूर्वी मराठवाड्यातील अनेक गावातील दलित वस्त्यांमध्ये वीज पोहोचलेली नव्हती. त्यातही अनेकदा कार्यक्रम हे चौरस्त्यावर, गावाबाहेर असलेल्या मरिआईच्या, म्हैसम्माच्या देवाशेजारी होत असल्याने ते कंदील अथवा गॅसबत्तीच्या उजेडात होत असत. बळी देण्याचा कार्यक्रम रात्रभर चालतो.

रेडा आणि बकऱ्याच्या नरडीवर असलेल्या चामड्याचे आवरण आपल्या दाताने तोडण्याइतपत पोतराजांची दाते तीक्ष्ण असणे शक्य नसल्याने यात हातचलाखी केली जात असल्याचेही काही पोतराज सांगतात. थोड्याशा उजेडात सुरू असलेल्या नरडी तोडण्याच्या कार्यक्रमात पोतराज चाबूक फिरवून अगोदरच आजूबाजूला असलेल्या लोकांना पांगवत असे. आपल्या आभरानमध्ये अगोदरच लपवून ठेवलेल्या धारदार छोट्या सुरीने ते नरडे तोडत असे. हा सर्व प्रकार नंतर लोकांच्या लक्षात येण्यापूर्वीच त्याला तोंड लावून सगळे रक्तबंब झालेले तोंड आणि तो आपला अवतार दाखवत असे. मात्र पोतराज पोटासाठी ही सर्व

प्रकारची हातचलाखी करत असल्याचे प्रा. चिकटे यांनी सांगितले.

बंजारा समाजात मरिआई म्हणजेच मरियम्मा, याडी मरियम्मा ही संपूर्ण विश्वाचे, सृष्टीचे नियंत्रण करते, ती सर्वशक्तिमान असून तिच्या अधीन सर्व शक्ती प्राप्त होतात, यावर दृढ विश्वास आहे. (पृ.६९) ती बंजारा स्त्रीचे रूप धारण करून बंजारा समाजाच्या प्रत्येक कुटुंबात जाऊन कुशल-मंगलतेचा समाचार घेत असते, असा समज आणि विश्वासही या समाजात आहे. यामुळेच कोणत्याही कार्यापूर्वी तिचे 'याडी मरियम्मा यिंळती' हे स्तवन म्हटले जाते. तिच्या कार्यक्रमात बोकडाचा बळी देण्याची प्रथा आहे. त्या वेळी बोकडाचा बळी देताना मरिआईच्या नावाने पुढील प्रार्थना केली जाते -

**''जे जे मरियम्मा याडी, बोल।**<br>
**खडीया रो आसवार रेणो,**<br>
**पडेती खडी करणों.**<br>
**समर ओत आड आणों, याडी मरियम्मा...**<br>
**खेप वटवे वत रूपा रेल चलाणो याडी...**<br>
**दी पहर साही वेणो,**<br>
**चार पहर साही वेणो,**<br>
**राक वटवं ओत पाक करणो याडी...**<br>
**बाग बगीच्या फुलवाडी हारोभरी रकाड,**<br>
**खुटा मुंगरीन साई वेस,**<br>
**बालबच्यान साई वेस.**<br>
**सावकारेन समनक रकाड,**<br>
**कचेरिरे पाचेन काढ,**<br>
**को माथेर मनक्या छा,**<br>
**पेगपगेमा चुकाचा, भुली चुकी माफ कर,**<br>
**कबुलो, कबूल कर याडी मरिअम्मा...''**

ही प्रार्थना म्हणून मरियम्माला बोकडाचा बळी दिला जातो. ही देवी एकदा प्रसन्न झाली की सर्व संकटाचे निवारण होते, अशी धारणा या समाजात आहे. पूर्वी बहुतांश अस्पृश्य समजला जाणारा समाज या बळी

देण्याच्या माध्यमातून आपले नातेवाईक, गणगोत एकत्र करून कोंबडा, बकरा, रेडा यांचा बळी दिल्यानंतर त्यांचे मांस खात असत. हा एक समूहभोजनाचा प्रकार खूप प्राचीन काळांपासून बंजारा, आदिवासी आदींमध्ये अजूनही शिल्लक आहे. जवळचे नातेगोते एकत्र आल्यानंतर या समाजात ही बळी देण्याची प्रथा टिकून राहिली असावी.

आजही बंजारा समाजात आपले गणगोत एकत्र आल्यावर बकऱ्याचा बळी म्हणजेच मांसाहार असलेले समूहभोजन आयोजित करतात. एकूणच या बळीमागे सगळे गणगोत एकत्र यावेत, भेटावेत, एकमेकांचे हितगुज विचारले जावे, सुखदुःखाची विचारपूस, त्यांच्या चर्चा व्हाव्यात, हा एक हेतू असतो. बळी दिलेल्या हाल्याच्या, बकऱ्याच्या मांसाला वेगवेगळ्या पद्धतीने ते तयार करून पाड्यात असलेल्या सर्वांच्या ताटात मिळेल यावर लक्ष दिले जाते. बळी देण्याचा कार्यक्रम म्हणजेच कारणाचा कार्यक्रम यावर अनेक गाणीही आहेत. पोतराज त्यावर धुपारती बोलतो, त्याची आरती करतो, असे त्यातून सांगितले जाते.

दक्षिण भारतात प्रसिद्ध असलेल्या दुर्गम्मा या देवीलाही रेडा अथवा बोकडाचा बळी दिला जातो. ही देवी झोपड्या, पालांचे रक्षण करते, संसर्गजन्य रोगांचे निवारण करते, भूता-खेतांपासून, नैसर्गिक आपत्ती-संकटांपासून रक्षण करते, अशी भावना तिच्या भक्तांमध्ये असते. महाराष्ट्रात भटक्या-विमुक्त जाती-जमातींमधील लोक दुर्गम्मा देवीला मानतात. विशेषतः कर्नाटकाच्या सीमेलगत जिल्ह्यातील लोक दुर्गम्माचा उत्सव साजरा करतात. कर्नाटकात पौष महिन्यात गावोगावी हिची यात्रा भरते. या यात्रांमध्ये सर्वत्रच रेडा, कोंबडा अथवा बोकडाच्या बळी दिला जातो. त्यानंतर समूहभोजनाचे कार्यक्रम होतात.

सारांश, पोतराज आणि देवकरीण यांचा एकूणच संघर्ष हा कायमच वैदिक परंपरेच्या विरोधात राहिलेला आहे. अवैदिकांची ही महान परंपरा आपल्या लोकगीतातून एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे कायम ठेवून ती आजपर्यंत अबाधित ठेवण्याचे महान कार्य पोतराज, देवकरीण यांनी केलेली आहे. त्यांच्याकडून आजपर्यंत जतन करण्यात आलेली मौखिक गाणी हीच एकमेव या परंपरेला समजून घेण्यासाठी महत्त्वाचा दुवा असून ती आजही मराठवाडा, विदर्भातील मांग वस्त्यातील पोतराजांकडून अधिक

प्रकर्षाने समजून घेता येतो. देवकरीण या मांग समाजासोबत मराठा, कुणबी, सालेवार, भोई, माळी आदी समाजात मोठ्या प्रमाणात दिसतात. पण पोतराज मात्र बहुतांश मांग समाजातूनच सोडलेला दिसतो. ही या परंपरेतील महत्त्वाची बाब आहे.

**बाई कारणाचा हाल्या,**
**हाल्या येशीला कुथला, कुथला.**
**मानाचा पोतराज,**
**जटा सोडाया गुंतला गं... जटा सोडाया...**
**बाई कारणाचा हाल्या,**
**हाल्या आला मेटंकुटी,**
**मानाचा पोतराज,**
**वरतं बोलं धुपारती वं...**
**माय माझी धुरपता,**
**तुझी सुपात आरती...**
**बोलतं पोतराज,**
**हाल्यावरती धुपारती वं..**
**हाल्यावरती धुपारती...**

**संदर्भ :**


१. सिंधू संस्कृतीपूर्व गोर संस्कृती नांदत होती : प्रा. मोतीराज राठोड पृ. ९.
२. दास-शूद्रांची गुलामगिरी : भाग-१, शरद् पाटील, पृ. २७१, २८७.
३. कर्तृत्वशालिनी महाराणी हिराई : दत्ता तन्नीरवार, पृ. ११३.
४. दैत्य बळी व कुंतलदेश महाराष्ट्र : डॉ. नीरज साळुंखे, पृ. ५, १४७, १५२.
५. महाराष्ट्रातील वीरगळ : सदाशिव टेटविलकर पृ. ७७, ८१.
६. महाराष्ट्र पुरातत्त्व वार्षिक अहवाल : अहवाल क्र. १, २००४-०५.
७. उस्मानाबाद जिल्ह्यातील लोकदैवते : डॉ. नवनाथ शिंदे, पृ. ५.
८. महाकाली चंद्रपूरची : डॉ. रघुनाथ बोरकर, पृ. १२, २१.
९. मराठी संस्कृतीचे उपासक : रा. चिं. ढेरे, (मराठी विश्वकोश).
१०. शिखर शिंगणापूरचा श्रीशंभुमहादेव : रा. चिं. ढेरे, पृ. १७०, १७१, १७२.
११. बंजारा जमात : लोकजीवन आणि लोकगीत : प्रा. डॉ. सुनील राठोड, पृ. ६९.

१२. पुराणकथा आणि वास्तवता : डी. डी. कोसंबी,
पृ. ११६, ११८, १५९, १६१, २७१.
१३. महालक्ष्मी मंदिर कोल्हापूर एक सांस्कृतिक अध्ययन :
अरविंद जामखेडकर, पृ. २३९, १४३.
१४. लोकसंस्कृतीच्या उपासकाच्या लोकवाड्मयाचे वाड्मयीन वा सांस्कृतिक
स्वरुपः डॉ. आनंद घाटुगाडे, पृ. १२४, १४४, १२५.
१५. दलित, ग्रामीण साहित्यः रूढी, प्रथा परंपरा विधिकोशः
संपादक, डॉ. गंगाधर पानतावणे पृ. ५४, ७०, ८१,१०२.
१६. पोतराजावरील गाणी : कोंडिबा कांबळे, वाडी पिंपळगाव, जि.परभणी.
: जलसामाय देवकरीण, थडी पिंपळगाव, जि. परभणी.
१७. पटाची माहिती : बाबू कांबळे पोतराज, ढाळेगाव,
ता. अहमदपूर, जि. लातूर.
१८. घुराजी कांबळे, पोतराज, नामदेव नगर, पाथरी, जि. परभणी.
१९. पोतराजाच्या कार्यक्रमाची माहिती : प्रा. एस. टी. चिकटे, चंद्रपूर.
२०. देवकरीणच्या दीक्षेची माहिती : गंगुबाई देवकरीण, परभणी.
२१. गोंडकालीन चंद्रपूर : अशोक जयराज सिंह ठाकूर, पृ. ३१.

***



# २

# महाकाली : एक गुह्यवासिनी

**इथूनं मला दिसं,**
**गडचांदियाचा आंबा..**
**माय माझी धुरपता,**
**भोईऱ्यात नांदं रंभा वं...**

चंद्रपूरच्या महाकालीचे मंदिर हे एक प्राचीन गुंफा-लेणी अर्थात शैलगृहाच्या प्रकारात मोडते. यासाठीचे प्रमाण आपल्याला येथे पाहावयास मिळतात. मंदिरात असलेल्या तळघरात महाकालीची निद्रिस्त अवस्थेतील पाषाण शिल्पाची मूर्ती आहे. ती मूर्ती एकाच पाषाणात कोरलेली आहे. त्या आजूबाजूचे दोन्हीही शैलगृहे आणि आतील भुयार पाहिल्यास मंदिर

आणि परिसर एके काळी शैलगृहे असल्याचे लक्षात येते. या मूर्तीच्या शेजारी अनेक प्रकारची भुयारे आणि आत गुहा आहेत. एकूणच त्याची रचना ही चंद्रपूर जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात असलेल्या इतर शैलगृहे आणि लेण्यांसारखी दिसते. येथील गुहेच्या आत असलेल्या भुयारांचे एक टोक हे भद्रावतीपर्यंत तर दुसरे बल्लारशहापर्यंत पोहोचल्याचे सांगितले जाते. तशा आख्यायिका आहेत. याच भुयारातून गोंडराजा हा देवीच्या दर्शनासाठी येत असल्याच्या आख्यायिका, लोककथा या परिसरात आहेत. मात्र, यासाठी बरेच संशोधन करण्याची गरज आहे. भुयारातील संशोधन झाल्यास या मंदिराबद्दल इतरही अनेक उलगडे होऊ शकतील.

चंद्रपुरातील इतिहास संशोधक आचार्य टी. टी. जुलमे आपल्या 'चंद्रपूरच्या देवी महाकालीची चैत्र यात्रा' या पुस्तकात मंदिराचा सर्व भाग हा एक बौद्धकालीन गुंफा असल्याचे सांगतात, मात्र त्यांचे ते मत असून त्यासाठी कोणतेही प्रमाण ते देत नाहीत. महाकाली मंदिरातील या गुंफा महायान पंथाचा प्रभाव निर्माण झाल्यानंतर त्या काळात भिक्षू-भिक्षुणीसाठी तयार करण्यात आल्या होत्या. त्याचे साम्य हे या मंदिरातील शैलगृहे यांच्याशी करता येते, असे जुलमे म्हणतात, तसेच कृतध्वजाचा पुत्र सुनंद याने येथे उत्खनन केले असेही जुलमे म्हणतात, परंतु त्यासाठी पुरक प्रमाण देत नाहीत. कृतध्वजाला भुयारातील शिलेवर कोरलेली एक भव्य देवीची मूर्ती आढळली. तीच महाकाली देवी होय. त्यामुळे ही शैलगृहे, गुंफा या इसवी सनापूर्वीच्या असाव्यात, असेही जुलमे सांगतात. (पृ.१५)

मंदिराच्या समोरील दरवाजाच्या जिथे दगडाची मोठी शिळा उभी करण्यात आली आहे. त्याला लागूनच समोर दोन पादुका आणि एक मातृदेवतेचे छोटेसे शिल्प आहे. त्याला नैवेद्य वाहून आणि त्या शिल्पाला शेंदूर लावूनच भक्त पुढे जातात. या शिल्पाचे साम्य हे प्राचीन देवी हरितीच्या काही शिल्पाप्रमाणे दिसते. या शिल्पाची खूप मोठी झीज झाली आहे. शेंदूर फासला जात असल्याने या शिल्पाची ओळख पुसटशी झाली आहे. धुरपतामाय ही मुलांची रक्षणकर्ती आहे, तिच्या ओटीत नवीन जन्माला आलेले मूल टाकले जायचे असे देवकरीण सांगतात. पुढील काळात तिच्या पायावर नवीन मुलांचे डोके टेकवले जाते. तसाच भाग देवी हरितीचा आहे. तिला मुलांचे रक्षणकर्ती म्हणून ती भारत, पाकिस्तान,

नेपाळ आणि अफगाणिस्तानमध्ये ओळखली जाते. विविध देशात असलेल्या शिल्प आणि तिच्या मंदिरातून तिची ही ओळख मिळते. तिचे भारतातील अनेक लेण्यांमध्ये शिल्प आहेत. विशेषतः वेरूळ अजिंठ्याच्या लेण्यांपासून ते आताच्या पाकिस्तानातील पेशावर येथील चारसद्दाच्या परिसरातील अनेक स्तुपात देवी हरिती आणि पांचिकाची अनेक शिल्पचित्रे आहेत. महाकाली मंदिर आणि परिसरात असलेल्या शिल्पाचा बारकाईने अभ्यास केल्यास देवीच्या आजूबाजूला अंगावर मुले बसली तर काही उभी आहेत असे दिसते. मंदिराच्या मुख्य दरवाजासमोर असलेल्या शिल्पाखालून या मंदिराच्या खालील भागात असलेल्या गुंफेत जाण्याचा मार्ग असल्याचे सांगितले जाते. महाकाली मंदिर हे गुहा मंदिर आहे. मात्र, ते बौद्धकालीन असल्याचे प्रमाण मिळत नाही.

नेपाळमध्ये असलेल्या जगप्रसिद्ध बुद्धनाथ मंदिरात जाण्यापूर्वी हरितीची पूजा-अर्चा केल्याशिवाय पुढे जात नसत. तिच्या ओटीत आणि अंगावर मुले खेळत असतात. तसेच साम्य असलेले शिल्प हे धुरपतामायच्या मंदिरासमोर आहे.

हरितीचीही तेथील अस्पृश्य, बहुजनसमाजातील महिला ओटी भरून पूजा करतात. ती सर्व सृष्टीची आणि आमचीही रक्षणकर्ती आहे, असे महिला आपल्या कवनातून गातात. कालांतराने दोन्हीही शिल्पांवर मुकुट बसविले असले तरी त्यात बरेच साम्य दिसते. महाकालीचीही देवकरीण आणि भक्त ओटी भरतात. विशेष म्हणजे तिलाही आपली रक्षणकर्ती म्हणतात. आपल्याला मुलगी व्हावी म्हणून महाकालीला नवस केला जातो. मुंबईजवळील कार्ला लेण्याच्या प्रवेशद्वारावर असलेल्या एकवीरा देवीचेही असेच आहे. येथील लेणीच्या प्रवेशद्वारावरच एकवीरेचे मंदिर आहे. ते केव्हा वसवले गेले, यावरून वाद असले तरी तिलाही एकवीरा आणि महाकाली बोलले जाते.

चंद्रपूर, गडचिरोली हा परिसर लक्षात घेतला तर त्यावर बौद्ध परंपरेचा मोठा प्रभाव होता. नागभीड तसेच याच तालुक्यातील कुनघाडा या परिसरात लेणी, शिल्प, शैलगृहे येथे पाहावयास मिळतात. हे सर्व हिनयान काळात आणि दरम्यान, या परिसरात लेण्या कोरलेल्या असाव्यात, असे ज्येष्ठ संशोधक डॉ. रघुनाथ बोरकर यांनी स्पष्ट केले आहे. यासाठी त्यांनी

'चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्ह्याचे पुरातत्त्व' अत्यंत महत्त्वाच्या शोधग्रंथातून चंद्रपूर आणि परिसरातील शिल्प लेण्यासोबत दुसऱ्या शतकापासून ते १३ व्या शतकापर्यंतचे अनेक पंथ, त्यांच्या शिल्पांचा अभ्यास केला आहे.

आचार्य टी. टी. जुलमे म्हणतात, चंद्रपुरातील महाकालीच्या मंदिरातील म्हणजेच शैलगृहात ठेवण्यात आलेली मूर्ती पाषाणात कोरून तयार केली आहे. यात स्वतंत्र गुंफा म्हणजेच शैलगृहे असल्याचे दिसून येतात. त्यापैकी एक ३.१५ मि × १.६० मि. × १.× ८५ मिटर आकाराचे शैलगृह आहे. याच शैलगृहात महाकालीची प्रतिमा भिंतीवर देव्हारा करून स्थापन केली आहे. या देवीला शेंदूर माखलेले असते. हीच मुख्य देवी म्हणून तिची पूजा केली जाते. 'महाकाली मंदिरातील शैलगृहे, गुंफा या सातवाहन काळातील असल्याचेही आचार्य जुलमे 'चंद्रपूरच्या देवी महाकालीची चैत्र यात्रा' या पुस्तकातून सांगतात.' (पृ.१२) महाकाली मंदिराच्या डाव्या बाजूला असलेल्या मैदानालगत एक मोठी बारव आहे. ती आता झाकून टाकल्याने तिच्याकडे लक्ष जात नाही. या बारवमध्ये सुरुवातीला राजामाय, रुकमामाय आदी देवकरीण आणि त्यांच्यापूर्वी शेकडो वर्षांपासून देवकरीण, योगिनी या मातृदेवतेच्या परंपरेची दीक्षा घेण्यापूर्वी याच ठिकाणी आंघोळ आणि पूजा करत असाव्यात. तशीच बारव ही नांदेड जिल्ह्यातील बारड या ठिकाणी आहे. बारड येथील बारवाचे स्वरूप एक एखाद्या लघू पुष्करणीप्रमाणे होते. उतरण्यासाठी खाली पायऱ्याने जाता येत होते.

आज बऱ्याच प्रमाणात ही बारव बुजवल्यामुळे तिचे अस्तित्व जाणवत नाही. दुसरीकडे 'चंद्रपूरचा इतिहास' या अत्यंत महत्त्वाच्या संशोधन ग्रंथात ज्येष्ठ संशोधक अ. ज. राजूरकर यांनी चंद्रपूरच्या इतिहासावर संशोधन केलेले आहे. चंद्रपूरमधील अत्यंत बारीकसारीक पौराणिक, प्राचीन बाबींचे बारकावे त्यांनी आपल्या पुस्तकात मांडले आहेत. त्यात तर दत्ता तन्नीरवार यांनी महाकाली मंदिराजवळ असलेल्या विहिरीचा उल्लेख केला आहे. ते म्हणतात, महाकाली मंदिराबाहेराच्या दक्षिणेस ही विहीर आहे. अशा प्रकारची विहीर ही कुठेही नसल्याचे ते नमूद करतात. सुमारे ४० फूट गोलाईची असलेली ही खोल विहीर आहे.

या विहिरीत तीन ते चार फुटाच्या पट्टीवर अनेक प्रकारची चित्रे कोरण्यात आली आहेत. या पट्टीच्या खाली गोलाकार पंख असलेल्या गरुडाच्या आकृती कोरल्या असून, त्याचे आधारस्तंभासारखे बांधकाम केले आहे. यासोबत नैर्ऋत व दक्षिण दिशेला अनेक प्रकारच्या शिल्पाकृती कोरल्या असून त्या काळाच्या ओघात झिजल्या आहेत. या विहिरीचे नेमके बांधकाम कोणी केले, त्याचा नेमका कालावधी कोणता असावा, यावर अद्यापही संशोधन झालेले नसल्याने यावर तन्नीरवार यांचा अपवाद वगळता इतरांनाही प्रकाश टाकला नाही. (पृ.१०६) त्यातील शिल्प आणि रचना लक्षात घेता ती खूप पुरातन असावी. अत्यंत प्राचीन वैभव असलेल्या आणि आपल्या इतिहासाची साक्ष देणाऱ्या या विहिरीचे आणि त्यातील शिल्पांचे जतन करण्याची जबाबदारी खरेतर मंदिर व्यवस्थापनासोबतच पुरातत्त्व विभागाचीही आहे. मात्र, त्याकडे दुर्लक्ष झाल्याने या विहिरीचे अस्तित्व नामशेष होण्याच्या मार्गावर आहे. अलीकडे तर ती पूर्णपणे अडगळीत पडली आहे. या ऐतिहासिक विहिरीची अत्यंत दुरवस्था झालेली दिसते. तिच्यात निर्माल्य, घनकचरा टाकल्याने तिचे अस्तित्व धोक्यात आले आहे. तसेच मंदिर परिसरात असलेल्या काही शिल्पांची झालेली दिसते.

महाकाली मंदिर आणि येथे चैत्राच्या महिन्यात भरणाऱ्या यात्रेसंदर्भात राजूरकर म्हणतात, 'हे मंदिर परकोटाच्या बाहेर, दक्षिणेस झरपट नदीच्या पलीकडे आहे. देऊळ आकाराने ६०×६० फूट असून उंची ५० फूट असावी. देवळात जमिनीच्या सपाटीपासून १० फूट उंचीची फरसबंदी असून मध्यभागी ६ फूट खोलीचे व १८ फूट औरस चौरस असे एक

तळघर आहे. तळघरात खडकात कोरलेली पाच फूट उंचीची देवीची मूर्ती आहे. तिच्या हातात खड्ग व दुसऱ्या हातात ढाल आहे. यात्रेच्या वेळी दर मंगळवारी तिला साज चढवतात. मागील बाजूस आणखी एक तळघर आहे, त्यात देवीचा पलंग आहे. गच्चीवर जाण्यासाठी दोन चक्राकार जीने आहेत' असे राजूरकर सांगतात. मात्र या मंदिराच्या एकूण रचनेचा उलगडा करण्याच्या नादात ते पडत नाहीत. त्यापेक्षा ही येथे चैत्राला यात्रा कशी भरते, त्यात येणारे देवकर, देवकरीण, पोतराज ही गाणी आणि त्या रचना कशी करत असतात, याची सुंदर माहिती राजूरकर यांनी आपल्या ग्रंथातून दिली आहे. (पृ.१८५)

'डॉ. रघुनाथ बोरकर यांनी आपल्या 'महाकाली चंद्रपूरची' या ग्रंथात यासाठीचा अधिक उलगडा केला आहे. त्यांनी मंदिराची रचना, त्याची स्थापत्य कला आणि शिल्प यांचा कालावधी याची नीट उकल केली आहे. ते म्हणतात, महाकालीचे मंदिर हे शैलगृह म्हणजे गुंफाच आहे. मूळचे हे शैलगृह मंदिर हे (पाषाण कोरून तयार झालेली गुंफा)आहे. येथे आजही स्पष्टपणे दिसून येणारी तीन स्वतंत्र अशी शैलगृहे बघावयास मिळतात. यापैकी ३.१५ मी. × १.६० मी. × १.८५ मी. आकाराच्या एका शैलगृहात देवी महाकालीची प्रतिमा शैलगृहाच्या भिंतीवरच देव्हारा करून स्थापन केली असल्याचे म्हटले आहे. अन्य दोन शैलगृहांपैकी एका शैलगृहाचा आकार हा २.१५ मी. × १.९० मी. × १.८५ मी. अक्षांश आहे.' या शैलगृहात प्रवेश करण्यासाठी भुयारात प्रवेश केल्याप्रमाणे पायऱ्या खाली उतरून जावे लागते. ह्या शैलगृहाच्या बाजूलाच तिसऱ्या शैलगृहात देवी महाकालीचे पलंग ठेवले आहे. काही वर्षांपासून या पलंगावर निद्रावस्थेत महाकालीचे शिल्प भक्तगणांच्या दर्शनासाठी ठेवण्यात आले आहे. यामुळे येथे असलेल्या शैलगृहाकडे भक्तांचे फारसे लक्ष जात नाही. (पृ.१८) महाकाली मंदिराच्या खाली मोठी गुंफा आहे. अशाच प्रकारच्या गुंफा वर्धा नदीच्या काठावर असलेल्या सास्ती आणि कोठारी गावाजवळ असलेल्या काटवाली येथेही आहेत. या गुंफांवर संशोधन होण्याची गरज दत्ता तन्नीरवार यांनी व्यक्त केली आहे.(पृ.९८)

महाकाली ही दशमहाविद्यांपैकी पहिली, प्रथमा शक्ती आहे. तिच्या संदर्भातील भेद, प्रकार करताना 'पूर्नश्चार्णव', 'तंत्रवाङ्मय' आदी ग्रंथात



तिला 'गुह्यकाली' म्हटले आहे.

'महाकाली मंदिर हे गोंडकालीन चित्रांचा उत्कृष्ट नमुना म्हणता येईल. गोंडकालीन चित्रकला, गोंडकालीन संस्कृती आणि त्याचे अनोखे दर्शन महाकाली मंदिरातील अनेक चित्रकलेतून दिसून येते. मंदिराच्या भिंतीवर करण्यात आलेली शिल्पचित्रे ही तितकीच देखणी आहेत.' गोंडकालीन चित्रकला ही विदर्भात असलेल्या कोणत्याही गोंडकालीन मराठाकालीन मंदिराच्या मंदिरात आढळून येत नसल्याचे तन्नीरवार सांगतात.(पृ.१०२)

महाकाली मंदिरातून एकूण चित्रशिल्प हे वेरूळ अजिंठ्यातील लेण्यांमध्ये असलेल्या चित्रशिल्पाच्या प्रभावामुळे राणी हिराई यांनी निर्माण केले असावेत असा एक अंदाज व्यक्त केला जातो. राणी हिराई औरंगाबाद येथे राहत असताना त्यांनी वेरूळ अजिंठा येथे ती चित्र पाहिले असल्याने त्याच्या प्रभावातूनच महाकाली मंदिर बांधताना त्या चित्रांप्रमाणेच चित्र काढण्यासाठी त्यांनी पुढाकार घेतला असावा, असे मतही तन्नीरवार व्यक्त करतात. (पृ.१०२)

राज्यातच नव्हे, तर देशात चैत्राच्या महिन्यात सुरू होणाऱ्या नवरात्रोत्सवातील एकूणच देवींची ठिकाणे सहज लक्षात घेतली तरी ती गुहा, डोंगरमाथ्यावर, नदीच्या कडेला अथवा लेण्यांमध्ये दिसून येतात. महाकालीचे मंदिर हेही एक गुंफेतील मंदिर आहे. एकवीरा देवी ही आगरी, कोळी, कुणबी आदी जातींची कुलमाता समजली जाते. एकवीराचा अर्थ बुद्धाची आई म्हणूनही केला जातो. राज्यात ज्या-ज्या ठिकाणी एकवीरा देवीची मंदिरे अथवा ठाणे आहेत, त्या सर्वच ठिकाणच्या यात्रा या चैत्र, आषाढ महिन्यातील पौर्णिमेला भरतात.

चंद्रपूरच्या महाकालीला भक्त एकवीराही म्हणतात. मात्र, चंद्रपुरात महाकालीप्रमाणेच एकवीरेचे एक स्वतंत्र मंदिर आहे, हेही लक्षात घेतले पाहिजे. कोकण किनाऱ्यावरील कोळी समाज असो अथवा धुळे-नंदुरबार जिल्ह्यातील आदिवासी. सर्वच एकवीरेला आपली देवी मानतात. यामुळे यातील साम्य लक्षात घेतले पाहिजे.

राज्यात परिचित असलेल्या लेणी समूहांमध्ये, गुंफांमध्ये महाकाली, एकवीरा आदी देवींची मंदिरे आढळून येतात. अनेक ठिकाणी त्या मूळ स्वरूपात तर काही ठिकाणी त्या नंतरच्या काळात स्थापन झालेल्या दिसतात. विदर्भातील चंद्रपूर, गोंदिया, गडचिरोली, भंडारा जिल्ह्यात ठिकठिकाणी गुंफांमध्ये असलेली देवींची मंदिरे प्रसिद्ध आहेत.

बंजारासमाजात मरिआईसोबत कंकाळी देवीला खूप मानतात. तिला महाकाली म्हणूनही ओळखले जाते. कंकाळी देवी ही सप्तमातापैकी असून ती दुष्काळाचे निवारण करणारी असल्याचे सांगत तिला संतुष्ट करण्यासाठी हाल्या म्हणजेच रेड्याचा बळी दिला जात होता. अलीकडे तांड्यावर ही प्रथा खूप कमी झाल्याचे दिसते. कंकाळी देवीचे मंदिर माहूर येथील किल्ल्याच्या भूयारात आहे. तिथे तिला महाकाली नावाने ओळखले जाते. बंजारा समाजात मरिआई, सीतळा, तुळजा, मंथराल आदी देवींना विविध सण-उत्सवांमध्ये बोकडाचा बळी दिला जातो.

कोल्हापूर येथील महालक्ष्मी मंदिरात असलेले अंतराळ व गाभारा हे सर्वात प्राचीन अवशेष आहेत. त्यात स्वतंत्र अशा तीन खोल्या असून त्यामध्ये महालक्ष्मी, उत्तरेस महाकाली व दक्षिणेस महासरस्वती या देवतांच्या मूर्ती असाव्यात. अंतराळात उत्तर व दक्षिणेस दोन खोल्या असून त्यातील एक खोली बंद असते. त्यात पूर्वी मातृदेवतांच्या आणि शाक्तांचा संबंध दर्शविणाऱ्या मूर्ती असाव्यात. विशेष म्हणजे सप्तमातृका, महालक्ष्मीच्या परिवारातील इतर देवता या खोलीमध्ये असाव्यात असे काही संशोधकांना वाटते.(पृ. २५१)

'सरोजिनी बाबर यांनी आपल्या 'कुलदैवत' मध्ये कोल्हापूरच्या महालक्ष्मीला महाकाली म्हटले आहे. तर हीच महाकाली रेणुकेची धाकटी बहीण म्हणजेच कोल्हापूरची महालक्ष्मी म्हणतात.' येथे असलेल्या किल्ल्यांमध्ये हिचे स्थान आहे. (पृ.६१९)

कोल्हापूराहून आली, तुझ्यासाठी महाकाली,
ठाण मांडूनी बैसली किल्ल्यात.

धुरपतामायच्या परंपरेतही रेणूका आणि महालक्ष्मीलाही धुरपतामायची मोठी बहीण म्हटली आहे. धुरपतामायच्या परंपरेत सांगितली जाणारी एक आख्यायिका ही महालक्ष्मीच्या बाबतीत सांगितली जाते ती अशी -

''महाकालीला झंपटनाथ नावाचा पोरगा होता. हा तो मुलखाचा दांडगेश्वर! आईला त्रास द्यायचा. तो पळून रेणूकेजवळ आला. तेथे लपून बसला. महाकालीचा संताप अनावर झाला. रेणूकेजवळ ती संतापाने आली. रेणूकेने 'क्षमा' करण्याचे आश्वासन महाकालीकडून घेऊन झंपटनाथाला तिच्या स्वाधीन केले. महाकालीला आपल्या शेजारीच ठेवून घेतले व अग्रपूजेचा मान दिला आणि झंपटनाथाचे दर्शन घेतल्यानंतरच माहूरगडची यात्रा सफल होईल, असे त्यासही वरदान दिले.'' (पृ.६२०)

महालक्ष्मी आणि महाकाली या दोघी बहिणी असल्याचा उल्लेख लोकगीतातून मिळतो. अरविंद जामखेडकर आपल्या 'महालक्ष्मी मंदिर कोल्हापूर एक सांस्कृतिक अध्ययन' या शोधप्रबंधात म्हणतात, कोल्हापुरातील महालक्ष्मी मंदिराशेजारी महाकालीचे एक मंदिर आहे. त्याचा उल्लेख हा सुरुवातीला इ. स. १२३६ च्या यादव राजा सिंघण (द्वितीय)च्या लेखात मिळतो. त्यात पहिल्यांदा महालक्ष्मीबरोबर महाकालीचा उल्लेख आला आहे. त्यानंतर यादव राजा कन्हरदेव यांच्या काळातील इ. स. १२५७ काळातील लेखातही महालक्ष्मीबरोबर महाकालीचा उल्लेख असल्याचे जामखेडकर यांनी म्हटले आहे. (पृ.२५०)

यादवांच्या काळात शिलाहार राजा द्वितीय भोज याचा बिमोड करून या भागावर आधिपत्य स्थापन करणाऱ्या यादव राजा सिंघण द्वितीय (इ. स. १२००- इ. स. १२४७) याने महाकाली मंदिराची निर्मिती केली असावी. कारण याच्याच काळात महाकालीचा महालक्ष्मीबरोबर उल्लेख मिळत असल्याचे जामखेडकर स्पष्ट यांनी स्पष्ट केलेले आहे. (कोल्हापूर शिलालेख, १५ ऑगस्ट इ .स. १२३५).(पृ.१२७)

डी. डी. कोसंबी यांनी आपल्या 'पुराणकथा आणि वास्तवता' या

शोधग्रंथातील 'गावाच्या चौरस्त्यावर' मातृदेवतांच्या पूजास्थानांचा एक अभ्यास' या प्रकरणात पुणे आणि परिसरात असलेल्या लेण्या, गुंफातील देवींची माहिती दिली आहे. ते म्हणतात, बेडसा येथील विहाराच्या गुहेत 'यमाई' देवीची मूर्ती असून तिला वर्षातून एकदा कोंबड्या, बकऱ्याचा बळी दिला जातो.

कार्ले येथील लेण्यातील देवी सोनकोळी लोकांची पारंपरिक गृहदेवता आहे. तिला अंबाबाई किंवा बेहराई म्हणजे 'लेण्यातील आई' असे नाव आहे. कोळी लोक येथे असलेल्या स्तुपालाच देवी मानतात. ज्या ठिकाणी संत तुकारामांनी भंडारा टेकडीत तपश्चर्या केली. त्या लेणीत देवी होती. जुन्नर परिसरात असलेल्या गणेश लेणीत देवीचे मंदिर आहे.(पृ.१२७)

जुन्नरपासून तीन किमी अंतरावर असलेल्या तुळजा लेण्यात तुळजा देवीची नंतरच्या काळात स्थापना केल्याचे दिसते. तर जुन्नरच्या दक्षिणेला धामणखेल खंडोबाच्या डोंगरात मोठ्या प्रमाणात लेणी समूह आहेत. यात मानमोडी नावाची लेणी प्रसिद्ध आहे. यात मानमोडी नावाची प्राचीन देवी असून तिची पूजा केली जाते. जवळच अंबा, अंबिका लेणीत जैन पार्श्वनाथ आणि देवी अंबिका हिचे मंदिर दिसते.

शिवनेरी किल्ल्याच्या बाहेरच्या तटबंदीतील एका गुहेत शिवाबाई देवीचे मंदिर आहे.(पृ.१३२) शेंदूर लावलेली आणि बिनघडीव प्रतिमा आहे. सासवडजवळ असलेल्या हिवऱ्यापासून देहू छावणीच्या पलीकडील नानोली येथील बौद्ध गुहा परिसरात कुरकुंभची देवता असलेली 'फिरंगाई' देवी आणि तिच्या मूर्ती आहेत. कोसंबी सांगतात की, सर्व ठिकाणी गुहा अथवा लेणी खोदली जाण्यापूर्वी देवस्थान अस्तित्वात होते, हे सिद्ध करण्याइतका ठाम पुरावा देणे कठीण असल्याचेही ते सांगतात.

पुण्यातील या गुहांसोबतच खोंडाई देवी, गडदूबाई गुहेतील देवी, कडजाई मंदिर आदी देवींची मंदिरे ही गुहांमध्ये आहेत. रायगड जिल्ह्यात दत्त टेकडीवर असलेल्या बौद्ध लेणीत हिंगुलजा ही देवी आहे. या देवीचे कोकणातील भन्साळी समाजात मोठे स्थान असे त्यांनी नमूद केले आहे.

कोकणात असलेल्या अनेक लेण्यांमध्येही देवींची मंदिरे दिसून येतात.

यात सिंधुदूर्ग जिल्ह्यातील धामापूरच्या अत्यंत निसर्गरम्य असलेल्या तलावाशेजारी महाकालीचे मंदिर आहे. या मंदिरात महाकालीची मूर्ती ही बाराव्या शतकापूर्वीची असावी. त्यासोबतच राजापूरजवळच असलेल्या आडवली येथे महाकालीचे प्रसिद्ध मंदिर आहे.

मुंबईतील जोगेश्वरी येथे असलेल्या गुफेत जोगेश्वरी देवीचे मंदिर आहे. ठाणे जिल्ह्यात असलेल्या मुंब्रा येथे एका डोंगरावर मुंबादेवीचे मंदिर दिसते. यासोबतच नांदेड जिल्ह्यातील माहूर या ठिकाणी असलेले महाकालीचे मंदिर ही एका स्वतंत्र अशा गुहेतच आहे. तर कर्नाटकमधील दोड्डगड्डवळ्ळी येथील महालक्ष्मी मंदिरातही स्वतंत्र अशी महाकाली आहे. 'कर्नाटकच्या तमकूर जिल्ह्यातील नेलमंगल तालुक्यात असलेल्या 'शिवगंगा' या दक्षिण काशी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पर्वतरांगांमध्ये गंगाधरेश्वर आणि होन्नदेवीची मुख्य मंदिरे अशी गुंफा मंदिरे आहेत. (१२३)

'होन्नदेवी दुर्गा, महाकालीप्रमाणेच असून ती पायाखाली चंड-मुंडाचे दमन करणारी उग्र देवी आहे. याच देवीच्या नावाने छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या राज्यातील 'होन' हे सुवर्ण नाणे सुरू केले होते.'

अरुणा ढेरे म्हणतात, चंद्रपूरच्या महाकालीसारखेच विदर्भातील दुसरे कालीचे ठाणे हे बारसी-टाकळी येथे आहे. हे मंदिर देवपंचायतनामधले एक आणि मुख्य मंदिर आहे. तर तिसरी काली मूर्ती ही बुलढाणा जिल्ह्यातील पारडा-दराडे या गावी आहे. तर कोकणात दोन कालीची मंदिरे प्रसिद्ध असून, त्यात रत्नागिरीजवळ असलेल्या अद्कूळ या गावी आणि कुडाळजवळच्या आडिवरे या गावी आहे. मराठवाड्यात औरंगाबादजवळच कनशील हे कालीचे प्राचीन ठाणे असून, ती सत्यकालिका या नावाने प्रसिद्ध आहे. ढेरे यांनी नोंदवलेल्या कालीच्या मंदिरांपैकी अनेक मंदिरे ही गुहा आणि लेणी परिसराजवळ आहेत.

सारांश, चंद्रपूरच्या महाकालीचे मंदिर हे एक गुह्येतील लेणी, शैलगृहाच्या प्रकारात मोडते. राज्यात अनेक ठिकाणी अशा प्रकारची अनेक मंदिरे आहेत. यावरूनच गावांची त्या-त्या ठिकाणांची नावेही पडलेली दिसून येतात. ही सर्व नावे चौरस्त्यावर, नदीकाठी, डोंगर माथ्यावर आदी ठिकाणी असलेल्या मातृदेवतांची आहेत. (११९)

**संदर्भ :**

१. चंद्रपूरचा इतिहास : अ. ज. राजूरकर, पृ. १८५.
२. महाकाली चंद्रपूरची : डॉ. रघुनाथ बोरकर, पृ. १२, १८.
३. पुराणकथा आणि वास्तवता : डी. डी. कोसंबी, पृ. १३२, १२७,
४. चंद्रपूरच्या देवी महाकालीची चैत्र यात्रा : आचार्य टी. टी. जुलमे, पृ. १२, १५.
५. २७ डिसेंबर २००६ रोजीचे मुंबईतील भाषण : शरद् पाटील.
६. हिराई, स्मरणिका - २०१२, पृ. १७, १९.
७. कुलदैवत : सरोजिनी बाबर, पृ. ६१९, ६२०.
८. शिखर शिंगणापूरचा श्रीशंभूमहादेव : रा. चिं. ढेरे, पृ. १२०, १२३.
९. महालक्ष्मी मंदिर कोल्हापूर एक सांस्कृतिक अध्ययनः अरविंद जामखेडकर, पृ. १२७, २५०, २५१.
१०. कर्तृत्वशालिनी महाराणी हिराईः दत्ता तन्नीरवार, पृ. १०६.

***



# ३
# सप्तमाता आणि जलदेवता

साती बहिण्यांचा हाय मेळा,
चला जाऊ अंघोळीला,
या बाई गणानं गजरा गुंफिला.
बारीक झाड माय दवण्याचं,
देवूळ महादेवाचं,
या माय गणानं गजरा गुंफिला.
साती बहिण्यांचा हा मेळा,
या माय गणानं गजरा गुंफिला.
बारीक झाड माय खारकीचं,
देवूळ महाकालीचं,

**या माय गणानं गजरा गुंफिला.**
**साती बहिण्यांचा हाय मेळा,**
**चला जाऊ अंघोळीला...**

'निसर्गाने चंद्रपूर या जिल्ह्याला भरभरून नद्या आणि तलाव दिलेले आहेत. म्हणूनच नद्या आणि तलावांचा जिल्हा म्हणून चंद्रपूर जिल्ह्याची ओळख आहे. या जिल्ह्यात वर्धा, वैनगंगा, प्राणहिता, इंद्रावती आणि गोदावरी या जिल्ह्यातील महत्त्वाच्या नद्या असून वर्धा, प्राणहिता आणि गोदावरी नद्यांनी जिल्ह्याची संपूर्ण पश्चिम सीमा व्यापली आहे. वर्धा नदीला वैनगंगा व इरई नद्या मिळतात. पुढे ती प्राणहिता म्हणून ओळखली जाते आणि ती सिरोंचाजवळ गोदावरीला मिळते. तर जिल्ह्याच्या आग्नेय सीमेवर इंद्रावती गोदावरीस मिळते. वैनगंगेला डाव्या बाजूने गाढवी, खोब्रागडी, कथणी (काठाणी) व पोटफोडी आणि उजव्या बाजूने अंधारी या महत्त्वाच्या नद्या मिळाल्या आहेत.' याशिवाय जिल्ह्यात अनेक छोट्या नद्या आहेत. त्याचप्रमाणे जिल्ह्यात सु. ३,००० बारमाही तलाव व ८,००० हंगामी तलाव आणि तळी आहेत. चंद्रपूर शहर हे तलावाचे शहर होते. याच शहरातील अनेक तलाव हे भराव घालून बुजवून टाकले असल्याने त्यांची तलावाचे शहर ही ओळखही पुसली गेली.

**बारा कोसाचा माय किल्ला,**
**गोंड राजानं बांधीला.**
**हाल्या दयीत मातला,**
**धडक्या मारतो किल्ल्याला.**
**किल्ल्यामधी हाय तळ,**
**त्यात पाणी डळमळ.**
**या वं पाण्यांमधी काई,**
**माझी महाकाली आई...**

चंद्रपूर, गडचिरोली जिल्हा हा प्राचीन सभ्यतांनी नटलेला आहे. जैन, बौद्ध, जैन तीर्थंकरांची इथे मोठी परंपरा होती. या जिल्ह्यांमध्ये सर्वाधिक लेणी-शिल्प आणि गुंफा मोठ्या प्रमाणात आढळून येतात. शाक्तांचा या

परिसरात मोठा प्रभाव होता. म्हणून अनेक ठिकाणी अजूनही असंख्य शिल्प आणि त्यासाठीचे पुरावे भग्नावस्थेत विखुरलेले असे पडून आहेत. शैवांच्या मंदिरांसोबत बौद्धकालीन लेण्या, स्तुपाने हा परिसर बहरून गेला होता. या परिसरात ब्रह्मदेवाच्या मंदिरासोबतच बुद्ध, मैत्रेय, वज्रपाणी, शाक्यमुनी, यक्ष, कुबेर आदी पुरुषांच्या आकृतींप्रमाणेच अप्सरा, निर्ऋती, हरिती या मातृदेवतांच्याही मूर्ती ठिकठिकाणच्या लेण्या आणि मंदिरांवर वैशिष्ट्यपूर्ण कोरण्यात आल्या आहेत. विशेष म्हणजे या परिसरात यक्षी, अप्सरा, नृत्यांगना, वादक, नृत्यश्रृंगार करणाऱ्या स्त्रियांसोबत मायादेवी, हरिती, निर्ऋती, मंदिरादेवता, यक्षी, अप्सरा यांची संख्या लक्षणीय आहे. विशेषतः अनेक लेण्या, शिल्प आणि मंदिरे ही नदीच्या काठाजवळ आणि काठाशेजारी असलेल्या मंदिर लेण्यांमध्ये अधिक दिसून येतात.

चंद्रपूरच्या महाकाली मंदिर हेही एके काळी झरपट (जरीपटका) नदीच्या काठावर वसलेले आहे. चंद्रपूरच्या पूर्व व दक्षिणेला ही नदी आहे. तर दुसरी नदी इरई ही पश्चिमेला आहे. लोहारा जगंलातून झरपट नदीचा उगम झालेला आहे. इरई आणि झरपट नदींचा हडस्तीजवळ संगम होतो. त्यानंतर त्या वर्धा नदीत विलिन होतात.

झरपट नदीचीही धुरपतामायचे भक्त हे नदी देवता म्हणून तिची पूजा करतात. या नदीच्या परिसरात वेळूच्या बांबूची वने आणि आमराई होती. या वनातून धुरपतामायच्या यात्रेला येताना आलेल्या प्रसंगावरील गाणीही भक्त गातात. धुरपतामायची सातीआसरापैकी सर्वांत मोठी बहीण म्हणूनच तिची पूजा केली जाते. 'धुरपता' या मातृदेवतेबद्दल ती सात मातांमधील एक माता असल्याचे भाविक आपल्या गाण्यातून सांगतात.

**संभाला सात लेकी,**
**माय मजे देवंय बाई गं...**
**पोचीमायला बोलविलं,**
**माय मजे देवंय बाई गं..**
**माय राहतूस कोण्या भागी?**
**मी राहतो तुमच्याच भागी,**
**माय मजे...**

**महाकालीला बोलविलं,**
**माय मजे देवंय बाई गं...**
**माय राहतूस कोण्या भागी...**

चंद्रपुरात चैत्राच्या द्वादशीला येणाऱ्या यात्रेत प्रत्येक भक्त या नदीला अत्यंत पवित्र मानतो. शहरीकरणाच्या वेगाने आज नदीची अवस्था नाल्यासारखी बनली आहे. तरीही तेथील नदीतून वाहणाऱ्या पाण्यावर धुरपतामायच्या भक्तांची मोठी श्रद्धा आहे. तिथे आंघोळ केल्याशिवाय यात्रा



पूर्ण होत नाही, असा एक समज त्यांच्यात खोलपर्यंत रुजला असून, या नदीवरही अनेक रचना त्यांच्यात गायिल्या जातात. त्याचप्रमाणे तिथे असलेल्या रंगमहालाचाही उल्लेख येतो.

**गडचांद्या नगरातं,**
**कायं दिसे लालेलालं...**
**धुरपतामाय-राजामायचा हो,**
**बाई पाण्यामंधी रंगंमहालं.**
**धुरपताच्या महालाला,**
**लाख खिडक्या बावन येशी.**
**तळेगावच्या राजामायला,**
**हो काशी सापडले कशी...**

'चंद्रपूरला धुरपतामायच्या शिष्यपरंपरेत सामील झालेल्या नवीन शिष्यांपैकी देवकरीण आणि देवकरांसाठी झरपट नदीतील आंघोळ आणि त्यासाठी विधीही महत्त्वाचा समजला जातो.' त्यासाठी येथे लघू पुष्करणी असावी. शहरीकरण आणि काळाच्या ओघात असलेल्या अनेक तलावांसोबत ती गायब झाली असावी, असे माझे मत बनले आहे. त्यासाठी गाण्यांमधून तलावात असलेल्या महाकालीचा उल्लेख येतो.

गुरूंकडून दीक्षा घेतल्यानंतर झरपट नदीत आंघोळ करण्यासाठी महत्त्वाचा विधी समजला जातो. कारण त्यांना ही नदी म्हणजे आपली आई महाकाली असल्याचे ते गाण्यातून प्रकट करत असतात. शहरीकरणामुळे चंद्रपुरातील ज्या प्रकारे अनेक तलाव गायब झाले. तसेच या झरपट नदीचेही झाले. ती नदी उरलीच नाही. केवळ तिच्या खुणा शाबूत आहेत. आता तिला एक मोठ्या नाल्याचे स्वरूप आले आहे. अत्यंत दूषित पाणी येथून वाहत असते. तरीही या पाण्यात आंघोळ केल्याशिवाय धुरपतामायचे भक्त राहत नाहीत.

**साती बहिण्यांचा हाय मेळा,**
**चला जाऊ अंघोळीला..**
**या बाई गणानं गजरा गुंफिला...**

नांदेड जिल्ह्यातील बारड येथे पोचेम्माचे मंदिर असून, बाजूलाच बारव म्हणजे मोठी विहीर आहे. तर काहींच्या मते येथे लघू पुष्करणी असावी. येथे येणाऱ्या देवकरीण या मोठ्या विहिरीत आंघोळ करूनच पोचेमायची पूजा करत. याठिकाणी आता बारवचा काही भाग शिल्लक राहिला आहे. येथे सर्व भाग बुजवून टाकला असून बारवही गोल बांधून ती बंदिस्त करण्यात आली आहे. येथे मोठ्या प्रमाणात पोतराज, आणि मातृदेवतांची असंख्य शिल्प विखुरलेली तसेच शेतात बांधाच्या कडेला पडलेली दिसतात. बारडला नवीन मूल झाल्यानंतर त्याचे डोके येथे टेकवतात, त्याला सुरक्षा मिळावी, आयुष्य चांगले मिळावे, यासाठी देवीकडे याचना केली जाते.

नांदेडप्रमाणेच परभणी जिल्ह्यात गंगाखेडपासून जवळच असलेले राणीसावरगाव हे मातृदेवतांचे प्रसिद्ध ठिकाण आहे. माता रेणुका यांचे येथे

मंदिर असले तरी ते सप्तमातेचे मंदिर म्हणून ओळखले जाते. या परिसरातून गोमती नदी वाहते. रेणुका देवीच्या मंदिरासमोरच होमकुंड असून दक्षिणेला एक हेमाडपंथी बांधणीची भव्य अशी दगडी विहीर



आहे. या विहिरीला (लघू पुष्करणी) 'कल्लोळतीर्थ' असे म्हणतात. या कल्लोळतीर्थाला लागून काही साधुपुरुषांच्या समाध्या असल्याने याचे महत्त्व लक्षात घेतले जात नाही.

नांदेड जिल्ह्यात असलेल्या कंधार येथे राष्ट्रकुट काळात सप्तमातृकांचे भव्य मंदिर होते, असे मते अनेक संशोधकांनी मांडले आहेत. येथे मोठ्या प्रमाणात सप्तमातृकांची शिल्पे, लेणी उपलब्ध असून अनेक शिल्प हे काळाच्या ओघात नष्ट झाले आहेत. त्यातही ब्राह्मी, माहेश्वरी, कौमारी, वैष्णवी, इंद्राणी, वाराही, चामुंडा, लज्जागौरीचे मंदिरही प्रसिद्ध आहे. आपल्याला संतती व्हावी म्हणून तिची पूजा महिला करत असतात. सातीआसरा यांनाही सप्तमाता म्हणून ओळखले जाते.

कोल्हापूर जिल्ह्यातील शिरोळ तालुक्यात कृष्णा नदीच्या तीरावर वसलेले खिद्रापूर हे शाक्त तांत्रिकांचे प्राचीन केंद्र होते. येथे सप्तमातापासून ते निर्ऋतीपर्यंतची अनेक शिल्प पाहावयास मिळतात. संपूर्ण मंदिरच निरखून पाहिल्यास ते योगिनींचे केंद्र असल्याचे लक्षात येते. या मंदिराच्या मुख्य गाभाऱ्याच्या उजव्या बाजूला सप्तमातांचे एकाच लांब शिळेत कोरलेले शिल्प आहेत. त्याला 'सप्तमातृकापट्टिका' असे म्हटले जाते. असे तीन शिल्प या ठिकाणी आहेत. शेंदूर माखला असल्याने त्याची पुरेशी माहिती मिळत नाही. ज्येष्ठ संशोधक डॉ. गो. ब. देगलूरकर यांनी 'कोप्पेश्वर (खिद्रापूर) मंदिर आणि मूर्ती' या ग्रंथात या शिल्पाला 'सप्तमातृकापट्ट' असे म्हटले आहे. यात नऊ शिल्प दिसतात. देगलूरकर म्हणतात, त्यात भद्रा, माहेश्वरी, कौमारी, वैष्णवी, वाराही, इंद्राणी, चामुंडा हिचे शिल्प आहेत. यात वीरभद्र आणि गणेशाच्या प्रतिमा आहेत. या शिल्पांचे वैशिष्ट्ये म्हणजे या सव्यललितासनात बसलेल्या असून त्यांच्या मांडीवर मूल घेतलेले दिसते. देवी हरितीच्या शिल्पाप्रमाणे हे शिल्प



आहेत. (पृ. ४४) या शिल्पांवर नव्याने संशोधनाची गरज आहे.

महालक्ष्मी आणि महाकाली या दोघी बहिणी असल्याचा उल्लेख लोकगीतातून मिळतो. शाक्त धर्मामध्ये महालक्ष्मीस मूळ प्रकृती मानून तिची व तिच्या रूपांची पूजा करण्यात आल्याचे जामखेडकर यांनी आपल्या शोधग्रंथात स्पष्ट केले आहे.(पृ. २५०,२५५)

'डॉ. नीरज साळुंखेही आपल्या 'दैत्य बळी व कुंतलदेश महाराष्ट्र' मधील वीरगळ या प्रकरणात सप्तमातृकापट्ट नेहमीच नऊ मूर्तीसह येतो असे म्हणतात. सात मातृका व दोन्ही बाजूस त्यांचे रक्षक म्हणून गणपती व वीरभद्र असतात. वीरभद्र हाही सातीआसरांचा एक रक्षक वीर असल्याचे सांगतात.'(पृ.१४७) तसेच राज्यातील परभणी जिल्ह्यातील चारठाणा, औंढा नागनाथ, अम्भई, खानापूर, धर्मपुरी, लातूर, कवठापट्टी आदी ठिकाणी सप्तमातृकापट्टिका असल्याचे ते सांगतात. निलंगा येथील चालुक्यांच्या नीळकंठेश्वर मंदिरातील सप्तमातृकापट्टीसोबतच कीर्तीमुख असून येथे नरसोबा हा सातीआसराचा भाऊ म्हणूनही पूजला जातो. (पृ.४८) डॉ. साळुंखे यांनी सप्तमाता, जलदेवतांचा अत्यंत चांगला उलगडा केला आहे. ते म्हणतात, की व्रात्य हे अवैदिक सात या संख्येशी संबंधित आहेत. जलदेवतांचे सात या संख्येशी नेहमीच संबंध आहेत. हरप्पा संस्कृतीही सात नद्यांशी संबंधित मानली जाते. मरुत या जलदेवतांचा सात संख्येशी घनिष्ठ संबंध आहे. उत्खननात सापडलेल्या एका हडप्पा चिन्हावर उभ्या सात स्त्रीमूर्ती एकत्र उमटविलेल्या आहेत. सातीआसरांची नंतरची शिल्पे अशाच प्रकारची आहेत. यातूनच जलदेवतांचे 'सात' संख्येशी असणारे सख्य प्रकट होते. तसेच 'सात' या आकड्यास भारतीय परंपरेत पवित्रता लाभली आहे व तो आकडा मातेशी एकजीव झाला असल्याचेही डॉ. साळुंखे म्हणतात. कन्नडमध्ये 'अेळ' म्हणजे 'सात'

होय. तर तेलुगू भाषेत 'येडू' म्हणजे सात होय. म्हणजे 'सात' संख्येशी पावित्र्य व मातृत्व निगडीत आहे.

साळुंखे मूळ सात देवता निर्ऋती, रोहिणी/उषा, दिती, दनू/हारिती, उर्वशी, अंबा, इळा या असाव्यात असे म्हणतात. तसेच सातीआसरांचा महाराष्ट्राच्या सांस्कृतिक व राजकीय जडणघडणीत अत्यंत महत्त्वाचा वाटा असल्याचेही ते नमूद करतात. (पृ.३८)

बदामीच्या चालुक्य घराण्याचे कुलदैवत सातीआसरा होत्या. चालुक्यांची राजधानी बदामी येथे असंख्य सातीआसरा शिल्पे मिळतात. मुंबईतील प्रिन्स ऑफ वेल्स संग्रहालयात उत्तर चालुक्य कालखंडातील सप्तमातृकापट्टिका ठेवण्यात आल्या आहेत. (पृ.४०)

नांदेड जिल्ह्यातील मुखेड तालुक्यात असलेल्या मोहनावती नदीच्या किनाऱ्यावर प्राचीन महादेव मंदिर आहे. बाजूलाच एक अत्यंत घडीव अशा रचनेतील बारव असून, ती पुष्करणी असावी. या मंदिरात सप्तमातृकांचे एक शिल्प असून इतर अनेक शिल्प नष्ट झाल्याचे दिसते.

शरद् पाटील यांच्या म्हणण्यानुसार ब्रह्मण काळात दर तीन वर्षांनी सबंध केरळीय गण राष्ट्री या महत्त्वाच्या प्रश्नाबद्दल निर्णय घेण्याकरिता व नवा रक्षापुरुष निवडण्याकरिता पोन्नानी नदीच्या तीरावरील थिरुनावाये या ठिकाणी जमा होत असे. महाराष्ट्रात वारीच्या निमित्ताने देहूच्या नदीपात्रात सुरू झालेली भागवत संप्रदायाची वारी चंद्रभागेच्या वाळवंटात जाऊन विसावते. सर्व वैष्णव, दिंड्या इथूनच पुढच्या वर्षीचे निर्णय घेऊन आपल्या आलेल्या मार्गाने परतीला लागतात. ग्रामीण भागात अनेक लहान नद्यांच्या काठी पावसाळ्यापूर्वी कल्हई लावून एकत्र येत सहभोजन करण्याची एक परंपरा अजूनही मागील काही दशकापर्यंत जिवंत होती. जून महिन्यात पावसाला सुरुवात होण्यापूर्वीपासून ते नद्या दुथडी वाहायला लागेपर्यंत लोकपरंपरेने वेगवेगळ्या पूजा-अर्चा जतन करून ठेवलेल्या आहेत. या पूजेच्या माध्यमातून जलदेवतांचा म्हणजेच मातृदेवतांचा उगम झालेला आपल्याला पाहावयास मिळतो.(पृ.१६३)

चंद्रपूरच्या नागभिड तालुक्यात पेरजागड येथे सात बहिणींचा डोंगर प्रसिद्ध आहे. त्यात निंबाई, उमाई, गौराई, मुक्ताई, पावराई, भिवराई सात बहिण्यांचे वास्तव्य असल्याच्या अनेक लोककथा आहेत.

मराठवाड्यात लातूर जिल्ह्यातील देवणी तालुक्यात असलेल्या रोहिणा या गावाजवळ असलेल्या एका डोंगर कड्याजवळून तीरू नदी उगम पावते. या उगमाच्या स्थानावर रेणूका मातेचे मंदिर आहे. पुढे उदगीर तालुक्यात ती वाहत येते. तीरू नदी जिथे सखल भागातून वाहायला सुरुवात होते. त्यातील काही गावांपैकी हंडरगुळी एक गाव आहे. या गावाच्या तिरावर शिवाचे मोठे मंदिर आहे. या मंदिराच्या शेजारीच अकरावरच्या आईचे म्हणजेच मातृदेवतेचे एक प्राचीन देऊळ आहे. काळाच्या ओघात या मातृदेवतेच्या देवळाकडे दुर्लक्ष झालेले असले तरी येथील मांग, कोळी समाजातील भगिनी अजूनही या अकरावरच्या आईची चैत्रापासून अनेक उत्सवाच्या काळात पूजा करतात. बाजूला असलेल्या शीव मंदिराजवळच उजव्या बाजूला मुक्तामाय या मातृदेवतेचे मंदिर आहे. हे मंदिर शिवमंदिराला जोडून असल्याने शिवासोबतच येथे मुक्तामायचीही पूजा केली जाते. त्यातही शिवमंदिराच्या डाव्या बाजूला आणि काही अंतरावर असलेल्या अकरावरच्या देवीची पूजा केवळ मांग आणि काही प्रमाणात कोळी समाजातील भगिनी करतात. आता या मंदिराचे नव्याने बांधकाम सुरू असून तिला भवानी मंदिर या नावाची ओळख दिली जात आहे. मांग, कोळी या दोन्ही समाजात घरातील कोणत्याही महत्त्वाच्या विधीपूर्वी या आईला नैवेद्य दाखवूनच पुढील पूजा केली जाते. पुढे तीरू नदीच्या मधोमध शेंदूर फासलेल्या सातीआसरा या जलदेवतेच ठिकाण आहे. याठिकाणी सातीआसरा या जलदेवतेचे मंदिर असावे. मात्र तीरू नदी इथूनच आपले पात्र विस्तारत जाऊन ती पुढे आंध्रात कृष्णेला जाऊन मिळते. तीरू नदीवर असलेल्या मातृदेवतेच्या मंदिराच्या खुणा काळाच्या ओघात गायब झाल्या असल्या तरी येथे मोठा गोल खडक अजूनही सातीआसरा म्हणून पुजला जातो. बाजूलाच मोठा खडकही म्हसोबाच्या नावाने पुजला जातो. या खडकाच्या आजूबाजूला पसलेल्या डोहात लहान मुलांना पोहायला आसरा लागतात, अशी एक भीती घातली जायची. यामागे बऱ्याच मोठ्या कथा सांगितल्या जात असल्या तरी एक बाब निश्चित होते. ती म्हणजे नदी, विहिरी, तळी आदीच्या परिसरात जलदेवता म्हणजेच सप्तमातृकांची देऊळ अथवा त्यांच्या खुणा असतात. त्यांच्याबद्दल एकाच वेळी भय आणि श्रद्धा या दोन्हीही गोष्टी समाजमनात

खोलवर रुजविल्या आहेत. त्याचे हे एक उदाहरण म्हणता येईल.

नदी, तळे विहिरीशेजारी असलेल्या देवी, देवतांबद्दल एकीकडे मोठी आदरभावाची भावना आणि त्यासोबच आपली रक्षणकर्ती देवता म्हणून ओळखले जाते. दुसरीकडे सातीआसरा, सप्तमाता यांच्या नावातही तितकीच भीतीही लोकमानसांमध्ये दिसून येते. यामुळे नदीकाठी शेंदूर लावून असलेल्या सातीआसराच्या शेजारच्या डोहात अथवा त्या जवळच्या ठिकाणी एकीकडे मुलांना पोहण्यासाठी भीती दाखवली जात असली तरी तिच्याकडून आपल्या मुलांचे रक्षण व्हावे; अशी तिच्याकडे याचनाही केली जाते.

'शरद् पाटील म्हणतात, महाराष्ट्रातील नवप्रसूत स्त्रिया जन्माला आलेल्या मुलाला घेऊन विहीर वा नदीकाठी असलेल्या आसरा व अप्सराची नदीचीही पूजा करतात. अजूनही मराठवाड्यातील अनेक ठिकाणी नवजात मुलाचे डोके आसराजवळ टेकवून त्याच्या सुरक्षेची याचना केली जाते. देशात विविध ठिकाणी असलेली चैत्यही मातृदेवतांची मंदिरे होती. त्याचप्रमाणे देवी निर्ऋतीचा उलगडा पाटील यांनी केला आहे. तर डॉ. नीरज साळुंखे यांनी निर्ऋती ही जलदेवता असल्याचे म्हटले आहे.'(पृ.५२)

'डी. डी. कोसंबी यांनी आपल्या 'पुराणकथा आणि वास्तवता' या ग्रंथात दाखवून दिल्याप्रमाणे चैत्य, शिळा म्हणजे केवळ स्मारके नसून, ती मातृदेवता व त्यांच्या यक्ष सहचरांची मंदिरे होती. भारतात अजूनही बऱ्याच ठिकाणी आदिवासी, भटके विमुक्त, बंजारा आणि दलित आदी समाज दगडी खांब व वृक्षपूजेशिवाय दुसरी पूजा करत नाहीत, असे नमूद केले आहे.' चंद्रपूरच्या धुरपतामाय मंदिरासमोरही एक मोठी दगडी शिळा उभी आहे. तिची पूजा अगोदर करूनच मंदिरात प्रवेश केला जातो. आता या शिळेवर भक्तगण तेल टाकून तिथे दिवे लावतात. या शिळेवर कोणत्या प्रकारच्या नोंदी आहेत काय याचा शोध घेण्याची गरज आहे. परंतु या डिकमाळ म्हणून त्यावर दिवे लावले जातात. त्यासाठी असा उल्लेख एका आरतीतून येतो.

**'मायची पायरी निर्मळ,**

पुढी डिकमाळं जळं, देवमाय...'

प्रा. मोतीराज राठोड यांनी आपल्या 'सिंधू संस्कृती पूर्व गोर संस्कृती' या पुस्तकातून गोर संस्कृतीचा उलगडा करताना बंजारा, आदिवासी समाज हा मातृपूजक व त्यातही सप्तदेवींची पूजा कशी करत होता, हे स्पष्ट केले आहे. गोर संस्कृतीत पूजा-अर्चा करण्याची पद्धत ही वेगळी होती. मात्र, सप्तदेवींची पूजा प्रमुख होती. ती आजही केली जात आहे. अजूनही बंजारा समाज 'याडी मरियम्मा यिंळती' हे स्तवन गावून मरिआईला म्हणजेच सृष्टीला, निसर्गमातेला, भूमातेला वंदन करतो. हे स्तवन असे असते -

**याडी मरियामा यिंळती,**
**जे जे याडी मरियामा.**
**हारे झाडेरी लाखीया चूडेरी,**
**आवकांळ कोट सावकांळ कोट,**
**याडी चारी पोर तार छ,**
**धरतीर तू मालकंळ छी.**
**चांदी सूरीयान समनक रेदेस,**
**हूबी तेग ढळक जावच,**
**दनिया दकाळ हे जावच,**
**सेरो समीया सकाळ करेस.**
**काळे मातेर मांळस छां,**
**पगपगेम आडक जावांचा,**
**वळी वाटेन सूदो करेस.**
**डूंगर खोळा तार छ,**
**आंगळेमांयीर खाडू तार छ,**
**कानी कानी बडती करेस.**
**ढेरो फकडी तार छ,**
**घरेमायीर गूंळी तार छ,**
**सेरेम सवासेर करेस.**
**लोयी पांळी तार छ,**

**वेल वाडी तार छ,**
**सेरी वेल मांडवान पूंचायेस.**
**वाडी वसतीन सायी हेयेस.**
**जीव जंळगाणीन सायी हेवेस.**
**भूली चूकीन करबांळ करेस.**
**आयो वगम घंळम करेस.**
**झकडझोला हजार टाळेस.**
**चिते काम फत्ते करेस.**
**जत समरा वत आढंळ आयेस.**
**तारे नामेरो कीदे जको पूजा, कडाव,**
**तारे मंजरेन पूंचा लेयेस.**
**जीत सवायी रकाडेस अन,**
**सायी हेयेस याडी सायेबंळी सायी हेयेस...**

या स्तवनातून बंजारा समाज आपल्या गोर संस्कृतीतून 'याडी' म्हणजे भूमाता म्हणून गणलेल्या सृष्टीची मालकीन असलेल्या मरिआईची आठवण करत असतात. त्यांचे हे स्तवन पिढ्यान्‌पिढ्यापासून गायिले जाते. हे स्तवन गाण्यासाठी अजूनही पुरुष-महिलांना एकत्र करून म्हटले जाते. पूजा करताना जमिनीवर चौकट काढून चार दिशाला फुले, दिवा लावले जातात.

बंजारासमाजात अजूनही खोलवर रुजलेले मरिआईवरील स्तवन लोकसाहित्यातील सर्वात जुने असावे. विशेष म्हणजे देशाच्या कानाकोपऱ्यात ज्या-ज्या ठिकाणी बंजारा, आदिम समाज आहे, त्या-त्या ठिकाणी गोरमाटी म्हणून समजल्या जाणाऱ्या या भाषेतच हा समाज हे स्तवन म्हणत असतो. कुठेही त्यात बदल दिसत नाही. इतके वैशिष्ट्ये इतर कोणत्या कवनात क्वचितच दिसते. धुरपतामायवरील गाण्यांमध्ये अनेकदा तिला 'लमाणीन' असल्याचा उल्लेख येतो. मांग समाजासोबत बंजारा समाजातही देवकरीण अथवा योगिनी झाल्या असाव्यात. म्हणून एक गाण्यात त्यांचा उल्लेख हा असा येतो -

**'माय तुमचा गुरू कोण?**

जातीची लमाणीनं,
त्यांच्या लंगीयाला सोनं,
लाविलं ज्योतिबानं...'

असा उल्लेख असलेली असंख्य गाणी धुरपतामायच्या परंपरेत गायिली जातात. 'धुरपतामायला गोरमाटी भाषेत 'याडी मरियम्मा' म्हणून पुजले जाते. सृष्टीची तू रक्षणकर्ती असल्याचे म्हटले जाते.'



कोणत्याही घरातील चांगल्या कार्याच्या सुरुवातीला हे 'याडी' मरियम्माचे हे स्तवन म्हटल्याशिवाय बंजारा समाज पुढे जात नाही. विशेष म्हणजे हे स्तवन म्हणण्यासाठी या समाजात अजूनही कोणत्या पुरोहिताला अथवा ब्राह्मणाला बोलवले जात नाही. समाजातील जाणकार अथवा ज्येष्ठ व्यक्ती हे स्तवन म्हणतो आणि त्याच्या मागे उपस्थित असलेले सर्व लोक म्हणत असतात. असेच देवी निर्ऋतीबाबतचे एक स्तवन शरद् पाटील यांच्या पहिल्या खंडातील 'भूमाता' या प्रकरणात येते. (पृ.१००, १०१)

'विश्वरूपे निर्ऋते, तुला प्रणाम असो,
हे लोहमय पाश मोकळे कर;
यम व यमीसह तू
या सर्वोच्च स्वर्गावर आरोहरण कर.
देवी निर्ऋते, तू ज्या पाशांनी
न सोडण्यासाठी याचा गळा बांधलास,
ते मी जणू काय आयुष्याच्या मध्यान्हीपासून मोकळे करीत आहे;
मग बंधमुक्त होऊन जग, व अन्नग्रहण कर.
जिच्या क्रूर मुखात मी
पाशविमाचनार्थ होम करतो,
ज्या तुला 'भूमि' म्हणून जन जाणतात,

त्या तुला 'निर्ऋति' म्हणून मी सर्वतोपरी ओळखतो.
ना हवन ना यज्ञ करणाऱ्याला तू शोध, तो तुझा रस्ता आहे.
देवी निर्ऋते, तुला प्रणाम असो.
देवी निर्ऋतीला वंदन करणारा मी,
पिता जसा पुत्राला, तसा मी तिला माझ्या शब्दांनी थकवून सोडतो;
विश्वातल्या सर्व जातमात्रांना ती जाणते,
आणि डोक्याडोक्याला ही उद्गाती ओळखते.
(गण-)धनाची निधान व संग्राहक,
विश्वातली यच्चयावत् (चराचर) रूपे जाणणारी सर्वज्ञ,
सत्यधर्मा सविता देवाप्रमाणे,
इंद्रासारखी, ती चौरस्त्यावर उभी राहाते'

प्रा. राठोड यांनी केलेल्या उलगड्याप्रमाणे ज्या सप्तदेवींच्या मूर्ती हडप्पामध्ये सापडल्या आहेत. त्या 'गोरदेवी' आहेत. म्हणजेच 'सप्तमाता' आहेत. पृथ्वीची निसर्गमायेची पूजा ही सिंधू संस्कृतीत केली जात असल्याचे पुरावे ते देतात. गोरवंशी आजही सामुसमनक पृथ्वी ही पूजा बळी देऊन करतात.

'पैलो नमन धरतीन, दुसरो नमन मेलीया'

असे गीत गाऊन मेघ, जल अशी निसर्गपूजा ही हडप्पा संस्कृतीत जळवा संस्कारामध्ये केली जात होती, त्यासाठीच्या अनेक देवींच्या मूर्ती सापडल्याचे प्रा. राठोड म्हणतात. बंजारा समाज याडी मरियम्मा या सप्तमातामधील देवीला अग्रस्थानी मानतो. तिचे स्तवन केल्याशिवाय कोणतीही दुसरी पूजा आजही करत नाही. ही पूजा म्हणजे बंजारा समाजाचे निसर्गाशी कायम साधर्म्य असल्याचा एक पुरावा आहे. मात्र, शिक्षित समाजात याडी मरियम्माऐवजी 'जगदंब' नावाने तिच्या रेखीव आणि सुंदर आकाराच्या मूर्त्या तयार करून तिची पूजा केली जात आहे. शेंदूर लावलेली, चौरस्त्यावर, रस्त्याच्या कडेला, गावाच्या बाहेर आकारहीन दगडात आपले अस्तित्व असलेल्या मरिअम्माला बंजारा समाजातील काही मंडळींनी संगमरवरी दगडात कोरून तिला जगदंबाचे रूप दिले आहे. तिला शेंदूर लावण्याची, तिची मूळ पूजा करण्याची

प्रथाही अलीकडे कमी होत असून होम, हवन आणि यज्ञही केले जात आहेत. यामुळे ज्या समाजाने हजारो वर्षांपासून याडी मरिअम्माची परंपरा जतन केली तिथे ही परंपरा नष्ट होण्याच्या मार्गावर आली आहे. नांदेड येथील बंजारा समाजातील ज्येष्ठ साहित्यिक व अभ्यासक मोहन राठोड यांनी तर 'याडी मरिअम्मा' आणि 'देवी निर्ऋती' यावर प्रकाश टाकणारे लेखन केले असून, ते पुढील पिढीसाठी मार्गदर्शक ठरणार आहे.

डॉ. सुनील राठोड यांनी 'बंजारा जमात-लोकजीवन आणि लोकगीते' या आपल्या शोधनिबंधात बंजारा समाजाच्या लोकगीतांमधून मातृदैवतांसाठी गायिल्या जाणाऱ्या अनेक लोकगीतांचा उलगडा केला आहे. बंजारा समाजात दसरा या सणाला खूप मोठे महत्त्व आहे. यात घटस्थापना झाल्यानंतर पारंपरिक पद्धतीने जीव बळीचा विधी पार पडतो. त्यानंतर रात्रभर थाळी, नगाऱ्याच्या तालावर भजन करतात. याला 'देवी जगाडेरो' असे म्हणतात. सूर्योदय झाला की, बंजारा समाजाच्या पाल, तांडे, वस्त्यांमधून देवीची आरती करतात. ती अशी असते-

**चोको पुरदी, जग मी उतरीर... गोळेतारा**
**जग मांडण, तारी आरत उतरीर... गोळेतारा**
**साती भेनेरी आरत उरतरीर... गोळेतारा**
**देवीम देवी कुणसी मोटी वियेर... गोळेतारा**
**धनेमा धन कुणसो मोटो वियेर... गोळेतारा**
**भगतेमा भगत कुणसो मोटो वियेर... गोळेतारा**
**भगतेमा भगत झापा मोटो वियेर... गोळेतारा**
**आनेमा आण कुणसो मोटो वियेर ... गोळेतारा**
**आनेमा आन कोदू कुणसो मोटो वियेर ... गोळेतारा**
**पाडेमा पाडे कुणसो मोटो वियेर ... गोळेतारा**
**पाडेमा हिमाला मोठो वियेर ... गोळेतारा.**

त्याचा भावार्थ डॉ. सुनील राठोड असा सांगतात, जगन्मातेचे प्रतीक असलेला गोल ताऱ्याप्रमाणे चोको रेखाटून जगाची निर्मिती करणाऱ्या हे 'चोको' आम्ही तुमची आरती करीत आहोत. त्याचबरोबर सातही देवींची आरती करीत आहोत. चोको तूच सांग! सात देवींपैकी आम्ही कोणाला

श्रेष्ठ मानू? श्रेष्ठ देवी कोणती? देवींमध्ये (देवीचे नाव घेऊन) हीच श्रेष्ठ, धनात धन कोणते श्रेष्ठ, हेही आम्हाला सांग! आम्ही बारा वर्षांनंतर तुझी आरती करीत आहोत.(पृ. ९३,९४)

'मौखिकता आणि लोकसाहित्य'मध्ये श्रीकृष्ण राऊत यांनी कोरकू लोकगीतातील पृथ्वीच्या पूजेसंदर्भात एक दाखला दिला आहे.

**भई जब लाखो उदला वायरो,**
**वन जारण वाई लाखो उदल वाई,**
**भई जब कौन हला देवान सेवान.**
**वायलारो उदल वायरो,**
**रोजा भी उदीला न वायरो,**
**सेवा उदल वायरो...**

यातून कोरकू म्हणतात, मी कोणत्या देवतेची पूजा करू, ज्याने पृथ्वी निर्माण केली त्याची पूजा करावी. सर्वाआधी उदिया (उधई) मातेची पूजा करावी; कारण तिने पृथ्वी निर्माण केल्याचे सांगतात. त्यांची ही उधई माता भूमाता आहे. (पृ. ११६)

डी. डी. कोसंबी यांच्या म्हणण्याप्रमाणे भारतातील मातृदेवतांची मंदिरे ही स्थानिक उगम असलेल्या प्राचीन टोळीबद्ध पंथाबरोबर सरळ विकसित झाली आणि पुढे कालांतराने तिचे ब्राह्मणीकरण झाले.(पृ.९५) 'ऋग्वेदात उर्वशीशिवाय दुसऱ्या कोणत्याही अप्सरेचा उल्लेख नसला तरी अथर्ववेदात मात्र अनेक अप्सरांचा उल्लेख आढळतो.' यात ब्राह्मी, माहेश्वरी, कौमारी, वैष्णवी, वाराही, इंद्राणी, चामुंडा या सात मातृदेवता तर गोत्रकर्तेही सात होते, असे कोसंबी सांगतात. यात विश्वमित्र, जमदग्नी, भारद्वाज, गौतम, अत्री, वशिष्ठ आणि कश्यप ही प्रमुख आहेत. कोसंबींनी मातृदेवतांबद्दल अनेक पौराणिक दाखले देऊन त्यांचा निसर्गमायेशी असलेला संबंध स्पष्ट केला आहे. ऋग्वेदात. ५.४७.६ मध्ये मातृदेवता या आपला पूत्र सूर्य याच्यासाठी कापड विणतात, असे म्हटले आहे. 'वस्त्र वयन्ती नारीष रात्रि' सूर्याची वस्त्रे ही रजनी (रात्र) विणते, असे ते सांगतात.

कोसंबी यांनी यात अप्सरांना 'वायुपुराणा'त गांधर्वी म्हटल्याचे सांगितले आहे. त्यात त्यांची संख्या वायुपुराण चौतीस असून अमरकोशात

मेनका, रंभा, उर्वशी, तिलोत्तमा, सुकेशी आदी अप्सरांचा उल्लेख आहे. समुद्र मंथनाच्या गोष्टीत ज्या आख्यायिका पुराणात आल्या आहेत, त्यात चौदा रत्नांच्या उल्लेखात रंभादी अप्सरा यांचा उल्लेख असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे. महाराष्ट्रातच नव्हे, तर देशातील प्रत्येक लहान-मोठ्या नदीच्या उगमापासून ते त्यांनी निर्माण केलेल्या खोऱ्यांपर्यंतच्या काठावर मातृदेवतांची आणि शैव परंपरा जतन करणारी शिवाची देऊळ, मंदिरे आढळतात. तशीच तलाव, तळी यांच्या शेजारीही ती आढळतात. अनेक जलस्थानाच्या ठिकाणी शिवलिंग आणि मातृदेवता एकाच ठिकाणी आढळून येतात. चंद्रपुरातील धुरपतामायचे मंदिरही जरीपटका नदीच्या काठावर आहे. देवीच्या मूर्तीसोबतच समोर असलेले शंकराची पिंडही पुरातन असल्याचे सांगण्यात येते. तर काहींच्या मते ते नंतर आले असावेत. मात्र, या मातृदेवतेचे दर्शन घेण्यापूर्वी भक्तमंडळी अगोदर मूर्तीच्या समोर असलेल्या शिवलिंगाचे दर्शन घेतात.

डॉ. नीरज साळुंखे यांच्या 'दैत्यबळी व कुंतलदेश महाराष्ट्र' अंबा नावाचे प्रकरण आहे. त्यात ते म्हणतात, अम्बा ही जलदेवता आहे. 'अम्ब' याचा अर्थ 'जल' होतो. कृषक समाजातील जलदेवतेस अम्बा म्हटले जाणे साहजिक होते. अम्बेचाच नंतर लक्ष्मीमध्ये विकास झाला. निर्ऋतीप्रमाणेच लक्ष्मीचेही वाहन घुबड आहे. रुद्र हा त्र्यंबक म्हणजेच त्रिरूप अंबेचा पुत्र मानला जातो, असेही डॉ. साळुंखे सांगतात. तसेच अम्बेचा सातीआसरांशी (सप्तमातृकांशी) ज्येष्ठ 'आसरा' म्हणून संबंध आहे. केवळ सात देवतांमधील ती थोरली नसून साऱ्याच देवतांना सप्तंबा म्हणण्याचा प्रघात आहे. यल्लमाचा अर्थदेखील 'सप्तंबा' होतो, असे ते सांगतात. (पृ.१०४) यल्लमाचा कन्नडमध्येही अर्थ सर्वांची माता, सप्तमाता असा केला जातो.

गोदावरीच्या उगमाजवळ असलेले त्र्यंबकेश्वराचे मूळ मंदिर हे अंबा, अंबालिका, आणि अंबिका या त्रिअंबाचे होते. येथील मुख्य मंदिरात केवळ शिवलिंगाची पूजा होते. अनेक ठिकाणचे अजूनही शाबूत असलेले मातृसत्ताक परंपरा दर्शविणारे शिल्प आणि येथे असलेल्या प्रसिद्ध पुष्करणी शेजारी आहे.मातृदेवीची मूळ ओळख देण्यास पुरेशी आहे. मात्र, कालांतराने ही मूळ ओळख अनेक मातृदेवतेच्या मंदिरांप्रमाणे पुसली

गेली असावी. गोदावरी नदीच्या उगमाजवळील त्र्यंबकेश्वर येथे असलेली पुष्करणी हे देशातील तीन मुख्य पुष्करणीपैकी एक असून तिला पुराणातही अनन्यसाधारण महत्त्व आहे. संघगणप्रथाक समाजात व त्यानंतरच्या कालावधीतही स्त्री ही त्या-त्या गणाची अथवा राज्याची प्रमुख शास्ती वा राज्यप्रमुख होण्यापूर्वी याच पुष्करणीत या स्त्रीचा 'अभिसिंचन' नावाचा विधी केला जात होता. हे शरद् पाटील यांनी आपल्या 'दास-शूद्रांची गुलामगिरी' खंड १, मध्ये सप्रमाण दाखवून दिले आहे. कर्नाटकात बेल्लूर जिल्ह्यातील हम्पी, महाकुटा आदी अनेक ठिकाणी अशा प्रकारच्या पुष्करणी पाहावयास मिळतात. मात्र, यात श्रीशैलमच्या पुष्करणींचे एक अनन्यसाधारण महत्त्व आहे. प्रत्येक पुष्करणीच्या शेजारी मातृदेवतेचे मंदिर आणि त्यांची एक परंपरा त्या-त्या ठिकाणी पाहावयास मिळते.

श्रीशैलम हे योगिनी परंपरेचे देशातील सर्वांत मुख्य असे तत्त्वज्ञानाचे केंद्र होते. तसेच प्राचीन केंद्र, कोल्हापूर जिल्ह्यातील खिद्रापूर, उस्मानाबाद जिल्ह्यातील येरमाळा आणि नांदेड जिल्ह्यातील बारडही असावेत. या ठिकाणी दूरवर पसरलेल्या दुर्मीळ शिल्पांवरून हे लक्षात येते.

कर्नाटकमध्ये विजापूर जिल्ह्यातील बदामी तालुक्याचा परिसर हे मातृदेवता आणि शैव परंपरेसाठी प्रसिद्ध आहे. याच तालुक्यात अनेक प्रकारच्या पुष्करणी आढळतात. बदामीच्या चालुक्य काळातील महाकूट मंदिर समूहांमध्ये नंदिकेश्वर या गावी लज्जागौरीश्वर नावाचे नवलिंगांपैकी एक मंदिर हे येथील विष्णू पुष्करणीजवळ आहे. तिलाही 'महाकाली' म्हणून ओळखले जाते. तर दुसरीकडे धुरपतामाय, देवी हरितीप्रमाणेच आपल्या मुलांचे रक्षण करणारी आणि संतती देणारी देवता म्हणून लज्जागौरीची पूजा केली जाते. आंध्र प्रदेशातील मेहबूबनगर जिल्ह्यातील नंदीकोटकूर तालुक्यात असलेल्या आलमपूर, संगमेश्वर या गावी असलेल्या लज्जागौरीची पूजा स्त्रिया या संततीप्राप्तीसाठी करत असतात. कर्नाटकमधील दोड्डगड्डवळ्ळी येथील महालक्ष्मी मंदिरात महाकाली आहे. तिथेही तिची एक सप्तमाता म्हणून पूजा केली जाते.

'संशोधन' या त्रैमासिकात नांदेड जिल्ह्यातील कंधारसंदर्भात विस्तृत माहिती मिळते. त्यातील वास्तू मंदिरे या तिसऱ्या प्रकरणात राष्ट्रकूट काळात कंधार हे मातृदेवता व आदिशक्तीचे महत्त्वाचे शक्तिपीठ होते, अशी

माहिती मिळते. येथे मन्याड नदीच्या पात्रात मातृदेवतांची अनेक शिल्पे मिळालेली आहेत. येथे असलेल्या मातृदेवीची (लज्जागौरी) पूजा, उपासना केली जात होती. या परिसरात अनेक ठिकाणी मातृदेवतांची शिल्पे मिळाली असून अजूनही मोठ्या प्रमाणात उत्खनन करण्याची गरज आहे. देगलूर जवळील करडखेलच्या बसस्थानकाशेजारीच लज्जागौरीचे तीन मातृशिल्पे ठेवण्यात आली असून या परिसरात अशा प्रकारची अनेक मातृशिल्प आढळून येतात.

परभणी जिल्ह्यातील सोनपेठ तालुक्यात गोदावरीच्या तीरावर असलेल्या कुंभारी गावापासून हाकेच्या अंतरावर बंजाराबहुल वस्ती लागते. या वस्तीच्या बाजूलाच गोदावरी नदी अर्ध चंद्राकार वळण घेऊन पुढे जाते. त्या ठिकाणी तुळजाभवानीचे छोटेखानी मंदिर आहे. मंदिरातील शिल्प हे महाकालीच्या शिल्पाशी साम्य दाखवणारे असून, मंदिरासमोर मरिआई, पोचेम्माची शेंदूर लावलेले दगड असले तरी त्यातील अनेक दगडांवर पुसटशी ओळख होईल, अशी शिल्प उरली आहेत.

येथील देवीला तुळजाभवानी का म्हटले जाते, याची माहिती उपलब्ध नाही. मात्र, कोणीतरी तिच्या हातात खड्ग असल्याने तिला तुळजाभवानी म्हणून ओळखले जाण्याचा प्रघात पडला असल्याचे स्थानिकांकडून सांगण्यात आले. या शिल्पांची रचना ही महाकाली, सप्तमातांप्रमाणे असून येथेही चैत्राच्या पौर्णिमेला मोठी यात्रा भरते. येथे खणा-नारळाने ओटी भरणे, हिरवा चुडा चढवणे आदी पुजाविधी महिला करतात. अशा प्रकारची विखुरलेली आणि ओळख नसलेली असंख्य शिल्पे गोदावरीच्या तिरावर ठिकठिकाणी मिळतात.

नांदेड जिल्ह्यातील बारडला असलेल्या पोचेम्मा मंदिराच्या आजूबाजूच्या परिसरात असलेल्या सप्तमाता आणि पोतराजांची शिल्पे विखुरलेली आहेत. ती खूप प्राचीन काळातील आहेत. त्यावरही अजून नीट संशोधन झालेले दिसत नाही. चंद्रपूर, बारडपासून ते श्रीशैलमपर्यंतचा एक समान धागा यातून सापडू शकतो.

सारांश, धुरपतामायची ही परंपरा सप्तमाता आणि जलदेवतांची आहे. पोतराज, देवकरीण यांनी आपल्या गाण्यांतून आणि विविध प्रकारच्या कार्यक्रमातून ती अधोरेखित केली आहे.

**संदर्भ :**

१. दैत्य बळी व कुंतलदेश महाराष्ट्र : डॉ. नीरज साळुंखे, पृ. ३८, ४७, ४८, ५२, १०४.

३. सिंधू संस्कृती पूर्व गोर संस्कृती : प्रा. मोतीराज राठोड, पृ. ९.

४. बंजारा जमात-लोकजीवन आणि लोकगीत : डॉ. सुनील राठोड, पृ. ९३, ९४.

५. पुराणकथा आणि वास्तवता : डी. डी. कोसंबी, पृ. ९५.

६. कोप्पेश्वर (खिद्रापूर) मंदिर आणि मूर्ती : डॉ. गो. ब. देगलूरकर, पृ. ४४.

७. दास-शुद्राची गुलामगिरी-भाग-१ : शरद् पाटील, पृ. ५२, १५८, १६३.

८. महालक्ष्मी मंदिर कोल्हापूर, एक सांस्कृतिक अध्ययन : अरविंद जामखेडकर, पृ. २५०, २५५.

९. चंद्रपूर जिल्हा गॅझेट आणि जिल्हाधिकारी संकेतस्थळावरील माहिती.

१०. मौखिकता आणि लोकसाहित्य : संपादक, मधुकर वाकोडे / सुषमा करोगल, पृ. ११६.

***



# ४

## धुरपतामाय :
## शाक्त तांत्रिकांची परंपरा

बाई सोमार दिवसं,
मला कळना येडीला.
महादेव-पार्वती,
उभी बैलाच्या पाडीला वं.. धुरपतामाय..
आटा-दीसं सोमारी,
सारविते चारं कोनं...
महादेव तं पाव्हणा,
पार्वती सुवासिनं वं.. धुरपतामाय

चंद्रपूरच्या धुरपतामायची परंपराही शाक्त तांत्रिकांशी संबंधित आहे. या परंपरेत पोतराज, देवकरीण यांची दीक्षा, जन्म, मृत्यूच्या संकल्पना, त्यासंदर्भातील भीती, भाव यासाठीचे अनेक प्रमाण देता येतील. पोतराजांकडून गायिले जाणारे कवन, आरती ऐकल्यास त्यातील तांत्रिकांचा संबंध हा सहजपणे लक्षात येतो. तांत्रिकांशी संबंधित असलेल्या या धुरपतामायच्या परंपरेकडे त्या दृष्टिकोणातून पाहण्याची आवश्यकता आहे. 'अनेकांनी धुरपतामायचा संबंध महाभारतातील द्रौपदीशी सांगितला जातो. त्यात द्रौपदीचा उल्लेख देवकरीण यांच्याकडून गाण्यांतून करतात.' शाक्त, तांत्रिकांशी संबंधांचा त्याचा उलगडा करण्यासाठी चंद्रपूर परिसरापासून ते मराठवाड्यातील नांदेड, लातूर, उस्मानाबाद, परभणी, औरंगाबादसोबत शेजारच्या तेलगंणा, आंध्र प्रदेशातील शाक्त तांत्रिकांची शक्तिपीठे कशी शाबूत होती आणि कोणत्या समाजातून ती चालविली जात होती, हे पाहिल्याशिवाय ही परंपरा आणि तिचे महत्त्व लक्षात येणार नाही. त्यातही तंत्रांच्या संदर्भात अनेक उलटसुलट मतप्रवाह असल्याने त्यातील काही महत्त्वाचा भाग पाहणे आवश्यक वाटते.

धुरपतामायच्या परंपरेत तांत्रिकाबद्दल कमालीची एक भीती आहे. तंत्र-मंत्राचा वापर काळी जादूसाठी केला जातो, असे काहींना वाटत असले तरी वस्तुस्थिती वेगळी आहे. तंत्र-मंत्रांच्या संदर्भात भीती दाखविणाऱ्या गोष्टी या परंपरेत प्रवाहित झाल्या असल्या तरी त्यातून अनेक गैरसमजही रुजलेले आहेत, हेही नाकारता येत नाही.

नांदेड जिल्ह्यातील राजामाय, यमुनामाय, रुकमामाय, परभणी जिल्ह्यातील विठामाय, भागामाय आणि देवयमाय या देवकरणींच्या समाधीस्थळांना मी भेटी दिल्या. या भेटीदरम्यान त्यांच्यावर असलेल्या अनेक लोककथांचा मागोवा घेताना कुठेही या देवकरीण आणि पोतराज यांनी तंत्र-मंत्रांचा वापर आपल्या शिष्यांवर अथवा इतरांवर दाखवल्याचे ऐकिवात आले नाही. उलट जादूटोणा आणि तंत्र-मंत्रांच्या पलीकडे जाऊन त्यांनी आपली मातृदेवतेची परंपरा जपत असल्याचे दिसून आले.

'परभणी जिल्ह्यातील रामपुरी येथील भागामाय देवकरीण यांचा सर्वांत प्रभावी असा पोतराज हा श्रावण्या होता. त्याचा मोठा दरारा

आजूबाजूच्या गावात होता. परंतु तो गावात भिक्षा मागण्यासाठी आल्यानंतर संपूर्ण गावात एक चैतन्याचे वातावरण निर्माण होत असे.' असंख्य भगिनी या पोतराजाला आपल्या सूपात धान्य आणून देत असल्याचे सांगितले जाते. मात्र तंत्र-मंत्रांच्या भीतीचा कुठेही लवलेश नसे, असेही स्थानिक सांगतात. यामुळे तंत्राच्या संदर्भात भीती अनाठायी असली तरीही काही ठिकाणी याचा धाक निर्माण करून आर्थिक लूबाडणूक केल्याचे दिसून आले.

दुसरीकडे ज्याप्रमाणे ब्राह्मणी तंत्राने आणि साहित्यिकांनी अब्राह्मणी तंत्राची बदनामी केली, तोच प्रकार येथेही असावा. शरद् पाटील यांनीही 'शैव व तंत्र संप्रदाय हे मुळातच अवैदिक व वर्ण-जात-स्त्रीदास्यविरोधी होता' असे स्पष्ट केले आहे. (पृ.७४)

नांदेड, परभणी, लातूर आणि चंद्रपूर जिल्ह्यांवर शिवकाळापर्यंत शाक्तांचा शैव आणि वीरशैवांचाही मोठा प्रभाव होता. मराठवाड्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये शैवांची प्रतीके अजूनही शाबूत आहेत.

**भगतीनी चला की, जाऊ या,**
**शिवगडावर 'समय' लावू या.**
**आई गं लता बाई, तुझा शिववरी वेढा.**
**दुनिया कापं थरथरा...**

चैत्रातील धुरपतामायच्या यात्रेपूर्वी सातारा जिल्ह्यातील माण तालुक्यात असलेल्या शिखर शिंगणापूर येथील शंभूमहादेवाची मोठी यात्रा भरते. या यात्रेला आणि विशेषतः शंभूमहादेवाला धुरपतामायच्या परंपरेत मोठे स्थान आहे. एकूणच शिखर शिंगणापूर हे शाक्तांचे ठिकाण होते.

शिखर शिंगणापूरच्या शंभू आणि बळीपच्या कथेवर रा. चिं. ढेरे यांनी 'शिखर शिंगणापूरचा श्रीशंभू महादेव' या शोध ग्रंथातून बराच उलगडा केला आहे. शाक्तपीठाच्या संदर्भात या ठिकाणी कावडीची परंपराही लक्षात घेणे आवश्यक वाटते.

**तेल्याच्या कावडीला हायत, तांबियाचे घडं,**
**धाव धाव महादेवा, मुंगी घाट हा उघड गं...**

**बाई तेल्याच्या कावडं, मुंगी घाटाला तटली,**
**गिरीजा संबूची उठली, डाव्या हातानं लोटली वं... धुरपतामाय**
**बाई संबू देव म्हणी, गिरीजा नंदीचाही केला,**
**गेले होते माहेराला, निरव वांगीत राहिला वं... धुरपतामाय**
**गोड मोटचं वं पाणी, शिंगणापूरीच्या तळ्याला,**
**गिरीजा बोलती माळ्याला,दवणा आलाय कळ्याला...**
**बाई संबू म्हणू संबू, हाका मारीतेत... वं धुरपतामाय**

मराठवाड्यातील नांदेड, लातूर, परभणी, बीड, जालना, उस्मानाबाद आदी जिल्ह्यातून देवकर, पोतराज, देवकरीण हे मोठ्या प्रमाणात चंद्रपूरला जातात. चंद्रपूरच्या महाकालीची मूळ परंपरा ही शाक्त, तांत्रिकांशी संबंधित आहे. धुरपतामायच्या परंपरेत प्रामुख्याने शिखर शिंगणापूरच्या शंभूमहादेवाला मोठे स्थान आहे. त्यावर असंख्य गाणी आहेत. चैत्र शुक्ल पंचमीपासून ते चैत्राच्या पौर्णिमेपर्यंत शिखर शिंगणापूरच्या यात्रेला सर्वाधिक लोक हे मराठवाड्यातून जातात. कावडी, काठ्या घेऊन पायी चालत शिखर शिंगणापूर गाठतात. या यात्रेत शिव-पार्वतीला विवाहाच्या वेळी बळी व महादेव(शंभू) मंदिरांना जोडणारे पाचशे फुटाहून अधिक लांबीचे पागोटे बांधले जाते. ते पागोटेही मराठवाड्यातील लातूर, बीड, उस्मानाबाद जिल्ह्यातून येते. विशेषतः हे पागोटे बांधण्याचा कार्यक्रम हा चैत्र शुद्ध अष्टमीला दुपारी सुरू होतो आणि सायंकाळपर्यंत चालतो. हे पागोटे म्हणजेच 'ध्वज' हा पौर्णिमेला उतरवला जातो. असेच पागोटे बांधण्याचा विधी हा श्रीशैलमलाही असतो. याच चैत्र पौर्णिमेच्या दरम्यान श्रीशैलमची यात्रा भरत असते.(पृ. १४०-४१) पागोटे उतरवल्यावर पौर्णिमेच्या सायंकाळी शेजारती करून शंभूमहादेवाचा दरवाजा बंद होतो. असाच चैत्र पौर्णिमेच्या मध्यरात्री शेंदूर चढविण्याचा विधी चंद्रपुरात महाकाली मंदिरात होतो. महाकालीला शेंदूर चढवून तिला मानाचे पातळ नेसवले जाते. पूर्वी हा विधी पोतराज, पुजारी आणि मानाच्या देवकरीण यांच्या उपस्थितीत होत असे. अलीकडे त्याचे स्वरूप बदललेले आहे. धुरपतामायची यात्रा ही पौर्णिमेला संपते. त्या दिवशी भाविक यात्रा आटोपून परतीच्या प्रवासाला निघतात.

बाई सोमार दिवसं,
मला कळना येडीला.
महादेव-पावती,
उभी बैलाच्या पाडीला वं... धुरपतामाय..
आटा दीसं सोमारी,
सारविते चारं कोनं.
महादेव तं पाव्हणा,
पार्वती सुवासिनं... धुरपतामाय
आटा दीसं सोमारी,
कोऱ्या घागरीत पाणी,
एवढे महादेव स्वामी,
आले लिंगायत वाणी...धुरपतामाय
संबू म्हणू वं संबू,
हाका मारीतेत बळी,
संबू गेला चका माळी,
दवण्याचे वाफे वळी वं... धुरपतामाय
संबू केलिया आळी,
वाटी तोळा दवणा गोळी वं... धुरपतामाय
बाई संबूचं शिखरं,
दिसतोय आत्मा पार.
नवरत्नाचा हारं,
संबू फेकी गिरीजावरं वं... धुरपतामाय

'शिखर शिंगणापूर हे शाक्तांचे केंद्रस्थान होते. त्याची परंपरा मराठवाड्यातील अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या विशेषतः मांग समाजात अजूनही कायम आहे. महादेवाच्या कावडीची परंपरा लक्षात घेतल्यास शाक्तांचा प्रभाव लक्षात येऊ शकेल. मराठवाड्यातील मांग, महार, कोळी, माळी आदी समाजासोबतच जंगमालाही सारखाच कावडीचा मान असतो.' अनेक गावांमध्ये मांग समाजासाठी स्वतंत्र अशी महादेवाची मंदिरे असून त्याचे पुजारीही त्याच समाजातील असतात.

महालक्ष्मीला आद्यशक्ती मानले जाते. तिच्यापासूनच सर्व देवदेवता व विश्वाची निर्मिती झाली अशा प्रकारची संकल्पना देवीमाहात्म्यात पहिल्या अध्यायात आली आहे.

**त्वयैतत्पाल्यते देवि त्वमत्स्यन्ते च सर्वदा**
**विसृष्टौ सृष्टिरुपा त्वं स्थितिरूपाच पालने**

तुझ्याकडूनच या जगाचे पालन होते आणि हे देवी तू कल्पांती या जगाचा संहार करते. जगाच्या उत्पत्तीचे वेळी तूच सृष्टीरूप होतेस रक्षणकाळी तूच स्थितीरून होते. (पृ.२३८)

शिखर शिंगणापूरप्रमाणेच कोल्हापूर येथील महालक्ष्मीचे क्षेत्र शाक्त-तांत्रिकांचे केंद्र असल्याचे काही संशोधकानी मते मांडली आहेत. धुरपतामायच्या गाण्यातून कोल्हापूरच्या महालक्ष्मीचे महाकालीशी असलेले नाते स्पष्ट केले जाते. दोन्ही क्षेत्रातील अनेक प्रकारचे साम्य दिसते. अरविंद जामखेडकर आपल्या शोधप्रबंधात म्हणतात की, कोल्हापूरची महालक्ष्मीचे हे पीठ शाक्तांचे होते, हे ताम्रपट व अभिलेख पुराव्यांवरून दिसून येते. त्याचा उल्लेख शिवक्षेत्र म्हणून प्रसिद्ध होते. महालक्ष्मी ही रुद्राची अर्धांगिनी व चौसष्ठ योगिनींनी परिवेष्टित असा तिचा उल्लेख आलेला आहे. देवीभागवत व शाक्त तंत्रातील तिच्या या स्थानाला शक्तिपीठ वर्णिल्यामुळे नंतरच्या काळात तिचा संबंध तिरुपतीच्या बालाजीबरोबर जोडला गेला आणि त्यानंतर त्यात झालेल्या बदलातून तिचे मूळ शाक्ताचे रूप बदलून वैष्णव रूप आले, हा काळाच्या ओघात झालेला बदल आहे. महाकालीप्रमाणेही महालक्ष्मीलाही नवरात्रात अष्टमीच्या दिवशी मांसाहाराचा नैवद्य दाखविला जात होता. तो नंतरच्या काळात बंद करण्यात आला. (पृ.२५४) शाक्त धर्मामध्ये महालक्ष्मीस मूळ प्रकृती मानून तिची व तिच्या रूपांची पूजा करण्यात आली आहे.(पृ. २५५)



'लातूर जिल्ह्यातील उदगीर तालुक्यात असलेल्या हंडरगुळी या गावात

जंगम आणि मांगाच्या कावडीचा चैत्राच्या द्वादशीला विवाह सोहळा पार पडतो.' यामुळे येथे एके काळी शाक्त तांत्रिकांचा मोठा प्रभाव असावा. तर या जिल्ह्यात असलेल्या अनेक गांवामध्ये मांग समाजाचीच पुरातन शिव मंदिरेही आहेत, ही बाब महत्त्वाची आहे.

चंद्रपूर जिल्ह्यातील तालुका वरोराच्या भटाळा येथे शाक्त आणि शैवांची प्रमाण देणारी असंख्य शिल्प उपलब्ध आहेत. त्याची मुहूर्तमेढ ही इ.स. ४ थ्या शतकात रोवली गेली असल्याचे डॉ. रघुनाथ बोरकर यांनी 'चंद्रपूर-गडचिरोली जिल्ह्याचे पुरातत्त्व' या शोधग्रंथात सांगतात. (पृ. ४२९) वैदिक उपासनापद्धतीत देवापेक्षा देवींना कमी लेखले असले तरी शक्ती ही जगाचे आदीकरण असल्याचे समजले जात असल्यामुळे देवींना अन्योन्य असे महत्त्व प्राप्त झाले असल्याचे डॉ. बोरकर सांगतात.

चंद्रपूर, गडचिरोली जिल्ह्यात महिषासूरमर्दिनी, पार्वती, भैरवी आणि चामुंडा या शक्तीचे प्रतीक समजल्या जाणाऱ्या देवी आहेत. तसेच सरस्वती, गजलक्ष्मी, अन्नपूर्णा, गंगा-यमुना आणि सप्तमातृका या देवी अनुक्रमे विद्या, धन, अन्न, जल आणि मातृत्वाचे प्रतीक समजल्या जाणाऱ्या आहेत. या देवीच्या प्रतिमा या ४-५ व्या शतकापासून शैलगृहात कोरल्याचे दिसतात. याच दरम्यान शक्तिपूजनही सुरू होते, असे दिसते. बरोडा



तालुक्यात असलेल्या भटाळा येथे लघुलेणी समूह असून यातील ११ व्या शैलगृहात शाक्तांशी संबंधित असलेली महिषासूरमर्दिनीची मूर्ती कोरलेली असल्याचे दाखले दिले आहेत. (पृ. १७२)

'पोतराज आणि देवकरीण यांच्या हातात असलेले वीर कंगण हे त्याच्या शाक्त तांत्रिकांशी असलेला संबंध स्पष्ट करण्यासाठी भक्कम प्रमाण आहे' मात्र, तरी अलीकडे त्याचा वापर पोतराज, देवकरीण हे यांच्याकडून कोणत्याही जादूटोणा अथवा इतर भीती निर्माण होईल, अशा कारणासाठी केला जात नसल्याचे दिसून येते. तरीही काही अपवादाने काही भगत

आदी मंडळी तसा वापरही करतात. त्याचे प्रमाणही बरेच असले तरी काही अशांने त्यांचा या परंपरेशी संबंध कमी दिसतो.

धुरपतामाय ही एक सप्तमातांमध्ये असलेली जलदेवता, निसर्गदेवता आहे. त्यामुळे तिच्या या परंपरेचा संबंध शाक्त, तांत्रिकांशी असणे स्वाभाविक आहे. त्यांच्या पूजा-अर्चामध्ये प्रामुख्याने नदी, वृक्षपूजा लक्ष वेधतात. चंद्रपूरच्या यात्रेची सांगता करताना प्रत्येक महिला मंदिरापासून सुरू असलेल्या चौरस्त्यावर शिजवलेला भात आणि त्याचे शिंपण करत जातात. त्याचे मूळ हे कृषिमायेशी निश्चितच असावे. कालांतराने त्यात बदल झाला असावा.

शेतीचा शोध स्त्रियांनी लावला. जमिनीत बिया पेराव्यात त्याप्रमाणे हा एक विधी असतो. दीक्षा घेताना ज्या प्रकारची गुप्तता पाळली जाते, त्यावरून या धुरपतामायच्या परंपरेत शिवकाळापर्यंत शाक्त तांत्रिकांचा मोठा प्रभाव असावा. त्यासाठी शरद् पाटील यांच्या अनेक ग्रंथातील संदर्भांचा आधार घेतल्याशिवाय पुढे जाता येणार नाही. 'शिवाजीच्या हिंदवी स्वराज्याचे खरे शत्रू कोण : महमंदी की ब्राह्मणी?' या ग्रंथात तंत्राचा इतिहास सांगितलेला आहे. यासाठी त्यांनी 'तंत्र' या शब्दाचा ऋग्वेदांत एकमेव उल्लेख १०.७१.९ या ऋचेत आलेला असल्याचे सांगत या ऋचेचे महापहोपाध्याय सिद्धेश्वरशास्त्री चित्राव यांनी केलेल्या भाषांतराचा उतारा दिला आहे :

'वेदार्थज्ञानाचा थांग न लागलेले अज्ञ ( न ब्राह्मणासः)
यज्ञकार्यअसमर्थ (न सुतेकरासः) आणि पापी लोक लौकिक भाषा
रुपी नांगर हाती धरून शेती (तंत्र) करतात' (पृ.७४)

या भाषांतरावर पाटील म्हणतात, 'येथे शेती करणाऱ्या लोकांना न-ब्राह्मण वा अब्राह्मण म्हटले असून ते लोकभाषा बोलतात असे म्हटले आहे. यावरून तंत्राचा जन्म कृषिमायेत झाला आणि कृषी व कृषिमाया यांचा शोध प्रथम स्त्रियांनी लावून स्त्रीराज्ये स्थापन केल्यामुळे स्त्रीसत्तेच्या अंतानंतर तंत्र स्त्रीप्रधान आचारविचार पंथांच्या रूपात अवशिष्ट राहिले हे स्पष्ट होते.' धुरपतामायच्या परंपरेसंदर्भातही असेच म्हणता येईल. आज त्यांच्याकडे केवळ स्त्रीप्रधान आचारविचार पंथांच्या रूपात त्याचे अवशिष्ट राहिल्याचे दिसते.

आत्मा ज्ञानाचं कुलुपं,
उघडती उघडना गणा वं.
माय माझ्या विठामायची,
किल्ली मला सापडना वं.
आत्मज्ञानाचा कुलूप,
उघडू कशी-कशी नं,
किल्ली माझ्या गुरूपशी गं...
आत्मज्ञानाचं कुलुपं,
मितं उघडया गेले गेले वं,
मितं उघडया गेले,
रत्नं मला सापडले वं...
मितं उघडाया गेले,
माझ्या गुरूचे मंतरं, मंतरं...
माझ्या गुरुचे मंतरं,
रत्नं मला सापडले वं... धुरपतामाय
मह्या गुरूचे मंतरं,
रत्नं मला सापडले वं...

देवकरीण गात असलेल्या या गाण्यातून गुरूकडून देण्यात आलेल्या आत्मज्ञानाचे धडे आपल्याला मिळत असल्याचा उल्लेख आला असून तो लक्षात घेण्याजोगा आहे.

विठामाय गुरू केले, म्यातं ज्ञानाची पाहूनं,
विठामायचा भंडारं, दिसतोयं अगुचरं..
गुरू माझ्या विठामायनं, सोडविले घरं दारं गं.. धुरपतामाय
बाई विठाळं-चांडाळं, करीते दूरं-दूरं,
गुरू माझी विठामाय, गुरू आगनीचं घरं गं.. धुरपतामाय
माय आगनीचं घरं गं.. धुरपतामाय

या गाण्यातील 'विटाळ-चांडाळं करीते दूरं दूरं' तसेच 'विठामाय गुरू केले म्यातं ज्ञानाची पाहूनं' हे दोन्हीही वाक्य धुरपतामायच्या परंपरेचा शाक्त तांत्रिकांशी असलेला संबंध अधोरेखित करतात. ज्या देवकरीण होऊन

गेल्या त्यांच्याकडे आध्यात्मिक ज्ञानाचा मोठा खजिना असावा. त्यामुळेच एखाद्या योगिनींप्रमाणे आत्मज्ञान झाल्यास घरदारं सोडविण्याची ताकद त्यांना मिळाली असावी. मागील शतकभराच्या कालावधीत परभणी जिल्ह्यातील भागामाय देवकरीण या अशाच आपले घरदार सोडून रामपुरीत येऊन स्थिरावल्या होत्या. त्यांच्या मूळ गावाचा अथवा कुटुंबांचा अखेरपर्यंत कोणालाही थांगपत्ता लागला नाही. तर अलीकडच्या काळातील नरळद-इरळदच्या देवयमायचेही संपूर्ण जीवन एखाद्या योगिनींप्रमाणेच जगल्याचे स्थानिक सांगतात. त्यांनीही आपले घरदार सोडले होते. तर येळेगावच्या रुकमामायनेही अशीच भटकंती करत आयुष्यभर मातृपरंपरेची चळवळ पुढे नेली होती. त्यांच्यावरील अनेक गाण्यातून तंत्राचा उल्लेख येतो.

धुरपतामायच्या परंपरेतील सर्वच देवकरीण या मातृपरंपरेची चळवळ आणि सोबतच लोकांच्या आरोग्याचे हित राखले जावे म्हणून गावोगाव भटकंती करत असत. ज्या गावी कॉलरा, हावळ, आदी रोग त्या वेळी यायचे, त्या गावात या योगिनींना बोलावले जायचे. त्या वेळी त्या अनेक आजारांवर औषधोपचार करण्याची महत्त्वाची जबाबदारी पाडत होत्या.

यासाठी 'जातिव्यवस्थाक सामंती सेवकत्व' या ग्रंथातील शरद् पाटील यांचा उतारा खूप महत्त्वाचा आहे. 'पाणिनीच्या काळात ज्याप्रमाणे मातृनामकता बदनाम झाली होती, त्याप्रमाणे कुलटाही.' ही कुलटा वा तंत्राची योगिनी वा भैरवी परिभ्रमण ज्याप्रमाणे धर्मप्रसारासाठी करीत होती, त्याप्रमाणे औषधोपचारासाठीही. कुंती दुर्वापासून अथर्वांगिरसी विद्या ब्रह्मवादिनी बनविण्यासाठी शिकली. अथर्ववेदाला 'ब्रह्मवेद'ही म्हणतात. ब्रह्मवादिनी म्हणजे कुलटा. अशा प्रकारे चिकित्साविद्येचा उगम व विकास मुख्यतः व मूलतः स्त्रियांनी केला. तसेच पुढे शरद् पाटील हेही नमूद करतात, की, भारतीय वैद्यकाचा ऱ्हास योगिनी व वैद्य हे ब्राह्मण-उपनिषद्काळात तिरस्कृत झाल्यामुळे झाला. पण या काळातील योगिनी व वैद्यांच्या वर्णाश्रमधर्माशी संघर्ष 'दैव-व्यपाश्रय-भेषजा'च्या, म्हणजे जादूवर आधारलेल्या चिकित्साविद्येच्या चौकटीतच झाला. (पृ.१०५)

'गांव-गाडा'मध्ये त्र्यंबक नारायण अत्रे, म्हणतात की, 'देवींचे भक्त, आराधी, पोतराज, महार-मांग असले तरी ब्राह्मणेतर स्त्री-पुरूष त्यांना

शिवतात, कुंकू लावतात आणि हातात हात लावून एकत्र देवींची गाणी म्हणतात. कारण विचारल्यास ते असे सांगतात की, देवी विटाळ धरू देत नाही. शाक्तांत मांगिणीची पूजा आहे.

धुरपतामायच्या परंपरेत पोतराज-देवकरीण हे सर्वात जास्त मांग समाजातील असतात. विशेषतः पोतराज हा या परंपरेत मांग समाजातील सर्वाधिक दिसतात. तर देवकरीण आणि देवकरांचे सर्वाधिक प्रमाण हे मांग समाजानंतर भोई, कोळी, चर्मकार, माळी, बंजारा, मराठा, सालेवार आदी समाजात दिसते.'

याठिकाणी संत सोयराबाईंनी केलेल्या विटाळवरील अभंगांचीही आठवण येते. त्यांनी यातून केवळ उद्वेग व्यक्त केला नाही, तर जन्म उत्पत्तीचे स्थान यावर त्या म्हणतात-

**'देहासी विटाळ म्हणती सकळ, आत्मा तो निर्मळ शुद्धबुद्ध**
**देहीचा विटाळ देहीच जन्मला, सोवळा तो झाला कवणधर्म**
**विटाळा वाचोनी उत्पत्तीचे स्थान, कोण देह निर्माण नाही जगी'**

'शाक्त तंत्राने शिवाजी व संभाजी या पितापुत्रांना ब्राह्मणी धर्माविरुद्ध बंड करायची प्रेरणा दिली होती', असे पाटील सांगतात. (पृ. ११७) शिवाजी महाराजांनी ज्याप्रमाणे तंत्राचे केंद्रस्थान असलेल्या श्रीशैलला जाऊन दर्शन घेतले,( अनेक बौद्ध तांत्रिक ग्रंथातून श्रीशैलमचे 'केंद्रस्थान' म्हणून वर्णन आहे ) त्याचप्रमाणे त्यांनी आग्राहून सुटका झाल्यानंतर चंद्रपूरच्या महाकालीचे दर्शन घेतल्याचा उल्लेख एक्क्याण्णव कलमी बखरीत आहे. त्यांनी हे दर्शन गुप्तपणे घेतल्याचे बखरकार सांगतात. शिवाजी महाराजांचे हे दर्शन आणि त्याचे अनेक दस्तावेज अजूनही उजेडात आलेले नसले तरी बखरकारांची एक नोंद पुरेशी आहे. तसेच शिवाजी शाक्त साधक होते. त्यांचा शैलच्या प्रवरमुख्या महायोगिनींशी प्रतीकात्मक योग झाला असावा, असेही पाटील नमूद करतात.(पृ.१२३)

अरुणा ढेरे यांनी एक्क्याण्णव कलमी बखरीतील नोंद ऐतिहासिक प्रमाणांनी पुष्ट होत नसली तरी शक्यतेच्या कोटीत मात्र येतेच आहे, असे सांगत बखरकाराचा दाखला दिला आहे. त्या म्हणतात, 'बखरकार सांगतो की, आग्राहून सुटका झाल्यानंतर शिवछत्रपती मजल दरमजल करीत



महाराष्ट्रात पोचले ते विदर्भातून, चंद्रपूरच्या परिसरातून पुढे गेले. आणि जनश्रुती तर अशी आहे की, त्या वेळी छत्रपतींनी अत्यंत गुप्तपणे महाकालीचे दर्शनही घेतले.' (पृ. १९)

सतराव्या शतकात गोंड हे मोगलांचे अधिनस्त होते. त्या वेळी चंद्रपूरचा राजा असलेला मानजी बल्लाळ हा औरंगजेबाचा एकनिष्ठ असा मांडलिक होता. तरीही शिवाजी महाराजांनी चंद्रपुरातील महाकाली येथे असलेल्या शाक्त तांत्रिकांच्या जोरावर येऊन देवीचे दर्शन घेतले असावे आणि येथील तांत्रिकांना बळ दिले असावे.

पं. महादेशवशास्त्री जोशी म्हणतात, शक्तीची उपासना करणाऱ्यांना शाक्त व त्यांच्या धर्म-तत्त्वज्ञानाला शाक्तमत किंवा पंथ म्हणतात. या पंथात परमेश्वराची किंवा परमतत्त्वाची कल्पना स्त्रीरूपात केली जाते. या स्त्रीरूपाला ते शक्ती म्हणतात. दुर्गा, त्रिपुरसुंदरी, ललिता, महाभैरवी, आनंदभैरवी इत्यादी अनेक नावांनी ते शक्तीला संबोधितात. (पृ.२४१)

शाक्त पंथांची तीन प्रमुख केंद्रे आहेत. काश्मीर, कांची आणि कामाख्या. पहिली दोन ही श्रीविद्येच्या उपासनेची केंद्रे होती. कामाख्या हे कौलमताचे फार मोठे केंद्र होते व आजही इथल्या शाक्तांच्या उपासनेवर अनार्य तिबेटी तंत्रांचा विशेष प्रभाव असल्याचेही जोशी म्हणतात. (पृ.२४५)

हे तंत्र बौद्धांकडून हिंदूकडे आले असल्याचे 'साधनमालेत' बी. भट्टाचार्य यांनी प्रस्तावनेत म्हटले आहे. शरद् पाटील यांनी 'जातिव्यवस्थाक सामंती सेवकत्व' मध्ये तांत्रिकांच्या संदर्भात उलगडा केला आहे. रामेंद्रनाथ नंदी यांचा दाखला देत पाटील यांनी दहाव्या शतकापर्यंत बौद्ध, जैन, शैव व वैष्णव पंथांनी आपापले तंत्र साहित्य

रचल्याचे पाटील नमूद करतात. (पृ.९८) शरद् पाटील यांनी आपल्या 'दास-शूद्रांची गुलामगिरी' या खंडातील पहिल्या भागात शक्ति वा मातृदेवतेचे भक्त असलेल्या शाक्तांना त्यांचे धर्मग्रंथ कुलवृक्ष व कुलयोगिनींची पूजा करायचा आदेश देतात- 'अंथरूणातून उठल्याबरोबर शाक्ताने पार पाडायचा पहिला विधी म्हणजे कुलवृक्षांना ओम कुलवृक्षेभ्यो नमः या मंत्रांने वंदन करणे.'

कुलवृक्षाचा अर्थ होतो कुलदैवत, असेही पाटील यांनी नमूद केले आहे. तर दुसरीकडे 'जातिव्यवस्थाक सामंती सेवकत्व' या ग्रंथात पाटील तंत्रात कुलचा अर्थ स्त्री होतो, असे सांगतात. शक्तीला 'कुल' म्हटले आहे आणि शिवाला 'अकुल' म्हणजे स्त्री ही कुल व पुरुष हा अकुल. असे पाटील नमूद करतात. (पृ.१००)

तेलंगणाच्या नशिराबादजवळ मैलार नावाच्या ठिकाणी श्रीकोच्चर मैसेम्मा नावाचे देवस्थान आहे. हे देवस्थान म्हणजे सुमारे अर्ध्याहून अधिक एकर परिसरात पसरलेले प्राचीन वटवृक्ष आणि त्याच्या बुडाला शेंदूर लावलेला आकारहीन दगड आहे. नंतर शेजारी एक देवीची मूर्ती तयार करून ठेवण्यात आली आहे. येथे महाकाय असलेल्या वटवृक्षाची पूजा केली जाते. या वृक्षाने आजूबाजूला आपल्या फांद्या, पारंब्यांनी एक मोठा पसारा येथे निर्माण केला आहे.

या वटवृक्षाची पूजा आंध्र प्रदेश आणि तेलंगणातील माला, मादिगासह महाराष्ट्रातील मांग समाज मोठ्या प्रमाणात करतात. श्रीकोच्चरी देवी पोच्चर मैसम्माला म्हणजेच वटवृक्षाला आपले कुलदैवत मानतात. विशेष म्हणजे, शुक्रवारी आणि रविवारी या ठिकाणी कोंबडे, बकरे यांचा बळी देऊन त्याठिकाणी समूहभोजनाचे कार्यक्रम आयोजित केले जातात. अशीच पूजा ही देगलूरपासून जवळ असलेल्या होट्टल येथे भवानी मंदिरासमोर आकारहीन दगडाची केली जाते. येथेही रविवार, शुक्रवारी मोठ्या प्रमाणात समूह भोजनासाठी कोंबड्या बकऱ्यांचा बळी दिला जातो. भवानीसोबत येथेही असलेल्या वृक्षाला कुलदैवत म्हणून महिला पूजा करतात.

पोतराजाचा शाक्तांशी संबंध हा कानसवारणीच्या कार्यक्रमातूनही स्पष्ट होतो. नवीन दीक्षा घेण्यापूर्वी पोतराजाची कानसरावणी केली जाते, त्याला कान फुंकणे असेही म्हणतात. येथेही देवीसमोरील पूजेप्रमाणे धुपारती होते.

या वेळी पुजेचे सर्व साहित्य तयार करून मोठ्या जल्लोषात स्मशान भूमीत जातात. तिथे देवीला तयार करण्यात आलेल्या सर्व नैवद्याप्रमाणेच सर्व नैवद्य, बोणे, भात, आरतीत दिवे लावून ठेवतात. ज्येष्ठ पोतराज अथवा गुरू यावेळी धुपारती म्हणतो, आपल्या पूर्वजांना, दैत्यांना, आठवण



करून त्याला उठवण्यासाठी हाक देतो. धुपारती होताच त्या ठिकाणी गुरूंच्या अंगात वारे येते. स्मशानातील सर्व पूजा आटोपल्यानंतर सोबत आणलेले सर्व नैवद्य बारीक कुसकरून सर्व परिसरात शिंपडले जाते. त्यानंतर मरिआईच्या मंदिरात जाऊन पूजा, धुपारती केली जाते. तिथे कानसवारणी झाल्यास नवीन शिष्याच्या अंगात वारे येते.

अरुणा ढेरे 'हिराई, स्मरणिका-२०१२' मध्ये म्हणतात, शाक्तांच्या उपासनेतील काली ही एक गूढ देवता आहे. (पृ.१७) तंत्रवाङ्मयात ती शिवसान्निध्याचे फारसे महत्त्व राखणारी देवी नाही. त्यात या देवीची अनेक रूपे कल्पिली आहेत. पूर्णशक्ती, अंशरूपिणी शक्ती, कलारूपिणी शक्ती आणि कलांशरूपिणी शक्ती अशा स्तरावर शक्तीच्या अवतरणाची कल्पना शाक्तांनी केली आहे आणि मानवी स्त्री त्यांच्यासाठी सर्वात पहिल्या, प्राथमिक स्तरावर कलांशरूपिणी शक्ती म्हणून पूर्णशक्तीकडे घेऊन जाण्याचे साधन ठरली आहे. तर एका तांत्रिक वर्गीकरणानुसार पूर्णशक्तीकडे घेऊन जाणाऱ्या दहा महाविद्यांमध्ये काली प्रथम आहे आणि तारा द्वितीय आहे. ढेरे म्हणतात, दुर्गा, काली, महादेवी, उमा, गौरी, लक्ष्मी, चंडी, सरस्वती आणि चामुंडा या शाक्त संप्रदायात विविध लक्षणयुक्त अशी एकाच महाशक्तीची भिन्न रूपे आहेत. (पृ.१६)

'महाकाली, कालीला विविध नावाने ओळखले जात असले तरी

प्रामुख्याने काली माता हे नदीदेवतेचे नाव आहे.' नदीकन्या म्हणूनही उल्लेख केला जातो. व्यासांच्या आईचे नावही काली होते. कालिकापुराणात तिचा महामायेच्या कुशीतून जन्म झाल्याची सांगण्यात आले आहे. ज्येष्ठ संशोधक डॉ. रघुनाथ बोरकर यांनी 'महाकाली चंद्रपूरची' या शोधग्रंथात महाकाली देवीची प्राचीनता आणि उत्पत्ती या प्रकरणात सविस्तर उलगडा केला आहे. कालीचे आध्यात्मिक तत्त्व-मंत्रशास्त्रात कसे विशद केलेले आहे, ते बोरकर यांनी अत्यंत प्रभावीपणे मांडले आहे,(पृ.११) ते अत्यंत महत्त्वाचे आहे. शाक्त, तांत्रिकांच्या संदर्भात कालीचा उल्लेख करताना जे गैरसमज करण्यात आले आहेत, त्यासाठी बोरकरांनी महत्त्वाचा भाग उजेडात आणून अनेक संकल्पांना छेद दिला आहे. शरद् पाटील यांनी ब्राह्मणी तंत्राने अब्राह्मणी तंत्राला बदनाम केल्याचे सप्रमाण दाखवले आहे. बोरकरांनीही त्यांच्या शैलीत काही दाखले देत शाक्तांची देवता असलेल्या महिषासूरमर्दिनीच्या प्रतिकातील अर्थ आणि त्याचा उलगडा असा केला आहे -

''महाकालीच्या एका हातात नुकतेच तोडलेले मुंड असून त्यातून रक्तबिंदू ठिबकत आहेत. हे मुंड मोहपुरुषांचे आहे. कालीने महिषासूर मारला, त्याला तात्विक अर्थ तिने अज्ञान किंवा मोह याचे मस्तक तोडले असा होतो. विद्या व अविद्या याच्या क्रियांमुळे सृष्टीचा संकोच व विकास होत राहतो. जीवनाचे प्रमुख उद्दिष्ट ब्रह्मप्राप्ती हे ठरलेले आहे. अविद्या ही त्या उद्दिष्टाला बाधक होते. म्हणून साधकांना आत्मदर्शन होण्यासाठी किंवा महानंद प्राप्त होण्यासाठी मोहपुरुषाचा शिरच्छेद होणे आवश्यक असते. शिरातून रक्तबिंदू ठिबकणे हे क्रियाशीलतेचे द्योतक आहे. काली ही स्मशानात नृत्य करते. वासनाविभमुक्त अतएव जीवनमुक्त साधक यांचे हृदय म्हणजेच स्मशान होय. त्या साधकांच्या कर्मबंधाचे प्रतीक म्हणून शवांचे हात तोडून तिने आपल्या बाजूभोवती त्याची मेखला केली आहे. काली हीच वेदान्त्यांची निर्विकल्प समाधी, बौद्धांची शून्यता, शाक्त व वैष्णव यांची समरसता व जैनाची केवलावस्था होय.'' बोरकर पुढे म्हणतात की, 'कालीच्या गळ्यात मुंडमाला आहे, ही शब्दब्रह्माची प्रतीक अशी वर्णमाला होय. 'कर्पूरादिस्तोत्रा'त ही कल्पना मांडलेली आहे. निरुत्तरतंत्रात या मालेतील मुंडे ५० असल्याचे सांगितले आहे.'

महाकाली, काली, चामुंडा आणि रेणुका आदी देवींच्या संदर्भात ज्या काही कथा आणि रचना करून ठेवण्यात आल्या आहेत, त्याकडे या दृष्टीने पाहिल्यास महाकाली, कालीचे मूळ लक्षात येण्यास मदत होऊ शकते. ते म्हणतात, मातृदेवतांच्या मूर्ती या भारतात इ. स. पूर्व २५०० पासूनच्या मिळतात.

शक्तिपूजा फार प्राचीन काळापासून स्वतंत्र तऱ्हेने उत्पन्न होऊन चालत आली आहे. अशाच शक्तिपूजेत महालक्ष्मीस एक अन्योन्य असे महत्त्व आहे. महालक्ष्मीचे शिव व विष्णू या दोघांशी नाते सांगितले आहे. शाक्त संप्रदायात तर शक्ती हेच जगाचे आदीकारण ठरवून तिला महाकाली म्हटले व तिजपासून जग उत्पन्न करून दाखविले आहे. तर महाकाली ही दशमहाविद्यांपैकी पहिली आहे. म्हणूनच तिला प्रथमाशक्ती किंवा आद्यशक्ती असेही म्हणतात. महाकालीचे दक्षिणकाली, भद्रकाली, गुरूकाली, कामकलाकाली, धनकालिका, सिद्धीकाली, चंडकालिका इत्यादी नऊ भेद तंत्रवाङ्मयात सांगितल्याचे बोरकर नमूद करतात. (पृ.११)

संबळपूर विद्यापीठातील इतिहास विभागाच्या प्राध्यापिका तरंगिनी पटेल आपल्या 'बुद्धिजम इन साऊथ कोसला' या शोधग्रंथातील 'दक्षिण कोसलातील लोककथा' प्रकरणात पर्णसबारी ही तांत्रिकांची देवता असल्याचे म्हणतात. बौद्ध देवी पर्णसाबरी हिची पूजा सीतला देवी म्हणूनही केली जाते. ती सर्व प्रकारच्या कॉलरा, प्लेग आणि साथीसह इतर महामारी, आजार आदी आपल्यावरील संकटे दूर करते. तिला ओरिसात सीतला आणि पतरसौरुनी नावाने ओळखली जाते. तिला अनेक ठिकाण तीन मुखे दिसतात. त्यात प्रत्येकी तीन डोळा, सहा हात दाखविले जातात. तर दूसरीकडे ओरिसात चामुंडा देवीची तांत्रिकांची देवी म्हणून पूजाकेली जाते. चामुंडा ही देवी बौद्ध देवता चर्चिकाचे दुसरे रूप आहे. ओरिसातील तंत्रपीठांमधून हे प्रकर्षाने दिसून येत असल्याचे पटेल आपल्या शोधगंथात म्हणतात. (पृ.२७९)

आचार्य रजनीश ओशो काली संदर्भात सांगतात की, काली ही मृत्यू आणि आई या दोन्हींचे एकच प्रतीक आहे. तशीच ती आईसारखी सुंदर स्त्रीही आहे. दुसरीकडे ती आपल्या गळ्यात नर मुंडमाला घातलेली मृत्यूचीही देवता आहे. कालीला इतक्या अकराळ-विकराळ रूपात का

चित्रीत करण्यात आले, असतानाही तिला आईचे रूप दिले का जाते. तिच्या या प्रतिमेचे चित्र पाहून पाश्चिमात्य देशातील विचारवंत चकित होतात. जिच्यापासून जन्म आणि तिच्यापासूनच मृत्यूचीही सुरुवात होते. तिने जन्मच नाही तर मृत्यूही दिला आहे. तिच्या हातात नुकतेच कापलेले नरमुंड असून त्यातून रक्त गळत आहे. आणि तिने आपल्या पायाखाली आपल्या पतीला धरले आहे. काली म्हणजे जीवन आणि मृत्यूही या दोन्हीही एकाच नाण्याच्या बाजू असलेली एक प्रतीक आहे. कालीची प्रतिमा, तिचे प्रतीक जगात दुसऱ्या कोणाला ओळखता आले नसल्याचेही आचार्य रजनीश म्हणतात.

'संतश्रेष्ठ तुकाराम महाराज यांच्या शिष्या संत बहिणाबाई आणि त्यांच्या शाक्त घराण्यांचा या शाक्तपीठाचा मोठा संबंध आला होता. शरद् पाटील म्हणतात, बहिणाबाई तुकोबांपाशी भक्तिपंथ शिकत होती, तर तुकोबा तिच्यापासून शाक्तधर्म. बहिणाबाई या शाक्त घराण्यातील असल्याने त्या वारकरी पंथात कायम बहिष्कृत राहिल्या असल्याचे नमूद करतात. अजूनही त्यांचे अभंग काही वारकरी गाण्याचे धाडस करत नाहीत. शाक्तांचे घराणेच बहिणाबाईंचे असल्याने ब्राह्मण जातीतील असूनही एका शूद्र जातीच्या संताला गुरू मानण्यास त्यांना गैर वाटले नाही.'

**'बहिणी म्हणे येती सुखाचे हेलावे,**
**जाणती अनुभवे जाणने जे'**

आणि

**'कलियुगी बौद्धरूप धरी हरी!**
**तुकोबा शरीरी प्रवेशला!!'**

असे त्या आपल्या अभंगातून आपल्या गुरूबद्दल भाव व्यक्त करतात. 'शाक्तांच्या प्रभावामुळेच तुकारामांनी अश्वघोषांच्या 'वज्रसूची' या वर्णजातविरोधी संस्कृत काव्याचा मराठी अनुवाद करायचे काम बहिणाबाईंवर सोपवल्याचे शरद् पाटील सांगतात.' शाक्त संत व संतश्रेष्ठ तुकाराम महाराजांच्या शिष्या बहिणाबाई या मराठवाड्यातील आपल्या सासर आणि माहेराला सोडून थेट शिखर शिंगणापूरच्या महादेवाला आल्या होत्या. तो दिवसही चैत्र पौर्णिमेचा होता.

**चैत्र पौर्णिमेस गेलो महादेवा।**
**देवयात्रा सर्वा पाहाविले।।**
**जालें समाधान देखोनि शंकर।**
**मागे उभयकर भक्तियोगें ।।२।।**

आषाढी वारी ही शिखर शिंगणापूरच्या पायथ्याजवळ असलेल्या नात्यापुत्याकडे वळते, तेव्हा वारकरी तुकोबांच्या कावडीचे आणि बहिणाबाईच्या 'चैत्र पौर्णिमेस गेलो महादेवा' हे अभंग म्हणतात. (पृ.२१)

धुरपतामायची परंपरा ही वैदिकांच्या विरोधात समान पातळीवर चालत आली असली तरी ती प्रामुख्याने मौखिक परंपरेवर भर देणारी होती. एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे आणि एका पोतराज-देवकरीण यांच्याकडून त्यांच्या पुढील शिष्यांकडे प्रवाहित होत राहिली. या परंपरेचे वाहक, उपासक हे शूद्र,अतिशूद्र समाजातील असल्याने त्यांच्याकडून कोणत्या नोंदी अथवा साहित्य संग्रहित होऊ शकले नाही. तरीही हजारो वर्षांपासून ज्या निसर्गमायेचा, कृषिमायेचा जयघोष त्या आपल्या गाण्यातून, कवनातून, आरतीतून पिढ्यान्‌पिढ्या वारसा जतन केला आणि तो वैदिकांच्या अनेक आक्रमणानंतरही टिकवून ठेवला. त्यावरून ही परंपरा शाक्त तांत्रिकाचा वारसा सांगणारी होती, असे म्हणता येईल.

विशेषतः शाक्त तांत्रिकांची ही शक्तिपीठे मांग वस्तीतून चालवली जात होती. यामुळेच धुरपतामायची परंपरा ही पुढे नेण्यासाठी मांग समाजातून जन्माला आलेला मुलगा हा पोतराज म्हणून देवीला सोडला जायचा. म्हणजेच त्या परंपरेचे वाहक बनून पूर्णवेळ सेवक बनविले जात होते. अजूनही याच समाजाने ही मातृपरंपरा चालविण्यासाठी इतकी उदारता जपली आहे. शिक्षणाचे प्रमाण वाढत असले तरी अनेक कुटुंबांमध्ये धुरपतामायचा पोतराज हा मांग समाजातूनच सोडलेला दिसतो.

शिवकाळापर्यंत चंद्रपूर हे योगिनीचे शाक्त, तांत्रिकांचे आध्यात्मिक केंद्र असावे. म्हणूनच नांदेड, परभणीपासून सुमारे साडेतीनशे किमीहून अधिक अंतर कापून, डोंगरदऱ्यातून रस्ता काढून चंद्रपूरला पायी येण्याचा अट्टहास देवकरीण, पोतराज यांनी केला असावा. नांदेड जिल्ह्यातील राजामाय देवकरीण हिने चंद्रपूरच्या यात्रेची सुरुवात केली, असे म्हटले

जात असले तरी त्यापूर्वीच्या असंख्य आणि अनाम अशा योगिनींनी हा मार्ग सुकर करून ठेवला असावा. यामुळेच राजामाय आणि इतर देवकरीण त्या सहजपणे त्या मार्गावर येऊन पोहोचू शकल्या.

**बाई संबूच्या शिखरी, दवणं खात्यात पाखरं,**
**संबूची गिरीजा नारं, टाकी मुंगीला साखरं वं...**
**महादेवाच्या वाटेनं, हायत खारकाचे घोसं,**
**हायत खारकाचे घोसं वं, कावड्याला एकादसं वं, धुरपतामाय**
**तेल्याच्या कावडीला हायत, तांबियाचे घडं,**
**धाव धाव महादेवा, मुंगी घाट हा उघड गं...**
**बाई तेल्याची कावडं, मुंगी घाटाला तटली,**
**गिरीजा संबूची उठली, डाव्या हातानं लोटली वं, धुरपतामाय**
**बाई संबू देव म्हणी, गिरीजा नंदीचाही केला,**
**गेले होते माहेराला, निरव वांगीत राहिला वं, धुरपतामाय**
**गोड मोटचं वं पाणी, शिंगणापूरीच्या तळ्याला,**
**गिरीजा बोलती माळ्याला, दवणा आलाय कळ्याला**
**वं, धुरपतामाय**
**बाई संबू म्हणू संबू हाका मारीतेत...**

अशा प्रकारची असंख्य गाणी ही धुरपतामायच्या परंपरेचे मूळ नाते हे शाक्त तांत्रिकांशी असल्याचे दाखवून देत असतात.

**संदर्भ :**

१. शिखर शिंगणापूरचा श्रीशंभू महादेव : रा. चि. ढेरे पृ. २०, २१.
२. गांव-गाडा : त्र्यंबक नारायण अत्रे, (१९१५) पृ. २४०.
३. महाकाली चंद्रपूरची : डॉ. रघुनाथ बोरकर, पृ. ७, ११.
४. चंद्रपूर-गडचिरोली जिल्ह्याचे पुरातत्त्व : डॉ. रघुनाथ बोरकर, पृ. १७२, १७४, १९९.
५. शिवाजीच्या हिंदवी स्वराज्याचे खरे शत्रू कोण : महमंदी की ब्राह्मणी? : प्राच्यविद्यापंडित शरद् पाटील, पृ. ७४, ७८, ११७, १२३, १५५, १५६.
६. महालक्ष्मी मंदिर कोल्हापूर एक सांस्कृतिक अध्ययन : अरविंद जामखेडकर, पृ. २३८, २५४, २५५.

७. हिराई, स्मरणिका-२०१२, : अरुणा ढेरे, पृ. १५, १७, १८.
८. जातिव्यवस्थाक सामंती सेवकत्व : शरद् पाटील पृ. ८, ७४, १००, १०५, १०६, १६०.
९. बुद्धिजम इन साऊथ कोसला : तरंगिनी पटेल, पृ. २७९.
१०. गाणी : जलसामाय कदम, थडी पिंपळगाव, ता. सोनपेठ, जि. परभणी.
११. आचार्य रजनीश यांच्या काली याविषयावरील भाषणातील माहिती.
१२. कानसवारणीची माहिती : धुराजी कांबळे, पोतराज, पाथरी, जि. परभणी.

***



# ५

# धुरपतामाय आणि देवी हरिती

'देवी हरितीवरील एक लेख मी २००९ मध्ये लिहिला होता. हा लेख खूपच प्राथमिक स्तरावरील आणि ढोबळ स्वरूपाचा होता. हिवाळी अधिवेशनाच्या निमित्ताने एकदा नागपूरहून चंद्रपूरला गेलो असता मला धुरपतामाय आणि देवी हरितीच्या मातृपरंपरेचे साम्य लक्षात आले. 'धुरपतामायचे मूळ मंदिर हे एक शैलगृहे असल्याचे बारकाईने पाहिल्यास लक्षात आले. धुरपतामायच्या ओटीत नवीन मूल टाकले जाते. हरितीचे शिल्प पाहिल्यास तिच्या अंगाखांद्यावर मुले दिसतात. धुरपतामायचे मूळ शिल्प हे ओबडधोबड असले तरी तिच्याही अंगाखांद्यावर मुलेच असली पाहिजेत. काही संशोधकांनी ती एका हातात खड्ग घेऊन उभी असल्याचा अंदाज व्यक्त केला असला तरी मौखिक परंपरेतील गाण्यातून तसा कुठेही उल्लेख मिळत नाही. त्यामुळे धुरपतामाय आणि हरिती देवी ही या भूमाता एकाच परंपरेतील मातृदेवता असाव्यात.'

महाकाली मंदिराच्या मुख्य प्रवेशद्वारासमोर काही शिल्प दिसतात, तेथून भुयाराचा मार्ग जातो. त्या शिल्पाची बरीच झीज झाली आहे. अलीकडे त्याजवळ पादुका ठेवण्यात आल्याने त्याकडे दुर्लक्ष होते. ते शिल्प निरूखून पाहिल्यास हरितीसारख्या मातृ शिल्पाची प्रतिकृती दिसते. धुरपतामायच्या मूळ शिल्पातही अनेक बाबींचे साम्य आढळते. शिवाय देवी हरितीची आणि धुरपतामायची परंपरा सारखीच दिसते.

'नेपाळमधील बुद्धनाथ स्तुपाजवळ असलेल्या मंदिरात हरितीचीही मूळ मूर्ती आहे. येथेही दलित, आदिवासी, भटके विमुक्त तिला आपली भूमाता म्हणून पूजा करताना दिसतात.' विशेष म्हणजे ज्याप्रमाणे मरिआई, पोचीमाय आणि धुरपतामायला सुखसमृद्धी आणि आरोग्यासाठी याचना केली जाते तसेच पाकिस्तानातील गांधार परिसरात आणि नेपाळमध्ये असलेल्या हरितीपुढे याचना केल्या जातात.

महामारीसारख्या अनेक संकट आणि आजारांमधून मरिआई, धुरपतामाय ही आपले रक्षण करते, तसेच हरितीच्या बाबतीत आहे. नेपाळमधील बौद्ध साहित्यात त्याचे अनेक दाखले मिळतात. बौद्ध विहारांमध्ये तिची रोज पूजाही केली जाते. गांधार परिसरात असलेल्या हरितीपुढे आमच्या मुलांचे रक्षण कर म्हणून तिच्या पुढे आजूबाजूच्या परिसरात ताईत बांधण्याची परंपरा आहे. 'देवकरीणप्रमाणे तिची परंपरा मुस्लीम समाजातील महिलाही चालवतात. योगिनी म्हणून ओळख बनलेल्या बीबी सय्यदा हिच्या समाधीस्थळाचे यासाठी उदाहरण देता येईल.'

नेपाळमध्ये बौद्ध स्तूपांसोबत चौरस्त्यावर हरितीची मंदिरे दिसून येतात. तिची मातृपरंपरा जतन करण्याचे काम तेथील बहुजनसमाजातील महिलांनी केलेले आहे. हरितीची मंदिरे नेपाळमध्ये ज्या परिसरात आहेत, त्या परिसरात 'लखा' नावाचे पारंपरिक लोकनृत्य आणि त्याचे कार्यक्रम होतात. त्यात धुरपतामायच्या पोतराजाप्रमाणेच लखा नावाचे पोतराज नृत्य करतात. त्यांच्या हातात चाबूक नसतो. चेहऱ्यावर देवीचे मुखवटे लावले जातात. कंबरेला आभरान, पायात आणि कंबरेला घुंगरे लावलेली असतात. त्यांचे लोकनृत्य हे एखाद्या संघर्ष आणि युद्धाप्रमाणे असते. पोतराजांप्रमाणेच महिला येथे मुखवटा घातलेल्या पोतराजाला सुपात

भरून धान्य, अन्न, नैवद्य आणून त्याची पूजा करतात.

ज्याप्रमाणे मरिआई, धुरपतामायला भूमाता, जगतजननी, सर्व प्राणीमात्रावर दया करणारी, रक्षण करणारी म्हटले जाते, तशीच शेकडो लोकगीते ही नेपाळमधील महिला लोकगीतांमधून म्हणतात. तिची आरती, महती गातात. नेपाळमधील शेतकरी, कष्टकरी समाज या देवीची पूजा करतात. नेपाळच्या ग्रामीण भागात खूप मोठ्या प्रमाणात देवी हरितीची मंदिरे असून तिला आपली रक्षणकर्ती म्हणून धुरपतामायसारखीच पूजा-अर्चा केली जाते.

## देवी हरिती

भारतीय वैदिक आणि अवैदिक परंपरेत स्त्रियांच्या सत्तासंघर्षांवर अनेक कालखंड व्यापलेले आहेत. शेतीचा शोध लावण्यापासून ते वेदांची निर्मिती करण्यापर्यंत अनेक स्त्रियांनी महत्त्वाची भूमिका बजावल्याचे पुरावे वैदिकशास्त्रात मिळतात. देशातील अनेक महत्त्वाच्या प्राच्यविद्यापंडितांनी हजारो वर्षांपासून स्त्रियांनी केलेल्या विविध योगदानाची उकल करण्याचा प्रयत्न केला आहे. निर्ऋती, हरिती,



पद्मावती, सीता, द्रौपदी, शूर्पणखा, ताटिका आदी अत्यंत प्रभावशाली आणि गौरवशाली स्त्रिया भारतीय भूमीला लाभल्या. वैदिक इतिहासकारांनी या प्रभावशाली स्त्रियांचा इतिहास लिहिताना किंवा त्यांची नव्याने मांडणी करताना वैदिकीसाचा कायम ठेवल्याने त्यांचा खरा इतिहास भारतीय समाजात रुजू शकला नाही. परंतु याबाबत पुरातन संशोधक डी. डी. कोसंबी, शरद् पाटील, डॉ. आ. ह. साळुंखे आदी अनेक संशोधकांनी ऐतिहासिक सत्य बाहेर आणून त्याची नव्याने मांडणी केली.

यात शरद् पाटील यांचे नाव अग्रक्रमाने घेणे क्रमप्राप्त ठरते. पाटलांनी

त्यांच्या 'दास-शूद्रांची गुलामगिरी'-भाग-१ आणि भाग-२ मध्ये भारतीय इतिहासात दुर्लक्षित करण्यात आलेल्या हरिती, निर्ऋती या प्रभावशाली मातृदेवतांवर अत्यंत महत्त्वाचे शोध पुढे आणले आहेत. त्यामुळे आपल्या देशातील पुरातन काळातल्या या मातृदेवतांवर नव्याने विचार सुरू झाले आहेत. यातील हरितीदेवीबाबत पाटील म्हणतात, 'त्या वेळी जगातील सर्वात प्रगत असलेल्या नालंदा विद्यापीठाच्या प्रवेशद्वाराजवळ हरितीदेवीची प्रचंड मोठी मूर्ती स्थापलेली होती. या विद्यापीठात प्रवेश करणारा बौद्ध भिक्खू, प्रशिक्षक, विद्यार्थी आणि इतर कोणीही प्रवेश करण्यापूर्वी हरिती देवीची पूजा-अर्चा करीत आणि नंतर पुढे विद्यापीठात जात.' असाच उल्लेख भारतातील पहिले चिनी प्रवासी फा हियान यांनी आपल्या प्रवास वर्णनात तक्षशिला विद्यापीठाच्या बाबतीत केला आहे. या विद्यापीठाच्या प्रवेशद्वाराजवळही देवी हरितीची भव्य प्रतिमा होती. भिक्खू, विद्यार्थी तिथे या देवीची पूजा-अर्चा केल्यानंतरच ते पुढे जात असल्याचे या चिनी प्रवाशाने म्हटले आहे.

'भारतातील पुरातन इतिहासावर वैदिकी परंपरेचा पगडा असल्याने आणि इसवी सनाच्या दुसऱ्या शतकानंतर भारतावर वैदिक परंपरेने केलेल्या आक्रमणामुळे बौद्ध धर्माचे मोठ्याप्रमाणात नुकसान झाले. नालंदा, तक्षशीला आदी प्राचीन विद्यापीठे, लाखो बौद्ध लेण्या आणि स्तुप सुरुवातीला वैदिकांनी नंतर यवनांनी नष्ट केले. नालंदा विद्यापीठाबाबत चीनी प्रवाशांनी केलेल्या उल्लेखावरून हे विद्यापीठ त्यातील विविध विषयावरील शिक्षण, संशोधन आणि त्याच्या शिल्पकला, बौद्ध परंपरा, ज्ञानविज्ञान, तंत्रज्ञान, संशोधन, चिकित्सा आदी विषयासंदर्भात परमोच्च शिखरावर पोहोचले होते. 'जीवक नावाच्या शल्यचिकित्सकाने त्या वेळी मेंदूची शल्यचिकित्सा केल्याचे उल्लेख लक्षात घेता यावेळी चिकित्साशास्त्रही मोठ्या प्रमाणात विकसित झाल्याचे असावे.' परंतु, भारतात त्यानंतर आलेल्या धार्मिक आक्रमणांमुळे हे सर्व नष्ट झाल्याने देश पुन्हा एकदा या क्षेत्रात मागास अवस्थेकडे गेला. ज्ञान-विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या विकासाबाबत जगात शिखरावर पोहोचलेला आपला देश कर्मकांड आदी रूढी, परंपरेने निर्माण केलेल्या गुलामगिरीत रुतला. यामुळे कालांतराने आपल्या देशातील लोकांना नालंदा, तक्षशिलांचे

ऐतिहासिक योगदान कळू शकले नाही. त्यामुळे हरितीसारख्या देवी कळणेही अवघड होते. शरद् पाटलांनी केलेल्या आयुष्यभरातील संशोधनामुळे हरितीचा इतिहास, वारसा हा नव्याने पुढे आला आहे.'

'वैदिक पुराणकथेत हरितीचा उल्लेख अनेक ठिकाणी ती एक राक्षसवृत्तीची आणि राक्षसाची आई असल्याचे उल्लेख आहेत. ती बौद्ध देवी बनण्यापूर्वी ती अनेक लहान मुले पळवीत असे, एका प्रसंगी ती मूल पळवीत असताना तथागताने ते एक मूल लपवून ठेवले आणि त्यानंतर तिला मातृत्व काय असते हे कळले आणि पुढे ती मुलांचे संगोपन करणारी 'आई' म्हणून प्रसिद्ध झाल्याचे वैदिक पुराणशास्त्रात उल्लेख आहेत.' तिला कुठे महादेवी, लक्ष्मी, धनाची देवी, भारतीय ब्रह्म देवीही म्हटले आहे. मात्र जगातील सर्वात प्राचीन विद्यापीठे असलेल्या नालंदा आणि तक्षशिला विद्यापीठाच्या प्रवेशद्वारात तिची भव्य मूर्ती उभी होती. या विद्यापीठात कोणताही बौद्ध भिक्खू, विद्यार्थी प्रवेश करण्यापूर्वी तिची पूजा-अर्चा करूनच तो पुढे जात असे. 'बौद्ध धम्मात अनन्यसाधारण महत्त्व असलेल्या या देवी हरितीबाबत आपल्या देशात काही क्वचित ठिकाणी उल्लेख आणि शिल्प मिळत असले तरी बौद्ध धम्म जिथे जिथे रुजला होता, त्या-त्या देशांमध्ये अजूनही हरितीबाबत पुरावे मिळतात. 'हारितीचा मुलगा हारीत हा पहिला अब्राह्मणी तत्त्वज्ञानी असल्याचे शरद् पाटील सांगतात.' त्याचे तत्त्वज्ञान वैदिकांनी नंतर नष्ट केले असले तरी हारीतची विचारधारा त्यांना नष्ट करता आली नाही, असेही पाटील नमूद करतात. जापानी बौद्ध साहित्यात तिला मुलांची रक्षणकर्ती म्हणून ओळखले जाते. ती पांचिकाची पत्नी म्हणूनही तिथे ओळखली जाते. जापानमध्ये तिला करितैइमो व करितई नावाने संबोधले जाते.'

जापानमधील अनेक बौद्ध मंदिरात हिची रक्षणकर्ती देवी म्हणूनच पूजा-अर्चा केली जाते. या देवीसोबत सतत दहा राक्षसी महिला ज्या कोणतेही संकट दूर करतात, त्यासोबत असल्याचाही समज आहे. जापानी सूत्र लोटसच्या २६ व्या अध्यायात या देवीची सविस्तर माहिती आली आहे. जपानमध्ये बौद्ध धम्माचा प्रसार झाला तेव्हापासून तिचा इतिहास बहुतांश जापानी बौद्ध ग्रंथात आलेला आहे.

जपानच्या हियान काळात तिची काही शिल्प आणि चित्रे तयार



करण्यात आली असून, राजवंशातील एका महाराणीप्रमाणे वस्त्र परिधान केले आहेत. डाव्या हातात अंगूरासारखे फळ, उजव्या हातात एका लहान मुलाला आपल्या कुशीत घेऊन बसलेली आहे. तिच्या शेजारी तीन ते नऊ मुले खेळताना दिसताहेत. अशा प्रकारची अनेक शिल्पचित्रे, लाकडी मूर्ती व चित्रे जापानी साहित्यात दिसून येतात.

जपानमध्ये किचिजौटेन तर कधी करितेइमोची ती बहीणही असल्याचे मानले जाते. तर तिला कधी सम्राटच्या रूपातही पाहिले जाते. तक्षशिला विद्यापीठ आजच्या पाकिस्तानात होते. 'पुरुषपूर म्हणजेच आजच्या पेशावर परिसराला पूर्वी गांधारचा प्रदेश म्हणून ओळखले जात. या आजचा चारसद्दा जिल्हा याच परिसरात आहे. पहिल्या शतकाच्या दरम्यान पेशावरचे नाव बौद्ध काळात पुरुषपूर होते. तसे चारसद्दाच्या शहराला पुष्कलावती नावाने ओळखले जात होते. या परिसरात बौद्ध धम्माचा खुप मोठा प्रभाव होता.'

समय जातकातील उल्लेखावरून येथे जगातील सर्वांत मोठा स्तूप बांधण्यात आला होता. येथे देवी हरिती आणि पांचिका यांचे काही शिल्प होते. चारसद्दा येथील घनी धेरी परिसरात पुष्कलावतीच्या नावाने पुरातत्त्व विभागाची एक इमारत आहे. 'प्रा. अहसान अली यांनी १९९३ साली प्रकाशित केलेल्या आपल्या संशोधनाच्या अनेक पुस्तकात ते येथे अत्यंत भव्य अशी शेकडो बौद्ध स्तूप होते, असे नमूद करतात. हाच परिसर आशिया खंडातील प्रवेशद्वार म्हणून ओळखला जात होता. यामुळे इथून आशिया खंडातील इतर देशात बौद्ध धम्माचा प्रसार झाल्याचेही दाखले

मिळतात. त्या काळात ही एक मोठी बाजारपेठ आणि धम्मपीठ होते. इ. सनाच्या दुसऱ्या आणि तिसऱ्या शतकात अनेक बौद्ध राजांनी हा परिसर विकसित केला होता. यात राजा कनिष्क, महान कुषाण आदी राजांनी पुरुषपूरवर राज्य केले होते.'

चारसद्दाच्या परिसरातील अनेक स्तुपात देवी हरिती आणि पांचिकाची अनेक शिल्पचित्रे आणि त्यांचे छायाचित्रे प्रा. अहसान अली यांनी संग्रहित केली आहेत. या परिसरात हरितीच्या नावे अपभ्रंश झालेल्या गावांची नावे आढळून येतात. याच परिसरात देवी हरिती आणि पांचिकाचा जन्म झाला असावा असा अली यांनी अंदाज व्यक्त केलाय. त्या वेळी गांधार परिसरात हरितीला मातृत्वाचे अत्यंत श्रेष्ठ उदाहरण म्हणून या देवीकडे पाहिले जायचे. पांचिका आणि हरितीला सुमारे पाचशे मुले असल्याच्या लोककथाही येथील काही पुराणकथातून दिसून येतात.

'तथागत राजगृहात थांबले असता हरिती त्यांच्या संपर्कात आली आणि तिला देवत्व प्राप्त झाले. ती बौद्ध धम्माची देवी बनली' गांधार परिसरात हरिती आणि पांचिकांच्या अत्यंत सुंदर आणि कलाकुसर असलेल्या मूर्ती आहेत. गांधार कला म्हणून जगप्रसिद्ध असलेल्या अनेक शिल्पकलांची ही उत्कृष्ट उदाहरणे आहेत. अनेक ठिकाणी प्राकृत भाषेत हरितीबाबत माहिती देणारे शिलालेख आजही या परिसरात आढळून येतात. पाकिस्तानी पंतप्रधान कार्यालयाच्या अखत्यारित येणाऱ्या पेशावर येथील संग्रहालयात चार हात असलेली आणि एका हातात रक्षणासाठी त्रिशूल घेतलेली १२२ सेंमी उंच असलेली उभी हरितीची मूर्ती आहे. तिच्या डोक्याच्या मागे तेजोवलय असून एका हातात तिने त्रिशूल घेतला आहे. तिचे वस्त्र अंगाला चिकटलेले असून शरीरयष्टी भारदस्त आहे. तिच्या छातीवरून साडीच्या पदरासारखे एक वस्त्र खांद्यापासून ते खालपर्यंत पसरले आहे.  तिचे केस बांधलेले असून डोक्यावर पिंपळाच्या पानाने सजवलेला मुकूट आहे. डाव्या व उजव्या हाताच्या दंडाला दंडकडे असून गळ्यात अत्यंत नक्षीदार अशी मोत्यांची आणि त्यात रत्ने जडलेली माळ आहे. शिवाय यासोबतच तिच्या गळ्यात एक मोठ्या धाग्याची माळ आहे. गांधारमध्ये बौद्ध धम्माचा पाडाव झाल्यानंतर तिला आगाऊ हात जोडले असल्याचे काही संशोधकाना वाटते. तर ती मूर्तीच मुळतः तशीच

असावी असे काहींचे मत आहे. 'स्वात परिसरात तिसऱ्या शतकातील हरिती पद्मासनात विराजमान झालेली मूर्ती आहे. साधारणपणे हिची उंची १७ सेमीची असून ती तिसऱ्या शतकात तयार केली असावी. तिच्या शेजारी पती पांचिका असून स्वातच्या पुरातत्त्व केंद्रात ही अजूनही दाखविली जाते. तिच्या डोक्याच्या बाजूने तेजोवलय पसरले असून तिच्या शेजारी एक सुरक्षा करणारा व्यक्ती भाला घेऊन उभा आहे. हातात आणि गळ्यात अत्यंत मनमोहक अशी दागिने तिने परिधान केली असून एका हातात धनाची पिशवी आहे, तर दुसरा हात पतीच्या खांद्यावर ठेवला आहे. कानात रत्नजडीत कुंडल घातले असून ते तिच्या खांद्यापर्यंत लांब आहेत. मात्र तिने आपल्या पायात कोणतेही पादत्राणे घातलेले नाहीत. दुपदरी सिंहासनावर हे दोघे विराजमान झाले आहेत. स्वातच्या संग्रहालयात दुसरे एक हरितीचे शिल्प असून ते १३ सेंमी उंच आहे. या शिल्पात हरितीच्या अंगाखांद्यावर आणि आजूबाजूला मुले खेळत आहेत.'

चारसद्दाच्या नारदखा हाउसमध्ये मिळालेली हरितीची मूर्ती पेशावरच्या सर साहिबजादा अब्दुल कय्युम संग्रहालयात ठेवण्यात आली होती. ती आता जर्मनीच्या एका वास्तुसंग्रहालयात आहे. ही मूर्ती दुसऱ्या शतकातील आहे. १९६३-६४ साली एका खोदकामप्रसंगी आढळलेली सर्वात सुंदर मूर्ती असल्याचे प्रा. अहमद हसन यांनी आपल्या 'गांधारा आर्ट ऑफ पाकिस्तान' या पुस्तकात नमूद केले आहे. अशीच मूर्ती तक्षशिला विद्यापीठाच्या प्रवेशद्वारावर होती. त्यानंतर तिच्या अनेक प्रतिमूर्ती विविध स्तूप आणि बौद्ध मठात उभारल्याचे ते दाखले देतात. मात्र पेशावरच्या विद्यापीठात यावर अनेक जणांनी संशोधन केल्याचे दाखले मिळत असले तरी कट्टर तालिबानींनी येथील अनेक प्राचीन मूर्ती आणि दस्तावेज नष्ट केले आहेत. पाकिस्तानप्रमाणेच नेपाळमध्ये हरितीच्या अनेक मूर्ती दिसून येतात. नेपाळमधील जगप्रसिद्ध असलेल्या बुद्धनाथ स्तुपात प्रवेशद्वाराच्या उत्तरेला देवी हरितीचे स्वतंत्र मंदिर आहे. यात हरितीची मूर्ती सोन्याच्या आवरणांनी मढवलेली आहे, तर मंदिराचा बहुतांश भाग चांदीच्या आवरणांनी मढवलेला आहे. नेपाळमध्ये तिला मुलांची रक्षणकर्ती देवता म्हणून तिची पूजा करतात. तिबेटीयन बौद्ध हे बुद्धनाथला आल्यास हरितीची पूजापाठ केल्याशिवाय पुढे जात नाहीत. बुद्धनाथ स्तूप हे अत्यंत

पवित्र धम्मस्थळ म्हणून बौद्ध धर्मियांमध्ये ओळखले जाते. बौद्ध काळात नालंदा विद्यापीठाप्रमाणे येथेही ज्ञानविज्ञान आणि धम्म शिक्षणाचे केंद्र होते. या स्थळाला १९७९ साली युनोस्कोने जागतिक वारसास्थळ म्हणून त्यासाठीची मान्यता दिली. नेपाळमध्ये बुद्धनाथ स्तुपानंतर इतर अनेक ठिकाणी हरितीच्या मूर्ती आढळून येतात. तिथे तिला जगतजननी, मूळमाया, भूमाता म्हणून पूजा केली जाते. बाली बेटावर हरितीसंदर्भात अजूनही अनेक पुरावे उपलब्ध आहेत. रॉयल एशियाटिक सोसायटीने १९७३ साली प्रकाशित केलेल्या एका लेखात बाली बेटावरील हरितीच्या पुराव्याचे अनेक दाखले दिले आहेत.

हिंदी महासागरामध्ये असलेल्या या बेटाला अनेक ऐतिहासिक संदर्भ उपलब्ध असले तरी या बेटावर असलेले शिवमंदिर आणि हरितीचे मंदिर एक वेगळा संशोधनाचा विषय होऊ शकतो. येथे असलेले हरितीचे मंदिर नैसर्गिक रचना आणि त्याला अनुसरून तयार केलेल्या वास्तूचा अत्यंत सुंदर नमुना आहे. या मंदिराच्या शेजारी सर्व प्रहरात निसर्गाचे अनेक रंग येथे पाहावयास मिळतात. भारतातही हरितीच्या मंदिराचे अनेक पुरावे नष्ट करण्यात आले असले तरी गोवा राज्यातील गजह परिसरात अनेक पुरावे अजूनही शाबूत आहेत. या परिसरातील एलिफंटा नदीच्या किनाऱ्यावर असलेल्या अनेक स्तुपात हरितीच्या भग्नावस्थेत असलेल्या शेकडो मूर्ती दिसून येतात. महाराष्ट्रातील जगप्रसिद्ध असलेल्या वेरुळ अजिंठ्याच्या लेण्यांमध्ये हरिती आणि पांचिकाचे शिल्प आहे. अजिंठाच्या लेणी क्रमांक-२ मध्ये हे शिल्प असून ते इतर देशातील हरिती, पांचिकाचे शिल्पासारखे दिसते.

**संदर्भ :**

१.समय जातक तसेच जपानी सूत्र लोटस : २६ व्या आध्यायातील माहिती.
२. सर साहिबजादा अब्दुल कय्युम संग्रहालयाने प्रसिद्ध केलेली माहिती.
३. गांधारा गॅलरी, लाहोर, उपसंचालक, मुझीब खान यांची माहिती.
४. गांधारा आर्ट ऑफ पाकिस्तान, पुस्तकातील माहिती.

***

**विभाग दुसरा : लोकपरंपरेचा स्थळ अहवाल**

आंध्र प्रदेश, तेलंगणा, मराठवाडा, विदर्भातील
स्थळांना भेटी देऊन मिळवलेली माहिती तसेच
पोतराज, देवकरीण व त्यांचा ग्राऊंड रिपोर्ट

## ६. योगिनी : देवकरीण

१. राजामाय, २. भागामाय, ३. श्रावण्या पोतराज,
४. यमुनामाय, ५. देवयमाय, ६. विठामाय ,
७. रुकमामाय, ८. म्हादामाय

## ७. धुरपतामायची मौखिक परंपरा

मराठवाड्यासह आंध्र प्रदेश, तेलंगणाच्या
अनेक जिल्ह्यातील महिला पोतराजांची गाणी

## ८. अंगात येणे : नेणिवेचा आविष्कार

गंधर्व, मातृदेवता, पोतराज, देवकरीण

# ६
# योगिनी आणि देवकरीण

१. तळेगावची राजामाय,
२. रामपुरीतील भागामाय,
३. श्रावण्या पोतराज,
४. शेलगावची यमुनामाय,
५. इरळद-नरळदची देवयमाय,
६. दैठण्याची विठामाय,
७. येळेगावची रुकमामाय,
८. देगलूरची म्हादामाय.



# १. तळेगावची राजामाय

**राजामायची गाडी, दिसते मला छानं,**
**चालली डोंगरानं तिला, रोखीणार कोण ?**

चैत्राच्या पहिल्या दिवशी नांदेड जिल्ह्यातील उमरी तालुक्यातील तळेगाव परिसरातून गडचांद्याच्या (चंद्रपूर) वाटेने निघालेल्या राजामायच्या गाडीचे वर्णन करणारे हे लोकगीत. गडचांद्याच्या गडावर माय धुरपताला भेटण्यासाठी आतूर झालेली राजामाय देवकरीण आपल्या गाडीने चांद्याच्या दिशेने निघालेली आहे. वाटेत येणारे डोंगर, नदी, नाले, घनदाट जंगले ती पार करत जात आहे. तिला रोखण्याची कोणाचीही हिंमत नाही, असा ठामपणे विश्वास देवकरीण या लोकगीतातून व्यक्त करतात. अशी असंख्य गाणी राजामायसाठी आपले भक्त मागील अनेक

पिढ्यांन्पिढ्यापासून गातात. त्यातून धुरपतामायसोबतच राजामायचीही आठवण काढत असतात.

चंद्रपूरच्या महाकालीच्या पायी यात्रेची पहिली सुरुवात ही तळेगावच्या राजामाय या देवकरीणने केली, असे सांगितले जाते. यामुळे राजामायला महाकालीची पहिली मानकरीण म्हणूनही या परंपरेत सर्वात मोठा मान आहे. नांदेड जिल्ह्यातील उमरी तालुक्यातील तळेगाव हे राजामायचे मूळ गाव. 'चंद्रपूरच्या देवी महाकालीची चैत्र यात्रा' या पुस्तिकेत लेखक व आचार्य टी. टी. जुलमे हे राजामायने सुरू केलेल्या यात्रेचा कालावधी १८८० चा सांगतात. (पृ.१५) तर राजामायच्या वंशजांकडून ही यात्रा सुमारे २५० वर्षांपासून सुरू झाली असल्याचा अंदाज व्यक्त केला जातो. त्याचे कुठेही प्रमाण मिळत नसले तरी संशोधकांच्या मतेही हा कालावधी सुमारे सव्वाशे-दीडशे वर्षांच्या दरम्यान असावा.

एक-दीड हजारांच्या सुमारास घरे असलेले तळेगाव हे गाव मुखेड मार्गे नरसी-नायगावकडून उमरीला जाणाऱ्या रस्त्याच्या कडेला एका उमाटावर वसले आहे. मूळ तळेगाव हे गाव रस्त्याच्या पश्चिमेला वसलेले होते. आता लोकसंख्या वाढल्याने गावाच्या शेजारी गेलेल्या रस्त्याच्या पूर्वेलाही आता वस्ती वाढत गेली आहे. मुख्य रस्ता ओलांडून पुढे गेल्यास डाव्या बाजूला जुन्या माळवंद आणि एका जुन्या वाड्याच्या शेजारी राजामायचा वाडा लागतो. त्या वाड्याशेजारीच राजामायचे एक छोटेखानी मंदिरही उभारण्यात आले आहे.

'धुरपतामायचा प्रत्येक भक्त तळेगावला 'मूळ ठाणं' समजतात. अलीकडे चंद्रपूरला चैत्रात भरणाऱ्या यात्रेपूर्वी तळेगावला तीन दिवस मोठी यात्रा भरते. ही यात्रा संपल्यानंतरच चंद्रपूरला इथून पुढे भाविक निघतात. तळेगावची यात्रा, या यात्रेची प्रथा ही वाहतुकीच्या साधनांचा अधिक वापर सुरू झाल्यानंतर निर्माण झाली असावी. चंद्रपूरप्रमाणेच मायचे मूळ ठाणं म्हणून भक्तांमध्ये तळेगावला मान्यता असल्याने या ठिकाणचे मोठे आकर्षण भक्तांमध्ये दिसते.'

दीडशे वर्षांपूर्वी अथवा त्यादरम्यान राजामायने सुरू केलेल्या धुरपतामायच्या पायी यात्रेच्या परंपरेला इथूनच सुरुवात झाली असली तरी आज हे ठाणं विकासाच्या आणि एकूणच प्रसिद्धीच्या दृष्टीनेही खूप

उपेक्षित राहिले आहे. मात्र, भक्तांनी ते आपल्या मौखिक परंपरेतून जतन करून ठेवले आहे. तळेगाववर असंख्य गाणी भक्त म्हणताना दिसतात. तळेगावचे अत्यंत विलोभनीय आणि मनाला भेदून टाकणारे वर्णन आपल्या गाण्यात देवकरीण करताना दिसतात.

**तळेगाव नगरातं हाय, आंब्याचं आगरं.**
**हाय आंब्याचं आगरं, राजामाईचं नगरं...**
**तळेगाव नगरातं, गुरूघरं आहे थोरं,**
**त्याच्या कवाडावरं मोरं, दाखविले देवघरं.**
**धुरपता-राजामाय दाखविले देवघरं...**
**तळेगावं नगरातं...**

राज्यात मातृदेवतेची चळवळ निर्माण करणाऱ्या राजामायचे मंदिर तिच्या मूळ घराच्या बाजूला साठ वर्षांपूर्वी बांधण्यात आले आहे. या मंदिरात आकारहीन आणि शेंदूर फासलेल्या मातृदेवतांच्या तीन मूर्ती ठेवण्यात आल्या आहेत. मुख्य मूर्ती धुरपतामाय आणि एक मूर्ती राजामायची असल्याचे सांगतात. तर मंदिराला लागून असलेल्या वृक्षाच्या शेजारी अनेक दगडांना शेंदूर माखून ठेवण्यात आले आहेत. त्यांनाही येणारे भक्त मातृदेवता म्हणून पूजा करत असतात. राजामायचे वंशज हे मूळ बलुतेदारांमधील सालेवार समाजातील असल्याने मूळ व्यवसाय हा विणकाम होता. त्यांना राजामायने निर्माण केलेल्या परंपरेमुळे एक वेगळे स्थान समाजात मिळाले आहे. अलीकडे विणकाम मागे पडल्याचे दिसते. राजामायच्या वंशजातील बालाजी महाराज, श्यामसुंदर महाराज हे राज्यभरात अनेक ठिकाणी कार्यक्रमाला जातात. दोघेही राजामायचे वंशज आणि सध्या त्यांच्या गादीचे वारसदार आहेत.

मूळ राजामाय ही योगिनीसारखी आयुष्यभर जगली. तिला एकही मूल नव्हते मात्र, नंतर तिच्या सवतीची जी मुले झाली तीच पुढे राजामायची वंशज म्हणून मान्यता पावली. राजामायच्या मंदिराशेजारी लागूनच त्यांच्या वंशजाची घरे असली तरी इतर मंदिरांप्रमाणे या मंदिराचा विकास होऊ शकला नाही. अजूनही छोटेखानी मंदिर आहे. राजामायचे मूळ मंदिर गावात असले तरी समाधी मात्र, गावाबाहेर दक्षिणेला आहे. ती खूप

दुर्लक्षित आहे. गावाच्या पश्चिमेला एका पायवाटेने गेल्यास ही समाधी दिसते. राजामायच्या समाधीजवळच तिच्या वंशजातील यंका महाराज, संता बापू, नागामाय, देवूमाय यांच्याही येथे समाध्या उभारण्यात आल्या आहेत. त्यात राजामायची समाधी शोधावी लागते. ती ठळकपणे दिसून येत नाही. समाधीच्या शेजारी राजामायच्या गाडीची एक लहानशी प्रतिकृती कोण्यातरी भक्ताने तयार करून ठेवली आहे. दूरदूरून येणारे भक्त या प्रतिकृतीजवळ हिरव्या कांकणाचा चुडा, हिरवा खण, लिंबाचा डहाळा, लिंबू वाहतात. त्याच्या अनेक खुणा इथे पहावयास मिळतात.

मूळ मंदिरासोबत जिथे राजामायची समाधी आहे, तिथेही भक्त जाऊन आपला माथा टेकवतात. राजामायच्या समाधीला डोके टेकवल्याशिवाय तिथून निघत नाहीत. अलीकडे याच गाव शेजारी एक मंदिर महाकालीचे बांधण्यात आले असल्याने राजामायचे मंदिर आणि तिच्या परंपरेकडे दुर्लक्ष होत असल्याचे तळेगावला जाऊन आल्यास लक्षात आले. राजामायच्या समाधीवर धुरपतामायचे चित्र लावण्यात आले आहे. राजामायचे मूळ चित्र कोणाकडेही उपलब्ध नसले तरी बालाजी महाराज यांच्या वंशावळातील काही मंडळींनी त्यांचे चित्र रेखाटले असून, ते एकमेव असल्याचे सांगतात.

राज्यात आणि राज्याबाहेर मोठ्या प्रमाणात राजामायने प्रेरित झालेली शिष्यपरंपरा लाखोंच्या घरात आहे. सालेवार, कोळी, माळी, मांग, महार, लोहार, होलार आदी अठरापगड जातींसोबत भटक्या-विमुक्तांतील बंजारा, गाडी लोहार, लोहार आदी जातींमध्ये ही शिष्यपरंपरा आढळून येते. त्यातही मांग, कोळी, माळी आदींची संख्या अधिक असते.

धुरपतामायची पहिली देवकरीण, योगिनी म्हणून राजामायची ओळख तिने निर्माण केलेल्या शिष्यपरंपरेत दिसते. देवकरीण-पोतराज यांच्यामध्ये मातृदेवता म्हणून जितके स्थान धुरपतामायचे, तितकेच स्थान या परंपरेत राजामायचे आहे. धुरपतामायच्या नावाचा जयघोष करताना राजामायने निर्माण केलेल्या देवकरीणच्या परंपरेचा उल्लेख केल्याशिवाय एकही भक्त पुढे जात नाही.

**'धुरपतमायच्या नावाने हार बोला,**

**राजामायच्या नावाने हार बोला,**
**यमुनामायच्या नावाने हार बोला.'**

असा तो जयघोष असतो. या जयघोषात सर्व योगिनींचा जयघोष असतो ही बाब लक्षात घेणे महत्त्वाचे आहे. राजामायने निर्माण केलेल्या परंपरेची मूळे आज मराठवाड्यातील लातूर, उस्मानाबाद, परभणी, जालना, औरंगाबाद, बीड, नांदेड आदी जिल्ह्यांसह तेलंगणातील निझामाबाद, कर्नाटकातील बीदर, भालकी, गुलबर्गा आदी परिसरात रूजलेली आहेत. पूर्वीच्या आंध्र प्रदेशमध्ये असलेल्या आणि आता तेलंगणामध्ये असलेल्या निझामाबाद जिल्ह्यातील बोधन, कोटगिरी, मदनूर, कामारेड्डी, मकलूर, नशिराबाद आदी मंडल या पट्ट्यात मोठ्या प्रमाणात धुरपतामायची आणि विशेषतः राजामायची शिष्यपरंपरा आहे.

मराठी भाषेसोबतच तेलगू भाषेतही मोठ्या प्रमाणात राजामाय आणि धुरपतामायच्या ओव्या, गाणी येथे गायिल्या जातात. या गाण्यांतील रचना, त्यातील लयबद्धता लक्षात घेतल्या तर या गाण्यातील भाषिक अडचणी गळून पडतात. प्रत्येक गाणे हे मनाला भारावून टाकतात. मराठीतील ओव्यांप्रमाणे तेलगू भाषेतील अनेक गाणी आणि ओव्याही कालांतराने नष्ट झाल्याचे तेलंगणातील कामारेड्डी जिल्ह्यातील मदनूर तालुक्यातील मोगा या छोट्याशा गावातील शोभाबाई या देवकरीण यांनी सांगितले. त्या देगलूर येथील देवकरीण म्हादामाय यांच्या नात आहेत. त्या आता म्हादामायचा वारसा चालवतात. म्हादामाय देवकरीण यांच्या निधनापूर्वी त्यांनी आपला वारसा आणि भंडाऱ्याचा डबाही आपल्याला दिल्याचे शोभाबाई सांगतात. पुढील एका प्रकरणात त्यांची माहिती आपण पाहणार आहोत. देगलूर येथील म्हादामाय देवकरीण या १९९५ पर्यंत धुरपतामायची चळवळ चालवत होत्या. देवकरीणच्या परंपरेतील त्या अखेरच्या प्रभावशाली अशा देवकरीण होत्या.

'मराठवाड्यातील प्रत्येक जिल्ह्यांमध्ये धुरपतामायची पूजा करणारा पोतराज हा मांग समाजातून आलेला दिसतो. शिक्षणाचे प्रमाण मागील काही दशकात वाढत गेल्याने ही परंपरा खुंटीत होताना दिसत असली तरी अजूनही अनेक ठिकाणी पोतराजांचा वावर दिसतो. धुरपतामायची पहिली

पुजारीण, मानकरीन म्हणून ज्याप्रमाणे राजामायची ओळख आहे, त्याचप्रमाणे दुसरी मुख्य देवकरीण म्हणून नांदेड जिल्ह्यातील उमरी तालुक्यातच असलेल्या शेलगावच्या यमुनामायचीही आहे. दोघीही समांतर काळातील देवकरीण होत्या. मात्र, त्यासाठी कोणत्याही नोंदी आणि प्रमाणही मिळत नाही' या दोघींचे तख्तही समांतर असल्याचे बोलले जाते. मात्र, पहिली देवकरीण म्हणून राजामायचे स्थान त्यांच्या भक्तांमध्ये अढळ असले तरी तितकेच स्थान यमुनामायचेही आहे. धुरपतामायच्या नावासोबत राजामाय आणि यमुनामायचे नाव घेतल्याशिवाय एकही देवकरीण आणि देवकर राहत नाही. वारकरी परंपरेत ज्याप्रमाणे पुंडलिकांपासून तुकाराम-एकनाथ आदी महाराजांचा जयघोष केला जातो, अगदी त्याचप्रमाणे धुरपतामाय, राजामाय आणि यमुनामायचा जयघोष उठताबसता केला जातो. धुरपतामायच्या या परंपरेत तिच्या भक्त म्हणून घेणाऱ्या या दोघी देवकरणींना मोठे स्थान आहे.

**आया बायांनों, भरलाय माय वाडा,**
**हाती घेऊनी नारळाचा पुडा.**
**राजामायची गाडी, दिसते मला छानं...**
**चालंली डोंगरानं तिला, रोकीणारं कोण..? आया बायांनों...**
**हाती घेऊनी खणाचा पुडा.**
**राजामायची गाडी, दिसते मला छानं.. चालंली...**
**आया बायानों, भरलाय माझा वाडा,**
**हाती घेऊनी पातळाचा पुडा.**
**कुंकवाचा पुडा, हाती घेऊनी वटीचा पुडा...**

विशेषतः या दोघीही देवकरीण नांदेड जिल्ह्यातील उमरी तालुक्यातील आहेत. दोघींच्या गावांमध्ये सुमारे ३५ कि. मी.च्या दरम्यान अंतर असावे. तालुक्याजवळ असलेल्या तळेगाव या गावची राजामायने धुरपतामायच्या यात्रेची सुरुवात केल्याचे लिखित दाखले उपलब्ध नाहीत. जे काही आहेत ते केवळ मौखिक परंपरेत आणि गाण्यातून मिळतात.

तळेगावची राजामाय ही आयुष्यभर योगिनीसारखी जीवन जगली होती. तिला एकही मूलबाळ नव्हते. मात्र, तिच्या सवतीला मुले झाली

होती. तिची वंशावळ ही आज राजामायची परंपरा पुढे चालवत आहेत. त्यात सर्वाधिक शिष्यपरंपरा निर्माण करणारे म्हणून यंका बापू महाराजांचे नाव घेतले जाते. त्यांनी आयुष्यभर धुरपतामायच्या नावाने शेकडो जणांना दीक्षा दिली असल्याने आज नांदेडपासून ते तेलंगणा, आंध्र प्रदेशापर्यंत अनेक तख्त निर्माण झालेले आहेत. त्यात यंका बापूंचे मोठे योगदान दिसते. त्यासोबतच संता बापू, नागामाय, देवूमाय या चंद्रपूरच्या यात्रेला घोड्यावर बसून जात असत. नागामाय आणि त्यानंतर देवूमायची गाडी चंद्रपूरात पोहोचल्याशिवाय यात्रा पूर्ण होत नसे. ती परंपरा आता बालाजी महाराज आणि श्यामसुंदर महाराज प्रभावीपणे चालवतात. आजमितीला हे गावोगावी फिरून या परंपरेचे जतन करत आहेत. हीच राजामायची साधारणपणे वंशावळ आज तळेगावमध्ये आहे. मागील काही वर्षांपूर्वीच राजामायच्या समाधीच्या जीर्णोद्धाराचे काम केले असल्याचे या वंशजाकडून सांगण्यात आले.

राजामायने यात्रेची सुरुवात कशी केली, याच्या अनेक चित्तथरारक व तितक्याच निसर्गमायेशी संबंध असलेल्या लोककथा सांगितल्या जातात. तळेगावमधील मंदिराची सर्व देखभाल करणाऱ्या व भक्तांसोबतच नातेवाईकांमध्येही राजामाय म्हणूनच ओळख असलेल्या ८० वर्षीय राजामाय यांनी सांगितले की, मूळ राजामाय कधी झाली हे आम्हालाही माहीत नाही. तिला आम्ही कोणीही बघितलं नाही. पण तिला लेकरू-बाळ काहीही नव्हते. ती 'कदीम'ची माय होती. तीच राजामाय होती. आताची सर्व वंशावळ ही तिच्या सवतीची म्हणजे डाकाबाईची आहे. राजामायचे नाव अजरामर आहे. सवतीच्या लेकरांकडून राजामायचा वेल वाढला आहे. माझ्या काळापर्यंत जी यात्रा निघायची त्यावेळीही रस्ता कुठून जायचा, हे बऱ्याचदा कळत नसे. परंतु राजामायने कधीकाळी एक पायवाट आणि त्यासाठीचे अनेक ठिकाणं ठरवली असल्याने त्या ठिकाणांचा शोध घेत आम्ही डोंगरकड्यातून, झाडाझुडपातून रस्ता काढून गडचांद्याला पोहोचत. सकाळी डोंगर चढायला सुरुवात झाली की, कधी-कधी संध्याकाळ व्हायची. अनेक डोंगरावर पायवाटा इतकीच जागा असायची. त्यातून मार्ग काढून आमची यात्रा चालत असे. राजामायने सुरू केलेल्या वाटेवर ठिकठिकाणी नदी-नाल्यांसोबतच पाण्याचे झरे,

पाणवटे हमखास मिळायचे. त्यामागे राजामायची मोठी किमया होती. माझ्यासमोर त्यावेळी पाच तख्त चंद्रपुरापर्यंत पोहोचत असत. पुढील काळात रस्ते आणि जाण्यासाठी वाहनांच्या सोयी-सुविधा निर्माण झाल्यानंतर ही पायवाट बंद झाली असली तरी अजूनही अनेकजण याच पायवाटेने गडचांद्याला येतात. मागील चाळीसएक वर्षांपर्यंत ही चालत जाण्याची मोठी परंपरा टिकून होती.

राजामाय चंद्रपूरला कशा गेल्या, याविषयीही अनेक हकीकती सांगितल्या जातात. त्यांच्या वंशजातील शेवटच्या राजामायने सांगितले की, त्या एक अवतारी महिला होत्या. पाखरू होऊन त्या चंद्रपूरला गेल्या. त्यांना इथून चंद्रपुरात धुरपतामाय आहे, हे कसे कळले. हे न उलगडणारे असल्याचे त्या म्हणाल्या. मात्र, धुरपतामाय ही एका वाड्यात बंदिस्त असल्याचा राजामायला साक्षात्कार झाला आणि त्यांनी आपल्यासोबत एक-दोन गडीमाणसं घेऊन त्याकाळी थेट चंद्रपूर गाठले होते.

डोंगरकपारी, नदी-नाले ओलांडत आणि कोणत्याही रस्त्याची पूर्व कल्पना नसताना त्या चंद्रपुरात पोहोचल्या. तिथे धुरपतामायच्या मंदिराची कवाडे बंद करण्यात आली होती. तिथे राजामाय पोहोचली. मंदिराच्या पूर्वी असलेली (किल्ला)दगडाची मोठी शिळा राजामायने आपल्या हातात असलेला लिंबाच्या पानाचा डहाळा लावताच गळून पडली. तो दिवस दाटाळीच्या पौर्णिमेचा होता. ही शिळा पडल्यानंतर राजामाय पुढे जाण्यापूर्वीच तिथे रक्त वाहताना दिसल्याने सोबतीचे अनेकजण घाबरले. मात्र, राजामाय घाबरली नाही. पुढे काट्या-कुट्यातून रस्ता काढत राजामाय चालत जाऊन थेट दरवाजाजवळ जाऊन पोहोचली. तिच्या धाडसामुळे सोबतीला आलेले एक-दोघेजणही पोहोचले. मंदिराचा सर्व भाग हा कधीकाळी चिणून टाकण्यात आला होता. त्यामुळे आत जाण्यासाठीचा एक दरवाजा असला तरी तोही दगडी शिळांनी बंद होता. आजूबाजूला किर्र्र्र घनदाट जंगलाने वेढलेल्या या मंदिराच्या दरवाजाजवळ राजामायपूर्वी कोणीही जाण्याची हिंमत केली नव्हती. श्वापदे, रानटी जनावरांचा मोठा वावर आजूबाजूच्या परिसरात होता.

या दरवाजाजवळ राजामाय जाऊन थांबली. दोन्ही हातात असलेल्या लिंबाच्या डहाळ्याचे हात लावताच दरवाजाचा कर्रऽऽऽर्र असा मोठा

आवाज झाला. आवाजाने संपूर्ण परिसर दणाणून गेला. तो कधी काळी चिणून ठेवलेला धुरपतामायचा दरवाजा राजामायने खुला केला. राजामायसोबत आलेल्या माणसांनाही पुढे येण्याचे धाडस होत नव्हते. मात्र, राजामायजवळ दैवी शक्ती असल्याने त्यांनी आत प्रवेश केला. आत प्रवेश करताच काटे-कुटे, सर्प-विंचूपासून ते अनेक हिंस्त्र श्वापदे राजामायच्या समोर येऊ लागली. राजामाय घाबरली नाही. राजामायच्या प्रत्येक पावलागणिक ही सर्प-विंचू आणि हिंस्त्र श्वापदे रस्ता सोडून बाजूला होऊ लागली. राजामाय पुढे चालताना आपल्यासोबत आलेल्यांना धीर देत होत्या. मध्येच धुरपतामायचा एक डोळा चाकासारखा मोठा चमकला. त्यावर राजामायने आपल्यासोबत आलेल्यांना भीती वाटू नये म्हणून धीर दिला. काही उमगण्यापूर्वीच धुरपतामाय राजामाय समोर प्रगट झाली. तिने राजामायला विचारले,

'कुठं आलीस गं?'

राजामाय म्हणाली, *तुझ्या भेटीला!*

*काय मागतेस माग, अशी माय म्हणाली.*

त्यावर राजामायने आपल्या भावासाठी

*'मला एक वाटी आणि चंबू दे'* अशी मागणी केली.

त्यावर मायने वाटी आणि चंबू देण्यास नकार देत दुसरे काही माग असे तिने सांगितले. त्यावर राजामाय म्हणाली,

*तुझ्या इच्छेला वाटेल ते दे!.*

*त्यानंतर धुरपतामायने वस्त्र विणण्यासाठी सोन्याची सुई दिली.*

अशा प्रकारच्या लोककथा, आख्यायिका राजामायच्या शेवटच्या वंशजांकडून अजूनही सांगितल्या जातात. धुरपतामायचा शोध घेण्यासाठी त्या कालावधीत राजामाय तळेगावहून चंद्रपूरला कशी निघाली? तिला दगडी शिळेत चिणून ठेवलेल्या धुरपतामायच्या मंदिराचा शोध कसा लागला? याचा नेमका उलगडा करण्यासाठी पुरावे उपलब्ध नसले तरी ते नेणिवेच्या पातळीवर जाऊन त्याचा शोध घेता येऊ शकेल. शरद् पाटील यांनी सांगितल्याप्रमाणे 'अब्राह्मणी बहुप्रवाही विधायक भौतिकवादी ऐतिहासिक अण्वेषण पद्धती' वापरून अभ्यास करावा लागेल. राजामाय चंद्रपूरला कशा पोहोचल्या, यासाठी राजामायच्या शिष्यपरंपरेत अजूनही

काही मौखिक गाणी, ओव्या आणि हकिकती सांगितल्या जातात, त्या आधारेही ते सांगता येऊ शकेल.

नांदेड जिल्ह्यातील तळेगावपासून ते चंद्रपूर असा सुमारे साडेतीनशे किमीचा टप्पा राजामायने पार करत चंद्रपूर गाठले. त्यामुळे साहजिकच चंद्रपूरला राजामाय जाण्यापूर्वी तिथे निश्चितच योगिनीची परंपरा शाबूत असली पाहिजे. परंतु शिवकाळानंतर आलेल्या पेशवाईनंतर अथवा त्यादरम्यान ही परंपरा भूमिगत झाली असावी. त्याच परंपरेला उजाळा देण्याचे काम राजामायसारख्या अनाम आणि असंख्य परंतु काळाच्या पदरात गडप झालेल्या देवकरणींकडून झाले असावे.

दीड-दोनशे वर्षांपूर्वी नांदेडमधील उमरी ते चंद्रपूरच्या मार्गावरील परिसरात पायी प्रवास निश्चितच अवघड असावा. मात्र, मातृपरंपरेची पायवाट अगोदरच तयार झालेली असल्याने ती राजामायला सोपी ठरली असावी.

१९७०च्या दशकापर्यंत परभणी जिल्ह्यातील भागामाय आणि विठामायही बैलगाड्या घेऊन चंद्रपूरच्या यात्रेला जात असल्याचे त्यांच्या शिष्यमंडळींकडून सांगितले जाते. या काळातही खूप अडचणी आणि



कठीण प्रसंगाला सामोरे जावे लागत. यामुळे राजामायने उमरीवरून थेट चंद्रपूरला जाणे यामागे त्या परिसरात योगिनींची परंपरा असावी. तसेच या परिसरात ज्याप्रमाणे अनेक लेण्या, शिल्प, मंदिरांची भरभराट असतानाही त्यांची नासधूस करून उद्ध्वस्त करण्यात आल्या. तशाच प्रकारे धुरपतामायच्या या परंपरेमागे योगिनी परंपरा दडपून टाकण्यासाठीच धुरपतामायचे मंदिरही कायमचे दुर्लक्षित केले असावे. राजामायसाठी सांगण्यात येणाऱ्या लोककथेप्रमाणे ते दगडांनी चिणून टाकलेले असावे.  अथवा ती चळवळ कुंठीत करण्यात आली असावी. अशा प्रकारची अनेक दुर्लक्षित ठेवण्यात आलेल्या मातृदेवतांच्या मंदिरांची ठिकाणे केवळ राज्यातच नाही, तर देशात ठिकठिकाणी आढळून

येतात. यातून एक मात्र निश्चित सांगता येईल की, राजामायसारख्या असंख्य देवकरीण,योगिनींनी या परंपरेला पुन्हा जिवंत ठेवण्याचे मोठे कार्य केले आहे. त्यासाठीच्या आख्यायिका, लोककथा सांगितल्या जात असाव्यात. त्यासाठी काही ऐतिहासिक पार्श्वभूमीही पाहणे आवश्यक आहे.

राणी हिराईने महाकालीचे जुने मंदिर पाडून नवीन मंदिर बांधले होते. तिनेच देवीसमोर चैत्र पौर्णिमेची यात्रा सुरू केली. तो कालावधी हा इ. स. १७०४ ते १७१९ असा आहे. मंदिर दुर्लक्षित ठेवण्यात आल्याचा कालावधी हा त्याहीपेक्षा अगोदरचा आहे. ज्येष्ठ संशोधक अ. ज. राजूरकर यांच्या मते खांडक्या बल्लाळशहा (इ. स. १४७२-१४९७) हा चंद्रपूर आणि त्या परिसरात शिकारीसाठी फिरत असताना त्याला चंद्रपूर शहर उद्ध्वस्थ झालेले दिसले. तिथे सर्वत्र जंगल वाढले होते. (पृ.१२५) त्याच परिसरात त्याला एका भुयारात खडकात कोरलेली महाकालीची मूर्ती आढळली होती. बल्लाळशहा यांनी ते भूयार उघडे करून तिथे वाढलेली झाडे-झुडपे साफ केली आणि त्यावर त्यांनी त्या वेळी छोटेसे मंदिर बांधले असल्याचे राजूरकर नमूद करतात.(पृ.१२६) त्यामुळे राजामायसंदर्भातील सांगण्यात येणाऱ्या लोककथांचा समन्वय साधताना त्याचीही समाजमनात खोलवर रुजलेली असलेली पार्श्वभूमी महत्त्वाची आहे.

राजामायची परंपरा त्यांच्या सवतीच्या मुलांनी चालवली. त्यात राजामायनंतर लक्ष्मीबाई देवकरीण यांनी ही परंपरा प्रभावीपणे पुढे नेली. त्याही राजामायप्रमाणेच आपल्या असंख्य भक्तांसमवेत गडचांद्याला घोड्यावर बसून यात्रा काढत. लक्ष्मीबाईलाही राजामाय म्हणूनच ओळखले जात. त्यांना दोन मुले होती. त्यात एक यंकाबापू आणि मुलगी लचमा. यंकाबापू यांनी देवकर म्हणून दीक्षा घेतल्यानंतर आपले आयुष्य या चळवळीसाठी वाहून घेतले होते. गावोगाव फिरून त्यांनी असंख्य महिला-पुरुषांना दीक्षा दिल्याचे सांगितले जाते.

यंकाबापूनंतर नागामाय, देवूयमाय यांनी ही परंपरा चालवली. आज देवूमायची दोन मुले राजामायची गादी सांभाळत असतात. एक बालाजी आणि दुसरे श्यामसुंदर. बालाजी यांना चार मुले असून लक्ष्मीकांत, व्यंकटेश, राजू आणि चंद्रकला, तर श्यामसुंदर यांना भुमण्या नावाचा एक मुलगा आहे.

## राजामायवरील मौखिक संपदा

देवकरीणच्या परंपरेत सर्वात जास्त मौखिक गाणी ही राजामायवर दिसून येतात. तळेगाव नगरासोबत राजामायच्या सौंदर्यावर आणि तिने निर्माण केलेल्या परंपरेवरील ही गाणी आहेत. राजामायचे नाव आणि तिचा जयघोष हा धुरपतामायसोबत केला जातो. 'धुरपतामायच्या नावाने हार बोला, राजामायच्या नावाने हार बोला' असा तो जयघोष असतो. तळेगाव संदर्भात असलेल्या गाण्यातून राजामायच्या कार्याचे वर्णन केले जाते.

**तळेगाव नगरातं, हायं भंडाराची खोली,**
**राजामाय झोपी गेली, धुरपतमायनं उठवली.**
**तळेगाव नगरातं, शिशीनामा घाले सडा.**
**एवढं राजामायचा वाडा.**
**तळेगाव नगरातं, हायं आगनीचं भांडं,**
**माय माझ्या राजामायचं, पतिव्रता नावं दडं.**
**तळेगाव नगरातं, वडं गोटुल्या पानाचा,**
**माय माझ्या राजामायचे, गुरू मोकळ्या मनाचे...**

तळेगाव जवळ असलेल्या एका खेड्यातील देवकरीणकडे हे एक अत्यंत महत्त्वाचे गाणे ऐकायला मिळाले. तळेगावची महती ही त्यांच्या शिष्यांमध्ये सर्व ज्ञानाचे, तत्त्वज्ञानाचे केंद्र असल्याचे ते म्हणतात. तळेगावला 'काशी'चीही उपमा दिल्याचे पहावयास मिळते. तळेगावचा महिमा आणि वर्णन करणारी असंख्य गाणी आहेत. त्यापैकी काही गाणी-

**तळेगाव नगरातं, चला की हो पहा जाऊ..**
**काशी खंडाचे हे बूडं, नारळातं दूध गोडं..**
**तळेगाव नगरातं, शेषा भरीले जमीनं..**
**माय निघावं मातूनं, देहू निघावं मातूनं..**
**धुरपता-राजामायचं, देहू निघावं मातूनं...**
**तळेगाव नगरातं, साती सेमुंद्रा झुकिले,**

धुरपता-राजामायनं, एका हुरुपं लाविले..
तळेगाव नगरातं, माझ्या गुरूची हो घोडी.
दानं द्यावं हो मनुक्याचा, उमरीमाय तालुक्याचा...
--
तळेगाव नगरातं,
वडं गोटुल्या पानाचा.
माय माझ्या राजामायचे,
गुरू मोकळ्या मनाचे.
तळेगाव नगरातं,
चला की हो पहा जाऊ,
काशी खंडाचे हे बूडं,
नारळातं दूध गोडं.
तळेगावं नगरातं,
शेषा भरले जमीनं,
माय निघावं मातूनं,
देहू निघावं मातूनं...
धुरपता-राजामायचं,
देहू निघावं मातूनं...
तळेगावं नगरातं,
साती सेमुंद्रा झुकिले,
धुरपता-राजामायनं.
एका हुरुपं लाविले..
तळेगाव नगरातं,
गुरू मोकळ्या मनाचे.
दानं द्यावं हो मनुक्याचा,
उमरीमाय तालुक्याचा..
--
तळेगावच्या देवकरणीला..
भंडार शोभे तुला व माय, राजामायला..
भंडार शोभे तुला की, माय धुरपतमायला

तळेगावच्या राजामायला, तळेगावच्या राजामायला...
भंडार शोभे तुला की, माय राजामायला.
तळेगावच्या देवकरणीला...
पातळ शोभे तुला की माय, धुरपतमायला...
तळेगावच्या देवकरणीला...
कंठी शोभे तुला की माय, धुरपतमायला..
तळेगावच्या राजामायला...
लिंबू शोभे तुला की माय, धुरपतमायला...
--
तळेगाव नगरातं हायं, आंब्याचं आगरं,
हाय आंब्याचं आगरं, राजामाईचं नगरं.
तळेगाव नगरातं, गुरूघरं आहे थोरं.
त्याच्या कवाडावरं मोरं, दाखविले देवघरं.
धुरपता-राजामाय दाखविले देवघरं...
तळेगावं नगरातं...

--

तळेगाव नगरातं आहे,
भंडाराची खोली.
राजामाय झोपी गेली,
धुरपता मायनं उठविली.
तळेगाव नगरातं...
शिशी नाम्या घाले सडा,
देव राजामायचा वाडा.
तळेगाव नगरातं..
आहे आगरीचं बांडं,
माय माझ्या राजामायचं
पतीवरता नावं गरतं...

**संदर्भ / माहिती :**

१. चंद्रपूरच्या देवी महाकालीची चैत्र यात्रा : आचार्य टी. टी. जुलमे, पृ. १५.

२. चंद्रपूरचा इतिहास : अ. ज. राजूरकर, पृ १२५, १२६.

३. राजामायची माहिती : लक्ष्मीमाय, (राजामायची वारसदार), तळेगाव, जि. नांदेड.

४. वंशजाची माहिती : बालाजी महाराज, तळेगाव, जि. नांदेड.

५. राजामायवरील गाणी : रेणुबाई शेळके, धोंडाबाई शेळके, तेजाबाई कोकणे, सुंदराबाई वाघमारे, वडगाव, जि. नांदेड.

६. विशेष सहकार्य : अनिल गायकवाड, बळेगाव, ता. उमरी, जि. नांदेड.
नामदेव गुंडले, सामाजिक कार्यकर्ते, दाताळा, ता. कंधार, जि. नांदेड.

***



# २. रामपुरीतील भागामाय

**आली आली भागामाय,**
**माझ्या वसरीला दिवा.**
**पतिवरता भागामाय नं,**
**'गुर्ज' सांगून गेली कवा...**

परभणी जिल्ह्यातील पाथरी तालुक्याच्या आग्नेय दिशेला सुमारे १९.२ कि.मी.च्या अंतरावर रामपुरी हे छोटेसे गाव. पाथरीहून शेलूकडे जाताना एक मधेच ढालेगाव फाटा लागतो. तिथून उजव्या बाजूला एक छोटा रस्ता रामपुरीला जातो. मुख्य रस्ता संपल्यानंतर बराच भाग कच्चा रस्त्याचा आहे. आजूबाजूला शेती आणि मध्येच काही भाग उजाड दिसतो. येथे असलेल्या पुरातन रत्नेश्वरांच्या मंदिरामुळे रामपुरी गंगेकाठचे तीर्थक्षेत्र म्हणून सर्वत्र प्रसिद्ध आहे.

रामपुरीजवळ येताना गोदावरी नागमोडी वळण घेत रामपुरीला ती स्पर्श करून पुढे जाते. रामपुरीत प्रवेश करण्यापूर्वी वेशीबाहेरच डाव्या बाजूला श्रावण्या पोतराजाची समाधी लागते. ती खूप दुर्लक्षित अवस्थेत आहे. समाधीच्या बाजूला मरिआईचे शेंदूर लावलेले बरेच दगड ठेवलेले आहेत. तिथेच श्रावण्या पोतराजाची समाधी असल्याचे दाखवले जाते. थोडे पुढे गेल्यास गावाची हद्द सुरू होण्यापूर्वी एक जुनी कचेरी आणि

बाजूला तशीच एक छोटी वास्तू ओसाड अवस्थेत पडलेली दिसते. तिच्या रचनेवरून त्या मुस्लीम राजवटी काळात अथवा त्यादरम्यान या बांधलेली असावी. त्यापुढे गेल्यास डाव्या बाजूला रत्नेश्वर मंदिराकडे कच्चा रस्ता जातो आणि उजव्या हाताला वळल्यास मारूतीच्या याच मंदिरासमोर भागामायची समाधी दिसते. ही समाधी मांग, धनगर, कोळी समाजाच्या वस्तीशेजारी गावाच्या कडेला असलेल्या जागेत असून खूप दुर्लक्षित राहिली आहे. हेच भागामायचे छोटेसे मंदिर म्हणूनही परिचित आहे.

रामपुरी गाव हे रत्नेश्वर या पुरातन मंदिरामुळे प्रसिद्ध आहे. तसे इथे हिंदूंचीही पाच देवळे आणि एक मठ आहे. रामपुरी हे शैवांचे मोठे केंद्र होते. गोदावरीच्या तीरावर उंच ठिकाणी रत्नेश्वराचे सर्वांत प्रसिद्ध मंदिर येथे आहे. गावाची ओळख ही रत्नेश्वरांच्या मंदिरामुळे होत असली तरी रामपुरी हे नाव गावाला का पडले, याच्या अनेक लोककथा येथे सांगितल्या जातात. वनवासात असताना प्रभू राम येथे थांबले होते आणि त्यांनीच येथील रत्नेश्वर मंदिरात असलेल्या शंकराच्या पिंडीची प्राणप्रतिष्ठा केली. या पिंडीवर अभिषेक करण्यासाठी त्यांनी आपल्याकडील बाण जमिनीत मारला आणि त्यानंतर उंचावर पाणी काढले. यामुळे उंचावर असलेल्या या मंदिरातील शंकराच्या शाळुंकेत सतत पाणी वाहत असते, अशी लोककथा प्रचलित आहे. छत्रपती शाहू महाराज यांनी येथे असलेल्या ब्राह्मणांना ताम्रपत्र देऊन त्यांचा गौरव केल्याचा उल्लेख आहे. तर तसेच निजामाच्या काळात निजाम सरकारनेही रत्नेश्वर मंदिर संस्थानाला इनाम बहाल केल्या असल्याचे भी. रा. आरवाड यांनी 'एक गाव एक अभ्यास' या संशोधनपर लेखात म्हटले आहे. शिवाय रामपुरीच्या जवळच असलेल्या राघूडोहच्याही बऱ्याच आख्यायिका गावात सांगितल्या जातात. या डोहात नरबळी दिला जात असे. हे नरबळी विशेषतः अस्पृश्य जातीतील मांग समाजातील प्रामुख्याने असत. येथील स्थानिकांनी दिलेल्या माहितीनुसार इथे मांग समाजातील व्यक्तीला बळी देण्याची प्रथा मागील शंभरएक वर्षांपर्यंत सुरू होती. येथे झालेल्या धरणामुळे पाणी थांबल्यानंतर राघूडोह दिसत नाही. सीताच्या न्हाणीघराचेही असेच झाल्याचे इथे आल्यावर दिसून येते.

रत्नेश्वरांच्या मंदिरांसोबतच येथे दिगंबरपंथी जैन तीर्थंकर वास्तव्यास

असल्याचे दाखले मिळतात. त्याच्या अनेक खुणा रामपुरीत पाहवयास मिळतात. यामुळे या गावात व्यापारी आणि साधक बनलेल्या काही जैनांची जुनी घरे आढळतात. दानशूर जैनांच्या कथाही सांगितल्या जातात. 'रामपुरी हे शैवपंथासोबत जैनांचेही तीर्थक्षेत्र म्हणून ओळखले जात असले तरी इथे भागामाय या देवकरीणच्या माध्यमातून मातृदेवतांच्या परंपरेची मुळे खोलवर रूजली' रत्नेश्वर मंदिर, राघूडोह आणि इतर लोककथांना पुराणात अथवा लिखित प्रमाण आढळत असले तरी त्याहून कैकपटीने अधिक भागामायवर गाणी आणि त्याविषयीच्या लोककथा देवकरीण आणि महिलांकडून सांगितल्या जातात.

भागामाय रामपुरीत कुठून आल्या, त्या कोण होत्या, यावरही बरेच मतभेद आहेत. परंपरेतच त्यासाठी निश्चित अशी माहिती मिळत नाही. परंतु भागामायला जवळून पाहिलेल्या स्थानिकांच्या सांगण्यावरून ती अशीच



एकदा चंद्रपुराहून आली आणि रामपुरीत स्थिरावली. ती कुठून आली, ती कोण होती, हे माहीत नसले तरी गावातील लोकांना त्यांच्याबद्दल अजूनही उत्सुकता संपलेली नाही. यासाठी परभणी जिल्ह्याला लाभलेल्या प्राचीन काळापासूनच्या सांस्कृतिक वारशातून बोध होऊ शकतो. परभणी, बीड, हिंगोली, नांदेड या पट्ट्यात अलीकडच्या काळापर्यंत शाक्तांचा विविध मार्गाने प्रभाव कसा अबाधित होता, याचा उलगडा केल्यास भागामायचे रामपुरीत येऊन स्थायिक होण्याचे उत्तर मिळू शकेल.

'परभणीला जिल्ह्याला 'दक्षिणेची गंगा' म्हणून ओळखली जाणारी गोदावरी नदी लाभली आहे' मराठवाड्यातील गोदावरीच्या तिरावर सातवाहनांच्या पाचशे वर्षांच्या कारकीर्दीत जसा सांस्कृतिक वारसा विकसित झाला, तसाच बौद्धकाळात सम्राट अशोकाच्या अनुयायांनी परभणीसह मराठवाड्यातील अनेक जिल्ह्यांत आपला सांस्कृतिक

विकासाचा पाया रूजवला होता. पैठणला यामुळेच एक सांस्कृतिक आणि वैचारिक अधिष्ठान लाभले. तसेच गोरखनाथ, गहिनीनाथ यासारखे नाथपंथीय या जिल्ह्यात गोदावरी वास्तव्याला आल्याचे उल्लेख आढळतात. ज्या भागवत धर्माची पताका अखिल भारतात पोहोचवली ते भागवत धर्माचे संस्थापक संत शिरोमणी संत नामदेव महाराज याच जिल्ह्यातील होते. त्यांचा जन्म नरसी येथे (इ. स. १२७०) झाला होता. हिंगोली जिल्ह्याची निर्मिती झाल्याने नरसी हे गाव हिंगोली जिल्ह्यात गेले. तर संत जनाबाई ही (इ. स. १२६०-१३५३) याच जिल्ह्यातील गंगाखेडच्या. संत नामदेवांचे गुरू म्हणून ओळखले जाणारे विसोबा खेचर हे संतही याच जिल्ह्यातील होते. महानुभाव पंथाचे साहित्य ज्यांच्यामुळे अजरामर झाले ते थोर कवी भास्करभट्ट बोरीकर हे जिंतूर तालुक्यातील कासार बोरीचे असल्याचे काही संशोधकांना वाटते. दत्त संप्रदायाचे योगानंद सरस्वती तथा गांडा महाराज याशिवाय वैदिक परंपरा चालविणारे रंगनाथ स्वामी मोगरीकर, रंगनाथ महाराज परभणीकर, वारकरी परंपरेतील निवृत्तीबुवा ठाकूर, तुकाराम महाराज येळेकर, संत योगानंद स्वामी महाराज, सखाराम महाराज, संतबुवा महाराज आदी अनेक परभणी जिल्ह्यात होऊन गेले आहेत.

परभणी आणि परिसरावर शाक्त पंथाचे मोठे वर्चस्व होते. याचे अनेक दाखले उपलब्ध आहेत. सुमारे दीडशे वर्षापर्यंत वसमत येथे शुकानंद महाराजांचा मठ यासाठी प्रसिद्ध आहे. शुकानंद महाराज यांनी या परिसरात मोठ्या प्रमाणात शाक्तांचा प्रसार केला होता. ते योगी म्हणूनही ओळखले जात होते. त्यांनी संस्कृतसह मराठी भाषेतून मोठ्याप्रमाणात लिखाण केलेले आहे. त्यातील काही दस्तावेज वसमत येथील मठात शिल्लक आहेत. शाक्त पंथांचा प्रचार आणि प्रसार करत असताना त्यांनी अस्पृश्य समाजात आणि विशेषतः बलुतेदार वर्गात आपली एक छाप निर्माण केली होती. त्यांनी केलेल्या शाक्त पंथाच्या प्रसाराचा प्रभाव परभणी आणि जिल्ह्यात असलेल्या शैवांवर पडणे स्वाभाविक होते. त्यातच रामपुरी ही जसे जैनांचे तीर्थक्षेत्र होते, तसेच ते शैवांचेही तीर्थक्षेत्र म्हणून नावारुपाला आले होते. रत्नेश्वर मंदिर याची साक्ष देते.

मंदिराची रचना त्याचा कालावधी लक्षात घेतल्यास अनेक बाबींचा

उलगडा होऊ शकतो. त्यातच या मंदिराजवळ असलेल्या राघूडोहाची निमितींच मूळात शैव आणि शाक्तांच्या विरोधात झाली असावी. शाक्तांची सुरू असलेली परंपरा ही भागामायला रामपुरीत स्थिर होण्यास मदत ठरली असावी. त्यामुळे ती कुठून आली, याची माहिती मिळत नसली तरी तिने मातृदेवतांची परंपरा या परिसरात रुजलेल्या शाक्तांच्या आधाराने अधिक बळकट केली असावी.

नारायण गोडबोले यांनी भागामायला जवळून पाहिले होते. ते त्यांच्या अनेक आठवणी सांगतात. गावातील एक मांग, एक कोळी आणि एक मराठा त्यावेळी चंद्रपूरला गेले होते. ते परत येताना त्यांच्यासोबत भागामाय आली. इथे आल्यावर भागामाय ही सुंदरवाड्यात एक वर्षभर राहिली. भागामाय गावात आल्यापासून गावात कॉलरा आणि इतर महारोगाने मरणाऱ्या लोकांची संख्या कमी झाली. यामुळे लोक भागामायला खूप मानू लागले.

भागामायने दिलेल्या भंडाऱ्याच्या चुटकीने अनेक जणांचा कॉलरा, ताप आणि इतर आजार पळून जायचे. यामुळे भागामाय ही गावासाठी वरदान ठरल्या होत्या. गावावर कोणतेही संकट आले की, लोक भागामायकडे येऊन ते दूर करा, म्हणून विनंती करायचे. एकदा गोदावरीला महापूर आला होता. या महापुराने गावाला घेरले होते. आता गाव या पुरात वाहून जाणार अशी भीती सर्वांना वाटत असताना गावातील लोकांनी भागामायकडे धाव घेतली. 'माय आता तूच यातून गावाला वाचव' अशी याचना, विनंती केली. तेव्हा भागामाय उठल्या आणि जिथंपर्यंत गंगेचे पाणी आले होते, तिथे जाऊन थांबल्या. मायगंगेला तिच्या भाषेत हाक मारली. थोडासा भंडारा उधळला. काही क्षणाच्या आतच गावात शिरलेले पुराचे पाणी मागे सरले. भागामायच्या या चमत्कारामुळे गंगेला येत असलेल्या पुरातून गावाची सुटका झाली. याचे साक्षीदार आपण स्वतः होतो, अशी माहितीही गोडबोले यांनी दिली.

रामपुरी गावातील जनमाणसांमध्येही भागामायच्या अनेक लोककथा, आख्यायिका आणि चमत्काराच्या कथा सांगितल्या जातात. एकदा गंगेच्या पलीकडे कनकशेठ नावाच्या मारवाड्याला मूल होत नव्हते. तो मारवाडी भागामायच्या चमत्काराच्या कथा ऐकून रामपुरीत आला. त्याने भागामायला

आपल्याला मूल व्हावे यासाठी याचना केली. त्यानंतर वर्षभरातच त्या मारवाड्याला मूल झाले. अशा असंख्य कथा सांगितल्या जातात. भागामाय मारवाड्याला प्रसन्न झाली, ही गोष्ट आजूबाजूच्या गावांमध्ये पसरल्यानंतर भागामायची मोठी ख्याती झाली होती. आपल्याला मूल झाल्याने त्या मारवाड्याने त्यावेळी रामपुरीत आपल्या मालकीची सुमारे १२ एकर जागा भागामायला इनाम म्हणून दिली. आता या इनाम मिळालेल्या जागेपैकी केवळ भागामायच्या समाधीची जागा शिल्लक राहिली आहे. शाक्त परंपरेत संपत्ती गोळा केली जात नाही. भागामाय ही एक योगिनी होती. यामुळे तिने आपल्याला मिळालेल्या या १२ एकर जमिनीतून जे अन्नधान्य मिळायचे ते एकूणएक दान करायच्या. आलेल्या लोकांना जेवणावळी घालायच्या. कमीच पडले तर गावात आणि आजूबाजूंच्या गावात अनेकदा भिक्षा मागून लोकांना जगवायच्या, अशा त्यांच्या अनेक आठवणी स्थानिक, महिला, देवकरीण सांगतात.

आता भागामायच्या समाधीची जागा सोडली तर कनकशेठ यांनी दिलेली १२ एकर जमीन उरली नाही. भागामायच्या खांद्याला खांदा लावून रामपुरीला मातृदेवतेच्या चळवळीला बळ देणारा श्रावण्या पोतराज हा भागामायचा वारसदार होणे अपेक्षित होते. परंतु तो होऊ शकला नाही. भागामायच्या चळवळीशी त्यावेळी इतका जवळचा संबंध नसलेल्या जिजामाय या अचानकपणे वारसदार म्हणून पुढे आल्या. आज त्याच भागामायच्या गादीवर बसल्या आणि श्रावण्या अखेरपर्यंत दूरच राहिल्याचे भागामायची परंपरा चालवणारे शिष्य सांगतात. तरीही जिजामाय यांनी भागामायची समाधी आणि तिची परंपरा जतन करून ठेवली असल्याचे या समाधीस्थळाजवळ गेल्यानंतर दिसून आले.

भागामायच्या निधनापूर्वी काही वर्षे अगोदर भागामायप्रमाणेच श्रावण्याचेही तितकेच नाव धुरपतामायच्या चळवळीत अग्रक्रमाने घेतले जायचे. मात्र, याच काळात भागामायकडे पोतराजांसोबत देवकरीणचाही मोठा समूह गोळा झाला होता. त्याच दरम्यान, काही तरी वाद टोकाला गेल्याने श्रावण्या आणि भागामाय एकमेकांपासून दुरावले. काही फर्लांगांच्या अंतरावर श्रावण्याचे घर असतानाही श्रावण्या पुढील काळात भागामायकडे फिरकला नाही. इथपर्यंत तो वाद विकोपाला गेला होता.

याच वादापूर्वी भागामायकडे इनाम म्हणून मिळालेली जमीन आणि भक्तांकडून मिळणारे दान बऱ्यापैकी येत होते. त्याच वेळी आता गादीवर बसलेल्या जिजामाय यांचा इकडे प्रवेश झालेला होता. त्या कुठून आल्या आणि त्यांनी भागामायला कसे आपलेसे केले, याबद्दलही अनेकांच्या मनात प्रश्नचिन्ह आहेत.

भागामायच्या मृत्यूनंतर त्यांची ही चळवळ वाढणे अपेक्षित होते; परंतु दिवसेंदिवस लोक कमी होत गेले. जिजामाय केवळ गादीवर बसलेल्या आहेत, म्हणूनच लोक सन्मान करतात. बाकी भागामायबद्दल त्यांच्याकडून चांगले शब्द ऐकायला मिळत नाहीत. भागामायने गुरूमंत्र दिलेल्या अनेक पोतरांजानी जिजामायच्या एकूणच वागण्यावर अनेकदा आक्षेप घेतलेले आहेत. त्यांनी भागामायला मिळालेली जागा विकली नसती तर हजारो भक्तांनी भागामायच्या नावावर इथे येऊन सेवा केली असती. त्यातून अनेक गरीब पोतराज-देवकरीण यांना एक आधार मिळाला असता, अशा भावना काही पोतराजांनी व्यक्त केल्या. यामुळे परभणी जिल्ह्यापासून ते चंद्रपुरापर्यंत आपल्या नावाचा दरारा असलेल्या भागामायची परंपरा तिच्या मृत्यूनंतर प्रभावीपणे चालवता आली नाही. आज जे काही चित्र आहे, ते केवळ भागामाय आणि तिच्या शिष्यांकडून तयार झालेल्या चळवळीतून दिसते. तिच्या शिष्यगणांनी जपलेल्या मौखिक परंपरेतून माध्यमातून भागामाय या जिवंत आहेत.

**भागामायं सेवं झाल्या,**
**जनीमनी झाल्या झाल्या.**
**पतिवरता भागामायचा,**
**चूडा समाधीतं...**
**भागामाय सेव झाल्या,**
**शंभर वर्षाच्या वयातं..**
**माझ्या भागामायचा,**
**चूडा वाजतो समाधीतं.**
**भागामायच्या समाधीतं...**
**दिवा जळतो तुपाचा,**

## तसा उजेड पडला,
## माय तुमच्या रूपाचा...

गोडबोले सांगतात की, भागामायच्या अंगात वारं आले की, तिच्या तोंडून खडीसाखरेचे मोठे खडे पडायचे. ते आम्ही खाल्ले असल्याची हकीगतही त्यांनी सांगितली. 'त्या वेळी आम्ही लहान होतो. त्यावेळी भागामाय आम्हाला 'पोरंहो!, पाणी द्या रे!, पोरंहो हे काम करा रे!' असे सांगायच्या. लगेचच आम्ही भागामायचे काम ऐकायचो!. भागामायचे वर्णन करताना गोडबोले म्हणाले, 'भागामायसारखी बाई गावात नव्हती. ती महापतिव्रता होती. अंगात वारे आल्यास एखादी वीज कडाडते की काय, असा लोकांना भास होत असे. ती योगिनी होती, देवी होती. तिच्या आशीर्वादाने हे गाव चालायचे'.

भागामायच्या समाधीशेजारी एक हिरवेगार कडूलिंबाचे झाड उभे आहे. ते गोडबोले यांनी तरूणपणात लावले होते. त्याचीही मोठी रंजक माहिती त्यांनी दिली. 'मी कोळी आहे. एकदा गंगेहून पखाल भरून आणायला गेलो होतो. तर एक लहान पोखारा वाहून आला होता. पखाल भरताना तो माझ्या माशाच्या दोऱ्याला लागला. काय आलं म्हणून हातात घेऊन पाहिलं तर लिंबाचा बोटाएवढा मूळ असलेला पोखारा होता. त्याला पाहिलं तर तो मुळीसह उपटून आलं होतं. इथं आणलं, एक कंबरं इतकं खंदून त्याला लावलं आणि तो एवढा मोठा झाला.' त्यांनीच आपल्या लहानपणी ऐकलेले हे गाणे ऐकवून दाखवले -

**चांदगडीयाला जायया,**
**मनं माझं गं राहू जावूं..**
**संगं भागा गं मायला नेवूं.**
**चांदगडीयाला गं जायया,**
**मला लागं ना गं भूकं,**
**माय माझ्या गं धुरपतानं,**
**गेली कवागडला तापं..**
**चांदगडीयाला जायया,**
**मनं माझं गं राहू जावूं,**

**माय माझ्या धुरपतानं,**
**चिठुया पाठ गं इल्या दोनं.**
**चांदगडीयाला जायला,**
**पाहू नका गं म्हागं म्होरी,**
**वाटं सरगाची दोरी.**
**माय माझ्या गं भागामायची,**
**वाटं सरगाची दोरी.**
**माय माझ्या गं धुरपतानं...**
**चांदगडीयाला गं जायया,**
**खडे रुतती पायाला,**
**माय माझी गं धुरपता,**
**आली सतवं पाहायाला.**
**माय माझी गं भागामाय,**
**आली सतवं पाहायाला...**

भागामाय चंद्रपूरला निघण्यापूर्वी रामपूरीत एक उत्सवाचे वातावरण असायचे. गावातील प्रत्येक नागरिकांना याबद्दल एक उत्सुकता वाटायची. त्या वेळी अनेकजण या दिवसाची वाट पाहत असत असल्याची माहिती सध्या त्यांच्या गादी सांभाळणाऱ्या जिजामाय यांनी दिली.

'भागामायसोबत त्यावेळी पोतराज, देवकर यांचा मोठा राबता असायचा. त्यांचे झेंडे, अब्दागिरी आणि देवकरणींचा जथ्था निघाला की, गावच्या गावे तिच्यापुढे नतमस्तक व्हायची. ज्या दिवशी यात्रेला निघायचा दिवस ठरलेला असायचा, त्यादिवशी त्या सकाळी भंडाऱ्याचा म्हणजेच हळदी कुंकूचा पहिला मान देण्यासाठी मांगवाड्यात जायच्या. तो मान दिल्यानंतर त्या सुताराच्या घरी जायच्या. त्यानंतर त्या घरी येत. मग घरून गावातील मरिआईला जात असत. तिथून आल्या की, त्यांच्यासाठी दूरदूरून आलेल्या आपल्या भक्तांना जेवू घालत.'

भागामाय वैशाखी पौर्णिमेला हिल्लाळ काढत असे. हिल्लाळ म्हणजे आईच्या दर्शनासाठी मोठा समुदाय वाजतगाजत देवीकडे घेऊन जाणे. या हिल्लाळात पुन्हा गावातील आईला नैवेद्य चढविण्याचा एक मोठा उत्सव

असतो. असाच हिल्लाळ अनेक देवकरीण एकत्र येऊन धुरपतामायच्या मंदिरात काढतात. रामपुरीतील हिल्लाळही मोठा उत्सवाचा असतो. या उत्सवात भागामायसोबत गावातील महिला आणि पुरुषही सहभागी होत असत. हलगी, सूर सनई वाजवत आईला नैवेद्य त्या घेऊन जात. दुपारी तिथे आईला नैवेद्य चढविले जायचे. पौर्णिमेच्या रात्रीला तर सर्व गाव जागे असायचे. या रात्री आईजवळ रात्रभर पोतराज आणि आईचे गाणे गायिले जायचे. हा कार्यक्रम रात्रभर चालल्यानंतर पहाटे पाच वाजता आईची ओटी भरली जायची. यासाठी तिथे आलेल्या प्रत्येक सुवासिनीला मोठा मान मिळायचा. तिथून मग त्यांना निरोप दिला जायचा. दसऱ्यातही आलेल्या आपल्या भक्तांना भागामाय खूप सांभाळत असत. कोणीही जेवण पाण्यावाचून राहणार नाही, याची ती स्वतः काळजी घेत. त्यावेळी त्या गावात भिक्षा मागून जमवलेले सर्व धान्य गोळा करून आलेल्या लोकांना त्याचे जेवण करून घालत असायच्या. लोक कितीही आले तरी भागामायकडे कधीही ते कमी पडत नसे.

जिजामाय सांगतात, 'पुसाच्या पौर्णिमेला आम्ही आता ५०० पानांचा विडा कुटून त्याचा प्रसाद म्हणून देतो. त्यावेळी पोतराजासोबत देवकर, देवकरीण आणि काही आराधीही येतात. या पौर्णिमेच्या रात्री मोठा कार्यक्रम असतो. रात्रभर मायचे गाणी गातात. सकाळी पाच वाजता आरती करून मायची ओटी भरण्याचा कार्यक्रम होतो. त्यानंतर आलेले लोक आपापल्या गावी निघायला तयार होतात.'

या ओटीमध्ये खण, नारळ आणि सोबत फळेही येथे आलेल्या प्रत्येक महिलेच्या ओटीत भरले जाते. त्याशिवाय पुरुषांना धोतर असल्यास त्या अथवा रूमालात ही ओटी देऊन त्याचा सन्मान केला जातो. मात्र महत्त्वाचा मान हा महिलांचा असतो. ओटी भरताना मायचे वेगळे गाणे यावेळी गायिले जातात. भागामाय या खूप सुंदर होत्या. त्यांच्या सौंदर्यावरही खूप गाणी म्हटली जातात.

**पतिवरता भागामाय, हिची बारीक कंबरं.**
**नेसली व्हम्याचं पातळं, पाडीली मिऱ्या शंभर....**
**रामपुरी नगरातं,अंगण वली कशानं गं झाली ?**

**माय माझी भागामाय, केसं वाळवितं आली गं...**
**रामपुरी नगरातं, वाट दगडं-धोंड्याची..**
**मला सडक वाटली गं.. धुरपतामाय...**

अशा अनेक गाण्यांतून भागामायचे सौंदर्य, तिचे वर्णन देवकरीण प्रगट करत असतात.

**रामपुरी गावाच्या शिवाला,**
**भंडार वाटीला गावाला.**

**संदर्भ / माहिती :**

१. भागामायची माहिती : गंगुबाई देवकरीण, परभणी.
शंकर (बंडू) देवकर, पाथरी जि. परभणी.
२. भागामाच्या आठवणी : नारायण गोडबोले, रामपुरी,जि. परभणी.
३. हिल्लाळचा कार्यक्रम : जिजामाय देवकरीण, रामपुरी, जि. परभणी.
४. महाराष्ट्र पुरातत्त्व वार्षिक अहवाल क्र.१,२००३-२००४ : पृ. ६३५, ६३७, ५६३, ५६४, ५६५, ५६७, ५६८, ५६९, ५७१.

***



# ३. श्रावण्या पोतराज

**रामपुरी नगरातं.**
**पोतराज आला कोण नवा?**
**पतिवरता भागामाय,**
**लिंबं उतरून दाखवा.**
**रामपुरी नगरातं...**

भागामायचा सर्वांत जवळचा आणि विश्वासाचा पोतराज म्हणून श्रावण्या पोतराजाची ओळख आहे. रामपुरीतील मांगवाड्यात एक छोट्याशा घरात श्रावण्या पोतराजाचे एक छायाचित्र त्यांच्या वंशजाकडे मिळाले. ढालेगाव फाट्याहून येताना रामपुरीत शिरण्यापूर्वीच डाव्या बाजूला एक मरिआई आणि शेजारीच श्रावण्या पोतराजाची समाधी दिसते. मोठ्या लिंबाच्या झाडाखाली ही समाधी आहे. हे झाड श्रावण्याला आपली छाया देते, असा काही गाण्यात उल्लेख येतो. बाजूला असलेल्या मरिआईच्या मंदिराला थोडासा ओटा बांधून त्यावर पत्रे टाकण्यात आली आहेत. त्याच बाजूला इतरही काही शेंदूर लावलेली दगड ठेवण्यात आली आहेत. श्रावण्याच्या समाधीची बरीच दुरवस्था झालेली आहे. अनेक दगडही निखळून बाजूला पडलेले असून त्यावर बरेच तण वाढलेले आहे. मधोमध एका दगडावर खूप महिन्यांपूर्वी कोणीतरी शेंदूर लावल्याची खूण दिसते.

'श्रावण्या खूप ताकदवान आणि एक दरारा असलेला पोतराज होता. तो शंभर वर्षांहून अधिक जगल्याचे नातेवाईक सांगतात. त्यामागे आता त्याचा मुलगा धुराजीही पोतराज झाला आहे. एकीकडे वडिलांचा वारसा चालवत दुसरीकडे कुटुंबाची जबाबदारी पार पाडताना धुराजीला वडिलांइतका आपला दरारा निर्माण करता आला नाही.'

धुराजीला रत्नाकर आणि श्रीपत अशी दोन मुले आणि भाग्यश्री व सरस्वती दोन मुली. मार्गवाड्यात पाण्याच्या टाकीशेजारी एका कडेला श्रावण्या पोतराजाचे घर आहे. त्यातच आपल्या वडिलांची ओळख म्हणून धुराजीने एक मोठे छायाचित्र जपून ठेवले आहे. श्रावण्या पोतराजाच्या अंगावर कायम असलेला चाबूक आता धुराजीला वारसाने मिळाला आहे. धुराजीने तो आपला वारसा जपत आणि आपल्या वडिलांची एक आठवण आणि जबाबदारी म्हणून सांभाळला आहे. भागामायच्या दर्शनाला आलेले भाविक श्रावण्या पोतराजाचे घर कुठे आहे, हे शोधत येतात. घरात ठेवलेल्या फोटोपुढे आपले डोके टेकवून दर्शन घेतात.

'भागामायने सुरू केलेल्या मातृदेवतेच्या चळवळीत श्रावण्या पोतराजाचेही मोठे योगदान राहिलेले आहे. चंद्रपूरला भागामायची पायी वारी निघाल्यास सर्व नियोजन करण्याची, रामपुरीपासून ते चंद्रपूरपर्यंतच्या अनेक पायवाटा शोधून त्यातून रस्ता काढण्याची जबाबदारी ही श्रावण्या पोतराजावर असायची. अनेक डोंगर कपारीतून गाडी कुठून घेऊन जायची याची खडान्‌खडा माहिती या श्रावण्या पोतराजाला होती. यामुळे भागामायच्या चळवळीचा तो एक सेनापती म्हणूनही ओळखला जायचा. म्हणूनच त्याचा उल्लेख भागामायवरील अनेक गाण्यांतून येत असतो.'

**भागामाय सेव झाल्या,**
**चुटका लागली गावाला.**
**श्रावण पोतराज सेवाला गं..**
**धुरपतामाय....**

गंडीपाटीवर अनेकदा बैलगाडी चढत नसे. त्या वेळी हाच पोतराज गाडीला ठिकठिकाणी सोल, दोरखंड लावून ओढत असे. रामपुरीहून

चंद्रपूरला निघालेल्या पायी यात्रेचा कुठे मुक्काम करायचा. दुपारी जेवणाची वेळ कुठल्या पाणवठ्यांवर ठेवायची, हे सर्व ठरविण्याचे अधिकार श्रावण्याला होते. भागामायचा त्याच्यावर खूप विश्वास होता. रामपुरीहून निघालेली ही पायी यात्रा आणि त्यात सहभागी झालेले लोक परत रामपुरीला आणून सोडण्याची मुख्य जबाबदारीही श्रावण्यावर होती. ती जबाबदारी तो चोखपणे पार पाडत असे. डोंगरदऱ्यांतून वाट कुठे जाते, याची माहिती श्रावण्याला होती. यामुळे यात्रेला निघालेल्या प्रत्येकाचा त्याच्यावर विश्वास आणि



तितकाच दराराही असायचा. सहा फुटांच्या दरम्यान उंची, सावळा रंग आणि भारदस्त देहयष्टी असलेल्या या पोतराजाला लोक घाबरूनच असायचे. दणकट शरीराप्रमाणे आवाजही मोठा खणखणीत होता. सहज आरोळी मारली तरी दोन-अडीच कि.मी.वरच्या माणसाला आवाज जायचा. श्रावण्याच्या अंगात हत्तीचे बळ होते. तो खूप ताकदवान असल्याचे अनेक गाण्यातून संदर्भ येतात. अनेक गावात जाऊन भिक्षा मागणे आणि त्यावरही आपल्या कुटुंबांची आणि आपल्यासोबत असलेल्या इतर लोकांची गुजराण करत.

श्रावण्या गावात आल्याची ओळख लोकांना त्यांच्याकडे असलेल्या हलगीच्या आवाजाने होत. गावातील प्रत्येक महिला मोठ्या सन्मानाने त्याला आपल्या सुपात आणून धान्य देत. आणलेले प्रत्येक धान्य आपल्या झोळीत टाकण्यापूर्वी श्रावण्या आपल्याकडे असलेला भंडारा त्या महिलांना लावत त्यांनी आपल्यासोबत आणलेले कुंकूही त्यांना लावत. 'तुझा वेल मांडवाला जाऊ दे!' असा आशीर्वाद देत. त्या महिलांनी आणलेले धान्य सुपावर गोल फिरून नाचवताना संपूर्ण परिसर श्रावण्याकडे बेभान होऊन पाहत असे. त्याच्यासोबत असलेल्या हलगीचा ठेका, पायात असलेल्या घुंगरासारख्या वाळ्याचा आवाज आजूबाजूच्या लोकांना बेभान करायचा. त्याची ही ओळख परभणीपासून चंद्रपूरपर्यंतच्या

केवळ यात्रेतच नाही, तर अजूनही गावागावांमध्ये राहिली आहे. भागामायच्या समाधीला दर्शन घेण्यासाठी आलेला प्रत्येकजण श्रावण्या पोतराजाच्या समाधीला शोधत जातो आणि तिथे येऊन आपले डोके टेकवतो. 'मराठवाड्यातील शेकडो पोतराजांचा श्रावण्या खरे तर एक प्रकारचा 'आयडॉल' होता' या आयडॉलचे २९ नोव्हेंबर १९९६ रोजी निधन झाल्याचे नातेवाईकांनी त्याच्या छायाचित्रावर नोंद केली आहे.

धुरपतामायच्या परंपरेत प्रत्येक पोतराज हा आपण श्रावण्या पोतराज असल्यासारखे सांगतात. श्रावण्याचा वारसा केवळ त्याच्या मुलानेच नाही, तर आजूबाजूच्या परिसरातील जिल्ह्यातील शेकडो पोतराजांनी सुरू ठेवला आहे. श्रावण्या हा भागामायच्या सेवेला तत्पर हजर राहणारा एकमेव पोतराज होता. भागामायचा अत्यंत जवळचा आणि तितकाच विश्वासू होता. भागामायच्या अखेरच्या काळापर्यंत सर्वात मोठी साथ श्रावण्याने दिली होती. परंतु भागामायच्या निधनापूर्वी श्रावण्याच्या विरोधात काही तरी वाद निर्माण झाल्याने मातृदेवतांचा वारसा जतन करणारी ही देवकरीण-पोतराजाची जोडी अखेरपर्यंत एकत्र टिकून राहिली नाही. त्यामुळे नंतरच्या काळात अनेक पोतराजही भागामायपासून दूर गेले. त्या वेळी तरुण असलेल्या आणि आता गादीवर बसलेल्या जिजामायची भागामायला सोबत भेटली, परंतु श्रावण्या पोतराजामुळे मिळालेले बळ भागामायला शेवटच्या काळात टिकून राहिले नाही. वादामुळे अखेरीसही ते बळ आणि सोबतही मिळू शकली नसल्याची खंत पोतराज व्यक्त करतात. भागामाय आणि श्रावण्याचे नाते हे एका आई आणि मुलांप्रमाणे गुरू आणि शिष्याप्रमाणे होते. याची जाणीव देवकरीण आपल्या गाण्यातून व्यक्त करत असतात.

**भागामायचा गं डबा,**
**कोणी ठेवला अंधारात?**
**माय माझ्या भागामायचा,**
**सरावण्या लेकं...**

हा लेक आपल्या आईपासून शेवटच्या काळात का दूर झाला, याची ही खंत देवकरीण आपल्या गाण्यातून व्यक्त करतात. आपल्या आईच्या

मांडीवर एखादे मूल कसे खेळते, बागडते तसे श्रावण्याचे हे नाते होते.

**भागामायचा गं डब्बा,**
**कोणी आणला उजेडात.**
**माय माझ्या भागामायच्या**
**मांडीवरी सरावण्या गं...**

भागामाय आणि श्रावण्या पोतराज यांच्यातील संवाद, त्यांनी केलेल्या कार्यक्रमांची माहिती अजूनही अनेक लोक सांगत असतात. अनेक आख्यायिका लोक सांगतात. भागामायपेक्षा श्रावण्या अधिक वर्षे जगला. भागामायला ते भाग्य लाभले नाही. भागामायपेक्षा श्रावण्या लहान असला तरी तो भागामायला 'भागे' म्हणूनच बोलत असे. परंतु त्या 'भागे' म्हणण्यातही त्याची भावना ही पवित्र असायची.

**काय वाजतं गाजतं,**
**माय माझ्या भागामायचं,**
**लग्नं देवीचं लागतं...**
**रामपूरी नगरातं...**
**रत्नं लंय कोनं वं महाराज,**
**आसं मारुतीचा कुंभ,**
**नं भागामायची समाधी...**

भागामायची शिष्यपरंपरा ही सुमारे दोन लाखांच्या दरम्यान असावी. भागामायचे निधन हे १९७२ साली झाल्याचे सांगितले जाते. भागामायपेक्षा श्रावण्या वयानेही खूप लहान होता. म्हणून तो १९९६ पर्यंत जगला. भागामायच्या निधनाची तशी नोंद कुठेही भेटत नाही. मात्र त्यावेळचे अनेक साक्षीदार सांगतात की, भागामायने आपल्या मृत्यूची माहिती चार दिवसांपूर्वीच दिली होती. योगिनीसारखे जीवन जगल्याने त्यांच्यावर त्यावेळी अनेकांनी विश्वासही ठेवला होता.

भागामायचे निधन झाले असे भक्त कधीही बोलत नाहीत. तर त्या 'सेव' झाल्याचे, चंद्रपूरला गेल्याचे सांगतात. भागामायच्या निधनाच्या प्रसंगाचे गावात अजूनही काही साक्षीदार असून त्यांचे निधन झाल्यानंतर

गावातून त्यांची मिरवणूक काढून त्यांना अखेरचा निरोप देण्यात आला. निधनाच्या प्रसंगी संपूर्ण गाव आणि आजूबाजूचे शेकडो भक्त त्यावेळी सहभागी झाले होते.

**भागामाय सेव झाल्या,**
**रामपुरी गावाच्या शिवाला.**
**भंडार वाटीला गावाला**
**गं, धुरपतामाय...**

भागामायच्या निधनाने केवळ रामपुरी गावच नाही, जवळच्या काही गावातील लोकांनी शीवेपर्यंत भंडारा वाटून भागामायला निरोप दिला होता. हा निरोप आणि त्यासाठीचे वर्णन त्यांच्यावरील अनेक गाण्यातून येते. भागामायची मारूतीच्या मंदिरासमोर ज्याठिकाणी आज समाधी आहे, ती जागासुद्धा शितळ म्हणजे खूप पवित्र असल्याची भावना भक्त आपल्या गाण्यातून व्यक्त करतात.

**भागा माय सेव झाल्या,**
**जागा पाहुन शितळ,**
**आल्या गंगाला न्हावून गं..**
**धुरपतामाय...**

भागामायला कापूर, भंडाऱ्याने भरलेल्या खोल खड्ड्यात समाधी देण्यात आली. त्यावेळी सर्व गाव भागामायच्या अंत्ययात्रेत सामील झाला होता. त्या गावाची एक रक्षणकर्तीच आपल्यातून निघून गेली की, काय असे वातावरण निर्माण झाले होते. असे त्यावेळचे साक्षीदार सांगतात. याच समाधीवर आज भागामायचे छोटे मंदिर उभे आहे.

भागामायच्या निधनावर असंख्य गाणी आहेत. त्यांनी समाधी कशी घेतली, त्या 'सेव' कशा झाल्या याचे नांदेड, परभणीत वेगवेगळी गाणी त्यांचे भक्त गातात. त्या शंभर वर्षात 'सेव' झाल्या, त्यांच्या समाधीत अजूनही चुडा समाधीत वाजतोय असा विश्वास अनेक गाण्यांतून व्यक्त केला जातो.

आली आली भागामाय,
माझ्या वसरीला दिवा.
पतिवरता राजामाय नं,
गुजं सांगून गेली कवा...
आली आली भागामाय,
माझ्या वसरीला बसं.
घेते व्हमाचं पातळ,
घडी उकळून नेसं.
पतिवरता भागामाय,
हिची बारीक कंबरं,
नेसली व्हम्याचं पातळ,
पाडिली मिऱ्या शंभर...
बाई तांब्याची घागरं,
वरती भंडाऱ्याची गोणी,
पतिवरता भागामाय नं,
करते सती देवकरीण खरी...

**स्थानिकांकडून मिळालेली माहिती :**

१. श्रावण्या पोतराजाची माहिती : धुराजी पोतराज (मुलगा), लक्ष्मीबाई (सून).
२. श्रावण्यावरील गाणी : स्थानिक पोतराज,नातेवाईक, स्थानिक रहिवाशी.
३. शंकर (बंडु) देवकर, पाथरी जि. परभणी.

***



# ४. शेलगावची यमुनामाय

**माय म्हझी यमुनामाय,**
**हाय जगावूनं जबरं...**
**उभी एका भेटं पायावरं,**
**ठेवते भक्तावर नजरं...**

यमुनामायचे शेलगाव गाव हे नांदेड जिल्ह्यातील उमरी तालुक्यापासून सुमारे २० कि.मी.च्या जवळपास आहे. मूळ शेलगाव आणि नव्याने झालेली वस्तीत आता बरेच अंतर पडले आहे. उमरी-नांदेड रस्त्याच्या कडेला नवी आबादी म्हणून विकसित झालेल्या गावालाही शेलगाव म्हणूनच ओळखले जाते. मूळ शेलगाव आणि नवीन गावात साधारणपणे एक-दीड कि.मी.चे अंतर असावे. मूळ शेलगावात यमुनामायची समाधी आहे. ही समाधी गावाच्या पूर्वेला एका रस्त्याच्या बाजूला तर रस्त्याच्या दुसऱ्या बाजूला यमुनामायचे मंदिर उभारण्यात आले आहे.

राजामायच्या मंदिराएवढेच हे मंदिरही छोटेखानी आहे. गावाच्या कडेला भोई आणि मांग समाजाची वस्ती असून, त्याशेजारी हे मंदिर

आहे. या मंदिराची ओळख ही यमुनामायचे मंदिर म्हणून असले तरी ते यमुनामायच्या निधनापूर्वीच काही वर्षे अगोदर उभारण्यात आले आहे. यमुनामाय या चंद्रपूरला जाण्यापूर्वी इथे हिल्लाळचा मोठा कार्यक्रम करत असत. यमुनामायच्या जिवंतपणीच येथे मूर्ती स्थापन करण्यात आली होती. यमुनामायसोबत त्यावेळी कोणते पोतराज आणि त्यांच्या नावाची नेमकी माहिती उपलब्ध नाही. परंतु त्यांच्यासोबत असलेल्या एका पोतराजाची आठवण म्हणून त्याचा चाबूक आणि भंडाऱ्याची पिशवी या मंदिरात ठेवण्यात आली आहे. त्यासोबतच यमुनामाय या धुरपतामायच्या यात्रेसाठी निघायच्या त्या वेळेपासूनच्या त्यांच्या तख्तातील चाबूक, भंडाऱ्याची पिशवी आणि यमुनामायला आपल्या भक्तांनी वाहिलेले साडी, खण आदी वस्त्रे, हिरव्या बांगड्या आदी येथे ठेवण्यात आल्या आहेत. त्यासोबतच येथे अनेक देवादिकांचे फोटोही लावण्यात आले आहेत. मंदिराच्या बाजूलाच यमुनामायची समाधी आहे. ती खूप दुर्लक्षित आहे. आजूबाजूचे अनेक दगड पडल्याने ती मोडकळीस आली असून, यमुनामायचे मूळ वंशजच या मंदिराची आणि समाधीची देखभाल करत असतात. मागील काही वर्षांमध्ये येथे चंद्रपूरच्या यात्रेपूर्वी मोठी यात्रा भरली जाते. ती यात्रा आता प्रचलित होताना दिसते.

**शेलगाव नगरात, सवा खंडीचा पुरण,**
**लावा चांदीचे दुरणं यं, धुरपताबाई...**
**अन पतीवरता भोजनं यं, धुरपताबाई**

यमुनामाय यांच्या या समाधीची देखभाल नीट न झाल्याने ती बरीच मोडकळीस आली होती. आता त्यात बरीच दुरुस्ती करण्यात आली. आताचे सर्वच वंशज हे मूळ शेलगाव सोडून नवी आबादीत राहायला गेल्याने त्याकडे दुर्लक्ष झाले असावे. यमुनामायच्या समाधीवर दोन पदचिन्ह ठेवण्यात आले असून, त्यावर हळदकुंकू लावले जाते. यमुनामाय ही भोई म्हणजेच कोळी समाजाची होती. मराठवाड्यात कोळी समाजाची मूळ देवता म्हणून धुरपतामायकडे पाहिले जाते. या समाजातही शिक्षणाचे प्रमाण खूप कमी असल्याने त्यांना अजूनही मासेमारी आणि मोलमजुरीवर जगावे लागते. यमुनामायच्या परंपरेतील भक्त हे सर्व जाती-

धर्मातील पहावयास मिळतात. त्यातच भोई-कोळी, मांग-महार, माळी आणि भटक्या विमुक्त समाजातील अनेक जमातींमध्ये यमुनामायची शिष्य परंपरा मोठी आहे. मूळ यमुनामाय यांचा कालावधी १८८० च्या दरम्यान असावा. तसा दावाही त्यांच्या वारसदारांकडून केला जातो. आता त्यांच्या वारसातील तिसरी पिढी परंपरा चालवते. आजच्या यमुनामाय या तिसऱ्या पिढीतील त्यांच्या वारसदार आहेत. असंख्य देवकर आणि देवकरीण आपल्या मूळ यमुनामायची प्रतिकृती आताच्या या यमुनामायमध्ये पाहत असतात. मूळ यमुनामाय यांच्या वंशजाबद्दल कोणत्याही महत्त्वाच्या नोंदी त्यांच्या वारसदारांकडे उपलब्ध नाहीत. परंतु ते वारसा अधिकाराने आलेली परंपरा त्या प्रभावीपणे चालवत आहेत.

चंद्रपुरातील यात्रेत गेल्या काही वर्षांमध्ये यमुनामायची पालखी आल्याशिवाय अजूनही यात्रा पूर्ण होत नाही. त्यामुळे या यात्रेत यमुनामायला मोठा मान असतो. म्हणूनच तिला शेंदराच्या मानाची देवकरीण असे बोलले जाते. तोच मान राजामायच्याही वंशजाला पूर्वीपासून आहे. राजामायच्या वंशजात १९८५ पर्यंतच्या काळात नागामाय आणि देवूमायपर्यंत घोड्यावरून बसून चंद्रपूरला येत होत्या. त्यानंतर यंका महाराज यांच्याकडे ही जबाबदारी होती. राजामायच्या वारसदारांमध्ये घोड्यावर देवकरीण बसून येण्याची परंपरा थांबली असावी. आता बालाजी महाराज, श्यामसुंदर महाराज ही वंशपरंपरा चालवत असले तरी त्यांची पालखीही तितकीच महत्त्वाची असते. राजामायच्या वंशजामध्ये तीन वेगवेगळे तख्त लावण्यात येत असल्याने भक्तांची थोडी पंचाईत होताना दिसते. तसे यमुनामायकडे दिसत नाही. अलीकडे त्यांचा मुलगा गोविंद महाराज आणि एक मुलगी ही परंपरा चालवतात. गोविंद महाराज यांनी लातूर, नांदेड जिल्ह्यातील तरुण पोतराजांची चांगली मोट बांधली असल्याने त्यांच्याकडे अधिक ओढा दिसतो. पांढरे शुभ्र पातळ, कपाळभर भंडाऱ्याचा मळवट, पायात चांदीचे तोडे आणि सतत हसमुख असलेल्या यमुनामाय या कायम देवकर आणि देवकरीण यांचे आकर्षण ठरतात. मूळ यमुनामाय नेमक्या कोणत्या गावातील होत्या, त्या धुरपतामायच्या परंपरेकडे कशा आल्या, याची माहिती उपलब्ध नाही. मात्र एका गाण्यातून त्यांचे माहेर शेलगाव असल्याचा उल्लेख पोतराज करतात.

**यमुनाबाईचं गं माहेर,**
**शेलगाव ही गाजलं.**
**चंद्रपुरातं बाई गं,**
**घोडं बाईचं सजलं...**

आमची ही चौथी पिढी असल्याचे सध्या गादी सांभाळत असलेल्या यमुनामाय सांगतात. चंद्रपूरच्या वाटेने यात्रा कशी अवघड वळणे, डोंगरकडे, नद्या ओलांडून निघते, याची माहितीही त्यांनी सांगितली. त्या म्हणाल्या, शेलगावहून निघाल्यानंतर महत्त्वाची जी मोठी ठिकाणे, वळणे, रस्ते आम्ही कशी लक्षात ठेवत असू याची त्यांनी माहिती दिली.

शेलगावहून निघालेली पायी यात्रा ही पुढे भोकर ते पारवा या मार्गाने निघायची. इस्लामपूर मग पुढे धानुरं, कुलाडी धानुरं झाली की, बोधडी लागायची. त्यात मोठी बोधडी झाली की पुढे माळ धरायचा. तिथूनच चिखलीचा घाट सुरू व्हायचा. हा माळ पूर्वी आमच्यासोबत असलेली



गाडी, घोडे, बैले तशीच या माळातून यायची. चढतीला अनेकदा गाड्या चढत नसल्याचे की आमचे पोतराज आणि इतर लोक गाडीचे बैलं सोडून त्या गाडीचा जू आपल्या खांद्यावर घेऊन ते माळ चढवायचे. उतरतीलाही अशा अनेकदा अडचणी यायच्या. अनेकदा रस्त्यात घसरंडी, तर कधी रस्ते खराब असत. मध्ये नद्या लागायच्या. त्यात वैनगंगा, जोडगंगा, पानगंगा अशा नद्या ओलांडून आम्ही चंद्रपूरला येत. वाजंत्री,

पोतराज, देवकरीण आणि भक्तांचा हा मेळा चालत येऊन चंद्रपुरात येत असल्याचे त्यांनी सांगितले. शिवाय आमच्या पहिल्या काळात आमची मूळ यमुनामाय अशीच चंद्रपूरला येत. आम्ही त्यांची परंपरा सुरू ठेवली असल्याचे त्यांनी सांगितले.

पोतराज आणि देवकरीण जी गाणी म्हणतात, त्यातूनच काहीसा पुरावा शोधता येतो. त्यातही राजामाय, बिठामाय, भागामाय यांच्यावर ज्या प्रमाणात गाणी आणि त्यासाठीचा संग्रह अजूनही लोकांमध्ये उपलब्ध आहे, तसा यमुनामायच्या संदर्भात कमी दिसतो. जी गाणी आहेत, त्यात राजामाय आणि यमुनामाय यांना जोडून आलेली दिसतात. यमुनामाय आणि राजामाय या दोघीही समकालीन होत्या, असे बोलले जाते. धुरपतामायच्या यात्रेची परंपरा सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी राजामायच्या कालावधीदरम्यान अथवा दरम्यानच्या काळात यमुनामायचे मोठे योगदान राहिलेले आहे. मूळ राजामाय आणि यमुनामाय यांनी चंद्रपूरची यात्रा ही सुमारे १८८० च्या कालावधीत सुरू केली असल्याचे सांगितले जात असले तरी त्यावरून बरेच मतभेद आहेत.

यमुनामायच्या वारसदाराकडून सुरुवातीला १८६० कालावधीत यमुनामाय आली असल्याचा दावा केला जातो. तर राजामायच्या वारसदारांनाही तेच वाटते, परंतु दोन्ही वारसदारांकडे त्यासाठीचे प्रमाण मिळत नाही. तरीही या राजामाय आणि यमुनामाय या दोघींनीही चंद्रपूरची यात्रा आणि त्यासाठीची परंपरा वाढवली. पोतराज आपले मूळ कवन आणि त्यातून नमन करताना धुरपतामायसोबत यमुनामायला नमन करतात. अभिवादन करत असतात.

**माझ्या जीवाला हूर हूरं, गावापासून शेलगाव दूर**
**महिनेमागे महिने निघं, महिन्याची नाही यादं**
**पाडवा जेवूनं निघायाचं, बाई गं,**
**कानामंधी यमुनामायचा वादं...**
**शेलगावची यमुनाबाई, भल्या-भल्यांना कळेना.**
**पाडवा जेवूनं आली बाई गं, नाव तिचं यमुनाबाई**
**चंद्रापूरला जायाला, भक्त करितात घाई,**

**चलत गेल्यावर कळंत बाई, कुठे यमुनाबाई.**

मराठवाड्यातील नांदेड, लातूर, परभणी आदी जिल्ह्यांमध्ये राजामाय, विठामाय, भागामायप्रमाणेच यमुनामायवरही असंख्य गाणी म्हटली जातात. त्या गाण्यातून आपली कृतज्ञता व्यक्त करत असतात. तिच्यासोबत चंद्रपूरला जाण्यासाठी करण्याची तयारी, तिचे वेगळेपण आपल्या या गाण्यातून सांगत असतात.

**आली आली यमुनाबाई, शेंदराला होती कुठं,**
**वरदेला घेते भेटं, पुन्हा डोळे पुसीत भक्त उठं.**
**बारा कोसाचा माय किल्ला, दोन येशी केल्या त्याला,**
**यमुनामायचा घोडा आला, बाई गं कुणी फौजदार सौरक्षणाला**
**एव्हढं चंद्रपुरात, गदी कशापायी झाली,**
**वाट सोडा, माझी आली आई, नाव तिचं यमुनाबाई.**
**एव्हढ वाजत गाजतं, गर्दी झाली बाई कुठं,**
**माय माझ्या यमुनामायचा, भोळे भक्त पुरवी छंदं.**

**स्थानिकांकडून मिळालेली माहिती :**

१. यमुनामायची माहिती : नागाबाई, स्थानिक रहिवासी, शेलगाव
: गोविंद महाराज,(वारसदार) शेलगाव.
: राम पोतराज, लातूर, जि. लातूर.

२. यमुनामायची गाणी : सुमनबाई कदम, सावळेश्वर, ता. कंधार, जि. नांदेड.
: लक्ष्मण कांबळे, कोल्हे बोरगाव, ता. बिलोली, जि.नांदेड.
: यासोबतच नांदेड जिल्ह्यातील विविध ठिकाणच्या देवकरीण,तसेच स्थानिक देवकर आणि चंद्रपूरच्या यात्रेतील देवकरणींनी दिलेली माहिती.

***



# ५. इरळद-नरळदची देवयमाय

**माय मह्या देवयमायचा,**
**माईचा सोलावरी दंडवतं, दंडवतं...**

गंगाखेडच्या पूर्वेला सुमारे २० कि.मी.च्या अंतरावर इरळद-नरळद हे जोडगाव. गंगाखेडहून राणीसावरगाकडे जाणाऱ्या रस्त्यावर एक फाटा फुटतो, तो थेट इरळद-नरळदला जातो. दोन्ही जोडगावामधून मासोळी नावाची एक नदी वाहते. या नदीमुळेच दोन्ही गावांचे वेगळे अस्तित्व दिसून येते. लातूर जिल्ह्यातील धर्मापुरी येथून या मासोळी नदीचा उगम होतो. ती इरळद नरळदला भेदून पुढे राजूऱ्याला जाऊन गोदावरीला मिळते.

मासोळी नदीकाठी वसलेले नरळद हे तसे जुने गाव; परंतु इरळदला काही काळाने वस्ती होत गेली आणि गाव म्हणून ते नव्याने नावारूपाला आले.

धुरपतामायच्या परंपरेत मानाची देवकरीण म्हणून देवयमायचे नाव अग्रक्रमाने घेतले जाते, त्या देवयमायचे नरळद हेच ते मूळ ठाणं. देवयमाय, देवूमाय, देवईमाय आदी नावाने त्या ओळखल्या जातात. देवयमाय तशा मूळच्या हिंगोली जिल्ह्याच्या कळमनुरी तालुक्यात असलेल्या हिवरा पिंपळगाव या गावच्या. हिवरा पिंपळगाव हे त्यांचे माहेर. पूर्वी हे गाव नांदेड जिल्ह्यात होते. हिंगोली जिल्ह्याच्या निर्मितीनंतर या जिल्ह्यात हिवरा पिंपळगा या गावाचा समावेश झाला.

देवयमाय या कुंभार समाजाच्या होत्या. त्या फिरतफिरत नरळदला आल्या आणि इथेच त्या कायमच्या स्थिरावल्या. आयुष्यभर त्या केवळ फळांवर जगल्या. स्थानिकांमध्ये अशा आख्यायिका सांगितल्या जातात. त्यांचे जगणे हे एका योगिनीप्रमाणे होते. शंभर वर्षांच्या वयातही त्यांचे तेज पाहून अंगावर काटे येत. त्या महान तपस्वी होत्या. त्या नरळदला आल्यानंतर त्यांनी मासोळी नदीच्या काठावर एक महाकाली मातेचे मंदिर उभे केले. त्यात त्या सुरुवातीला अन्नदान आदी कार्यक्रम करत. गावातल्या आणि आजूबाजूच्या गावातील सुवासिनी महिला त्यावेळी देवयमायची ओटी भरून त्यांची पूजा करत.

इरळदमध्ये त्यांची समाधी आणि मोठे मंदिर आहे. हे मंदिर नांदेड, परभणी, लातूर आदी ठिकाणी असलेल्या लाखो भक्तांचे तीर्थक्षेत्र बनले आहे. आपल्या जिवंतपणी देवयमायने मासोळी नदीच्या काठावर एका उमाटाच्या जागेवर महाकालीचे एक छोटेसे मंदिर उभे केले होते. त्यानंतर येथे हळूहळू वस्ती होत गेली आणि आज ते एक वेगळे गाव म्हणून नावारूपास आले आहे.

धुरपतामायच्या परंपरेवर श्रद्धा, विश्वास असलेल्यांपैकी बहुतेक भक्तमंडळी, रस्ता शोधत शोधत नरळदला येतात आणि इथे येऊन आपला माथा टेकवतात. देवयमायने सुरुवातीला मातृदेवतेची परंपरा खूप जोमाने चालवली होती. नंतरच्या काळात त्या वारकरी परंपरेकडे झुकल्या. देवीच्या भक्तीप्रमाणेच ते पंढरपूरच्या विठ्ठलाचीही भक्ती करत. धुरपतामायच्या परंपरेत पहिल्यांदाच धुरपतामाय आणि विठ्ठल भक्ती या

दोन्ही परंपरांचा मेळ घालण्याचे मोठे काम देवयमायने केल्याचे दिसून येते.

रामपुरीतील भागामाय, दैठण्याची विठामाय यांच्या मंदिरासमोर धुरपतामायचे भक्त ज्याप्रमाणे उत्सव आणि कार्यक्रम साजरा करतात, तसे देवयमायच्या बाबत खूप कमी वेळा घडते. देवयमायने सुरू केलेली मूळ मातृदेवतेची परंपरा बरीच कमी झाल्याचे आणि त्याचे एकूणच स्वरूप बदलल्याचे दिसून येते.

देवयमाय देवस्थानाचे धार्मिक कामकाज पाहून आजूबाजूच्या परिसरात वारकरी चळवळ आणि कीर्तनाच्या माध्यमातून आपली वेगळी ओळख निर्माण करणारे तुळशीदास महाराज यांनी देवयमायच्या गाण्याला कीर्तनाच्या माध्यमातून नवे आयाम दिले आहेत. येथे टाळमृदंगाच्या गजरात अगदी अभिनवपणे धुरपतामायची गाणी म्हटली जातात. हे सर्व तेथे गेल्यास लक्षात येते. धुरपतामायच्या गाण्याचा नाद येथे वर्षातून काही दिवस घुमत असतो. त्यात एक वैशाखी पौर्णिमेचा आणि नवरात्रचा ही दोन अपवाद सोडल्यास देवयमायच्या मंदिरात रोज भजन कीतर्नाचा नाद घुमत राहतो. अखंड हरिनाम सप्ताह, एकादशीचे कीर्तन, नियमित भजन येथे सुरू असते. देवकरणी येतात, देवयमायचे दर्शन घेऊन निघून जातात. त्यांची इतर वेळेत म्हणावी तशी कोणी दखल घेताना दिसत नाही. परंतु रोज देवयमायच्या समाधीला दर्शन घेणाऱ्यांमध्ये महिलांचीच संख्या अधिक असते. त्या तुलनेत वारकरी खूप कमी दिसतात.

मासोळी नदीच्या काठावर इरळदला ज्याठिकाणी देवयमायची समाधी आहे, तिथे मोठे मंदिर उभारण्यात आले आहे. माहुरच्या देवीची प्रतिकृती असलेली एक मूर्ती त्यात बसविण्यात आली आहे. तिला 'महाकाली' म्हणून ओळखले जाते. पुढे ते मोठे मंदिर म्हणून आकाराला आले. देवयमायची समाधीही इथेच आहे. देवयमायची येथे समाधी असली तरी हे मंदिर 'महाकाली मंदिर संस्थान' या नावानेच आजूबाजूचे लोक ओळखतात. तर धुरपतामायचे भक्त देवयमायचे मंदिर म्हणून.

या महाकालीची शेंदूर लावून तिथे पूजा केली जाते. असंख्य महिला, पुरुष येथे देवयमायच्या काळातही नवस फेडायला येत असत. नवस फेडण्यासाठी हिरवा चुडा, खण येथे बांधून ठेवतात. तर येथील संस्थानाकडून देवयमाय मंदिरात हरिपाठ, विविध धर्मग्रंथांवरील पारायणे

आदी कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. गावातील असंख्य भाविक, तरुण, मुले यात सहभागी होत असतात.

महाकालीच्या समोरच शेंदूर लावून मारोती उभा करण्यात आला आहे. येथे महिला नारळ फोडून त्या ठिकाणी धुपारत्या लावतात. मंदिराच्या डाव्या बाजूलाच अगदी चिकटून देवयमायची समाधी आहे. त्याच ठिकाणी देवयमायची एक मूर्ती आणि वर छायाचित्र लावण्यात आले आहे. देवयमाय या विठामाय, भागामायच्या काळात चंद्रपूरला जात असल्याचे सांगितले जाते.

देवयमायचे वयाच्या सहाव्या वर्षी बालविवाह झाला होता. त्या आयुष्यभर योगिनीप्रमाणेच जगल्या. त्यांना एकही मूलबाळ झालेले नव्हते. लहानपणी त्यांच्यावर हिवरा पिंपळगाव येथे असलेल्या पोतराज, देवकरीण यांच्या कार्याचा मोठा प्रभाव पडला होता. बालमनापासून झालेले हे संस्कार त्यांना या परंपरेकडून आकर्षित करत होते. लग्नानंतर वयात आल्यानंतर त्यांना आपल्या महादेव पिंपळगाव या सासरला जावे लागले. परंतु तिथे त्यांचा जीव संसारात रमला नाही. म्हणूनच की काय त्यांचे आपल्या पतीशीही फार काळ जमले नाही. एकदा तर देवयमायला त्यांच्या पतीने रागाच्या भरात मडके भाजण्याच्या आव्यात ढकलून दिल्याची आख्यायिका सांगितली जाते. त्यांना आव्यात ढकलून दिल्यानंतरही त्यात त्यांना काहीही झाले नाही. उलट त्यातून त्या सुखरुप बाहेर आल्याची आख्यायिका सांगितली जाते. तर अशाच एक दुसऱ्या एका प्रसंगात त्यांना पतीने अन्न, पाणी न देता एका खोलीत कुलूप लावून बंद करून ठेवले होते. तेव्हाही त्या खोलीची कडी आणि कुलूप आपोआप गळून पडल्याचीही आख्यायिका सांगितली जाते. तर देवकरीण त्यावर मनाला भिडणारी गाणीही गात असतात.

**देवयमाय सेवकरी,**
**जातीची कुंभारीनं.**
**असं तिच्या सतवानं नं,**
**बाई गं निघाली आव्यातून.**
**देवयमायचे गं गुण,**

मला लागलेत गोड,
असं मासोळीच्या कडनं,
बाई गं बारा लावलेत वडं.
नळद-येळद गावं,
एक गावं उमाटाला.
पतिव्रता माउलीने नं बाई गं,
डेरा दिला उमाटाला...
नळद गावामधी,
पाणी दिसतं नितळ.
असं दंडवटाच्या वेळा,
नं बाई गं नाही भिजलं पातळं.
पतिव्रता माऊलीच,
नं बाई गं नाही भिजलं पातळ.
देवयमाय सेव झाल्या,
देवयमाय देवकरी,
गुरू नका करू आधी,
माय माझ्या देवयमायची नं बाई गं,
हिची संन्याशाची गादी...

देवयमाय यांचा ओढा लहानपणापासून धुरपतामायकडे होता. त्यांचा जन्म ज्या गावात झाला त्या गावात आणि आजूबाजूच्या परिसरात मोठ्याप्रमाणात त्या वेळी पोतराज, देवकरीण आणि योगिनींची चळवळ फोफावली होती. जवळच राणीसावरगावसारखे मातृपरंपरेचे शाक्त-तांत्रिकांचे केंद्र जवळच असल्याने त्याचा साहजिकच मोठा प्रभाव देवयमायवर झाला असावा.

नरळदला त्या अशाच फिरत फिरत आल्या. आणि इथेच त्या स्थिर झाल्या. त्यावेळी कोणीही त्यांची चौकशी करण्याचे धाडस केले नाही. त्यांच्या अंगातील तेज आणि योगिनीसारखी त्यांची वागणूक पाहून येथील लोकांनी त्यांचे देवी, योगिनी म्हणूनच स्वागत केले. त्यासाठीच त्यांना दंडवत घातला जातो.

## देवयमायचा सोलावरी दंडवतं

**माय मह्या देवयमायचा, सोलावरी दंडवतं... दंडवतं...**
**बाई नळदच्या वाटं, हळदीचे बन दाटं,**
**माय मह्या देवयमायचा, मायचा.. सोलावरी दंडवत...**
**बाई नळदच्या वाटं, लिंबा नारळाची पेठं,**
**माय मह्या देवयमायचा, मायचा सोलावरी दंडवत...**
**बाई नळदच्या वाटं, खारीक खोबऱ्याची पेठं,**
**माय मह्या देवयमायचा, सोलावरी दंडवत... दंडवत..**

देवयमायने आपला मृत्यू कधी होणार याची हकिकत सांगून ठेवली होती. असाच एक प्रसंग 'मराठी स्त्रियांच्या कविता'मध्ये प्रभा गणोरकर यांनी दिला आहे. त्या म्हणतात 'संत तुकारामांच्या शिष्या बहिणाबाई यांनीही आपल्या मृत्यूच्या क्षणी आपण यापूर्वी १२ पूर्वजन्म कसे घेतले ते आठवतात. ती विस्मयकारी घटना त्यांनी आपल्या निर्याणपर २६ अभंगांतून व्यक्त केली आहे. पहिल्या, दुसऱ्या, तिसऱ्या, सातव्या, आठव्या, अकराव्या व बाराव्या जन्मातील स्थळं, कुळदैवत, जन्माची हकिकत, पुत्राशी असणारे नाते, विरक्ती, ज्ञानप्राप्ती आणि त्या जन्मातील मृत्यूचा प्रसंग या साऱ्यांचे वर्णन त्यांच्या निर्वाणपर अभंगातून येते'.(पृ.४८)



पौष महिन्यात आलेल्या एकादशीच्या दिवशी देवयमाय यांचे निधन झाले. ती तारीख होती १० जानेवारी १९७४. तशी नोंद तेथे लावण्यात आलेल्या छायाचित्रांमध्ये करुन ठेवण्यात आली आहे. त्यावेळी मारोतीराव महाराज दस्तापूरकर हे प्रसिद्ध कीर्तनकार होते. त्यांच्या कीर्तनाचा बराच मोठा प्रभाव नंतरच्या काळात देवयमायवर झाला होता. मारोतीराव महाराज यांना त्यांनी आपण एकादशीच्या दिवशी देह ठेवणार असल्याची कल्पना देवून ठेवली होती. त्या दिवशी मारोतीराव महाराज हे जवळच असलेल्या चाटोरी या गावात कीर्तनाला आले होते; बरोबर पौष महिन्याच्या

एकादशीच्या दिवशी देवयमायची प्राणज्योत मालवली. देवयमायचे भक्त हे त्यांचे निधन झाले असे म्हणत नाहीत, तर त्या पुन्हा 'चंद्रपूरला गेल्या' असे आपल्या गाण्यातून सांगतात. देवयमाय यांच्या निधनावर असंख्य गाणी गायली जातात.

**देवयमाय सेव झाल्या,**
**सेव झाल्या म्हणू नका.**
**म्हणू नका सेव झाल्या,**
**गं बाई गं, माय चंद्रापुरा गेल्या.**
**देवयमाय सेव झाल्या,**
**झाल्या बोलत चालत.**
**पतीव्रता माऊलीचं,**
**नं गं बाई सरणं जळतं फुलातं.**
**देवयमाय सेव झाल्या,**
**नळदगावी पानंदीतं.**
**पतीव्रता माऊलीचा,**
**नं बाई गं वीणा वाजे समाधीतं...**

देवयमाय यांच्या निधनाच्या वेळी मारोतीराव महाराज यांच्यासह दूरदूरून असंख्य वारकरी गोळा झाले. कीर्तन आणि टाळ, मृदंगाच्या गजरात देवयमायची अंत्ययात्रा काढण्यात आली. त्यांना नरळदहून इरळदला आणण्यात आले. आणि इरळद येथे कापूर, चंदनाची लाकडे, नारळ, फुले यांच्यात देवयमायच्या पार्थिवाला अग्नी देण्यात आला.

हा दिवस तेव्हापासून ते आजतागायत पुण्यतिथी म्हणून इरळद येथे साजरी होते. यावेळी हरिनाम सप्ताह मोठ्या प्रमाणात साजरा केला जातो. ज्ञानेश्वरी, रामायण, श्रीविजय, हरीविजय, भागवत पुराण आदींचे वाचन होते. अन्नदानाचे कार्यक्रमही साजरे केले जात असल्याची माहिती देवयमाय यांचा वारसा चालविणारे तुळशीदास महाराज यांनी दिली. तसेच या वेळी काढण्यात येत असलेल्या पालखी सोहळ्यात दोन्ही गावातील भाविक, महिला मोठ्या प्रमाणात सहभागी होत असतात.

देवयमायने स्थापन केलेल्या महाकालीच्या मंदिरात लोक नवस

बोलतात. आणि ते पूर्णही होत असल्याची समजूत त्यांच्या भक्तांमध्ये आहे. मुंजाजी माली-पाटील यांनी देवयमायच्या सेवेसाठी आपले आयुष्य वाहून घेतले होते. तर साहेबराव जाधव यांच्या तीन पिढ्यांनी देवयमायची सेवा केली. देवयमायला सुरुवातीला आणि नंतरच्या काळात लोकांनी जमिनी दान केल्या होत्या. त्यात अनेक ठिकाणी मंदिर संस्थानने बागायती, नगदी पिकांची शेती सुरू केली आहे. लग्नकार्यासाठी मंदिराशेजारी बरीच मोठी जागा ठेवण्यात आली आहे. पवित्र तीर्थक्षेत्र म्हणून मोठ्या संख्येने लोक येथे लग्नकार्यासाठी आणि इतरही सांस्कृतिक कार्यक्रमासाठी येतात.

सुरुवातीला दैठण्याच्या विठामायप्रमाणेच आजूबाजूच्या परिसरावर देवयमायने बराच मोठा आध्यात्मिक दरारा निर्माण केला होता. धुरपतामायच्या परंपरेत त्यांनी त्यावेळी हजारोंच्या संख्येने आपली भक्त परंपरा निर्माण केली होती. अनेक आरत्या देवयमायवर आहेत. चंद्रपूरच्या मूळ आरतीत देवयमायला स्थान मिळाले.

**संभाला सात लेकी,**
**माय मजे देवंयबाई गं...**
**पोचीमायला बोलविलं,**
**माय मजे देवंय बाई गं...**
**माय राहतूस कोण्या भागी?**
**मी राहतो तुमच्याच भागी.**
**माय मजे...देवयबाई गं...**
**महाकालीला बोलविलं,**
**माय मजे देवंयबाई गं...**
**माय राहतूस कोण्या भागी,**
**माय मजे देवयबाई गं...**

संबाला म्हणजेच महादेवाला सात लेकी आहेत, याची माहिती एक देवकरीण आपल्या देवयमायला एका गाण्यातून देते. त्यात ती प्रत्येक लेकीला बोलावते असे ते गाणे आहे. देवयमायची चळवळ ही पहिल्या टप्प्यात मातृदेवतेला वाहिलेली होती. मात्र नंतरच्या काळात ती वारकरी परंपरेकडे झुकलेली दिसते.

पंढरपूरच्या वारीला जाता-जाता त्या देवकरीण ते संत या पदाला पोहोचल्या. दोन्ही चळवळीचा मिलाफ करण्याचे खूप मोठे कार्य देवयमायने केलेले दिसते. आज त्यांना दलित, आदिवासी, बंजारा, मराठा आदी समाजातील महिला या देवकरीण म्हणून ओळखत असल्या तरी त्या वारकरी आणि महिला संत म्हणून पुढे नावारूपाला आल्या होत्या.

'देवकरीण ते संतपदापर्यंतचा प्रवास करणाऱ्या धुरपतामायच्या परंपरेतील त्या पहिल्याच देवकरीण ठरल्या.' पंढरीची वारी आणि पांडुरंगाबद्दलचे प्रेमभाव अनेक गाण्यातून येत असले तरी त्यांची ओळख ही संत देवयबाई अशी असल्याचे सेवेला असलेल्या रमाकांत कुलकर्णी यांनी सांगितले.

ज्याप्रमाणे देवयमायच्या सुरुवातीच्या काळात त्यांच्यावर निरक्षर असलेल्या महिलांनी शेकडो गाणी रचली, गात राहून ती एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे पोहोचवली. तशी गाणी, देवयमाय संत झाल्यानंतर त्यांच्या नवीन वारकरी भक्तांना सहजतेने आणि कृतज्ञता व्यक्त करणारी गाणी क्वचितच करता आल्याचे दिसले. मात्र अपार श्रद्धा असलेल्या भक्तांनी देवयमायला वारकरी झाल्यानंतरही अंतर दिले नाही. तिथेही त्यांनी त्यांची सोबत कायम ठेवली. म्हणूनच देवयमायमुळे पंढरपूरच्या वारीलाही धुरपतामायच्या परंपरेत एक मोठे स्थान मिळाले. धुरपतामायवरील असंख्य गाण्यात पंढरपूर, पांडुरंग, विठ्ठल आणि वारीचे उल्लेख देवकरीण आपल्या गाण्यांतून करतात.

**पंढरीचा पांडुरंगं, हाय अंतरीचा शहाणा..**
**बहिणा धुरपता आणा, धुरपताबाई...**
**पांडुरंगाचा हे रथं, रथं गेला गावाबाहेर**
**सगळ्याला रामराम करी, धुरपताबाई...**
**पांडुरंगाचा हे रथं, रथं गेला वेशीबाहेरी...**
**त्यानं रामराम करी, धुरपताबाई...**

पंढरपूरचा विठ्ठल हा धुरपतामायचा भाऊ असून तो आपल्या बहिणीला घेऊन जाण्यासाठी रथ आणला आणि तो रथ वेशीच्या बाहेर गेला, असा त्यात उल्लेख काही ठिकाणी येतो. तर धुरपतामाय आणि विठ्ठल यांच्यातील

संवादही अनेक गाण्यातून आलेले आहेत. ही सर्व गाणी देवयमाय वारकरी चळवळीकडे वळल्यानंतर अधिक प्रमाणात आली असावीत. मात्र दुसरीकडे पंढरपूर आणि धुरपतामायचे नाते हे जरीमरीच्या माध्यमातून त्यापूर्वीच्याही देवकरणींनी स्पष्ट केलेले आहेत. त्यातील एका गाण्याची सुरुवात ही अशी आहे -

**जरी बोलते मरीला,**
**आपूण पंढरीला जाऊ.**
**भेट विठ्ठलाची घेऊ गं,**
**आपुन पंढरीला जाऊ**
**भेट विठ्ठलाची गं, धुरपतामाय..**

या गाण्यात कुठेही देवयमायचा उल्लेख येत नाही. मात्र, या गाण्यातून विठ्ठल-धुरपतामाय यांचे संवाद आलेले आहेत. त्याला अनेक प्रमाण नव्याने शोधून त्यावर प्रकाश टाकण्याची गरज आहे. देवकर आणि देवकरीण आजही पंढरपूरला वारीला गेल्यानंतर पहिले दर्शन हे जुन्या रुक्मिणीमातेच्या मंदिराजवळ असलेल्या जरीमरीचे घेतात. तिला धुरपतामाय, मरिआई असेही म्हटले जाते. तिथे भंडार लावूनच पुढे विठ्ठल-रुक्मिणीचे दर्शन घेण्यासाठी येतात. ही परंपरा आजही कायम आहे. पंढरीच्या पांडुरंगावरील हे गाणे त्याचे बोलके उदाहरण आहे.

देवयमाय यांचे निधन हे १० जानेवारी १९७४ रोजी झाल्याची नोंद आहे. मात्र मूळ छायाचित्र आणि बसविण्यात आलेल्या मूर्तीत साम्य दिसत नाही. ती नंतरच्या कालावधीत समाधीच्या वर उभी करण्यात आली आहे. तर बाजूलाच देवयमायची आयुष्यभर सेवा केलेल्या मुंजाजी माली पाटील (आयलाजी) यांची समाधी आहे.

देवयमायसारखीच एक मूर्ती बसविण्यात आली आहे. उजव्या बाजूला विठ्ठल रुक्मिणीसह इतर देवादिकांच्या मूर्ती बसवण्यात आल्या आहेत. त्या संत तुकाराम महाराज, कृष्ण, दत्तात्रय, रामदास स्वामी, गोरा कुंभार, गणपती अशा मूर्ती आहेत.

बाजूलाच मोठा फलक लावून त्यावर देवयमायची आरती दिसते. यात दोन आरत्या आहेत. सुरुवातीला 'श्रीदेवीची आरती' आणि त्यानंतर

'आरती देवई मातेची' अशा दोन आहेत. पहिल्या आरतीत देवकरीण, पोतराज ज्या देवयमायची आरती गातात. येथे लावण्यात आलेल्या आरतीतील वाक्यरचना आणि देवकरीण यांच्या वाक्यरचनेत मोठी तफावत दिसून येते. पोतराज, देवकरीण सहजपणे म्हणत असलेली आणि त्यांना मुखोद्गत असलेल्या मूळ आरतीला मोडून-तोडून केलेली दिसते. मूळ आरती आणि त्यातील गाभा हा परभणी जिल्ह्यातील सोनपेठ तालुक्यात असलेल्या थडी पिंपळगाव या गावातील जलसामाय देवकरीण यांच्याकडून मिळाली, ती अशी आहे -

## देवयमाय आरती..

**मायचं माहेरं, मूळ घरं,**
**पुढी हाय बारवं हीरं, पाणी निर्मळ...**
**चंदन पाटावरं, माय बसं,**
**सवर्णाचे केसं, देवमाय आरती..**
**आरती, चंद्रापूर धुरपती, देवमाय आरती...**
**फुलबाई माळीणं, फुलं देती..**
**हार हार बोलती, देवमाय आरती...**
**आरती केली म्या उजवटं,**
**गणपतीस गटं, देवमाय आरती..**
**मायची पायरी निर्मळं,**
**पुढी डीकमाळं जळं, देवमाय आरती...**
**मायच्या पायरी लाहीला,**
**चपराशाचा पहारा, देवमाय आरती...**
**उजव्या बाजूला मारवती,**
**रस्त्यावर गणपती, देवमाय आरती...**
**आरती केली म्या उजवटं,**
**हनुमंतास गटं, देवमाय आरती...**
**मायची पायरी अवघडं,**
**पाठीमागे बकरे पडं, देवमाय आरती...**

**दिवा जळतो, लोण्याचा,**
**सारा शिनगारं सोन्याचा, देवमाय आरती...**
**मायचं राऊळ चौफेरं,**
**मधी गुरुवाचं घरं, देवमाय आरती...**
**आरती केली म्या उजवटं,**
**महादेवाशी गटं, देवमाय आरती...**

तर देवयमायच्या मंदिरात लावण्यात आलेल्या श्रीदेवीच्या आरतीत 'आरती चंद्रापूर धुरपती देवमाय आरती, आईचं मूळ राहनं चंद्रापूर ठिकाण, आईचं देऊळ, चौकोणी बाई कळसाला दोन्ही, कवाडाला बिन्नी दरवाजे कमानी, देवमाय आरती' अशी रचना आहे. यात बराचसा भाग हा मूळ आरतीशी जुळताना दिसत नाही.

देवयमायची आरती म्हणून ती खाली मोठ्या फलकावर लावण्यात आली आहे. त्यात देवयमायची वारकरी परंपरेसोबतच्या काळातील चित्र आणि त्यासाठीची स्तुती गीत रचण्यात आले आहे. या आरतीचा तसा धुरपतामायच्या परंपरेशी फारसा संबंध दिसत नाही. मात्र, येथेही त्यात वैशाख पौर्णिमेला जत्रा भरते.

आजूबाजूच्या जिल्ह्यातून झेंडे, अब्दागिरी घेऊन लोक येतात, इतका उल्लेख सापडतो. एखाद्या संत अथवा देवीवर स्तुतीपर करण्यात आलेल्या आरतीसारखी आहे. देवकरणींच्या परंपरेत मागील काही दशकांमध्ये सर्वांत शेवटची आणि प्रभावशाली ठरलेली देवकरीण म्हणून देवयमायची ओळख आहे. देवयमायने एकाचवेळी धुरपतामाय आणि दुसरीकडे वारकरी चळवळीची परंपरा चालवली. संत जनाबाई गंगाखेडच्या पूर्वेला सुमारे २० कि.मी.च्या अंतरावर नरळदची देवयमाय आणि पश्चिमेला २२ कि.मी.च्या अंतरावर असलेल्या दैठण्याची विठामाय या दोघीही मोठ्या योगिनी होऊन गेल्या. संत जनाबाई यांचे कार्य बरेच मोठे होते. परंतु त्या तुलनेत देवयमाय आणि विठामायचेही मातृपरंपरेच्या चळवळीचे कार्य उल्लेखनीय होते.

वारकरी चळवळीला मोठे अधिष्ठान मिळाले, तसे धुरपतामायच्या चळवळीला मिळाले नाही. ते मौखिक परंपरेतच शिल्लक राहिले. यामुळेच

देवयमाय, विठामाय, भागामाय यांच्यापूर्वी होऊन गेल्या अनेक अनाम देवकरीण काळाच्या ओघात गडप झाल्या. धुरपतामायची ही चळवळ वैदिक परंपरेच्या विरोधात आणि विशेषतः वारकरी चळवळीच्या पूर्वीपासून आजतागायत समांतर पद्धतीने चालत आलेली दिसते. या चळवळीचे असलेले सर्वच शिलेदार म्हणजे पोतराज, देवकरीण हे अस्पृश्य आणि बलुतेदार जातीतून आले होते. शिकण्याचे, लिहिण्याचे अधिकार अथवा तशी परिस्थिती त्यांना मिळाली नसल्याने त्यांनी कायमच केवळ मौखिक परंपरेवरच भर दिला.

जनाबाईच्या गंगाखेडपासून काही कि.मी.च्या अंतरावर असलेल्या विठामाय, देवयमाय या दोन्ही योगिनींनी आपल्या आयुष्याच्या शेवटच्या घटकेपर्यंत मातृदेवतांची परंपरा कायम ठेवली. त्या-त्या लोकांना चांगले जगण्याची प्रेरणा देण्याचे काम केले.

एकाच वेळी देवकरीण ते संत, योगिनी या पदाला पोहोचलेल्या देवयमायची तशी नोंद वारकरीही कुठे परंपरेने घेतलेली दिसत नाही. त्यांना ते भाग्य लाभले नाही. मात्र त्यांचा वारसा चालवत असलेले तुळशीदास महाराज ही उणीव भरून काढण्याचे काम करताना दिसताहेत. अजूनही देवयमाय या धुरपतामायच्या लाखो भक्तांच्या मुखातून त्यांच्या मौखिक परंपरेतून कायम जिवंत राहिल्या आहेत. पोतराज-देवकरीण देवयमायला रोज गाण्यातून, आरतीतून आठवण करत असतात. 'एकबार धुरपतामायच्या नावाने हार हार बोला', असा जयघोष करताना देवयमायच्या नावानेही हार हार बोलला जातो.

**संदर्भ / माहिती :**

१. मराठी स्त्रियांच्या कविता : प्रभा गणोरकर, पृ. ४८.
२. देवयमायच्या जीवनप्रवासाची माहिती : भागिरथीबाई पाटील, देवकरीण,परळी वैजनाथ, जि. बीड.
३. पारामाय देवकरीण, सावळ, जि. परभणी.
४. परंपरा यांची आख्यायिका माहिती : नरहरी महाराज (मुजांजी पाटील यांचे पुत्र),परळी, ता. बीड.
५. सध्या सुरू असलेल्या परंपरेची माहिती : तुळशीदास महाराज, पुजारी, रमाकांत कुलकर्णी, इरळद-नरळद.

६. देवयमायची मूळ आरतीचा संग्रह :
जलसामाय कदम, देवकरीण,थडी
पिंपळगाव, ता. सोनपेठ, जि. परभणी.
७. देवयमायवरील गाणी : मुक्तामाय, परळी, जि. बीड.
: सोनाजी देवकर, परळी जोड, ता. वसमत, जि परभणी.

***



# ६. दैठण्याची विठामाय

**विठामाय गुरू केला,**
**नाही कोणाला माहीतं,**
**दिव्या नव्हती ज्योतं,**
**गुजं बोलू सारी रातं...**

परभणीपासून सुमारे २७ कि.मी.वर असलेले दैठणा एक हजारभर कुटुंबांचे गाव. परभणी-गंगाखेडच्या मुख्य मार्गावर पोखर्णीच्या पुढे आल्यास तिथून तीन किमी अंतरावर आहे. गावापासून काही फर्लांगाच्या अंतरावरून गोदावरी नदी थोडासा वळसा घेऊन पुढे जाते. गंगेकाठचे गाव म्हणून दैठण्याला ओळखले जाते. हे माले-मराठा समाजबहुल वस्तीचे गाव असून इतर समाजही संमिश्र प्रमाणात येथे राहतो. गावाची महत्त्वाची ओळख म्हणजे देवकरीण विठामाय यांचे मूळ ठाणं असलेले गाव. या गावावर महानुभाव पंथ आणि दत्त संप्रदायाचा मोठा प्रभाव होता. याची ओळख सांगणारी दोन मोठी मंदिरे गावाच्या पश्चिमेला असून ती जुळी

वाटतात.दोन्हीची रचना वेगळी आहे. त्यात एक दिलीजगीर या गोसाव्याचे आणि दुसरे ठाकूरबुवा यांचे. गाव थोडेसे उमटावर असले तरी दोन्ही मंदिरे ही गावाच्या बाहेरील बाजूस गेल्यास नजरेस पडतात. पण सर्वांत अधिक ओळख असलेल्या विठामायची समाधी गावापासून अर्ध्या किलोमीटर अंतरावर असलेल्या एका शेतात आहे. ते खूप छोटेखाणी असल्याने जवळ जाईपर्यंत नजरेस पडत नाही. या छोट्याशा मंदिरासमोरच विठामायची समाधी आहे.

**ठाकरं-बुवा मारवतीचे,**
**दोनी शिखरं बरूबरं.**
**गुरू माझ्या विठामायच्या,**
**समाधं मारवतीच्या म्होरं वं... धुरपतामाय**
**ठाकरं-बुवा मारवतीचे,**
**दोनी शिखरं बरूबरं.**
**गुरू माझ्या विठामायच्या,**
**घाला समाधीला हारं वं.. धुरपतामाय**
**विठामाय सेवं झाली,**
**शंभर वरसाच्या आतं.**
**गुरू माझ्या विठामायच्या,**
**चुडा वाजं समाधीतं वं.. धुरपतामाय**

गावात प्रवेश केल्यानंतर नागमोडी वळणे घेत असतानाच डाव्या बाजूला असलेल्या आळीत धोंडीराम माले-पाटील (कच्छवे) यांचा वाडा लागतो. तेच विठामायचे मूळ घर. एके काळी त्यांचे घर दैठण्यातील सर्वांत मोठ्या जमीनदार आणि श्रीमंतांचे घर म्हणून ओळखले जात होते. त्यांचा मुलगा आणि देवकर प्रल्हाद माले-पाटील यांचाही मोठा दबदबा होता, परंतु मागीलवर्षी त्यांचे निधन झाले. गावाच्या बाहेर जात असताना धोंडीराम माले-पाटील यांच्या मुलीचे म्हणजेच रुकमामायचे घर उजव्या बाजूला रस्त्यावर लागते.

विठामायच्या आठवणी म्हणून रुकमामायने आपल्या वाड्यातच छोटेसे मंदिर बांधले आहे. आता रुकमामाय या एकट्याच आपल्या

आईने निर्माण केलेल्या चळवळीच्या साक्षीदार आहेत. कडूलिंबाच्या हिरव्यागार सावलीच्या झाडाखाली आणि रस्त्याच्या कडेला हे मंदिर रस्त्याने जाताना दिसते. या मंदिराची महाकाली म्हणजेच धुरपतामायचे मंदिर म्हणून ओळख आहे. विठामायला चार अपत्ये होती. त्यात मुलगा प्रल्हाद आणि तीन मुली. यात रुकमीनबाई म्हणजेच रुकमामाय देवकरीण, सत्यभामा आणि तिसरी शकुंतला. या तीन बहिणींमध्ये रुकमामायने आपल्या आईची परंपरा कायम ठेवली. वयाच्या ९० व्या वर्षानंतरही त्या गडचांद्याला चैत्राच्या यात्रेचा जात होत्या. अलीकडेच त्यांचे निधन झाले.

विठामायनंतर मुलगा प्रल्हाद कच्छवे यांनी काही वर्षे त्यांची गादी म्हणजे परंपरा चालवली. पण नंतर काही कारणामुळे प्रल्हाद देवकर हे आर्थिक संकटात सापडल्याने वडिलोपार्जित असलेली बहुतांश मोक्यावरची शेती विकून टाकली. विठामायची ज्या शेतात आज समाधी आहे, त्या समाधीशेजारी सर्व शेतीही आज प्रल्हाद देवकर यांच्या ताब्यात राहिलेले नाही. अलीकडेच एका जवळच्या नातेवाईकाने ती खरेदी केली. केवळ समाधीची जागा आता शिल्लक राहिलेली आहे. विठामायच्या संपर्कात आलेल्या अनंता शिंदे या देवकरने ही जमीन अनेकदा मागितली होती, परंतु ती मिळाली नाही. हा देवकर विठामायमुळे खूप प्रभावित झाला असल्याने त्यांनी दैठण्यापासून अडीच-तीन किमीच्या अंतराने असलेल्या त्याच्या शेतात विठामायच्या आठवणीसाठी एक महाकाली आणि दुसरे महालक्ष्मीचे अशी दोन मंदिरे बांधली. या मंदिरांमागे विठामायच्या आठवणी असल्याचे अनंता देवकर आवर्जून सांगतात.

विठामायने सुरू केलेली परंपराही प्रल्हाद देवकर यांना प्रभावीपणे जपता आली नाही. तिची जी ताकद होती ती, नंतरच्या काळात खंडित झाली असल्याचे सांगितले जाते. मात्र ही उणीव मुलगी व देवकरीण रुकमायमाने भरून काढली. आज विठामायचे बहुतांश शिष्य आणि तिची परंपरा चालविणारे भक्त हे मुलगी रुकमामायकडे अधिक येताना दिसतात. रुकमामायमध्ये आपली विठामाय असल्याचे ते सांगतात.

प्रल्हाद देवकर भेट घेतली असता त्यांनीही आपल्याकडे केवळ वैशाखी पौर्णिमेला मोठी गर्दी असते, असे सांगितले. विठामायच्या काळात मोठा बाज होता, पोर्णिमा आल्यास येथे येण्यासाठी लोकांची रांग

लागायची. जितके शक्य होईल तितके कार्यक्रम व्हायचे आणि आलेल्या भाविकांची सोय आपण करत असू, असे त्यांनी सांगितले. प्रल्हाद देवकर आर्थिक अडचणीत येण्यापूर्वीच बहीण रुकमामायसोबत गादीवरून बरेच बिनसले होते. त्यामुळे बहीण-भावात यावरून वाद निर्माण झाल्याने रुकमामायने आपल्या घरीच छोटेखानी मंदिर बनवून आई विठामायने सुरू केलेल्या देवकरीणच्या परंपरेला जिवंत ठेवले. प्रल्हाद देवकर गादीचे वारसदार म्हणून ओळखले जातात. तरीही रुकमामायच्या दारात आणि विठामायच्या समाधीजवळ प्रत्येक पौर्णिमेला मोठी गर्दी होत असते. दूर-दूरून देवकरीण, पोतराज येऊन भेटत असतात.

मराठवाड्यातून परभणी जिल्ह्यासह लातूर, नांदेड, जालना, नाशिक आणि मुंबई-ठाण्यात जाऊन स्थायिक झालेले अनेक भक्तमंडळी इथे येत असतात. चैत्रानंतर येणाऱ्या वैशाख पौर्णिमेला विठामायच्या समाधीजवळ मोठी यात्रा भरते. त्यानंतर पौष महिन्यातील पौर्णिमा हा दिवस मोठ्या जत्रेचा असतो. विशेषतः महिला आपल्या विठामायच्या आठवणी आणि त्यांच्याबद्दल असलेली भावना विविध गाण्यातून व्यक्त करीत असतात. पावसाळ्याचा आणि सुगीचा काळ वगळता वर्षभरात येणाऱ्या पौर्णिमेला इथे भक्तमंडळी कायम येत असतात, असे त्यांची वारसदार रुकमामाय सांगत असत.

धुरपतामायचे हजारो भक्त विठामायच्या दैठण्याला तीर्थक्षेत्र मानतात. चंद्रपूरला ज्या प्रकारे मूळ ठाणं समजतात, त्याचप्रमाणे दैठणा या गावाचे नुसते नाव उच्चारताच असंख्य गाणे या दैठण्यावर आणि इथे असलेल्या विठामायच्या देवकरीण-देवकर आणि पोतराज गातात. त्या वेळी विठामायसोबत मराठवाड्यातील अनेक जिल्ह्यातील देवकर आणि पोतराजांसोबतच देवकरणींची मोठी गर्दी असायची. तो खूप मोठा मेळा दैठण्यात भरत असायचा.

**बारंड-चंद्रापूरं दोन्ही महोजाचे गावं,**
**ज्याच्या मनामंधी भाव, त्यायनं चांदियाला जावं गं.. धुरपतामाय...**
**चिखलीच्या गंडीवरी, काय दिसू लालं लालं,**
**गुरू माझ्या विठामायनं, दिलंय दुशालीचं पालं वं.. धुरपतामाय**

**चिखलीच्या गंडीवरी, हायता सोन्याच्या चपल्या,**
**माय माझ्या धुरपताच्या, गाड्या गंडीला थोपाल्या वं.. धुरपतामाय**
**चिखलीच्या गंडीवरी, येळू आडवा पडला,**
**गुरू माझ्या विठामायनं, त्यायनं झेंड्याला तोडीला गं.. धुरपतामाय**

विठामायच्या समाधीला लागून मोठे हिरव्या गर्द रंगाचे कडूलिंबाचे झाड आहे. या कडुलिंबाची सावली विठामायच्या समाधीवर पडलेली असते. आपल्या प्रत्येक फांद्या विठामायच्या समाधीचे रक्षण करण्यासाठी आणि तिला शीतलता मिळावी म्हणून हाताला लागतील काय अशा आकाराने पसरल्या आहेत. ही समाधी आणि मंदिर, ते कडूलिंबाच्या झाड म्हणजे शेकडो देवकर-देवकरीण आणि पोतराजाचे एक मोठे श्रद्धास्थान आहे. गावच्या बाहेर आणि शेतात असलेली ही विठामायची समाधी खूपच दुर्लक्षित राहिली आहे. मंदिरावर फिकट रंगाने समाधीचा उल्लेख करण्यात आला आहे. त्यावरून या समाधीची ओळख होते.

समाधीच्या समोर वीस-बावीस फुटाच्या अंतरावरच विठामायच्या आवडत्या घोडीची समाधी आहे. या घोडीच्या समाधीच्या वर गोल दगड शेंदूर माखून ठेवला आहे. तर बाजूलाच १० फुटाच्या अंतरावर दुसरा एक उभा दगड शेंदूर माखून ठेवण्यात आला आहे. तो 'वीर' असल्याचे सांगितले जाते. या वीरावर फारशी माहिती मिळत नाही. पण विठामायच्या घोडीबद्दल आणि तिच्या अनेक शूरपणाच्या कथा सांगितल्या जातात. विठामाय याच घोडीवर बसून १९७२ च्या काळापर्यंत चंद्रपूरला जात असे. या घोडीचा दरारा दैठण्यापासून ते चंद्रपूरच्या यात्रेपर्यंत असायचा. विठामाय या घोडीवर बसून जात असताना आजूबाजूचा परिसरही भारावून जात असे. विठामायच्या या घोडीवर अनेक कथा आणि गाणीही गायिली जातात. परभणी जिल्ह्यातील समाजजीवन हे वऱ्हाडी मिश्रित वळणाचे असल्याने त्याचा प्रभाव विठामायवर करण्यात आलेल्या गाण्यावरही दिसून येतो. त्यातील एक गाणे असे -

**विठामायची वं घोडी,**
**चालताना तंगं तोडी..**
**दोन्ही शिष्य मागंम्होरी,**

लगामाला हिरे झोडी.
विठामायची वं घोडी,
पाणी पेईना वड्याला,
पाणी पेईना वड्याला.
जोड हौद वाड्याला.
विठामायची वं घोडी,
पाणी पेईना शेंदणीचं,
पाणी पेईना शेंदणीचं,
पुरी गाव चेलणीचं...
विठामायची वं घोडी,
तिचे पिवळे वं खुरं,
खरं सांगा विठामाय,
चांदं किती हाय दूरं...
विठामायची वं घोडी,
तिचे पिवळे वं खुरं,
चांद्याला गेलंय कोण?
विठामायची वं घोडी,
एक्या दवडीत वं गेली,
एक्या दवडीत गेली,
गडचांद्याला पवचली...
विठामायची वं घोडी,
हिचा पिवळा वं माथा,
दर्शन घेते येता जाता.
विठामायची वं घोडी,
आली हासतं इसतं,
वाडा शिष्याचा पुसतं...
विठामायची वं घोडी,
आली उठतं बसतं,
सांगते चेलनीला,
दूध आणा वं गायीचं...

विठामायची ही घोडी म्हणजे एक प्रकारे विठामायची रक्षणकर्ती होती. विठामायशिवाय या घोडीलाही करमत नाही. त्या एखाद्या मैत्रिणी, सखीसारख्या राहत. विठामाय चारा टाकल्याशिवाय ती खात नाही, पाणी पीत नाही. इतकेच काय तिला विठामायच्या हाताने विहिरीतून शेंदून काढलेले पाणी लागते. नदी-ओढ्यातील पाणी सहसा आवडत नाही. यामुळे ती विठामायच्या वाड्यात असलेल्या जोडहौदातील शेंदणीचे पाणी पिते. एक मुके प्राणी असूनही विठामायच्या घोडीत अनेक प्रकारच्या



मानवी संवेदना होत्या. बोलता येत नसले तरी ही घोडी आपल्या हावभावातून अनेक भावना प्रकट करत असे. ती आपल्या गुरूच्या शिष्यासोबत हिदळून, खिदळून आपल्या भावना व्यक्त करत.

एखाद्या घोडीवर अनेक गाणी तिचे मानवी भावनेशी जोडून केलेले वर्णन अद्वितीय आहे. ती आपल्या विठामायच्या वाड्याचा रस्ता कसा पुसत येते, यांच्या सुरस कथा सांगितल्या जातात. तर तितकी गाणीही गायिली जातात. एका घोडीला इतका मानवी भावनांच्या संवेदनाचा सन्मान लोकपरंपरासह इतर चळवळीत क्वचितच पाहावयास मिळतो. त्यातही विठामायपूर्वी आणि त्यानंतरच्या कालखंडात देवकरीण महिलांनी घोड्यावर बसून मातृदेवतांची परंपरा चालविणे एक आव्हान होते. ते त्यांनी अगदी सहजपणे स्वीकारलेले होते.

विठामायच्या सौंदर्याबद्दलही अनेक कथा, आख्यायिका सांगितल्या जातात. त्या साडेपाच फुटाहून अधिक उंच होत्या. सडपातळ, गोरा रंग असल्याने त्या कुठेही उठून दिसत. त्या रस्त्याने चालताना आजूबाजूच्या लोकांच्या नजरा विठामायवर खिळून असायच्या.

विठामाय आपल्या आवडत्या घोडीवरून जाताना त्यावेळच्या

साक्षीदार असलेल्यांना नवल वाटायचे, तर शेकडो जण या रस्त्यावर येऊन आपले डोके टेकवित असत.

**बाई तनं-मनं-धनं, माझ्या गुरूला वाहायाचे.**
**शुद्ध करावं महाराजं, मोक्षपदाला जायाचं वं... धुरपतामाय**
**विठामाय गुरू केली, म्यातं ज्ञानाची पाहूनं.**
**मला शिकवीलं न्यानं, मांडी जवळं घेऊनं गं... धुरपतामाय**
**माय माझे विठामाय, नको हिंडू गावोगावी.**
**असा तुझा अनुभावं, नाही कैकाला ठावं वं.**
**बाई सकाळी उठूनी, गाईच्या कोठ्या जावं,**
**गुरू माझ्या दयाळा, नावं पवित्राचे घ्यावं वं... धुरपतामाय**
**आत्मा ज्ञानाचे कुलूपं, उघडते उघडना,**
**गुरू माझ्या विठामायची, किल्ली मला सापडना वं.**
**यमाच्या कचेरीला, जीव बसलाय दडूनं,**
**गुरू माझ्या दयाळानं, दिल्या पत्रिका धाडूनं गं... धुरपतामाय**
**आल्या गेल्याला पुसीते, दैठणगावची खुशालं,**
**गुरू माझी विठामाय, गादीवरली दुशालं वं... धुरपतामाय**

विठामायच्या निधनानंतर काही दिवसांतच घोडीनेही आपला प्राण त्यागला. तिलाही विठामायच्या समाधीशेजारी जागा देण्यात आली. अगदी समोरच विठामायच्या या आपल्या मैत्रीण, सखी असलेल्या घोडीची समाधी बांधण्यात आली आहे. एखाद्या प्राण्याला मानवासारखा सन्मान देणारे हे उदाहरणही थक्क करणारे आहे. संत तुकारामांच्या शिष्या संत बहिणाबाई यांनी केलेल्या अभंग गाथेत गाय आणि वासराचा उल्लेख येतो. बहिणाबाई यांच्या आत्मकथनात वासराच्या मृत्यूनंतर एक विलक्षण कारुण्य निर्माण झाले होते. वासराच्या मृत्यूनंतर त्याची काढण्यात आलेली अंत्ययात्रा आदीच्या नोंदी गाथेतून मिळतात. बहिणाबाईंनी आपल्याकडे असलेल्या एका द्विमुखी गायीचे वर्णन असे केले आहे,

**'काळी ती कपिला काळे तिचे वत्स**
**प्रदक्षणे पुच्छ निवेदिली**

**सुवर्णाची शृंगे रूपियाचे खूर**
**वर पितांबर पांघुरिला'**

संत बहिणाबाई यांनी आपल्या गायीचा श्रृंगार अशा प्रकारे चित्रीत केला. तर विठामायच्या घोडीच्या स्वभावाचे मानवीकरण त्यांच्या घोडीवर करण्यात आलेल्या गाण्यातून दिसते. विठामाय आणि तिच्या घोडीचे ऋणानुबंध गाण्यातून प्रकट होताना दिसतात.

विठामायसारखा ज्ञान देणारा गुरू, हितगुज आणि मायेने जवळ घेणारा दुसरा गुरू कोणी भेटणार नाही. विठामाय आणि तिच्या आठवणी, तिचा आशीर्वाद आमच्या ठायीठायी बसला असल्याची भावना त्यांच्या भक्तांकडून कायम व्यक्त केली जाते. विठामाय आणि त्यांच्या शिष्यामध्ये अनेक वेळा रात्रीच्या रात्री विचारमंथन, 'गूजं' म्हणजे ज्ञान, तत्त्वज्ञानाच्या विषयावर चर्चा होत. अज्ञानाचा अंधार दूर करून विठामायने कष्टकरी, शेतकरी, महिला, पुरुषांमध्ये मातृदेवतेच्या परंपरेची, त्या चळवळीच्या ज्ञानाची ज्योत पेटवल्याचे दिसते. त्यातील एक गाणे असे -

**असा मितं गुरू केला, गडू तांब्यावरी पेला..**
**विठामाय गुरू केला...**
**असा मितं गुरू केला, जवळ मांडीच्या बसूनं,**
**माय माझ्या विठामायनं, बुद्धी शिकवलंय ज्ञानं**
**माय माझ्या विठामायनं, बुद्धी शिकवलंय ज्ञानं**
**विठामाय गुरू केला, नाही कोणाला माहीतं...**
**दिव्या नव्हती ज्योतं, गुजं बोलू सारी रातं...**
**गुरूच्या मठा जाया, मला झाली पायपोळं,**
**गुरू माझ्या विठामायच्या, आरतीची झाली वेळं गं...**
**गुरूच्या मठा जाया, मला वाजलेतं बारा,**
**गुरू माझ्या विठामायचा नेमं पूनवंचा खरा गं...**
**गुरूच्या मठा जाया, बारावरी बाजे एकं..**
**अशी हिल्लाळ काढते, रुकमामाय तिची लेकं गं...**
**गुरूच्या मठा जाया, मला झालीया रातरी**
**गुरू माझ्या विठामायला, कसं कळालं अंतरी वं.. धुरपतामाय**

दैठण्याच्या माले-पाटलांच्या घराण्यातील या योगिनीने आजूबाजूच्या परिसरात धुरपतामायची मातृदेवतांची अवैदिक चळवळ उभी केली, ती वाढवली. दैठण्याच्या नैर्ऋत्येला सुमारे सात किमीच्या अंतरावर धारासूर येथे केशवरायाचे मंदिर आहे. या मंदिराची रचना लक्षात घेतली तर या परिसरात शैवांचा मोठा प्रभाव असावा असे प्रकर्षाने दिसते. त्यासोबत महानुभाव पंथाचाही मोठा प्रभाव असल्याने त्यासाठीचे बळ माले-पाटील यांच्या घरातून सुरू झालेल्या मातृदेवतांच्या या चळवळीला मिळाले असावे.

'धुरपतामाय आणि सप्तमाताच्या पूर्वापार चालत आलेल्या या परंपरेला विठामायने मराठवाड्यापासून ते तेलंगणापर्यंतच्या असंख्य गावागावातील मराठासमाजापासून ते अस्पृश्यजातीत खोलवर रुजविण्याचे मोठे कार्य केले आहे. विठामायचे नाव घेताच अनेक महिला आपल्या लाडक्या गुरूच्या आठवणींची गाणी गातात. तिला धुरपतामायसोबत जोडून तिच्याही नावाचा 'हार बोला' चा जयजयकार करत असतात.'

**बाई भक्तीनीचं गुण, बाई भक्तीनीला कळं,**
**माय माझी विठामाय, माझ्या हृदयातं खेळं.**
**आल्या आल्या विठामाय, कशा आल्या उल्हासानं,**
**माय माझ्या विठामायचे, पायं धुवा गिलासानं.**
**आल्या आल्या विठामाय, विठामायचे गं पायं,**
**हायेतं आळवणी मऊ, माय माझ्या विठामायचे,**
**किती दर्शन घेऊ?...**

अशा प्रकारची शेकडो गाणी विठामायवर गायिली जातात. त्यांची संख्या किती असेल, यावर प्रल्हाद देवकर यांच्याशी विचारले असता ते इतकेच म्हणाले की, 'डोक्याला जितके केस नसतात, तितकी गाणी आहेत. दरवर्षी वैशाखी पौर्णिमेला मोठी जत्रा भरते. जमेल तसा मोठा भंडारा केला जातो.' विठामायनंतर मुलगा म्हणून मी त्यांच्या गादीवर बसल्याने अनेक जिल्ह्यात आजही लोक बोलावून घेऊन जात असल्याचे त्यांनी सांगितले. मायने जवळपास माझ्यासमोर पाचशेच्या दरम्यान लोकांना देवकरणीला शिष्य केले. मला ते भाग्य मिळाले नाही. माझ्या हातून

पन्नासेक लोकांना मी गुरूमंत्र दिला. त्यात दोन-तीन देवकर आणि इतर पोतराजही होते, असेही प्रल्हाद देवकर यांनी एका भेटीदरम्यान सांगितले.

'राजामायपूर्वी त्यांच्या वंशात धुरपतामायची परंपरा चालविणारी कोण व्यक्ती होती, याबद्दल माहिती मिळत नाही. पण विठामायपूर्वी त्यांच्या कुटंबात चार पिढ्यांचा उल्लेख मिळतो. सुमारे दोनशे वर्षांच्या दरम्यान, चंद्रपूरची वारी सुरू होती. रामराव पाटील देवकर हे विठामायच्या सासऱ्यांचे वडील, सासरे घनःश्याम पाटील आणि त्यानंतर विठामाय आणि आता रुकमामाय आणि प्रल्हाद देवकर यांच्यापर्यंत धुरपतामायची परंपरा अजून सुरू आहे. विठामायच्या कुटुंबांची ओळख ही माले-पाटील अशी असली तरी त्यांचे आडनाव कच्छवे असे आहे.'



आजोबा घनःश्याम पाटील देवकर यांच्यापर्यंत आपण धुरपतामायची वारी कशी चालायची हे लहानपणी थोडेसे पाहिले होते, असे प्रल्हाद देवकर (कच्छवे)यांनी सांगितले. आपल्या आईबद्दल ते म्हणाले, 'माझी आई विठामायच्या पायी वारीचा मी साक्षीदार आहे. त्या वेळी आम्हाला अनेक लोक पाटील असून म्हारा-मांगाच्या आईला कसे जाता, असे म्हणून उपरोधाने चिडवत असत. पण आईने कधी त्यांच्याकडे लक्ष दिले नाही. उलट आईच्या संपर्कात आलेल्या महिला-पुरुषांच्या आयुष्यात अनेक चांगले बदल झाले, त्यांचे भले झाले. आईच्या अनेक चमत्कारामुळे लोकं तिला टर्रर घाबरायचे.' विठामाय यांनी आपल्या कार्यकाळात अनेक कुप्रथांना लगाम घालण्याचे काम केले होते. 'त्यावेळीही एखाद्या महिलेला मासिक पाळी आल्यानंतर वेगळी वागणूक देण्याचे प्रकार होत. त्यांनी ती प्रथा बंद करण्यासाठी त्या

वेळी बरेच मोठे धाडस केले होते.' म्हणूनच त्यांच्यावर करण्यात आलेल्या एका गाण्यात त्याचा उल्लेख सापडतो.

**विठामायचा भंडारं, दिसतोयं अगुचरं,**
**गुरू माझ्या विठामायनं, सोडविले घरं दारं गं... धुरपतामाय**
**बाई विठाळ-चंडाळं, करीते दूरं-दूरं,**
**गुरू माझी विठामाय, गुरू आगनीचं घरं गं... धुरपतामाय**
**माय आगनीचं घरं गं... धुरपतामाय**
**आल्या गेल्याला पुसीते, दैठणगावी खुशाल, खुशालं**
**गुरू माझी विठामाय, गादीवरली दुशालं वं... धुरपतामाय...**

असाच एक प्रसंग मालटाकळी या छोट्याशा गावी घडल्याची कथाही प्रल्हाद देवकर यांनी सांगितली. 'विठामाय गंडेदोरे घालण्यासाठी विरोध करायच्या. त्यापेक्षा तिचा आपल्या हळदीच्या भंडाऱ्यावर खूप विश्वास होता. हा भंडारा आणि लिंबू हीच तिची ताकद होती. कधी कोणी गंडे-दोरे द्या, मागणी करायला आल्यास त्याला विठामाय हाकलून द्यायची.'

विठामायचे मूळ नाव हे 'धुरपता' असल्याचे त्यांच्या काही भक्तांनी सांगितले. त्या लहान असताना ती अनेकदा वनात, जंगलात जाऊन बसायची. तेव्हापासूनच ती निसर्गाचे, मातृदेवींचे ध्यान करत असल्याच्या, चमत्कारांच्या कथा आजूबाजूच्या गावातून अजूनही सांगितल्या जातात. तिच्यामुळे गावातील कॉलरा, महामारीसारखे आजार कायम गेल्याचेही लोक सांगतात. स्वच्छता आणि रोगांपासून दूर राहण्यासाठी विठामायने अनेक गावांमध्ये त्या वेळी बदल घडवून आणले असले तरी ती एक देवकरीण म्हणूनच ओळखली जाते.

एकाच वेळी मातृदेवतांची परंपरा चालविताना निसर्गासोबत पशू, पक्षी आदींना त्यांनी खूप महत्त्व दिले होते, त्यावर विठामायचा भर होता. त्यामुळेच तिच्या घोडीलाही इतका सन्मान मिळाला होता. त्यांची ही घोडी एक मानवी प्रतिकात्मक रूप म्हणून समोर आल्याचे दिसते. विठामाय या आपल्या शिष्यगणाला जीवनमूल्यांची, आत्मज्ञानाची शिकवण देत असत. म्हणून ते विठामायचा प्रत्येक ठिकाणी 'गुरूमाय' असा उल्लेख करताना

दिसतात. विठामायच्या एकूण कार्याचा आवाका लक्षात घेण्यासाठी दाखला म्हणून खालील गाण्यातून बरेच संदर्भ मिळतात.

**विठामाय गुरू केला, म्यातं न्यानाची पाहूनं,**
**मला शिकविलं न्यानं, मांडी जवळं घेऊन... गं धुरपतामाय**
**विठामाय गुरू केली, म्याचं न्यानाची गं थोरं,**
**अंतः काळाच्या येळेला, दायी मारगाचे घरं गं...धुरपतामाय**
**येवढं तनं, मनं धनं मला गुरूला वाहायचं,**
**सुद्धं करावी महाराजं, मोक्षं पदाला जायाचं वं.. धुरपतामाय**
**एवढं सकाळं उठूनं गायीच्या कोठ्या जावं,**
**गुरू माझ्या दयाळा, नावं पवित्राचे घ्यावं गं... धुरपतामाय**
**बाई सरगीच्या वाटं, जीवं चालाला एकला,**
**गुरू माझ्या विठामायचा, संगं न्यानाचा दाखलां गं... धुरपतामाय**
**बाई सरगीच्या वाटं, बाई यामानं भरला वाडा,**
**गुरू महाराज बोलले, पत्रं पूरवीचे काढा वं ... धुरपतामाय**
**बाई सरगीच्या वाटं, जीवा तुझा अपघातं,**
**बोलले गुरू माय, साक्षेदार सद्‌गुरूनाथं... गं धुरपतामाय**
**गुरूच्या मठा जाया, मला झाली पायीपोळं,**
**गुरू माझ्या विठामायच्या, आरतीची झाली येळं... गं धुरपतामाय**
**गुरूच्या मठा तं जाया, मला वाजलेत बारा,**
**गुरू माझ्या विठामायचा, नेमं पुनवंचा खरा... गं धुरपतामाय..**
**गुरूच्या मठा जायला, मला झालीया रातरी,**
**गुरू माझ्या विठामायला, कसं कळालं अंतरी... वं धुरपतामाय**

विठामायपूर्वी त्यांच्या कुटुंबात धुरपतामायची परंपरा ही तीन ते चार पिढ्यांपासून होती. प्रल्हाद महाराज यांचे पणजोबा रामराव महाराज हे देवकर होते. त्यांचा कालखंड सुमारे दीडशे वर्षांपूर्वीचा असावा. त्यानंतर आजोबा घनःश्याम हेही देवकर होते. यांचा कालावधी हा राजामायच्या समकालीन असावा. अथवा तळेगावच्या राजामायच्या पूर्वीच विठामायच्या कुटुंबात धुरपतामायची परंपरा चालवली जात असावी. त्यानंतर विठामायकडे त्यांच्या सासऱ्यानंतर ही परंपरा कायम झाली. तरीही

विठामायच्या ज्या अनेक कथा सांगितल्या जातात, त्यावरून विठामायचा बालपणापासूनच ओढा हा योगिनी, देवी परंपरेकडे होता. त्यामुळे त्या बालपणी अनेकदा जंगलात एकट्याच जाऊन बसल्याच्या कथा सांगितल्या जातात.

**बारडाच्या पटांगणात,**
**एवढी विठामाय आली,**
**एवढी विठामाय आली,**
**आरतीला निवदी देली वं..धुरपतामाय**
**बारड-चंद्रापूरं,**
**दोन्ही महोजाचे गावं**
**ज्याच्या मनामंधी भावं,**
**त्यायनं चांदियाला जावं गं..धुरपतामाय**

विठामाय या चंद्रपूरला पायी जाताना वाटेत असलेल्या नांदेड जिल्ह्यात असलेल्या बारडला जात असत. बारड हे पोचीमायचे मूळ ठाणं असल्याने येथे त्या मुक्कामाला थांबून पुढे जात असत. तिथे त्यांच्याकडून करण्यात येणारी आरती असे अनेक वर्णन गाण्यातून येतात.

विठामाय या गडचांद्याला ६८ वेळा आपल्या घोडीवर स्वार होऊन गेल्याचे प्रल्हाद देवकर सांगतात. कदाचित काही वर्षांत अधिक वेळा त्या गेल्या असाव्यात. विठामायच्या वाड्यापासून ते (गडचांद्यातील) चंद्रपुरातील त्यांच्या उतरलेल्या ठिकाणापर्यंत अनेक गाणी भक्त गातात. त्यातील वर्णन लक्षात घेतल्यास ही त्यांची ही चळवळ किती प्रभावी असावी हे लक्षात येते.

**चला, चला फाह्या जावू, बारा दरवाज्याचा वाडा.**
**माय माझ्या धुरपताचा, एक पुजाला उघडा वं, धुरपतामाय**
**चंद्रापूराची गं हवा, काय सांगू नं येड्याला,**
**माय माझ्या धुरपताच्या, बारा दरवाजे वाड्याला गं, धुरपतामाय**
**माय माझ्या धुरपताची, जत्रा भरली आज ना,**
**गुरू माझ्या विठामायचा, कुठं उतारला म्याना वं, धुरपतामाय**

**मितं काय सांगू बाई, चंद्रापूरची गं हवा,**
**गुरू माझ्या विठामायचा, कुठं उतरलाय पवा वं, धुरपतामाय**
**माय माझ्या धुरपताची, जत्रा भरली झाडोझाडी,**
**गुरू माझ्या विठामायची, कुठं उतरील्याय गाडी वं, धुरपतामाय**
**मितं काय सांगू बाई, चंद्रापूराची गं हवा,**
**माय माझ्या धुरपताची, जत्रा भरली काठोकाठ,**
**गुरू माझ्या विठामायची, पडली हिल्लाळाला गाठं वं, धुरपतामाय**
**एक बार धुरपतमायच्या नावानं हार बोला...**

विठामायचे दैठण्यातील लग्न धोंडिराम कच्छवे यांच्यासोबत झाले. विठामायचे मूळ गाव आणि माहेर हे परभणी जिल्ह्यातील पूर्णा तालुक्यात असलेले धार हे होते. लग्नानंतर त्यांनी आपला संसार करीतच आपल्या कुटुंबात मागील दोन पिढ्यांपासून सुरू असलेली धुरपतामायची परंपरा चालवून एक लौकिक मिळवून दिला. इतकेच नव्हे, तर ती एका शिखरावर नेवून ठेवली.

विठामायपूर्वी असलेल्या रामराव, घनःश्याम या देवकरांचा उल्लेख खूप क्वचितच आढळतो. मात्र, विठामायवर लाखो मौखिक गाणी रचण्यात आली. तशी रामराव देवकर आणि घनःश्याम देवकर यांच्याबाबत झालेले दिसत नाही. अथवा ते काळाच्या ओघात नष्ट झाले असावेत. अलीकडे इतर गाण्यांप्रमाणेच विठामायच्या मूळ गाण्यांमध्येही बरीच मोठी भेसळ झालेली दिसते. तरी अजूनही जुन्या देवकरीणकडे काही मूळ गाणी, त्याच्या ओळी गाण्यातून मिळतात. यात प्रामुख्याने सोनपेठ तालुक्यातील थडी पिंपळगावच्या जलसामाय या देवकरीणला असंख्य गाणे मुखोद्गत आहेत.

जलसामाय यांचे एकदा गाणे सुरू झाल्यास आजूबाजूचा परिसरही भारावून जातो. त्यांचा भारदस्त आवाज, प्रत्येक गाण्यातील शब्दमाधुर्य भक्तांना आकर्षित करते. जलसामाय देवकरीणच्या आवाजातील विठामायची गाणी हृदय हेलावून टाकतात. कोणतेही शिक्षण नाही, परंपरा नाही, तरीही जलसामायसारख्या असंख्य देवकरणीने मुखोद्गत केलेली गाणे ऐकून आश्चर्य वाटते.

आत्मा ज्ञानाचं कुलुपं,
उघडती उघडना गणा वं..
माय माझ्या विठामायची,
किल्ली मला सापडना वं...
गुरू माझ्या विठामायची,
किल्ली मला सापडना वं...
आत्मज्ञानाचा कुलूप,
उघडू कशी-कशी नं,
किल्ली माझ्या गुरूपशी गं...
आत्मज्ञानाचं कुलुपं,
मीतं उघडया गेले गेले वं...
मीतं उघडया गेले,
रत्नं मला सापडले वं...
मीतं उघडाया गेले,
माझ्या गुरूचे मंतरं, मंतरं...
माझ्या गुरुचे मंतरं,
रत्नं मला सापडले वं...
मह्या गुरूचे मंतरं रत्नं,
मला सापडले वं...
विठामाय सेव झाली,
शंभर वरसाच्या आतं,
गुरू माझ्या विठामायचा,
चूडा वाजे समाधीतं वं...
गुरू माझ्या विठामायचा,
चूडा वाजे समाधीतं वं... धुरपतामाय

दैठण्यापासून काही मैलाच्या अंतरावर संत जनाबाईची समाधी असलेले गंगाखेड आहे. संत चळवळीमुळे हे तीर्थक्षेत्र म्हणून ओळखले गेले असले तरी तसा सन्मान दैठण्याला मिळाला नाही. धुरपतामायच्या नावाने सुरू झालेल्या या चळवळीला पुस्तकात मांडणे कठीण होते.

आपली परंपरा शेतकरी, बलुतेदार आदींमध्ये रुजविताना त्यांनी कायमच आपली वेगळी ओळख ठेवली. केवळ मौखिक परंपरेच्या जोरावर ती अजूनही शेवटच्या घटकांपर्यंत पोहोचली आणि रुजली असून आज ती मातृदेवतांच्या परंपरेची वाहक बनून जिवंत आहे. त्यांनी निर्माण केलेली मौखिक लोकसाहित्याची परंपरा ही एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे प्रवाहित होत असते. त्यामुळे तिचा कोणी एक रचिता नसला तरी विठामायच्या एकूणच मौखिक परंपरेतून या परिसरातील मातृपरंपरेच्या चळवळीचे चित्रण आणि त्या परंपरेचे दर्शन यातून घडते.

**कार्यक्रमांतील आणि स्थानिकांकडून मिळालेली माहिती :**

१. विठामायचे अनुभव : प्रल्हाद कच्छवे, देवकर(विठामायचे ज्येष्ठ पुत्र), दैठणा, जि. परभणी.

२. विठामायची गाणी : बंडू देवकर, खेडुळा, ता. पाथरी, जि. परभणी.

३. विठामायची माहिती : रुकमामाय देवकरीण, (विठामायची मुलगी), दैठणा, जि. परभणी.

४. विठामायची माहिती आणि गाणी : विमलबाई (नात), दैठणा, जि. परभणी.

५. गाणी : जलसामाय कदम, थडी पिंपळगाव,ता. सोनपेठ, जि. परभणी.

६. समाधीची ओळख : विमलबाई(नात), दिलीप (धुराजी)देवकर, कोंडिबा कांबळे आणि इतर सहकारी.

७. गाणे आणि विविध कार्यक्रमातील सहभाग :

स्वाती देवकरीण, देवनांदरा, ता. पाथरी, जि. परभणी.
गंगासागर, रेणुका, आशामती, रा. कोल्हा, ता. मानवत.
जिजाबाई, मीनाबाई, कोरेवाडी, ता. जिंतूर.
लक्ष्मीबाई, माजलगाव.
जयश्री, संगीता, नारायण देवकर, खेडुळा, ता. पाथरी.
शशिकलाबाई, देवनांदरा, ता. पाथरी, जि. परभणी.
गोपीनाथ सुरवसे, वाघरवाडा, ता. पाथरी.
गंगाबाई गायकवाड, ता. जि. परभणी.
छाया बारहाते, ता. जि. परभणी.
पद्मीनबाई कांबळे, उदगीर, जि. लातूर.
सुनिता गायकवाड, हातरवाडी, ता. मानवत, जि. परभणी.
धुरपती कुरधने, राधा जवाधे, धुरपती त्रिमुखे,
राणी सावरगाव, ता. घनसांगवी, जि. जालना.

भाग्यश्री जगताप, आशामती आहेरकर, मंगल दळवे,
राणूबाई कांबळे, पाथरी, जि. परभणी.
राधाबाई कांबळे, हंडरगुळी, उदगीर, जि. लातूर.
शशिकला भदरगे, शशिकला आतके, चंद्रकला गरड, कशीवरता,
इंद्रायणी ढालेगाव, ता. पाथरी, जि. परभणी.
विठ्ठल घोंगडे, मिनाबाई भालेराव, लक्ष्मीबाई भारसाखळे,
मालनबाई, मुंबई.
लक्ष्मीबाई सुतारे, माजलगाव.
पारुबाई पाटील, पंचुबाई कांबळे, पारुबाई कांबळे,
पोट्टूळ ता. मानवत, जि. परभणी.

***



# ७. येळेगावची रुकमामाय

**बाई मी निघाले बारडला,**
**चांद्याच्या देवीला!**

नांदेड जिल्ह्यात भोकरफाट्यापासून काही कि.मी.चे अंतर पुढे गेल्यावर येळेगावकडे जाणारा रस्ता लागतो. मुख्य रस्त्यापासून काही अंतरावरच अर्धापूर तालुक्यात येळेगाव हे गाव वसलेले आहे. जवळच भाऊराव चव्हाण सहकारी साखर कारखाना असल्याने येळेगावची ओळख या कारखान्यामुळे सर्वत्र आहे. गाव तसे जुने असले तरी साखर कारखाना आल्यानंतरच येथे सुधारणा झाल्याचे पाहावयास मिळते. याच गावी सुमारे शतकभराच्या सुमारास येळेगावात रुकमामाय नावाच्या

देवकरीण होऊन गेल्या.

धुरपतामायच्या देवकरीण परंपरेत येळेगावच्या रुकमामायला मोठे स्थान आहे. राजामाय आणि रुकमामाय यांच्यात थोडेसे अंतर असल्याचे सांगितले जाते. मात्र ते नेमके किती होते, याचा दाखला मिळत नाही. म्हणून त्यांच्यावर गायिल्या जाणाऱ्या गाण्यातूनच याचा शोध घेता येतो. तसा त्यांच्या जन्माचा इतर कोणताही पुरावा मिळत नाही. तळेगावच्या राजामायप्रमाणेच रुकमामायवरही मोठ्या प्रमाणात महिला गाणी गातात. प्रत्येक गाण्यातून रुकमामायला मोठा मान दिला जातो.

**येळेगाव नगरात,**
**अब्दागीरीचा दाटवा,**
**मानकारणीला काय उठवा,**
**माता माझे माय...**

येळेगावपासून सुमारे आठ-दहा कि.मी.च्या अंतरावर बारड हे मातृदेवताच्या यादीतील सर्वांत मोठे ठाणं आहे. बारड येथे पोचेमायचे स्थान म्हणून ओळखले जाते. तर देवकर, देवकरीण आपल्या गाण्यातून बारडच्या मातृदेवीला चंद्रपूरची देवी, चांद्याची माय म्हणूनही ओळखतात. स्थानिकांमध्ये ही ओळख शीतलादेवी म्हणून आहे. गावाच्या बाहेर मांगवाड्याच्या लगतच असलेल्या जागेत शीतला देवीचे म्हणजेच पोचेमायचे हे ठिकाण आहे.

रुकमामायला बारडजवळची देवकरीण म्हणून ओळख असल्याने एक वेगळा मान आहे. चंद्रपूरच्या पायी यात्रेची सुरुवात ही राजामायच्या पूर्वीच रुकमामायने केली होती, असे सांगितले जाते. यासाठी अनेक प्रकारच्या आख्यायिका या परिसरात सांगितल्या जातात. रुकमामायची आता चौथी पिढी हा वारसा चालवते.

चंद्रपुरात रुकमामायला पहिला मान असल्याचे त्यांची सध्या गादी सांभाळत असलेल्या सांगतात. चंद्रपूरची माय ही पूर्वी रुकमामाय राहत असलेल्या बारसगावला आली होती. तिथून ती बारडमार्गे चंद्रपूरला गेली अशी एक लोककथा आहे. बारसगाव येथे महाकाली आणि रुकमामाय यांचे एक छोटेखानी मंदिरही बांधण्यात आल्याचे दिसते. देवकर आणि

देवकरीण या आपल्या परंपरेत बारडसोबतच या बारसगावला त्या वेळी चंद्रपूरसारखा मान देत असत. परंतु पुढे रुकमामाय येळेगावात येऊन स्थिर झाल्यानंतर बारसगावकडे दुर्लक्ष झाले. यामुळे रुकमामाय ही येळेगावची देवकरीण म्हणून अधिक परिचित झाली असावी.

रुकमामायचे मूळ गाव हे भोकर तालुक्यात असलेले देवठाणा. पण त्या गावी राहिल्याच नाहीत. येळेगावपासून अडीच-तीन किमीच्या जवळ बारसगाव येथे त्यांचा अधिक काळ गेला. बारसगाव हे त्यांच्या मामाचे गाव होते. तेव्हा तिथे रुकमामायच्या आजीचा भाऊ राहत होता. त्यावेळी मराठवाड्यात बालविवाहाची मोठी परंपरा होती. त्या वेळी त्यांचे लहानपणीच लग्नाचा निर्णय घरच्या लोकांनी घेतला. तो विषय हळद लावण्यापर्यंत पोहोचला. मात्र, त्यावेळीही रुकमामायने आपण लग्न करायचे नाही, असे ठामपणे सांगितले होते. परंतु त्यांचे कोणी ऐकले नसावे; लग्नानंतर त्या कुटुंबात फार काळ रमल्या नाहीत.

वयाच्या सातव्या वर्षापासूनच रुकमामायचा ओढा हा देवी, मातृदेवता या परंपरेकडे होता, असे त्यांचे वारसदार सांगतात. त्यांच्या तोंडून जे शब्द त्यावेळच्या लोकांपुढे निघत ते खरे व्हायचे. रुकमामायच्या संपर्कात आलेल्या असंख्य लोकांच्या जीवनात बदल झाल्याचे त्यांचे नातेवाईक सांगतात. रुकमामायच्या कुटुंबात शिक्षणाची कोणतीही परंपरा नसल्याने रुकमामायच्याही कार्याची नोंद कुठेही करता आली नाही. मात्र, ती शिक्षण नसलेल्या हजारो देवकरीण-देवकर आणि पोतराजांनी आपल्या गाण्यातून जपून ठेवली आहे.

**येळेगाव उमाटाला...**
**देवी माझ्या रुकमामायच्या, येणं गुरूच्या मठाला,**
**येळेगाव गावाची गं, वाट हाय केसाहून बारीक.**
**माय माझ्या रुकमामायची, रथ नेण्याची तारीफ.**
**येळेगाव नगरात, जातो म्हणताना व्यानं,**
**देवी माझ्या रुकमामायची, आली हेतू करमना.**
**येळेगाव नगरातं गुरू घर हाय छान, त्यायने शिकविले ग्यान,**
**येळेगाव नगरात, कशा वेद वैदवाणी,**

**रमाईला पाजावा, भांडाराचं पाणी.**
**येळेगाव, बारसगाव दोन्ही महोजाचे गावं,**
**ज्यांच्या मनामध्ये भाव, त्यायनी येळेगावा जावं.**
**रुकमामाय-धुरपता दोन्ही, येवजाच्या बाया.**
**माय माझी रुकमामाय, आली सती भाव पाया.**

अशा प्रकारची असंख्य गाणी ही काळाच्या ओघात नष्ट झाली असली तरीही मूळ गाणी आणि त्याच्यातील काही ओळी अपवादाने देवकरीण गातात. त्यांचा संदर्भ जोडून रुकमामायच्या कार्याची नोंद घेता येऊ शकते. येळेगावमध्ये मूळ रुकमामायची समाधी आहे. रुकमामायनंतर त्यांची ही परंपरा नंतर मलशामाय हिने सांभाळली. मलशामाय यांचे सुमारे ४० वर्षांपूर्वी निधन झाले असून, त्यांचीही समाधी मूळ रुकमामाय यांच्या शेजारी आहे. ग्यानोजी व भीमबाई यांना तीन मुले झाली होती. चांदू, मंशाबाई, चंद्रकला अशी त्यांची नावे होती. मंशामाय यांनी मूळ रुकमामाय यांची परंपरा चालवली असली तरी त्यांनाही मूळबाळ झालेले नव्हते. पुढे चांदू यांना गंगासागर आणि शकुंतला या दोन मुली झाल्या. त्यापैकी गंगासागर यांनी देवकरीण म्हणून दीक्षा घेतली आणि रुकमामायची गादी सांभाळली. आता मंशामाय यांच्या भावाची म्हणजेच ग्यानोजी चांदू कंदिलवार यांची मुलगी रुकमामाय या नावाने गादीवर आहेत.

योगिनीसारखे जीवन जगत असलेल्या या तरुण देवकरणीने आपल्या मूळ रुकमामायने निर्माण केलेली परंपरा जतन कशी होईल, यासाठी आपल्याला वाहून घेतले आहे. मागील काही वर्षांत गावोगाव फिरून अनेक लोकांकडे सहकार्य घेऊन त्यांनी येळेगावमध्ये रुकमामाय, मंशामाय यांच्या समाधीला एका मंदिराच्या आकाराला आणले आहे. ही समाधी लाखो देवकर-देवकरीण आणि पोतरांजाचे तीर्थस्थान बनली आहे. तितकेच महत्त्व हे रुकमामाय ज्या गावात सर्वात जास्त काळ राहिल्या त्या बारसगावलाही आहे.

रुकमामाय बारसगावला राहत असताना त्या गावावर त्या काळी येणारे कॉलरा आदी रोग येत नसत. आजूबाजूच्या गावांमध्ये हे आजार आले तरी बारसगाव मात्र सुरक्षित असायचे. यासाठी रुकमामाय या आजारासाठी

लोकांना आपल्याकडे असलेला भंडारा आणि त्याचे पाणी पाजायच्या. आजारापासून दूर कसे राहता येईल, याचे मार्गदर्शन देत करायच्या. हळद, लिंबाचा डहाळा यातील रोगप्रतिकार शक्तीचे गुण हे त्या वेळी देवकर, देवकरीण यांना माहीत होते. त्यामुळेच हळद आणि लिंबाच्या डहाळ्याला मातृदेवतांच्या परंपरेत मोठे स्थान आहे. इतकेच नाही तर दही, शेरसाळीचे तांदूळ याचा भात यालाही महत्त्व दिले जाते.

रुकमामाय या चंद्रपूरच्या महाकालीची देवकरीणच असल्याने त्यांच्याजवळ भंडारा, लिंबाचा डहाळा आदी रोगप्रतिकार शक्ती वाढविणाऱ्या बाबी असणे स्वाभाविक होते. मात्र, त्यावेळी लोकांना अनेकविध आजारापासून दूर ठेवण्याची ताकद ही रुकमामाय यांच्यातच असल्याचे वाटत असावे. यामुळे लोकांचा खूप विश्वास होता. या विश्वासातून अनेक चमत्काराच्या लोककथाही बारसगाव येथे घडल्याचे देवकरीण आपल्या गाण्यातून, लोककथांतून सांगतात.

चंद्रपूरची माय ही चंद्रपूरला येण्यापूर्वी एकदा बारसगावला आली होती. परंतु तिला येथील लोकांनी ओळखले नसल्याने ती पुढे बारडला आणि चंद्रपूरला निघून गेली असल्याची लोककथा सांगितली जाते. हा सुमारे दीडशे वर्षांपूर्वीचा कालावधी असावा. लोक त्यावेळी कॉलरा आदी रोगाला देवीचा कोप म्हणूनच त्याकडे पाहत असत. अजूनही तसा बराच कल आहे. मात्र हे आजार का होतात, याची जाणीव अनेकांना त्यावेळीही नसत. मात्र, त्याला रोखण्याचे, स्वच्छतेसाठी प्रबोधन करून त्यासाठी लोकांमध्ये जागृती करण्याचे सर्वात मोठे कार्य हे देवकरीण करत असत. त्याच्या जवळील हळदीचा भंडारा, लिंबू, कडूलिंबाचा डहाळा हा त्यावरील जालीम उपाय ठरत होते.

याचदरम्यान, एकदा गडचांद्याची म्हणजेच चंद्रपूरची धुरपतामाय ही बारसगावात येणार असल्याचे रुकमामायने आपल्या अंगात येऊन सांगितले. धुरपतामाय ही गावात कोणत्याही वेशात येईल. तुम्ही रात्रभर जागे राहण्यासाठीचा त्यांनी गावातील लोकांना संदेश दिला होता. देवी येणार म्हणून त्या वेळी लोकांमध्ये खूप भीती निर्माण झाली होती. देवी आली तर आपले काय होईल, या भीतीने साऱ्या गावात एक भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. नेमका तो दिवस उजाडला.

देवी ही कोणत्याही वेशात आणि रूपात येऊ शकते, ती रात्रीही येऊ शकते, असे संकेत रुकमामायने दिल्याने लोक त्या दिवशी रात्री जागे राहिले. परंतु प्रत्येकांनी आपल्या घराची दरवाजे बंद करून घेतली होती. कोणाचेही दार उघडे नव्हते. माय तशी एका म्हातारीच्या रूपात आली. अनेकांच्या दरवाज्यांत गेली. परंतु कोणीही दरवाजे उघडले नाही आणि बाहेरही आले नाहीत. म्हणून ती बारसगाव सोडून पुढे गडचांद्याला निघून गेली. अशी ही लोककथा देवकरीण आपल्या गाण्यातून सांगत असतात. त्या रात्री बारसगावातील एका जरी घराचा दरवाजा खुला असता तर या गावाला चंद्रपूरसारखा मान कायम राहिला असता, असे देवकर सांगतात. यामागे असलेल्या प्रतिकांचा विचार लक्षात घेणे आवश्यक आहे. आजही बारसरगाव हे देवकर-देवकरीण यांच्या नजरेत मोठे तीर्थक्षेत्र म्हणून समजतात. या गावात माय आली, तिचे पाय या गावाला लागले म्हणून लोक इथे येऊन आपला माथा टेकवतात. त्यावर गाणीही गात असतात.

बारसगावाला रुकमामायने एक मोठा सन्मान मिळवून दिला होता. त्या वेळी मराठवाड्यात बारसगावची रुकमामाय म्हणूनच ओळख होती. परंतु योगिनी या एका जागेवर कुठेही स्थिर नसतात. तशा रुकमामायही फार काळ बारसगावात स्थिर राहिल्या नाहीत. त्यांचा पुढील प्रवास हा जवळच असलेल्या येळेगावात झाला. बारसगावातून रुकमामाय कशा आल्या, याचीही मोठी रंजक कथा आहे.

येळेगावात त्या काळी महामारी, हावळ म्हणजेच कॉलरासारखे आजार पसरले होते. मोठ्याप्रमाणात लोक मरत होते. एक गेला की, लगेच त्याच्यामागे दुसऱ्या एखाद्या व्यक्तीला मृत्यूने गाठले जायचे. कोणताच इलाज कामी येत नव्हता. मात्र, बाजूलाच असलेल्या बारसगावात एकही माणूस महामारीला बळी पडत नाही, ही गोष्ट आजूबाजूच्या अनेक गावांमध्ये पसरली होती. त्यासोबत येथे रुकमामायसारख्या योगिनीमुळे महामारी येत नाही, ती पळून जाते असाही समज लोकांमध्ये होता. यामुळे येळेगावच्या पाटील आणि गावातील लोकांनी आपल्या गावात रुकमामायला आणण्याचा निर्णय घेतला. परंतु त्या आपल्या गावात येतील कशा, हा मोठा प्रश्न त्यांच्यापुढे होता. काही गावातील पाटील मंडळींनी धाडस करून रूकमामायकडे जाऊन विनवणी केली.



आमच्या गावाचे रक्षण करण्यासाठी तुम्ही आमच्या गावात चला, आम्ही तुम्हाला सन्मान देतो, तुमची परंपरा चालवतो, असे आश्वासन दिले. त्यानंतर रुकमामायने विचार करून त्यांना येण्याचे कबूल केले. त्यानंतर काही वेळात रुकमामायने मात्र एक संदेश दिला. आज दुपारी बाराच्यानंतर तुमच्या गावातील एकही माणूस मरणार नाही. त्यासाठी गावात स्वच्छतेची काळजी घेण्यासाठी अनेक नैसर्गिक उपाय सांगितले. त्यात घरे, अंगण स्वच्छ करून त्यावर शेणाने सडा सारवण करणे, सर्व प्रकारची स्वच्छता राखणे अशा त्या सूचना होत्या. त्याचे गावातील लोकांनी तंतोतंत पालन केले. त्यानंतर गावातील लोकं हावळ आणि आदी आजाराने मरायची बंद झाली. यामुळे लोकांमध्ये रुकमामायबद्दल तीव्र ओढ आणि उत्कंठा निर्माण झाली. गावातील नागरिकांनी काहीही झाले तरी रुकमामायला आपल्या गावात आणायचे आणि इथेच त्यांना कायम ठेवायचे, असा निर्णय त्यावेळी घेतला होता.

'रुकमामायला बारसगावातून येळेगावला आणताना मोठा उत्सव साजरा करण्यात आला होता. त्यांच्या अनेक लोककथा या परिसरात सांगितल्या जातात. हलगी, सूर, सनई वाजविणारे अनेक मांग समाजातील वाजंत्री गावात जमा झाले. एखाद्या बहिणीला बोलावणे धाडण्यासाठी शिदोरी पाठवावी लागते, त्याप्रमाणे येळेगावच्या लोकांनी रुकमामायला शिदोरी पाठवली. ही शिदोरी घेऊन गावातील लोक मोठ्या गाजावाजात आणि वाजंत्र्यासह बारसगावात पोहोचले. तिथे रुकमामायची साडी, चोळी, चुडा घालून बोळवण करण्यात आली. तिथून एखाद्या देवीची पालखी निघावी, तसे रुकमामायला गाजावाजात येळेगावला आणण्याचा

कार्यक्रम सुरू झाला. यात येळेगावचे लोकच नाही तर रुकमामायने तयार केलेल्या नांदेड, लातूर, परभणी, बीडसह तेलंगणातील अनेक जिल्ह्यातील असंख्य देवकरीण, देवकर, पोतराज मोठ्या संख्येने या सोहळ्यात सहभागी झाल्याचे त्यांचे भक्त सांगतात.'

रुकमामायला येळेगावात आणण्यापूर्वीच त्यांच्यासाठी राहण्याची सोय गावकऱ्यांनी केली होती. आपल्या गावात त्या आल्यानंतर त्यांना मातृदेवींची परंपरा चालविण्यासाठी कोणतीही बाधा येऊ नये, यासाठी राहण्याच्या जागेसोबतच रुकमामायला गावाला लागूनच असलेली दोन एकर शेती ही दान म्हणून दिली होती. सोबतच राहण्यासाठी एक जुना चिरेबंदीवाडा दिला होता.

रुकमामाय येळेगावात स्थिर झाल्या तरी त्यांचा बारसगावाशी शेवटच्या काळापर्यंत संपर्क कायम राहिला होता. पौष आणि चैत्राच्या महिन्यात त्या गावोगावी भ्रमण करत असत. नांदेड, परभणी, लातूर, आणि जवळच असलेल्या तेलंगणा,आंध्र प्रदेशातील आपल्या शिष्यांच्या गावी त्या जाऊन त्यांना भेटत असत. आयुष्याच्या शेवटपर्यंत त्यांनी जवळ असलेल्या बारडच्या देवीची आणि चंद्रपूरच्या महाकालीची परंपरा चालवत आपली स्वतंत्र अशी शिष्यपरंपरा निर्माण केली. आज सुमारे लाखभराच्या घरात रुकमामायला आपले मूळ गुरू मानणाऱ्या देवकरीण आहेत. तर तितकेच देवकर आणि पोतराजही रुकमामायला आपला गुरू मानतात.

**मारवती बंधवाला...**
**दोन्ही हाताचा काय मुजरा,**
**माता माझे माय, दोन्ही काय मुजरा...**
**मारवतीच्या पारावरी,**
**हिरव्या पातळाची कोण,**
**माहे बहीण रुकमामाय,**
**माता माझे माय...**
**मारवतीची काय बहीण,**
**माता माझे माय...**
**बेजार केलाय काय दोहींनं,**

**माता माझे माय...**
**मारवतीच्या पारावरी,**
**हिरव्या पातळाची घडी,**
**माय मही रुकमामाय.**
**देवी माझी रुकमामाय...**
**बया नेसली संध्याकाळी,**
**माता माझे माय....**
**पिवळं पितांबर,**
**नकी पदराला हायतं,**
**चपराशी गं तिच्या संग,**
**माता माझे माय...**
**चांद्याच्या नारी दंगं,**
**माता माझे माय...**
**माय मह्या रुकमामायला,**
**देवी मह्या रुकमामायला...**
**मोती इंधन वाऱ्याला,**
**उभे पोलीस काय पहाऱ्याला,**
**माता माझे माय....**
**येळेगावच्या व्हमाला,**
**गावोगावचे भक्त येती...**
**स्वारीत भंडारे देती,**
**माता माझे माय...**

रुकमामायने चंद्रपूरची यात्रा ही बैलगाडीनेच सुरू केली असे बोलले जाते. राजामाय, विठामायप्रमाणे त्यांनी आपल्यासाठी घोडी ठेवल्याचे कोणत्याही गाण्यातून उल्लेख सापडत नाहीत. मात्र, राजामायप्रमाणे त्यांचा प्रवास हा बैलगाडीने होत होता. येळेगाव, बारड, आदिलाबाद आणि पुढे चंद्रपूर असा तो पायी प्रवासाचा मार्ग होता. अलीकडे बैलगाडीचा विषय उरला नाही. प्रत्येक जण विविध वाहनांनी येतात. चैत्राच्या यात्रेपूर्वी किमान चार दिवस रुकमामायचे तख्त तिथे जाऊन दाखल होते. दूरदूरून

आलेले शिष्य आता गादीवर असलेल्या रुकमामायच्या चरणावर आपला माथा टेकवतात. तिथला भंडारा घेऊन आपल्या डब्यात साठवतात. ती पुढील वर्षी येणाऱ्या चैत्राच्या यात्रेपर्यंत त्यांच्यासाठी ती शिदोरी असते.

**येळेगाव नगरात...**
**जातो मानताना व्हईना,**
**देवी माझ्या रुकमामायची,**
**आली हेतू करमना.**
**येळेगाव नगरात...**
**गुरू घर हाई छान,**
**त्यायने शिकवीले ग्यान...**

राजामाय, यमुनामाय, भागामाय आणि विठामायप्रमाणेच रुकमामायच्या अनेक चमत्काराच्या गोष्टी सांगितल्या जात असल्या तरी त्या कायम जादूटोणा, तंत्र-मंत्रांच्या विरोधात होत्या.आपल्या धुरपतामायच्या भंडाऱ्यातच सर्व ताकद असल्याचा त्यांना विश्वास होता. कोणताही व्यक्ती अडचणीत असला तर त्याला आपल्या हळदीचा भंडारा आणि लिंबू देत. खूप वेळा तर भंडाऱ्याची एक चुटकी टाकून ते पाणी प्यायला द्यायच्या. कोणी आजारीच असेल तर त्याला धुरपतामायची यात्रा करणे, तिची पूजा करणे, गावातील मरिआई, पोचेमायची पूजा करणे असे उपाय सांगायच्या. लोकांना विश्वास वाटायचा. त्यासोबतच त्या आपल्याकडे येणाऱ्या पोतराज, देवकरीण यांना आदर करून त्यांना दान देत, मदत करत. मदतीचा आणि एकमेकांना सोबत जगण्याचा एक संदेश रुकमामायनेही आयुष्यभर आपल्या संपर्कात आलेल्यांना दिला. आज नांदेड, परभणी, लातूर आदी जिल्ह्यात रुकमामायच्या नावाची, तिच्या आठवणींची गाणी महिला गातात. तिची आठवण, तिने दिलेल्या गुरूमंत्राची, तिच्या कार्याची महती या गाण्यांमधून गात असतात.

**येळेगावाची हो चांदणी,**
**आली माझ्या घरी पाव्हणी.**
**भंडारानं गं शेजं भरी..**

**कुंकवानं गं शेज भरी.**
**माय माझे धुरपता..**
**एव्हढी इच्छा कर गं पुरी...**

शिमगा आणि पाडव्यादरम्यान शेतीतील कामे कमी असल्याने त्या काळात अनेक गावांमध्ये रुकमामायच्या गाण्यांचा कार्यक्रम ठेवला जातो. पूर्णाजवळ कातनेश्वर नावाचे गाव असून तिथे रुकमामायची परंपरा चालवणारा मोठा समुदाय आहे. ते पौष आणि चैत्राच्या पौर्णिमेला मोठा हिल्लाळ काढून रुकमामायच्या नावाचा गजर करत असतात. या कार्यक्रमाला रुकमामायच्या चौथ्या पिढीतील सध्या त्यांची गादी चालविणाऱ्या (सध्याच्या वारसदार) रुकमामाय या जात असतात. सध्याच्या रुकमामाय यांनीही आपल्या पूर्वज रुकमामायची परंपरा जतन करण्यासाठी अनेक कार्यक्रम सुरू ठेवलेले आहेत. त्यांनीच येळेगावात रुकमामायला गावातील नागरिकांनी दिलेल्या जागेवर समाधीला मंदिराचा आकार देण्यासाठी अहोरात्र परिश्रम घेतले आहे.

मंदिरासमोर मोठ्या उंच दगडावर डिकमाळ आणि त्यातील दिवा कायम तेवत ठेवलेला असतो. बाजूलाच गावातील लोकांनी दिलेली



शेती असून, तिथे काढण्यात येणारे धान्य आणि त्यातील खर्चात मंदिर आणि इतर कारभार चालतो. दूरदूरून येथे देवकरीण, देवकर, पोतराज येतात. पौष महिन्यातील पौर्णिमेला आणि चैत्राच्या चंद्रपूरच्या यात्रेपूर्वी येणाऱ्या कार्तिक पौर्णिमेला येथेही मोठी यात्रा भरते. या यात्रेच्या वेळी पोतराजांची एक मोठी मिरवणूक गावातून काढली जाते. आजूबाजूच्या गावातील लोकही या मिरवणुकीत मोठ्या प्रमाणात सामील होतात.

बारसगावहून ज्या वेळी रुकमामायला येळेगावात बाजत-गाजत आणि धुरपतामायच्या नावाने हार बोलाचा गजर करत आणले गेले, तिची ती

आठवण स्थानिक सांगतात. यात्रेच्या दिवशी मातृदेवतांचा मोठा गजर असतो. लोक रात्रभर रुकमामाय, धुरपतामाय यांच्यावरील गाणी गातात. पोतराज नाचतो. अनेकांना धूपारत्या म्हणताना देवी अंगात येते, लोक बेभानपणे नाचत-बागडत असतात आणि आपल्या रुकमामायची आठवण करीत असतात.

**स्थानिकांकडून मिळालेली माहिती :**

१. रुकमामाय, माहिती (सध्या गादी सांभाळत असलेल्या).
२. रामराव निमोलवाड : रुकमामायचे शिष्य, पांढूर्णी,ता. भोकर, जि. नांदेड.
३. रुकमामायची गाणी : सीताबाई देवकरीण, पारवा-जांब, जि. नांदेड.
: गंगाराम बाळ देवकर, पारवा-जांब, जि. नांदेड.

***



# ८. देगलूरची म्हादामाय

नांदेड जिल्ह्यातील देगलूर या तालुक्याच्या गावी म्हादामाय नावाच्या देवकरीण होऊन गेल्या.(१९३५-१९९४) राजामायच्या परंपरेतील त्या देवकरीण होत्या. देगलूरच्या पूर्वेला जुनी गुमटवेस प्रसिद्ध होती. याच गुमटवेशीच्या बाजूला आणि आताच्या गौतमनगर परिसरात त्यांचे मूळ घर. बाजूलाच लागून असलेल्या कुरेशीवाड्याच्या शेजारी जुने घर होते. आता त्यांच्या वंशजांनी म्हादामायच्या जुन्या घराच्या जागेवरच नवे घर उभे केल्याने त्याची ओळख होत नाही. नवीन घरात गेल्यानंतर अनेक देवादिकांचे फोटो ठेवण्यात आलेले असून, त्यात म्हादामायचा फोटो ठळकपणे दिसून येतो. मागील ४०-५० वर्षांपूर्वी धुरपतामायची देवकरीण म्हणून मोठा दरारा होता. नंतरच्या काळात मात्र त्यांच्या शिष्यगणांचे त्यांच्याकडे दुर्लक्ष झाले, शिवाय त्यांनीही आपल्या देवकरीण होण्याचा कधी गाजावाजा केला नव्हता, यामुळे त्या दुर्लक्षित झाल्याचे त्यांचे वंशज सांगतात. अत्यंत साधी राहणी असलेल्या म्हादामायने धुरपतामायच्या परंपरेसाठी स्वतःला वाहून घेतले होते.

म्हादामायच्या मूळ वारसदारांपैकी त्यांची मोठी नात शोभाबाई, सर्वांत लहान नात शेषाबाई यांनी तिची परंपरा कायम ठेवली आहे. म्हादामायची नात म्हणून त्यांची ओळख असली तरी त्यांना आपले तख्त आणि आपल्या गादीची वेगळी अशी ओळख निर्माण करता आली नाही.

शोभाबाई पूर्वीच्या निझामाबाद आणि आताच्या कामारेड्डी जिल्ह्यातील

मदनूर मंडल म्हणजेच या तालुक्यातील मोगा गावात आपल्या म्हादामायची परंपरा चालवितात. म्हादामायप्रमाणेच त्यांनीही गाजावाजा न करता ही परंपरा सुरू ठेवली आहे.

कामारेड्डी जिल्ह्यातच असलेल्या ऋषेगाव येथे सर्वात लहान नात शेषाबाईने आपल्या आजीनंतर चंद्रपूरची चैत्राची यात्रा अजूनही कायम ठेवली आहे. या दोघीही कोणताही अभिनिवेष न ठेवता आपल्या आजीचा वारसा चालवितात. आपल्या आजीने दिलेला वारसा या नातींनी अजूनही कायम ठेवला आहे. त्यात बम्मनपल्ली येथील सुमनबाई आणि गुंडेकल्लूरच्या राजाबाई याही आपल्या आजीने चालवलेल्या परंपरेवर अभिमान व्यक्त करतात.

तळेगावच्या राजामाय देवकरीण हिची आठवण कायम राहावी, यासाठी म्हादामायने आपल्या एका नातीचे नाव राजाबाई असे ठेवले होते. म्हादामायच्या सर्वच नाती या आताच्या तेलंगणामध्ये असल्याने म्हादामायची अनेक गाणी ही मराठीसोबतच तेलुगू भाषेतही म्हणतात. म्हादामाय या धुरपतामायच्या परंपरेतील मांग समाजाच्या सर्वांत प्रभावशाली देवकरीण होत्या. म्हादामाय यांचे माहेर हे देगलूरपासून जवळच असलेले गोजेगाव. लहान वयातच त्यांचे देगलूर येथील मूळ रहिवासी असलेल्या मल्हारी धबाडे यांच्यासोबत लग्न झाले होते. म्हादामायला हुलामाय ही एक बहीण आणि मोठा मोगला आणि लहान गोविंद असे दोन भाऊ होते. हुलामायचा लातूर जिल्ह्यातील उदगीर तालुक्यात असलेल्या डोंगरशेळकी येथील नागनाक यांच्यासोबत विवाह झाला होता. म्हादामाय आणि हुलामाय या दोघीही बहिणी धुरपतामायच्या परंपरा चालविणाऱ्या होत्या. त्यातही म्हादामायने तळेगावच्या यंकाबापू यांच्याकडून दीक्षा घेतली होती. त्या वेळी यंका बापूला एक भर आहेर आणि सोन्याची मुदी भेट म्हणून दिली होती. त्या बदल्यात त्यांनी म्हादामायला साडी दिली होती. ती आपल्या बहिणीच्या मुलीला म्हणजेच अनुसया हिला दिली होती, त्याची आठवण त्यांच्या नाती सांगतात.

गोजेगावमध्ये पोतराज आणि देवकरीण यांचा वारसा त्यांच्या कुटुंबात अनेक वर्षांपासून होता. त्याला पुढील काळात म्हादामायच्या चळवळीने बळ दिले. म्हादामाय अत्यंत तापट, हजरजवाबी आणि तितक्याच प्रेमळ

होत्या. म्हणून त्यांच्याकडे म्हादामायचा आपल्याला आशीर्वाद मिळावा, आपले दुःख, दैन्य दूर व्हावे, आपल्या अडचणी दूर व्हाव्यात म्हणून देगलूर आणि आजूबाजूच्या परिसरातील म्हादामायकडे येत असत. देगलूर आणि आजूबाजूच्या परिसरात म्हादामायने आपला एक मोठा गोतावळा जमविला होता. चमत्कारापेक्षा आपल्या कर्तृत्वावर निष्ठा ठेवण्याचा त्या आपल्या भक्तांना संदेश द्यायच्या. आजारपणाच्या कारणांसाठी देवी, देव यांचा कोप कधी होत नसतो याचे त्या महत्त्व पटवून द्यायच्या. कमरेला कायम भंडाऱ्याने भरलेली पिशवी असायची, तर बाहेर जाताना आपल्याला दीक्षेसोबत मिळालेला पिवळा डबा, त्यातील वीर कंगन त्यासोबत ठेवायच्या. त्या डब्यात मातृदेवतांच्या काही मूर्तीही ठेवायच्या. तो डबा आता शोभाबाई या नातीजवळ आहे. म्हादामायने कोणत्याही शाळेत जाऊन शिक्षण घेतले नव्हते, परंतु धुरपतामायवर असंख्य रचना त्यांनी केल्या होत्या. इतकेच नाही,



तर त्यांच्याकडे हजारो गाण्यांचा संग्रह मुखोद्गत होता. त्या एकदा गाणे म्हणायला सुरू केल्यास रात्र संपली तरी समोरच्या भक्तांना कळत नसे, असे अनुभव त्यांचे भक्त सांगतात. म्हादामाय यांनी धुरपतामाय यांच्यासोबतच शंकर, पार्वती यांच्यावर अनेक नव्या रचना केल्या होत्या. त्यांना धुरपतामायच्या परंपरेने आलेली शेकडो गाणी त्यांना मुखोद्गत होती. परंतु त्यांची नोंद होऊ शकली नाही, अशी खंत त्यांचे वारसदार करताना दिसतात. मरिआई, पोचूमाय या देवीच्या सण आणि उत्सवात त्या एकदा गाणी म्हणायला लागल्यास सलग दोन-दोन दिवस त्या कोणतेही गाणे रिपीट न करता म्हणायच्या. त्या गाणे म्हणताना त्यांच्या तोंडून एखादे महाकाव्य आणि त्याची असंख्य रचना बाहेर पडतात की काय असा भास व्हायचा, त्या सहज जरी बोलल्या तरी त्यातसुद्धा लयबद्धता असायची. कवितांप्रमाणे त्या शब्दरचना असायच्या. राजामायच्या वंशावळीतील यंका बापू, संताबापू,

नागामाय यांच्या कालावधीतील त्या देवकरीण म्हादामायने देगलूर ते चंद्रपूरची पायी यात्रा तब्बल तीस वर्षांहून अधिक वेळा केल्याचे त्यांचे वारसदार सांगतात. राजामायचा वारसा चालविताना आपली वेगळी ओळख करून त्यासाठीचा पसारा त्यांनी कधी वाढवला नाही. अत्यंत शांतपणे त्या आपल्या धुरपतामायची ही चळवळ चालवित होत्या. त्यांनी केवळ देवकरीण आणि सोबतच आजारांना दूर पळवून लावणारी, लोकांना बरे करणारी देवकरीण म्हणून आपली एक वेगळी ओळख निर्माण केली होती. औषधी वनस्पती यांचे खूप मोठे ज्ञान म्हादामायला होते. कोणत्याही झाडे, वेली, त्यांच्या मुळा यांचा कशासाठी वापर केला जायचा यावर त्या चटकन माहिती देत. आपल्या जवळ कमरेला खोचून ठेवलेल्या भंडाऱ्याच्या पिशवीत अनेक प्रकारच्या औषधी वनस्पतीच्या मूळा आदी त्या ठेवत. दवाखाने उपलब्ध नसायचे त्या वेळी म्हादामाय या अनेकांना आपल्याकडे असलेल्या औषधी वनस्पती आणि त्यांच्या मूळा द्यायच्या. गरज पडली तर लगेच डोंगरात, वनात जाऊन त्या झाडपाला आणून ते एखाद्या वैद्यकांप्रमाणे त्याचे मिश्रण आणि गोळ्या बनवून घ्यायच्या. यातून अनेकांचे आजार नीट व्हायचे. त्यांच्या हळदीचा भंडारा आणि त्याची एक चुटकी टाकली की अनेकांचे आजार पळून जायचे असे भक्त सांगतात.

म्हादामाय ज्या गावी जात, त्यागावी त्यांना देवकरीण म्हणून मोठा सन्मान मिळायचा; पण त्यासोबत त्यांच्या हातून वनौषधी खाल्ल्यावर सर्व आजार पळून जातात, अशी एक भावना त्यांच्या भक्तांमध्ये होती. त्यामुळे त्यांच्याकडे आजूबाजूच्या परिसरात जडीबुटीवाल्या देवकरीण म्हणून त्या परिचित झाल्या होत्या. तिच्या हाताला खूप यश येते, गुण येतो, अशी एक भावना त्यांच्या भक्तांमध्ये होती. म्हादामाय या देगलूरमध्ये वर्षातून केवळ काही महिनेच असायच्या. त्या कायम भटकंती करत असत. त्यातही शेवटच्या काही वर्षांत लातूर जिल्ह्यातील डोंगरशेळकी या आपल्या बहिणीच्या गावी येऊन काही काळ स्थिरावत होत्या. या गावातील प्रत्येकजण हुलाबाईची देवकरीण बहीण म्हणून त्यांना ओळखत असत. देगलूरहून गोजेगाव मार्गे डोंगरशेळकीला चालत यायच्या. मधल्या प्रवासात त्या आपल्या अनेक शिष्यांच्या भेटी घेत त्या पुढील गावी जात

असत. डोंगरशेळकी, गोजेगाव आणि तेलंगणातील मोगा, बम्मनपल्ली, ऋषेगाव आदी गावांचा अपवाद सोडल्यास इतर गावांमध्ये फार काळ रमल्या नाहीत. योगिनीप्रमाणे त्या भटकंती करत राहिल्या आणि आपल्या मातृपरंपरेची चळवळ पुढे नेत राहिल्या. आंध्र प्रदेशच्या सीमेवरच म्हादामायचे देगलूर हे गाव असल्याने त्यांना मराठीसोबत तेलगू, हिंदी आणि कन्नडही भाषा येत होती. कोणतीही अक्षरओळख नसताना त्यांनी धुरपतामायच्या परंपरेवर मराठीसह तेलगूमध्ये असंख्य गाणी रचली होती. त्यातील अनेक गाणी आताच्या तेलंगणा आणि आंध्र प्रदेशातील महिला गावून आपल्या या देवकरणीचा वारसा सांगत असतात. याच काळात म्हादामायची मातृदेवतेची चळवळ खूप बहरास आली होती. म्हादामायचा देवकरीण म्हणून आजूबाजूच्या परिसरात खूप दरारा निर्माण झाला होता. म्हादामायकडे पौर्णिमेला खूप भक्तांचा मेळा भरायचा. म्हादामायने आशीर्वाद दिल्यानंतर अनेकांना मूल झाल्याचे अजूनही भक्त सांगतात. पौर्णिमेला आणि सणाच्या कार्यक्रमाच्या वेळी म्हादामायच्या अंगात यायचे. मात्र, हे अंगात येणे इतरांपेक्षा वेगळे असायचे. कोणताही आक्रस्ताळेपणा नसत. त्या आपल्या अंगात येण्याचा त्या कधीही देखावा करीत नसत. त्या स्थितीत तोंडी केवळ धुरपतामायचा जयघोष आणि एखादी अंगमोडी असायची. आपल्यासमोर एखादा भक्त खूप अडचणीत आणि आजारपण घेऊन आल्यासत्यासाठीची याचना करत. अशावेळी कधीतरी म्हादामायच्या अंगात वारे यायचे. वारे म्हणजे एखादा अंगावर काटे उभे राहिल्यासारखे त्यांना होत. त्यानंतर त्यात एखाद्या आईप्रमाणे आपले केस सोडून समोर आपल्या भक्ताच्या अंगावरून फिरवून त्याला आशीर्वाद द्यायच्या. लगेच त्या कमरेच्या पिशवीतील भंडारा उधळायच्या. हातात असलेल्या लिंबाचा डहाळ्याने समोर असलेल्या भक्ताच्या पाठीवर मारायच्या. तर कधीकधी हातानेच जोराचे तीन थाप मारायच्या. एकदा थाप खाल्यानंतर अनेकांचे आजार पळून जात. त्यामुळे म्हादामायचे हे फटके म्हणजे त्याचे भक्त एक प्रसाद म्हणून स्वीकारायचे. म्हादामायची पाठीवर जोराची थाप पडली की, आपल्या अंगातील आजार आदी पळून जातात, असा ठाम विश्वास त्यांच्या भक्त शिष्यांना होता.

म्हादामाय तंत्र-मंत्राच्या नावाने केल्या जात असलेल्या फसवणुकीच्या

विरोधात होत्या. केवळ धुरपतामायच्या आशीर्वादामुळेच सर्व सृष्टी, जग, चराचर चालते, ती भूमाता आहे, ती या सर्व जगाची नियती आहे, अशी तिची शिकवण असायची. समोर आलेल्या भक्तांच्या मनातील भाव टिपून त्यावर उपाय सांगायच्या. आपल्याला येणाऱ्या प्रत्येक आजारांमध्ये आपल्या आहार आणि स्वच्छतेची महत्त्वाची कारणे असतात, त्यामुळे त्या आपल्या भक्तांना पाणी गाळून पिण्यापासून ते जेवणात कोणती पोषकद्रव्ये असतात, ती कशी घ्यायची याचे मार्गदर्शन करत. महिलांना रातांधळेपणा आल्यास चार घरे मागून खाण्यामागे असलेले विज्ञान त्या पटवून देत. चार घरी मिळालेले वेगवेगळ्या प्रकारचे अन्नपदार्थ पोटात गेल्यास त्यातून अनेक जीवनसत्त्व मिळाल्याने रातांधळेपणा कसा जातो हे त्या पटवून द्यायच्या. आजाराचे मूळ आहारात असते, त्यामुळे त्या खाण्यापिण्यातील अनेक बाबींवर लक्ष देण्यासाठी सांगायच्या. लोक आपल्या आजाराच्या, आरोग्यासाठी सहज सांगितलेले ऐकत नाहीत हे त्यांना माहीत होते, त्यामुळे त्या धुरपतामायच्या नावाने लोकांचे प्रबोधन करायच्या. म्हादामायला दोन मुले होती. शंकर आणि व्यंकट. म्हादामायचा शंकरवर खूप जीव होता. शंकर लहान होता, परंतु खूप शांत स्वभावाचा होता. त्याने जेमतेम सातवीपर्यंतचे शिक्षण घेतले होते. यामुळे म्हादामायच्या कुटुंबातील हा सर्वात शिक्षित तरुण होता. दोन्ही मुले लहान असताना म्हादामायची आर्थिक घडी खूप चांगली होती. त्यांचे भ्रतार मल्हारी हे एखाद्या तालमीतील पहेलवानासारखे होते. ते देगलूरच्या आडत दुकानात अंगमेहनत करून कुटुंब चालवित.

पुढील काळात शंकर आणि व्यंकट ही दोन्ही मुले हाताला येण्याच्या काळात अचानक मल्हारी यांचे निधन झाले आणि म्हादामायचा मोठा आधार गेला. कुटुंबाची आर्थिक घडी विस्कटली. तिची सलग दहा वर्षे ही अशा संकटात गेली. त्यानंतर १९६०च्या दरम्यान शंकर हा सैन्यात भरती झाला. पुन्हा परिस्थिती आटोक्यात आली, परंतु तो काळही फार दिवस म्हादामायला अनुभवता आला नाही. काही वर्षांनी शंकरचे देगलूर येथील जवळच्याच नातेवाईकांच्या मुलीशी लग्न झाले. ती खुप सुंदर होती. पण अचानक तिचे निधन झाल्यानंतर शंकरला ते खूप मनाला लागले, त्यातून तो सावरला नाही. त्याने कायमचे देगलूर सोडले. परत

तो देगलूरला आला नाही. पुढे त्याचे काय झाले हे म्हादामायच्या हयातीत आणि नंतरही कळू शकले नाही. सैन्यातून निवृत्त झाल्यानंतर शंकर मुंबईत राहत असल्याची माहिती म्हादामायला त्यांचे शिष्य, गावातील ओळखीचे लोक सांगायचे. परंतु शंकरने कधीही मागे वळून पाहिले नाही, याची मोठी खंत म्हादामायच्या मनात आयुष्याच्या अखेरपर्यंत सलत राहिली. कधी तरी आपला मुलगा परत येईल यासाठी ती आयुष्यभर वाट पाहत राहिली, परंतु तो कधीच परतला नाही. हा कालावधी १९६९ दरम्यानचा असल्याचे नातेवाईक सांगतात. म्हादामायचे अर्धे आयुष्य तसे खूप काबाडकष्ट करण्यात आणि अनेक संकटे झेलण्यात गेले. शंकर आणि व्यंकट ही दोनच मुले होती. आपल्या पोटी मुलगी जन्माला यावी आणि तिचे नाव धुरपता ठेवावे, असे स्वप्न म्हादामायने पाहिले होते, परंतु त्यांना मुलगी झाली नसल्याने त्यांनी आपली बहीण हुलाबाईची मुलगी अनुसयाबाई हिलाच आपली मुलगी म्हणून स्वीकारले होते. अनुसयाबाईला झालेल्या मुलीला मात्र म्हादामायने आपल्या देवीचे म्हणजेच धुरपतामायचे नाव ठेवले होते. पती मल्हारीचे मध्येच सोडून जाणे आणि शंकरने गावाकडे कायम पाठ केल्याने त्याचे मोठे आघात म्हादामायला सहन करावे लागले. त्यानंतर आलेल्या अनेक संकटाचा म्हादामाय सामना करत राहिली. परंतु अनेक अडचणीनंतरही तिने मातृपरंपरेची चळवळ सोडली नाही. आपला मुलगा परत येईल, या आशेने त्या कायम चैत्राच्या जत्रेला देगलूरपासून चंद्रपूरापर्यंत चालत राहिल्या. यात्रा काढत राहिल्या.

म्हादामायने आपल्या निधनाची माहिती चार दिवस अगोदरच आपल्या नातवंडाला दिली होती. सर्वात जास्त त्यांचा जीव हा शोभाबाई यांच्यावर होता. त्यामुळे शोभाबाईला अगोदरच बोलावून घेतले होते. तर सर्वात लहान असलेल्या शेषाबाई या नातीला आपण चार दिवसांनी सगळ्यांचा निरोप घेत निघून जाणार असल्याचे सांगितले होते. त्या ज्या बोलत ते खरे झाल्याचे त्यांनी प्रत्यक्ष अनुभवले होते. चंद्रपूरच्या परंपरेत रामपुरीच्या भागामायपासून ते नरळद-इरळदच्या देवयमाय यांनीही अशीच आपल्या मृत्यूची कल्पना आपल्या जवळच्या लोकांना दिली होती. तशीच कल्पना म्हादामायने देत आपल्या नातीला धुरपताच्या नावाने हार बोलत

या जगातून निरोप घेतला. म्हादामायने ज्या दिवशी जगाचा निरोप घेतला तो दिवस चैत्रातील दुसरा शुक्रवार भारतीय पंचागानुसार चैत्रातील त्रयोदशी म्हणजेच ८ एप्रिल १९९४ रोजीचा होता. आयुष्यभर एखाद्या योगिनीप्रमाणे जगलेल्या म्हादामायच्या अंत्ययात्रेला त्यांचे मोजकेच शिष्य सामील झाले होते. भंडारा उधळत आणि धुरपतामायच्या नावाचा गजर करत त्यांची अंत्ययात्रा काढण्यात आली. कपाळभर भंडाराचा मळवट भरलेल्या म्हादामायच्या चेहऱ्यावरील तेज कायम होते. तोच सुगंध आजूबाजूच्या परिसरात दरवळत होता. याच काळात धुरपतामायच्या परंपरेत चैत्राच्या यात्रेला सुरुवात होते. पोतराज-देकरीण यांची चंद्रपूरला निघण्याच्या तयारीला लागतात. म्हादामाय या चंद्रपूरच्या यात्रेला पायी प्रवास करत असायच्या. ३२ वर्षांहून अधिक काळ त्या चंद्रपूरला पायी गेल्याचे नातेवाईक सांगतात. मात्र चैत्राच्या याच काळात यावेळी त्यांनी आपल्या आयुष्याची यात्रा मधेच सोडून जगाचा निरोप घेणाऱ्या पहिल्या देवकरीण ठरल्या. भागामाय, देवयमाय, बिठामाय यांच्या निधनावर त्यांचे भक्त हे त्या सेव झाल्या आणि चंद्रपूरला गेल्या, असे म्हणतात. म्हादामायही सेव झाल्या, त्यात गडचांद्याला गेल्या असल्याचे त्यांचे भक्त म्हणतात. म्हादामायने असंख्य महिलांना धुरपतामायच्या परंपरेची दीक्षा देऊन त्यांना शिष्य केले होते. परंतु आपल्याला मिळालेला भंडाऱ्याचा डबा आणि तो वारसा त्यांनी आपल्या सर्वात मोठ्या शोभाबाई नातीला मृत्यूपूर्वी काही दिवस अगोदर दिला होता. तो डबा आता शोभाबाई यांच्याकडे म्हादामायने निर्माण केलेला वारसा सांगत असतो. म्हादामायच्या कार्याची आठवण करून देत असतो.

**स्थानिकांकडून मिळालेली माहिती :**

१. मरुबाई व्यंकट धाबाडे (सुन), देगलुर, जि. नांदेड.
२. शेषाबाई राघास्वामी,(नात) ऋषेगाव, मंडल. मदनूर, जि. कामारेड्डी, तेलंगणा.
३. शोभाबाई, मोगा, मंडल. मदनूर,(नात) जि. कामारेड्डी, तेलंगणा.
४. अनुसयाबाई, हंडरगुळी, ता. उदगीर, जि. लातुर (मुलगी).
५. सुमनबाई, (नात)बम्मनपल्ली, जि. निझामाबाद. तेलंगणा.
६. राजाबाई (नात) गुंडेकल्लूर, मंडल, जि. कामारेड्डी.

***



७

# धुरपतामायची मौखिक परंपरा

**गडं चांदियाला जाया,**
**केली आजचं तयारी.**
**माय माझ्या धुरपताचा,**
**एवढा नवलाख गाडा,**
**पडला येशीच्या बाहेरी गं, धुरपतामाय...**

धुरपतामायची परंपरा ही मौखिक गाणी, कवने, ओव्या आदींवर

आधारित असलेली मातृदेवतेची लोकपरंपरा आहे. प्रामुख्याने यामध्ये महिला देवकरीण, सर्वसामान्य महिला आणि पोतराजांकडून म्हटली जाणारी गाणी आहेत. प्रामुख्याने लोकपरंपरेत महिला आणि पुरुषांनी रचलेल्या लोकगीतांची सरमिसळ दिसते. हे याचे वेगळे वैशिष्ट्ये म्हणता येईल. या परंपरेचा उगम कधी झाला हे सांगणे कठीण आहे. परंतु वैदिकांपूर्वी देशात या मातृपरंपरा आणि त्यातून मौखिक परंपरा अखंडपणे सुरू होत्या. त्याचाच एक भाग म्हणून या परंपरेकडे पाहता येईल.

लोकभाषेत सिद्धयोगिनींनी साहित्य निर्माण कसे केले, याचा महत्त्वाचा दाखला शरद् पाटील यांनी 'सत्यशोधक' या एप्रिल २००० च्या पहिल्या अंकात दिला आहे. (पृ.२९)

लोकसाहित्यांमध्ये स्त्रियांनी रचलेल्या लोकगीतांचा एकूणच आवाका आणि त्यांचा अभ्यास केल्यास त्यात स्त्रियांची महत्त्वाची भूमिका दिसते. त्या-त्या काळातील सामाजिक, आध्यात्मिक संदर्भ, त्या काळातील जीवनपद्धती, सण-उत्सव, मानवी इतिहास, रूढी, संस्कृती, लोकपरंपरा आणि त्या काळातील चालीरीती, जगण्याच्या पद्धती लक्षात येतात. मूळातच लोकगीतांची निर्मिती ही निसर्ग, कृषिमाया, जीवनक्रम आणि त्या काळातील जीवनपद्धती यातून झालेली दिसते. लोकगीते ही एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे प्रवाहित होत असतात. मौखिक लोकसाहित्य एका समुदायाची निर्मिती असली तरी त्याचा निश्चित असा एक रचिता नसतो. लोकगीते प्रवाहित होत असताना असंख्य वेळा त्याचा मूळ गाभा शिल्लक राहिलेला असेलच, असेही म्हणता येत नाही. मात्र, जे काही पुढील पिढीपर्यंत झिरपत-झिरपत आलेले असते, त्यावरून त्या परंपरेच्या मुळाशी जाण्याचा प्रयत्न करता येतो. धुरपतामायच्या परंपरेबाबत असेच म्हणता येईल. सध्या उपलब्ध असलेल्या मौखिक परंपरेतील लोकगीते, कवने, ओव्या, आरती लक्षात घेता त्या मागील अडीच ते तीनशे वर्षांच्या कालावधीपर्यंतच्या असाव्यात. त्यांचे मूळ मात्र मागील हजारो वर्षांमध्ये दडल्याचे लक्षात येते. अनेक गाण्यांचा अभ्यास केल्यानंतर या ओव्या आपल्याला मागील काही शतकातील जीवनपद्धती, लोकपरंपरा यांचे दर्शन घडवीत असतात.

धुरपतामायवरील असंख्य गाणी ही अशीच आपल्याला मागील अनेक

शतकांमध्ये घेऊन जातात. दुसरे वैशिष्ट्ये म्हणजे शाक्त आणि तांत्रिकांशी असलेला संबंध ही गाणी स्पष्ट करतात. केवळ जीवनानुभव आणि दुःख मांडत बसत नाहीत, तर आयुष्यात चांगलेपणाने वागायला शिकवण्याची मोठी ताकद, जगण्याची प्रेरणा ही गाणी देतात. यामुळे धुरपतामायच्या मौखिक परंपरेतील लोकगीतांची अशी विविध प्रकारची वैशिष्ट्ये ही इतर लोकगीतांपेक्षा वेगळी म्हणता येतील. लोकगीते ही एकाच वेळी लयबद्ध, तालबद्ध आणि मनाला भावणारी आहेत. रचनात्मक अशी ती सहजपणे कोणत्याही चालींवर गाताना मनाचा ठेका धरतात. धुरपतामायच्या परंपरेतील सर्वच मौखिक गाणी ही अशीच विविध प्रकारच्या लयबद्ध तालावर म्हणता येतात.

**धुरपताचं नावं बाई, मी घेतो हरघडी..**
**उभा मझ्या पाठीमागं, माय धुरपता...**

अशी असंख्य गाणी ही विविध चालींवर गातानाही ती मनाला भिडतात. लोकगीतांमध्ये प्रत्येक वेळी त्या-त्या गाण्यांचा संदर्भ खूप महत्त्वाचा असतो. त्यासाठी त्यांची पार्श्वभूमी लक्षात घेताना त्यांचे भौगोलिक स्थान, चालीरिती त्याचा समाजसमूह यांचाही विचार होणे आवश्यक असते. त्या-त्या काळातील मातृदेवतांच्या परंपरेचे जतन करणाऱ्या समूहमनांची एक निर्मिती आणि मोठी देणगी आहे. यामुळे ही लोकगीते, ओव्या, कवने ही समाजमनात खोलवर रुजलेली दिसतात.

धुरपतामायच्या मौखिक परंपरेत अलीकडे मूळ लोकगीते आणि कालांतराने त्यात बऱ्याच वेळा भेसळ झाल्याचे दिसते. अनेक ओव्या, गाणी नष्ट झाल्याने त्यातून बराच भाग हा पुसला गेला असावा. धुरपतामायच्या मौखिक परंपरेचे आणखी एक वेगळे वैशिष्ट्ये म्हणजे एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे ते प्रवाहित होताना काही ठरावीक समाज आणि समूहमनातून नव्याने संदर्भ घेऊन आलेली दिसतात.

## लोकगीतावरील मतमतांतरे

विदर्भातील काही संशोधन करणाऱ्या विद्यार्थ्यांचा अपवाद वगळता चंद्रपूरच्या महाकालीवरील मौखिक परंपरेचे आणि परिसरातील

लोकगीतांचे संकलन फार झालेले दिसत नाही. नागपूर विद्यापीठात यासाठी तीन-चार विद्यार्थ्यांनी पीएचडीसाठी विषय निवडला होता. त्यातील आपला प्रबंध पूर्णही केला. त्यातही केवळ धुरपतामायच्या मौखिक परंपरेवर स्वतंत्र असे संशोधन, त्याचे जतन झालेले दिसत नाही.

त्यात लोकगीतासंदर्भात अनेक तज्ज्ञांची विविध मते आहेत. 'उस्मानाबाद जिल्ह्यातील लोकदैवते'मध्ये डॉ. नवनाथ शिंदे म्हणतात, 'लोकसाहित्य आणि लोकसंस्कृतीचा घनिष्ठ संबंध आहे. त्यात रोज नव्याची भर पडत असून समाज सदृढतेसाठी त्याची गरज असते. लोकसाहित्य ही जगण्याची कला आहे. जिथे माणूस आहे, तिथे लोकसाहित्य निर्माण होते. लोकसमूहांचा भावनिक अविष्कार म्हणजे त्यांचे लोकसाहित्य.' (पृ.२०)

डॉ. सरोजिनी बाबर यांनी लोकगीतांची केलेली व्याख्या महत्त्वाची आहे. त्या 'मराठीतील स्त्रीधन' मध्ये म्हणतात, 'विविध प्रकारच्या जातिवंत स्वरविलासांनी शिणगारलेले व अशिक्षितांनी कितीक वर्षांमागे रचले, असतानाही केवळ पाठांतराच्या बळावर पिढ्यान्‌पिढ्या आपल्या नवनवोन्मेषशालिनी तेजाने पुढच्या पिढीला उत्तेजित करणारे भावगीत अशी लोकगीतांची व्याख्या करण्यास हरकत नाही'. तसेच त्या पुढे म्हणतात, 'संदर्भ सोडून लोकगीतांचा अभ्यास करणे एखाद्या निर्जीव शरीराचा अभ्यास करण्यासारखेही आहे.' (पृ.६३ व ६४)

'मराठीतील स्त्रियांची कविता' मध्ये प्रभा गणोरकर म्हणतात, 'लोकगीतांचा काळ निश्चित करता येत नसला तरी त्याची निर्मिती कृषिसंस्कृतीशी निगडीत अशा जीवनव्यवहारातून झालेली आहे, हे स्पष्ट दिसते.' (पृ.६५) तर कमलाबाई देशपांडे यांनी स्त्रियांनी लिहिलेल्या साहित्याला 'अपौरुषेय वाङ्‌मय' असे सांगत याचा कालावधी खूप कमी म्हणजेच शंभर सव्वाशे वर्षांचा असल्याचे त्या सांगतात. यावर अनेकांमध्ये मतभेद असले तरी या परंपरांची भारतात योग्य नोंद होऊ न शकल्याने काळाच्या ओघात त्या अनेक गडप होत गेल्या. प्रभा गणोरकर म्हणतात, 'लोककथा, लोकगीतांची निर्मिती प्राचीन काळापासून अखंडपणे होत असली तरी त्यांच्या संकल्पाचे संपादन प्रयत्न ब्रिटिशांच्या आगमनानंतर आपल्याकडे सुरू झाले.' (पृ.६५)

'सुरुवातीला मेरी फ्रीअर या इंग्रजी संशोधक महिलेने लोकगीतांची नोंद, संकलन करण्यासाठी महत्त्वाचे पाऊल उचलले होते. त्यांनी 'ओल्ड डेक्कन डेज' हे लोककथांचे पहिले पुस्तक १८७० मध्ये प्रसिद्ध केल्याची नोंद आहे.' त्यानंतर वि. का. राजवाडे यांचा उल्लेख येतो. तो १८७२ मध्ये त्यांनी प्रसिद्ध केलेल्या 'स्त्रीगीतसंग्रह' त्यानंतर अनेकांची पुस्तके यावर आली. तर विसाव्या शतकाच्या सुरुवातीला १९२७ मध्ये ना. गो. चापेकर यांनी 'महाराष्ट्र साहित्य पत्रिके'तून लोकसहित्य प्रकाशित करायला सुरुवात केल्याचे प्रभा गणोरकर सांगतात. याच कालावधीत सर्वांत महत्त्वाचे असे साने गुरूजींनी संकलित केलेल्या तीन हजारांहून अधिक गाणी, ओव्यांचे संकलन असलेले 'स्त्रीजीवन' हे दोन भागात प्रसिद्ध करण्यात आले. त्यानंतर पुढे ग्रामीण भागातील स्त्रियांच्या गाण्यांचे संकलन हे ना. गो. नांदापूरकर, पा. आ. गोरे आणि डॉ. सरोजिनी बाबर यांनी केल्याचे दिसून येते. 'कुलदैवत', 'राजविलासी केवडा' हे त्यांची महत्त्वाचे पुस्तक आहेत.

## सौंदर्यांनी नटलेली गाणी

**माय माझी धुरपता, होऊ नको शिरजोरं,**
**होऊ नको शिरजोरं, माझ्या जलमाचा घोरं...**

धुरपतामायच्या मौखिक परंपरेतील गाणी ही सौंदर्यांनी नटलेली आहेत. ती ऐकताना भान हरपते. काही गाणी ही न थांबता एका सुरात म्हटली जातात. तर अनेक गाण्यांचे ठोकताळे ठरलेली आहेत. विशेष म्हणजे, प्रत्येक गाण्यांतून 'धुरपतामाय'चा उल्लेख ठरलेला असतो. त्याशिवाय बहुतेक गाणी ही पूर्ण होत नाहीत. त्यासोबतच ही परंपरा चालविणाऱ्या राजामाय, यमुनामाय, विठामाय, भागामाय, रुकमामाय आणि देवयमाय यांचा उल्लेख केलेला दिसतो. महाकालीवर असंख्य स्वरूपातील कवने, आरती ही पुराणात असल्या तरी त्याचा कोणताही उल्लेख देवकरीण, पोतराज आपल्या मौखिक परंपरेत करीत नाहीत.

चंद्रपुरातील धुरपतामायच्या मंदिरात अलीकडे हिंदी भाषिक भजनीमंडळींचाही बराच गाजावाजा होतो, परंतु देवकरीण, पोतराजांकडून

केला जाणारा जयघोष आणि त्यांची समर्पणाची भावना, उत्साह इतरांपेक्षा वेगळाच जाणवतो.

## पोतराजांवरील रचनांचे लोकवैभव

धुरपतामायच्या परंपरेत पोतराजाला एक अनन्यासाधारण महत्त्व आहे. या पोतराजाची देशातील इतर पोतराजांपेक्षा भौगोलिक, भाषिक आणि सांस्कृतिक अशी वेगळी वैशिष्ट्ये आहेत. तशीच पोतराजांवरील करण्यात आलेली कवने, गाणीही वेगळ्या पातळीवरचे भावविश्व साकारताना दिसतात. पोतराज स्वतः जी गाणी म्हणतो, त्या गाण्यांना या परंपरेत उच्च कोटीचे स्थान प्राप्त झाले आहे. जो आरती करतो ती तितकीच मातृपरंपरेचा मूळ गाभा आणि त्या परंपरेचा उलगडा करणारी आहे. पोतराज आपल्या आरतीतून बारा जणांना ती समर्पित करीत जातो. परंतु त्यातील पहिले समर्पण हे कोणाला असते, हे सांगितले जात नाही. एकूण परंपरा लक्षात घेता हे पहिले समर्पण महात्मा बळीराजा आणि भूमाता, मातृदेवतांना असावे. त्यानंतर तो पृथ्वी, त्रिभुवन, वेद, पांडव, धुरपता, सप्तमाता, आसरा, महिषासूर आणि शेवटी बृहस्पतीला समर्पित करतो. त्याच्या या आरतीतून पृथ्वी म्हणजे धरतीमातेपासून सुरुवात होते आणि मातृदेवता, पृथ्वीमाता, महिषासूर आणि बृहस्पतीच्या चरणी आपला नमस्कार सांगतो.

कोणत्याही कार्यक्रमात पोतराजाची आरती झाल्याशिवाय तो कार्यक्रम पूर्ण होत नाही. इतके त्यांच्या आरतीला धुरपतामायच्या परंपरेत महत्त्व आहे. या आरतीतून धुरपतामायच्या एकूणच परंपरेच्या मुळाशी जाण्याचा मार्ग मिळतो. त्यासोबत काळाच्या ओघात त्यात झालेला बदलही स्पष्टपणे जाणवतो. यात कुठेही राम-कृष्ण, विष्णू आदींचा उल्लेख येत नाही. मात्र शंकर-पार्वती, बृहस्पतींचा उल्लेख होतो. महिषासुराला, सातीआसराला तो आरती वाहून आपली परंपरा अधोरेखित करत असतो.

पोतराजांवरील आरती म्हणताना त्यात मोठ्या प्रमाणात शब्द आणि वाक्यरचना विविध जिल्ह्यांमध्ये वेगवेगळ्या दिसून येतात. मात्र आरती सर्वच ठिकाणी म्हणताना तिची लय सारखीच दिसते. पोतराज आरती करताना मोठी आरोळी, हाक देतो. त्यातून तो मातृदेवतांना आवाहन

करतो. तो आवाज आणि त्यातील भारदस्तपणा आजूबाजूच्या परिसरात चैतन्याचे वातावरण निर्माण करतो. त्यातील आरती करताना 'पहिली आरती' ही कोणाला म्हटली जाते, याचा उल्लेख केला जात नाही, यासाठी अनेक पोतराजांशी विचारणा केली, मात्र त्यांच्याकडून यावरील उत्तर मिळू शकले नाही. पोतराजाची ही आरती अशी असते -

**पोतराजाची आरती**

**पहिली आरती........**
(यात पहिली आरती कोणाला हा उल्लेख टाळला जातो)
**दुसरी आरती धरती माताला,**
**तिसरी आरती तीरभवनाला,**
**चौथी आरती चार वेदाला,**
**पाचवी आरती पाच पांडवाला,**
**सहावी आरती सहा धुरपतीला,**
**सातवी आरती साती आसराला,**
**आठवी आरती महिषासूराला,**
**नववी आरती नऊ खंड पृथ्वीला,**
**दहावी आरती दहा काशीला,**
**अकरावी आरती आकरा रूद्राक्षाला,**
**बारावी आरती बारा बृहस्पतीला,**
**तुमच्या चरणी माझा नमस्कार...!**

'पोतराजाच्या आरतीप्रमाणेच धुरपतामायच्या देवकरणींवर म्हटला जाणारा अभिषेकही तितकाच महत्त्वाचा आहे. अभिषेक हा शब्द नंतर आला असावा. इथे अभिषेकचा अर्थ दीक्षा याच अर्थाने अभिप्रेत आहे.' यातून देवकरीण या शिखर शिंगणापूरचे महत्त्व गाताना दिसतात. त्या वेळी देवकरीण या शाक्त पंथाचे प्रमुख केंद्र असलेल्या शिखर शिंगणापूर येथे जाऊन दीक्षा घेत असाव्यात. सलग पाच वेळा हा अभिषेक म्हटला जात असून त्यात देवकरीण दैत्यापुढे हात जोडतात. हनुमंताच्या म्हणजेच

मारोतीच्या पारावर जातात.

शिंगणापुरात जाऊन आपला निरोप पिताजीला म्हणजेच शंभू महादेवांना देत असल्याचा उल्लेख येतो. या गाण्यातील बराच मूळ गाभा काळाच्या ओघात नष्ट झाला असल्याने केवळ त्यातील पुसटशा ओळी शिल्लक आहेत. तरी या गाण्यातून देवकरीण यांची नाळ ही शिखर शिंगणापुरात त्या वेळी सुरू असलेल्या शाक्त परंपरेकडे जोडल्याचे अधोरेखित होते.

**पहिला अभिषकंनं गरतीला केलं कोणं,**
**जगी लाविलं निशाणं हो बाई, जगी लाविलं निशाणं...**
**पतिवरता राजामायनं हो बाई जगी लावले निशाणं...**
**दुसरा अभिषकंनं माय शिंगणापुरा गेले,**
**निरूप पिताजीला देले हो बाई,**
**निरूप पिताजीला देले.**
**तिसरा अभिषकंनं हनुमंतांच्या पारा गेले,**
**बंधुला हे बोलेले हो बाई, गाडी चांद्याला काढीले.**
**चवथा अभिषकंनं माय वेशीमंधी गेले,**
**हात दैत्याला जोडीले हो बाई, वाट भक्ताला सोडले.**
**पाचवा अभिषकंनं माय हाय मंदिरातं,**
**पाच बोटं शेंदरातं हो बाई,**
**धुरपता राजामायचे हो बाई पाचं बोटं शेंदरांत...**

धुरपतामायच्या मौखिक परंपरेत पोतराज हा महत्त्वाचा भाग आहे. त्याशिवाय ही परंपरा समजून घेता येऊ शकत नाही. त्याच्या जटामध्ये गंगेचे प्रतीक असते. या परंपरेत कोंबडे, बकरे, रेडा यांचा बळी देण्याची प्रथा असून त्यात बळी देण्याचा मान हा पोतराजांना असतो. यासाठीच्या कार्यक्रमात तो एका घावात बकरे, कोंबडे अथवा रेडा यांचे धड वेगळे करतो. आपल्या दाताने हा घाव करून तो धड वेगळे करत असल्याचा उल्लेख इथे येतो.

मराठवाड्यात तीस वर्षांपूर्वी असे कार्यक्रम चालत असायचे. विशेषतः मांगवाड्यात आयोजित करण्यात येणाऱ्या कार्यक्रमात पोतराज मोठ्या

शिताफीने रेड्याचे धड एका घावात वेगळे करायचा. कालांतराने ही प्रथा बंद झाली असली तरी आता रेड्याऐवजी बकरे, मेंढ्या आणि कोंबड्यांचा बळी दिला जातो. त्यासाठी पौष महिन्यात कार्यक्रमांचे आयोजनही केले जाते.

**माय माझी धुरपता,**
**तुझ्या वटीला खारीकं,**
**माझ्या दुःखाला सारथं, माय धुरपता...**
**माय माझी धुरपता,**
**तुझा पोतराज बळी...**
**जटानं गंगा वळी, माय धुरपता...**
**माय माझी धुरपता,**
**तुझा पोतराज नवा..**
**घाव तोडीलायं कवां, माय धुरपता...**

धुरपतामायच्या परंपरेत पोतराजाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. पोतराज आणि देवकरीण या प्रकरणात सविस्तर माहिती देण्यात आली आहे. देवकरीण पोतराजांवरील जी गाणी म्हणतात, त्यावरून पोतराजाची अधिक उकल आणि या परंपरेतील महत्त्व लक्षात येते.

**माय माझे धुरपता,**
**तुवा पोतराज येडा.**
**एव्हढं सैवाराच्या वेळा,**
**त्यायनं हांकारीला गाडा गं...**
**माय माझे धुरपता,**
**तुवा सारविते वटा,**
**पोतराज सोडी जटा गं, धुरपतामाय...**
**माय माझे धुरपता,**
**घटं तुवा घामेजला.**
**पोतराज तान्हेजला गं, धुरपतामाय...**
**बाई कारणाचा हाल्या,**

हाल्या येशीला खुथला,
मानाचा पोतराज,
जटा सोडाया गुंतला गं...
बाई कारणाचा हाल्या,
हाल्या आला मेटंकुटी,
मानाचा पोतराज,
वरतं बोलं धुपारती गं...
माय माझी धुरपता,
तुझी सुपात आरती,
बोलतं पोतराज,
हाल्यावरी धुपारती वं..
हाल्यावरी धुपारती...

या गाण्यांसोबत पोतराज हा आपल्या जटा सोडण्यासाठी बसलेला असताना कारणासाठी आणलेला म्हैषासूराचे प्रतीक असलेला हा हाल्या वेशीतच कुथून बसला आहे. तो पोतराजाशिवाय येणार नाही. पोतराज हा हाल्यावर धुपारती म्हणतो, असे भाव येथे प्रतीत होताना दिसतात.

बाई कारणाचा हाल्या,
हाल्या येशीला कुथला,
मानाचा पोतराज...
जटा सोडाया गुंतला गं...
जटा सोडाया गुंतला गं...

पोतराजांवर जशी देवकरीण गाणी गातात, तशीच पोतराजही शंकर, पार्वती, गणपती यांच्यावर कवने गात असतात. त्यांना त्यातून नमन करतात. गणाची सारजी हो कोण व्हावी असा वैदिकांना, पंडितांना प्रश्नही उपस्थित करत असतात.

त्यांच्या या प्रश्नांतून गणप्रथाक समाजातील महिलांच्या प्रमुख पदांचा विषय समोर आणला जातो. ती गणाची कोण आहे, असा प्रश्न वेळोवेळी विचारून ती समाजमनात खोलवर रुजवली जाते.

**शंभू पारवती कैलासपती हर हर महादेव,**
**ज्या भगवंतानी पिंड पैदास केला,**
**तुमच्या चरणी माझा नमस्कार!**
**गनान गन भजना चौदा विद्याच्या वंदना**
**हाती घेऊनी लाडवाची वाटी!**
**वाकडी फिरून गोमटी!**
**तुमच्या चरणी माझा नमस्कार!**
**पहिला नमस्कार महादेव तुझला,**
**दुसरा नमस्कार भूजरी गणपतीला,**
**गणनाथ लेक कुणाची सर्व सती,**
**गणा माझी सारजी ही कोण व्हावी गणाची?**

पोतराज आणि वैदिकांमध्ये वेळोवेळी वैचारिक संघर्ष झाला असावा अथवा त्यांच्यात वाद-विवाद झाले असावेत. त्याची नोंद पोतराजाच्या एका गाण्यातून मिळते. पोतराज हा पंडिताला चार वेद आणि पाचवे तत्त्व मला सांगून देण्याची मागणी करतात. गण आणि त्याचा उखाला म्हणजे अर्थही विचारताना दिसतात.

**''एक मुखी रूद्राक्ष जन्मला, महाशक्तीचा जन्म झाला**
**तीन मुखी रूद्राक्ष जन्मला, तीन ताळात जन्म झाला**
**चार वेद पाचवा तत्त्व, सांगून दे पंडिता मला !**
**हात जोडूनी विनंती करीतो, सर्व मंडळीला !**
**द्या गणाचा उखाला, सांगून द्या मला सर्व गणाला''**

यासोबतच आणखी एक कवन जोडून म्हटले जाते. यात अनेक वाक्ये आणि त्यातील ओळी काळाच्या ओघात पुसल्या गेल्या असाव्यात, असे हे कवन गाताना लक्षात येते. मात्र महादेवांनी गणपतीचे जे शीर उडवले ते कोठे गेले, हा जटील प्रश्न पोतराज विचारतो. या प्रश्नामागे बरीच चर्चा, वाद त्या-त्या काळात घडले असावेत.

**पार्वती बसली नाह्याला,**

मैलाचा पुतळा केला.
राकन दरवाज्यात बसविला,
बाहेरून आले महादेव,
महादेव युद्ध केले शिर उडूवून दिले,
शिर गेले कोठे, सांगून द्या मला.
हात जोडुनी विनंती करतो, सर्व मंडळीला.

या गाण्यांसोबत पोतराजांकडून अनेक प्रकारची कवने, आरत्या म्हटल्या जातात. धुरपतामायच्या या परंपरेतील पोतराजाकडून करण्यात येत असलेली वेशभूषा, त्यांनी वाढविलेल्या जटा आणि त्याच्याकडे असलेला चाबूक यावर असंख्य गाणी, कवने आहेत.

जरासं बसा विश्रांत्याला,
निगुर्नात निर्माळी चाळीत होता,
लिंबाची गुळी चाळीता चाळीता,
मोरी लागली रूद्राक्षाची जाळी...

विशेष म्हणजे मच्छिंद्रनाथ यांच्या जन्माची कथाही उलगडत सलगपणे धुरपतामायच्या गाण्यात म्हटली जाते. तर धुरपतामायच्या गाण्यात गणाचा प्रमुख म्हणून गणपतीला खूप महत्त्व असते. सप्तमातांच्या बाजूला असलेले त्यांचे रक्षक म्हणून गणपतीची ओळख आहे. वीरभद्र आणि गणपतीवर पोतराज अनेक कवने गाऊन त्यांचे ऋण व्यक्त करताना दिसतात.

### देवयमाय, परंपरेतील टप्पा

माय मह्या देवयमायचा, सोलावरी दंडवतं, दंडवतं...
बाई नळदच्या वाटं, हळदीचे बनं दाटं,
माय मह्या देवयमायचा, मायचा, सोलावरी दंडवतं...
बाई नळदच्या वाटं, लिंबा नारळाची पेठं,
माय मह्या देवयमायचा, मायचा, सोलावरी दंडवतं...
बाई नळदच्या वाटं, खारीक खोबऱ्याची पेठं

### माय मह्या देवयमायच्या, सोलावरी दंडवत, दंडवतं...

धुरपतामायच्या परंपरेत देवयमाय या देवकरीणचे स्थान या परंपरेतील शिखराप्रमाणे आहे. म्हणूनच त्यांच्या नावावरील आरती हीच 'धुरपतामायची आरती' म्हणून तिचा उल्लेख होतो. इतका मोठा मान देवयमायला मिळाला आहे. देवीच्या पूजेपूर्वी काढण्यात येणारा हिल्लाळ, देवयमाय इरळद-नरळदच्या मधोमध वाहत जाणाऱ्या मासोळी नदीतून येताना त्या दंडवत घालायच्या. त्याची आठवण म्हणून हे गाणे देवकरीण गात असतात. मासोळी नदी ही त्या वेळी दुथडी भरून वाहत जायची. देवयमाय यांचे कार्य उभे राहण्यापूर्वी त्या पूर्वीच्या नरळदमध्ये राहायच्या. मात्र त्यांनी उभे केलेले मंदिर हे नव्याने वसलेल्या इरळदमध्ये होते. देवयमाय रोज या मंदिरात येऊन पूजा-अर्चा करत असत. नदीला खूप पाणी असल्यास स्थानिक गावकरी देवयमायला सोल म्हणजे मोठे दोरखंड बांधून मासोळी नदी पार करून देत. त्या वेळी त्यांच्या आठवणी या गाण्यातून येतात. इतकेच नव्हे, तर दोन्ही गावांचे देवयमायने निर्माण केलेल्या मातृपरंपरेचे गतवैभवही यातून मांडले जाते. धुरपतामायची मौखिक परंपरा ही समूहांनी जिवंत ठेवलेली आहे. धुरपतामायची गाणी, स्तवन, आरतीही ठरलेली आहेत. त्यांची रचनाही लोकगीतांचा एक भाग आहे. महाकालीची म्हणजेच धुरपतामायची आरतीही भक्तांमध्ये ठरलेली असते. ती आरती नरळद-इरळदच्या देवयमाय यांच्या नावाने आहे. ही आरती धुरपतामायच्या भक्तांमध्ये प्रमाण मानली जाते. आणि तीच आरती सर्वत्र म्हटली जाते. ही मूळ आरती परभणी जिल्ह्यातील थडी पिंपळगाव येथील जलसामाय देवकरीण यांच्याकडून मिळाली ती अशी -

## देवयमाय आरती..

**मायचं माहेरं, मूळ घरं,**
**पुढी हाय बारवं हीरं, पाणी निर्मळ...**
**चंदन पाटावरं, माय बसं,**
**सवर्णाचे केसं, देवमाय आरती..**
**आरती, चंद्रापूर धुरपती, देवमाय आरती...**

फुलबाई माळीणं, फुलं देती..
हार हार बोलती, देवमाय आरती...
आरती केली म्या उजवटं,
गणपतीस गटं, देवमाय आरती..
मायची पायरी निर्मळं,
पुढी डीकमाळं जळं, देवमाय आरती...
मायच्या पायरी लाहीला,
चपराशाचा पहारा, देवमाय आरती...
उजव्या बाजूला मारवती,
रस्त्यावर गणपती, देवमाय आरती...
आरती केली म्या उजवटं,
हनुमंतास गटं, देवमाय आरती...
मायची पायरी अवघडं,
पाठीमागे बकरे पडं, देवमाय आरती...
दिवा जळतो, लोण्याचा,
सारा शिनगारं सोन्याचा, देवमाय आरती...
मायचं राऊळ चौफेरं,
मधी गुरुवाचं घरं, देवमाय आरती...
आरती केली म्या उजवटं,
महादेवाशी गटं, देवमाय आरती...

या मूळ आरतीनंतर देवीचे 'ठाणं' यासंदर्भात खूप सुंदर गाणे असून ही आरती म्हणूनही म्हटली जाते. या आरतीत चंद्रपूरच्या ठाण्याला पाचवे स्थान देण्यात आले आहे. गणपती, सरस्वतीला नमन करून सुरू होणाऱ्या या आरतीत पहिले ठाणं हे रेणुकामातेचे माहूरगड, दुसरे उस्मानाबाद जिल्ह्यात असलेल्या येरमाळा येथील येडाई, येडामायचे. तर तिसरे ठाणं तुळजापूर आणि चौथे नांदेड जिल्ह्यात असलेल्या बारडला म्हटले आहे.

या आरतीतून चंद्रपूरची महाकाली, माहूरची रेणुका, येरमाळ्याची येडामाय, येडाई, तुळजापूरची भवानी, बारडची पोचीमाय आदी देवींचे वर्णन केले आहे. त्यांच्या कपाळी, भरलेला मळवट, देवींनी घातलेले

सोग्याचे काजळ, नेसलेल्या हुंबाचे पातळ यांचा उल्लेख अत्यंत मार्मिकपणे करण्यात आला आहे. प्रत्यक्षात ही आरती म्हणताना देवकर, पोतराज-देवकरीण बेभान होतात.

परभणी जिल्ह्यातील पाथरी तालुक्यात असलेल्या खेडुळा गावातील बंडू देवकर यांच्याकडून मला ही आरती मिळाली, ती आरती बंडू देवकर मनाला भिडणाऱ्या अशा तालात म्हणतात. त्यांची ही आरती या परिसरात खूप प्रसिद्ध आहे. परिसरातील कोणत्याही कार्यक्रमात त्यांच्या आरतीचा आग्रह असतो ती आरती अशी -

**आदिमाय नमो गं नमो गणपती,**
**तू गं सार सरसोती... तू गं..**
**पहिलं ठाणं गं, ठाणं माव्हरं गडं.**
**दुसरं ठाणं गं, ठाणं येरमाळं,**
**तिसरं ठाणं, गं, ठाणं तुळजापूरं.**
**चवथं ठाणं गं, ठाणं बारडं.**
**पाचवं ठाणं गं, ठाणं चंद्रापूरं.**
**भांगी गुलालं भरीला, गुलालं भरीला,**
**श्रीबाई मस्तकी, मस्तकी मळवटं.**
**लेली सोग्याचं काजळं, सोग्याचं काजळं,**
**उंडी तांबोळां, तांबोळा धरीला.**
**पानं फुलाचा आगरं, फुलाचा आगरं.**
**मायचं हुंबाचं, हुंबाचं पातळं,**
**आयचं हुंबाचं, हुंबाचं पातळं,**
**देवी पडली, पडली शंभरं.**
**मायच्या पदराला, पदराला मोतीजाळी,**
**आदिमाय, नमो नमो गं गणपती..**

चंद्रपूरच्या धुरतामायवरील मौखिक परंपरा ही उच्च कोटीची आहे. इथे केवळ संवाद, भाव, जगण्यातील उमेद आदी सर्व विसरून केवळ आपल्या मातृदेवतांप्रती कृतज्ञता व्यक्त होताना दिसते. निसर्गमायेचे,

कृषीमायेचे गुणगाण दिसते. पंढरपूरला जाण्यासाठी ज्याप्रमाणे भक्तांमध्ये ओढ लागते, तशीच ओढ धुरपतामायच्या यात्रेसाठी लागलेली असते. ही यात्रा नेणिवेच्या पातळीवर आल्यास संपूर्ण चंद्रपूर डोळ्यासमोर उभे राहते. तिथंली वेस, मंदिर परिसरातील निसर्ग, झाडे, अंगण, दिवा, अगदी वाट कशी आहे याचे मनोरंजक चित्र उभे राहते. अनेकदा या गाण्यांतून एखादी माहेरवासिनीची आठवण येते. आपल्या माहेरला जाण्यासाठी तिची आतुरता दिसते. एक मैत्रीण, सखी, सोबती, एक पाठीराखी आणि आपली रक्षणकर्ती म्हणून तिला भक्त आपल्या गाण्यातून पाहत असतात.

**धुरपताचं नाव बाई, मी घेतो हर घडी,**
**उभा मझ्या पाठीमागी, माय धुरपता...**
**धुरपताचं नाव बाई, हायतं गुळावणी गोडं,**
**कसे मला सापडलं, माय धुरपता...**
**धुरपताचं नावं बाई, माझ्या जिभीवरी सदा..**
**चुकविले येता, जाता, माय धुरपता...**
**धुरपताचं बाई नावं, मी घेतो भलत्या जागी,**
**उभा मझ्या पाठीमागी, माय धुरपता...**
**दुबळ्या मझ्या संसाराचा, मला आलायं कदर,**
**जाऊन धरीले पदरं माय धुरपता...**
**बाई माझं सुख, दुःखं, हृदयी दाटलं किटनं,**
**चला जाऊ गं वाटंनं.. माय धुरपता...**

धुरपतामायच्या यात्रेपूर्वीच्या तयारीवर असंख्य गाणी आहेत. नांदेड, परभणी, लातूर आदी जिल्ह्यातून चंद्रपूरला पायी चालत साधारणपणे १५ ते २५ दिवसांचा कालावधी त्या वेळी लागत असावा. तळेगावची राजामाय, शेलगावची यमुनामाय, रामपुरीची भागामाय आणि दैठण्याची विठामाय, देगलूरची म्हादामाय या चैत्राच्या पाडव्याला चंद्रपूरकडे पायी यात्रा सुरू करायच्या. ही यात्रा सुरू करण्यापूर्वी आपल्याला धुरपतामायने पाडव्याच्या दिवशीच यात्रेला येण्यासाठी चिठ्ठी पाठवून बोलावणे धाडले असल्याचे त्या गाण्यातून गात. या यात्रेला जाताना आपल्या पोटचे बाळसुद्धा या काळात दूर ठेवून स्वर्गाची म्हणजेच चंद्रपूरची वाट धरण्याचा

त्यांच्या गाण्यातून आग्रह असतो.

**गड चांदियाला जाया, पाडवाचं घरी करा.**
**माय माझ्या धुरपताची, वाट चांदियाची धरा गं, धुरपतामाय...**
**बाई पाडव्याच्या दिशी, कापूर झेंड्याला चढवा.**
**माय माझ्या धुरपताची, जत्रा चांद्याला काढावा गं, धुरपतामाय...**
**बाई पाडव्याच्या दिशी, चिठ्ठ्या धाडील्या लेहूनं.**
**येते, पाडवा जेवूनं गं... धुरपतामाय.**
**येते पाडवा जेवूनं गं,**
**पाडव्याच्या दिशी, चिठ्ठ्या गेल्या देशोदेशी वं,**
**माय माझी धुरपता, सवा महिन्याची उपाशी गं,**
**बारा महिन्याचा पाडवा, माझ्या जीवाला आनंद.**
**माझ्या जीवाला आनंद, पडशी भरीतो बाळं नंद गं, धुरपतामाय...**
**गडं चांदियाला जाया, पिटी पडते साखराची वं,.**
**माय माझ्या धुरपताची, चिठ्ठी आली जतराची गं, धुरपतामाय...**
**गडं चांदियाला जाया, बाळ पोटीचं तोडावं.**
**माय माझ्या धुरपताचं, जाता शिखरं काढावा गं, धुरपतामाय...**
**गडं चांदियाला जाया, नका सरू म्हागं, म्होरी..**
**माय माझ्या धुरपताची, वाट सरगाची दोरी वं, धुरपतामाय...**
**गडचांदियाची वाटं, टाकी लावूनं फोडीली, फोडीली.**
**माय माझी धुरपता, दूरची सोयरी जोडीली वं,**
**गडं चांदियाला जाया, पडशी भरावं गोळ्यानं,**
**माय माझ्या धुरपताची जतरा काढावी मेळ्यानं गं, धुरपतामाय...**
**गडं चांदियाला जाया, केली आजचं तयारी,**
**माय माझ्या धुरपताचा, एवढा नवलाख गाडा,**
**पडला येशीच्या बाहेरी गं... धुरपतामाय...**

याचप्रमाणे चंद्रपूरच्या यात्रेला निघाल्यानंतर वाटेत दगड-धोडे आडवी येत असली तरी तो रस्ता हा धुरपतामायच्या वाटेतला असल्याने तो धोपट म्हणजे सरळ दिसतो. याच वाटेने समोर पोतराज खेळत, नाचत असतात. इतकेच नव्हे तर या वाटेत गाडीला जुंपलेल्या बारा हाल्यांची दावण

आणि सोबत एक महादेवाच्या नावाने सोडलेला कटाळ्यालाही असतो, असे सुंदर वर्णन गाण्यातून केले जाते.

**गुडी पाडव्याच्या दिवशी, कापूर लाविते झेंड्याला,**
**जत्रा चालली, चांद्याला गं, धुरपतामाय...**
**गड चांद्याच्या वाटानी, लेवू नये जोडा बुटं,**
**माय माझ्या धुरपताचा, रस्ता दिसतो धोपटं गं,**
**गड चांद्याच्या वाटानी, आडवा लागतो दगडधोंडा**
**माय माझ्या धुरपताच्या झाडा भंडाराचा लोटा गं, धुरपतामाय**
**गड चांद्याच्या वाटानी, व्हईना पापाची वासना,**
**माय माझ्या धुरपता, पतीवरताला सोसना गं, धुरपतामाय**
**गड चांद्यांच्या वाटानी, जत्रा जाबून पळती,**
**म्होरी पोतराजं खेळती गं.. धुरपतामाय...**
**गड चांद्याच्या वाटानी, जत्रा ठरली पाणी, पाणी**
**हौदं भरली दोन्ही, तीन्ही गं, धुरपतामाय...**
**गड चांद्याच्या वाटानी, बारा हाल्याची दावणं**
**तेरवा कटाळ्या सोडीला गं, धुरपतामाय...**

गडचांद्याच्या दिशेने गाड्या काढताना आपल्याला ती वाट कोणाच्या ध्यानात नाही, पण आपली धुरपतामाय ही गोंडाच्या रानात आहे. तिच्या रस्त्याने निघाल्यानंतर आजूबाजूच्या परिसरात हिरवागार आणि उंचच उंच जात आकाशाला भिडणारा वेळू करकरा लवताना त्याचा आवाज येतो. असे सुंदर वर्णन गाण्यातून केले जाते. एदलाबादनंतर हळदीवाडा लागतो त्या ठिकाणी भंडार सोडण्याचे आदेश विठामाय आपल्याला भक्ताला देतात. तर वाटेत येणाऱ्या जोडगंगेला दंडवत करतात.

**माय माझी धुरपता, नको हिंडू गावोगावं गं...**
**असा तुझा अनुभावं नाही, कईकाला ठावं गं...**
**माय माझी धुरपता, तुहा पोतराज येडा येडा गं...**
**असा तुह्या सैवराला, त्यानं हंकारीला गाडा गं...**
**माय माझी धुरपता, तुझं रस्त्यावरी ठाणं ठाणं गं...**
**पिकल्या लिंबासाठी, आडविले बागवनं गं...**

माय माझी धुरपता, तुहा सारविते वटा वटा गं...
असं तुह्या सैवरला, पोतराजं सोडी जटा वं...
माय माझी धुरपता, तुला सारा गाव, गाव भेला गं...
एवढं मांगाच्या बाळानं, तुहा गाडा हांकारीला गं...
आसमाच्या बाळानं, तुमचा गाडा हांकारीला वं...
माय माझी धुरपता, तुला कुठंवरी जाणं जाणं गं...
संगं देते गाडीवानं, त्याला संभाळून आणं गं...
माय माझी धुरपता, तुहं मूळ घरं खोलं, खोलं वं...
मला ऐकू येईना, तुमच्या पुंजाऱ्याचा बोल गं...
--
धुरपतमायचा भंडार, दिसतो आगोचरं,
माय माझ्या विठामायनं, सोडविले घरं दारं गं...
बाई विटाळं चंडाळं, करीत दूरं दूरं,
माय माझी धुरपता, देवी आगणीचं घरं वं...
मला इथूनं दिसतो, गड चांदियाचा आंबा आंबा गं,
माय माझी धुरपता, भोईऱ्यात नांदं रंभा वं...
मला इथूनं दिसतं, गड चांद्याची तुळसं, तुळसं,
माय माझ्या धुरपतच्या, शिखरी सोन्याचा कळसं गं...
मला इथूनं दिसतं, गड चांद्याचं पतरं, पतरं,
माय माझ्या धुरपतच्या, खांबाखांबाला चितरं गं...
चंद्रापूराची गं हवा, काय सांगू गं नं येड्याला येड्याला,
माय माझ्या धुरपतच्या, बारा दरवाजे वाड्याला गं...
चला फाया जावू, बारा दरवाजाचा वाडा, वाडा गं,
माय माझ्या धुरपतच्या, एक पुंजाला उघडा वं...
गड चांद्यानगरामंदी, हायतं भंडाराचे पेवं पेवं गं,
माय माझ्या धुरपतच्या, पायरीला गोंडदेवं गं...
--
गड चांदियाला जाया, पाडवा घरी करा, करा गं,
माय माझ्या धुरपताची, वाट चांदियाची धरा वं.
चंद्रपूराला जायाला, केली आजच तयारी, तयारी,

एवढा लाख गाडा, वाडा येशीच्या बाहेरी गं.
माय माझ्या धुरपता, तुझी माझी झटपटं, पटपटं गं,
असं तुह्या गादीखाली, शीरं देते बळकटं गं.
गडचांदियाला जाया, पडशी भरावं गोळ्यानं, गोळ्यानं,
माय माझ्या धुरपताची, जत्रा काढावा मेळ्यानं गं.
गड चांदियाच्या वाटं, येळू करकरा लवती, लवती,
माय माझ्या धुरपताची, मुखी हार हारं बोलती गं.
गड चांदियाच्या वाटं, लागतं यदलाबाद, बादं गं,
माय माझ्या धुरपतंचा, गोडं सनायाचा नादं वं.
गड चांदियाच्या वाटं, हळदी वडा, वडा नं,
बोलली विठामाय, तिथं भंडारातं सोडा वं.
गड चांदियाच्या वाटं, आडवी लागं जोड गंगा, गंगा नं,
माय माझ्या धुरपतंला, माझा दंडवतं सांगा गं.
चिखलीच्या गंडीवरी, येळू आडवा पडला, पडला,
गुरू माझ्या विठामायनं, त्यायनं झेंड्याला तोडीला वं.
चिखलीच्या गंडीवरी, काय दिसं लालो, लालं गं,
गुरू माझ्या विठामायनं, देलंय दुशालीचं पालं वं.
चिखलीच्या गंडीवरी, तान्हं लागणी बाळाला, बाळाला,
माय माझ्या धुरपतानं, झरे सोडीले माळाला वं.
माय माझ्या विठामायनं, झरे सोडीले माळाला वं...

--

इथं काय सांगू बाई, चंद्रापूराची नं हवा हवा गं,
गुरू माझ्या विठामायचा, कुठं उतरलाय पवा वं.
माय माझ्या धुरपताची, जत्रा भरली झाडोझाडी झाडं वं,
गुरू माझ्या विठामायची, कुठं उतरली गाडी वं.
माय माझ्या धुरपताची, जत्रा भरली दणादणा वं,
गुरू माझ्या विठामायचा, कुठं उतरला म्याना वं.
माय माझ्या धुरपताची, जत्रा भरली काठोकाठ गं,
गुरू माझ्या विठामायची, पडली हिल्लाळीला गाठं वं...

धुरपतामायच्या मंदिराला देवकरीण बारा दरवाजाचा वाडा म्हणून संबोधतात. आणि आपल्या विठामाय देवकरीणचा म्याना कुठे उरतला याचेही वर्णन आपल्या गाण्यातून करताना दिसतात. तसेच चंद्रपूरची वाट धरल्यानंतर त्यांना चंद्रपुरातील तुळस, मंदिराला असलेला सोन्याचा शिखर, भोयऱ्यात असलेली धुरपतामाय म्हणजेच रंभा आणि मंदिरांच्या प्रत्येक खांबांवर कोरण्यात आलेली चित्र याची कशी आठवण येते, ते आपल्या नजरेसमोर कसे दिसतात, यासाठी सुंदर आणि लयबद्ध रचना देवकरीण म्हणताना दिसतात. विशेषतः चंद्रपूरच्या वाटेने निघताना मनाला लागलेल्या ओढीतून संपूर्ण चंद्रपूर आणि तेथील निसर्ग परिसराचे चित्र त्या आपल्या गाण्यातून जिवंत करतात. आपल्या धुरपतामाय यांची ती आठवण आपल्या गाण्यातून काढत असतात. ज्या वाटेने निघालेले असतात, त्या वाटेत लागणारी जोडगंगा, चिखलीची गंडी आदींची खूप मनोरंजक वर्णने या गाण्यातून येतात. वाटेने जाताना डोंगरावर तहान लागते आणि त्यासाठी आपली धुरपतामाय डोंगरावर पाण्याचे झरे सोडते, असे अनेक वर्णन यातून केले जातात.

**इथूनं मला दिसं, धुरपतामायची गं न्हाणी,**
**पडदा लावून घेती पाणी यं, धुरपतामाय...**
**इथूनं मला दिसं, गडचांद्याचे पतरं,**
**अन् खांबाखांबाला चितरं वं धुरपतामाय...**
**इथूनं मला दिसं, गडचांद्याची चांदणी,**
**गोंड राजाची बांधणी यं, धुरपतामाय...**
**इथूनं मला दिसं, गडचांद्याचा पळसं,**
**शिखरी सोन्याचा कळसं यं, धुरपतामाय...**
**इथूनं मला दिसं, गडचांद्याची तुळसं,**
**गोंडराजाची बांधणी यं, धुरपतामाय...**
**इथूनं मला दिसं, गडचांदीयाचा आंबा,**
**भोईऱ्यात नांदं रंभा यं, धुरपतामाय...**
**इथूनं मला दिसं, गडचांदीयाची चिचं,**
**सव्वाहात गादी उचं यं, धुरपतामाय...**

याचप्रमाणे चंद्रपूरला निघालेले भक्त नांदेड जिल्ह्यात असलेल्या बारडच्या पोचीमायचा वेळोवेळी उल्लेख करत असतात. चंद्रपूर आणि बारड ही 'महोजाचे गाव'असल्याचा त्यांच्या गाण्यातून उल्लेख येतो. विशेष म्हणजे ही विठामाय, राजामाय यांच्या निघालेल्या गाड्यांचा मार्ग हा चिखलीच्या गंडीतून जातो. त्या गंडीलाही खूप महत्व या धुरपतमायच्या मौखिक परंपरेत मिळाले आहे.

**बारंड-चंद्रापूरं दोन्ही महोजाचे गावं,**
**ज्याच्या मनामंधी भाव, त्यायनं चांदियाला जावं गं, धुरपतामाय...**
**चिखलीच्या गंडीवरी, काय दिसू लालं लालं,**
**गुरू माझ्या विठामायनं दिलंय, दुशालीचं पालं वं, धुरपतामाय...**
**चिखलीच्या गंडीवरी, हायता सोन्याच्या चपल्या,**
**माय माझ्या धुरपताच्या, गाड्या गंडीला थोपल्या व, धुरपतामाय...**
**चिखलीच्या गंडीवरी, येळू आडवा पडला,**
**गुरू माझ्या विठामायनं, त्यायनं झेंड्याला तोडीला गं, धुरपतामाय..**
**गडचांदियाच्या वाटं, सासासुनाच्या गं हिरी,**
**गवंड्या तुझी कारागिरी वं.. धुरपतामाय...**
**--**
**माय माझ्या धुरपतानं, गाड्या जुपीलेतं नंदी गं, धुरपतामाय...**
**गडचांदियाच्या वाटं, नाही कुणाच्या ध्यानातं.**
**माय माझी धुरपता, बया हाय गोंडाच्या रानातं.**
**देवी गोंडाच्या रानातं गं, धुरपतामाय...**
**गडचांदियाच्या वाटं, येळू करकरा लवती,**
**माय माय धुरपताच्या, मुखी हार हार बोलती वं, धुरपतामाय...**
**गडचांदियाच्या वाटं, आडवं लागं एदलाबादं,**
**मायं माझ्या धुरपताचं, जोडं सनयाचा नादं गं, धुरपतामाय...**
**गडचांदियाच्या वाटं, आडवा लागे हळदी वाडा,**
**बोलल्यात विठामाय, तिथं भंडाराचं सोडा वं, धुरपतामाय...**
**गडचांदियाच्या वाटं, आडवं लागतंय जेंजं,**
**माय माझ्या धुरपताचं, सत्य नारायणाला भजं गं, धुरपतामाय...**

**गडचांदियाच्या वाटं, आडवी लागे जोडयं गंगा.**
**माय माझ्या धुरपताला, माझा दंडवतं सांगा गं, धुरपतामाय...**
**गडचांदियाच्या वाटं, आंब्या, लिंबांच्या लावणी,**
**माय माझ्या धुरपताच्या जोड हाल्याच्या दावणी गं...**
**गडचांदियाची वाटं, टाक्या लावूनी फोडीली,**
**माय माझी धुरपता, दुरली सोयरी जोडीली गं...**
**गडचांदियाच्या वाटं, कोसाकोसाचे लवणं,**
**माय माझ्या धुरपताच्या संग, चपराशी जवान गं...**
**गडचांदियाला जाया, नका सरू मागं मोरी, मागं मारी वं..**
**माय माझ्या धुरपताची वाटं, सरगाची दोरी वं..**
**--**
**चला, चला फाह्या जावू, बारा दरवाज्याचा वाडा,**
**माय माझ्या धुरपताचा, एक पुजाला उघडा वं, धुरपतामाय**
**चंद्रापूराची गं हवा, काय सांगू नं येड्याला,**
**माय माझ्या धुरपताच्या, बारा दरवाजे वाड्याला गं, धुरपतामाय**
**माय माझ्या धुरपताची, जत्रा भरली आज ना,**
**गुरू माझ्या विठामायचा, कुठं उतारला म्याना वं, धुरपतामाय**

चैत्राच्या पाडव्यापासून निघालेली ही यात्रा चंद्रपूरला गेल्यानंतर देवकरीण चंद्रपूरच्या अंगणात पहिला दंडवत घालतात. तिथून त्यांची यात्रा सुरू होते. तर दुसरा दंडवत हा चंद्रपुरातील वेशीला टाकला जातो. तिसरा पटांगणाला, चौथा राऊळाला केला जातो.

धुरपतामायच्या परिसरात पोहोचल्यानंतर मारवती आपल्याला येण्याचा निरोप देतो. यामुळे पुढे मानकरणीला धाडले जाते, असे एकूण चित्र या गाण्यातून उभे केले जाते. हे गाणे प्रत्यक्षात ऐकताना आपण चंद्रपूरच्या वाटेने जाऊन चंद्रपुरात कधी पोहोचतो, त्या वातावरणात कधी मिसळून जातो, हे कळत नाही. इतकी ताकद या गाण्यातून दिसते.

**पहिला दंडवतं, म्याचं टाकीला अंगणी,**
**माय माझ्या धुरपताच्या, हाती फुलाच्या कंगणी गं, धुरपतामाय...**

**दुसरा दंडवतं, म्याचं टाकीला येशीतं.**
**माय माझ्या धुरपतामायचा, बघा देवीचा रहिवासं गं, धुरपतामाय...**
**बघा मायचा रहिवासं गं, धुरपतामाय...**
**तिसरा दंडवतं, पादुका पटांगणं**
**माय माझ्या धुरपताचं, भक्त घेते लोटांगणं गं.. धुरपतामाय...**
**चवथा दंडवतं, पडलाय राऊळाला येडा,**
**बोलले मारवती, मानकरणी पुढी धाडा वं, धुरपतामाय...**
**पाचवा दंडवतं, म्याचं टाकीला पांदणी, वं, धुरपतामाय...**

चंद्रपूरच्या महाकालीला तिचे भक्त गडचांद्याची आई म्हणजेच धुरपतामाय, मायधुरपता, मायकाशी असे म्हणतात. चंद्रपूर असा उल्लेख त्यांच्या तोंडून खूप कमी येतो. त्यापेक्षा गडचांद्याचा उल्लेख अधिक वेळा निघतो. अजूनही हे भक्त चंद्रपूरला गडचांदा नगर, चांदा असेच म्हणतात. चंद्रपूरच्या या जुन्या नावाचा उल्लेख स्थानिकांमध्ये होत नसला तरी भक्तांच्या गाण्यांतून मात्र अद्यापही तो शिल्लक आहे.

**गडचांद्या नगरामधी नं,**
**मायचं रमून गेलंय मनं.**
**नारळाचे बनं राजा,**
**लाविलंय गोंडानं, सावळ्या प्रेमानं.**
**तोडून तोडून केलंय रानं,**
**गुरवाच्या बाळानं, सावळ्या प्रेमानं...**

चंद्रपूर हे दीडशे वर्षांपूर्वी वनाने वेढलेले शहर होते. येथील वातावरण आणि हवा ही मनाला भूरळ घालत असावी. यामुळे यात्रा झाडोझाडी आणि काठोकाठ भरल्याचे देवकरीण आपल्या गाण्यातून सांगतात. विठामायची गाडी चंद्रपूरात पोचल्यानंतर ही जत्रा काठोकाठ भरली असल्याचे देवकरीण आपल्या गाण्यातून सांगतात. त्यात विठामाय यांची भेट, त्यांच्याकडून काढण्यात येणाऱ्या हिल्लाळात होते वर्णन असे असते-

**मितं काय सांगू बाई चंद्रापूरची गं हवा,**
**गुरू माझ्या विठामायचा, कुठं उतरलाय पवा वं.. धुरपतामाय**

**माय माझ्या धुरपताची, जत्रा भरली झाडोझाडी,**
**गुरू माझ्या विठामायची कुठं उतरील्याय गाडी**
**वं .. धुरपतामाय**
**मितं काय सांगू बाई, चंद्रापूराची गं हवा,**
**माय माझ्या धुरपताची जत्रा भरली काठोकाठ..**
**गुरू माझ्या विठामायची, पडली हिझ्ळाला गाठं वं.. धुरपतामाय**
**एक बार धुरपतमायच्या नावानं हार बोला..**

याचप्रमाणे या गाण्यातूनही चंद्रपूरचे वर्णन आणि देवकरीण विठामायच्या म्यानाचा उल्लेख गाण्यातून येतो. ही नुसती गाणीच नाही तर यातून धुरपतामायच्या मंदिराचे सुरेख असे वर्णन, तेथील परिसर वातावरण आणि चैत्राच्या महिन्यात भरलेली यात्रा चित्रित केली जाते. जत्रेत गुरू विठामायचा म्याना शोधत ही देवकरीण धुरपतामायच्या मंदिराला म्हणजेच वाड्याला बारा दरवाजे असून ते आपण पाहायला आलोय, ते वैभव आपल्या नजरेत टिपून घ्यायला आलोय, असे त्या गाण्यातून सांगत असतात. त्याची महती आपल्या गाण्यातून गात असतात.

**चला, चला फाह्या जावू, बारा दरवाज्याचा वाडा.**
**माय माझ्या धुरपताचा, एक पुजाला उघडा वं, धुरपतामाय**
**चंद्रापूराची गं हवा, काय सांगू नं येड्याला,**
**माय माझ्या धुरपताच्या, बारा दरवाजे वाड्याला गं, धुरपतामाय**
**माय माझ्या धुरपताची, जत्रा भरली आज ना,**
**गुरू माझ्या विठामायचा, कुठं उतारला म्याना वं, धुरपतामाय**

चंद्रपूरला देवकरीण गेल्यानंतर येथील नदीकाठी असलेला झरपट (जरीपटका) या भागाला खूप महत्त्व आहे. जरीपटका याचा उल्लेख धुरपतामायच्या मौखिक परंपरेत अनेकदा येतो. देवकरीण, पोतराज आणि देवकरांनी आपल्या गुरूंकडून दीक्षा घेतल्यानंतर येथे असलेल्या जरीपटक्यात जाऊन अंघोळ करायची असा नियमच आहे.

चंद्रपूरच्या विकासात ज्याप्रमाणे येथे असलेल्या अनेक तलावांची वाताहत झाली तशीच महाकाली मंदिराशेजारून वाहत जाणाऱ्या झरपट

नदीचीही झालेली आहे. इथे आज नदी गायब होऊन केवळ तिचे अवशेष उरले आहेत. तरीही धुरपतामायचे भक्त हे या जरीपटक्याच्या म्हणजेच नदीच्या कडेला उतरून आपला डेरा घालतात. चंद्रपुरात उतरल्यानंतर आपल्या मायचे वर्णनही करत असतात. हे वर्णन असे असते-

**उतरले चंद्रपुराला...**
**उतरले चंद्रपुराला, जरीपटक्याच्या कडला.**
**आकासाला डोई, मायचे पाताळाला पायी.**
**धन्य झालो पाहून, मी धुरपतमाई...**
**पाषाणाला घाम फोडीला, जरीपटक्याच्या कडला.**
**चाकावाणी डोळे, मायचे गरगरा फिरविती,**
**साऱ्या जगावर चं, माय नजर ठेविती. उतरले...**
**वारकरी लोकं, मायला मारीती दगडं,**
**देवीचं सोंग घेऊन, फाटक लुगडं.**
**भेट देई बाळा विठ्ठलाला,**
**जरीपटक्याच्या कडला...**

धुरपतामाय ही एक सप्तमाता आहे. या सप्तमाता म्हणजेच सात बहिणींमध्ये धुरपता म्हणजेच महाकाली ही घाग, रागीट स्वभावाची आहे. पोचूमाय ही लहान असली तरी ती करामती असल्याचे देवकरीण आपल्या गाण्यातून सांगत असतात.

**आम्ही सात गं साती गं बहिणी,**
**महाकाली हाय घागं,**
**धावाला पिल्लू मागं, माय धुरपता...**
**आम्ही साती गं बहिणी,**
**पोचूमाय हाय न्हाणं.**
**धावाचा दिला मानं, माय धुरपता...**
**आम्ही साती गं बहिणी,**
**पोचू माय करामती.**
**बायच्या आळंक्यांवर ज्योती... माय धुरपता**

**बायच्या आळंक्यावर ज्योती,**
**वाऱ्यानं पाजळती, माय धुरपता...**

तसेच 'साती बहिण्यांचा मेळा' हे गाणे एकूणच सप्तमाता आणि शैवाच्या परंपरेचा वारसा आणि त्यांचा मेळ घालताना दिसतात. वृक्षांमध्ये दवणा, खारीक, लवंग, सुपारी आदी झाडांची तुलना केली जाते.

**साती बहिण्यांचा हाय मेळा...**
**चला जाऊ अंघोळीला. या बाई गणानं गजरा गुंफिला...**
**बारीक झाड माय दवण्याचं..**
**देवूळ महादेवाचं, या माय गणानं गजरा गुंफिला...**
**साती बहिण्यांचा हा मेळा...**
**या माय गणानं गजरा गुंफिला...**
**बारीक झाड माय खारकीचं,**
**देवूळ महाकालीचं, या माय गणानं गजरा गुंफिला...**
**साती बहिण्यांचा हाय मेळा...चला जाऊ अंघोळीला...**
**बारीक झाड माय सुपारीचं,**
**देवूळ गणपतीचं, या माय गणानं गजरा गुंफिला...**
**बारीक झाड माय लवंगचं,**
**देवूळ महाकालीचं, या माय गणानं गजरा गुंफिला...**

धुरपतामायची एकूणच परंपरा ही मातृदेवतेची आहे. या परंपरेचा धुरपतामाय हीच केंद्रबिंदू आहे. धुरपतामायची ज्या देवकरीण, पोतराज, देवकर यांनी ही परंपरा सुरू ठेवली. त्यांची नाळ ही शाक्त आणि तांत्रिकांशी जोडली गेलेली असली तरी त्यांच्यावर सुरुवातीच्या काळात गुरू मच्छिंद्रनाथ, दत्त संप्रदाय आणि त्यानंतर महानुभाव पंथ, भागवत संप्रदाय आणि मुस्लीम भक्तीपंथांचाही प्रभाव पडलेला दिसतो. विशेष म्हणजे आत्मज्ञान, त्यासाठीचे संवाद, गुरू-शिष्यांचे नाते, त्यांना देण्यात येणारी दीक्षा, तत्त्वज्ञान यांचे प्रतिबिंब देवकरीणच्या गाण्यांतून उमटताना दिसते. आपण गुरू करताना तिचे ज्ञान आणि एकूण आवाका पाहून त्यांचे शिष्यत्व स्वीकारल्याची कबुली भक्त आपल्या गाण्यातून देताना

त्यातील ज्ञानाचा महिमा, त्याचे महत्त्व सांगताना दिसतात.

**माय माझी धुरपता, तुझं मूळं घरं खोलं.**
**असा ऐकू येईना, तुमचा पुंजाऱ्याचा बोलं वं..**
**मला इथूनं दिसं, गडचांदियाचा आंबा,**
**माय माझी धुरपता, भोईऱ्यात नाचे रंबा गं.**
**मला इथूनं दिसं, गडचांदियाची तुळसं,**
**माय माझ्या धुरपताच्या, शिखरी सोन्याचा कळसं.**
**मला इथून दिसं, गडचांद्याचं पतरं,**
**माय माझ्या धुरपताच्या खांबाखांबाला चितरं, वं...**

चंद्रपूरला पायवाटेने जाताना पायात खडे रुततात, वेळूच्या वनातील त्याचा होणारा आवाज कानावर पडतो. वनातून मार्ग काढताना आपल्याला भीती वाटत नाही, आपल्यासोबत पोतराजासारखा सोबती, जवान शिपाई आहे. आपल्याला निसर्गमातेने या प्रवासात पिण्यासाठी वाटेत प्रत्येक ठिकाणी पाण्याचे झरे दिले आहेत, त्यामुळे आपण ही वाट आनंदाने जातोय, आपल्याला कोणती चिंता, भीती नसल्याच्या भावना या गाण्यातून प्रकट होताना दिसतात.

**गड चांदियाला जाया,**
**पाया रुतत्यात खडे**
**पापा-पुण्याचे गेले झाडे गं, धुरपतामाय...**
**गड चांदियाला जाया,**
**येळू करकरा लवती**
**जोड नारळं फोडिते गं, धुरपतामाय...**
**गड चांदियाला जाया,**
**कोसा कोसाचे लवणं**
**संगं, चपराशी जवान गं, धुरपतामाय...**
**गड चांदियाला जाया,**
**म्हणून नका पाय पोळ..**
**अन् हिरवं पातळ, पायघोळं वं, धुरपतामाय...**

गड चांदियाला जाया,
तान्ह लागली बाळाला
झरे सोडीले माळाला गं...
गड चांदियाला जाया,
करू नका उदगीदूगी,
बया, शिखराला उभी गं, धुरपतामाय...

चंद्रपुरात भरलेल्या यात्रेत दूरदूरून आलेल्या योगिनी, देवकरणींनी सर्व परिसर व्यापून गेला आहे. एखाद्या फुलांचा दाटवा निर्माण व्हावा असे ते चित्र तेथे निर्माण झाले आहे. प्रत्येक देवकरीण आपल्या हातात लिंबाचा डहाळा ठेवते, परंतु येथे आलेल्या देवकरणींमुळे आजूबाजूच्या परिसरातील लिंबांच्या झाडांनाही तो डहाळा उरलेला नसल्याचे त्या गाण्यातून म्हणतात.

गडचांद्या नगरामंधी, देवकरणीचा दाटवा,
मानकरणीला उठवा वं...
गडचांद्या नगरामंधी, देवकरणी झाल्या लई,
लिंबाळा डहाळा न्हाई गं, धुरपतामाय...

## आत्मबोधाची चळवळ

आत्मज्ञानाचं कुलुपं,
उघडते उघडना...
गुरू माझ्या विठामायची,
किल्ली मला सापडंना, वं...

'धुरपतामायच्या मौखिक परंपरेचे सर्वांत मोठे वैशिष्ट्ये म्हणजे ती आत्मबोध आणि आत्मज्ञानाची चळवळ होती. म्हणूनच या परंपरेत वेळोवेळी ज्ञान, तत्त्वज्ञानाचा विषय येतो. चळवळीचे दुसरे वैशिष्ट्ये म्हणजे जीवन हे क्षणभंगूर असून त्याचा कोणताही भरवसा नाही. याची वेळोवेळी जाणीव गाण्यातून, स्तवनातून करून दिली जाते. अनेक गाण्यांतून आत्मा आणि शरीरातील भांडण आणि संवाद हा खूप महत्त्वाचा

दिसतो. आपले शरीर एक प्रकारे सोयरी असून त्यातून आत्मा म्हणजे प्राण निघून गेल्यानंतर त्याची जागा ही कायम नगराबाहेर असते, याची जाणीव करून दिली जाते'.

पोतराज, देवकरीण दंडात वापरत असलेल्या वीर कंगनमध्येही जीवनाचे सर्व सार आणि त्याची प्रतिकृती उमटलेली असते. म्हणूनच अनेक गाण्यातून जीवनाकडे पाहण्याचा एक नवा मार्ग शोधून दिला जातो. तो मार्ग हा सत्याचा, ज्ञानाचा आणि गुरूंच्या आशीर्वादाचा असतो. स्वर्गाच्या म्हणजेच्या अंताच्या दिशेने, त्या वाटेने निघण्यापूर्वी आपल्याकडे गुरूंच्या माध्यमातून मिळालेला ज्ञानाचा दाखला आपल्याकडे आहे. यामुळे आपल्याला यमाची म्हणजेच मृत्यूची भीती नसल्याचे त्या गाण्यातून म्हणतात. जीवनाचे तत्त्वज्ञान अगदी साध्या आणि सोप्या भाषेत सांगणारी ही गाणी लोकसाहित्यातील मोठा ठेवा आहे. संतांनी, महानुभाव पंथातील विद्वानांनी हेच तत्त्वज्ञान आपल्या भाषेतून सांगितलेले आहे. मात्र, धुरपतामायच्या परंपरेत विठामायपर्यंत ते ओझरत आल्याचे दिसते.

**बाई आत्माराज म्हणे, कुडी माझी तं सोयरी...**
**देतनी झाली बाई, जागा नगराबाहेरं गं, धुरपतामाय...**
**जागा नगराबाहेर गं, धुरपतामाय...**
**आतमा कुडीचे, हायतं दोघाचे भांडणं,**
**आत्माराज बेईमान, गेला कुडीला सोडूनं गं..**
**चालला कुडीला सोडूनं गं, धुरपतामाय..**
**आत्माराज म्हणी, आवरं कुडे लवकरी..**
**तुला राहणं गावकरी, मला जाणं देशावरी गं, धुरपतामाय...**
**मला जाणं देशावरी गं, धुरपतामाय...**
**पुढी आत्माराज गेला, कुडी दिसती बेसूरं,**
**गुरू माझ्या दयाळाला, कुठं लागला उशीरं गं, धुरपतामाय...**
**पुढी आत्माराजं गेले, कुडी पडली पेवातं,**
**गुरू माय येतेलं धावतं गं, धुरपतामाय**
**बाई सरगीच्या वाटं, येमाचं आडवणं...**
**गुरू माझ्या दयाळाचं, मला सोडवणं...**

लोकगीतात स्वर्ग-नरक, पाप-पुण्य आदी संकल्पना मोठ्या प्रमाणावर येतात, या परंपरेत मात्र त्यासाठी वेगळ्या संकल्पना आणि त्याकडे बघण्याचा एक वेगळा दृष्टिकोण दिसून येतो. इथेही स्वर्ग-नरक आणि पाप पुण्याच्या संकल्पना असल्या तरी आयुष्यभर आपल्या गुरूंसोबत घेतलेल्या शिकवणुकीमुळे त्यांना यमाची, पापाची, नरकाची म्हणजेच मृत्यूची भीती उरलेली नाही. ती शिकवण आपल्याला शेवटच्या काळात कामी येते, म्हणून आपल्या गुरूंनी दिलेला दाखला म्हणजे आपले जीवन सार्थ झाल्याची भावना ते व्यक्त करतात.

तळेगावची राजामाय, शेलगावच्या यमुनामायपेक्षा दैठण्याच्या विठामाय आणि भागामायच्या शिष्यपरंपरेतील गाणी पाहिली तर त्यात ज्ञान, आत्मज्ञान आणि त्यातून गुरू-शिष्यांमध्ये झालेले संवाद, चर्चा कशा होत असायच्या, याचे दाखले मिळतात. विठामाय आपल्या शिष्यांना ज्ञानाची शिकवण देताना, त्यासाठीचे विषय सांगताना रात्रही अपुरी पडत असल्याचे उल्लेख देवकरीण आपल्या गाण्यातून करतात. विठामायवरील काही महत्त्वाची गाणी लक्षात घेतली तर त्यातूनही धुरपतामायच्या मातृपरंपरेची चळवळ ही एक आत्मज्ञानाची, विचारांची, तत्त्वज्ञानांची चळवळ होती, याचा उलगडा होतो. महिला योगिनी अथवा देवकरीण या आपल्या शिष्यांना देत असलेली शिकवण याच पद्धतीची होती, हे अनेक गाण्यातून स्पष्ट होते. त्यातील एक गाणे असे -

**आत्मा ज्ञानाचं कुलुपं, उघडती उघडना गणा वं...**
**माय माझ्या विठामायची, किल्ली मला सापडना वं,**
**गुरू माझ्या विठामायची, किल्ली मला सापडना वं...**
**आत्मज्ञानाचा कुलूप, उघडू कशीकशी नं,**
**किल्ली माझ्या गुरुपशी गं...**
**आत्मज्ञानाचं कुलुपं, मितं उघडया गेले गेले वं,**
**मितं उघडया गेले, रत्नं मला सापडले वं..**
**मितं उघडाया गेले, माझ्या गुरूचे मंतरं, मंतरं,**
**माझ्या गुरुचे मंतरं, रत्नं मला सापडले वं, धुरपतामाय...**
**मह्या गुरूचे मंतरं, रत्नं मला सापडले वं.,**

**विठामाय सेव झाली, शंभर वरसाच्या आतं,**
**गुरू माझ्या विठामायचा, चुडा वाजे समाधीतं वं...**
**गुरू माझ्या विठामायचा, चूडा वाजे समाधीतं वं...**

आपल्या गुरूंचे ज्ञान पाहून त्यांचे शिष्यत्व आपण स्वीकारले आणि त्यांनी आपल्याला मातृदेवतेच्या परंपरेचा वारसा चालविण्यासाठी आपल्याला घरदार सोडवले. जुन्या समजूती, महिलांवर वेळोवेळी लादण्यात आलेल्या अनिष्ठ प्रथाही आपल्या गुरूंनी दूर केल्या. दैठणगावाला जे कोणी जातात, त्यांच्याकडे आपल्या गुरूमाय विठामायची खुशाली विचारत असल्याचेही देवकरीण आपल्या गाण्यातून म्हणत असतात. आत्मज्ञान आणि आत्मबोधाची ही परंपरा अत्युच्य कोटीची असल्यानेच त्या घरदार सोडून एखाद्या योगिनीप्रमाणे जीवन जगण्याची प्रेरणा देतात. जगण्यासाठी बळ देतात. हे बळ त्यांना मातृदेवतेची परंपरा, तिचा वारसा पुढे नेण्यासाठी ताकद देतात.

**विठामाय गुरू केले, म्यातं ज्ञानाची पाहूनं**
**विठामायचा भंडारं, दिसतोयं अगुचरं..**
**गुरू माझ्या विठामायनं, सोडविले घरं-दारं गं, धुरपतामाय...**
**बाई विठाळ-चंडाळं, करीते दूरं-दूरं,**
**गुरू माझी विठामाय, गुरू आगनीचं घरं गं, धुरपतामाय...**
**माय आगनीचं घरं गं, धुरपतामाय...**
**आल्या गेल्याला पुसीते, दैठणगावी खुशाल-खुशालं,**
**गुरू माझी विठामाय, गादीवरली दुशालं वं, धुरपतामाय...**

गुरूंकडून आयुष्यभर ज्ञान, आत्मज्ञान याची शिकवण घेतल्यानंतर आपल्याला मृत्यूचे भय नाही. मात्र, तो अटळ आहे. यावर देवकरीण, पोतराज यांचा अगाध विश्वास असतो. म्हणूनच त्यांच्या प्रत्येक गाण्यातून जगताना आयुष्य किती चांगले जगले, याची कोणती पोचपावती आपण जवळ ठेवली याची शिकवण प्रत्येकांना असावी, याचा संदेश धुरपतामायच्या मौखिक परंपरेतील ही गाणी देतात.

बाई सरगीच्या वाटं, जीवं चालला एकला,
गुरू माझ्या दयाळाचा, संगं हाय ज्ञानाचा दाखला गं, धुरपतामाय
बाई सरगीच्या वाटं येमाचं आडवणं,
आज हाय पंधरवाडी एकादसं, जिवाला या सोडवणं गं..
बाई सरगीच्या वाटं, येमं पुसं घाई-घाई,
जीवाला सोडवणं, एकादसं केली नाही वं.. धुरपतामाय..
बाई सरगीच्या वाटं, यमाच्या पासापूस.
आम्हाला ही सोडवणं, नाही केल्या एकादशी वं..
बाई सरगीच्या वाटं, जीवा तुझा अपघातं..
गुरू माझे दयाळ, साक्षीदारं सदगुरूनाथं वं, धुरपतामाय
बाई सरगीच्या वाटं, येमाचं नाही भेवं,
गुरू दयाळं बोलले, आसामी तुमची न्हवं वं, धुरपतामाय
ही आसामी तुमची न्हवं वं, धुरपतामाय
बाई सरगीच्या वाटं, बाई केलं पापं, पुण्य
तिथं सांगा खरं, खोटं गं, धुरपतामाय...
बाई सरगीच्या वाटं, यमानं भरलाय वाडा,
गुरू दयाळं, बोलले पत्रं पूरवीचे काढा वं, धुरपतामाय
बाई तनंमनधनं, मला गुरूला वाहायाचं,
सुदं, करावं महाराज, मोक्षंपदाला जायाचं वं, धुरपतामाय.
बाई सकाळी उठूनी, गायीच्या कोठ्या जावं,
गुरू माझ्या दयाळाचे, नाव पवित्राचे घ्यावं गं, धुरपतामाय...

धुरपतामायच्या मौखिक परंपरेत अनेक वेळा जन्म आणि मृत्यू आणि त्यानंतरच्या अंताच्या प्रवासासंदर्भातील उल्लेख येतो. या प्रवासात आपण आपल्या गुरूसोबत केलेल्या कार्याची पोचपावती त्यांच्यासोबत असते. आयुष्य जगताना केलेल्या चांगल्या कामाची ताकद त्यांच्यासोबत असते, त्यामुळे अंताच्या दिशेने सुरू झालेल्या प्रवासाची त्यांना भीती वाटत नाही, असे उल्लेख गाण्यातून येतात.

देवकरीण आपल्या एका गाण्यातून अकरा वेळा नमन करतात. त्याची सुरुवात गणपतीपासून आणि शेवट हा हरीच्या नामापर्यंत जाऊन होतो.

शेवटच्या वाक्यात या नमनाची अनेकांना याद नाही, आठवण राहिली नाही, असे हे माझे नमन असल्याचेही त्या सांगतात.

यादरम्यान मूळमाया शक्ती, पृथ्वी, आकाश, पाताळ, चंद्र, सूर्य, आदींना नमन केले जाते. मात्र, यात अनेकदा नवनाथ, गोरखनाथ, जालिंदर आणि मच्छिंद्रनाथाला नमन असते. इतर गाण्यांमध्येही यांचा खूप वेळा उल्लेख येतो. पोतराज तर यांच्या जन्माच्या कथा, आपले नाते अधोरेखित करतात.

**पहिले नमनं गणपतीला, अन् गणपतीच्या सारजंला.**
**अंजानीच्या हनुमंताला की, नमनं माझे हो, नमन माझे.**
**दुसरे नमनं आई पांढरी, अन् पाटील-पांडे रथ सारी.**
**आली शंकराची स्वारी की, नमनं माझे हो, नमनं माझे.**
**तिसरे नमन तिन्ही ताळातं, अन् मी काय राहते त्रिभूवनातं,**
**शेषा नांदे पाताळातं की, नमनं माझे हो, नमनं माझे.**
**चवथे नमनं चारी वेदाला, अन् गोरखनाथा, मछिंद्राला,**
**शिष्या त्यायनं तयार केला की, नमनं माझे हो, नमनं माझे.**
**पाचवे नमनं पाची पांडवाला, अन् पांडवाच्या धुरपताला,**
**आदी मूळमाया शक्तीला की, नमनं माझे हो, नमनं माझे.**
**सहावे नमनं सहाये दर्शनी, सरव्या परथवीचा धनी,**
**चांद, सूर्य राहते गंगणी की, नमनं माझे हो, नमनं माझे.**
**सातवे नमनं हुर्देनेमीला, फेरा चौऱ्यांशी चुकविला की नमने माझे.**
**आठवे नमन मशासूराला, अन् गोरखनाथं, मच्छिंद्राला,**
**अनुसयाच्या दत्ताला की, नमनं माझे हो, नमनं माझे.**
**नववे नमनं नवनाथाला, गोरखनाथं मच्छिंद्राला,**
**शिष्या त्यायंनं जार्लींदर केला की, नमन माझे हो, नमन माझे.**
**दहावे नमनं श्रीहरीला, पव्वा त्यायंनं वाजविला,**
**खेळ गवळीणीचा केला की, नमनं माझे हो, नमनं माझे.**
**अकरावे नमनं अकरा पदं, अन् ह्यात हरीच्या नामाची,**
**नाही कयिकाला यादं की, नमन माझे हो, नमन माझे...**

## पंढरपूरचा विठ्ठल आणि धुरपतामाय

चंद्रपूरच्या महाकालीचा आणि पंढरपूरच्या विठ्ठलाचा संबंध धुरपतामायच्या अनेक गाण्यातून प्रकर्षानि दिसतो. येथे विठ्ठलाला भाऊ आणि धुरपतामाय ही त्यांची बहीण म्हणून वेळोवेळी उल्लेख येतो. हा संबंध दाखविणारी गाणी अजूनही बऱ्याच प्रमाणात आणि अत्यंत लयबद्धपद्धतीने म्हटली जातात. विशेष म्हणजे पंढरपूरला जाणारा धुरपतामायचा भक्त, देवकरीण हे तेथे असलेल्या जुन्या रुक्मिणीच्या मंदिरात जाऊन पहिले दर्शन घेतात. ती पंढरपुरातील मूळ मातृदेवता आणि तिचा पंथ असावा. कारण देवकरीण ज्यांचा उल्लेख जरीमरी असे करतात, तिचेही मंदिरे येथे आहेत. तिथे त्यांना लक्ष्मीआई, मसादेवी नावाने ओळखले जाते. जुन्या रुक्मिणीला दिंडीर वनातील 'लखूबाई' असेही म्हटले जाते. आजूबाजूची ही सर्व मंदिरे लक्षात घेता जुन्या रुक्मिणीच्या मातृदेवतेचा पंथ वारकरी पंथाहून जुना असावा.




मराठवाड्यातील देवकरीण पंढरपुरात आल्यानंतर रुक्मिणीचे लखूबाईचे म्हणजेच मरिआईच्या मंदिराचं दर्शन घेतल्यानंतरच विठ्ठल-रूक्मिणीच्या मंदिराकडे येतात. पंढरपुरातील हे जरीमरी या आईचे मंदिर हेच आपले मूळ मंदिर असल्याचे ते आपल्या गाण्यातून सांगतात. रुक्मिणीमाता आणि जरीमरीच्या मंदिराजवळ भंडारा उधळूनच पंढरपूरमध्ये प्रवेश केला जातो.

पंढरपुरात दुर्लक्षित झालेल्या मातृदेवतांचे खूप जुने पंथ होते. ते काळाच्या ओघात दुर्लक्षित झाले असावेत. तरीही त्यांच्या काही खुणा येथे शिल्लक आहेत. देवगड मठाजवळ विजापूर गल्लीतील एका लहानशा बोळात शेंदूर माखून ठेवलेली आकारहीन दगडातील फोडी ही देवी

आहे. जवळच काही अंतरावर मुर्षद बाबा दर्गाशेजारी आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर क्रीडा संकुलाला लागूनच मरिआईचे मंदिर आहे. तिचाही एक वेगळा पंथ असल्याचे संदर्भ तिथे शिल्लक आहेत.

जरीमरीच्या गाण्यांतून विठ्ठल-धुरपतामाय यांच्यातील नाते आणि भावना व्यक्त करताना दिसतात. विठ्ठल आणि जरीमरी यांच्यातील संवाद साधणारी गाणी लक्षात घेतली तर यावर एक वेगळे संशोधन होण्याची गरज वाटते. यासाठी देवयमायने या दोन्ही परंपरेतील दुवा साधण्याचे मोठे कार्य केले होते.

**जरी बोलते मरीला, आपुनं पंढरीला जाऊ.**
**भेट विठ्ठलाची घेऊ गं, धुरपतामाय...**
**जरी बोलते मरीला, आपुनं पंढरीला जाऊ.**
**आळंदीची आली दिंडी, चला जलदी पाहू तिला गं, धुरपतामाय...**
**माय माझी धुरपता, निघाली अर्ध्या रात्री,**
**बोलले मारवती, लावा कापराच्या ज्योती, गं, धुरपतामाय...**

चंद्रपुरात धुरपतामाय गेल्यानंतर ती आषाढ महिन्यातील एकादशी होती. पंढरपुरात येताच तीने वेशीला धक्का दिला. परंतु गावातील लोक तिला वेडी म्हणत. तिला ओळखत नव्हती. जरी ही मरीला म्हणते, आपण पंढरीत शिरून जो टाळ मृदगांचा नाद सुरू आहे, वीणा सुरू आहे, त्याचा आवाज बंद करू असा इशारा देतात. हा इशारा प्रतिकात्मक स्वरूपाचा आहे. आळंदीहून आलेली दिंडी पाहण्यासाठी आतूर झालेली धुरपतामाय ही अर्ध्या रात्री निघून वातावरण प्रसन्न होण्यासाठी कापराच्या ज्योती लावते. असे चित्र गाण्यातून रेखाटले असून पुढे विठ्ठलाला मानवी रूप देत त्यातून विठ्ठल आणि मरिआई म्हणजेच धुरपतामायचा संवाद अत्यंत मार्मिक आणि लयबद्धपणे करण्यात आल्याचे या गाण्यातून दिसतो.

**बाई बोलतं चालतं, माय गेली पंढरीशी,**
**आकाड्या व्हत्या एकादशी गं, धुरपतामाय...**
**आली आली धुरपता, येशीला दिलायं धक्का.**
**बोलतीया गाव लोका, मला येडी म्हणू नका रं...**

आली आली धुरपता, कोणी वळकीना तिला..
मारवतीच्या पारावरती, गुजं बोलं तेलंगला वं, धुरपतामाय...
हाती बोराट्याची काठी, मायला वळकीना कोणी.
अवघ्या पंढरीतं, टाळ मृदंगाची धुनी गं...
जरी बोले मरीला, उतरल्या गावकरी..
अन हादरले, वारकरी गं...
जरी बोलती मरीला, आपुन गावामंदी शिरू,
नवं लाख आली दिंडी, वीणा त्यांचा बंद करू.
वीणा त्यांचा बंद करू गं, धुरपतामाय...
माय माझी धुरपताची, हिची निंदा कुणी केली?
अवघ्या पंढरीत, ढाळ उलटी पैदा झाली वं, धुरपतामाय..
बाई पंढरपुरात, सरणाला सरण दाटं,
विठ्ठल गाडीवरून उठं, अन जाऊन धुरपताला भेटं वं..
बाई विठ्ठल म्हणीतो, दंगा करू नका माई..
दंगा करू नका माई,
वारी आकाडीची हाय वं, धुरपतामाय..वारी...
आकाड, सरावण झोप येईना नेतरंला,
तुम्ही दंगा केल्यावर, कोण येईल जतरला वं, धुरपतामाय...
बाई विठ्ठल म्हणीतो, नेसा हुंबाचं पातळ,
चंद्रभागाच्या बाहेर, रथ जाऊ द्या शीतळ वं,
गाडा जाऊ द्या शीतळ...
आली आली धुरपता, आली तशी मी जाईन,
आकाड महिन्यात, वाट पाहायला लावीन वं, धुरपतामाय....

पंढरीचा पांडुरंग हा धुरपताचा भाऊ असल्याचे अनेक गाण्यांतून देवकरीण सांगत असतात. ही गाणी इतर अनेक परंपरांच्या प्रभावातून आली असावीत असे वाटते. मात्र ती खूपच सौंदर्यांनी नटलेली आहेत. धुरपतामायला म्हणजे आपल्या बहिणीला आणण्यासाठी पांडुरंग रथ घेऊन तातडीने निघालेला आहे, असे एक चित्र या गाण्यातून साकारले गेले आहे. धुरपतामाय आणि विठ्ठल यांच्यातील संवादावर अशा प्रकारची

असंख्य गाणी आहेत.

**पंढरीचा पांडुरंग, हाय अंतरीचा शहाणा,**
**बहिणा धुरपताला आणा, धुरपताबाई...**
**सवा मणाचे लाडू, सवा मणाचे पापडी**
**देव निघाले तातडी, धुरपताबाई...**
**पांडुरंगाचा हे रथं, रथं गेला गावाबाहेर**
**सगळ्याला रामराम करी, धुरपताबाई...**
**पांडुरंगाचा हे रथं, रथं गेला वेशीबाहेरी,**
**त्यानं रामराम करी, धुरपताबाई...**

यासोबतच धुरपतामाय आणि विठ्ठलांची भेट ही जरीपटक्याच्या कडेला कशी झाली याचे मानवी भाव प्रकट करणारे आणि त्यातून वेगळे नाते उलगडणारे गाणे आहे. पंढरपुरात ती आल्यानंतर आपले असलेले चाकावाणी डोळे ती गरगरा फिरवते आणि दुसरीकडे तिच माय साऱ्या जगावर लक्ष ठेवते, नजर ठेवते.

तिचं फाटकं लुगडं आणि देवीचं सोंग घेऊन आलेल्या या धुरपतामायला वारकरी लोक 'वेडी' म्हणून दगड मारतात. तिथे विठ्ठल येऊन जरीपटक्याच्या कडेला मायची भेट घेतात. संपूर्ण जगावर नजर ठेवणारी ही 'माय' पंढरपुरातील वारकऱ्यांना कळलीच नसल्याचा 'बोध' या गाण्यातून होतो.

**उतरले चंद्रपुराला, जरीपटक्याच्या कडला,**
**आकासाला डोई, मायचे पाताळाला पायी.**
**धन्य झालो पाहून, मी धुरपतमाई...**
**पाषाणाला घाम फोडीला, जरीपटक्याच्या कडला,**
**चाकावणी डोळे, मायचे गरगरा फिरविती,**
**साऱ्या जगावर चं, माय नजर ठेविती. उतरले...**
**वारकरी लोकं, मायला मारिती दगडं,**
**देवीचं सोंग घेऊन, फाटक लुगडं,**
**भेट देई बाळा विठ्ठलाला, जरीपटक्याच्या कडला...**

## धुरपता, द्रौपदी आणि काली

'धुरपतामायची एकूणच परंपरा ही सप्तमाता, नदी देवता या परंपरेतील आहे. मात्र अनेकदा त्यांच्यावरील गाण्याचा संबंध हा महाभारतातील द्रौपदीशीही जोडला जातो.' द्रौपदी ही एक काली असल्याचे शरद् पाटील म्हणतात, 'पांडवाची कुलदेवता दुर्गा होती; कारण मत्स्यांच्या विराटनगरीत अज्ञातवासाचे वर्षे व्यतीत करण्यासाठी, शिरण्यासाठी युधिष्ठिराने मदतीसाठीचा धावा केला. या प्रार्थनेत युधिष्ठिर तिला कृष्णाची भगिनी म्हणून संबोधतो. पांडवाची आई कुंती ही कृष्णाची आत्या होती. द्रौपदीचे कृष्णा हे नावच सूचित करते की, ती काली, दुर्गेची मानवी प्रतिनिधी व त्या भूमिकेत ती कृष्णाची भगिनी होती,' असा दाखलाही पाटील देतात. धुरपतामायच्या परंपरेत या द्रौपदीला धुरपताच म्हटले जाते. इतकेच नव्हे तर विठ्ठल, रुक्मिणी, पांडव, द्रौपदी यांच्यातील नातेसंबंध, संवाद गाण्यातून अत्यंत लयबद्धपणे रेखाटला जातो. यावर अनेक गाणी ही या परंपरेत लक्ष वेधून घेतात. एखादी मोठी कथा आणि त्या संपूर्ण कथासूत्राचा उलगडा प्रत्येक ओळीतून केला जातो. असे गाणे थडी पिंपळगावच्या जलसामाय या देवकरीणकडून मिळाले, ते असे -

**बाई रुकमीन म्हणी, देवा तुम्हा बहिणी किती?**
**बाकीची सुभीदरं, धरमाची धुरतपती वं, धुरपतामाय**
**बोटं कापली देवाचं, रुद्राला लागलीया धारं,**
**त्यात सुभीदरा परीस, मया धुरपताला फार वं, धुरपतामाय**
**बोटं कापलं देवाचं, रुद्रा भरल्यातं सांधी.**
**बोलंली सुभीदरा कुठं, सापडंना चिंधी वं, धुरपतामाय**
**बोटं कापलं देवाचं, रुदरा भरीलंत बोटं,**
**बोलली सुभीदरं, चिंधी सापडंना कुठं वं, धुरपतामाय**
**यात धुरपताबाईनं, भाऊ धरमाचा जोडीला,**
**कापली कनगुळी, पदरं जराचा फाडीला वं, धुरपतामाय**
**यात धुरपताबाईला, हिला सक्का बंधू कुठं,**
**एवढं पाठवाचं दिंड, आले द्वारकीच्या वाटं वं, धुरपतामाय**

बाई विठलं म्हणीतं, गोष्ट रुकमिणी जाणावी,
पाच दिसाची दिवाळी, बहिण धुरपता आणावी वं,...
बाई साकराचे लाडू, करा रुकमीनं ताजं,
बहीण धुरपताला मूळं, अर्णावती जातो आज वं,...
बाई अंगणात रथं, रथं सावळ्या रायाचा,
बहिणा धुरपताला मूळं, अर्णावतीला जायाचा वं,...
बाई साकराचे लाडू, लाडू रूकमीनीनं केले,
बहिणं धुरपताला मूळं, देवं अर्णावती गेले वं, धुरपतामाय
बाई विठलाचा रथ, अर्णावतीच्या रानातं,
असा उतार पडला, धुरपतबाईच्या कानातं वं, धुरपतामाय
बाई श्यामकर्ण घोडा, गलीगलीनं हिसतो,
बहिणा धुरपताबाईचा, वाडा विठल पुसतो वं, धुरपतामाय
बाईचा विठलाचा रथं, अर्णावतीच्या नायेरी,
पाची पाडंव पारावरी, रामरामाची तयारी वं...
बाई विठलाचा रथं, पाची पांडवाच्या दारी,
यात धुरपताबाईच्या, हातावरी जंबूझारी वं, धुरपतामाय
धुरपतीची सासू म्हणी, काहो देवा येणं केलं,
पाचा रोजाची दिवाळी, मूळं धुरपताला आलं वं, धुरपतामाय
धुरपतीची सासू म्हणी, पांडव माझे घरी नाही,
पूसं अर्जूनाची घ्यावी वं, धुरपतामाय
देव अर्जून म्हणी, पांडव माझे घरी नाही,
त्यात धुरपताबाईला, धाडण्याची सोय नाही वं, धुरपतामाय
देवाला कुर्द आला, रथ माघारी फिरला,
आडवा अर्जून झाला, धाडतो धुरपताला वं, धुरपतामाय
पाची पांडव व म्हणीते, घाला धुरपताला न्हावू,
पाचा रोजाची दिवाळी, मूळं आले तिचे भाऊ वं...
बाई धुरपतानं केल्या, निरशा दूधातं सेवया,
पांडवा बरोबरी, बसा यदवं जेवाया वं, धुरपतामाय
बाई सोन्याचा चाबूक, यदवरायाच्या हातातं,
येवढं जेवूनं खावून, बसा धुरपता रथातं वं, धुरपतामाय

बाई धुरपतीचा रथं, रथं येशीच्या बाहेरी,
पाचीया पांडवाची, रामरामाची तयारी वं, धुरपतामाय
बाई धुरपतीचा रथं, रथं पंढरी रानातं,
असा उतारं पडला, रुकमीनबाईच्या कानातं वं, धुरपतामाय
बाई धुरपतीचा रथं, चंद्रभागी वाळवंटी,
सावळ्या रुकमीनच्या हाती, सोन्याची आरती वं,...
बाई धुरपतीचा रथं, रथं राऊळाजवळी,
एवढी नंदाच्या नात्याने, सत्यभामा तं ओवाळी वं, धुरपतामाय
बाई धुरपतीचा रथं, राऊळाच्या पुढे,
एवढं नंदाच्या नात्यानं, राही रुकमीनं पाया पडं वं..
बाई विठल म्हणीतो ठेवा, उणंउणं पाणी,
गाव अर्णावती दूर, आली धुरपता शिणून वं.. धुरपतामाय
हांड्या ठेवीलंय पाणी, पाणी इसानिला न्हाणी,
यात धुरपता गुंफा, लवंगाची फणी वं.. धुरपतामाय
यात रुकमीनीनं केल्या, निरशा दूधातं शेवया,
विठला बरोबरी बसा, धुरपता जेवाया वं, धुरपतामाय
एवढं जेवूनं खावूनं, गेली सूर्व्याला पाठं,
पाचीया पांडवाची, धुरपता पाहती वाटं वं, धुरपतामाय
पाचा रोजाची दिवाळी, बहू आनंदात झाली,
अर्णावतीच्या वाटंनं, दौडं पांडवाची आली वं, धुरपतामाय
बाई रुकमीनं म्हणी, उद्या तुळशीचं लग्न,
यात धुरपताबाईची मंगं करू बोळवणं वं, धुरपतामाय
विठलाला झाली रातं, हस्नापुरीच्या बाजारी,
अशी त्यानं खंडवीली, नवं लाखाची गुजरी वं, धुरपतामाय
बाई विठलं म्हणीतं, बघा रुकमीनं बाजारं,
धुरपताची बोळवणं, सुरती लागली हजारं वं, धुरपतामाय
बाई रुकमीनं म्हणी, चोळीला काय दिलं,
बोललं पांडुरंग, दोन्हीचं एक मोलं वं, धुरपतामाय
बाई पंढरपुरातं, गलोगलीला कासारं,
धुरपताच्या चुडीयाचा, दिलाय देवानं इसारं वं, धुरपतामाय

वरी शिव शिंपी दादा, मोती लावूनं बंधाला,
मोती लावूनं बंधाला, चोळी धुरपता नंदाला वं, धुरपतामाय
वरी शिव शिंपी दादा, मोती लाव पसापसा,
बहिणा धुरपताबाईला, चोळी जायची दूरल्या देसा वं...
बाई साकर सोजीची, रुकमीनं करीती शिदोरी,
इथं वरी चला वाटं, तुम्हाला साजरी वं, धुरपतामाय
बाई विठलं म्हणीतो, जाच कशीयाचा तुला,
सांगतोय मी अर्जूनाला, फार जपा धुरपताला वं, धुरपतामाय
बाई विठलं म्हणीतो, धुरपताला जाचं फार,
सावळे रुकमीनी, जाणं आलं तिथंवरं गं, धुरपतामाय
बाई विठल म्हणीतो, नेसा धुरपती पितांबरं,
गावं अर्णावती दूरं, फार होईलं उशीरं वं, धुरपतामाय
पिवळं पितांबरं, कस्तुरी हिरवा रंगं,
धुरपताची बोळवणं, चांदं सूरवे झाले दंग वं, धुरपतामाय
यात रुकमीनीच्या ताटी, शंभर सवाशे गं वाटी,
बोलले पांडुरंग, भरा धुरपताची वटी गं, धुरपतामाय
बाई रुकमीनं म्हणी, वहिनी तजंबीजं भारी,
आली महिन्याची वारी द्या, धाडून लवकरी वं, धुरपतामाय

या मौखिक परंपरेत कुंती, पंडू राजा आणि कर्णाच्या जन्माची कथाही गाण्यातून येतात. कर्णाचा जन्म कसा झाला, त्यासाठी कुंतीला विचारले जाते आणि तिने जपलेल्या सूर्याच्या मंत्राचा उल्लेख त्यात येतो. यामुळेच कर्ण हा सूर्याच्या तेजाचा कसा होता, याचे सुंदर वर्णन गाण्यातून येते. विशेष म्हणजे, या गाण्यात एकदाही धुरपतामायचे नाव येत नाही. अशी गाणी आणि त्याचे प्रमाण कमी असले तरी ती अशा विषयासाठी या परंपरेत खोलवर रुजलेली आहेत.

हस्तानपूरीचा राजा नं, राजा शिकारीला गेला वं
राजा शिकारीला गेला नं, हरणी सरापं देती त्याला वं...
हरणीचा सरापं एवढा, ऐकीला कानी वं,
कुंती पंडू राजा नं, स्वार्ग चाललेत दोन्ही वं...

कुंती पंडू राजा नं, भागीरथीपशी गेला वं,
गुरूच्या मंतराची नं, आठवणं झाली त्याला वं...
कुंतीची, पाचीया पांडव नं, कर्ण कोणाचे आसावं नं,
कर्ण कुणाचे असावं नं, कुंती माताला पुसावं...
पाचिया पांडवं कर्ण नं, कुणाच्या बीजाचा वं,
कुंती बाई नं जपीला, मंत्र सूर्व्याच्या तेजाचा वं...
कुंतीकी बाई नं, मंत्र जपून पाहिला वं,
केळीच्या दुर्णामधी नं, कर्ण गंगाला वाहिला वं...
इतनं इंद्रं, जीतनं रूद्रं चालीलाई लोंढा वं,
माता मनी नदी कोंडा नं, मदी इंद्रजीत धुंडा वं...

## शिखर शिंगणापूर व धुरपतामाय

धुरपतामायच्या परंपरेची नाळ ही शाक्तांशी असल्याने देवकरीण यांच्या गाण्यातून प्रामुख्याने शिखर शिंगणापूरचा वेळोवेळी उल्लेख येतो. इतकेच नव्हे, तर धुरपतामायच्या नावाने 'हार हार' बोलल्यानंतर त्याचा शेवट हा 'हर हर महादेव, पार्वती शिवहारा' या घोषणांनी केला जातो.

शिंगणापूर हे शाक्तांचे मोठे शक्तिपीठ होते. त्या ठिकाणी योगिनींचा मेळा भरला जात होता. यासाठी पुरावे देवकरीण आपल्या गाण्यातून देतात. भगतीनी म्हणजे योगिनी शीवगडावर आपल्या ज्ञानाचा शाक्तांचा वारसा जतन करण्याचे आवाहन त्या करताना दिसतात.

घेतली कुंकू गेली गाण्याला,
घेतली भंडार गेली गाण्याला,
भगतीने चला की, जाऊ या,
शीवगडावर 'समय' लावू या...
बाईला माझ्या नाद गाण्याचा,
देवीला माझ्या नाद गाण्याचा,
घेतली, लिंबं गेली गाण्याला,
घेतली नारळ गेली गाण्याला,
भगतीनी चला की, जाऊ या,

शिवगडावर 'समय' लावू या...
बाईला माझ्या नाद गाण्याचा,
घेतली शेंदूर गेली गाण्याला.. भगतीनी...

शिंगणापूरच्या शंभूचे शिखर हे धुरपतामायच्या परंपरेत आकर्षणाचे केंद्र आहे. म्हणून या शिखराला खूप मोठे स्थान अनेक गाण्यांतून मिळालेले आहे. सोमवार, गिरीजा, कावडी यातील प्रत्येक गोष्टी या गाण्यातून एका समर्पित भावनेने प्रकट केलेल्या दिसून येतात.

**बाई संबूचं शिखरं...**

बाई सोमार दिवसं, मला कळना येडीला,
महादेव-पार्वती, उभी बैलाच्या पाडीला वं..
आटा दिसं सोमारी, सारविते चार कोनं...
महादेव तं पाव्हना, पार्वती सुवासिनं वं..
आटा दीसं सोमारी, कोऱ्या घागरीत पाणी,
एवढे महादेव स्वामी, आले लिंगायत वाणी, वं..
संबू म्हणू वं संबू, हाका मारीतेत बळी,
संबू गेला चका माळी, दवण्याचे वाफे वळी वं..
संबू केलिया आळी, वाटी तोळा दवणा गोळी वं...
बाई संबूचं शिखरं, दिसतोय आत्मा पार...
नवरत्नाचा हारं, संबू फेकी गिरीजावरं वं...
बाई संबूच्या शिखरी, दवणा खात्यात पाखरं...
संबूची गिरीजा नारं, टाकी मुंगीला साखरं वं...
महादेवाच्या वाटेनं हायत, हायत खारकाचे घोसं वं,
कावड्याला एकादसं वं... धुरपतामाय

शिखर शिंगणापूरच्या चैत्राची यात्रा भरल्यानंतरच धुरपतामायच्या यात्रेला सुरुवात होते. राज्यात देवी, देवतांच्या तशा अनेक ठिकाणच्या इतर यात्राही या कालावधीत सुरू असतात, परंतु धुरपतामायच्या परंपरेत केवळ शिंगणापूरच्या यात्रेची नाळ जोडली जाते. त्यामुळे येथील अनेक वर्णन गाण्यातून येतात. विशेषतः चैत्राच्या द्वादशीला नाचणाऱ्या तेल्याचा

कावडीचा, तिथल्या मुंगी घाटाचा, दवण्याचा वेळोवेळी उल्लेख येतो.

**तेल्याच्या कावडीला हायतं, तांबियाचे घडं,**
**धाव धाव महादेवा, मुंगी घाट हा उघड गं....**
**बाई तेल्याच्या कावडं, मुंगी घाटाला तटली,**
**गिरीजा संबूची उठली, डाव्या हातानं लोटली वं...**
**बाई संबू देव म्हणी, गिरीजा नंदीचाही केला,**
**गेले होते माहेराला, निरव वांगीत राहिला वं...**
**गोड मोटचं वं पाणी, शिंगणापूरीच्या तळ्याला**
**गिरीजा बोलती माळ्याला, दवणा आलाय कळ्याला वं...**
**बाई संबू म्हणू संबू हाका मारीतेत वं, धुरपतामाय...**

शंभू महादेवाला म्हणजे संभाला सात लेकी असून त्यात पोचीमाय, महाकाली यांना आपल्या ठिकाणावर कसे बोलवले जाते, त्याची एक सुंदर रचना देवकरीण म्हणतात. संभाला म्हणजेच शिवाला 'सात लेकी' या विषयावरील मूळ गाणे शाक्तांच्या संदर्भातील अनेक बाबींचा उलगडा करणारे आहे. काळाच्या ओघात या गाण्याच्या केवळ काही ओळी उरल्या आहेत.

**संभाला सात लेकी,**
**माय मजे देवंय बाई गं...**
**पोचीमायला बोलविलं,**
**माय मजे देवंय बाई गं...**
**माय राहतूस कोण्या भागी?**
**मी राहतो तुमच्याच भागी, माय मजे...**
**महाकालीला बोलविलं,**
**माय मजे देवंय बाई गं...**
**माय राहतूस कोण्या भागी...**

धुरपतामायची गाणी ही प्रामुख्याने मराठवाड्यातील नांदेड, परभणी, जालना, लातूर, औरंगाबाद या पट्ट्यात सर्वाधिक असली तरी ती दलित, बहुजन समाजात महिला-पुरुषांकडून सर्वाधिक म्हटली जातात. विशेष

म्हणजे, प्रत्येक जिल्ह्यातील बोलीभाषा आणि तिच्या विविध छटा, त्या गाण्यातून उमटताना दिसतात. भटक्या विमुक्त आणि बंजारा समाजातील भाषेचा प्रभाव आणि ती लय या गाण्यांमध्ये वेळोवेळी दिसून येते.

नांदेड, लातूर जिल्ह्यातील भटक्या विमुक्त समाजातील भगिनी आपल्या विशिष्ट तालावर धुरपतामायची गाणी म्हणतात. त्या गाण्यातील अनेक शब्दांचे प्रतिबिंब त्यांच्या त्या गाण्यातून उमटते. हे गाणे ऐकताना विशिष्ट लय आणि तालात म्हटले जात असल्याने त्याचे एक वेगळे सौंदर्य त्यातून अनुभवयाला मिळते, तेलंगणा, आंध्र प्रदेशच्या सीमावर्ती भागात अशा प्रकारची खूप गाणी ऐकायला मिळतात. त्यातील एक गाणे असे-

**पहिलं माझं दंडवतं, मारवती आमीड्याला,**
**उजडबयाच्या वाड्याला, धुरपताबाई...**
**हातहात मी जोडीतो, घरदारायातूनी,**
**मला पावं चांद्यातूनी, धुरपताबाई...**
**हातहात मी जोडीतो कोपरायापासूनी,**
**आली रथातं बसूनी, धुरपताबाई...**
**हातहात जोडीतो, मनगटायापासूनं,**
**आली सवळं नेसूनी, धुरपताबाई...**
**हात-हात जोडीतो, घरदारायातूनी,**
**मला पावं चांद्यातूनी, धुरपताबाई...**

## याडीधुरपता, जोतीबा

बंजारा समाजात मरिआईला सर्वांत मोठे स्थान आहे. तिला बंजारा समाज हा 'याडी' म्हणतो. मरिआईच्या नावाने म्हणजेच भूमातेच्या नावाने 'याडी मरिअम्मा' हे स्तवन या समाजाने हजारो वर्षांपासून जतन करून ठेवलेले असून आजही ते प्रत्येक कार्याच्या सुरुवातीला समूहाने म्हटले जाते.

हीच बंजारा म्हणजे लमाणीन असलेल्या महिलेला देवी तुमचा गुरू कोण, असा सवाल एका गाण्यातून केला जातो. या गाण्यातून बंजारा समाजातील भगिनी म्हणजेच लमाणीनं हिचे वैभव सांगत त्यांची नाळ ही

थेट बळीराजा आणि त्यांच्या नऊ खंडकरी असलेल्या जोतिबांपर्यंत जाऊन पोहोचते. बंजारा समाजात मरिआईला याडी, याडी मरिअम्मा म्हणतात. तिचे सर्वात जुने स्तवन बंजारा समाजात प्रत्येक कार्याच्या सुरुवातीला म्हटले जाते. त्यावर मागील पोतराज-देवकरीण प्रकरणात सविस्तर प्रकाश टाकण्यात आला आहे.

**माय तुमचा गुरू कोणं,**
**देवी तुमचा गुरूं कोणं,**
**जातीची लमाणीनं, त्येच्या लेंगीयाला सोनं...**
**लावीलं जोतिबानं...**
**माय तुमचा गुरू कोणं,**
**देवी गुरू तुमचा गुरूं कोणं,**
**जातीची लमाणीनं, त्येंच्या राऊळाला सोनं...**
**लावीलं जोतीबानं...**
**माय तुमचा गुरू कोणं,**
**देवी गुरू तुमचा गुरूं कोणं,**
**जातीची लमाणीनं,**
**त्येंच्या डिकमाळीला सोनं...**
**लावीलं जोतीबानं,**
**माय तुमचा गुरू कोणं,**
**देवी गुरू तुमचा गुरूं कोणं...**
**जातीची लमाणीनं, त्येंच्या पायरीला सोनं...**
**लावीलं जोतीबानं...**

## मारवती आणि धुरपतामाय

धुरपतामायच्या मौखिक परंपरेत ज्याप्रमाणे शिखर शिंगणापूरच्या शंभू महादेव आणि पार्वतीला सर्वाधिक स्थान आहे. तसेच (मरुत गणाच्या) मारुतीलाही मोठे स्थान आहे. 'हा मारुती म्हणजे हनुमान, बंजरंगबली हा नव्हे हे इथे लक्षात घेतले पाहिजे.' गावाच्या बाहेर चौरस्त्यावर, नदी, तलावांच्या काठावर ज्याप्रमाणे मरिआई, पोचेमाय, सप्तमाता आदींची

ठिकाणे असतात, तसेच प्रत्येक गावाच्या वेशीवर अथवा गावाच्या मुख्य प्रवेशद्वारावर मारुतीचे मंदिर असते. तो अंजनीचा पुत्र असला तरी तो मारवती, मारुती, बलभीम म्हणूनच त्याचा उल्लेख येतो.

धुरपतामायच्या मंदिराशेजारीही असेच एक मारुतीचे मंदिर आहे. रामपुरीतील भागामायची, येळेगावच्या रुकमामायची समाधीही मारुती मंदिराच्या समोर आहे, तशी इतर देवकरीणच्या असून मारुतीचे आणि धुरपतामायच्या परंपरेत एक अतूट नाते आहे. धुरपतामाय ही मारुतीची बहीण आहे म्हणून तसा उल्लेख गाण्यातून येतो.

**मारवतीच्या पारावरी, पिवळ्या पातळाची कोण?**
**मारवतीची बहीण, धुरपताबाई...**
**मारवतीच्या पारावरी, कशी ओळखू धुरपताला,**
**पिवळी रेघं कपाळाला, धुरपताबाई...**
**मारवतीच्या पारावरी, कोणं केलं वरमाई,**
**धुरपताची बंधूबाई, धुरपताबाई...**
**मारवतीच्या पारावरी, पिवळ्या पातळाची कोणं,**
**मारवतीची बहीणं, धुरपताबाई...**

'मारवतीच्या जन्माची कथाही धुरपतामायच्या मौखिक परंपरेत दिसून येते. परभणी जिल्ह्यातील जलसामाय देवकरीण यांनी ही जन्माची कथा एका गाण्यात म्हणून त्याची उकल केली. गावाबाहेरील चौरस्त्यावर असलेल्या देवी आणि त्यासोबत मारुतीला शेंदूर लावला जातो, त्याला बलभीम या नावाने ओळखले जाते, असा या गाण्यात उल्लेख येतो'

**बाई बीनं पुरुषाचा,**
**पुत्रं आंजनीला झाला,**
**देवं मव्हा मारवती,**
**सुरव्या गिळाई चालला वं, धुरपतामाय**
**बाई बीनं पुरुषाचा,**
**पुत्रं आंजनीचा खरा.**
**देवा मह्या मारवतीला,**

सुरव्या कापे थरथरा वं, धुरपतामाय
बाई बारा वरसं तपं,
तपं केला अंजानं माईनं,
देव मह्या मारवतीचं,
पिंड आणीलाय घारीनं वं...
बाई बारा वरसं तपं,
तपं आंजणानं केलं,
देवं महे मारवती,
रत्नं तिला सापडलं वं, धुरपतामाय
बाई येशीच्या बाहेरी,
बंगला बांधिला दुरुस्त,
बाई महे मारवती,
बीनं नारीचे पुरुष वं, धुरपतामाय
बाई येशीच्या बाहेरी,
बंगला बत्तीस खांबाचा,
बाई मह्या मारवती,
शिष्या नांदतंय रामाचा वं, धुरपतामाय
बाई येशीच्या बाहेरी वं,
मारवती, मारवती म्हणीतेत सारा गावं,
अंगी शेंदराचा डावं,
बलभीम त्याचं नावं गं, धुरपतामाय...

मारवती हा बंधू भाऊ आहे. म्हणून धुरपतामायला त्याच्या पारावर पिवळ्या पातळाचा शेज चढवला जातो. तिला ओळखण्यासाठी विशिष्ट अशी खूण असते ती पाहून तिला ओळखता येते. अशा आशयाची असंख्य गाणी मारुतीच्या नावाने देवकरीण म्हणत असतात.

मारवती बंधवाला, दोन्ही हाताचा काय मुजरा,
माता माझे माय...
मारवतीच्या पारावरी, हिरव्या पातळाची कोण,
माहे बहीण रुकमामाय, माता माझे माय...

**मारवतीची काय बहीण, माता माझे माय...**
**बेजार केलाय काय दोहींनं, माता माझे माय...**
**मारवतीच्या पारावरी, हिरव्या पातळाची घडी,**
**माय मही रुकमामाय, देवी माझी रुकमामाय**
**बया नेसली संध्याकाळी, माता माझे माय...**

यासोबत मारवती आणि रुकमामायवरील अनेक गाणी या परंपरेत सापडतात. गाण्यातील अर्थ काही प्रमाणात सारखा असला तरी ती म्हणताना त्यातील वेगळपण लक्षात येते. विविध प्रकारच्या चालींवर ही गाणी ऐकताना त्यातील गांभीर्य पुन्हा अधोरेखित होते.

चांद्याच्या धुरपतामायची गोडवे गाणारी असंख्य गाणी असली तरी या गाण्यातून धुरपतामायला मानवी रूप देणारी, तिची काळजी घेणारी गाणीही तितकीच आहेत. ती ज्या बाजेवर बसणार आहे, तिचे सुंब्र, गातं हे सर्व काही लिंबोणीचे असून ते तिच्याप्रमाणेच नाजूक आहे. म्हणून धुरपतामायला या गाण्यातून तिला पाय टाकताना, बसताना सावधपणे, हळुवारपणे ते टाक अशी विनवणी करतात.

**चांद्याच्या धुरपताचे,**
**हिचे लिंबोणीचे ठायं**
**हळूच टाकं पायं गं, धुरपतामाय**
**चांद्याच्या धुरपताचे,**
**हिचे लिंबोणीचे सुंबं**
**हळूच टाकं अंगं गं, धुरपतामाय**
**चांद्याच्या धुरपताचे,**
**हिचे लिंबोणीचे गातं**
**हळूचं टाकं हातं गं, धुरपतामाय**

धुरपतामाय ही रागावते, आपल्यावर शिरजोर होते. परंतु ती शिरजोर झाल्यास माझ्या आयुष्याचा घोर निर्माण होतो, त्यामुळे तिला अशी शिरजोर होऊ नको, म्हणून विनंती केली जाते. विशेष म्हणजे यात धुरपतामायला विनंती करताना देवकरीण यांना आपल्या दूरवरून आलेल्या गावी जायचे

असते, त्यासाठी एक प्रकारे ती त्यांच्यासोबत पाठराखण करत जाते आणि तिला गाडीवान देतो, असे वचन देण्याची रचनाही सुंदर आहे.

**माय माझी धुरपता,**
**होऊ नको शिरजोरं**
**होऊ नको शिरजोरं,**
**माझ्या जलमाचा घोरं**
**माय माझी धुरपता,**
**तुला जाणं दूरवरं**
**तुला जाणं दूरवरं,**
**संगं देते गाडीवानं**

ज्या धुरपतामायला, निसर्गमातेला दुनिया थरथरा कापते, तिचा वेढा हा शिवेवर असतो, तिचे ते घर म्हणजे ही सर्व पृथ्वी आहे. तिच्या त्या घराची म्हणजे त्यातील न्हाणी, वटा सारवताना आपल्याला आभूषणासाठीच्या अनेक वस्तू कशा सापडतात, हे या गाण्यातून देवकरीण सांगतात.

थोडक्यात, पृथ्वीची, सृष्टीतील प्रत्येक गोष्टीचे जतन करताना, त्या सांभाळताना आम्हाला जे काही हवे असते ते कसे मिळते, सापडत असते हे यातून देवकरीण सांगत असतात, तर दुसरीकडे तिला लताबाई म्हणजेच तू निसर्गमाता असून तुझा शिवेवर, सृष्टीच्या सभोवताली तुझा वेढा आहे. तुला सगळी दुनिया, जग थरथरा कापत असते, असेही त्या सांगतात.

**आई गं लताबाई,**
**तुझा शीववरी वेढा.**
**शीववरी वेढा...**
**दुनिया कापं थरथरा...!!**
**आई गं लता बाई,**
**तुझं सारवितो घर,**
**सारवितो घरं,**

मला सापडलाय सरं...
आई गं लता बाई,
तुझी सारवितो न्हाणी,
सारवितो न्हाणी,
मला सापडले फणी...
आई गं लता बाई,
तुझी सारविते चूल,
सारविते चूलं,
मला सापडले फूलं...
आई गं लता बाई,
तुझा सारवितो वटा,
सारवितो वटा...
मला सापडल्या नोटा,
आई गं लता बाई,
तुझा शीववरी वेढा,
दुनिया कापं थरथरा...

धुरपतामायच्या मौखिक परंपरेचे आणखी एक वैशिष्ट्ये म्हणजे त्यांची गाणी ही जातीधर्माच्या कक्षा ओलांडून इतर प्रतीकांना आपल्या परंपरेत मानाचे स्थान देतात. नांदेड, लातूर, परभणी, औरंगाबाद हा पट्टा बराच काळ मुस्लीम राजवटीत राहिल्याने या काळात धुरपतामायच्या चळवळीवर मुस्लीम भक्तिपंथांचा बराच प्रभाव पडल्याचे दिसते.

माय माझ्या धुरपताचं,
हायतं सोन्याचे कंगण,
माय माझ्या धुरपतानं,
लुटीलेय तेलंगणं वं..
लुटीलेय तेलंगण..

वैदिकांविरोधात तळागाळातील समाजासोबत नाळ असलेल्या या मातृदेवतांच्या परंपरेला मुस्लीम भक्तिपंथाचे या काळात बरेच मोठे बळ

मिळालेले असावे. कारण नांदेड, परभणी जिल्ह्यातून चंद्रपूरच्या दिशेने निघालेल्या देवकरीणचा मेळा हा वाटेत भेटणाऱ्या प्रत्येक दर्गा, समाधीपुढेही डोके टेकवत असतो. एदलाबाद, अर्धापूर आदी ठिकाणी असलेल्या अनेक समाधींवर या परंपरेत गाणी म्हटली जातात. विशेष म्हणजे, वाशिम जिल्ह्यातील प्रसिद्ध असलेल्या सैलानी बाबांवर अनेक गाणी म्हटली जातात. या गाण्यात प्रत्येक ठिकाणी एक आपलेपणा आणि जिव्हाळा व्यक्त होतो.

सैलानी बाबाची सवारी म्हणजेच अंगात येणे कसे असते याची अत्यंत मनाला भेदणारी माहिती ते देतात. आपल्या गाण्यातून सैलानी बाबा आणि संपूर्ण त्या परिसराचे चित्र उभे करण्याची किमया देवकरणींच्या गाण्यातून दिसते. धुरपतामायच्या गाण्यातील 'धुरपतामाय' हे शेवटचे ध्रुवपद सैलानी बाबांच्या गाण्यातही येते.

चंद्रपूरला येण्यासाठी धुरपतामाय आपल्याला बोलावणे धाडते तसेच सैलानी बाबाही या देवकरीणींना लिंबू पाठवून बोलवण्याचा निरोप देतात. या गाण्यातील एक महत्त्वाची ओळ म्हणजे आपला सैलानी बाबा हा 'नाही कुणाच्या देव्हारी' असे सांगत देवकरीण या एकाच वेळी या भक्तीपरंपरेशी आपली नाळ जोडताना दिसतात.

**बाई हासेनं-हुसेनं,**
**डोल्याच्या महिन्यातं**
**बीनं बोलं सनईतं, गं.. धुरपतामाय...**
**माझ्या सैलानी बाबा,**
**हायतं चिचाच्या झाडीतं,**
**हायतं चिचाच्या झाडीतं..**
**गल्य जाऊ द्या गाडीतं, गं.. धुरपतामाय...**
**बाई नवसं बोलले,**
**काय नवसाची बाबदं**
**माझ्या सैलानी बाबाच्या,**
**डोल्या लाविलं कागदं गं, धुरपतामाय...**
**बाई पाऊसं पडतं,**

पिपळगाव राणीवणी,
माझ्या सैलानी बाबाची,
नाही भिजली उदानी वं, धुरपतामाय...
गुरूवारी, शुकीरवारी,
मला न्याह्याचं दुधातं
माझ्या सैलानी बाबाच्या,
हजऱ्या घियाला जायाचं वं..धुरपतामाय...
शुकीरवारी, गुरूवारी,
हायमी कामाच्या राड्यातं
हाय मी कामाच्या राड्यातं...
माझ्या सैलानी बाबाचं,
लिंबू आलयं वाड्यातं वं, धुरपतामाय
माझ्या सैलानी बाबाची,
ह्याची न्यादं कवा केली
हलग्या लावून दर्ग्या नेवी वं.. धुरपतामाय..
माझ्या सैलानी बाबाची,
नाही कुणाच्या देव्हारी
नाही कुणाच्या देव्हारी...
माझ्या सैलानी बाबाची,
अंगी नाचती सवारी वं, धुरपतामाय...

## बारडची पोचूमाय, चांद्याची देवी

चांद्याच्या धुरपतामायचे दुसरे मूळ ठाणं म्हणून नांदेड जिल्ह्यातील बारडला समजले जाते. चंद्रपूरला जाऊन आल्यानंतर बारडला देवकरीण जातात. बारडच्या पोचूमायचे दर्शन घेत तिची पूजा करतात. दगडाची चूल मांडून त्यावर केलेला नैवेद्य तिला दाखवतात.

बारडच्या पोचूमायवर धुरपतामायच्या मौखिक परंपरेतील गाणी वेगळी करता येत नाहीत. त्यांची एकमेकांशी नाळ जुळलेली आहे. बारड आणि चंद्रपूरची माय ही आणि आपली चांद्याची देवी असल्याची भावना देवकरीण व्यक्त करतात.

बारडाच्या पटांगणात,
एवढी विठामाय आली
एवढी विठामाय आली,
आरतीला निवदी देली वं..
बारडं-चंद्रापूरं दोन्ही महोजाचे गावं..
ज्याच्या मनामधी भावं,
त्यायनं चांदियाला जावं गं...

देवकरीण म्हणत असलेल्या अशा प्रकारच्या असंख्य गाण्यांमध्ये बारड आणि चंद्रपूरचे उल्लेख येत असतात. तर दुसरीकडे या चांद्याच्या देवीवर भक्तांची अगाध श्रद्धा आहे.

पोचीमाय असलेले गाव हे चंद्रपूरप्रमाणेच ते महोजाचे म्हणजेच देवीचे ठाणं असलेले गाव असल्याचे देवकरीण आपल्या गाण्यातून म्हणतात. 'धुरपतामायच्या मौखिक परंपरेत माहूरच्या रेणुकापेक्षा अधिक उल्लेख हा बारडच्या पोचीमायचा येतो. म्हणून तिला चांद्याची देवी म्हटले जाते.'

बाई मी निघाले बारडंला गं,
चांद्याच्या देवीला..
चांद्याच्या देवीला..
हळदं, कुंकू घेऊन तिला,
हळदं कुंकू वाहू तिला
लिंब, नारळं वाहू तिलाय...
बाई मी निघाले गं बारडला...
चोळी पातळं घेऊ तिला,
चोळी पातळ वाहू तिला
बाई मी निघाले बारडला
चांद्याच्या देवीला
खारीकं-खोबरं, लिंबं नारळं घेऊ तिला...

## राजामायवरील गाणी

तळेगावची राजामाय, रामपुरीची भागामाय, दैठण्याची विठामाय, शेलगावची यमुनामाय, देगलूरची म्हादामाय, नरळद-इरळदची देवयमाय या देवकरीणवरील मौखिक गाणी, आरती, कवने हे धुरपतामायच्या मातृपरंपरेचे सर्वांत मोठे शक्तिस्थान आहे. अशिक्षित समाजातील महिलांनी पिढ्यान्‌पिढ्या ते जतन करून दुसऱ्या पिढीपर्यंत पोहोचवल्याने त्यातील अनेक गाणी लक्ष वेधून घेतात. तळेगावच्या राजामायवर आणि तिच्या गावाची महती गाणारी अनेक गाणी आजही म्हटली जातात. त्यात राजामायला पातळ, लिंबू तिच्या कपाळावर भंडारा कसा शोभून दिसतो याचे वर्णनही लक्ष वेधून घेते.

**तळेगावच्या देवकरणीला..**
**भंडार शोभे तुला माय, राजामायला..**
**भंडार शोभे तुला की, माय धुरपतमायला**
**तळेगावच्या राजामायला,**
**तळेगावच्या राजामायला,**
**भंडार शोभे तुला की, माय राजामायला**
**तळेगावच्या देवकरणीला..**
**पातळ शोभे तुला की माय.. धुरपतमायला...**
**तळेगावच्या देवकरणीला..**
**कंठी शोभे तुला की, माय धुरपतमायला..**
**तळेगावच्या राजामायला...**
**लिंबू शोभे तुला की माय धुरपतमायला...**

चैत्राच्या यात्रेपूर्वी तळेगावमध्ये योगिनी, देवकरीण एकत्र जमत असून तिथून त्याचा मोठा जथ्था चंद्रपूरच्या दिशेने निघायचा. हा कालावधी सुमारे सव्वाशे ते दीडशे वर्षांपर्यंतचा कालावधी असावा. त्या वेळी राजामायसोबत असंख्य योगिनी चंद्रपूरला पायी जात असत. या यात्रेचे एकूण नेतृत्वही निश्चितच राजामाय करत असत. चंद्रपुराच्या दिशेने एकदा राजामायची गाडी निघाली की, तिला कोणी रोखण्याची त्या वेळी हिंमत

करत नसे, असा विश्वास देवकरीण आपल्या गाण्यातून व्यक्त करतात.

**आया बायांनो भरलाय माय वाडा,**
**हाती घेऊनी नारळाचा पुडा.**
**राजामायची गाडी दिसते मला छानं,**
**चालंली डोंगरानं तिला रोकीणारं कोण?**
**आया बायांनो...**
**हाती घेऊनी खणाचा पुडा.**
**राजामायची गाडी दिसते मला छानं, चालंली...**
**आया बायानों भरलाय माझा वाडा,**
**हाती घेऊनी पातळाचा पुडा, कुंकवाचा पुडा.**
**हाती घेऊनी वटीचा पुडा.**

देवकरीण, योगिनी असलेल्या राजामायच्या तळेगाव या नगरात भंडाराची, म्हणजेच ज्ञान, तत्त्वज्ञानाची खोली असून मातृपरंपरेचा विसर पडताच तिला धुरपतामाय ही झोपेतून उठवते. हे तळेगाव म्हणजे काशी खंडाचे, भंडाराचे म्हणजे ज्ञानाचे केंद्र असावे. ते त्या कालावधीदरम्यान मातृपरंपरेच्या चळवळीचे केंद्र असल्याचेही त्या सांगत असतात. यावर तळेगावची राजामाय या प्रकरणात सविस्तर दखल घेतली गेली आहे.

**तळेगाव नगरात, हाये भंडाराची खोली..**
**हाये भंडाराची खोली...**
**राजामाय झोपी गेली, धुरपतमायनं उठवली..**
**तळेगाव नगरात, शिशी नामा घाले सडा..**
**एवढं राजामायचा वाडा..**
**तळेगाव नगरात, हायं आगनीचं भांडं..**
**माय माझ्या राजामायचं, पतिव्रता नावं दडं..**
**तळेगाव नगरातं, वडं गोटुल्या पानाचा..**
**गुरू मोकळ्या मनाचे..**
**माय माझ्या राजामायचे, गुरू मोकळ्या मनाचे..**
**तळेगाव नगरातं, चला की हो पहा जाऊ..**

काशी खंडाचे हे बूडं, नारळातं दूध गोडं..
तळेगावं नगरात, शेषा भरले जमीनं..
माय निघावं मातूनं, देहू निघावं मातूनं..
धुरपता-राजामायचं, देहू निघावं मातूनं...
तळेगावं नगरात, साती सेमुंद्रा झुकिले,
धुरपता-राजामायंनं, एका हुरूपं लाविले..
तळेगाव नगरातं, माझ्या गुरूची हो घोडी..
दानं द्यावं हो मनुक्याचा, उमरीमाय तालुक्याचा..

'तळेगाव हे जसे राजामायच्या परंपरेमुळे भंडाऱ्याचे आगर आहे तसेच ते गुरूघर आहे. तिच्यामुळे धुरपतामायचे देवघरही तळेगावात पाहायला, अनुभव घ्यायला मिळते. हे गुरूघर थोर म्हणजेच मोठे असल्याचेही गाण्यातून म्हटले जाते.'

तळेगाव नगरातं,
हाय आंब्याचं आगरं.
हाय आंब्याचं आगरं, राजामाईचं नगरं...
तळेगाव नगरात,
गुरूघर आहे थोरं.
त्याच्या कवाडावरं मोरं ,
दाखविले देवघरं.
धुरपता-राजामायनं,
दाखविले देवघरं.
तळेगावं नगरातं...

## यमुनामायवरील गाणी

नांदेड जिल्ह्यातील उमरी तालुक्याच्या पश्चिमेला यमुनामायचे मूळ गाव शेलगाव आहे. गावाची वस्ती वाढल्याने नव्या आबादीनंतर मूळ गाव तसेच राहिले आहे. त्यामुळे जुन्या शेलगावमध्ये कोळी, भोई आणि मांग समाजाच्या वस्तीशेजारी मूळ यमुनामायची समाधी आहे. ही समाधी

म्हणजे धुरपतामायच्या परंपरेतील एक मानाचे स्थान आहे. चंद्रपूरला येणारा बहुतेक भाविक हा शेलगावला जाऊन यमुनामायच्या समाधीचे दर्शन घेतो. सध्या यमुनामायचा वारसा त्यांच्या यमुनामाय नावाच्या वंशज चालवतात. चंद्रपूरला घोड्यावर बसून येण्याची परंपरा या यमुनामायने कायम ठेवली आहे. चैत्राच्या पौर्णिमेला धुरपतामायला शेंदूर लावण्याचा विधी होतो. त्या वेळी शेंदराचा मान हा यमुनामायला दिला जातो.

मूळ यमुनामायच्या काळात त्यांच्याकडे भक्तांचे, शिष्यांचे फार मोठे वैभव असावे, असे त्यांच्यावरील अनेक गाण्यातून दिसून येते. ती आपल्या सोबतीच्या प्रत्येकांच्या सुखदुःखाची जाणीव ठेवते, काळजी घेते. त्यांच्या संकटाला धावून येते. मात्र तिचे रक्षण करणारा तिचा फौजदार म्हणजेच पोतराज हा कायम तिच्या मागे उभा असतो. तिच्याकडे आपल्या भक्तांची मोठी गर्दी दाटून असते, अशा प्रकारच्या अनेक आठवणी देवकरीण आपल्या गाण्यातून सांगत असतात. यमुनामायला चैत्राच्या यात्रेतच नव्हे तर आषाढ, श्रावणातही तिची आठवण काढत असतात. तुझी आमच्यावर नजर असू दे, अशी आळवणी ते करताना दिसतात.

**माझ्या जीवाला हूर हूर,**
**गावापासून शेलगाव दूर**
**महिनेमागे महिने निघं,**
**महिन्याची नाही यादं**
**पाडवा जेवून निघायाचं, बाई गं,**
**कानामंधी यमुनामायचा वादं.**
**शेलगावची यमुनाबाई,**
**भल्या भल्यांना कळेना,**
**पाडवा जेवूनं आली बाई गं,**
**नाव तिचं यमुनाबाई**
**चंद्रापूरला जायाला,**
**भक्त करीतात घाई.**
**चलत गेल्यावर कळंत बाई,**
**कुठे यमुनाबाई,**

**आली आली यमुनाबाई,**
**शेंदराला होती कुठं,**
**वरदेला घेते भेटं,**
**पुन्हा डोळे पुसीतं भक्त उठं.**
**बारा कोसाचा माय किल्ला,**
**दोन येशी केल्या त्याला**
**यमुनामायचा घोडा आला.**
**बाई गं कुणी फौजदार सौरक्षणाला.**
**एव्हढं चंद्रपुरातं,**
**गर्दी कशापायी झाली,**
**वाट सोडा, माझी आली आई,**
**नाव तिचं यमुनाबाई.**

शेलगावची यमुनामाय ही आपल्या भक्तांवर नजर ठेवते. ती चंद्रपूरच्या वेशीवर आल्यानंतर आपल्या भक्ताला हाक देते. आणि त्या वेळी आपण आल्याची खूण सांगण्यासाठी लिंबू दाखवून यात्रेची माहितीही देत असते. यमुनामायच्या भेटीसाठी देवकरीण या आतूर असतात. आपली आई, बहीण, मैत्रीण आणि सर्व काही असलेली यमुनामाय आपल्याला भेटावे आणि तिला आपण कवटाळून घ्यावे, अशी त्यांची इच्छा असते. तर दुसरीकडे आपली ही यमुनामाय साधीसुधी नव्हे, तर ती एक प्रकारे इस्त्याचा, अग्नीचा इंगूळ असावी अशी आहे, असेही ते सांगत तिचे वर्णन करत असतात.

शेलगावात यमुनामायच्या भक्तांचा मेळा जमत, भोजनावळीचा मोठा कार्यक्रमही होत असत. आलेल्या भक्तांसाठी सव्वाखंडीचे पुरण लावले जायचे. या गाण्यावरून त्या वेळी यमुनामाय यांच्याकडे खूप मोठ्या प्रमाणात भक्तांचा राबता होता असे दिसते.

**शेलगाव नगरातं,**
**सवा खंडीचा पुरणं**
**लावा चांदीचे दुरणं,**
**यं धुरपता बाई**

अन पतीवरता भोजनं,
यं धुरपता बाई...

यमुनामायची समाधी ही शेलगावात आहे. विठामायच्या समाधीप्रमाणे यमुनामायच्या समाधीवरील गाणी खूप कमी मिळतात. त्यातील काही वेगळे वैशिष्ट्ये असे की, आपले भक्त समाधीत चिरनिद्रा घेतलेल्या यमुनामायला आपल्या सुख-दुःखाचे कागद पाठवितात. समाधीच्या यमुनामायला झोपेतून उठवतात. तिच्या समाधीजवळ राळ आणि कापराचा वास दरवळत असतो, तो आपल्याला बोलवत असतो, असे त्या आपल्या गाण्यातून सांगतात.

**शेलगाव नगरातं,**
**काय नव्वलंच झालं,**
**समाधीची यमुनामाय गं बाई,**
**सत्य निघालेत देव**
**शेलगाव नगरात हायं,**
**भंडाराची खोली**
**समाधीची यमुनामाय गं बाई,**
**काशी तिथं झोपी गेली**
**सुखा-दुखाचे कागदं,**
**शेलगावाला पाठवा**
**राळा, कापराचा वास,**
**आता पदरी सुटला...**
**समाधीच्या यमुनामायला गं बाई,**
**जाऊन झोपेत उठवा...**

यमुनामायवरील बहुतांश गाणी ही यमुनामाय आणि तिच्या भक्तांमधील संवाद स्पष्ट करतात. बहुतेक गाण्यातील काही भाग हा यमुनामाय यांच्या काळातील असला तरी नंतर बरेचसे बदल झालेले दिसतात. त्यात संवादाचा सूर मात्र कायम दिसतो. चंद्रपूरला जाताना आपल्या यमुनामायचा सहवास, तिच्यासोबत जवळून पाऊल टाकीत जाणे हा देवकरीण

यांच्यासाठी सर्वांत मोठा आनंदाचा क्षण. तिचा नुसता पदर अंगाला लागल्यानंतर आपल्याला मोठा लाभ होतो, अशी भावना त्या व्यक्त करतात. इतकेच नव्हे, तर चंद्रपूरच्या वाटेवर निघाल्यास दुसऱ्या दिवसाचा मुकाम कुठला असेल, याची विचारणा करत असतात.

**माय मझे यमुनाबाई,**
**उद्या मुक्काम कुठला?**
**माय मझे पतीव्रता बाई,**
**जरी सांगं मरीआईला**
**येगं येगं मरुबाई,**
**एवढा उशिर का गं केला,**
**कोकणी लांब पल्ला गं बाई,**
**लोटीत आलो झाड-पाला.**
**माय मझ्या यमुनामायच्या,**
**पदर गरतीचा चांगला,**
**मझ्या अंगाला लागला,**
**मला बहू लाभ झाला.**
**दोन्ही हात मी जोडीतो नं,**
**आता मनगटापासून,**
**चंद्रापूरचे ते माय वं,**
**येवं शिखर सोडूनं.**
**आता नवस बोललो,**
**मरुबाईला पातळं,**
**आकाड-श्रावण गं बाई,**
**नजरी राहू दे शीतळ.**

यमुनामायवरील गाण्यातून केवळ भक्त आणि गुरू यांचेच नव्हे, तर आई, बहीण, मुलगी आदींचे नातेसंबंध त्यातील प्रेम, वात्सल्य, जिव्हाळा वेळोवेळी स्पष्ट होतो. एखाद्या आईला भेटण्यासाठी जी उत्सुकता लागते तशीच उत्सुकता देवकरीण यांना आपल्या यमुनामायच्या भेटीची लागलेली असते. तिला कधी एकदाची भेटून कवटाळून घेण्याची उत्कंठा लागलेली

असते. इतकेच नव्हे तर आपले काही चुकले तर तू माफ कर, अशी विनवणीही करतात. तिला आपली गुरू, आई, बहीण आदी सर्व रुपात पाहून तिचे स्तवन करत, तिचे गोडवे गात असतात.

**माय मझी यमुनामाय, हाय जगावून जबरं,**
**उभी एका भेट पायावर, ठेवते भक्ताला नजरं.**
**माय मझी यमुनामाय, उभा राहिले येशीला,**
**हातं जोडी हनुमंताच्या भेटीला.**
**अंजानीच्या बाळा, यश देवं भंडाराला,**
**माय मझी यमुनामाय, म्हणी गं बाई यश देवं भंडाराला.**
**माय मझी यमुनामाय, उभी राहिले येशीला,**
**हाक मारी भक्ताला, भंडार लिंबू देतो तुला.**
**माय मझी यमुनामाय, मला वाटते येवावं,**
**अशी भरारी मारावी, हारणं कवटाळून धरावं.**
**माय मझी यमुनामाय, येतो म्हणता येता व्हयंना,**
**आली हेतू करमना वं बाई, काशी मनातून जाईना.**
**माय मझे यमुनामाय, तुझा जरीचा पदरं,**
**येड्या मुक्याचा बाजार वं बाई, चुकल्यालं माफ करं.**
**माय मझ्या धुरपतामायला, म्हणून नका वंगळं,**
**रूपं तिचं इकराळं, गं बाई मुलकांची आगजाळं,**
**माय मझी यमुनाबाई वं बाई, हाय इस्त्याचा इंगळं.**

## रुकमामायवरील गाणी

नांदेड जिल्ह्यातील भोकर रोडवर बारडजवळ असलेल्या येळेगावातील रुकमामाय या देवकरीणचेही एक वेगळे स्थान धुरपतामायच्या परंपरेत आहे. नांदेड जिल्ह्यातील त्या एक प्रभावी देवकरीण होत्या. त्यांच्यावरही भक्तांकडून शेकडो गाणी म्हटली जातात.

येळेगाव हे रुकमामायचे गुरूघर म्हणून भक्तांमध्ये प्रसिद्ध आहे. मात्र रुकमामायचे मूळ गाव बारसगाव असून त्याला महोजाचे गावही भक्त म्हणतात. 'ज्यांच्या मनात भाव, त्यांनी येळेगावला जावं' असेही त्यात

म्हणतात. रुकमामाय आपल्या भक्तांना ज्ञानाची शिकवण देते, पण त्यांच्या गावाची पाऊलवाट म्हणजेच तिची ताकद कमी असतानाही ती आपल्या चळवळीचा गाडा, रथ हा अत्यंत चिंचोळ्या नाजूकशा वाटेने पुढे नेत असते. तिची ही मातृदेवतेची चळवळ संथगतीने सुरू असून तिला आपल्या भक्तांचे मोठे बळ मिळाले असल्याचे देवकरीण आपल्या गाण्यातून सांगतात.

**येळेगाव उमाटाला,**
**देवी माझ्या रुकमामायच्या,**
**येणं गुरूच्या मठाला,**
**येळेगाव गावाची गं वाट,**
**हाय केसाहून बारीक.**
**माय माझ्या रुकमामायची,**
**रथ नेण्याची तारीफ,**
**येळेगाव नगरात,**
**जातो म्हणताना व्हयना.**
**देवी माझ्या रुकमामायची,**
**आली हेतू करमना,**
**येळेगाव नगरातं गुरू घर हाय छान,**
**त्यायने शिकविले ग्यान.**
**येळेगाव नगरात,**
**कशा वैदवाणी,**
**माय माझ्या सागरमाईला,**
**पाजावा भंडाराचं पाणी.**
**येळेगाव, बारसगाव,**
**दोन्ही महोजाचे गावं,**
**ज्यांच्या मनामध्ये भाव,**
**त्यायनी येळेगावा जावं.**
**रुकमामाय-धुरपता,**
**दोन्ही येवजाच्या बाया,**

**माय माझी रुकमामाय,**
**आली सती भाव पाया.**

धुरपतामायच्या परंपरेतील प्रत्येक देवकरणींचे सौंदर्य, त्यांचे सर्वसामान्यांप्रमाणे जगणे, त्यांचे राहणीमान आणि त्यांच्या दिनचर्यांची अनेक वर्णने गाण्यातून मिळतात. मातृपरंपरेच्या चळवळीसाठी आपले आयुष्य वाहून घेणाऱ्या देवकरणींच्या सौंदर्याची भूरळ पडायची. म्हणूनच नांदेड जिल्ह्यातील अगदी छोट्याशा गावातून चंद्रपुरात आलेल्या देवकरणींकडे चांद्यातील लोकं दंग होऊन पाहत असत.

**पिवळं पितांबर,**
**नकी पदराला हायतं,**
**चपराशी गं तिच्या संग,**
**माता माझे माय चांद्याच्या नारी दंगं,**
**माता माझे माय...**
**माय मह्या रुकमामायला,**
**देवी मह्या रुकमामायला,**
**मोती इंधन वाऱ्याला,**
**उभे पोलीस काय पहाऱ्यायाला.**
**माता माझे माय...**
**येळेगावच्या व्हमाला.**
**गावोगावचे भक्त येती,**
**स्वारीत भंडारे देती**
**माता माझे माय...**
**येळेगाव नगरात,**
**अब्दागीरिचा दाटवा**
**मानकारणीला काय उठवा,**
**माता माझे माय...**

देवकरणींनी आपल्या मातृदेवतांच्या परंपरेतून लोकांच्या आरोग्याचे रक्षण करण्याची चळवळही चालवली होती. शेतकरी, कष्टकरी आणि

त्यावेळच्या बलुतेदार,आलुतेदारांसाठी त्या एक प्रकारे वैद्यांचीही भूमिका बजावीत असत. त्यात सर्वच देवकरणींनी आपले आयुष्य वाहून घेतलेले दिसते. त्यांच्याकडून देण्यात येणारा भंडारा, लिंबू ही विविध प्रकारची औषधी गुणधर्म असल्याने अनेक आजारांमध्ये त्यांना त्याचा लाभ होत असे. नुसते भंडाऱ्याचे पाणी पाजले की, अनेक आजार दूर पळून जात. म्हणूनच एकदा रुकमामायच्या हातून हा भंडारा, लिंबू मिळाल्यानंतर आपल्या अंगातून सगळे रोग पळून जातात, आपल्यावरील संकटे दूर पळून जातात, ही भावना भक्तांमध्ये रुजलेली आहे. त्यामुळेच रुकमामाय या आपल्या वैदवाणी असल्याचे भक्त सांगतात.

**येळेगाव नगरात...**
**जातो म्हणताना व्हयंना**
**देवी माझ्या रुकमामायची,**
**आली हेतू करमना.**
**येळेगाव नगरात,**
**गुरू घर हाई छान,**
**त्यायने शिकवले ग्यान..**
**येळेगाव नगरात,**
**कसा वेद वैद्यवाणी,**
**देवी माझ्या सगरामायच्या,**
**पाजावा भंडाराचे पाणी.**

धुरपतामायच्या मौखिक परंपरेत अलीकडे मूळ गाण्यांमध्ये खूप मोठी सरमिसळ करण्यात आल्याचे दिसते. मूळ गाण्यातील एकदोन शब्द जोडून नव्याने गाणी म्हटली जातात. अनेकदा त्या गाण्यांमध्ये लय, त्यातील मूळ अर्थ हरवून जातो. केवळ तेच ते शब्द आणि ओळी म्हटल्या जातात. अनेकदा समर्पणाची भावनाही त्यात दिसत नाही. अलीकडे तर अत्यंत गोंगाट करून त्याचत्याच ओळीवर गाणे म्हणण्याचा प्रघात सुरू झाला असून त्यातही मूळ गाणे आणि त्यातील अर्थ हिरावून जाताना दिसतो.

**येळेगावाची हो चांदणी,**

आली माझ्या घरी पाव्हणी
भंडारानं गं शेजं भरी..
कुंकवानं गं शेजं भरी
माय माझे धुरपता..
एव्हढी इच्छा कर गं पुरी..
येळेगावाची हो चांदणी..
नारळानं ग शेजं भरी,
माय माझे रुकमामाई
एव्हढी ईच्छा कर पुरी...
बदामाणे गं शेजं भरी
येळेगावची चांदणी
कप्रणे शेजं भरी...
माय माझे सागरमाय
एव्हही इच्छा कर गं पुरी....
--
वाजली हलकी, अनं निघाली पालखी
बाई, बाई गोंडाच्या रानातं,
बाई, चांद्याच्या रानातं,
भागामायचे मंत्रं, राजामायचे मंत्रं
माझ्या फुका वं कानात
लहानपणी केलाय गुरू,
अन् आलंय अंगात नका वं धरू
हळदीने केली पिवळी, कंपाळाला मळवट
केसरी चुना, अन् लावते पानाच्या विड्यात
भागामायचे मंत्रं माझ्या फुका वं कानातं

धुरपतामायच्या परंपरेत जी काही मूळ गाणी आणि त्यातील मोजकेच वाक्य, शब्द काही गाण्यांमध्ये शिल्लक आहेत. त्यातील एकदोन गाण्यांतील वाक्यरचनांवरून धुरपतामायची मौखिक परंपरा ही किती उच्च कोटीची लोकपरंपरा निर्माण करणारी होती, हे दिसून येते. अनेक गाण्यांचा

काळाच्या ओघात असाच ऱ्हास झाला. धुरपतामायच्या या गाण्यांची कुठेही नोंद न झाल्याने परंपरेचे हे उच्च कोटीचे मूळ वैभव काळाच्या ओघात गडप झाले असले तरी त्यातील अनेक प्रतीकांतून, शिल्लक असलेल्या गाण्यातून त्या परंपरेचा आवाका लक्षात येतो.

**गुडीपाडव्याच्या दिवशी,**
**कापूर लाविते झेंड्याला.**
**जत्रा चालली, चांद्याला गं, धुरपतामाय**
**गडचांद्याच्या वाटानी,**
**लेवू नये जोडा, बुटं.**
**मायमाझ्या धुरपताचा,**
**रस्ता दिसतो धोपटं गं,**
**गडचांद्याच्या वाटानी,**
**आडवा लागतो दगडधोंडा.**
**माय माझ्या धुरपताच्या,**
**झाडा भंडाराचा लोटा गं.. धुरपतामाय**
**गडचांद्याच्या वाटानी,**
**वहिना पापाची वासना,**
**माय माझ्या धुरपता,**
**पतीवरताला सोसना गं.. धुरपतामाय**
**गडचांद्याच्या वाटानी,**
**जत्रा जाबून पळती,**
**म्होरी पोतराजं खेळती गं.. धुरपतामाय**
**गडचांद्याच्या वाटानी,**
**जत्रा ठरली पाणी, पाणी,**
**हौदं भरली दोन्ही, तीन्ही गं.. धुरपतामाय**
**गडचांद्याच्या वाटानी,**
**बारा हाल्याची दावणं,**
**तेरवा कटाळ्या सोडीला गं.. धुरपतामाय**

एकीकडे जगण्याचा संघर्ष प्रसंगी हालअपेष्टा आणि कायमची उपेक्षा सहन करून देवकरीण, पोतराज यांनी या परंपरेचे वैभव टिकवून ठेवलेले दिसते. 'पोतराज-देवकरीण यांना कायमच वैदिकांसोबत संघर्ष करावा लागल्याचेही अनेक गाण्यातून स्पष्टपणे दिसते. ही परंपरा अवैदिकांची येथील शूद्रातिशूद्रांची, बहुजनांची आणि विशेषतः कधी गावकुसाबाहेरील तर कधी गावकुसाच्या आतील महिलांनी जतन केलेली असून या परंपरेचा उलगडा करण्यासाठी धुरपतामायच्या परंपरेतील गाणी पुरेशी आहेत.'

**माय माझी धुरपता,**
**होऊ नको शिरंजोरं,**
**माझ्या जलमाचा घोरं,**
**माय माझी धुरपता,**
**तुला जाणं दूरवरं,**
**संगं देते गाडीवानं...**

**संदर्भ :**


१. उस्मानाबाद जिल्ह्यातील लोकदैवते : डॉ. नवनाथ शिंदे, पृ. २०, २१.
२. मराठीतील स्त्रीधन : डॉ. सरोजिनी बाबर, पृ. ६३, ६४, ६५.
३. सत्यशोधक माफुआं, एप्रिल-२०००, संपादक, शरद् पाटील, पृ. २९.
४. मराठीतील स्त्रियांची कविता : प्रभा गणोरकर, पृ. ६५.
५. देवयमायची गाणी : जलसामाय, थडी पिंपळगाव, जि. परभणी.
६. विठामायवरील गाणी : जलसामाय, थडी पिंपळगाव, जि. परभणी.
विमलबाई, दैठणा, ता. गंगाखेड.
७. चंद्रपूरच्या यात्रेतील गाणी : छाया देवकर, अहमदपूर, जि. लातूर.
बंडू देवकर, पाथरी, जि. परभणी.
दिपक देवकर आणि त्यांचे सहकारी, परभणी
८. पोतराजावरील गाणी : सुमनबाई कदम, सावळेश्वर, ता. कंधार, जि. नांदेड.
लक्ष्मण कांबळे, कोल्हे बोरगाव, ता. बिलोली जि. नांदेड.
कमलाकर ग्रूपवार, जिवती, जि. चंद्रपूर.
यादव देवकर, जिवती, जि. चंद्रपूर.
९. विशेष सहकार्य : संजय वैद्य, अभ्यासक, पर्यावरण तज्ज्ञ, चंद्रपूर.
चंद्रकांत वानखेडे, ज्येष्ठ साहित्यिक, नागपूर.

दिगंबर दळवी, संचालक, डीव्हीईटी, मुंबई.
सुनील वारे, आयआरएस, मुंबई.
सचिन गरुड, अभ्यासक, इस्लामपूर.
सरोजकुमार मिठारी, ज्येष्ठ अभ्यासक, वाई.
मधुकर भावे, ज्येष्ठ पत्रकार, मुंबई.
शाहजहान मगदूम, ज्येष्ठ पत्रकार, मुंबई.
विनोद राऊत, ज्येष्ठ पत्रकार, मुंबई.
राजेश मोरे, पत्रकार, मुंबई.
अमन कांबळे, ज्येष्ठ पत्रकार, नागपूर.
गोविंद तुपे, ज्येष्ठ पत्रकार, मुंबई.
लक्ष्मीकांत सुदामे, ज्येष्ठ पत्रकार, नागपूर.
जगदेश्वर संका, संगणक तज्ज्ञ, मुंबई.
विलासभाई जाधव, अभ्यासक, घाटकोपर, मुंबई.
रवींद्र सोनडवले, कॅमेरामन, चंद्रपूर.
नागेश दाचेवार, ज्येष्ठ पत्रकार, मुंबई.
आरतीमाय गंगोत्री, देवकरीण, चंद्रपूर.
नाना देवगाडे, सामाजिक कार्यकर्ते चंद्रपूर.
धर्मेश निकोसे, सामाजिक कार्यकर्ते चंद्रपूर.
गणेश चुंचूवार, चंद्रपूर.
प्रवीण यादव, विक्रोळी, मुंबई.
नयन कितांवडे, विक्रोळी, मुंबई.
माणिक कोकाटे, येरमाळा, जि. उस्मानाबाद.
ज्ञानोबा कांबळे, हंडरगुळी, जि. लातूर.
सुनील बोडके, विक्रोळी, मुंबई.

***



# ८

# अंगात येणे : नेणिवेचा आविष्कार

भारतात ज्या-ज्या ठिकाणी मातृदेवतांची परंपरा सुरू आहे, त्या-त्या ठिकाणी महिलांच्या अंगात येण्याचा प्रकार सर्रासपणे दिसून येतो. प्रामुख्याने देवी अंगात येणाऱ्या महिला व पुरुष या विशेषतः शूद्रातिशूद्र, आदिवासी आदी समाजातील असतात. त्यातही महिलांचे प्रमाण अधिक असते. धुरपतामायच्या परंपरेतही पोतराज, देवकर, देवकरीण यांच्या अंगात देवी येते. अंगात देवी येणे हा या परंपरेतील अत्यंत महत्त्वाचा आणि सन्मानाचा भाग असतो. याशिवाय वेगळी ओळख वा समाजमान्यता मिळत नाही. अंगात देवी येणाऱ्या देवकरीण, पोतराजांना धुरपतामायच्या

परंपरेत एक वेगळा सन्मान असतो. तो कधीही ढळू दिला जात नाही. हे वर्षानुवर्षे जपले जाते.

अंगात येणे हा प्रकार म्हणजे एखाद्या आध्यात्मिक, लौकिक गोष्टीशी समरस होणे. पूर्ण शरीर आणि मन एखाद्या विचारांशी तादात्म्य पावणे म्हणजेच ध्यान, तंद्री, स्थिती आदी अवस्थेत जाणे. बाह्यजगाशी त्याचे भान न राहणे, असा प्रकार हा असतो. हेच ध्यान, नृत्य, संगीत आणि लौकिक आनंदाच्या प्रक्रियेतही घडते. अशा प्रकारचे कृत्य अंतर्मन हे बाह्यमनाला भाग पाडते त्या वेळी असे अंगात येण्याचे प्रकार घडतात. यासाठी असंख्य उदाहरणे देता येतील.

देवी अंगात येणे या प्रकाराचा समाजशास्त्रीय दृष्टिकोणातून उलगडा होणे आवश्यक आहे, परंतु तो आपल्याकडे करता आला नाही. म्हणूनच एक मानसिक आजाराच्या पलीकडे त्याकडे पाहिले जात नाही. यासाठी शरद् पाटील यांनी दिलेल्या नेणिवेच्या तर्कशास्त्रावर याचा उलगडा होण्यास मदत मिळू शकते. एखादी देवी अंगात येताना शरीरात आणि मनात घडणाऱ्या क्रिया आणि त्यातून तयार होणारी मानसिकता, मेंदूत निर्माण झालेल्या संवेदना या महत्त्वाच्या असतात. याच काळात जागे होत असलेल्या सुप्त मनाचा आणि त्यातून झालेल्या क्रियांचा आपल्याकडे गांभीर्याने विचार केला गेल्याचे दिसत नाही. यामागे असलेल्या कारणांचा आणि विशेष म्हणजे त्यामागे असलेल्या नेणिवेचा उलगडा करता आला नाही. म्हणूनच अंगात येण्याच्या प्रकाराला कायम समाजात अंधश्रद्धा आणि चुकीच्या दृष्टिकोणातून पाहिले गेले. तो दृष्टिकोण बदलून त्याकडे समाजशास्त्रीय आणि मानसशास्त्रीय अंगाने बघणे त्यावर चर्चा होणे आवश्यक आहे.

उत्तर भारताचा काही अपवाद वगळता दक्षिण भारताच्या शेवटच्या टोकापर्यंत कोणत्याही राज्यात गेल्यास देवीची मंदिरे असलेल्या ठिकाणी प्रासंगिक काळात महिलांच्या अंगात येण्याचे प्रकार दिसून येतात. दलित, आदिवासी, भटके-विमुक्तसमाजात अंगात येण्याचे प्रकार अधिक असतात. अंगात येण्याचे प्रकार मुख्यतः या बहुजन समाजातील स्त्री-पुरुषांमध्येच का घडतात, याचा उलगडा झालेला दिसत नाही. या घटनेकडे कायमच अपराधपणाने आणि तुच्छतापूर्वक पाहिल्याने ही

परंपरा आपल्याकडे समजून घेता आली नाही. जगभरात मानसशास्त्रांच्या विविध शाखांमधून अंगात येण्याच्या प्रकारावर विविध दृष्टिकोणातून संशोधन झालेले दिसते. त्याचा काही आधार घेऊन याकडे नव्याने पाहणे आवश्यक आहे.

महात्मा चक्रधर स्वामी यांनी स्थापन केलेल्या महानुभाव पंथामध्ये अध्यात्माच्या एका विशिष्ट अवस्थेला एखादी व्यक्ती गेल्यास त्याला 'स्थिती' प्राप्त होत असे. असे अनेक दाखले महानुभाव परंपरेत दिसतात. 'स्थिती' येणे अथवा एका विशिष्ट मानसिकतेमध्ये जाणे हासुद्धा एक अंगात येण्याचा प्रकार आहे. एखादे लहान मूलसुद्धा कुठल्याही संगीताच्या तालावर आपले अंग हलविताना आपण पाहतो. विशेषतः त्याला त्या संगीताबद्दलची काहीएक कल्पना नसताना त्याचा मेंदू विशिष्ट अशा अवस्थेमध्ये जाऊन तो त्या तालबद्ध वातावरणाशी समरस होतो. ही मानवी मनाची सहजक्रिया त्या काळात घडत असते.

हलगीच्या विशिष्ट तालामधेही मानवी मनावर नियंत्रण मिळविण्याची ताकद असते. महाराष्ट्रापासून ते पुडुचेरी, आसाम, पश्चिम बंगाल, तेलंगणा, आंध्र प्रदेश, केरळ, तामिळनाडू आदी भागांमध्ये हलगीचे विशेष असे ताल आणि त्याची लयबद्धता दिसून येते. एखाद्या देवीपूजेपासून ते अंत्यविधीपर्यंतच्या अशा विशेष तालावर अशी हलगी वाजवली जाते. ज्या वेळी देवीची पूजा असते त्यासाठीसुद्धा एक विशेष असा लयबद्धता आणि ठेका, ताल ठरलेला असतो. तो ताल केवळ देवकर आणि पोतराज यांना अंगात देवी आणण्यासाठी त्या काळामध्ये कारणीभूत ठरतो असे नाही, तर त्या वातावरणात रमलेल्यांनाही आपले भान हरपल्याची जाणीव करून देतो. एखाद्या नवीन व्यक्तीलासुद्धा हलगी मनाला भारावून टाकते. एकदा भारावून गेलेला व्यक्ती काही काळासाठी भान हरपून बघत बसत असेल तर तोसुद्धा एक अंगात येण्याचा प्रकार म्हणता येऊ शकेल.

जगभरात मानवी मेंदूतील नेटवर्क म्हणजेच महाकाय अशा जाळींवर संशोधन पुढे आले आहेत. नव्याने विकसित झालेल्या अनेक तंत्रज्ञानाच्या आधारे मानवी मनाच्या विविध क्रिया आणि त्यासाठी मेंदूतील कोणता भाग सक्रिय होतो, हे स्पष्ट झाले आहे. तर काही क्रियेसाठी अनेक भाग एकत्र येऊन काम करतानाही दिसून आले आहे. त्या मेंदूतील नेटवर्कमध्ये

प्रामुख्याने लिंबिक सिस्टम (भावनिक मेंदूचे जाळे), डिफॉल्ट मोड नेटवर्क, एक्झिक्युटिव्ह फंक्शन नेटवर्क, डॉर्साल अटेंशन नेटवर्क, सलायंस नेटवर्क आणि विशेष म्हणजे व्हेंट्रल अटेंशन नेटवर्क मध्ये एखाद्या व्यक्तीच्या आजूबाजूला निर्माण होणारे बाह्य आवाज, संगीत-दृश्य यावरून त्याच्या शरीरातील वेदना, मनातील विचार याकडे लक्ष आपोआप जाते. त्या वेळी मेंदूतील हे नेटवर्क सक्रिय असते. त्यातून तो आपोआपच अनेक क्रिया करू लागतो. देवी-देवता अंगात आलेली व्यक्ती अशा स्थितीत प्रामुख्याने तो बेभान होऊन नाचत असते, त्याला कोणतेही भान उरलेले नसते. त्यामुळे व्यक्ती अवस्थेत फ्लो स्टेटमध्ये असू शकते. तर दुसरीकडे अशा वेळी त्याची खूप एकाग्रता असते, मात्र, त्याला आजूबाजूच्या परिस्थितीचे अथवा अन्य भान राहत नाही. ती एकूणच स्थिती आनंददायी असते. यातील दुसरा भाग असा की, अंगात संचार होतो त्या वेळी ती व्यक्ती  मूळ ओळख, नाव-गाव विसरलेली असते. ही 'डिसोसिएटिव्ह डिसऑर्डर' असते. अनेकदा ज्या व्यक्ती अंगात येण्याचे सोंग करतात. त्यामध्ये आपल्याकडे इतरांचे लक्ष वेधून घेण्यासाठी त्यातून पर्याय शोधत असतात. हेही त्यांच्या मानवी मेंदूतील नेटवर्कमधून होणाऱ्या क्रियांचा भाग असतो.

सरोजिनी बाबर आपल्या संपादित 'कुलदैवत' या ग्रंथातील बाळकराम वरळीकर यांच्या 'आदिमाया, आदिशक्ती एकवीराः' या प्रकरणात अंगात येण्याच्या प्रकाराला भक्त किती आदराने दर्शन घेतात असे नमूद करतात. ''चैत्र शुद्ध सप्तमीला एकवीरा देवीची यात्रा असते. त्याच्या एक दिवस अगोदर म्हणजे चैत्र शुद्ध षष्ठीला भैरी देवीची यात्रा असते. अशी आख्यायिका आहे की, भैरी देव हा एकवीरा देवीचा भाऊ. तेव्हा आदल्या दिवशी त्याची पालखी असते. ती संपली की, सारी मंडळी एकवीरास येतात. दुपारपासून डोंगरावर लोकांची रांग लागते. त्यातच दर्शन घेण्यास माणसे आतूर असतात. याच वेळेस भक्तगणांच्या अंगात देवीचे वारे येते. सर्व लोक देवीचे वारे आलेल्या भक्तांचे दर्शन घेतात.''(पृ.६६९)

भारतीय पुरातन संस्कृतीचा अभ्यास केला असता अंगात येण्याचे प्रकार हे प्राचीन काळापासून सुरू असल्याचे अनेक दाखले मिळतात. पं. महादेवशास्त्री जोशी म्हणतात, अंगात आलेला संचार काही

कालापुरताच टिकून राहतो. यात ती व्यक्ती माध्यम या स्वरूपात काम करते. हे दैवताशी होणारे एकरूपत्त्व वैयक्तिक व सामाजिक असे उभयविध असते. अंगात येणे हा प्रकार सर्व जगात प्राचीन काळापासून आजतागायत निरनिराळ्या स्वरूपात चालू आहे. (पृ.१६)

अलीकडच्या काळाचा विचार केला तर छत्रपती शिवाजी महाराज हे देवीभक्त होते. त्यांनी श्रीशैलमला एकदा भेट दिल्यानंतर त्याठिकाणी त्यांच्या अंगात देवी आल्याचा वृत्तान्त आज्ञापत्रकार कृष्णाजी अनंत सभासदांनी आज्ञापत्रात सविस्तर दिला आहे. बखरकारांचा दाखला देत महाराजांच्या अंगात श्रीभवानी आल्याचे रा. चिं. ढेरे यांनी म्हटले आहे. त्यांनी 'शिखर शिंगणापूरचा श्रीशंभुमहादेव' या ग्रंथात छत्रपतींची 'दक्षिणेतील देवयात्रा' या प्रकरणात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या (आंध्र प्रदेश) श्रीशैलम येथील भेटीचा वृत्तांत दिला त्यात सविस्तरपणे मांडले आहे. तो उतारा -

''... ऐसे एक महिनाभर भागानगरी होते. तेथील द्रव्य वस्तभाव घेऊन चंदीकडे सेनासमुदाय घेऊन चालिले. मग श्रीशैलास आले. नीळगंगेचे स्नान करून श्रीचे दर्शन जाले. तीर्थविधी जाला. राजियांनी स्थळ देखोन परम आनंद जाला की, केवळ कैलास दुसरें, असे स्थळ वाटलें. तेथे हें देह श्रीस अर्पण करावें, शिरकमल वाहावें, ऐसें योजिलें. (ते) समयी श्रीभवानी अंगात आर्विभवली आणि बोलली जे, 'तुज ये गोष्टी मोक्ष नाहीं. हे कर्म करू नको. पुढे कर्तव्यहि उदंड तुझे हातें करणें आहे' असें सांगून श्री गेली. हें वर्तमान सावध जाल्यावरि राजियांस कारकुनांनी सांगितले. मग श्रीस शिरकमल वाहावें, हा विचार राहिला..'' (पृ. १६६)

रा. चि. ढेरे यांनी दिलेल्या या प्रमाणामुळे शिवकाळापर्यंत देवी अंगात येण्यासाठी एक मोठी समाजमान्यता होती. म्हणूनच छत्रपती शिवाजी महाराजांपर्यंत ही परंपरा सुरू होती, असेही म्हणता येईल.

दुसरीकडे शरद् पाटील यांनीसुद्धा अंगात येण्याचे प्रकार देवलोकांमध्ये कसे प्रचलित होते, याचे प्रमाणशीर दाखले दिले आहेत. शिवाय त्याचा उलगडा करून मातृपरंपरेतील या विषयाला बळकटी दिली आहे. अनेकदा गंधर्वांच्या अंगात वेगवेगळे देव येऊन काय सांगायचे याची याचे अनेक दाखले त्यांनी आपल्या 'दास-शूद्रांची गुलामगिरी' या ग्रंथात दिले आहे.

उपनिषदकालीन मातृवंशक मद्र देशात पतञ्चल काप्य (कापी या स्त्रीचा पुत्र) यासारख्या विख्यात ऋत्विजांच्या कुलस्त्रियांच्या अंगात गंधर्व येत असत आणि त्यांच्या तोंडून त्या अध्यात्म व तत्त्वज्ञानावरही प्रवचने करीत असत. काप्याच्या पत्नीच्या अंगात कबंध आथर्वण नावाचा गंधर्व येत असे -

'१. मग उद्दालक आरूणीने त्याला प्रश्न विचारला - ''याज्ञवल्क्य,'' तो म्हणाला, 'आम्ही मद्रांमध्ये पतञ्चल काप्याच्या घरी यज्ञाच्या अध्ययनासाठी राहत होतो. त्याच्या पत्नीच्या अंगात गंधर्व येत असे. आम्ही त्याला विचारले, ''तू कोण आहेस?'' तो म्हणाला, ''मी कबंध आथर्वण आहे''...'

अंगात यायची' ही दैवी शक्ती मातृवंशपरंपरेने चालत असे -

' १. मग भुज्यु लाह्यायनीने त्याला प्रश्न केला - ''याज्ञवल्क्य,'' तो म्हणाला, ''आम्ही चरक म्हणून मद्रांमध्ये परिभ्रमण करीत होतो. त्या दरम्यान आम्ही पतञ्चल काप्याच्या घरी आलो. त्याच्या कन्येच्या अंगात गंधर्व येत असे. आम्ही त्याला विचारले, ''तू कोण आहेस?'' तो म्हणाला, ''मी सुधन्वा आङ्गिरस आहे''....'

वर्तमान भारतात भगताने अंगात आलेल्या माणसाला प्रश्न विचारण्याच्या पद्धतीत भाषेव्यतिरिक्त थोडा फरक पडलेला आहे. माद्री भगतिणींच्या अंगात येणारे गंधर्व दुसरेतिसरे कोणी नसून अथर्वन् व आङ्गिरस या वैदिक ऋषीसारखे विख्यात पितर होते. हे गंधर्व वा विख्यात पितर कालानुक्रमात अवैदिक व वैदिक दैवतायनातील हाडामांसाच्या दैवतांत विकसित झाले. (पृ.१९४)

भारतीय मनोविश्लेषकांनी अंगात येण्याच्या प्रकाराला फार गांभीर्याने घेतलेले दिसत नाही. कारण हा अवैदिक परंपरेतील आविष्कार एक असल्याने त्याकडे दूर्लक्ष झाल्याचे दिसते. मातृदेवता, देवींची पूजा करून त्यासाठी समरस झालेल्या भक्तांना सरसकट मानसिक आजार म्हणून त्याकडे पाहणेही थोडे अन्यायकारक वाटते. देवी अंगात आल्यानंतर कुठेही मोठे आर्थिक भुर्दंड होत नसतो. दुसरीकडे यातील अनेक मनोविश्लेषकांनी अनेक खर्चिक कर्मकांडांना प्रतिष्ठा मिळवून देण्यातच धन्यता मानल्याचे काहींचे म्हणणे असते. विविध प्रकारच्या व्यवस्थेच्या

एकूणच पूजा-अर्चा आदी विधीतून अनेकदा पर्यावरणाची, अन्नधान्याची हानी होते. शिवाय त्यातून एका ठराविक वर्गाला आर्थिक भुर्दंडही सोसावा लागत असल्याचे महात्मा फुलेंसह प्रबोधनकारांपर्यंत सर्वांनीच लक्ष वेधलेले आहे. पूजेच्या माध्यमातून हजारो लिटर दूध आणि दही वाया घालविले जात असल्याने त्यावर टीका होतात. त्याचेही समर्थन करणारा खूप मोठा मतप्रवाह आहे. यज्ञात वापरण्यात येणाऱ्या तुपातून आजूबाजूच्या वातावरणात प्रसन्नता निर्माण होते, असेही काहींना वाटते. त्यासाठी वैज्ञानिक कारणेही देत त्याचे समर्थन केले जाते. त्यावर मतप्रवाह असू शकतात. मात्र, कोणत्याही आध्यात्मिक व्यवस्थेत आर्थिक आणि इतर कारणे लावून त्यावर टीका करणे योग्य नाही. ती व्यवस्था समजून घेणे आवश्यक आहे.

एखाद्या महिलेच्या अंगात देवी आल्यानंतर तिची काही भक्त पूजा करायला सांगतात. विविध प्रकारची पूजा, बळी देण्याचा कार्यक्रम सांगत असतात.अशा वेळी त्या पूजेचा सर्वाधिक लाभ जवळच्या कुटुंब, नात्यागोत्यातील व्यक्तींना झालेला दिसतो. रेडा, बकरे, मेंढी आदींचा बळी दिल्यानंतर त्या कुटुंबाला त्या दिवसापुरते तरी पौष्टिक जेवण मिळते. उलट दुसरीकडे यज्ञात टाकलेल्या तुपातून प्रसन्नता मिळत असली तरी ज्यांच्याकडे अतिरिक्त साधने उपलब्ध झालेली असतात, त्यांच्यासाठी ही बाब समाधानाची वाटत असावी. दुसरीकडे कोंबडे-बकरे कापून त्यांचा बळी दिल्यानंतर समूहभोजनातून जो आनंद मिळतो त्याकडेही दुर्लक्ष करणे योग्य वाटत नाही.

भारतीय सणांच्या माध्यमातून निसर्गाचा, पर्यावरणाचा, अर्थद्रव्याचा ऱ्हास करताना त्याला सन्मानाचे समजले जाते. नवस न करता खाटकांकडून कापलेले कोंबडे-बकरे खाण्यावर आक्षेप नसतो. तिथे मात्र त्या प्राण्यांचा पशूंचा 'बळी' दिसत नाही. हा एक प्रकारचा दुटप्पीपणा आहे. कोंबड्या, बकऱ्यांचा बळी देण्यामागे असलेली समूहभोजनाची संकल्पना, त्यातील सामाजिक एकोपा साधला जातो. यानिमित्ताने जमणारा गोतावळा, कुटुंबीय, मित्रपरिवार आणि त्यातून होणारे संवाद, हितगुज याचा मात्र विचार केला जात नाही. याकडे सामाजिक दृष्टिकोणातून पाहण्याची गरज आहे.

देवींच्या पूजा त्यांच्या सर्व परंपरा लक्षात घेतल्या तर निसर्गाचा कुठेही ऱ्हास होईल, अशा प्रकारचे कृत्य केलेले दिसत नाही. उलट प्रत्येक पूजा ही निसर्गाशी समरस असलेल्या दिसतात. त्यातही बहुतांश वेळा त्या आरोग्याशी संबंधित असतात. देशातील विविध विद्यापीठांमध्ये या विषयावर संशोधन होण्याची गरज आहे. मानसशास्त्रीय दृष्टिकोणातून सभोवतालच्या परिस्थिती आणि वातावरणाशी समरस होऊन हे संशोधन झाल्यास यातून वेगळे निष्कर्ष बाहेर येतील. हजारो वर्षे ही परंपरा वेगवेगळ्या समुदायांकडून जतन करण्यात आली. असंख्य प्रकारच्या धार्मिक आक्रमणानंतरही ही परंपरा आपले अस्तित्व टिकवून आहे.

अंगात येण्याच्या प्रकारावर वैज्ञानिक दृष्ट्या विश्लेषण होण्याची गरज आहे. या परंपरेकडे पाहण्याचा दृष्टिकोण बदलायला पाहिजे. त्या काही त्रुटी, चुकीच्या पद्धती निश्चितच बळावलेल्या आहेत, त्यात सुधारणा करून मातृदेवतेच्या परंपरेचे वाहक म्हणून त्यांच्याकडे पाहण्याची नवी दृष्टी विकसित झाल्याशिवाय या परंपरेला बदनामीच्या तावडीतून बाहेर काढता येणार नाही.

अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे दिवंगत कार्यकर्ते डॉ. नरेंद्र दाभोलकर यांनी जादूटोणा, अनिष्ठ प्रथा, अंधश्रद्धा, अंगात येण्याच्या प्रकारावर बरेच वर्षे पाठपुरावा करून सरकारला त्यासाठीचा कायदा करण्यासाठी भाग पाडले. या विषयावर खूप प्रबोधन आणि चळवळीही केल्या. अभ्यासपूर्ण मते मांडली. त्यासाठी त्यांचे मोठे योगदान राहिलेले आहे. 'दाभोलकर हे माणसाच्या अंगातील देवीचा संचार व माणसाच्या अंगात भूताने झपाटणे हे एकच असल्याचे नमूद करतात.(पृ.११९) 'अंगात येणे' हे सुप्त मनामध्ये जे अनेक विचार, भावना, परस्परविरोधी मते, ताणतणाव साठलेले असतात त्यामुळे घडून येते. याची कल्पना इतरांना नव्हे तर त्या व्यक्तीलाही नसते. सुप्त मनातील भावनांना वाट मोकळी करून देण्याची कृती बहुतेक वेळा जाणीवपूर्वक केलेली नसते. तर आपोआप घडत असते. हा एक प्रकारचा मानसिक आजार आहे (पृ.११९ ते १२१) असे ते म्हणतात.' पुढे जाऊन ते दाभोलकर म्हणतात, अंगात येणे व भुताने झपाटणे हे मनाचे आजार आहेत. त्यातही अंगात येणे हा प्रासंगिक प्रकार आहे. अंगात येऊन गेल्यावर ती व्यक्ती इतरांसारखीच वाटते.

त्यासाठीचे तीन प्रकार ते सांगतात, त्यात पहिला प्रकार म्हणजे अंगात येणारी व्यक्ती ही फायदे लक्षात आल्याने हे ढोंग करत असते. त्यामुळे ही ढोंगबाजी असू शकते. तर मांत्रिक, देवऋषी, प्रश्नांची उत्तरे देणाऱ्या देव्या यांचे अंगात येणे हे ढोंग असते. दुसरा प्रकार म्हणजे, अंगात येण्याच्या काळापुरता कोणी देवाने, देवीने, स्वतःचा ताबा घेतला आहे, असे त्या व्यक्तीला वाटते. देव असा अंगात येतो. हा त्या व्यक्तीवर लहानपणापासून झालेला संस्कार असतो. व्यक्तींची मानसिक ताणतणावाची अवस्था व हा संस्कार यांमधून काही काळ अंगात येते. याचा व्यक्तीला उपयोग होऊन तिचे मानसिक ताण कमी होतात.

समाजात काही मान्यता मिळण्याची शक्यता असते. या व्यक्तींना अशा मान्यतेची फार गरज असते. अंगात येण्याचा तिसरा प्रकार म्हणजे विशिष्ट वेळी अंगात येणे; हे सामाजिक, सांस्कृतिक दृष्ट्या मान्यताप्राप्त वर्तन असते. ते देवाच्या पूजेसारखेच चांगले मानले जाते. नवरात्रीला देवीसमोर अंगात येणाऱ्या काही स्त्रियांच्या बाबतीत तरी ढोंगबाजी वा मनोविकृतीच्या ऐवजी हे कारण असू शकते. (पृ.२६.)

अशा प्रकारे तीन शक्यता दाभोलकरांनी सांगितल्या आहेत. त्यात त्यांनी दुसरे कारण देताना संस्कारामधून काही काळ अंगात येते आणि तिचे मानसिक ताण कमी होतात,असे नमूद केले आहे. उर्वरित भाग त्यांनी अंगात येण्याला मनोविकृती आणि ढोंगबाजीच म्हटले आहे. त्यात अनेक ठिकाणी ढोंगबाजी करणारे भक्त वाढलेले आहेत. त्यामुळे त्यातील बहुतांश बाबी या सत्यही आहेत. यात कोणाचेही दुमत नसावे. अनेक ढोंगबाजी करणाऱ्यांचाही मोठा सुळसुळाट झाला असून हेही नाकारता येत नाही. मात्र सर्वच ढोंगबाजी करतात म्हणून सर्वांनाच एका कक्षेत आणून बसविणे हेही उचित वाटत नाही.

धुरपतामायच्या परंपरेत अलीकडे मोठ्याप्रमाणात तृतीयपंथीयांची संख्या वाढली असून, यात अनेक जण अंगात येण्याचे, आपणच देवी असण्याचे निश्चितच ढोंग, बतावणी करत असतात. मात्र, त्यांच्यातही अनेकजण देवींसाठी समर्पित जीवन जगतात हेही नाकारता येत नाही. यामुळे त्याकडे बघण्याचा दृष्टिकोण साहजिकच तसा होणे अपेक्षित आहे.

दाभोलकरांनी अंगात येण्याचा प्रत्येक प्रकार ही लोकांची जाणूनबुजून

केलेली फसवणूक असते काय, या प्रश्नावर खूप समर्पक उत्तर दिले आहे. ते पाहणे आवश्यक आहे. त्यातूनच दाभोलकरांची अंगात येण्याच्या या प्रकाराकडे दुसरा दृष्टिकोणही लक्षात येतो. ते म्हणतात, अंगात आलेली व्यक्ती १) फसवणूक करणारी ढोंगी असेल किंवा २) ती मनोरुग्ण असेल. यावर अंगात येणारी प्रत्येक व्यक्ती ही जाणूनबुजून फसवणूक करणारी असते, असे समजणे हे चूक ठरेल. दाभोलकरांचे हे विधान अत्यंत महत्त्वाचे आहे. यात अंगात येण्याच्या प्रकाराला सरसकट फसवणूक नसल्याचे ते मान्य करतात. पुढे ते म्हणतात, अंगात आलेली व्यक्ती फसवणूक करणारी असेल, तर अशी व्यक्ती लुबाडणुकीचा धंदा सुरू करते. लोकांच्या प्रश्नांची उत्तरे देणे, प्रश्नावर उतारा सांगणे, यामधून पैसा मिळतो. लोक पाया पडतात. प्रतिष्ठा मिळते, देवऋषी, दरबार भरवून प्रश्नांची उत्तरे देणाऱ्या देव्या या प्रकारात मोडतात, असेही दाभोलकर म्हणतात. त्यांच्या या म्हणण्यात तथ्य आहे.

अंगात आलेल्या व्यक्तीकडून अनेक विषयावरील प्रश्नांची उत्तरे दिली जातात, त्यावर दाभोलकर म्हणतात, अंगात आलेल्या व्यक्तीने ज्यांच्या ज्यांच्या प्रश्नांची उत्तरे दिली ती सर्व अचूक आली. याचा संख्याशास्त्रीय अभ्यास झाला नाही. त्यामुळे याला शास्त्रीय आधार नसल्याचे ते सांगतात. अंगात आलेली व्यक्ती ही उत्तर देताना 'होय' किंवा 'नाही' असे उत्तर येईल, असेच प्रश्न विचारले जातात, असेही दाभोलकर म्हणतात. मात्र त्यापलीकडे जाऊन काही प्रश्न असतात, त्याचा उलगडा मात्र ते करत नाहीत. देवी अंगात आल्यानंतर पहिला प्रश्न 'तू कोण आहेस', असा विचारला जातो. ही प्रश्न विचारण्याची परंपरा उपनिषदकालीन असल्याचे  शरद् पाटील यांनी 'दास-शूद्रांची गुलामगिरी' या पहिल्या खंडात दिले आहे. पतञ्चल काप्य (कापी या स्त्रीचा पूत्र) यासारख्या विख्यात ऋत्विजांच्या कुलस्त्रियांच्या अंगात गंधर्व येत आणि त्यांच्या तोंडून त्या अध्यात्म व तत्त्वज्ञानावरही प्रवचने करीत असत.

अंगात येण्याची आणि संमोहनात जाण्याची अवस्था बहुतेक प्रमाणात सारखीच असते. त्यात संमोहन अवस्थेत आपोआप जाणे आणि कोणाच्या तरी कृतीवरून जाणे इतकाच फरक असतो. मात्र, दोन्हीबाबत वातावरण

निर्मिती झाल्यास त्या अवस्थेत जाऊन पोहोचतात. अमेरिकेत एडगर केसी (१८७७-१९४५) यांचे यासाठी एक चांगले उदाहरण देता येईल. केसी एकदा कोमात गेले, आणि त्याच अवस्थेत एकदा अचानकपणे उठून त्यांनी आपल्यावर काही वेळात इलाज करा, त्यासाठी ही अमूक-अमूक औषधे द्या, असे सांगून ते पुन्हा कोमात गेले. हा सर्व प्रकार पाहून सर्वांना धक्का बसला होता. त्यांना औषधे देण्यात आली आणि त्यातून ते बरे झाले. त्यानंतर संमोहन अवस्थेत जाऊ लागले. विशेष म्हणजे या अवस्थेत गेल्यानंतर ते अनेक रोगांचे निदान औषधोपचार सांगायचे. ते ज्या वैद्यकीय परिभाषेंचा वापर करायचे, त्यासाठी त्यांना वैद्यकशास्त्राचे कोणतेही ज्ञान नव्हते आणि परिभाषाही माहीत नव्हती. विशेष म्हणजे कधीही न पाहिलेल्या स्थळाची माहिती ते वर्णन करत. देवी अंगात आलेल्या असंख्य महिलाही अशा प्रकारे अनेकांचे आजार आणि त्यावर काही उपचार सांगतात, कधी न पाहिलेल्या स्थळांची माहितीही अचूकपणे देतात. हे प्रमाण खूप कमी असले तरी काही महिलांच्या बाबतीत हा प्रकार दिसून येतो. ते तपासून घेण्याची गरज आहे. कदाचित आपल्याकडे अशा प्रकारची नोंदच होऊ शकली नसल्याने ते दुर्लक्षित राहिले असावेत. आजही एखाद्या महिलेच्या अंगात आल्यानंतर तिच्या तोंडून निघणारे शब्द खरे मानले जातात. त्यात वैज्ञानिकता नसली तरी त्यामागील नेणिवेचा उलगडा होणे आवश्यक आहे.

'महानुभाव पंथाची त्रिमुर्ती' मध्ये डॉ. यादव अढाऊ म्हणतात, यादवाच्या काळात हेमाद्री पंडित यांनी 'चतुर्वर्गचिंतामणी' हा ग्रंथ लिहून एक वर्षात दोन हजार व्रते सांगितली होती. वर्णभेद, त्यातून जातिभेद व विषमता, विटाळ-चांडाळ पराकोटीस पोहोचला होता. तिन्ही वर्णांना व स्त्रियांना धर्म नाकारला होता. मंदिर प्रवेश नाकारला होता. कर्मकांड, यज्ञ, पशूबळी, हिंसा शिगेस पोहोचली होती. वैदिकांनी वैदिक देव नाकारल्याने तिन्ही वर्ण शुद्र देवतांच्या आराधनेत मशगूल झाले होते. कोंबडे, बकरे बळी देणे, दारू प्राशन करणे, अंगात येणे यातच गुंतले होते. (पृ.६) म्हणजेच यादव काळातही अंगात येण्याचे प्रकार बहुजनसमाजात सर्रासपणे सुरू होते.

अंगात येणे हा दैवी शक्तीचा प्रकार धुरपतामायच्या परंपरेत मोठ्या

प्रमाणात आहे. देवी अंगात आल्यानंतर जे काही आपल्या भक्तांच्या मुखातून विधान निघते, ते विधान सत्य मानून त्याला स्वीकारण्याची प्रथा आहे. अंगात आलेल्या व्यक्तीने देवीचा कोणता नवस राहिला, कोणते कारण करताना अमूक-अमूक विसरले, याची आठवण करून दिली की ती सत्यच असते, असे मानले जाते. तो एक प्रकारचा आदेश मानूनच त्याचे तंतोतंत पालन भक्तांकडून केले जाते. त्याला सहसा डावललेले जात नाही. कधी-कधी समोर बसलेल्या भक्तांना आपल्याकडून काहीतरी मोठी चूक झाल्याची आणि एक अपराधाची भावना कायम मनात निर्माण होत असते. हे भक्त देवीच्या पूजासंदर्भात आपली झालेली चूक सुधारून घेण्याचे मान्य करतात.

धुरपतामायच्या परंपरेत गावोगावी असलेल्या मरिआईच्या पूजेला मोठे प्राधान्य असते. तसेच पोचीमाय या दोन्ही बहिणींची पूजा गावोगावी केली जाते. या दोन्हीची मंदिरे ही गावाच्या बाहेर चौरस्त्यावर असतात. त्यांची पूजा प्रत्येक पौर्णिमेला केली जात असली तरी चैत्र आणि पौष महिना त्यासाठी अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. चैत्राच्या महिन्यात धुरपतामायची चंद्रपूरला यात्रा भरते. त्या वेळी सर्व चंद्रपूरला जातात तर पौष महिन्यामध्ये फक्त चंद्रपूरला न येता आपल्या गावात असलेल्या मरिआई आणि पोचीमाय या दोन्ही बहिणींची पूजा करतात.

पौष महिन्यात मराठवाड्यात बहुतांश अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या मांग आणि भटक्या विमुक्त समाजातील बंजारा आदी जाती-जमातींमध्ये गावोगावी 'सण' नावाचा एक कार्यक्रम केला जातो. त्यासाठी मंगळवार, रविवार आणि अथवा महिन्यातील पौर्णिमेच्या दिवशी हा 'सण' केला असतो. देवीला प्रसन्न करण्यासाठी या सणाच्या निमित्ताने कोंबडे-बकरे अथवा रेडा, बोकड कापून त्यासाठीचा बळी अर्पण केला जातो. या समाजाच्यावस्त्यांमध्ये सहज फेरफटका मारल्यास वस्त्यांमध्ये अथवा एखाद्याच्या घराशेजारी म्हैसेमा, सटवाई आदी देवतांना शेंदूर लावून ठेवलेले असते.

सणाच्या दिवशी गावातील या देवींच्या जवळ कार्यक्रम केला जातो. अलीकडे रेडा कापण्याचे प्रकार कमी झाले असले तरी बकरे, मेंढ्या आणि कोंबडे यांचे बळी देण्याचे प्रकार मात्र सुरू आहेत. बळी देण्याचा

हा सण प्रामुख्याने संध्याकाळी असतो. सायंकाळ होण्यापूर्वी घराजवळ अथवा वस्तीत असलेल्या देवींची पूजा केली जाते. त्या वेळी घरापासून ते गावाच्या बाहेर असलेल्या मरिआई आणि पोचीमायच्या मंदिरापर्यंत नाचत-नाचत मोठा समुदाय जातो. लहान मुली, महिला आपल्या डोक्यावर पाण्याने भरलेला कुंभ डोक्यावर घेऊन जात असतात. त्या कुंभात लिंबाचा डहाळा ठेवलेला असतो.

मरिआईच्या मंदिरापर्यंत पोतराज, देवकरीण त्यांच्याकडील असलेली गाणी म्हणत तिथपर्यंत पोहोचतात. या कार्यक्रमाला 'हिल्लाळ' म्हटले जाते. असाच हिल्लाळ हा चंद्रपुरात यात्रेची सांगता करण्यापूर्वी अथवा सुवासिनी वाढण्यापूर्वी केला जातो. मंदिराजवळ पोहोचल्यास पोतराज आपल्या शैलीत देवीची आरती करतो. आरतीच्या दरम्यान त्याच्या आवाजातील भारदस्तपणा आणि त्यातून निर्माण झालेले वातावरण लक्षात घेतल्यास आजूबाजूचा परिसर दणाणून जातो. या भारलेल्या वातावरणात असलेल्या देवकरीण आणि इतरांच्या अंगात देवी येत असते. या वेळी महिला आपले केस सोडून नाचताना देवी अंगात आल्याची बतावणी करत असतात. तर काही देवीची भक्ती आणि दबदबा कायम ठेवण्यासाठी सोंगही करतात. त्यातूनच आपण देवीचे भक्त असल्याचा दावा करत संबंधितांना आदेश देत असतात.

मरिआईपासून हा हिल्लाळ गावात आल्यानंतर सायंकाळी देवीला बळी देण्याचा मुख्य कार्यक्रम असतो. त्यावेळीही हलगी, सूर, सनईच्या ठरावीक ठेक्याने आणि पोतराजाच्या धुपारतीने वातावरण तयार होते. त्यानंतर उशिरापर्यंत जेवणाचा कार्यक्रम केला जातो. रात्रभर पोतराज आणि देवकर यांच्या गाण्याचा कार्यक्रम होतो.

पोतराज आपल्या परंपरेची सर्व माहिती देत राहतो. तर देवकर हा आतापर्यंत झालेल्या देवकरांच्या जीवन चरित्राचा उलगडा करण्याचे तसेच त्यांची स्तुती करण्याची गाणे म्हणत असतात. या गाण्यात आपल्या मूळ गुरूंवर स्तुतीपर कवने अधिक असतात. त्याचे वर्णन, एखाद्या लीळा म्हटल्या जाव्या तशी ही गाणी आकार घेतात. ही गाणी बऱ्याचदा एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे आलेले असल्याने त्यामध्ये बऱ्याच वेळा शब्द आणि वाक्य यामध्ये प्रचंड मोठी तफावत आढळून येते. अनेकदा

एकच गाणे हे वेगवेगळ्या देवकरांसाठी वापरले जाते. फक्त नाव आणि ठिकाण बदलण्याचा प्रकार गाण्यातून होत असतो.

सणाचा कार्यक्रम रात्रभर चालतो. या दरम्यान पोतराजांचे भारून टाकणारे नृत्य, हलगी आणि सूर, सनईचा ताल जुळून येतो. त्या वेळी अंगात येण्याचे प्रकार सर्वाधिक घडत असतात. जोपर्यंत हलगीचा ठेका जोरात असतो तोपर्यंत अनेक महिलांच्या अंगात देवी येते. अनेक जण निर्माण झालेल्या वातावरणात आपले अंग हलवून, केस मोकळे सोडून देवी अंगात आल्याचे दाखवत असतात. उपस्थित असलेल्या जाणकारांना देवी अंगात येणार असल्याची अगोदरच कल्पना असल्याने त्या ठिकाणी त्यांना भंडारा अथवा लिंबू हे आणून ठेवले जाते. अनेकांना देवीचा भंडारा लावल्यास अंगात आलेली देवी निघून जाते. हे सर्व प्रकार सणाच्या दिवशी देवी पूजेच्या कार्यक्रमात आणि चंद्रपूरच्या यात्रेतही सर्रास पाहताना मिळतात.

भारताच्या कानाकोपऱ्यातच नव्हे, तर ग्रीकमध्ये असलेल्या असंख्य मातृदेवतांना प्रसन्न करण्यासाठी पूजा-अर्चा करताना ग्रीकमधील महिलांच्या अंगात देवी येत असे. या अंगात आलेल्या महिलांकडून करण्यात येत असलेल्या भविष्यवाणीला फार महत्त्व असायचे. याचे असंख्य दाखले ग्रीक साहित्यातून मिळतात. नेपाळमध्ये देवी हरितीची पूजा करणाऱ्या महिलांच्याही अंगात देवी येते. विशेष म्हणजे, ज्या-ज्या देशात मातृपरंपरा प्रवाहित होत गेली त्या-त्या ठिकाणी महिला भक्तांच्या देवी अंगात येणे हे प्रकार दिसतात.

भारतात ही परंपरा अनेक परंपरांना छेद देत आपले अस्तित्व टिकवून ठेवून अबाधित राहिली. परंतु या परंपरेला नेणिवेच्या पातळीवर समजून घेण्याचा प्रयत्न न झाल्याने ती कायमच उपेक्षित आणि बदनाम झाली. हजारो वर्षांपासून आपले वेगळे अस्तित्व टिकवलेली ही परंपरा भारताच्या कानाकोपऱ्यात निसर्गमायेचे गुणगाण करत राहिली. निसर्गातील अनेक रहस्य, घडामोडी, आविष्कार यांच्याप्रमाणेच मातृपरंपरेत अंगात येणाऱ्या मानवी आविष्काराचे अनेक पैलू उलगडण्याची गरज आहे. यातून अनेक भारतीय महिलांच्या अंगात देवी येण्याच्या या आविष्कारातून एडगर केसीसारखे वेगळे योगदान समोर येऊ शकेल.

**संदर्भ :**

१. भारतीय संस्कृतिकोशः खंड पहिला, संपादक,
पं. महादेवशास्त्री जोशी पृ. १६.
२. शिखर शिंगणापूरचा श्रीशंभूमहादेव : रा. चिं. ढेरे, पृ. १६६.
३.अंधश्रद्धा, प्रश्नचिन्ह आणि पूर्णविराम : डॉ. नरेंद्र दाभोलकर,
पृ. २६, २७, २८.
४. प्रश्न मनाचे : डॉ. नरेंद्र दाभोलकर पृ. ११९, १२०, १२१.
५. महानुभाव पंथाची त्रिमुर्ती : डॉ. यादव अढाऊ, पृ. ६.
६. आभरान : पार्थ पोळके, पृ. २, ३, ४.
७. दास-शुद्रांची गुलामगिरी, भाग १ : शरद् पाटील, पृ. ११४.
८. कुलदैवत : सरोजिनी बाबर, पृ. ६६९.
९. कार्यक्रमातील माहिती : २०१३ ते २०२२ या काळातील चंद्रपुरमधील चैत्राची
यात्रा आणि विविध ठिकाणच्या कार्यक्रमांतील माहिती.
: हंडरगुळी, ता. उदगीर, येथील कार्यक्रम.
: कुंभारी तांडा, ता. सोनपेठ,: खेडुळा, ता. पाथरी.
: वाडी पिंपळगाव, ता. सोनपेठ.
: देवनांदरा, ता. पाथरी, जि. परभणी.
: श्रीकोच्चेरी देवी मंदिर, जि. निझामाबाद, तेलंगणा.
: पोचेम्मा देवी मंदिर, बारड, जि. नांदेड.

***

विभाग तिसरा : परिशिष्ठ

**९. पोतराजविरोधातील संघर्ष**
१९८४ सालातील चंद्रपूरच्या यात्रेतील संघर्ष,
सहभागी कार्यकर्त्यांकडील माहिती

**१०. गोंड राजे आणि चंद्रपूर**
गोंड राजे, खांडक्या बल्लाळशहा,
राणी हिरातानी, राणी हिराई,

**११. महाकाली मंदिर आणि स्थापत्यकला**
राणी हिराईचे योगदान, गोंडकालीन
चित्र-शिल्प, मंदिराची रचना

**संदर्भसूची**

**शब्दसूची**



# ९
# पोतराजविरोधातील संघर्ष

**माय माझे धुरपता,**
**तुवा पोतराज येडा..**
**एव्हढं सैवाराच्या वेळा**
**त्यायनं हांकारीला गाडा गं...**

चंद्रपूरच्या महाकालीची चळवळ प्रामुख्याने चंद्रपूरपासून ते मराठवाड्यातील नांदेड, लातूर, उस्मानाबाद, परभणी, औरंगाबाद, जालना, बीड आणि त्यासोबतच तेलंगणा, आंध्र प्रदेश आणि कर्नाटकच्या सीमा भागातील जिल्ह्यांमध्ये दिसून येते. या चळवळीतील नायक असलेला हा पोतराज या भागातील विशेषतः मांग समाजातील आहे.

पोतराज आणि त्याने जपलेल्या परंपरेमुळे समाजहित साधले जात नाही. समाजाचा विकास होत नाही. समाजात अंधश्रद्धा, रूढी, परंपरा चिकटून राहतात. यासाठी पोतराजांच्या विरोधात या समाजातील कार्यकर्त्यांनी १९८४ सालात आंदोलन छेडले. पोतराजांनी आपली ही प्रथा सोडून द्यावी, असा रोख या आंदोलनापाठीमागे होता. विविध प्रकारचे विचार, भूमिका त्यामागे होत्या.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सुरू केलेल्या धम्मचक्र परिवर्तनाच्या चळवळीपासून हा समाज काही अंतराने दूर होता. त्याला ही चळवळ नीट अंगीकारता आली नाही. तो अनेक जुन्या चालीरिती परंपरा यांच्याशी चिकटून राहिल्याने त्याचा शैक्षणिक, सामाजिक आणि आर्थिक विकास होऊ शकला नाही. हे यामागील वास्तव होते. मात्र, त्यातील ज्यांना ही चळवळ समजली त्यातील असंख्य कुटुंबांनी आपला भौतिक, शैक्षणिक आदी विकास करून घेतला. ते विकासाच्या मुख्य प्रवाहात आले. त्यातील सामाजिक कार्यकर्ते, साहित्यिक, राजकीय, सामाजिक पक्ष-संघटनांचे नेते होऊन विविध चळवळीत नेतृत्व करू लागले. समाजाची एक वेगळी ओळख निर्माण केली जात होती. त्याच कालावधीत काही शिक्षितवर्ग पोतराज आणि त्याच्या परंपरेवर नाराज होता. पोतराजांनी जपलेल्या रूढी परंपरा या अंधश्रद्धा आहेत. त्यामुळे समाजाची प्रतिष्ठा राखली जात नाही, अशी एक भावना निर्माण झाली होती. त्या भावनेतूनच धुरपतामायच्या परंपरेसाठी वाहून घेतलेला पोतराज आणि त्याची एकूणच रूढी परंपरा हे थांबवून त्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणावे असा एक विचार समोर आला होता. याच विचारातून काही प्रबोधनाचे मार्ग सुरू झाले, परंतु नियोजनाअभावी त्याला फारसे यश आले नाही.

१४ एप्रिल १९८४ रोजी चंद्रपुरात यात्रा भरली असताना मांग समाजातील काही सामाजिक कार्यकर्त्यांनी पोतराजविरोधात आंदोलन छेडले. या आंदोलनामध्ये मांग समाजातील पोतराजांना धरून त्यांचे केस कापणे, जटा कापणे तसेच त्यांच्या हातातील हलगी, डफडे फोडून त्यांना या एकूणच परंपरेपासून परावृत्त करण्याचा प्रयत्न केला गेला. या आंदोलनाचा सविस्तर वृत्तान्त त्या वेळी 'चंद्रपूर समाचार' या नियतकालिकामध्ये प्रसिद्ध झाला होता. हे आंदोलन खूप गाजले होते. या

आंदोलनामध्ये सहभागी असलेला वर्ग हा शिक्षित आणि सामाजिक कार्यकर्ता अशा प्रकारातला होता. त्यामुळे त्यांच्याकडून पोतराजांच्या माध्यमातून सुरू असलेल्या या परंपरा खंडित व्हाव्यात आणि आपली ही ओळख पुसली जावी असा यामागे हेतू होता. तो हेतू साध्य करण्यासाठी चंद्रपुरात १९८४ पासून पुढील चार वर्षे चैत्राच्या यात्रेदरम्यान अशा प्रकारची आंदोलने करण्यात आली. त्यामुळे अनेक जणांनी या यात्रेला जाणे काही वर्षे थांबविले होते. या आंदोलनाने केवळ चंद्रपूरच नव्हे तर मराठवाड्यातील प्रत्येक जिल्ह्यांमध्ये एक खूप मोठा धाक निर्माण झाला होता. ज्या-ज्या ठिकाणी महाकाली आणि धुरपतामायच्या कार्यक्रमाचे आयोजन केले जायचे अशा ठिकाणी सामाजिक कार्यकर्ते जाऊन पोतराजांच्या हलगी फोडणे, त्यांचे केस कापणे वगैरे उपक्रम या आंदोलनात राबविण्यात आले. हे उपक्रम राबवित असताना त्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम होण्यासाठी पर्याय उभे करून देण्याची गरज होती. परंतु या पर्यायांवर भर दिला गेला नसल्याने हे आंदोलन पुढे तग धरू शकले नाही. ते अयशस्वी ठरले.

पोतराज विरोधातील या आंदोलनानंतर काही कार्यकर्त्यांना समाजामध्ये वेगळी प्रतिष्ठा मिळाली. काहींना राजकीय क्षेत्रामध्येही आपले स्थान निर्माण करता आले. परंतु पोतराज या घटकाच्या एकूणच आर्थिक विकासासाठी कोणताही ठोस कार्यक्रम पुढे न आल्याने समाजाची स्थिती मात्र जैसे थे राहिली.

हजारो वर्षांपासून अवैदिक परंपरेचा वारसा चालवणारे पोतराज आणि देवकरीणला या समाजामध्ये फारशी प्रतिष्ठा, सन्मान मिळाला नाही. तो सन्मान करून महाकालीचे उपासक असलेल्या पोतराज-देवकरीण यांचा तो  प्राचीन वारसा जतन करून सांगता आला असता. त्यासोबतच पोतराज-देवकरीण यांना शिक्षण, प्रशिक्षण देऊन सर्वांगिण विकासाचे पर्यायही उपलब्ध करून देता आले असते. परंतु ते पर्याय न देता त्यांच्या विरोधात केवळ आंदोलने झाली. अनेक वर्षे चाललेल्या या आंदोलनातून नेमके यश कोणते मिळाले हा प्रश्न अधांतरी राहिला.

आज मराठवाड्यातील बहुतांश जिल्ह्यांमध्ये तरुण पोतराजांचे प्रमाण वाढताना दिसत आहे. ३९ वर्षांपूर्वी ज्या पोतराजांना कार्यक्रम करून

आपला विकास साधता आला नाही, ती उणीव आता तरुण पोतराज भरून काढताना दिसताहेत. अलीकडे लातूर, नांदेड जिल्ह्यातील तरुण पोतराजांची एक मोठी फळी निर्माण झाली असून ती व्यावसायिक पद्धतीने अनेक कार्यक्रम सादर करताना दिसताहेत. त्यातून केवळ पोतराज म्हणून नव्हे तर अनेकांनी आपले रोजगार, व्यवसाय सांभाळत आपली परंपरा जपण्याचा वसा घेतला आहे. प्रतिष्ठेसंदर्भात निर्माण झालेले प्रश्न आजही अधांतरी राहिले आहेत. कधीही तडजोड करत आपला वारसा सोडला नाही. शाक्त-तांत्रिकांचा वारसा जतन करत हजारो वर्षांपासून एक वेगळी ओळख पोतराजांनी ठेवलेली. त्याने मातृदेवता आणि तिची अवैदिक परंपरा जपली, तो कायमच तिचे गुणगान करत राहिला. एकूणच पोतराज, देवकरीण यांच्या या परंपरेकडे एक सांस्कृतिक वारसा म्हणून बघण्याची गरज वाटते.

**टीप :** पोतराजविरोधात झालेल्या आंदोलनातील सहभागी व साक्षीदार कार्यकर्त्यांपैकी प्रा. एस. टी. चिकटे (चंद्रपूर),राम गुंडिले, सामाजिक कार्यकर्ते (लातूर), कुसुमताई गोपले, सामाजिक कार्यकर्त्या (मुंबई), कोंडिबा कांबळे, पोतराज (परभणी), शंकर साठे, सामाजिक कार्यकर्ते (मुंबई), बी. जी. गायकवाड, सामाजिक कार्यकर्ते, (मुंबई) तसेच विविध ठिकाणच्या कार्यकर्त्यांकडून मिळालेली माहिती.

***



# १०

# गोंड राजे आणि चंद्रपूर

**चंद्रापूराची गं हवा,**
**काय सांगू नं येड्याला,**
**माय माझ्या धुरपताच्या,**
**बारा दरवाजे वाड्याला गं, धुरपतामाय...**

भारताच्या प्राचीन इतिहासावर नजर टाकल्यास आपला एकूण देश हा मातृदेवतांसोबतच शिवपूजक अधिक दिसतो. शैव आणि तंत्राच्या प्रभावाने एके काळी देशाचा कानाकोपरा प्रभावित झाला होता. त्यामुळे देशाच्या कानाकोपऱ्यात उभारण्यात आलेली मंदिर, शिल्प, लेण्या आदींमध्ये यासाठीचे चित्र स्पष्ट होते. त्याचा प्रभाव त्या-त्या काळातील अनेक राजवंशांवर होता. त्या प्रभावातूनच अनेक राजवंशातील महिलांच्या पुढाकाराने अनेक मंदिरे, लेण्या, शिल्पे आदी उभारण्यात आली. त्यातील बहुतांश शिव उपासक, मातृपूजक तसेच शाक्त आणि

तंत्राशी जवळीक असलेले दिसतात. यामध्ये गोंड राजा बल्लाळशहा यांची पत्नी राणी हिरातानी, बीरशहाची पत्नी व चंद्रपूरची राणी हिराई यांचे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागेल. हिरातानी आणि हिराई या दोघीही धार्मिक होत्या. त्यामुळे राणी हिरातानी आणि हिराईचा इतिहास समजून घेताना या देशातील इतर कर्तृत्ववान आणि आपली ओळख निर्माण करणाऱ्या महिलांचाही उल्लेख करणे आवश्यक वाटते.

महाराष्ट्रात राणी हिराईसह राजघराण्यातील अनेक महिलांनी मंदिरे बांधण्यासाठी पुढाकार घेतल्याच्या नोंदी सापडतात. यात कोकणवासीयांची कुलस्वामिनी म्हणून परिचित असलेली; परंतु मराठवाड्यातील बीड जिल्ह्यातील अंबाजोगाई येथे असलेली देवी योगेश्वरी (जोगेश्वरी) हिचे मंदिर परभणी येथे प्रशासन करणाऱ्या चारुदत्त यांच्या पत्नी चारुमती हिच्या हट्टामुळे बांधले गेले. इतकेच नाही, तर तिने जवळच असलेल्या चरणचारण या गावात रोज नवे शिवमंदिर हवे असा हट्ट धरून ३६५ शिवमंदिरे बांधून घेतली होती. आता त्यातील मोजकीच अशी दोन-चार देवळे शिल्लक आहेत. (पृ.३१) याशिवाय अनेक मंदिरे, धर्मशाळा आदींचे निर्माण करून त्यासाठी दानधर्म देणाऱ्या अहिल्याबाई होळकर यांचेही नाव अग्रस्थानी घ्यावे लागेल.

ओरिसातील आठव्या शतकात सत्तेवर येऊन तब्बल दोनशे वर्षे भौमकरवंशाने राज्य केले होते. या भौमकर राज्याची स्थापना ही राजा क्षेमकरदेव याने (इ. स. ७३६ ते ७८३) केली होती. त्यांच्या काळात बौद्धांचा खूप मोठा विकास झाला होता. या वंशाने देशात सर्वाधिक सत्ता आणि त्याचे नेतृत्व महिलांच्या हाती दिली होती. त्यात त्रिभुवन महादेवी, पृथ्वी महादेवी, त्रिभुवन महादेवी (तिसरी), गौरी महादेवी, दंडी महादेवी, बकुल महादेवी आदी होत्या. यात त्रिभुवन महादेवी हिने शाक्त पंथाच्या वाढीसाठी मोठे योगदान दिले होते.

विराजजयपूर हे त्या वेळी मोठे शक्तिकेंद्र म्हणून प्रसिद्ध झाले होते. यासोबत या वंशाच्या कालावधीतच मार्कंडेश्वर, शिशिरेश्वर, पालेश्वर आदी भव्य शिवमंदिरांची निर्मिती झाली होती. जगप्रसिद्ध आणि विविध वैशिष्ट्यांनी समृद्ध असे ६४ योगिनींचे मंदिर हिरा महादेवी हिने हिराकुडजवळ बांधले. त्याचीच प्रतिकृती भारतीय संसद भवनच्या

इमारतीसाठी इंग्रजांनी वापरली. योगिनींच्या मंदिराची ती प्रतिकृती जगविख्यात झाली.(पृ.३६)

तेराव्या शतकापर्यंत तांत्रिकांचे प्रबळ केंद्र म्हणून ज्याची ओळख होती, ते वेरूळ अजिंठ्यातील कैलास लेण्यातील नेत्रदीपक शिल्पाकृती या राजा कृष्णराज (इ. स. ७५५ ते ७८३) यांच्या पत्नी माणिकवतीने केलेल्या हट्टामुळे नियोजित झाली आणि पुढे त्यातूनच हे जगप्रसिद्ध कैलास लेणे हे शिल्प निर्माण झाले.(पृ.२५)

या कैलास मंदिरावर कांची येथील शिवमंदिराचा प्रभाव असल्याचे काही तज्ज्ञांचे म्हणणे आहे. हे विरूपाक्ष मंदिर दुसऱ्या विक्रमादित्य यांची पत्नी लोकमहादेवी हिने बांधले होते. तर तिच्याच त्रिलोकमहादेवी या बहिणीने विरूपाक्ष या मंदिराच्याच शेजारी त्रिलोकेश्वर मल्लिकार्जुन यांचे अत्यंत सुंदर मंदिर बांधले.

कांचीपुरम येथील कैलास मंदिर उभारण्यासाठी (पृ.२९) राजा पल्लव ऊर्फ नरसिंह यांची राणी रंगपताका हिने पुढाकार घेतल्याच्या नोंदी मंदिराजवळील शिलालेखात आहेत. जैनांचे तीर्थक्षेत्र म्हणून ज्यांची ओळख आहे आणि मराठीतील पहिला शिलालेख असलेल्या श्रावणबेळगोळ हे मंदिर राणी शांतलादेवी हिने बांधले. त्यासोबत तिने बेल्लूरच्या कप्पे-चेन्नगिरी मंदिरात पतीची, आपलीही मूर्ती स्थापली आहे.

बाराव्या शतकातील गुजरातमधील पाटण येथील राणी उदयमती हिने आपल्या पतीच्या स्मरणार्थ त्याचे स्मारक म्हणून भव्यदिव्य अशी 'राणी की वाव' ही जगप्रसिद्ध जलविहीर बांधली. आज त्या विहिरीची जागतिक वारसा यादीत नोंद आहे.

जगभरातील शेकडो पर्यटक या विहिरीला भेटी देत असतात. अशा प्रकारच्या जलविहिरी गुजरात-राजस्थानमध्ये राण्यांच्या नावाने प्रसिद्ध होत्या. त्यात 'हाडारानी की बावडी', 'नाथावती की बावडी' जोधपूरजवळ असलेली 'रूपाबाई की बावडी' आदी अनेक प्रसिद्ध असलेल्या, लक्ष वेधणाऱ्या विहिरींचा उल्लेख येतो. (पृ.४७)

याच कालावधीत गुजरातमधील राणी मीनलदेवी हिने अहमदाबाद शहरात असलेल्या धोलका तलावातील एका गणिकेचा असलेला महाल अडचणीत येऊ नये म्हणून त्याशेजारी दुसरा तलाव बांधून न्यायाची एक

वेगळी प्रतिमा जपली होती.

जगप्रसिद्ध कोणार्क मंदिर उभारण्यासाठी त्यावेळी शैवपंथी असलेल्या महाराणी रुद्राम्बाने (इ. स. १२६७ ते १३२५) मोठे आर्थिक साहाय्य केले होते. (पृ.५२) अशी असंख्य उदाहरणे आसाम, ओडिशासोबतच देशाच्या कानाकोपऱ्यांत सापडतात.

## गोंडांचे राजकीय, सांस्कृतिक योगदान

चंद्रपूरच्या राजकीय-सांस्कृतिक इतिहासामध्ये गोंड राजांचे खूप मोठे योगदान आहे. त्यांच्या योगदानाची दखल घेतल्याशिवाय चंद्रपूरचा इतिहास पूर्ण होऊ शकत नाही. चंद्रपूर आणि परिसरातील या भूभागावर सुमारे तीनशे ते पाचशे वर्षांहून अधिक (यावरून अनेक संशोधकांची मते वेगवेगळी आहेत) वर्षे राज्य चालविलेल्या या गोंड राजांची इतिहासामध्ये म्हणावी तशी दखल का घेतली नाही. गोंड राजाच्या प्रत्येक राज्यांची कारकिर्द आणि त्यांनी केलेले कार्य लक्षात घेता, ते समाजाभिमुख आणि राज्याच्या विकासाला विविध प्रकारे कलाटणी देणारे होते. प्रत्येक राजाने आपल्या कार्यकाळात आपल्या कामातून एक आदर्श लोकाभिमुख राज्यपद्धतीही निर्माण केली. त्यांच्या कार्यातून 'प्रजाहित आणि सर्वसमावेशपणा'ची दृष्टी विकसित झालेली दिसते.

गोंड या जमातीचा प्रामुख्याने वावर हा नर्मदेच्या दक्षिणेस गोदावरीपर्यंत आणि पूर्वेस छत्तीसगडपासून पश्चिमेस खान्देशापर्यंत दिसून येतो, असे अभ्यासकांचे म्हणणे आहे. प्रामुख्याने पर्वतरांगा, डोंगरदऱ्या, नदी दुर्गम भाग आदी पट्ट्याच्या प्रदेशातच यांच्या वस्त्या दिसून येतात. संशोधकांच्या मते, 'फेरसापेन हा त्यांचा प्रमुख देव मानला जातो. त्यालाच बडादेवही म्हटले जाते.' यासोबत भूथलापेन, मातिया, मागरा, पालगडवा, खाम, सालई आणि लाकडाचे देव तसेच मातीचे देव ते पूजत असतात. त्यांचा प्रत्येक सण आणि उत्सव हा सामूहिक असतो, यावरही संशोधकांचे एकमत आहे. 'निसर्गाशी समरस होऊन जगणारा गोंड समाज आहे. आपल्या देवतांना प्रसन्न करण्यासाठी गायीचा बळी देत असत. त्यातूनच ते त्यांच्या समूह भोजनाचा कार्यक्रम करीत असत. परंतु त्यांची ही प्रथा धुंड्या रामशहा यांच्या काळात बंद करण्यात आली.' मात्र, आदिवासी

जमातींचा एकूणच इतिहास लक्षात घेता तेही निसर्गपूजक आणि मातृपूजक असल्याचे दिसून येते. गोंड राजाने बांधलेली एकूण मंदिरे आणि त्यांची यादी लक्षात घेतली, तर त्यातील बरीच मंदिरे ही देवीची दिसतील.

गोंड प्रामुख्याने निसर्गाशी, कृषिमायेशी साधर्म्य साधून वन्यसंस्कृती जपणारा एक आदिवासी समाज आहे. या जमातीमध्ये राज गोंड, महाराज गोंड, माडिया गोंड, कोरकू गोंड, द्रूक गोंड, धूर गोंड, लिंग गोंड, बडी गोंड, डोखर गोंड आदी जाती आढळतात. त्यातही थुकेल, बडी आणि डोखर हे अस्पृश्य समजले जातात. या विविध प्रदेशांत असल्या तरी त्यांच्यातील अनेक नावे वेगवेगळ्या प्रकारची आहेत.

राजसत्तेत आल्यानंतर प्रत्येक गोंड राजांनी आपल्या कार्यकर्तृत्वाने वेगळी ओळख निर्माण केली. वेगळा ठसा उमटविला. चंद्रपूरच्या राजवंशात आणि चंद्रपूरच्या गादीवर राज्य करणारा पहिलाच स्वतंत्र राजा म्हणून ज्याची ओळख आहे, त्या हीरशहाने (इ.स. १४९७-१५२३) एकीकडे मंदिरे बांधत असतानाच दुसरीकडे तलावांची निर्मिती केली आणि आपल्या राज्यात जमीनदारीची स्थापना करून त्यासोबतच आपल्या राज्यात त्यांनी जमीनदारीपद्धत सुरू केली. अत्यंत दूरदृष्टीचा आणि शेतकरी कास्तकारी यांच्या हिताचा हा राजा होता. 'गोंडकालीन इतिहासामध्ये पहिल्यांदा याच राजाने जमीनदारांचे संमेलन बोलावल्याची नोंद आहे.' त्या निमित्ताने शेतकऱ्यांचे अनेक प्रश्न आणि विषय सोडवण्यासाठी प्रयत्न केला होता.

'हीरशहाने आपल्या कार्यकाळात गरीब शेतकऱ्यांना वेळोवेळी आर्थिक मदत देण्याचा पायंडा निर्माण केला होता. इतकेच नव्हे, तर आर्थिक मदत देऊन जमिनी लागवडीस प्रोत्साहन देण्याचे मोठे काम केले. जमीनदार वरचढ होऊ नये, याची काळजी घेत जमीनदाराच्या मर्यादासुद्धा त्यांनी निश्चित केल्या होत्या.' त्यामुळे त्यांच्यामध्ये एकसमानता कायम जपली जावी, याची काळजी त्यांनी घेतली होती. शिवाय चंद्रपूरजवळ असलेल्या जुनाना येथे गरीब कास्तकरांच्या सोयीसाठी तलाव बांधून देण्याचे ऐतिहासिक कार्यदेखील हीरशहा यांनी केल्याच्या नोंदी विविध संशोधकांनी केल्या आहेत. (पृ.१३६)

राजूरकर म्हणतात, जमीनदारीपद्धत सुरू केलेल्या गोंड राजांनी

जमीनदारांची संमेलने भरवली. जमिनी ओलिताखाली आणण्यासाठी विविध प्रकारचे उपक्रम राबवले. जे पाट बांधतील, त्यांना जमिनी बक्षीस देण्यासाठी पुढाकार घेतला. जे जमिनी केवळ पडीक ठेवतील, त्यांच्या जमिनी लागवडीखाली यावी म्हणून त्यांना ती काढून घेण्याची ताकीद देणे आणि एखाद्याने जंगल साफ करून वस्ती वसवल्या, त्याला सरदार बनवून त्या भागाच्या सनदी देण्याचे मोठे कार्य त्यांनी केले. ज्यांनी तलाव बांधले, त्या तलावाच्या पाण्याखाली जितकी जमीन ओलिताखाली आली, त्या सर्व जमीन बक्षीस दिल्या.

आपल्या राज्यात विद्वानांची गरज असल्याचे लक्षात आल्याने राजा कर्णशहा यांनी तेलगू ब्राह्मणांना आश्रय दिला. त्यामुळे हा राजा विद्वानांचा आश्रयदाता म्हणून परिचित होता. ही उदारता केवळ गोंडकालीन राजांमध्येच दिसून येते. त्याची शेतकऱ्यांना जमीनदार बनविणाऱ्या मलिक अंबर आणि त्यानंतर छत्रपती शिवाजी महाराजांनीही केले होते. शेतकऱ्यांना जमीनदार बनवून त्यांना प्रोत्साहन देण्याचे खूप मोठे कार्य केले होते. त्याची आठवण गोंड राजांचे एकूण कार्य पाहून येते.

चंद्रपूरच्या महाकाली मंदिरासमोरच नरबळीसारख्या प्रथा सुरू होत्या, त्या प्रथा बंद करण्याचे मोठे कार्य गोंड राजांनी केले. बहुतेक राजे हे आध्यात्मिक, शिवभक्त, मातृदेवतेचे पूजक होते. त्यामुळे त्यांच्या कार्यकाळात मंदिरे, तलाव, विहिरी आदी बांधून राज्याच्या विकासासाठी एक नवे आयाम देण्याचे मोठे कार्य झाले.

खांडक्या बल्लाळशहा याने चंद्रपूरच्या गादीवर येताच रामाळा तलावाची निर्मिती करून त्याने चंद्रपूरची प्राचीन ओळख असलेले इंदपूर हे नाव सुरू केले आणि त्यातून पुढे चंद्रपूर झाल्याचे राजूरकर म्हणतात. (पृ.१२९) तसेच राणी हिरातानीच्या मार्गदर्शनाखाली चंद्रपूरच्या तटाचा पाया रचून ती राजधानी वसवली. तर त्याच्या हीरशहा या मुलाने चार दरवाजे, खिडक्या उभारल्या आणि हीरशहाचा नातू कर्णशहा याच्या कारकिर्दीत तटाची अर्धी उंची झाली. तर बाबाजी बल्लाळशहा यांचा मुलगा आणि गोंड राजांमध्ये अत्यंत सुधारणावादी राजा म्हणून ओळख निर्माण करणाऱ्या धुंड्या रामशहाने तटाचे काम पूर्ण केले.

थोडक्यात चंद्रपूरच्या या किल्ल्याचे काम खांडक्या बल्लाळशहाच्या

(इ. स. १४७२-१४९७) कारकिर्दीत सुरू झाले आणि गोंड राजाच्या सहाव्या पिढीत ते शंभर वर्षे चालून धुंड्या रामशहा यांच्या (इ. स. १५९७-१६२२) मध्ये पूर्ण झाले, त्यासाठी या काळात सुमारे सवाकोट रुपये खर्च झाल्याचे संशोधकांनी नमूद केले आहे.

## गोंड राजांचा पाया

'गोंड राज्याच्या राजवटीचा पाया बाराव्या शतकात कोल भिल्ल नावाच्या पराक्रमी महापुरुषाने घातला.' त्यानेच सुरुवातीला गोंडांना राजकीय दृष्ट्या संघटित करण्याचे काम केले. सुरुवातीला आलेल्या संधीचा योग्य वापर करत गोंड जमातीला राज्यकर्ती जमात बनविले. त्याने सुरुवातीला माणिकगडचा बळकट किल्ला जिंकून घेतला आणि तेथूनच गोंड राजाच्या राजकीय वाटचालीची मुहूर्तमेढ रोवली. (पृ.१०६) 'कोल भिल्ल यांनी त्यावेळी मोवाड आंध्र प्रदेशातील आत्राम घराण्याचा पराक्रमी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या गोंड जमातीच्या भिका ऊर्फ भीम बल्लाळसिंह (इ. स. १२४७-१२७२) याची निवड करून त्याच्याकडे गोंड राजा होण्यासाठी पहिले नेतृत्व दिले होते. पुढे हाच चंद्रपूरच्या गोंड राजाचा संस्थापक व राजवंशाचा मूळ म्हणून ओळखला गेला.' गोंडाचा अखेरचा राजा हा नीलकंठशहा (इ. स. १७३५-१७५१) ठरला.

गोंड राजवटीचा काळ त्यांच्या वंशावळीवर संशोधकांचे एकमत दिसत नाही. त्यातही अ. ज. राजूरकर यांनी दिलेली वंशावळ (पृ.११५) सुटसुटीत वाटते. त्यांनी गोंड राजाच्या पहिली शिरपूर येथील गादी तेथील झालेले तीन राजे, त्यानंतर बल्लाळपूर येथे आणि पुढे चंद्रपूर येथील स्थलांतरित झालेल्या गादी आणि त्यांच्या राजांचा कार्यकाळ दिला आहे. त्या यादीनुसार गोंड राजाच्या शिरपूर येथे गादीची स्थापना इ. स. १२४७ दरम्यान झाली. 'पहिला राजा भीम बल्लाळसिंह (इ. स. १२४७-१२७२), दुसरा खर्जा (इ. स. १२७२-१२९७), तिसरा राजा हीरसिंह (इ. स. १२९७-१३२२) हे तीन शिरपूरचे गोंड राजे येथील गादीवर होते. या गादीचे पुढे बल्लाळपूर येथे इ. स. १३२२ मधे स्थलांतर झाले. त्यानंतर त्यांची ओळख बल्लाळपूरचे गोंड राजे म्हणून झाली, त्यात सात गोंड राजांनी बल्लाळपूरचे गोंडराजे म्हणून कारभार पाहिला. त्यात आदिया

बल्लाळसिंह (इ. स. १३३२-१३४७), तलवारसिंह (इ. स. १३४७-१३७२), केसरसिंह (इ. स. १३७२-१३९७), दिनकरसिंह (इ. स. १३९७-१४२२), रामसिंह (इ. स. १४२२-१४४७), सूर्जा बल्लाळसिंह (इ. स. १४४७-१४७२), खांडक्या बल्लाळशहा (इ. स. १४७२-१४९७) अशी एकूण सात राजांची बल्लाळपूरचे गोंड राजे म्हणून नोंद आहे. तेथून गोंड राजाच्या गादीचे इ. स. १४९७ मध्ये चंद्रपूर येथे स्थलांतर झाले आणि तेथून चंद्रपूरच्या १३ गोंड राजांची वेगळी ओळख निर्माण झाली. त्यामध्येच महाकाली मंदिर बांधलेल्या राणी हिराई हिचाही अत्यंत वेगळ्या राजवटीचा कालखंड येतो.'

चंद्रपूरच्या गोंड राज्यात हीरशहा (इ. स. १४९७-१५२२), अकबा-लोकबा (इ. स. १५२२-१५४७), कोंडीशहा ऊर्फ कर्णशहा (इ. स. १५४७-१५७२), बाबाजी बल्लाळशहा (इ. स.१५७२-१५९७), धुंड्या रामशहा (इ. स. १५९७-१६२२), किंबा ऊर्फ कृष्णशहा (इ. स. १६२२-१६४०), मानजी बल्लाळशहा (इ. स. १६४०-१६६७), रामसिंग (इ. स. १६६७-१६८४) किसनसिंह (इ. स. १६८४-१६९६), बीरशहा (इ. स. १६९६-१७०४), राणी हिराई व रामशहा (इ. स. १७०४-१७१९), रामशहा (इ. स. १७१९-१७३५) आणि गोंड राजवटीचा शेवटचा राजा नीळकंठशहा (इ. स. १७३५-१७५१) यांची नोंद होते.' (पृ. ११५)

चंद्रपूरच्या सर्वच गोंड राजांवर महत्त्वाचे संशोधन, इतिहासलेखन अ. ज. राजूरकर, दत्ता तन्नीरवार, डॉ. प्रभाकर गद्रे आणि अलीकडे अशोक जयराज सिंह ठाकूर आदींनी केले आहे. यातील इतिहास संशोधकांनी बरेच लिखाण केले आहे. मात्र, अजूनही खूप सारे संशोधन होण्याची गरज आहे. खांडक्या बल्लाळशहा हा उद्ध्वस्त झालेल्या चंद्रपूर परिसरात आला, तेव्हा त्याला अंचलेश्वर आणि महाकाली मंदिरांच्या खुणा सापडल्या. मात्र, अनेक ठिकाणी प्राचीन उल्लेख असलेले चंद्रपूर शहर उद्ध्वस्त का झाले, त्यावर लक्षात येण्याजोगे संशोधन झालेले दिसत नाही. काहींनी परशुरामाचा दाखला दिला असला तरी तो पटण्याइतपत नाही. गोंडांच्या राजवटीपूर्वी विदर्भात मोठ्याप्रमाणात नागांच्या राजवटींचा उल्लेख मिळतो, त्या दृष्टिकोणातून याकडे पाहून त्याचा उलगडा करता येईल असे वाटते. उद्ध्वस्त झालेल्या चंद्रपूरला

शोधून त्याला प्राचीन नाव इंदपूर देण्याचे आणि पुन्हा इथे राजधानी निर्माण करण्याचे मोठे काम गोंड विशेषतः बल्लाळशहा आणि राणी हिरातानी यांच्या काळात केले. त्यांनीच चंद्रपूरला प्राचीन ओळख इंदपूर आणि जुने वैभव पुन्हा मिळवून त्याची ओळख निर्माण केली. त्यावर अखेरच्या टप्प्यात राणी हिराईने कळस चढविला.

चंद्रपूर आणि एकूणच येथील परिसर पाहिल्यास येथील सांस्कृतिक, धार्मिक वैभव लक्षात येते. गोंड राजांनी आपल्या कार्यातून अनेक नवे आयाम घालून दिले. त्या राजांच्या यादीतील एकमेव महिला राणी हिराई हिचेही कार्य देशातील अनेक नामवंत महाराण्यांच्या यादीत वरच्या स्थानावर आहे. आपल्या पतीचे उभारलेले स्मारक, महाकाली आदी मंदिरे याची साक्ष देत आहेत.

गोंड राजांच्या राजवटीमध्ये प्रामुख्याने शिरपूर बल्लाळपूर आणि चंद्रपूर या गाद्यांचा उल्लेख येतो. याच भागामध्ये सुमारे सहाशे वर्षे गोंड राज्याचे राज्य अस्तित्वात होते. ते शासक म्हणून कामकाज पाहत होते. त्यामध्ये एकूण २३ राजांचा उल्लेख येतो, त्यामध्ये एकमेव महिला राणी, महिला शासक म्हणून राणी हिराई यांचा उल्लेख येतो. चंद्रपूरच्या गादीवर ज्या १३ गोंड राजांचा उल्लेख येतो, त्यात एकूणच गोंड राजाच्या राजवटीमध्ये सर्वाधिक कर्तृत्ववान आणि नेत्रदीपक असे कार्य केलेली एक महिला राणी म्हणून राणी हिराईचा गौरवाने उल्लेख होतो. पती बीरशहा यांच्या मृत्यूनंतर न डगमगता आपला राज्यकारभार अत्यंत प्रभावीपणे चालविणारी, अत्यंत दूरदृष्टी असलेली लोककल्याणकारी ही महिला तसेच प्रजादक्ष राणी म्हणूनही प्रसिद्ध होती. तिच्या या दूरदृष्टीपणामुळे चंद्रपूरची एक वेगळी सांस्कृतिक ओळख निर्माण झाली, त्यात तिचे सर्वाधिक योगदान आहे. तिनेच या परिसरात अनेक मंदिरे, तलाव विहिरी यांचे निर्माण करून चंद्रपूरचा नावलौकिक देशभरात पोहोचविण्याचे काम केले. तिची महाकालीवर खूप श्रद्धा होती. ती धार्मिक वृत्तीची होती. या श्रद्धेतूनच तिने झटपट नदीच्या तटावर महाकाली आणि अंचलेश्वरचे मंदिर बांधले.

राणीने पती बीरशहा यांच्या आठवणीमध्ये त्यांचे नेत्रदीपक असे समाधीस्थळ बांधले. असेच एक अनोखे उदाहरण आठव्या शतकात

गुजरातमध्ये पाटण आदी परिसरात सहाशे वर्षे राज्य केलेल्या सोळंकी वंशातील महापराक्रमी राजा भीमदेवाची पत्नी उदयमतीचे आहे. तिने आपल्या पतीच्या स्मरणार्थ विहिरीच्या रूपाने जगप्रसिद्ध असे जलमंदिर असलेले 'राणी की वाव' बांधले. हे मंदिरही प्रेमाचे, स्नेहाचे प्रतीक म्हणून ओळखले जाते.

राणी हिराई ही मोगल सेनापती बिलनसिंह मडावी यांची मुलगी. मध्य प्रदेशातील होशंगाबादजवळ असलेल्या मदनापूर हे तिचे माहेर. वयाच्या सहाव्या वर्षी तिचा बीरशहा यांच्यासोबत विवाह झाला होता. परंतु त्यांना मुलगा नव्हता. त्यामुळे त्यांनी बीरशहा यांचा चुलतभाऊ गोविंदशहा याच्या रामशहा याला लहानपणीच दत्तक घेतले होते. त्यांना मानकुंवर नावाची मुलगी होती. ती देवगडच्या राजघराण्यातील दुर्गशहा याला दिली होती. परंतु त्याने तिचा उपमर्द केल्याने ती माहेरीच होती. त्यासाठी हिराई हिला खूप राग होता. राजा बीरशहाने दुर्गशहाचे महाकालीचे नाव घेत त्याचे शीर धडावेगळे केले. त्यातील विजय हा महाकालीच्या कृपेनेच मिळाला, असे समजून तिने ते शीर देवीला वाहिले आणि महाकालीचे मंदिर बांधले. चंद्रपूरच्या एकूणच सांस्कृतिक उभारणी राणी हिराई हिचे खूप मोठे योगदान आहे. त्यामुळे तिचा हा कार्यकाळ चंद्रपूरच्या इतिहासातील वास्तुकलेचा सर्वात मोठा सुवर्णकाळ म्हणून ओळखला जातो. इतकेच नव्हे, तर अनेक बांधकामे, दानधर्म करून आपले नाव तिने अजरामर केले होते.

राणी हिराई या धार्मिक वृत्तीच्या आणि अत्यंत प्रभावी दूरदृष्टी असलेल्या राज्यकर्त्यादेखील होत्या. त्यांना सुमारे १५ वर्षांची राजकीय कारकिर्द मिळाली होती, परंतु त्या कार्यकाळात त्यांनी चंद्रपूरच्या गादीचे भारतीय इतिहासात नाव कोरून ठेवले. औरंगजेबाच्या कैदेतून छत्रपती शिवाजी महाराज यांनी आपली सहीसलामत सुटका करून घेतली होती. तसेच दुसरे ऐतिहासिक उदाहरण हे राणी हिराईच्या संदर्भातील आहे. तिने आपल्या पती बीरशहा याची औरंगजेबाच्या कैदेतून सहीसलामत सुटका करून घेतली होती. एका महिलेने आणि तेही औरंगजेबासारख्या बलाढ्य आणि ताकदवान राजाला चकवा देत आपल्या पतीची सोडवणूक करणारे उदाहरण क्वचितच दिसते.

## खांडक्या बल्लाळशहा आणि महाकाली मंदिर

खांडक्या बल्लाळशहा याच्या संदर्भातील माहिती अनेक संशोधकांनी आपल्या पुस्तकातून मांडली आहे. तो एकदा शिकारीला गेला असता एकदा झटपट नदीवर आला. त्याला त्या काठावर एक कुंड दिसले. त्याचे पाणी पिऊन त्या पाण्यानेच त्यांनी तोंड धुतले आणि तिथे विश्रांती घेतली. तो राजधानी बल्लाळपूर येथे परत गेला. दुसऱ्या दिवशी त्याच्या अंगावर असलेले कोड म्हणजेच खांडके बरेच कमी झाल्याचे दिसून आले आणि त्याच्या चेहऱ्यावर तेच आल्याचे दिसल्याने त्याची पत्नी हिरातानी हिने राजाने ज्या कुंडावर पाणी प्यायले होते, ते कुंड आपल्या सैन्याच्या मदतीने शोधून काढले आणि त्या ठिकाणी अंचलेश्वर नावाचे महादेव मंदिर बांधले. शिवाय जवळच दक्षिणेला असलेल्या भुयारात खांडक्या बल्लाळशहाला दगडात कोरलेली महाकाली देवीची मूर्ती आढळली, ते भुयार त्याने स्वच्छ करून त्यावर एक छोटेसे देऊळ बांधले. उद्ध्वस्त झालेल्या चंद्रपूरच्या नव्या उभारणीचा पाया राणी हिरातानी आणि बल्लाळशहा यांनी अंचलेश्वर आणि महाकाली मंदिर बांधून केला, राणी हिराईवर बरेचशे संशोधन झाले असले तरी त्या तुलनेत हिरातानीवर फार संशोधन झालेले दिसत नाही, अन्यथा हिराईसोबत या राणीचाही देदीप्यमान असा इतिहास समोर आला असता. राजाला आपल्या मर्जीने प्रत्येक लोकहिताचे, नवीन कार्य करण्यासाठी प्रेरित करणारी, त्यांच्यासोबत खांद्याला खांदा लावून मंदिरे आदी बांधून घेणारी ही हिरातानी महाराणी निश्चितच अनोखी असावी. बल्लाळशहा यांच्यानंतर राणी हिराई हिने इ.स. १७०७ ते १७१९ काळात जुने मंदिर पाडून त्या ठिकाणी भव्य असे महाकालीचे नवीन मंदिर बांधले. तेव्हापासून तिने चैत्र पौर्णिमेला महाकाली मंदिराच्या यात्रेची सुरुवात केली. राणी हिराईच्या मंदिर बांधण्यामागील मुख्य कारणांमध्ये राजा बीरशहा याने आपल्या जावयाचा म्हणजे दुर्गशहा याचा शिरच्छेद केल्याने त्या विजयाचा उत्सव आणि त्यावर मिळविलेल्या विजयाची स्मृती कायम राहावी म्हणून तिने हे मंदिर बांधले. (पृ. १५८) राणी हिराईने चंद्रपूर परिसरात केवळ मंदिरेच

नाही, तर अनेक तलावांची निर्मितीही केली. त्या वेळी आपल्या शहरातील जनतेला मुबलक पाण्याची सोय करण्यासाठी शहरातील तलावातील पाणी पुरवण्यासाठी मातीचे पाइप तयार करून त्यासाठी ठिकठिकाणी 'हतनी' म्हणजे मोठे हौद तयार केले. तिने शहरात अशा प्रकारचे बारा हौद म्हणजेच पाणीसाठा करणाऱ्या टाक्यांची सोय केली होती. जटपुऱ्यात अजूनही साक्ष देणारी पायऱ्याची विहीरही तिनेच बांधली. कारभार हाती घेताच तिने घुटकाळा तलाव बांधला होता. शहरीकरणांमध्ये त्याचे अस्तित्व कधीच संपून गेल्याचे दिसते. महाकाली मंदिराच्या दक्षिण बाजूला असलेली प्राचीन विहीरदेखील बांधण्याचे श्रेयही तिचेच आहे.

राणी हिराईने चंद्रपूरपासून सुमारे ४० किमी. असलेल्या मार्कंडेश्वर मंदिराचा जीर्णोद्धारही केला. चंद्रपूरच्या महाकालीप्रमाणे माघ महिन्याच्या कृष्ण पक्षात येणाऱ्या महाशिवरात्रीला यात्रा सुरू केली. (पृ.१८५) वैरागड येथे वैलोचना नदीच्या काठावर गोरंजाईचे मंदिरही बांधले. राणी ही लष्करी डावपेचात अत्यंत हुशार होती. म्हणूनच तिला राजसत्ता नीट सांभाळता आल्याचे ज्येष्ठ संशोधक तन्नीरवार म्हणतात.(१५४)

तिनेच आपल्या पतीची आठवण म्हणून अंचलेश्वर मंदिराच्या उत्तर दिशेला असलेल्या हडवाड्यात प्रेमाचे प्रतीक म्हणून ऐतिहासिक अशी समाधी बांधली. हडवाड्यात राजघराण्यातील इतर अनेक जणांच्या समाधी आहेत. पहिली समाधी बीरशहा याची अत्यंत भव्य आणि लक्ष वेधणारी दिसून येते. याच समाधीसमोर चंद्रपूरचे सांस्कृतिक वैभव निर्माण करणाऱ्या आणि इतिहासात अजरामर झालेली महाराणी हिराईची समाधी आहे. ती समाधी दत्तक पुत्र रामशहाने इ.स. १७२७ मध्ये बांधली असल्याचे तन्नीरवार म्हणतात.(१५८)

**संदर्भ :**


१. कर्तृत्वशालिनी महाराणी हिराई : दत्ता तन्नीरवार, पृ. १५४, १५८.
२. सम्राज्ञींची स्फूर्ती-शिल्पे : सुनीला सोवनी, पृ. २५, २९, ३१, ३६, ४७, ५२.
३. चंद्रपूरचा इतिहास : अ. ज. राजूरकर, पृ. १०६, ११५, ११६, १२९, १३६, १३७, १८५.
४. गोंडकालीन चंद्रपूर : अशोक जयराज सिंह ठाकूर, पृ. १८, १९.


***



# ११
# महाकाली मंदिर आणि स्थापत्यकला

माय माझी धुरपता,
तुझं मूळ घरं खोलं
असा ऐकू येईना,
तुमचा पुंजाऱ्याचा बोलं वं...

'तंत्रवाङ्मय', 'संमोहन तंत्र' आणि 'पुनश्चर्यार्णव' आदी ग्रंथांमध्ये महाकाली संदर्भातील अनेक प्रकारचे भेद स्पष्ट करण्यात आले आहेत. त्यात महाकाली ही शिवाची शक्ती आणि ती गुह्यकाली असल्याचे दाखले देण्यात आले आहेत. त्या पार्श्वभूमीवर महाकाली मंदिर आणि तिच्या

एकूणच रचनेकडे पाहणे आवश्यक वाटते. महाकाली मंदिर हे मूळतः गुह्य मंदिराच्या रचनेतील मंदिर आहे. मूळ मंदिर हे एक प्रकारची गुंफा होती. ती गुंफा तिसऱ्या किंवा चौथ्या शतकात अथवा वाकाटकांच्या काळात कोरण्यात आली असावी, असे संशोधकांना वाटते. अशाच प्रकारच्या काही गुंफा, शैलगृहे चंद्रपुरात पठाण दरवाजापासून एक किलोमीटर अंतरावर माना टेकडीकडे कोरलेले असल्याचे डॉ. रघुनाथ बोरकर यांनी स्पष्ट केले आहे.

या सर्व गुंफा बौद्धकालीन असाव्यात, असाही अंदाज व्यक्त करण्यात येतो. त्याला ठोस पुरावा मिळत नाही. चंद्रपूर शहर उद्‌ध्वस्त झाल्यानंतर ही गुंफा आणि अंचलेश्वर येथील गोखुरकुंड दुर्लक्षित झाले होते. ते बल्लाळशहा यांनी शिकारीच्या निमित्ताने शोधले. त्याच्या या शोधानंतरच महाकाली मंदिराचा नव्याने इतिहास सुरू झाला. त्यापूर्वीचा इतिहास अथवा लोककथा काळाच्या ओघात लुप्त झाल्या असाव्यात.

महाकाली मंदिरातील या गुंफा कशासाठी होत्या, त्यावर अजूनही फारसे संशोधन झालेले दिसत नाही. तरीही दुर्लक्षित झालेल्या या गुंफा आणि त्यातील महाकालीची दगडातील कोरलेली मूर्ती, बल्लाळशहा आणि त्याची पत्नी हिरातानी यांच्या पुढाकारामुळे पहिल्यांदा जगासमोर आली, हे त्यांचे योगदान नाकारता येत नाही. महाकालीची दगडात कोरण्यात आलेली मूर्ती शिल्प आणि गोखुरकुंडावर बल्लाळशहा यांनी सुरुवातीला छोटेखानी मंदिर बांधले होते. तिथून या दोन्ही मंदिरांचा इतिहास सुरू झाला. बल्लाळशहा आणि त्याची पत्नी हिरातानी यांनी बांधलेल्या याच मंदिरावर पुढील टप्प्यात महत्त्वाचा विकास राणी हिराईने आपल्या काळात केला. तिने आपल्या कार्यकाळात अंचलेश्वर आणि महाकालीचे देखणे मंदिर बांधले. ही दोन्ही मंदिरे म्हणजे मंदिर मोगल आणि गोंडकालीन चित्रकला आणि शिल्पकला यांचा उत्तम संगम आणि त्याचे दर्शन घडवणारी ही मंदिरे आहेत.

चंद्रपूरला येणाऱ्या पोतराज आणि देवकरीण महाकालीच्या या मंदिराचे विविध अंगाने वर्णन आपल्या गाण्यातून करतात. चंद्रपूर म्हणजेच चांदा आणि त्या चांद्याच्या देवीचे, महाकाली म्हणजे धुरपता मायचे मंदिर आणि त्याचा कळस, त्यातील बारा दरवाजे, त्यावर साकारण्यात आलेली

चित्रे, उभारण्यात आलेले खांब, मंदिराच्या आतील आणि बाहेरील विविध शिल्प-चित्रांतून कोरण्यात आलेले त्याचे सौंदर्य धुरपता मायवरील म्हटल्या जाणाऱ्या लोकसाहित्याच्या गाण्यातून पदोपदी दिसून येते.

राणी हिराईने आणि गोंड राजाच्या योगदानाचा उल्लेखदेखील देवकरीण आपल्या गाण्यातून करतात. महाकाली मंदिरासोबतच गोंड राजांनी बांधलेला किल्ला, बांधलेल्या तलावांचा आणि त्या तलावातील पाण्याचा आवर्जून उल्लेख गाण्यांमध्ये करताना दिसतात.

## महाकाली मंदिर आणि बल्लाळशहा

महाकाली मंदिर हे पहिल्यांदा खांडक्या बल्लाळशहा याने इ.स. १४७२ ते १४९७ या काळात बांधल्याचा उल्लेख येतो. त्यानेच त्या काळी उद्ध्वस्त असलेल्या चंद्रपूर परिसरातील अंचलेश्वर मंदिराची उभारणी केली आणि त्यानंतर गुह्येमध्ये भुयारात दगडात कोरलेली महाकाली देवीची मूर्ती शोधून त्या ठिकाणी छोटेसे देऊळ बांधल्याचा उल्लेख राजूरकर यांनी केला आहे.( पृ.११६)

मंदिराच्या एकूण स्थापत्यरचना, त्याच्या सौंदर्यावर डॉ. बोरकर, बी. टी. जीवने, दत्ता तन्नीरवार अ. ज. राजूरकर आदींनी सविस्तर मांडणी केलेली आहे. या मंदिरातील शिल्पकला, चित्रकला त्यावरील प्रभावांवर अत्यंत समर्पकपणे या संशोधकाने विश्लेषण केलेले आहे. मात्र, यामध्ये तिसऱ्या किंवा चौथ्या शतकात कोरलेल्या महाकाली मंदिरातील गुंफासंदर्भात अनेक उलगडे होणे बाकी आहेत.

मंदिराच्या गुहेतील महाकालीच्या गुह्येतील शिल्प कोणत्या काळात कोरण्यात आले, यावर संशोधकांचे एकमत झालेले दिसत नाही. त्याचा काही कालावधी हा त्या शिल्पाला लावण्यात आलेल्या शेंदूर आणि त्याच्यावर तयार झालेल्या थरामुळे त्याची नीट ओळख होऊ शकत नाही, असे काही संशोधकांना वाटते. तर काहींनी महाकालीच्या पुराणातील एकूण वर्णनाप्रमाणे त्या शिल्पाचे वर्णन केले आहे. तरीही देशातील एकूणच मातृदेवतांची प्राचीन परंपरा आणि त्याचा इतिहास लक्षात घेता मातृदेवताची शिल्प आकारहीन दगडात अथवा विविध प्रकारच्या आकारात दिसतात. त्याच पार्श्वभूमीवर महाकाली मंदिराचे हे शिल्प अत्यंत

प्राचीन काळातील असले पाहिजे. अथवा शाक्त, तांत्रिकाचा प्रभाव संपूर्ण परिसरावर होता, त्या काळात ही कोरली गेली असावीत.

प्राचीन काळपासून मरिआई, मरियम्मा आदी देवतांची मंदिर शिल्पे त्यासोबतच मारुती अथवा हनुमानाची देवळेही गावाच्या बाहेर अस्पृश्य वस्त्यांच्या शेजारी अथवा ही चौरस्त्यावर, रस्त्याच्या कडेला असायची. अथवा गावाच्या वेशीबाहेरच असल्याचे दिसतात. महाकाली मंदिर ही चंद्रपूरच्या वेशीबाहेर, चौरस्त्यावरच आहे. मंदिराच्या समोरून जाणाऱ्या रस्त्यावरून एके काळी व्यापारी मार्ग अथवा इतर मार्गाचा विकास झाला असावा. महाकाली मंदिर हे दुरून पाहिल्यास एखाद्या राजवाड्याप्रमाणे दिसते. तशीच त्याची रचना करण्यात आली आहे. मंदिराच्या शिखराची





रचना ही मोगल शैलीच्या मिनाराप्रमाणे दिसते. चार मिनारे उभारण्यात आली आहेत. एकूण १६ चतुष्कोन स्तंभावर उभारण्यात आलेले हे मंदिर चार प्रवेशद्वार, आठ खिडक्या असे स्वरूप आणि रचना असलेले आहे. येथे येणाऱ्या भक्तांसाठी चार प्रवेशद्वारांपैकी पश्चिम आणि आग्नेय दिशेला असलेले दरवाजे सुरू असतात. तर दशर्नासाठी दोन दरवाज्यातून प्रवेशमार्ग आहेत. मंदिराच्या पूर्व-पश्चिम आणि दक्षिण भिंतीवर प्राणी, पक्षी, नक्षी, मानवी चित्र-शिल्प, बाह्यांगावर आणि आतील भागांवर ही अशीच चित्र-शिल्प कोरण्यात आली आहेत.

मंदिराची एकूण रचना आणि त्याचे सौंदर्यावर राणी हिराईने खूप लक्ष देऊन ती तयार केली असावीत. गोंडकालीन शिल्पकला आणि त्याचे सौंदर्य या मंदिराच्या अनेक चित्र-शिल्पातून प्रतिबिंबित होताना दिसते. यातील अनेक चित्रे ही वेरूळ अजिंठा लेण्यातील रंगीत चित्रांची छाप

पडलेली दिसतात. महाकाली मंदिरात काढण्यात आलेली ही रंगीत चित्रे कलाकृतीचा उत्तम नमुना आहेत. त्यामुळे ही गोंडकालीन रंगीत चित्रे विदर्भात दुसरीकडे कुठेही नसल्याचे तन्नीरवार म्हणतात.

या मंदिरात प्रामुख्याने मूर्ती शिल्प भित्तिचित्रे याचा समावेश होतो. त्यात मुख्य प्रवेशद्वारासमोर डावीकडील शिल्पात राणीचे स्नान, राजा



राणी संदेश, मल्लयुद्ध, श्रावण बाळ, अश्वमेघ यज्ञ, दहीहंडी, मेण्यात बसलेले राजाराणी यांची शिल्पे कोरली आहेत. त्यासोबत दक्षिण बाजूला डावीकडून शिल्पात यशोदा-कृष्ण, कावड धरलेला पुरुष, मदारी, हत्तीची झुंज, गवळणीची गाऱ्हाणे आदी चित्र-शिल्पांचा समावेश दिसतो.

मंदिराच्या आतील शिल्पांमध्ये प्रामुख्याने गायीवर झडप घेणारा वाघ, युद्धप्रसंग आणि ध्यान अवस्थेतील अथवा भक्तीत तल्लीन झालेले, नमस्कार करत असलेले भक्त कोरण्यात आले आहेत. मदारी, घोडेस्वार, हत्तीस्वार, युद्धावर जाण्यापूर्वीचा प्रसंग आणि युद्धात जय मिळविण्यासाठी शुभचिंतकाचे पूजन आदी शिल्प-चित्रात अत्यंत समर्पकपणे साकारण्यात आली आहेत. काही शिल्पांवर संशोधकांनी फारसे लिहिलेले नाही, अशीही बरीचशी शिल्प इथेही पाहायला मिळतात. ती शाक्त, तांत्रिकांचा संबंध अधोरेखित करणाऱ्या शिवपूजक हिराई हिच्या नेणिवेतून निर्माण करण्यात आली असावीत.

महाकाली मंदिरातील मूळ मूर्ती मातृदेवतेची, म्हणजेच महाकालीची असली तरी त्यानंतर समोर महादेवाची पिंड आणि इतर काही मूर्ती या नंतरच्या काळात स्थापित करण्यात आल्या असाव्यात. बाजूला असलेले हनुमानाचे मंदिर आणि गणपतीचे मंदिर ही हिराईने मंदिर उभे केल्यानंतर अथवा त्या दरम्यानच्या काळातील असावेत.

मंदिराच्या मुख्य प्रवेशद्वारासमोर असलेल्या पादुकाजवळ पूर्वी भुयार होते, ते नंतर झाकण्यात आले. त्यातून इतर ठिकाणी जाण्याचे मार्ग निघत होते, असे काही जण सांगतात. भद्रावती येथून एक भुयार या मंदिरापर्यंत येते, असेही सांगितले जाते. परंतु यातील तथ्य आणि बाकी गोष्टी तपासून

घेत या भुयाराच्या काही टप्प्याची माहिती घेतल्यास इतर काही संशोधन हाती येण्याची शक्यता आहे. महाकाली मंदिराच्या दक्षिणेला असलेली प्राचीन विहीर तिच्यावर करण्यात आलेले शिल्प आणि आज तिची झालेली अवस्था लक्षात घेता, या मंदिर परिसरात अनेक गोष्टी अजूनही उजेडात येऊ शकल्या नाहीत, त्याचा नव्याने शोध घेऊन राणी हिरातानी, राणी हिराई यांचे चंद्रपूर, महाकाली अंचलेश्वर मंदिराच्या उभारणीतील योगदान अधिक समोर आणून त्यांचे ऋण व्यक्त केले पाहिजे. गोंड समाजाच्या या महिला राण्यांनी दिलेला वारसा केवळ इतिहास म्हणून बंधिस्त न ठेवता तो पुस्तकांमधून, अभ्यासक्रमांतून यायला हवा.

**संदर्भ :**


१. चंद्रपूरची महाकाली : डॉ. रघुनाथ बोरकर, पृ. १८.

२. चंद्रपूरच्या इतिहास : अ. ज. राजूरकर, पृ. १२६.

३. कर्तृत्वशालिनी राणी हिराई : दत्ता तन्नीरवार, पृ. ९८, १०२.

४. चंद्रपूर जिल्हा गॅझेट आणि संकेतस्थळ.


***

# संदर्भसूची

१. भारतीय संस्कृतिकोश, खंड पहिला, संपादक,
पं. महादेवशास्त्री जोशी, पृ. १६.
२. भारतीय संस्कृतिकोश, खंड नववा, संपादक,
पं. महादेवशास्त्री जोशी, पृ. २४१, २४५.
३. दैत्यबळी व कंतलदेश महाराष्ट्र : डॉ. नीरज साळुंखे, पृ. ३८, ४७, ४८, ५२, १०४.
४. सिंधू संस्कृतीपूर्व गोर संस्कृती नांदत होती : प्रा. मोतीराज राठोड, पृ. ९.
५. बंजारा जमात-लोकजीवन आणि लोकगीत : डॉ. सुनील राठोड, पृ. ९३, ९४.
६. पुराणकथा आणि वास्तवता : डी. डी. कोसंबी, पृ. ९५.
७. कोप्पेश्वर (खिद्रापूर) मंदिर आणि मूर्ती : डॉ. गो. ब. देगलूरकर, पृ. ४४.
८. दास-शूद्राची गुलामगिरी, भाग-१ : शरद् पाटील,
पृ. ५२, १५८, १९४, १६३, २७१, २८७.
९. महालक्ष्मी मंदिर कोल्हापूर, एक सांस्कृतिक अध्ययन :
अरविंद जामखेडकर, पृ. १२७, १४३, २३८, २३९, २५०, २५१, २५४, २५५, २५०, २५५.
१०. भी. रा. आरवाड यांच्या 'एक गाव एक अभ्यास' या लेखातील माहिती.
११. शिखर शिंगणापूरचा श्रीशंभू महादेव : रा. चिं. ढेरे पृ. २०, २१, १२०, १२३, १६६, १७०, १७१, १७२.
१२. गाव-गाडा : त्र्यंबक नारायण अत्रे, (१९१५) पृ. २४०.
१३. महाकाली चंद्रपूरची : डॉ. र. रा. बोरकर, पृ. ७, ११, १२, १८, २१.
१४. चंद्रपूर-गडचिरोली जिल्ह्याचे पुरातत्त्व : डॉ. र. रा. बोरकर,

पृ. १७२, १७४, १९९.
१५. शिवाजीच्या हिंदवी स्वराज्याचे खरे शत्रू कोण : महमंदी की ब्राह्मणी? : कॉ. शरद् पाटील, पृ. ७४, ७८, ११७, १२३, १५५, १५६.
१६. २७ डिसेंबर २००६, रोजीचे मुंबईतील भाषण : शरद् पाटील.
१७. हिराई, स्मरणिका-२०१२ : अरुणा ढेरे, पृ. १५, १७, १८, १९.
१८. जातिव्यवस्थाक सामंती सेवकत्व : शरद् पाटील पृ. ८, ७४, १००, १०५, १०६, १६०.
१९. आचार्य रजनीश यांच्या काली याविषयावरील भाषणातील माहिती
२०. चंद्रपूरच्या देवी महाकालीची चैत्र यात्रा : आचार्य टी. टी. जुलमे, पृ. १२, १५.
२१. समय जातक तसेच जपानी सूत्र लोटस : २६ व्या आध्यावातील माहिती.
२२. सर साहिबजादा अब्दुल कय्युम संग्रहालयाने प्रसिद्ध केलेली माहिती.
२३. गांधारा गॅलरी, लाहोर, उपसंचालक, मुझीब खान यांची माहिती.
२४. महाराष्ट्र पुरातत्त्व वार्षिक अहवाल क्र. १,२००३-२००४ : पृ. ६३५,६३७, ५६३, ५६४, ५६५, ५६७, ५६८, ५६९, ५७१.
२५. कर्तृत्वशालिनी महाराणी हिराई : दत्ता तन्नीरवार, पृ. ९८, १०२, १०६, १२६, १५४, १५८.
२६. सम्राज्ञींची स्फूर्ती-शिल्पे : सुनीला सोवनी, पृ. २५, २९, ३१, ३६, ४७, ५२.
२७. चंद्रपूरचा इतिहास : अ. ज. राजूरकर, पृ. १०६, ११५, ११६, १२५, १२६, १२९, १३६, १३७, १८५.
२८. गोंडकालीन चंद्रपूर : अशोक जयराज सिंह ठाकूर, पृ. १८, १९, ३१.
२९. चंद्रपूर गॅझेट आणि जिल्हा कार्यालयातील संदर्भ.
३०. आभरान : पार्थ पोळके, पृ. २, ३, ४.
३१. दैत्य बळी व कुंतलदेश महाराष्ट्र : डॉ. नीरज साळुंखे, पृ. ५, १४७, १५२.

३२. महाराष्ट्रातील वीरगळ : सदाशिव टेटविलकर पृ. ७७, ८१.
३३. महाराष्ट्र पुरातत्त्व वार्षिक अहवालः अहवाल क्र. १, २००३-२००४ : पृ. ६३५, ६३७, ५६३, ५६४, ५६५, ५६७, ५६८, ५६९, ५७१.
३४. उस्मानाबाद जिल्ह्यातील लोकदैवते : डॉ. नवनाथ शिंदे, पृ. ५, २०, २१.
३५. मराठी संस्कृतीचे उपासक : रा. चिं. ढेरे, (मराठी विश्वकोश).
३६. बंजारा जमात : लोकजीवन आणि लोकगीत : प्रा. डॉ. सुनील राठोड, पृ. ६९, ९५.
३७. पुराणकथा आणि वास्तवता : डी. डी. कोसंबी, पृ. ११६, ११८, १३२, १२७, १५९, १६१, २७१.
३८. कुलदैवत : सरोजिनी बाबर, पृ. ६१९, ६२०,६६९.
३९. सत्यशोधक माफुआं, एप्रिल-२०००,संपादक कॉ. शरद् पाटील, पृ. २९.२
४०. मराठीतील स्त्रीधन : डॉ. सरोजिनी बाबर, पृ. ६३, ६४, ६५.
४१. मराठीतील स्त्रियांची कविता : प्रभा गणोरकर, पृ. ६५.
४२. अंधश्रद्धा, प्रश्नचिन्ह आणि पूर्णविराम : डॉ. नरेंद्र दाभोलकर, पृ. २६, २७, २८.
४३. प्रश्न मनाचे : डॉ. नरेंद्र दाभोलकर पृ. ११९, १२०, १२१.
४४. महानुभाव पंथाची त्रिमुर्ती : डॉ. यादव अढाऊ, पृ. ६.
४५. दलित, ग्रामीण साहित्यः रूढी, प्रथा परंपरा विधिकोशः संपादक, डॉ. गंगाधर पानतावणे पृ. ५४, ७०, ८१, १०२.
४६. लोकसंस्कृतीच्या उपासकाच्या लोकवाङ्मयाचे वाङ्मयीन वा सांस्कृतिक स्वरूपः डॉ. आनंद घाटुगाडे, पृ. १२४, १४४, १२५.
४७. मौखिकता आणि लोकसाहित्य : संपादक, मधुकर वाकोडे/ सुषमा करोगल, पृ. ११६.
४८. पोतराजाच्या कार्यक्रमाची माहिती : प्रा. एस. टी. चिकटे, चंद्रपूर.
४९. बुद्धिजम इन साऊथ कोसला : तरंगिनी पटेल, पृ. २७९.

50. Si-yu-ki-Buddhist Records of the Western World by Hiuen Tsang, translated by Samuel Beal, p.110-111).
51. Danger & Anger & Devotion: Hariti, Mother of Demons in the Stories & Stones of Gandhara: a Historigraphy & Catlogue of Images : Jennifer Gilmanton Rowan.
52. Buddhist Himalaya: A Journal of Nagarjuna Institute of Exact Methods : Vol. VII No. I & II (1996).
53. Hariti, Buddhist Deity: Dr Radha Banerjee Sarkar.
54. Gandhara art of Pakistan : Ahmad Hasan Dani.
55. https://buddhism.lib.ntu.edu.tw/FULLTEXT/JR-BH/bh117538.htm
56. https://core.ac.uk/download/pdf/36687517.pdf .

***

# शब्दसूची


**अ**

अंगात येणे : १५४, २१४, २९४ - ३०७

अंचलेश्वर : ३२४, ३२६, ३३०

अंधारी : ८२

अंबा : ७८, ८८, ९७

अंबाडा : २६, ३२-३३

अंबाबाई : ७८

अंबालिका : ९७

अंबिका : ७७, ९७

अंबेजोगाई : ३१४

अन्नपूर्णा : १०७

अन्नबळी : ६१

अब्दागिरी : ४५, ४८, ११५, १८२

अब्राह्मणी तंत्र : १०३, ११५

अभिसिंचन : ३९, ९८

अमेरिका : ३०३

अम्ब : ९७

**आ**

आक्रंदन : ३०

आथर्वण : २९८

आदीकारण : ११६

आदिया बल्लाळसिंह : ३२०

आद्यमाता : २३

आलमपूर : ९८

आसरा : १०, २५, ५०, ५२, ८३, ८९,

९०, ९७, २८८

आसाम : २१६, २९५

आसामी : २५५

आळंदी : २५८

आज्ञापत्र : २९७

**इ**

इरडं : ३७-३८, ४१

इंदपूर : ९६

इंद्राणी : ८६, ९६

इरई : ८२-८३

इरळद-नरळद : १४, ११०, १८३, २३५, २७८, ३४७

इळा : ८८

**उ**

उदयमती : ३१५, ३२२

उमाई : ८८

उर्वशी : ८८

उषा : ८८

**ए**

एकवीरा : ७१, २९६

एडगर केसी : ३०३-३०६

**ओ**

ओटी भरणे : ३६, ५२, ७१, ९९, १५६, १७२

**औ**

औषधी गुणधर्म : २८८

औषधी वनस्पती : २१८

औषधीसूक्त : ५८

**क**

कच्छवे : १८७, १८७, १९९

कडकलक्ष्मी : २०

कप्पे-चेन्नगिरी मंदिर : ३१५

कडजाई : ७८

कर्ण : २६५

कर्णशहा : ३१८, ३२०

कर्नाटक : २०-२६, ४७, ५२, ५९,

६६, ७९, ९८
कर्मकांड : १२४, २९८
कलगी-तुर्रा : ५३
कल्लू : ५२
कवडीच्या माळा : ४२, ४३
कवन : २७, ३०, ३९, ७१, ९२,
१०२, २२३, २७८
कांचीपूरम : ३१५
कान फुंकणे : ३५, ३७, ३७, ४०,
४३-४४, ११५
कानमंत्र : ४०
कानसवारणी : ३७-३८, ११३-११४
कामाख्या : ११२
कारण : ३५, ६०, ६५, २२२,
कुंभ : २५, ३८, ५९
कुंभार : १४, ३७, १७२, १८०
कुंभारी : १६, ९९
कुणबी : १४, २०, ६७, ७५
कुबेर : ८३
कुलटा : ११०
कुलदैवत : ८८, ११३,२९६
कुलवृक्ष : ११३
कुळांचे रक्षण : ५२
कृषिमाया : १०८, २२४
कैलास मंदिर : ३१५
कोटगिरी : १३६
कोणार्क मंदिर : ३१६
कोपेश्वर : ८६
कोरकू : ९६, ३१७
कोरडा : २०
कोल भिल्ल : ३१९
कोळी : १४, २०, ७५-७७, ८८,
१०५, १४८, १५४, १६६-१६७,
२८०
कौमारी : ८६, ९६
ख
खांडक्या बल्लाळशहा : १४२, ३१४,
३१८,३२०, ३२३, ३२७
खिद्रापूर : ८६, ९८
खेडूळा : १६, २३७, ३४८
ग
गंगम्मा : २५
गंगाखेड : १४, ८५, १५०, १७१,
१८२-१८३, १८५, २००
गंधर्व : १३०, २९७, २९८, ३०२
गजलक्ष्मी : १०७
गडचांदा-चांदा : १९, २१, ६०, १३२,
१३९, २०७-२०८, २२२, २४०,
२४६, ३२६
गडदुबाई : ७८
गडिम्हैसेम्मा : २५
गण : २७, २९, ३५, ५१, ५३, ९४,
९८, २३३-२३४,
गणधन : ३२
गणबंधू : ५१
गणांची रक्षणकर्ती : १९
गणिका : २३
गणोरकर, प्रभा : १७६, २२६-२२७
गांधार : १२२, १२७, २२८
गादी भरणे : ३५, ३७, ४५,
गुमटवेस : २१५
गुरव : २१
गुलाबी शाल : ३९, ४२
गोंड : ८२, ११२, २४४, २४६,
३२७-३२९
गोंडकालीन चित्रकला : ३२६, ३२९
गोंधळी : २१
गोखुरकुंड : ३२६
गोजेगाव : २१६, २१८
गोर देवी : ९४

गोर संस्कृती : ५८ ६०, ६३, ९१, ९२ २५८, २८०
गोविंदशहा : ३२२
गौराई : ८८
गौरी महादेवी : ३१४
घ
घुंगरावर्ण : २६
च
चंद्रपूर समाचार : ३१०
चतुर्वर्गचिंतामणी : ३०३
चापेकर, ना. गो. : २२७
चाबकाचे फटके : ३३, ४१-४२
चाबूक : २०, २७, ३१-३३, ३४, ६४, १२२, १५९, १६६, २३४,
चामुंडा : ८६, ९६, ११४, ११६, १५९, १६६, २३५
चारसद्दा : ७१, १२६, १२७, १२८
चार्वाक : ४५
चिकित्साविद्या : ४६, ५७, ११०, १२४
चेडा : ५३
चेडोबा : ५३
चोको : ६०, ६३, ९५, ९७
चौक-चौरस्ता : ३७, ५८, ६१, ६४, ७८, ९८, १०८, १२२, २६९, ३०४, ३२८
चौपट : ३७, ३९, ४०, ६३
ज
जगदंब : ९४
जगन्माता : २३
जटा : २२, २४, २७, ४८, ६७, २३१-२३२, २३५, २४१, ३१०
जनाबाई : १५०, १८२-१८३, २००
जमीनदारांचे संमेलन : ३१७-३१८
जरीपटका : ३९, ८३, ९७, २४७
जरीमरी : ५५, १७४, १८०, २५७-
जाखमाता : ५३
जीवक : १२४
जुनी रुक्मिणी : ५५, १८०, २५७,
जैन तीर्थंकर : ८२, १४८
जैनांची केवलावस्था : ११५
जोगेश्वरी : ७९
जोडगंगा : १६८, २४३
जोधपूर : ३१५
झ
झंपटनाथ : ७७
झरपट : ८३, ८५, २४७,
झोटींग : ५३
ट
टेंबलाई : ६१
ठ
ठाणं : २२, २६, १३३, १७२, १८५, १८८, १९८, २०४, २२६, २७६-२७७
ड
डफडी : २२, ३१०
त
तंत्र : ४८-५१, ५६-५७, १०२-१०३, १०८, ११०-११०, ११२, ११५, २१२, २१९, ३१४
तंत्रवाङ्मय : ७४, ११४, ११६, ३२५
तंत्र-वार्तिक : ५६
तमकूर : ७९
तलवारसिंह : ३२०
तळेगाव : ८४, १३३-१४५, २०४, २१६, २७८-२८१
तक्षशिला : १२४-१२६, १२८
तांत्रिकांचे केंद्र : ८६, १०६, ११८, १७५
तारा : ५७, ११४

तुकाई : ५३
तुळजापूर : ४२-४३, ६१, २३७
तुळशीदास महाराज : ४५, १७३, १७७, १८३
त्र
त्रिअंबा : ९७
त्रिभुवन : २२८
त्रिभुवन महादेवी : ३१४
त्रिरुप अंबा : ९७
त्रिपुरसुंदरी : ११२
त्र्यंबक : ९७, ११०,
थ
थडी पिंपळगाव : १६, १२०, १८१, १९९, २३५, २६१,
द
दंडकारण्य : ३१
दंडी महादेवी : ३१४
दत्त संप्रदाय : १५०, १८५, २४८-२४९
दनू : ८८
दाभोलकर, नरेंद्र : ३००, ३०२
दिंडीर वन : ५५
दिती : ८८
दुर्गम्मा : ६६
देगलूर : ४५, ८६, ९९, ११३, १३१, १३६, २१५-२२२
देवकन्या : ४०
देवठाणा : २०५
देवणी : ८९
देवदासी : ४७
देवी जगाडेरो : ९५
देवीचा संचार : २५, ३५, ४०, २०१, ३००
दैठणा : १४, २५, १८५, १८८, ३४६
दोड्डगवड्डवळ्ळी : ७९, ९८
द्रौपदी : ४५, १०२, १२३, २६१
ध
धुंड्या रामशहा : ६२, ३१६, ३१८-३२०
धनाची देवी : १२५
धरतीमाता : ४५
धुळोबा : ५३
न
नंदिकेश्वर : ९८
नदी देवता : ८३, २६१
नरबळी : ६१-६२, १४८, ३१८
नृसिंह वीर : ५५
नरसोबा : ८७
नरळद-इरळद : १४, ४५, ११०, १७१-१७२, १७७, १८२, २२१-२२२, २३५, २७८ ३४७
नवीन गादी : ४५
नशिराबाद : ११३
नाथावतीची बावडी : ३१५
नालंदा : १२४, २१५, २२२
निझामाबाद : १४, १३६, २१५, २२२, ३०७
निर्ऋती : १०, १७, ८३, ८६, ९०, ९३-९५, ९७
नीलकंठ शहा : ३१९-३२०
नेणिव : १४०, २९३-२९४, ३०६, ३२९
प
पंढरपूर : ५४-५५, १७२, १७९-१८०, २३८, २५७-२८५, २६०
पट फोडणे : ३४-३७, ४१
पश्चिम बंगाल : २९५
पांडव : ४६, २२८-२२९, २५६-२५७, २६१
पाच रोजाची हळद : ३५

पाथरी : १६, २५, १४७, १५७, २०१-२०२, २३७
पावराई : ८८
पानगंगा : १६८
पुनश्चर्याणंव : ३२५
पुष्करणी : २४, ३५, ३९, ७२, ८५, ८६, ८८, ९७-९८
पृथ्वी : ४३, ४६, ६३, ९४, २२९, २७३, ३१४,
पृथ्वी महादेवी : ३१४
पोचीमाय : २६, ३७, ८३, १२२, १७८, २३६, २४५, २६७, ३०२, ३०५,
पोचेम्मा : २६, ८५, ९९, ३०७
पोटफाडी : ८२
पोत्तुराजु : २३
पोत्तु : २३
पोन्नानी नदी : ८८
पोलेरम्मा : २५
प्राणहिता : ८२
फ
फटकुळी : ३३
फिरंगाई : ७८
फोडी आई : ५५, २५७
ब
बंजारा : २०, ५२-५३, ६५, ९१-९५, ९९, १११, १७९, ३०५
बंधू : ५४, २७१
बकुल महादेवी : ३१४
बडादेव : ३१६
बदकम्मा : ३८
बदामी : ८८, ९८
बम्मन पोतराज : २०
बल्लाळपूर गादी : ३१९
बल्लाळशहा : १४२, ३०८, ३२३, ३२६
बाबर, सरोजिनी : ९, ७६, २२६
बाबाजी बल्लाळशहा : ३१८
बारड : २६, ३९, ७२, ८५, ९८-९९, ११८, २०४, २१०-२११, २३६, २४४, २७६, २८५, ३४७-३४८
बारव : २४, २६, ३५, ३८-३९, ७२, ८५
बारसगाव : ४६, २०४-२१०, २८५-२८७
बावन्न वीर : ५१
बाह्मन : २९४
बिलनसिंह मडावी : १२२
बीजमंत्र : ४०
बीबी सय्यदा : १२२
बुद्धनाथ : ७१, १२२, १२८-१२९
बृहस्पती : ३०, ४५, २२८, २३०
बेडसा : ७८
बेलूर : ९८, ३१५
बेळगाव : ५२
बोधन : १३६
बोनालू : २४-२५,
ब्रह्मवेद : ११०
ब्राह्मी : ८६, ९६
भ
भंडारा : २०, ३६-४४, ५८-५९, ७६, १५१, १६०, १९४, २०७, २५७, २७९, २८९, ३०६
भटाळा : १०७
भडस्तंभ : ५४
भद्रा : ८६
भद्रावती : ७०, ३२९
भास्करभट्ट बोरीकर : १५०
भिवराई : ८८
भूमाता : १०, ३९, ९२-९३, ९६,

१२१-१२३, २२०, २२८
भैरवी : १०७
भोई : १११, १६५-१६७
भोकर : १६८, २०३, २०५, २१४, २८५
भौमकर : ३१४
म
मकलूर : १३६
मच्छिंद्रनाथ : ३०, २३४, २४९, २५६
मदनूर : १३६
मद्र देश : २९८
मरगाई : ३१
मराठा : १४-१५, २०, ६६, १११, १५१, १७९, १८५, १९४
मरियम्मा : २३, ६५, ९१, ९३-९४, ३२८
मर्गावीर : ५३
महात्मा चक्रधर : २९५
महादेव : २९-३०, ५०, १०३, १७४, १७८, ३२३
महानुभाव पंथ : १३, १५०, १८५, १९४, २४९, २५२, २९५, ३०३
महायान : ५६, ७०
महार : १४, २०-२१, १०५, ११०, १३५, १६७
महाराणी रुद्राम्बा : ३१६
महालक्ष्मी : २८, ४१, ६०-६१, ७६-७९, ८७, ९८, १०६, ११६, १८७
महासरस्वती : ७६
महिषासूर : ४६, ११५, २२८
महिषासूरमर्दिनी : १०७, ११६
महोजाचे गाव : २४४
माहेश्वरी : ८६
मांग : १४, २०-२३, ३३, ३८, ५१, ५६, ६०, ६६-६७, ८९, ९२, ११०, ११३, ११८, १३६, १४८, १५५, १६५, १६७, २०९, २१६
माणिकवती : ३१५
मातृपूजक : २९, ५१, ९१, ३१३, ३१७
मानमोडी : ७८
मायराणी : ५४
मारोतीराव महाराज दस्तापुरकर : १७६
माले-पाटील : १८६, १९४
मासोळी नदी : १७१-१७२, १७३, १७५, २३५
माहूर गड : ७७, २३६,
माळी : १४, ६७, १०५, १११, १३५, १६७,
माळ-परडी : ४२
मुस्लीम भक्तिपंथ : २४९, २७४
मेरी फ्रिअर : २२७
मैलार : ११३
मैसेम्मा : २५, ११३
मोवाड : ३१९
मोहपुरुष : ११५,
म्हसोबा : २५, ४५, ५०, ५२-५४, ८९
य
यल्लम्मा : ५९, ९७
याडी : ६५, ६७, ९१-९५, २६८-२६९
याडी मरिअम्मा : ९५, २६८-२६९
येडामाय : ३५, २३६
येडू : ८८
येरमाळा : ९८, २३६, २९२
येळेगाव : २०३-२१४, २८६-२८९
योगानंद सरस्वती : १५०
योगिनींचे केंद्र : ५६-५७, ८६

योगिनींचे मंदिर : ३१४-३१५
योगेश्वरी : ३१४
र
रंगन : २५
रंगनाथ स्वामी मोजरीकर : १५०
रंगपताका : ३१६
रत्नेश्वर : १४७, १५०
राणी की वाव : ३२२
राणीचे स्नान : ३९
राणी हिराई : ३१४-३१५, ३१९, ३२८, ३२४, ३२५
राणी हिरातानी : ३१४, ३२१, ३२४, ३२७
रामपुरी : २५, १०३, १११, १४०-१५९, १७३, २७१
रामशहा : ३१७, ३१९
रामसिंह : ३२०
रुक्मिणीमाता : १८१, २५८, २६२
रेणुका : ७८, २३७, २७९
रोहिणा : ९०
रोहिणी : ८९
ल
लखुबाई : ५५, २५८
लज्जागौरी : ८७, ९९, १००
लोकमहादेवी : ३१६
व
वज्रपाणी : ८४
वर्धा : ८३
वाघ्या-मुरळी : ४८
वायुपुराण : ९८
वाराही : ८७, ९७
व्रात्य : ८८
विजापूर : ५५, ९९
विटाळ- चंडाळ : ११२, १९६, २४२,
विठ्ठल : १७९, २५७, २६२
वीर कंगन : २५२
वीरकळ्ळु : ५३
वीरशैव : ५२
वीरोबा : ५४
वीरा, वीरो : ५३
वीरभद्र : ५३, ८७, २३५
विसोबा खेचर : १५०
वेताळ : ५४
वेद : ४६, २२९, २३४, २५६
वैनगंगा : ८३, १६८
वैष्णवी : ८७, ९७
श
शाक्त धर्म : ८८, १०८
शाक्तांचे पीठ : १०४, ११९
शिखर शिंगणापूर : २३१
शिवभाया : ५३
शिवाजी महाराज : २९७-२९८
शीतलामाता : २६, ३९
शीव : ५३, ८९, २६५, २७३-२७४,
शुकानंद महाराज : १५०
शूर्पणखा : ३१-३२, १२३
शेंदूर : ३२-३३, ५१-५२, ५४, ७०, ८६, ८९-९०, १३४, १४७, १५८, १७३, १८९
शेलगाव : १५, ३३, १३७, १६५-१६७, १६९, २८०-२८३, ३४७
शैलगृहे : ६९-७०, १२१
शैवपंथी : ३१६
शैव-वैष्णव : ११२
शैवांचे केंद्र : १४८
श्र
श्रावणबेळगोळ : ३१५
श्रावण्या पोतराज : १५८-१६३
श्रीकोच्चरी : २४, ११३, ३०७
श्रीशैलम : ९८, १०५, १११, २९७

स
संगमेश्वर : ९८
संघप्रयाक : ९८
संत नामदेव : १५०
संत बहिणाबाई : ११७-११८, १७६, १९२-१९३
संतबुवा महाराज : १५०
संत योगानंद स्वामी महाराज : १५०
सखाराम महाराज : १५०
सटवाई : ५१, ६०, ३०४
सण : ४२, ४८, ६०, ७६, ९५, २९९, ३०४-३०६
सप्तमाता : २४-२५, ४५, ५०-५१, ५६, ७६, ८१, ८६, ९०, ९४, ९७, ९९, १०८, ११४, २२८, २३४, २४८, २६९
सप्तमातृका : ७६, ८६-८९, ९७, १०७
सप्त+अम्मा : ५९
सप्तंबा : ९७
सलमकाडी : ३२
सांख्य : ५७
सात बहिण्यांचा डोंगर : ८८
साती आसरा : १०, २५, ४६, ५३, ८३, ८६, ८७-९०, ९७, २२९
साती बहिण्यांचा मेळा : ८१-८२, ८५, २४९
साने गुरुजी : २८७
सालेवार : १४, १५, ६७, १३४
सिंधु संस्कृती : ६०, ६३, ९१, ९४
सिद्धयोगिनी : ५६, २२४
सिद्धयुग : ५७
सिद्धीकाली : ११६
सूप : ३१-३२, ३६, ३८, १०३
सूर्जा बल्लाळसिंह : ३२०
सूर्यवंशी, राजाराम : ४५
सृष्टी : १०, २९, ३३, ४९, ६५, ७१, ९१-९२, १०६, ११५, २२०
सैलानी बाबा : २७५-२७७
स्वर्ग-नरक : २५३
ह
हंडरगुळी : ८९
हडप्पा : २६, ५३, ८७, ९४
हडवाडा : ३२४
हडस्ती : ८३
हरिती : २४, ७०-७१, ८३, ८६, ९८, १२१-१२९, ३०६
हलगी : ३१, ४०, ५०, १५६, १६०, २०९, २९५, ३०५-३०६
हाडाराणी की बावडी : ३१५
हारीत : १२५
हिंगुलजा : ७८
हिराकूड : ३१४
हिरा महादेवी : ३१४
हीरशहा : ३१७
होट्टल : ११३
होन : ७९
होन्नदेवी : ७९

***



महाकाली
मंदिर रचना,
गोंडकालीन
शिल्पकला.














चंद्रपूर येथील
चैत्र महिन्याच्या
यात्रेतील
काही क्षणचित्रे.















चंद्रपूर येथील
चैत्र महिन्याच्या
यात्रेतील
काही क्षणचित्रे.
























३.





१. दैठणा येथील विठामायची समाधी.
२. रामपूरी येथील भागामायची समाधी.
आणि मंदिर. ३. रामपूरी येथील श्रावण्या
पोतराजाची दूर्लक्षित झालेली समाधी,
श्रावण्या पोतराजाचे छायाचित्र.
४. विठामायची मुलगी देवकरीण
रुकमामाय आपल्या आईचा वारसा
जपताना.













१.बारडच्या मंदिरासमोरील शिल्प.
२. मातृदेवतांचा वारसा सांगणारे शिल्प.
३. इरळद-नरळद येथील देवमाय मूर्ती. ४.
रुकमामायचे समाधी मंदिर. ५. राजामायची
समाधी. ६. शेलगाव येथील यमुनामाय
मंदिर, समाधी. ७. मुंबईतील पुरातत्त्व
संचालनालयासमोरील पोतराजाचे शिल्प.










१. जलसामाय देवकरीण, थडी पिंपळगाव. २. खेडुळा येथील कार्यक्रम. ३. बारड येथे वृक्षाची पूजा करताना महिला. ४. विठामायच्या समाधी येथील कार्यक्रम. ५. चंद्रपूर यात्रेत साज भरलेले पोतराज-देवकरीण.













संजीव भागवत यांचा प्रचंड व्यासंगातून सिद्ध झालेला 'चंद्रपूरच्या महाकालीची लोकपरंपरा आणि धुरपता' हा संशोधनात्मक ग्रंथ प्रकाशित होत आहे. विविध मातृदेवता आणि त्यांच्या संबंधातील अनेकानेक प्रकारची मिथके, कथा, कर्मकांडे, चालीरीती, विधी, गीते इत्यादींचे संकलन व विश्लेषण करून त्यांच्यावर भाष्य करण्याचे महत्त्वाचे कार्य लेखकाने या ग्रंथात केले आहे. ही सर्व सामग्री मिळवण्यासाठी त्याने एका बाजूने या विषयावर ज्यांनी काम केले आहे, त्या संशोधकांच्या ग्रंथांचा अभ्यास केला आहे, तर दुसरीकडून अशा प्रकारच्या कर्मकांडांमध्ये सहभागी झालेल्या अथवा त्यांचा सखोल अभ्यास केलेल्या व्यक्तींबरोबर संवाद करण्यासाठी त्याने केवळ महाराष्ट्रातच नव्हे, तर महाराष्ट्राच्या बाहेरही अनेक प्रांतातून प्रवास केला आहे. सर्वसामान्य लोकांच्या जीवनात मातृदेवता आजही किती विविध स्वरूपात अस्तित्वात आहेत, याचे भान आपल्याला त्यांच्या या ग्रंथावरून येते. स्वतः भागवतांना पुढच्या काळात या विषयाचे आणखी नवे नवे आयाम प्राप्त होतील आणि त्यांच्या पाठीमागून येणाऱ्या संशोधकांना त्यांच्या या ग्रंथातून आपापल्या संशोधनासाठी अनेक प्रकारे आधार मिळतील, असा मला विश्वास वाटतो.

डॉ. आ. ह. साळुंखे, सातारा

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई